मूळ कन्नड लेखक

डॉ. एस. एल. भैरप्पा

अनुवाद

उमा कुलकर्णी

अवघ्या दोन वर्षांत
वीस आवृत्त्यांचा पल्ला गाठणारी
सुप्रसिद्ध कन्नड कादंबरी

आवरण



मूळ कन्नड लेखक

डॉ. एस. एल. भैरप्पा

अनुवाद

उमा कुलकर्णी

अवघ्या दोन वर्षांत
वीस आवृत्त्यांचा पल्ला गाठणारी
सुप्रसिद्ध कन्नड कादंबरी

आवरण

आवरण

मूळ कन्नड लेखक
डॉ. एस. एल. भैरप्पा

अनुवाद
उमा कुलकर्णी

मेहता
पब्लिशिंग
हाउस

‘हिंदुत्वाचा पुनशोध’

‘.... या दृष्टिकोनातून पाहता, या देशाच्या इतिहासात चुका आणि सूड, आक्रमण आणि हार यांची कधीही न संपणारी आवर्तने आजतागायत चालू असलेली दिसतात. याचा अर्थ असा नव्हे की, भूतकाळ आणि भविष्यकाळ हे कायमचे गोठलेले असतात, असे लेखक भैरप्पा मानतात! आपला पूर्वीचा विजय पुन:पुन्हा अभिनित करण्याचे ठरवणारी मुसलमान मनोवृत्ती मात्र स्पंदनशील, विरोधाभासाने भरलेले; आणि म्हणूनच सर्जनशील वाढीसाठी समर्थ असल्याचे दाखवते आहे. ... अशा हिंदुत्वामध्ये प्रा. शास्त्रींसारख्या ढोंगी माणसाबरोबरच त्याच्या कर्तव्यकठोर वडिलांनाही स्थान आहे. इस्लाममध्ये मात्र अशा विरोधाभासाला स्थानच नाही!....

लेखक : एम. एस. प्रभाकर.
‘फ्रंटलाईन’ साप्ताहिक,

‘भारतीय दा-विंची कोड!’

‘आवरण’ वाचताना डॅन ब्राऊन यांची ‘दा-विंची कोड’ मनात उसळून आली. स्वार्थी, पण प्रभावी शक्तिंनी खरा इतिहास दडपून ठेवून खोट्या इतिहासाचा प्रचार करणं, हे या दोन्ही कलाकृतींमधलं समान सूत्र. त्या कादंबरीत कॅथलिक चर्च आणि त्याच्या कुटिल कारस्थानात सहभागी असलेली ‘ओपस डे’ ही संस्था खलनायक आहेत, तर भैरप्पांच्या ‘आवरण’ मध्ये वैयक्तिक स्वार्थ आणि भीतीपोटी इस्लाम धर्माविषयी उपलब्ध असलेले रेकॉर्ड दडपून ठेवणारे इतिहासकार आणि बुद्धिजीवी हे खलनायक आहेत. हे ‘बुद्धिजीवी’ आपापल्या काळातल्या सरकारचा पाठिंबा मिळवू शकणारे शक्तिशाली गट नक्कीच तयार करू शकतात! इस्लामचं तुष्टीकरण करणं आणि त्याचं भूतकाळातलं रेकॉर्ड दडपून ठेवणं हे त्यांना राजकीयदृष्ट्या सोयीचंही ठरतं!....

लेखक : एन. एस. राजाराम
(शास्त्रज्ञ आणि इतिहासकार,
‘हिडन टॉरिझन्स : १००० इयर्स
ऑफ इंडियन सिव्हिलायझेशन’चे
डेव्हिड फ्रॉले यांच्याबरोबरचे सहलेखक)

डॉ. एस. एल. भैरप्पा

यांची

उमा कुलकर्णी

यांनी

अनुवाद केलेली पुस्तके

पर्व
वंशवृक्ष
मंद्र
काठ
तंतू

चार शब्द

डॉ. एस. एल. भैरप्पांची ही बहुचर्चित कादंबरी आता मराठीत येत आहे. ‘सार्थ’ पाठोपाठ आलेली त्यांची दुसरी ‘ऐतिहासिक’ (किंबहुना इतिहासावर आधारित) कादंबरी. कन्नडमध्ये हिच्या दोन वर्षांत बावीस आवृत्त्या निघाल्या आणि तिच्यावर दहा पुस्तके प्रकाशित झाली.

लेखनाच्या अगदी सुरुवातीपासूनच भैरप्पांनी जाती-धर्माविषयी अध्ययन करून चिंतनपर विषय मांडले आहेत. ‘धर्मश्री’ या कादंबरीत त्यांनी धर्मांतरामागील मानसिकतेचा वेध घ्यायचा प्रयत्न केला आहे, तर ‘दाटु’ (जा ओलांडुनी) या साहित्य अकादमी पारितोषिक विजेत्या कादंबरीत भारतीय जाती-व्यवस्थेमागील मानसिकतेचा परामर्श घेतला आहे. ‘पर्व’ या महाभारतावरील कादंबरी-लेखनाच्या वेळीही ते ‘सूत’ समाजाचा उहापोह करतात.

या पार्श्वभूमीवर ही कादंबरी वाचली आणि अखेरीस दिलेल्या ‘संदर्भ-ग्रंथां’ची यादी नजरेखालून घातली, तर डॉ.भैरप्पांची याविषयी असणारी कळकळ, गंभीर अध्ययन आणि चिंतन वाचकांच्या लक्षात यायला हरकत नाही.

आज केवळ भारतातच नव्हे, जगभर घडणाऱ्या अनेक अप्रिय घटनांच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी ‘बहुचर्चित’ ठरली, यात काहीच आश्चर्य नाही!

शेवटी, आजवरच्या अनुवादांप्रमाणे याही अनुवादाच्या वेळी श्री. विरूपाक्ष कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले आहे. तसेच ‘सा. सकाळ’चे संपादक श्री. सदा डुंबरे यांनीही हस्तलिखित वाचून काही सूचना केल्या. त्यांचे मन:पूर्वक आभार!

- सौ. उमा वि. कुलकर्णी

प्रवेश

विस्मरणाने सत्य झाकोळून टाकणाऱ्या मायेला ‘आवरण’ म्हणतात आणि असत्य बिंबवणाऱ्या कार्याला ‘विक्षेप’ असे म्हटले जाते. व्यक्तिगत पातळीवर चालणाऱ्या या क्रियेला ‘अविद्या’ आणि सामूहिक अथवा जागतिक पातळीवर चालणाऱ्या या क्रियेला ‘माया’ म्हटलं जातं.

वेदकर्त्यांनी मांडलेल्या या संकल्पना बौद्ध तत्त्वज्ञांनीही मान्य केल्या आहेत. ते त्यांना ‘संवृति’ म्हणतात. भारतीय जिज्ञासेच्या दोन प्रबल प्रवाहांनी कशा प्रकारे एकच संकल्पना मान्य करून तिचे प्रतिपादन केले आहे, हे काही उदाहरणांच्या आधारे पाहता येईल.

आपल्या ‘माध्यमिककारिका’मध्ये नागार्जुन म्हणतो:

द्वे सत्ये समुपाश्रित्य बुद्धानां धर्मदेशना

लोकसंवृतिसत्यं च सत्यं च परमार्थत:

लोकसंवृतिसत्य (लोकरूपामुळे आवृत्त झालेले सत्य) आणि परमार्थ सत्य नावाच्या सत्यांवर आधारित असा धर्मोपदेश बुद्धांनी केला आहे.

अभूतं ख्यापयत्यर्थं भूतमावृत्य वर्तते

ते– संवृति– नसलेला अर्थ दाखवते आणि आहे ते झाकून टाकते.

संव्रियत आव्रियते यथाभूतपरिज्ञानं स्वभावावरणात आवृत प्रकाशनाच्चानयति संवृति: अविद्या ह्यसत्पदार्थस्वरूपारोपिका स्वभावदर्शनावरणात्मिका च सती संवृतिरुत्पद्यते

ही संवृति यथावत असलेली जाणीव झाकून टाकते. तसेच आपल्या सामर्थ्याने वस्तूंचे स्वभावही झाकून टाकते.

ही अविद्या होय. ही नसलेले असल्याप्रमाणे दाखवते, सत्याचे अस्तित्व झाकून टाकते आणि स्वत:ला मिरवत राहते.

तत्वाप्रतिपत्तिर्मिथ्याप्रतिपत्तिरज्ञानमविद्येति

(संवृति) खरं आहे ते दाखवत नाही, खोटं आहे ते दाखवते. त्यामुळे हेच अज्ञान, हीच अविद्या.

– बोधिचर्यावतारपंजिका, पृ. ३५२

समंतावरणं संवृतिरज्ञानम्

संवृति हे सगळीकडून झाकोळून टाकणारं अज्ञान आहे.

– माध्यमिककारिकावृत्ति, पृ. ४९२

मोहस्वभावावरणाद्धि संवृति:

सत्यं तयाख्यातियदेव कृत्रिमम्

संवृति ही मोहात पाडणारी आहे. ही ‘कपट हेच सत्य आहे’ असं दर्शवते.

– माध्यमकावतार

वरील सर्व उदाहरणे बौद्ध-चिंतनामधील सत्य-असत्यासंबंधातील आहेत. यानंतर वेदकर्त्यांनी दिलेली दोन उदाहरणं दिली तर पुरेसं आहे.

तामसो हि प्रत्यय आवरणात्मकत्वादविद्या

विपरीतग्राहकस्संशयोपस्थापकोऽग्रहणात्मको वा

अविद्या तमोरूपी असून झाकोळून टाकणारी आहे. सत्याला विरोधी रूपात दाखवणारी. एवढंच नव्हे, संदेह निर्माण करणाऱ्या रूपात दाखवणारी अविद्या वस्तुस्थितीचं आकलन करू शकत नाही.

– शांकरगीताभाष्य.

अस्याज्ञानस्यावरणविक्षेपनामकमस्ति शक्तिद्वयम्

आवरण शक्तिस्तावदल्पोऽपि मेघोऽनेकयोजनायतमा्दित्यमंडलमवलोकयितृ

नयनपथपिधायकतयाऽच्छादयतीव ...

विक्षेपशक्तिस्तु यथा रज्ज्वज्ञानं स्वावृतरज्जौ

स्वशक्त्या सर्पादिकमुभ्दावयत्येवमज्ञानमपि

अज्ञानाला आवरण आणि विक्षेप या दोन शक्ति आहेत. एखाद्या लहानशा ढगाने मधे येऊन अनेक योजने विस्तार असलेल्या सूर्यमंडळाला दृष्टीआड करावं, त्याप्रमाणे आवरण-शक्ति सत्याला झाकोळून टाकते... अज्ञानामुळे दोर सापाप्रमाणे भासतो. तसेच, विक्षेप-शक्ति जे नाही ते असल्याप्रमाणे दाखवते.

– सदानंदीय वेदान्तसार, पृ. ३९-४०.

सत्य-असत्याची समस्या तत्त्वाच्या पातळीवर नेऊन तिचं दर्शन घडवणं हे भारतीय दर्शनशास्त्राचं वैशिष्ट्य. मला कळायला लागलं, तेव्हापासून छळणारा प्रश्न आहे हा! पाव शतकापूर्वी मी लिहिलेल्या ‘साक्षी’मध्ये ही समस्या व्यक्तिगत पातळीवर उफाळून आली होती. ‘प्रभू! खोट्याचं मूळ कुठलं? खोट्याला नाश नाही का?’ या प्रश्नापाशी कादंबरी थांबली. या प्रश्नानं कादंबरीला पूर्तता दिली असली तरी माझी बुद्धी आणि मन असमाधानीच राहिलं. तीच सत्य-असत्याची समस्या या ‘आवरण’मध्ये समूह-पातळी आणि संपूर्ण राष्ट्राच्या पातळीवर उफाळून आली आहे, असं कादंबरी लिहून संपल्यावर वाटतं आहे.

अविद्या, काम आणि कर्म (क्रिया) यांच्यापासून सोडवून घेऊन शुद्ध साक्षिभावाच्या पातळीवर पोहोचेपर्यंत आपल्याला आपल्या देशाच्या आणि मानवकुळाच्या इतिहासाचं आकलन होणं शक्य नाही.

ही माझी दुसरी ऐतिहासिक कादंबरी. आठव्या शतकातलं संधिकाळाचं अंत:सत्त्व ‘सार्थ’मध्ये कादंबरी-रूपानं मांडायचा प्रयत्न केला आहे, तर ‘आवरण’मध्ये ‘सार्थ’नंतरच्या कालखंडातल्या सत्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय इतिहासातल्या या अत्यंत व्यामिश्र कालखंडाविषयी विपुल सामग्री सापडते, पण ‘आवरण-शक्ति’ या विपुलतेकडे पूर्णत: दुर्लक्ष करून ताठ मानेनं मिरवत आहे. ‘सार्थ’मधला कालखंड ‘आवरण-शक्ति’ला फारसा बळी पडलेला नाही. त्या काळाच्या संदर्भात निर्भय होऊन सत्य लिहिणं शक्य होतं, पण ‘आवरण’मधल्या कालखंडाचं तसं नाही! इथे प्रत्येक टप्प्यावर आवरण-शक्तिला छेद देऊन पुढे जाणं अपरिहार्य ठरतं. त्यामुळे त्यासाठी सोयीस्कर असं स्वरूप आणि तंत्र इथे स्वीकारावं लागलं आहे. साहित्य ही शब्द आणि अर्थ यांच्या समरसतेची अत्युन्नत अशा पातळीवरची संवादक्रिया आहे. वाचकांपुढे

कादंबरी-विश्व उलगडून दाखवताना त्यांच्या मनात उद्भवणाऱ्या शंकांची कल्पना करून, त्यांचं निरसन करत पुढे जाण्याची गरज इथेही आहे. कादंबरीमध्ये संदर्भग्रंथ आणि पुरावे यांची खरोखरच गरज आहे का, या शंकेचं निरसन या गरजेची पार्श्वभूमी पाहता होऊ शकेल. वाचकांशी संवाद साधण्याच्या प्रक्रियेत जन्मणाऱ्या समस्यांमधून मार्ग काढण्याचं एक तंत्र म्हणूनही या यादीकडे पाहता येईल. इतिहास आणि इतिहासकार या दोघांनाही 'आवरण' कवेत घेते. इतिहासकारांची इतिहास पाहण्याची नजरच इतिहासानं झाकोळली गेली तर काय अर्थ आहे?

या कादंबरीतल्या ऐतिहासिक विषयात माझं स्वत:चं असं काहीही नाही. यातला प्रत्येक तपशील आणि चलन यांचा आधार कादंबरी या साहित्य-प्रकाराला पेलवेल एवढ्याच प्रमाणात देण्यात आला आहे. कादंबरीचं तंत्र साकारताना या दृष्टिकोनानं प्रामुख्यानं काम केलं आहे. ही गोष्ट सर्जनशील लेखक आणि दृष्टिशील वाचक समजून घेतील. इतर आधार मी नव्हे, कादंबरीतली पात्रं आपल्या वागण्यामागची कारणं सांगायची गरज म्हणून देतं. संपूर्ण कथावस्तूला हा आकार देणं, एवढंच माझं कर्तृत्व! इतिहासातल्या सत्यामध्ये कलेचा भाव उमटला असेल, तर त्या प्रमाणात हे लेखन 'साहित्य' म्हणून सफल झालंय, असं म्हणता येईल.

सत्य आणि सौंदर्य म्हणजेच सत्य आणि कला यांचा परस्पर संबंध आणि फरक हा माझ्या संशोधनाचा विषय. त्यानंतरच्या माझ्या कादंबरीकार म्हणून झालेल्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर माझं सर्जनशील अनुभवातून या समस्येवर चिंतन झालं आहे. ऐतिहासिक कथावस्तूंचं साहित्यकृतीत परिवर्तन करताना तर साहित्यिकावर सत्याविषयी आवश्यक असलेली जबाबदारी लेखन करताना मला सतत सावध करत आली आहे. संशोधनाशिवाय समकालीन विषयावर साहित्यरचना करता येतील, पण ऐतिहासिक विषयावर कलानिर्मिती करताना प्रत्येक तपशिलासाठी संशोधन गरजेचं असतं. साहित्यिकावर जबाबदारी असते, ती आपण लिहीत असलेल्या साहित्यकृतीमध्ये व्यक्त होणाऱ्या इतिहासाच्या सत्याची. सत्य आणि सौंदर्य यांची तुलना करता, साहित्यिकाची अंतिम निष्ठा सत्याकडेच असली पाहिजे. सत्याकडून सोयीनुसार उचलेगिरी करून 'मी केवळ एक कला-निर्माता आहे' म्हणून जबाबदारी झटकणं साहित्यिकाच्या दृष्टीनं योग्य नाही.

सत्य-शोधनाच्या या प्रक्रियेत वाचकही लेखकाइतकाच वाटेकरी असतो. पात्रं, प्रसंग, सत्य असो वा कला-सत्य; वाचकानं वस्तुनिष्ठपणे त्यांचं ग्रहण करून, वैयक्तिक राग-द्वेषांचा उद्रेक होऊ न देता, त्यातील भाव ग्रहण केला पाहिजे. मागे कुणीतरी केलेल्या चुकांसाठी आजचे जबाबदार नाहीत हे तर खरंच, पण आपण मागच्यांशी नातं जोडून 'आपण त्यांचे वारसदार' या भावनेत अडकणार असू, तर त्यांनी केलेल्या कर्माची जबाबदारी स्वीकारावी लागेल. आपल्या पूर्वजांच्या कुठल्या कार्याचा तिरस्कार करायचा आणि कुठल्या कर्तृत्वापासून स्फूर्ती घ्यायची, याचं जोपर्यंत आपण तारतम्य ठेवणार नाही, तोपर्यंत आपण प्रौढ होणार नाही. इतिहासाकडून मिळवण्याइतकंच, त्याच्याकडून सोडवून घेणं हे परिपक्वतेचं द्योतक आहे. प्रत्येक धर्म, जाती आणि व्यक्ती यांना लागू पडणारी ही गोष्ट आहे.

ही कलाकृती साकार करताना मला अनेक जणांनी मदत केली आहे. प्रामुख्यानं मला एका लेखक-भगिनीचा आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाचा कृतज्ञतेनं उल्लेख केला पाहिजे. त्या कुटुंबात मी पाच दिवस राहिलो, तेव्हा त्यांच्याबरोबरच त्यांच्या सुविद्य मुलांनी मुसलमानांचा रोजचा दिनक्रम आणि विशेष दिवसांचं आचरण याविषयी विस्तारानं सांगितलं. त्यांचे पतीही सतत माझ्याबरोबर राहिले. नमाजाच्या वेळी आपल्याबरोबर मला मशिदीत घेऊन गेले, आपल्या तिथल्या मित्र-मंडळींशी परिचय करून दिला. त्याचबरोबर मंगळूरच्या 'शांतिप्रकाशन'ने मुस्लीम आचार-विचाराच्या संदर्भात प्रकाशित केलेली सगळी प्रकाशने उपलब्ध करून दिली.

उत्तर भारतातल्या, त्यातही बनारसमधल्या मुसलमानांचे रीति-रिवाज माझे सहयोगी डॉ.सिद्दिकी यांनी दिवसच्या दिवस खपून मला विस्तारानं सांगितले. शिवमोग्याच्या एच. इब्राहिम साहेबांनी अनेक बारकावे सांगून माझ्या मनातलं चित्र स्पष्ट व्हायला मदत केली. या सगळ्यांचा मी ऋणी आहे. इतर तपशील मला ग्रंथांमधून मिळाला.

हंपीच्या संदर्भात माझ्या मनात काही प्रश्न होते. डॉ.एम. चिदानंदमूर्ती यांनी त्यावरची तेवढीच ठाम उत्तरं पुराव्यानिशी लिहून पाठवून मला उपकृत केलं. भारतीय धर्मशास्त्र आणि दर्शन-शास्त्र यांमधील काही संदर्भ माझ्या आठवणीमध्ये पुसट झाले होते. अष्टावधानी गणेश यांनी त्यातील निश्चित संदर्भ शोधून तर दिलेच, त्याचबरोबर या कादंबरीचं संपूर्ण हस्तलिखित वाचून त्यावर चर्चाही केली. डॉ.एस. राजस्वामी, बी. एस. चंद्रशेखर, तुलसीरामचंद्र यांनी हस्तलिखित वाचून काही सूचना दिल्या. डॉ.प्रधान गुरुदत्त यांनी अखेरच्या टप्प्यावर प्रूफं तपासली आणि त्याचबरोबर कादंबरीच्या सर्व बाजूंवर चर्चा केली. डॉ.एच.एस. गोपालराय यांनी काही दुर्मीळ ग्रंथ मिळवून दिले आणि काही दुर्मीळ नोंदी झेरॉक्स करून दिल्या.

इतरही अनेकांनी या संदर्भात मदत करून माझ्यावर उपकार केले आहेत. या क्षणी त्यांची नावं आठवत नाहीत. वेळीच त्यांची नावं आणि तपशील नोंदवून ठेवला नाही, या चुकीची जबाबदारी संपूर्णत: माझीच!

डी.टी.पी. पूर्ण झाल्यावर छपाईला देण्याआधी ही कादंबरी पंजाब आणि हरियाणाच्या उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश, कायद्यातील काही विद्वत्तापूर्ण ग्रंथांचे लेखक, झारखंड आणि बिहारचे माजी राज्यपाल एम. रामाजोईस तसेच थोर वकील, माजी कायदेमंत्री, कट्टर गांधीवादी, सार्वजनिक जीवनाचा दीर्घ अनुभव असलेले हारनहळ्ळी रामस्वामी आणि प्रख्यात वकील अशोक हारनहळ्ळी या तिघांनी बारकाईनं वाचून तिचा परामर्श घेतला आहे.

या तिन्ही कायदेतज्ज्ञांचा मी विशेष आभारी आहे.

- एस. एल. भैरप्पा,

Contact : 020-24476924 / 24460313
Website : www.mehtapublishinghouse.com
info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, without the prior written consent of the publisher and the licence holder. Please contact us at **Mehta Publishing House,** 1941, Madiwale Colony, Sadashiv Peth, Pune 30.

अनुक्रम

१

२

३

४

५

६

७

८

९

१०

११

१२

१३

१४

१५

१६

१

तुंगभद्रा धरणालगतचं सरकारी गेस्ट-हाऊस. वरच्या मजल्याच्या खिडकीतून बाहेर पाहत उभ्या असलेल्या रझियाच्या मस्तकावरचे केस गार वाऱ्याच्या झोतासरशी उडत होते. सकाळपासून भग्न हंपीत भटकल्यामुळे झालेली दमणूक त्या गार वाऱ्याच्या झोतासारखी शमत होती.

"चहा सांगू?"

आमिरचा प्रश्न तिच्या कानांत शिरला नाही. विस्तीर्ण जलाशयावरून थेट अंगावर येणाऱ्या वाऱ्यामुळे तिला तो ऐकू गेला नाही की तंद्रीत असल्यामुळे, हे त्याला समजलं नाही. 'किती लहरी आहे ही बाई! शरीर एकीकडे असलं तरी अनेकदा मन भलतीकडेच भरकटत असतं तिचं!' हे ठाऊक असूनही गप्पांचा मूड असताना तिला तिच्यापुरतं राहू देणं त्याला त्रासदायक वाटत होतं. वाऱ्यामुळे विस्तीर्ण जलाशयावर हलकेच उठणाऱ्या लाटा पाहताना तोही उत्साहित झाला होता.

"संध्याकाळच्या सोनेरी उन्हात तुझे केस कसे चामरासारखे चमकताहेत. पण ते डाय केले असतेस तर आणखी सुंदर दिसली असतीस तू!" आवाजात रोमँटिक भाव आणून तो म्हणाला.

तरीही ती त्याच्याकडे वळली नाही. काही उत्तरही दिलं नाही. अर्थात हे वाक्य तोही काही पहिल्यांदा बोलला नव्हता म्हणा! एकदा यावर तीही म्हणाली होती, "मी केसांना डाय लावेन. पण मग तुलाही तुझी दाढी रंगवावी लागेल. ओ.के.?"

'मौलाना पद्धतीची लांब दाढी असती तर रंगवता आलीही असती. पण आपली दाढी तशी नाही. मार्क्सिस्ट किंवा बुद्धिजीवी वर्गाला शोभावी अशी आपली दाढी. आठवड्यातून एकदा ती ट्रिम करावी लागते. डाय केलेली दाढी कापली जाते. म्हणून दर आठवड्याला दाढी, डाय करायला गेलं की कातडी सोलवटून निघते! शिवाय पुरुषांच्या दृष्टीनं पांढरे केस वृद्धत्वाचे निदर्शक नाहीतच. बायकांचं तसं नसतं.'

'पण तसं सांगितलं तर ही मान्य करणार नाही! पुन्हा समानतेचा विषय काढून वाद घालत राहील!' हे सगळं आठवून तो गप्प बसला.

चहा-बिस्किटं आणून दिल्यावर वेटरनं रात्रीच्या जेवणात काय करायचं, म्हणून विचारलं. तरी ती काही बोलली नाही. हॉटेलमध्ये गेल्यावर प्रत्येक वेळी जेवणाची ऑर्डर द्यायचं काम तिचंच असायचं. आता मात्र "तूच सांग" म्हणत, हातात चहाचा कप घेऊन ती पुन्हा खिडकीपाशी गेली. आमिरच म्हणाला, "चिकन पुलाव! नाही तर बिर्याणी!"

"इथे तसं काहीच मिळत नाही, सर. आज आणखी कुणी गेस्टही नाही. फक्त व्हेजिटेरियन बनवून देईन. चपाती, बटाटा-भाजी, भात, सांबार, दही." वेटरनं सांगितलं.

आमिरला राग आला. "अरे! काय रे हे! सकाळपासून फक्त व्हेज खाऊनच जीव तगवतोय. दिवसातून एकदाही नॉनव्हेज मिळालं नाही तर हाता-पायांत शक्ति कुठून येणार? अरे, सरकारी पाहुणे आहोत आम्ही. इथे जेवणाची व्यवस्था ठीक नाही म्हणून कंप्लेंट करू?"

पण यावरही वेटर तसाच असहायपणे दात विचकत उभा राहिला. सरकारी गेस्ट-हाऊसची परिस्थिती आमिरलाही नवी नव्हती म्हणा! तरीही थोडा रुबाब दाखवला नाही, तर आणखी दुर्लक्ष करतील, असा विचार करून त्यानं आवाज चढवला होता. नंतर म्हणाला, "ठीक आहे. आता जे आहे, ते करून वाढ. उद्या सकाळी ब्रेकफास्टला मात्र आम्लेट पाहिजे."

वेटरही “नक्की करतो, सर! आताच अंडी मागवून घेतो.” म्हणत निघून गेला.

दिवसभर हंपीमध्ये झालेल्या भटकंतीमुळे सगळं अंग घामानं चिकट होऊन गेलं होतं. तो बाथरूममध्ये शिरला आणि मन तृप्त होईपर्यंत शॉवरखाली उभा राहिला. अंगाला मनसोक्त साबण घासून, कपडे बदलून तो बाहेर आला तेव्हाही ती खिडकीबाहेर बघत उभी होती. त्यानं धुवून इस्त्री केलेली पँट चढवली, पायात चपला घातल्या आणि “अर्धा तास डॅमवर पाय मोकळे करून येतो.....” म्हणत तिथून बाहेर पडला.

धरणावर थंडगार वारं जाणवत होतं. ‘तसा हा सगळाच प्रदेश म्हणजे नुसती भट्टी आहे, भट्टी! त्यात हंपी म्हणजे तर नरकच! जहन्नुम! सगळं सोडून इथे का राजधानी केली यांनी? सुरक्षेच्या दृष्टीनं? बहुतेक हक्क-बुक्क हे गुराखी इथे राहत असतील. त्यामुळे केली असेल हीच राजधानी! अर्थात, हा सगळा मागचा तपशील. रझिया करेल त्यावर विचार. ती तिची जबाबदारी. पण आज संध्याकाळपासून, खरं म्हणजे दुपारपासूनच ती अशी मूडी का झालीये? कलाकार मूडीच असतात म्हणा! मीही कलाकारच आहे. पण मूडचं अवास्तव कौतुक करत बसलं, तर कामं कशी होतील? या विषयावर कितीदा तरी भांडण झालंय हिच्याशी! सिनेमा क्षेत्रात जर एखादा ‘मूड नाही’ म्हणून गप्प बसून राहिला, तर इतर शंभर जणांनी काय बोंबलत फिरायचं? आणि मग भरमसाठ पैसा ओतणाऱ्या निर्मात्यावर तर फासावर लटकायचीच पाळी! नशीब! हिचं कार्यक्षेत्र म्हणजे स्टोरी, स्क्रिप्ट, स्क्रीन-प्लेरायटिंग. प्रत्यक्ष शूटिंगमध्ये हिचा सहभाग बेताचाच असतो. पण एकही स्क्रिप्ट तिनं कबूल केलेल्या वेळेला दिलेलं नाही.’ त्याला राग आला. ‘आताही असंच करणार काय ही?’

केंद्र सरकारकडून हेरिटेज डिपार्टमेंटकडे हे काम आलं होतं. देशातल्या सगळ्या मुख्य हेरिटेज-स्थळांचं चित्रण करून त्याचा प्रसार आणि प्रचार करण्याची ही योजना होती. त्यातलं हंपीच्या चित्रणाचं काम आमिरकडे आलं होतं. त्यातही प्रेक्षकांच्या मनात मुस्लीम-विरोधी भावना निर्माण होता कामा नये, असा या मागे सरकारचा अलिखित उद्देश होता, हे सगळ्यांना ठाऊक होतं. ‘अलीकडे देशात हिंदू मूलतत्त्ववाद भडकतोय. देशातले बहुसंख्य लोकच मूलतत्त्ववादी होऊ लागले तर देशाचं ऐक्य कसं राहील? या मूलतत्त्व विचारांचा दृश्य परिणाम होऊन महिना झाला का? होय! एक महिना, आठ दिवस. संपूर्ण राष्ट्राचा ठोकाच चुकला! देशातल्या अल्पसंख्याकांच्या मनातली सुरक्षितता कोसळली. भारताचा गौरव आंतरराष्ट्रीय पातळीवर भुईसपाट करणारी ती घटना घडली. मी काही अयोध्येला प्रत्यक्ष जाऊन पाहिलं नाही म्हणा! तिथे सगळ्यांना प्रवेश करायला बंदी केलीये म्हणे. हजारो पोलिसांचा पहारा आहे. एक महिना आठ दिवस झाले. अल्पसंख्याकांचे पवित्र प्रार्थनास्थळ – बाबरी मशीद पाडली. तिथे पोलीस-पहारा ठेवणं पुरेसं नाही. देशातल्या समस्त अल्पसंख्याकांच्या मनातली सुरक्षिततेची भावना दृढ करणं आवश्यक आहे, असं वाटल्यामुळे सरकारनं हे प्रकल्प कार्यवाहीत आणायचं ठरवलंय, असंही समजलं. सरकारनं म्हणजे केंद्रात राज्य करणाऱ्या पक्षानं, जातीनिरपेक्षवाद्यांनी, डाव्या पक्षांनी शिक्षण माध्यमं यामधून, अल्पसंख्याकांना लक्षात भरेल एवढा मोठेपणा देऊन, अल्पसंख्याकांवर टीका करणाऱ्यांचा मुलाहिजा न ठेवता ते हे करताहेत. या चित्रपटाचं काम मला मिळालंय, तेही याच धोरणाचा एक भाग म्हणून? छे! तसं नसेल. प्रतिभावान दिग्दर्शक म्हणूनच हे काम माझ्याकडे आलंय, याबद्दल शंका नको. त्यांनी फक्त तेवढ्याच कारणासाठी दिलं असतं, तर मी तरी कशाला स्वीकारलं असतं म्हणा! हे काम ठरावीक दिवसांत, योग्य प्रकारे करून दिलं तर इतरही सगळी कामं मलाच देण्यात येतील, असंही त्यांनी सूचित केलंय! प्रत्येक प्रोजेक्टमध्ये आठ-दहा लाख तरी सहज सुटतील.’

‘हंपी तर या आधीही पाहिलं होतं. आता नव्यानं पाहिलं. नंतर तिनं चार-सहा ग्रंथ चाळून प्रस्तावना लिहायची आहे. मी दिग्दर्शक म्हणून कॅमेरामनला सोबत घेऊन सगळं शूट करायचं. त्यावर तिनं लिहिलेली माहिती योग्य प्रकारे पेरून डॉक्युमेंटरी तयार करायचीये. म्हणून म्हटलं, शूटिंगच्या वेळी तीही सोबत असेल तर बरं! अहं, तिनं असायलाच पाहिजे.’

‘हा फक्त मूडीपणा नाही. थोडी बधिरही वाटतेय ती! नाही, नाही. ती दमलेली आहे. ते ऊन, तापलेल्या दगडांवरून येणाऱ्या झळा. अगदी गाडीतून फिरलं तरी प्रत्येक ठिकाणी चढणं, उतरणं! काय कमी दमणूक होते? तीन दिवस सतत चाललंय हे! तीही चोपन्न वर्षांची आहे. दमणूक जाणवल्याशिवाय कशी राहील? मीही तिच्या बरोबरीचाच आहे म्हणा! मग मला का एवढी दमणूक जाणवली नाही? मस्तपैकी अंघोळ करून फ्रेश

होऊन फिरतोय. कुणीही काहीही म्हणू दे, स्त्री ही अबला असते, हे सत्य कुणीही नाकारणं शक्य नाही. शारीरिक बाबतीत तर आहेच, बुद्धी आणि मन यांच्या बाबतीतही तसंच! निसर्गाची रचना आहे ही! ही खोटी कशी असेल?' याच विचारात तो फिरत राहिला.

रात्री जेवतानाही ती विमनस्कच होती. झोपल्यावर त्यानं विचारलं, "इथं जे बघायचं होतं ते पाहून झालंय. एवढ्यात पाहून होईल हे आधी ठाऊक असतं तर आज रात्रीच बेंगळुरूला निघालो असतो. उद्याचा दिवसभर इथे गेस्ट-हाऊसवरच विश्रांती घेऊन उद्या रात्री बेंगळुरूची ट्रेन पकडू या. तुला अजून वाचून टिपणं काढायचं काम आहे, की आतापर्यंत वाचलंस, त्यावरून प्रस्तावना लिहिशील? एकेक आयटेम दाखवून प्रस्तावना वाचायची म्हटल्यावर तुला विशेष प्रकारानं नोट्स काढाव्या लागतील. बऱ्यापैकी गाईड पकडला तर थोडी-फार माहितीही मिळू शकेल."

तरीही ती काही बोलली नाही.

'हा हिचा फक्त मूड म्हणायचा की माझ्यावरचा राग? पण राग यायला मी काय केलंय? त्यानं पुन्हा एकदा संपूर्ण दिवसातल्या सगळ्या घटना आठवून पाहिल्या. तसलं काहीही आठवलं नाही. जाऊ दे! नाही तरी बायकांच्या रागाला कारण तरी कुठे हवं असतं?' त्याला पुढे काही बोलावंसं वाटलं नाही. ती कशाचंही उत्तर देत नसताना आपण होऊन पुन्हा पुन्हा विषय काढून बोलणं त्याला अपमानास्पद वाटलं. 'आत्मसन्मानापाशी येऊन ठेपणारे किती तरी प्रसंग या आधीही घडून गेले आहेत. दांपत्य-जीवनाचा एक अपरिहार्य भाग म्हणून त्याच्याकडे पाहत मी ते मागे टाकले आहेत.'

खिडकीतून थंडगार वारं येत होतं. धरणातल्या पाण्याच्या छोट्या छोट्या लाटा काठावर आपटून आत वळत असल्याचा आवाज ऐकू येत होता. खिडकीपाशी जाऊन पाहिलं तरी काहीही दिसणार नाही हे ठाऊक असल्यामुळे तो मुकाट्यानं पडून होता. काही वेळानंतर तीच बोलू लागली, "प्रस्तावना किंवा पार्श्वभूमीच्या संदर्भात लेखन करणं तितकंसं सोपं नाही. कॅमेऱ्यानं वास्तव दाखवत असताना त्या मागची खरी कारणं आपल्याला सांगावीच लागतील. नाही तर प्रेक्षक क्षणार्धात त्यातला खोटेपणा पकडतील. मानवी डोळ्यांपेक्षा कॅमेऱ्याचा डोळा हजार पटीनं शक्तिवान असतो. हा गोंधळ टाळायचा असेल तर तसे कितीतरी वास्तव संदर्भ सोडून द्यावे लागतील आणि तेच सोडले तर हंपीवरची डॉक्युमेंटरी कसली तयार करणार?"

तिनं बोलायला सुरुवात केली हे बघून त्याला थोडं हलकं वाटलं.

"हे बघ, असं मोघम बोलू नकोस. जे बोलायचं ते उदाहरणं देऊन सांग. गोंधळ, असत्य, अवास्तव असल्या प्रश्नांमधून मार्ग काढायची शक्ति कलाकारामध्ये निश्चित असते. हे तुलाही ठाऊक आहे, मलाही ठाऊक आहे. कलाकाराएवढी ती शक्ति इतर कोणातही नसते."

"ठीक आहे. उदाहरण देऊनच सांगते. उग्र नरसिंहाची मूर्ती आपण पाहिली. अर्थात तो उग्र नरसिंह आहे की लक्ष्मी-नरसिंह आहे, हे आजच्या त्याच्या भग्न अवस्थेवरून नीट समजत नाही म्हणा! काय देखणं शिल्प आहे! प्रत्येक अवयव! त्यांची प्रमाणबद्धता! समोर उभं राहून पाहताना मनात निर्माण होणारे अलौकिक भाव! त्याचे हात-पाय कुणी भग्न केले? विजय-विठ्ठल देवालय कुणी फोडलं? नरसिंहाच्या मूर्तीसाठीही एक उंच देऊळ होतं. त्यात लाकडं ठासून भरून, आग लावून देऊळ आणि मूर्तीमध्ये फट पाडल्यानंतर मूर्तीचे हात-पाय फोडलेले आहेत. विजय-विठ्ठलाच्या बाबतीतही तसंच केलंय हे तर कुणीही स्पष्टपणे पाहू शकेल. कारण जळलेल्या दगडांच्या खुणा आजही आपल्याला दिसू शकतात. हेच इतर देवळांच्याही बाबतीत झालं आहे. मूर्तींच्या बाबतीतही झालं आहे. हे सगळं कुणी, का केलं हे सांगितलं नाही तर आपलं विवरण अप्रमाणिक होईल. त्यामुळेच ते प्रभावहीनही होईल."

"ते तर सांगितलंच पाहिजे ना! मध्ययुगीन सरंजामशाही आणि त्या सरंजामशाहीला विरोध करणाऱ्यांमध्ये संघर्ष होऊन हा विध्वंस झाला, विरोधी शक्तिंनी तो केला हे आपण प्रभावीपणे सांगितलं पाहिजे. माझाही एक दृष्टिकोन आहे. समस्त बुद्धिजीवी तो पटकन मान्य करतील. त्या वेळी विजयनगर केवळ अद्वितीय असं ऐश्वर्यपूर्ण केंद्र होतं, हे सत्य आहे. इथल्या बाजारपेठेत हिरे-मोती मापट्यानं मोजले जात होते, हेही खरं! जर

एवढी सगळी संपत्ती एका ठिकाणी जमली असेल तर हे काय दर्शवतं? श्रमिकांचं रक्त शोषून भांडवलशाहीच्या अंगावर चरबी चढली होती. संपत्तीचं न्याय्य पद्धतीनं वितरण होत नव्हतं. श्रमिक वर्गामध्ये आतल्या आत विद्रोह खदखदत राहिला. त्यांनी शत्रूपक्षाशी हातमिळवणी केली. शत्रू चाल करून आले तेव्हा त्यांनी शत्रूला मदत केली. आपल्या श्रद्धांना योग्य ती फळं न देणाऱ्या, उलट आपल्या श्रमाचा फायदा घेऊन आपलं शोषण करणाऱ्या आणि देवळाच्या रूपानं मिरवणाऱ्या शक्तिविरुद्ध भावना भडकल्यामुळे त्यांनी स्वत: या देवळांमध्ये लाकडं भरून आग लावून दिली. एवढंच नव्हे तर त्यानंतरही हातोडीचे आघात करून सूड उगवला. काय! कसं काय वाटलं? अशा निवेदनाचं राष्ट्रातले सरसकट सगळे बुद्धिजीवी आनंदानं स्वागतच करतील?”

काही क्षण ती गप्प राहिली. आपल्या या नव्या व्याख्येमुळे उत्तेजित झालेल्या आमिरच्या उत्साहावर तिच्या मौनामुळे थंडगार पाणी ओतल्यासारखं झालं. थोड्या वेळानंतर ती म्हणाली, “औद्योगिक क्रांतीनंतर आलेली श्रमिक चळवळ आणि तिचं तत्त्वज्ञान कृषियुगाला जोडलं तर ते वडाची साल पिंपळाला लावल्यासारखं होईल. शिवाय आणखी एक लक्षात घ्यायला पाहिजे. या देवालयांसाठी राबणारी माणसं ताजमहालासाठी राबणाऱ्या कामगारांसारखी केवळ पोटार्थी नव्हती. ही देवळं, या मूर्ती ही त्यांच्या श्रद्धा-भक्तीचीही अभिव्यक्ती होती. त्यामुळे, त्यांना स्वत:च्या हातानं आग लावून, स्वत: हातोडीनं आघात करून भग्न करणं हे या लोकांच्या रक्तगुणाशी विसंगत आहे. युद्धामध्ये जेत्यांनी हरलेल्यांची संपत्ती लुटणं ही पटणारी गोष्ट आहे. पण हरलेल्यांची देवालयं आणि मूर्ती यांचा नाश करणाऱ्या प्रवृत्तीचं मात्र आकलन होत नाही. ”

आता तो गप्प झाला.

तीच पुढे म्हणाली, “मी लहान असताना माझ्या डोळ्यांनी पाहिलेली एक घटना सांगते. आमच्या नरसापूरचं आणि खालच्या बाजूला असलेल्या काळीनहळ्ळी या गावाचं फार जुनं एक भांडण होतं. डोंगरावर पाऊस व्हायचा ते पाणी आधी आमच्या गावाच्या तळ्यात साठायचं. आमचं तळं भरेपर्यंत ते पाणी काळीनहळ्ळीच्या तळ्याला सोडलं जायचं नाही. शेतांमध्ये ओल नसल्यामुळे त्या गावची शेतीवाडी सुकून जायची. गावातल्या विहिरी, तळ्यांचे झरेही आटून जायचे. कधीमधी फारच मोठा पाऊस होऊन आमच्या गावचं तळं भरलं तर त्यावरून पाणी वाहून जाऊन काळीनहळ्ळीच्या तळ्याला पाणी बघायला मिळायचं. साहजिकच त्या गावची नजर सतत आमच्या तळ्यावर रोखलेली!

“एका वर्षी काळीनहळ्ळीमध्ये खरोखरच दुष्काळ पडला होता. एका रात्री त्या गावचे तरुण आमच्या गावात शिरले आणि तीन डायनामाईट्स लावून आमच्या गावच्या तलावाची खालच्या अंगाची भिंत उडवून दिली. आमच्या गावचं तळं रिकामं होऊ लागलं, सगळं पाणी खालच्या तळ्याकडे वाहू लागलं. सकाळी आमचं गाव जागं झालं. वाहतं पाणी थांबण्याचा कुठलाही मार्ग दिसेना. गावभर बातमी पसरली. गावातले सगळे पुरूष एकत्र जमले. प्रत्येकाच्या हातात लाठ्या, काठ्या, कोयते, कांबी– काही ना काही हत्यारं होती. दीड मैलावरच्या काळीनहळ्ळीवर सगळे चाल करून गेले. फार मोठी हाणामारी झाली! खूप जणं जखमी झाले, हात-पाय तुटले, दोघं मेले. तेव्हा मी दहा वर्षांची होते. मारामारी बघायच्या उत्साहात धावत गेले होते. मी पोचले तेव्हा मारामारी संपली होती. आमच्या गावची माणसं माघारी वळली होती. वाटेत त्या गावचं ग्रामदैवत, काळम्माचं देऊळ होतं. तिथं येताच प्रत्येकानं हातातली हत्यारं जमिनीवर टाकली आणि देवीपुढे दंडवत घातला. ‘आई! तूच आम्हाला सांभाळ!’ म्हणत प्रार्थना केली आणि पुन्हा हत्यारं घेऊन पुढे निघाले. भांडण त्या गावकऱ्यांशी होतं. पण त्या ग्रामदेवतेपुढे मात्र सर्वांनी भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार केला. त्या गावकऱ्यांचंही तसंच होतं. आमच्या गावातून जाताना आमच्या गावच्या पांढरदेवीला नमस्कार करत, कट्ट्यावर घटकाभर विश्रांती घेऊन पुढे जायची त्यांचीही पिढ्यान्पिढ्यांची पद्धत होती. या घटनेनंतरही ही पद्धत चालूच राहिली. हे का सांगतेय मी? आर्थिक कारणांसाठी दोन समूहांत भांडण होऊन रक्त सांडलेलं असलं तरीही परस्परांच्या देवांविषयी भक्ती दाखवणं ही आमची पद्धत आहे. म्हणूनच हंपी येथील भग्न देवालयं पाहिली, की मनाचा गोंधळ उडतो.”

तो काहीही बोलला नाही. बोलायचं म्हटलं तर त्याच्या डोक्यातही बरेच मुद्दे होते. तिच्या दृष्टीनं त्यातही काही नवं नव्हतं. इतकी वर्षं एकत्र जगत असताना अनेकदा असे विषय निघत होते आणि त्यात त्या त्या दिवसाच्या

मूडप्रमाणे भरही पडत होती. सगळे मुद्दे ठाऊक असले तरी एकानं संभाषण सुरू केल्यावर त्याला पुष्टी देत देत एवढ्या मुद्द्यांची रास तयार झाली होती.

'पण आजचा हिच्या बोलण्याचा रोख नेहमीप्रमाणे नाही. दोघांमधलं ऐक्य पाहण्याऐवजी आज ही भेदांवर बोट ठेवत चालली आहे.' आता आपण काहीही बोललो तरी त्याला वादाचं स्वरूप येईल, हे जाणून तो गप्प झाला.

ती डोळे मिटून उताणी झोपली होती. त्याला खरंच झोप लागलीय, की तसाच पडून राहिलाय हे श्वासाच्या गतीवरूनही समजत नाही. शेजारी झोपूनही दोघांची मनं आणि विचार वेगवेगळ्या दिशांना धावत असतील तर हे असंच होतं, असं तिचाही एवढ्या दिवसांचा अनुभव सांगत होता. त्यालाही अनेकदा हाच अनुभव आला असेल. पण ते दोघंही कधीच अशा प्रकारच्या अनुभवांचा उच्चार करत नसत.

'डोळे उघडे असू देत किंवा बंद; डोळ्यांपुढची ती भव्य, भग्न नरसिंहमूर्ती कणभरही हलायला तयार नव्हती. नरसिंह म्हटला, की मांडीवर हिरण्यकश्यपू राक्षस आणि त्याचं फाडलेलं पोट असलं पाहिजे. पण इथे ती राक्षसाची मूर्तीच फोडून काढलीय. हंपीमध्ये असलेल्या हजारो मूर्तींपैकी हीच एक का अशी फोडली असेल, ही गोष्ट मनाला छळतेय?' तिनं स्वत:ला प्रश्न विचारला अन् थोड्याच वेळात मनातल्या आठवणींनीच त्याचंही उत्तर दिलं.

'आपल्या गावातील देवळातील नरसिंहदेवाची मूर्तीही अशीच आहे. हिरण्यकश्यपूला मांडीवर उताणं घेऊन त्याचं पोट फाडणारी. आकार एवढा मोठा नाही. आमच्या घरचा देव. माझ्या आजोबांचं नाव नरसप्पगौडा. अप्पांचं नाव नरसिंहेगौडा. त्या देवाशी, त्या घराशी, त्या धर्माशी, त्या घराण्याशी असलेले संबंध तोडून अठ्ठावीस वर्षं उलटून गेल्यानंतर आज का या हंपीच्या भग्न नरसिंहानं, नातं तुटलेल्या माहेरानं, त्या गावातल्या नरसिंहमूर्तीनं मला छळावं?'

फार वेळ उताणं झोपून पाठीला रग लागली. ती उजव्या कुशीवर वळली. याला गाढ झोप लागलीय.

'मी आमिरशीच लग्न करणार असा हट्ट धरला तेव्हा अप्पांनी शेवटचं बजावलं होतं, "तू एकटीनं तुझ्या आयुष्याचं काय करून घेतलंस, हा प्रश्न नाही. तुझ्या पोटी जन्मणारं मूल किंवा त्याचं मूल, कुठल्या ना कुठल्या पिढीत आपल्या देवालयाचा नाश करेल. ते पाप तुझ्या डोक्यावर राहील, लक्षात ठेव!"

"कुठल्या काळच्या गोष्टी बोलताय, अप्पा, तुम्ही?"

"मोगल बादशहा जहांगीर, त्याचा मुलगा शहाजहान हे सगळे हिंदू आयांच्या पोटीच जन्मले होते. राज्यावर आल्यावर त्यांनीही देवळं पाडली, मूर्ती फोडल्या. त्यांचा धर्मच तसं सांगतो म्हटल्यावर त्यांना तसं वागलंच पाहिजे. नाही का? तो धर्म आजही बदललेला नाही! बेटा, वयाच्या उन्मादामुळे तुला मी काय बोलतोय ते समजत नाहीय!"

त्याआधी कधीच अप्पा एवढ्या कठोरपणे बोलले नव्हते. शंभर टक्के गांधीवादी. एखादं धार्मिक कृत्य करावं, तितक्या निष्ठेनं रोज सकाळी दोन तास सूत-कताई करायचे. चरखा म्हणजे ध्यानसाधना, चित्तातील किल्मिष धुवून काढणारी क्रिया. रागापासून माणसाला दूर ठेवून सगळ्यांशी मिळून मिसळून वागायला ती मदत करते अशी त्यांची श्रद्धा!

आई वारली तेव्हा मी तीन वर्षांची होते, आणि अप्पा तेहतीस वर्षांचे होते. आधी ते लग्नाला तयार नव्हते. 'लग्न नको, ग्रामसेवा करत राहीन,' म्हणायचे म्हणे ते. लक्ष्मी-नरसिंह देवालयाचे पुजारी शेषशास्त्री अप्पांपेक्षा चार वर्षांनी मोठे. त्यांनी बजावलं, "नरसिंहप्पा, तू कितीही समाजसेवा कर. पण आश्रम-धर्माचं पालन केलंच पाहिजे. गृहस्थ होऊन, दारी आलेल्याला अन्न वाढलं पाहिजे. किमान दोन तरी मुलांना जन्म देऊन पितृऋण फेडलं नाहीस तर कर्तव्यभ्रष्ट होशील! तुला लग्न केलंच पाहिजे!"

याच शेषशास्त्रींनी मलाही 'परधर्मो भयावह:' असं सांगून माझं मन वळवायचा खूप प्रयत्न केला. ते मी ऐकलं नाही. पण तशीच धावत बेंगळुरूला येऊन घाबऱ्या घाबऱ्या विचारलं होतं, "आमिर! आपल्या पोटी जन्मलेलं मूल देऊळ फोडेल?"

त्यावर आमिरही म्हणाला होता, "नॉन्सेन्स! मुसलमानांच्या चेहऱ्याला काळं फासण्यासाठी उठवण्यात आलेल्या असल्या भाकडकथांवर तुझा विश्वास आहे?" अप्पांचं बोलणं खोटं सिद्ध व्हायला एवढं बोलणं पुरेसं होतं. प्रेमामध्ये ती शक्ति निश्चितच आहे. प्रेमात बुडालेल्या प्रेमिकाने उच्चारलेल्या एका वाक्यामध्ये हजारो संशोधकांनी मांडलेलं संशोधन नाकारण्याची शक्ति असते! साहजिकच त्या वयात अप्पांचं बोलणं म्हणजे म्हाताऱ्यांचं फुटकळ पुराण ठरलं.

पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये शिकत होते. आम्ही दोघंही कर्नाटकातून आलेलो. ओळख झाली, वाढली. बेंगळुरूच्या आठवणी काढत, एकमेकांना सांगत होतो. संध्याकाळी फर्ग्युसन कॉलेजमागच्या टेकडीवरच्या कातळावर बसून सूर्यास्त पाहत होतो. इतर तरुण मुला-मुलींच्या जोड्या एकमेकांना खेटून बसताना पाहत होतो. आमच्याही भावनांचा आवेग अनावर झाला की कन्नड भावगीतं, हिंदी सिनेमातली गाणी गुणगुणत होतो. 'जब प्यार किया तो डरना क्या', 'तू मेरा चांद, मैं तेरी चांदनी', 'कोरा कागज था ये मन मेरा...' अशी कितीतरी गाणी गुणगुणत होतो. एक दिवस आमिर असाच गुणगुणला, "लक्ष्मी, मनात मन गुंतलं असताना देहांना जबरदस्तीनं दूर ठेवण्यात किती वेदना आहे, नाही का?"

दोघंही समवयस्क होतो. एकत्र चित्रपट पाहताना, त्याचं तंत्र शिकताना, त्यावर चर्चा करताना, त्यानंतर एकत्र चित्रपट बनवताना एकमेकाच्या स्पर्शाचं वावडं राहिलं नव्हतं. मी तरी त्याची ती आर्जवी प्रार्थना किती दिवस नाकारत राहणार! रविवारी, सुट्टीच्या दिवशी हॉटेलवर खोली मिळवताना आम्हा दोघांनाही पैशाची चणचण जाणवत नव्हती. पण आमिर कधीही मला पैसे खर्च करू देत नव्हता. दोघांमध्ये धर्माची एवढी खोल दरी असेल याची जाणीव त्या वेळी कशी असणार म्हणा! आमिरला देह दिला नसता तर अप्पांचा हट्ट मान्य करून आमिरपासून दूर झाले असते की काय, कोण जाणे! एखाद्याला शरीर अर्पण केलं तर त्याच्याशी लग्न केल्यावाचून गत्यंतर नाही, असा गाढ विश्वास मनात असलेला काळ होता तो. तीस वर्षं झाली त्याला!

अप्पा पुढे म्हणाले होते, "त्याचंही तुझ्यावर एवढंच प्रेम असेल तर त्याला धर्म बदलू दे, नाव बदलू दे. मी स्वत: लग्न लावून देईन." हे सांगितल्यावर आमिर म्हणाला होता, "याचा अर्थ तुझ्याच मनात किंतू दिसतोय!"

"मी मुस्लीम व्हावं म्हणतोस, त्याअर्थी तुझ्या मनातही तोच किंतू आहे, नाही का?"

तो निरुत्तर झाला. मी उत्तर देण्याचा आग्रह धरला तेव्हा म्हणाला, "असं काय करतेस, लक्ष्मी? नवऱ्याच्या धर्माचं आचरण करणं ही जगात सगळीकडे चालणारी पद्धत आहे."

"पण मग मुस्लीम मुलीशी लग्न करणारी हिंदू मुलं जात बदलतात. ते का?"

"हे बघ, स्पष्टच सांगतो. आमच्या धर्मातला पुरूष असो वा स्त्री, कुठल्याही कारणानं समाजाबाहेर जाऊ लागले तर आमचा समाज सहन करत नाही. जातीबाहेर जाणाऱ्यांना ठार करतात आणि जे त्यासाठी कारणीभूत होतात, त्यांनाही ठार करतात. माझ्या दृष्टीनं आपलं दोघांचं प्रेम महत्त्वाचं आहे. आपण दोघांनी शाश्वत प्रेमाची जोडी होऊन राहणं महत्त्वाचं! धर्मावर माझाही विश्वास नाही, तुझाही विश्वास नाही. आपण दोघंही आधुनिक विचारसरणीचे आहोत. आता तू, धर्म आणि नाव बदलणं हा केवळ एक धोरणाचा भाग आहे. समाजात आमूलाग्र बदल होऊन गरिबांसाठी अफुची गोळी बनलेला धर्म समूळ नष्ट व्हायचा दिवस दूर नाही! तोपर्यंतची ही सोय म्हणूया."

त्याला झोप लागलीय. होय. श्वासोच्छवासाच्या गतीवरून लक्षात येतंय.'

ती हळूच उठली. आवाज न करता दरवाजा उघडून बाहेरच्या हॉलमध्ये, पुन्हा हलकेच दार बंद करून आली. पूर्वेच्या खिडकीकडे एक मोठी खुर्ची ओढून बाहेर पाहत बसली. पाण्यावरच्या लाटांचा फक्त आवाज

तेवढा ऐकू येत होता. चांदणं नाही.

‘इस्लामचा स्वीकार करून निकाह केल्यानंतर सहा महिन्यांत दिवस राहिले, तेव्हा माहेरची आठवण येऊ लागली. आई नसलेलं माहेर असलं तरी. त्याआधी दहा वर्षं बेंगळूरू-पुण्यात, आईच्या आठवणीशिवायच गेली होती. अप्पा ग्रामसेवा, चरखा म्हणत गावोगाव भटकत असतात. ते गावात क्वचितच असतात, हे ठाऊक असलं तरीही! “तू धर्मांतर करून जाणार असशील तर केवळ याच जन्मी नव्हे, कुठल्याही जन्मी, कसलाही संबंध राहणार नाही!” हे त्यांचं शेवटचं वाक्य आठवत असलं तरी! गांधीवादी, अहिंसावादी! ‘रागावर विजय मिळवला पाहिजे’ असा सगळ्यांना उपदेश करणारे! पंचक्रोशीत कुठेही भांडण झालं तर मधे पडून, भांडण मिटवून, ग्रामदैवतापुढे पंचायत भरवून परस्परांना प्रेमाचा विडा जाहीरपणे द्यायला लावून समेट करणारे. जातींमधील भेद खोटा आहे, असं सांगत गावातल्या विहिरी, देवळं, हॉटेलमध्ये जाऊन हरिजनांना प्रवेश द्यायचा आग्रह धरत फिरणारे अप्पा सगळ्यांना सांगायचे, ‘केवळ सरकारच्या भीतीपोटी नव्हे, भ्रातृभावानं सगळ्यांनी एकत्र येणं आवश्यक आहे!’ आणि हेच अप्पा कधी काळी, कुणीतरी, देवळं पाडली म्हणून आज आपल्या मुलीच्या बाबतीत डोळ्यांवर कातडं ओढून राहताहेत! “मी गरोदर आहे, तुम्हाला भेटायची खूप इच्छा आहे” म्हणून पत्र लिहिलं तर? किंवा मीच गावी जाऊन, ते जिथं असतील, तिथं जाऊन त्यांना भेटले तर? दिवस भरलेल्या गर्भार मुलीचं पोट बघून त्यांचं मन वितळणार नाही का? आई असती तर ती इतकी कठोर झाली असती का? तिनं अप्पांनाही एवढं कठोर होऊ दिलं असतं का? अहिंसावादी, गांधीवादी असले तरी एकदा ठरवल्यावर त्यावर ठाम राहायचा त्यांचा निश्चयी स्वभाव आठवला, की त्यांच्या पुढ्यात उभं राहायची भीती वाटत होती. त्यांचा स्वभाव हट्टी असेल तर मी तरी कुठे कमी हट्टी होते? त्यांना एवढं नको असेल तर मी तरी आपण होऊन त्यांच्या पुढ्यात का उभं राहायचं? हा हट्ट की मस्ती? काही का असेना, गेले नाही एवढं मात्र खरं! मुलगी गरोदर आहे, हे त्यांना तरी कसं समजणार म्हणा! कोण सांगणार त्यांना? हे आता सुचतंय. त्या वेळी सुचलं नाही.’

त्यांना समजण्याचा एकुलता एक दुवा म्हणजे प्रोफेसर शास्त्री. तेच योग्य. त्यांचे परंपरा मानणारे वडील शेषराय शास्त्री, आई अच्चम्मा. गोऱ्या मुलीशी लग्न करून आल्यामुळे खूप संतापले होते. त्यांनी स्वयंपाकघर वगळता, न्हाणीघरातल्या पाण्याच्या हंड्याला स्पर्श करू न देता घरी यायला परवानगी दिली होती. त्याप्रमाणे शास्त्री वर्षातून एकदा गावी जाऊन घरच्या आणि गावातल्या पाच-सहा जणांना भेटून येत होते. आगंतुकपणे खोटं खोटं हसत, खुशाली विचारत, लांब राहणाऱ्यांनाही अवघड वाटेल असं करत होते. पण मी गरोदर होते, नेमक्या त्याच कालखंडात ते एका वर्षासाठी व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून परदेशी गेले होते. ते काही का असेना, दिवस राहिले, की बाईला माहेरची आठवण एवढी का तीव्रपणे जाणवते? नवं बाळ माहेरी सगळ्यांना दाखवून यायची इच्छा इतकी का प्रबल असते?

संपूर्ण गरोदरपणात जाणवत राहिलेला प्रश्न आणि तितक्याच प्रबलपणे छळणारी इच्छा एकच होती: आई जिवंत असती तर अशा परिस्थितीत घरी बोलावल्याशिवाय राहिली असती काय? धर्मांतर करून इतर जातीत न जाता, इतर कुठल्यातरी जातीतल्या मुलाशी लग्न केलं असतं तर? तर आई गेल्यानंतर घरचं सगळं बघत स्वयंपाक करून वाढणाऱ्या निंगव्वाच्या मदतीनं अप्पांनी बाळंतपणही केलं असतं.

आणि धर्मांतर करून घरात आलेली, माहेर तोडून आलेली, एवढंच नव्हे, मुस्लीम होऊन आपल्या मुलाशी लग्न करून घरी आल्यानंतरही मुस्लीम रिवाज न पाळणाऱ्या सुनेविषयी सासूला तरी कसा विश्वास वाटेल? मी घरातल्याच एका खोलीत दिवसातून पाच वेळा नमाज करावा असा त्यांचा आग्रह होता. त्याही करायच्या. सासऱ्यांची तर गोष्टच वेगळी! आधुनिक विचारांनी प्रभावित झाल्यामुळेच आम्हा दोघांमध्ये प्रेम निर्माण झालं होतं. प्रत्येक धर्मात काही ना काही दोष आहेच. हे सगळेच धर्म भांडवलशाहीचे एजंट आहेत. गरिबांना पाजण्यासाठी म्हणून तयार केलेली अफु! या विचारानं मी इतकी प्रभावित होते की वाटलं, त्या धर्मातून, तिथल्या आचार-विचारापासून मी स्वत:ला सोडवून घेतलंय, आता या नव्या धर्मातल्या आचार-विचारात का अडकू? तसं पाहिलं तर मी ज्या धर्मात प्रवेश केला होता, तेवढी बंधनं, मी सोडून आले त्या धर्मात मुळीच नव्हती. नरसिंहदेवाचं देऊळ अथवा पांढरदेवीला हवं तेव्हा जाता येत होतं. नको असेल तरी न जायची मुभा होती. रोजचा पाच वेळा नमाज, शुक्रवारचा जबरदस्तीचा नमाज, रमजानचे सूर्योदय ते सूर्यास्तापर्यंतचे पाण्याचा थेंबही न घेता करायचे कडकडीत उपवास, जमाते इस्लामच्या माणसांनी येऊन सांगितलेले

तब्लीख नीती-नियम, सणांच्या दिवशी देण्यात येणारे पशुबळी– अशा प्रकारचे कुठलेही कडक नियम माझ्या आधीच्या धर्मात नाहीत. देवीच्या जत्रेत बकऱ्यांचा बळी दिला जायचा. सरकारी कायदा आणि अप्पांचे प्रयत्न यामुळे तिथली पशुबळीची पद्धतही पूर्णपणे बंद होऊन तिथे नैवेद्याची जागा तंबिटाचे लाडू, कोशिंबीर, नारळ, केळी यांनी घेतली होती. नरसिंहदेवाच्या पूजेप्रमाणे! पण मी ज्या धर्मात येऊन दाखल झाले होते, त्या धर्मात पशुबळी पाप आहे, हे सांगायची हिंमत कोणालाच नव्हती. असं सांगणारा जिवंत तरी राहू शकेल का? प्रवादी (सल्ललाहु अलैहि वसल्लम, अल्लाचा अनुग्रह, शांती त्यांच्यावर असू दे) मक्केच्या यात्रेला गेले तेव्हा उंटाचा बळी दिला. ज्यांची उंटाचा बळी द्यायची ताकद नसेल त्यांनी शेळ्या-बकऱ्यांचा बळी द्यावा. पशुवध हा या धर्माचरणापासून सुटा न करता येणारा एक अपरिहार्य भाग आहे.

नझीर जन्मला तेव्हा हे तीव्रतेनं लक्षात आलं. जन्मल्याच्या सातव्या दिवशी हिब्लाबिकडे तोंड करून दोन बकऱ्यांना झोपवलं आणि “इल्लिवज्जतु वज हियलिल्ल दी फरसम...”

...मी एकनिष्ठ होऊन माझं तोंड भूमी-आकाशाचा निर्माता, अल्लाहकडे केलं आहे. मी बहुईश्वरवादी नाही. माझा नमाज, माझं बलिदान, माझं जीवन, माझं मरण सगळं काही त्या सर्वलोकाच्या पालकाच्या पायाशी अर्पण आहे. तो एकटा आहे. तिथे कुणीही वाटेकरी नाही. अशी मला आज्ञा करण्यात आली आहे. मी त्याला पूर्णपणे शरण आहे. (मुस्लीम) ओ अल्लाह! हे तुला अर्पण करत आहे! तूच दिलं होतंस!” अशी प्रार्थना करून, त्यानंतर ‘बिस्मिल्लाहि अल्लाह अकबर’ म्हणत धारदार सुरी घेऊन दोन बकऱ्यांच्या माना कापत “ओ अल्ला! ही नझीरच्या वतीनं हकीक! तू याचा स्वीकार कर. तुझ्या लाडक्या मुहमदाकडून (स) आणि माझा स्नेही इब्राहिमकडून (अ) स्वीकारलंस, याचं रक्त हे मुलाचं रक्त, याचं मांस हे मुलाचं मांस, याचे केस, मुलाचे केस पर्यायी आहेत. (ओ अल्लाह! तू याचा स्वीकार कर!)” अशी प्रार्थना करत दिब्ह संपवलं. याच बळीच्या मांसाची बिर्याणी बनवून शेजारी-पाजारी, मित्र, नातेवाइकांमध्ये वाटली गेली.

त्या वेळी मी बाळंतिणीच्या खोलीत झोपले होते. मग मला दोन कोवळ्या कोकरांऐवजी दोन केळी, ओलं खोबरं, गूळ यांचा प्रसाद बनवून सगळ्यांना देण्याची पद्धत आठवली.

मीही मांस खाणाऱ्यांच्या जातीतच जन्मलेय. गांधी-प्रभावात सापडल्यानंतर अप्पा शुद्ध शाकाहारी झाले. त्यानंतर घरात मांसाचा प्रवेश पूर्णत: वर्ज्य झाला. माझ्या आईशी लग्न करताना हे त्यांनी स्पष्टपणे सांगितलं होतंच. तरीही मी कधी नातेवाईक, मित्रमंडळी, जातवाल्यांच्या घरी गेले, की मांसाचे पदार्थ खात होते. काही दिवस मात्र आमचे जातवालेही पाळायचे, त्या दिवशी तेही शाकाहारीच असत. त्यानंतर शिक्षणाच्या निमित्तानं बेंगळूरू आणि पुण्यात असताना मित्रमंडळींबरोबर हॉटेलमध्ये गेले, की नॉनव्हेज हे सर्वसाधारण खाणं असे. तरीही दयाळू देवाला पशूंच्या मांसाचा नैवेद्य देणं, ही कल्पना मनाला अस्वस्थ करून गेली. आध्यात्मिक पातळीवर अस्वस्थ करून गेली.

पण त्या संध्याकाळी प्रोफेसर शास्त्रींकडून आलेल्या फोनने माझ्या मनाला पूर्णपणे वेगळं वळण दिलं. आमिरनंच लांब वायर माझ्यापर्यंत आणून रिसिव्हर माझ्यापर्यंत आणून दिला.

“काय लक्ष्मी! काँग्रॅच्युलेशन्स! तुला रझियाऐवजी लक्ष्मी म्हटलं म्हणून रागावू नकोस! फारसा विचार न करता आपोआप तोंडून तेच नाव आलं! कारण तुझ्या गावानं तुला कितीही दूर केलं तरी माझ्या दृष्टीनं तू आमच्या गावचीच मुलगी!”

प्रोफेसरांचा आवाज ऐकून माझ्या मनाला बरं वाटलं. ते पुढे म्हणाले, “परवा रविवारी सेमिनारमध्ये आमिर भेटला होता. मुलगा झाल्याचं सांगितलं. मुलगा किंवा मुलगी! माझ्या दृष्टीनं काही फरक नाही म्हणा! तुला काँग्रॅट्स सांगणार होतो. पण दुसऱ्या दिवशी पहाटेच दिल्लीसाठी निघावं लागलं. संध्याकाळी परतलो. आज गांधीभवनमध्ये ‘गांधी आणि मार्क्स– एक तुलना’ या विषयावरच्या अभ्यास-सत्राच्या उद्घाटनासाठी गेलो होतो. तुझे अप्पा भेटले. त्यांना म्हटलं, ‘तुम्हाला नातू झालाय असं समजलं. आज सातवा दिवस म्हणे.’ ते काही बोलले नाहीत. माझं बोलणं त्यांना आवडलं नसावं. चेहऱ्यावरूनच लक्षात आलं माझ्या. मी विचारलं, ‘अजून तुम्ही जातींमधल्या फरकावर विश्वास ठेवता का? धर्मापेक्षा मानवी अंत:करण महत्त्वाचं, नाही का?’ ते

काय म्हणाले ठाऊक आहे? ‘नारायणा! इकडचं तिकडे आणि तिकडचं इकडे करणं नारदमुनींचं काम! सोडून दे तू ते!’ माझा काही त्यांच्यावर राग नाही म्हणा! माझ्या वडिलांचे ते मित्र. त्याच वयाचे आहेत. पण, धर्म कसा रक्त आणि अंत:करणाच्या नात्यामध्ये भिंत उभी करतो, हे मात्र पाहण्यासारखं आहे. म्हणूनच मी सतत सांगत असतो, जोपर्यंत धर्माचं अस्तित्व आहे, तोपर्यंत मानवता राहणार नाही. ते ठीक आहे. तुझ्याशी बोलून बरेच दिवस झाले. बाळंतपण संपू दे. नंतर एक दिवस कुठे तरी जेवायला जाऊ या.”

त्यानंतर मी अप्पांच्या बाबतीत आणखी कठोर झाले. एवढंच नव्हे, त्या धर्माविरूद्ध मनात द्वेष निर्माण झाला. होय. लाटांचा आवाज थोडा शांत झालाय. द्वेष निर्माण झाला तो त्या सोडून आलेल्या धर्माविषयी! स्वीकारलेल्या धर्माविषयी नव्हे. अहिंसेला विरोध म्हणून मांसाहाराचा त्याग करून शुद्ध शाकाहारी झालेल्या अप्पांच्या मनातली मानवताही ज्यानं निपटून काढली, तो धर्म किती वाईट म्हणायचा! त्यानंतरच मी माझे हे विचार वृत्तपत्रलेखनातून, सार्वजनिक भाषणे, सेमिनारमध्ये चर्चा यातून जाहीरपणे मांडू लागले ना! “हिंदू धर्माइतका निष्ठुर असा दुसरा धर्म नाही... सामाजिकतेची चिंता नसलेला... समानतेचा कट्टर शत्रू... सामाजिक विषमतेनं पोखरलेला... जगात इतर कुठेही न आढळणाऱ्या क्रौर्यानं भरलेला... स्त्रिया आणि दलितांवर अपरिमित अत्याचार करणारा दुसरा कुठलाही धर्म या पृथ्वीतलावर शोधूनही सापडणार नाही!... म्हणून मी त्या धर्माचा त्याग केला आणि विशाल पायावर उभ्या असलेल्या, राष्ट्रकुलांचा पाठिंबा नसताना जगभर पसरलेल्या, पसरत असलेल्या... आधुनिक समतावाद चौदाशे वर्षांपूर्वीच ज्यानं सांगितला... त्या धर्मात प्रवेश केला...” वगैरे सांगू लागले.

माझ्या या विचार-मांडणीला प्रोफेसर शास्त्री मुक्तकंठानं पाठिंबा देऊ लागले. एवढंच नव्हे, मला भाषणांमध्ये वापरण्यासाठी अनेक मुद्देही उपलब्ध करून देऊ लागले, माझ्या मुद्द्यांचं समर्थन करणारे ग्रंथ मला आणून देऊ लागले. सुरूवातीला माझ्या मनात थोडी भीतीही होती. देशात बहुसंख्येनं असलेल्या लोकांना डिवचायचं, ऐंशी टक्के लोकांच्या धर्माच्या पायाला धक्का द्यायचा, तेही उघडपणे! भीती वाटल्याशिवाय कसं राहील?

पण तसं काही घडलं नाही.

उलट, वृत्तपत्रांनी माझा पहिल्या पानावर फोटो छापून धीरोदात्त महिला म्हणून गौरवच केला. मी सेमिनारमध्ये मांडत असलेले निबंध वृत्तपत्रं संपूर्ण छापू लागली. कुठलाही क्रांतिकारी कार्यक्रम असला तर उद्‌घाटनासाठी मीच हवी, असा आग्रह सुरू झाला. बघता-बघता मला सगळ्यांनी हिरॉईन करून टाकलं. लाथा घालणाऱ्या पावलांना अभिषेक करून, तेच पाणी तीर्थ म्हणून श्रद्धा-भक्तीनं प्राशन करणाऱ्या या लोकांविषयीचा आणि धर्माविषयीचा माझा तिरस्कार आणखी वाढला. माझा नवा धर्म असा नव्हता. त्या धर्माविरुद्ध कुणी ब्र काढला तर त्याला क्षमा नाही! सगळा समाजच त्याच्याविरूद्ध उभा राहून त्याच्याकडून क्षमायाचना, दंड किंवा सुरीनं शिक्षा फर्मावतो. बाहेरचा कुणीही याविरूद्ध अवाक्षर उच्चारणार नाही, असा दरारा उत्पन्न करायचा गुण आहे या धर्मात! असा पाहिजे आत्मगौरव! अशा प्रकारे या धर्माविषयीचा अभिमान वाढला. ‘हाच स्वधर्म!’ असा कडवा विश्वास निर्माण झाला. मी घरात असताना न चुकता पाच वेळा नमाज करू लागले.

साहजिकच सासूला माझ्याविषयी प्रेम वाटू लागलं. सासरे खूष झाले. तरीही सासूला काही बाबतीत असमाधान होतं. जुन्या मुस्लीम कुटुंबांमध्ये मर्दाना आणि जनाना असे दोन भाग असायचे. पुढचा भाग मर्दाना, मागचा भाग जनाना. आत येणाऱ्याला जनाना भाग दिसू नये, अशा प्रकारे मधले दरवाजे वेगवेगळ्या प्रकारे ठेवतात. कुंपणही उंच असतं. परका पुरूष कंपाउंडपाशी आला, की त्यानं ओरडून गोशा, गोशा असं सांगायचं. त्यानंतर आतल्या बायकांनी स्वत:ला दडवून घ्यायचं. त्यानंतर घरचे पुरूष किंवा कामाच्या बायका यांनी कुंपणापर्यंत जाऊन बोलायचं ही बोलून यायची पद्धत.

मी त्या घरात पाऊल ठेवलेल्या दिवशीच सासूनं हा रिवाज मला सांगितला होता. पण मी तिकडे लक्ष दिलं नव्हतं. बुरखा घालणं तर लांबच राहिलं. कुणीही हाक मारली तरी सरळ कुंपणापर्यंत जात होते. सासू आक्षेप घेत होती, “तू अशी वागलीस तर मुस्लीम कशी होशील?” “मी सिनेमासाठी डायलॉग लिहिते, सिनेमाची गोष्ट

लिहिते. तिथे सगळीकडे 'गोशा' म्हणून चालणार नाही. मग घरात कशाला नाही तो घोळ?" मी म्हटलं.

"ते पुरूषी काम सोडून दे. मुस्लीम बाईनं मुस्लीम बाईसारखं राहण्यातच मान आहे. तरच अल्लाहचं प्रेम राहील."

"लग्नानंतरही सिनेमाचं काम करता येईल, असं तुमच्या मुलानंच सांगितलं होतं. विचारा हवं तर!" म्हणाले. साहजिकच सासू चिडली.

पण सासऱ्यांनी राग दाखवला नाही. दुसऱ्या दिवशी गोड शब्दांत म्हणाले, "मी सांगतोय ते शांतपणे ऐक. नीट समजून घे. जास्त शिकलेल्या मुलींच्या चेहऱ्यावर सौंदर्य नसतं. उन्हात फिरल्यामुळे चेहरा रापतो. व्यायाम नसतानाही सशक्त राहण्याचा विशेष गुण स्त्रियांमध्ये असतो. त्यामुळे स्त्रियांनी घराबाहेर अजिबात पडू नये."

"मी घराबाहेर पडून काम करतेय ते फक्त शरीराच्या आरोग्यासाठी नव्हे! माझ्या सर्जनशक्तिच्या अभिव्यक्तीसाठी...." सिनेमाक्षेत्राच्या संदर्भात वर्गात शिकलेलं मी त्यांना सांगितलं. पण ते त्यांना समजलं नाही. लग्न होऊन तीन वर्षं झाली तरी त्यांच्याशी माझं पटलंच नाही. "मूळ मुस्लीम मुलीशी यानं लग्न केलं असतं तर तिनं असा प्रत्येक बाबतीत उलट-जवाब दिला नसता. माझा मुलगा दिसायला देखणा आहे. सिनेमाचा डायरेक्टर आहे. त्याच्यावर आकर्षित होऊन आलेल्या बयेला आमच्या घरचे रिवाज कशाला पटतील? तिचा कशाला आमच्या धर्मावर विश्वास असेल म्हणा!...." इथपर्यंत विषय वाढला. त्यानंतर मात्र मला त्यांच्याबरोबर राहणं अशक्य वाटलं. वेगळं होण्याचा विषय मी मांडला.

पण आमिरनं याला तयारी दर्शवली नाही. "तू जुळवून घ्यायला पाहिजे. थोडं टॅक्टफुल राहिलं पाहिजे...." असं त्याचं म्हणणं.

"म्हणजे? टॅक्टफुल म्हणजे काय म्हणायचंय तुला?"

"घरी असताना आईला आवडेल असा काळा गाऊन घालायचा."

"आणि शूटिंगच्या वेळी? पब्लिसिटीसाठी कितीतरी फोटो काढून वेगवेगळ्या वृत्तपत्रांकडे पाठवायचे असतात ना? तेव्हा कुठले कपडे घालू? बुरखा घालून चेहरा लपवू? असला एक फोटो एका वृत्तपत्रात छापून आला तर माझ्या क्रांतिकारी इमेजचं काय होईल?"

यावर त्यालाही उत्तर सुचत नव्हतं. आठ बहिणींच्या पाठीवर झालेला हा एकुलता एक लाडका मुलगा. आई-वडील दुखावतील म्हणूनच केवळ नव्हे, आत डोकावून पाहिलं तर याच्यामधेही धर्माचा कर्मठपणा आहे, याचा मलाही हळूहळू प्रत्यय येत होता.

धार्मिकतेत कर्मठ म्हणून ओळखलं जाणारं त्यांचं कुटुंब होतं. प्रत्येक मुसलमान कुटुंबांमध्ये धर्म आणि परंपरेचं काटेकोरपणे पालन केलं जातं की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी म्हणूनच नेमण्यात आलेल्या हेरगिरी करणाऱ्या तब्लिखांना माझ्याविषयी समजलं. ते आले आणि त्यांनी सासू-सासऱ्यांपाशी चौकशी केली. आधीच रागानं धुमसणाऱ्या सासूनं सांगितलं, "आमचं निमूटपणे ऐकून राहणारी सून नाही ती! तुम्हीच विचारा तिला!"

दोन तब्लीख मला विचारू लागले, "तू अधून-मधून कपाळावर कुंकू लावतेस असं समजलं. खरं आहे?"

"मी सिनेमाक्षेत्रात असते. तिथला जसा प्रसंग असेल तशी माझी वेषभूषा असते."

"घरी आल्या-आल्या कुंकू पुसत नाहीस, अशी माहिती मिळाली आहे."

"कुंकू लावलंच पाहिजे असं हिंदू धर्मातले सांगतात. अजिबात लावू नये असं तुम्ही सांगता. घरी येताच पुसून टाकणं म्हणजे तेच ना! त्याचा धर्माशी काय संबंध?"

त्या दाढीवाल्या धर्म-रक्षकांना पुढे काय बोलावं ते सुचेना.

"काय संबंध? काफिरांची पद्धत ती!" ते चरफडले.

"काफीर ही शिवी झाली! याचा अर्थ अधर्म आहे, असा कुठे अर्थ होतो?"

त्या दोघांपैकी एकजण म्हणाला, "तू चुकीचं उर्दू बोलतेस. शब्द सुचला नाही की कन्नड बोलतेस."

"मल्याळी मुसलमानांना अजिबात उर्दू येत नाही. तमिळ मुसलमानांचंही तसंच आहे. उर्दूचा धर्माशी काय संबंध?" सिनेमामध्ये कठोर पारंपरिक पात्रांना शब्दांत अडकवणारे चमकदार संवाद डोकं वर काढू लागले.

"काय संबंध? क्या कहाँ?" ते एकमेकांकडे पाहू लागले.

"तू गोमांस खात नाहीस, असं आम्हाला समजलंय. खरंय?" पुन्हा धर्मपालकांनी विचारलं.

"मी जन्मले त्या धर्मात गोमांस पाप म्हणून सांगितलं आहे. इस्लाममध्ये प्रवेश करेपर्यंत हीच माझीही श्रद्धा होती. आता खायला गेले तर किळस येते. मला शक्य नाही ते! शिवाय मुसलमानानं गोमांस खाल्लंच पाहिजे, असं कुठं सांगितलंय?"

"कुठं सांगितलंय?" आता मात्र त्या दोघांनी युगुलगीत म्हटल्याप्रमाणे एका स्वरात सांगितलं, "कुठं सांगितलंय हे महत्त्वाचं नाही. तुझ्या त्या काफीर धर्माची मुळं पूर्णपणे कापून टाकली आहेस की नाही, याची परीक्षा घेण्यासाठी तुला हे तीन प्रश्न विचारले. आणखी चौकशी केली तर असले आणखी शंभर मुद्दे सापडतील."

मी त्यांना अडवून विचारलं, "समजा, एखादा मुस्लीम हिंदू झाला, तो त्याच्या पूर्वधर्मातून बाहेर आलाय की नाही हे बघायला त्याला डुकराचं मांस खाऊन दाखव म्हणून आग्रह धरणाऱ्या हिंदू परंपरावाद्यांप्रमाणे आहे तुमचा हा वाद!"

"काय? काय म्हणालीस?" दोघंही एकदम म्हणाले. नंतर लांब पांढऱ्या दाढीवाल्यांनी तेवढ्याच लांब करड्या दाढीवाल्यांना समजावून सांगितलं. नंतर करडी दाढीवाले म्हणाले, "तब्लिखांना असं उत्तर? केवढं धैर्य हे! सच्च्या धर्मात जन्मलेला आपला धर्म त्यागून दुसऱ्या धर्मात गेला तर त्यासाठी मृत्युदंड असतो हे ठाऊक नाही का तुला? मग त्यानं डुकराचं मांस खायचा प्रश्नच कुठे आला?" एवढं सांगून ते सासऱ्यांपाशी जाऊन म्हणाले, "युनस कुरेशी साहेब! तुमच्या सुनेचं बोलणं ऐकलं ना? तुम्हीच तिला नीट मार्गावर आणलं पाहिजे. नाही तर तुमच्यावर बहिष्कार टाकण्यात येईल. कुणीही तुमच्या घरी येणार नाही. घरी मयत झाली तर प्रेत उचलायलाही कुणी येणार नाही. तसे कुणी आले तर त्यांच्यावरही बहिष्कार घालण्यात येईल. तुमच्या मुलींचंही असंच होईल. तुमच्या मुलाला आम्हाला भेटायला सांगा." आणि निघून गेले.

आमिर माझ्यावर चिडला. "तू थोडी टॅक्टफुल का राहत नाहीस? त्यांनी बहिष्कार घातला तर आपली काय गत होईल याचा विचार केलास का?"

"टॅक्टफुल म्हणजे काय? मला ज्यात अर्थ दिसत नाही, ते मी का करावं?"

"अर्थ दिसत नाही म्हटलंस तर तुझा या धर्मावरच विश्वास नाही असा ते निष्कर्ष काढतील. तशी का संधी द्यायची त्यांना?"

“म्हणजे माझ्या अस्तित्वाचाच नाश करून मी बुरख्यात राहू म्हणतोस?”

“तसं नव्हे! बाहेर शूटिंगच्या वेळी कुंकू लावलंस तरी घरी येताना ते पुसायला काय हरकत आहे? बाहेर सलवार कमीज वापर. घरी येताना डोकं, चेहरा, मान झाकली जाईल अशी काळी शाल वापर आणि कधीतरी एवढंसं गोमांस खायला काय हरकत आहे? नाही तरी शेळ्या-मेंढ्याही प्राणीच आणि गाय-बैलही प्राणीच ना?”

“तूही तब्लीख सांगत होते, तेच सांगतोयस!”

तो बोलला नाही. सासू-सासऱ्यांनीही नंतर माझ्याशी बोलणं टाकलं. “हा फक्त टॅक्टचा प्रश्न नव्हता. हा माझ्या स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. आत्मगौरवाचा प्रश्न आहे हा!” हा माझा हट्ट माझ्यापुरताच राहिला. एक दिवस त्याला बरोबर घेऊन अमान रेस्टॉरंटला गेले आणि मुद्दाम गोश्त-बिर्याणी मागवून खाल्ली. त्याला आनंद झाला. हॉटेलबाहेर आल्यावर सांगितलं, “सोडून आलेल्या धर्माची पाळं-मुळं पूर्णपणे तोडून आलेय, हे दाखवायला मी खाल्लं. पण म्हणून घरात रोज खायला लागले तर तो माझ्या स्वाभिमानाचा बळी ठरेल. यानंतर तू माझी बाजू घेतली पाहिजेस. घरातला रोजचा वाद-विवाद, तब्लीखांचं भय, केवळ त्यांचं भय नव्हे, या सगळ्याला संधी दिली तर आपण नरकात जाऊ ही भीती! आज मी गोश्त खाल्लं. यानंतर घरी करतील तेव्हा का खाणार नाहीस, हा प्रश्न उपस्थित होईल. तू पुन्हा तेच तेच सांगू नकोस. त्यापेक्षा आपण एक छोटासा का होईना, फ्लॅट भाड्यानं घेऊ या. त्यांना तब्लीखांची भीतीही नको आणि नरकाचीही भीती नको. आणि आपल्यालाही रोज सकाळची कटकट नको.” मी म्हटलं.

भाड्याचं घर घेऊन निघून जाणंही एवढं सोपं नव्हतं. वडिलांचं एवढं मोठं घर सोयीचं होतं. जेवण-खाण आणि इतर खर्चासाठी आम्ही काहीच देत नव्हतो. मी घराबाहेर पडले तरी नातवाला ते अत्यंत प्रेमानं सांभाळत होते. आमचं सिनेमा-क्षेत्र, त्यातील उत्पन्नाची अनिश्चितता अशा अनेक बाबी होत्या. अडचणी होत्या, पण अशक्य नव्हतं.

शिवाय आमिर आई-वडिलांचा अत्यंत लाडका मुलगा. त्यांना उतारवयात सोडून घराबाहेर पडायला त्याचंही मन तयार नव्हतं. पण मी माझा हट्ट सोडला नाही. त्यानं सांगितलं, “मी येणार नाही. पाहिजे तर तू एकटी जा.”

“याचा अर्थ काय? तू काय बोलतोयस त्याचा अर्थ तुझा तुला समजतोय ना?”

“तू डायलॉग लिहिणारी आहेस. तूच अर्थ समजून घे.”

“तुझ्या तोंडानं सांग तू!”

“माझ्या तोंडानं सांगू? माझ्या तोंडातून ऐकणार आहेस काय?” म्हणत आपल्या डाव्या हातानं त्यानं माझी मान दाबली, वेणी घट्ट धरली आणि उजवा हात उगारला.

खोलीचा दरवाजा बंद होता. बाळ आजीपाशी होतं. मी बधिर झाले. शब्दांचं भांडण कितीही तीव्र असलं, तरी याआधी कधी त्यानं वेणी खेचून असा हात उगारला नव्हता. क्षणभर भयानं हात-पाय थंड पडले. आत्मसन्मान भुईसपाट झाला. तरीही धैर्य एकवटून म्हटलं, “हात काढ! लांब राहा! मीही हात उगारला तर तुझी गेलेली मर्दानगीची लाज पुन्हा येणार नाही.”

त्याचा उगारलेला हात तसाच राहिला. वेणीची पकड ढिली झाली. मनाचा गोंधळ डोळ्यांमध्ये उतरला. माझी नजर त्याच्या नजरेत खिळली. त्याची नजर मात्र खाली जमिनीवर लडबडली. पराभूतासारखा तो लगेच खोलीबाहेर पडला अन् त्याच पावली धाड धाड पावलं टाकत पुन्हा माझ्या समोर येऊन उभा राहिला. म्हणाला, “तुझ्यासारखीला तलाक देणं हाच एक मार्ग आहे. तुला तलाक देतोय! तलाक देतोय! तलाक देतोय!” आणि पुन्हा निघून गेला. आला तसाच धाड धाड पावलं टाकत!

क्षणभर मला तो नाटकातला किंवा सिनेमातला सीन वाटला. माझं लक्ष त्याची उभं राहण्याची पद्धत, डायलॉग फेकण्याची शैली आणि पाठोपाठ उमटलेल्या पावलांच्या आवाजाची लय यांमधील रूक्षा कलात्मकतेकडे वळलं. पण दुसऱ्याच क्षणी वास्तवतेचं भान येऊन मनाचा थरकाप उडाला. यानं खरोखरच तलाक तलाक तलाक तीन वेळा म्हटलं आहे! एका वेळी तीन वेळा तलाक म्हटल्यामुळे तलाक होतो, की अनेक महिन्यांच्या अवधीनं तीन वेळा म्हणावं लागतं? हा म्हणेल, एकाच वेळी तीनदा म्हटलं तरी पुरेसं आहे आणि तेवढं पुरेसं नाही, म्हटलं तरी काय फरक पडतोय? हा दर महिन्याला अनेकदा तलाक म्हणू शकेल. किती केलं तरी तलाक द्यायचा हक्क यालाच आहे ना! एकदा मनात त्या विचारानं प्रवेश केला, त्या अर्थी त्याच्या मनातली सहजीवनाची ओढ, प्रेम नष्ट झालं आहे. माझ्या सर्वांगाला सूक्ष्म कंप सुटला. अंतर्वस्त्र घामामुळे शरीराला चिकटली. तोल जाईल अशी भीती वाटून मी कॉटवर बसले. तिथेच आडवी झाले. बाहेर स्कूटर सुरू झाल्याचा आवाज झाला. कुठेतरी निघून जातोय. इथे खोलीतल्या प्रसंगाविषयी त्यानं आई-वडिलांना सांगितलेलं नाही. रागानं बोलला असला तरी ते स्वत:पुरतं ठेवायचा संयम त्याच्यात आहे. हे प्रकरण आई-वडिलांपर्यंत, त्यातही आईपर्यंत गेलं तर ते पुन्हा हिच्याशी संसार करू देणार नाही, याचं त्याला भानही आहे. याचाच अर्थ, आताचा हा डायलॉग मला घाबरवण्यासाठी होता. या विचारानं जीव थोडा शांत झाला.

तरीही त्याच्या तोंडून बाहेर पडलेल्या त्या शब्दानं आमच्या सहजीवनात दुरावा निर्माण झालाच.

पाठोपाठ मला आमच्या लग्नाच्या पद्धतीची आठवण झाली. त्या वेळी मला या पद्धतीमधला पूर्ण फरक लक्षात आला नव्हता. माझा विरोध होता तो धर्म बदलण्याला. माझं म्हणणं तर असंच होतं, दोघांपैकी कुणीही धर्म न बदलता रजिस्टर ऑफिसमध्ये जाऊन विवाहबद्ध व्हायचं. पण यावर, घरच्यांचा विरस होईल, नवऱ्याच्या धर्मात बायकोनं येणं, यात काहीच विशेष नाही, शिवाय तू धर्म बदलणार आहेस ते चारचौघांसाठी, आपल्या दोघांचा कुठल्याच धर्मावर विश्वास नाही हे तुलाही ठाऊक आहे, वगैरे बोलत राहिला. आणि मीही त्यावर विश्वास ठेवला ना! आता आपल्या धर्मात नवऱ्याला असलेल्या विशेष अधिकाराचा वापर करून यानं माझ्यापुढे तलाकची भाषा काढली आहे. फसवल्या गेलेल्या भावनेनं मन खदखदू लागलं. फसवून सशक्त प्राण्याला पिंजऱ्यात कोंडावं अन् मग त्याचा छळ करावा असंच वर्तन होतं हे....

तो रात्री उशिरा घरी आला. स्टँड लावलेल्या पाळण्यात दीड वर्षांचा नझीर गाढ झोपला होता. मी आमिरशी बोलले नाही. तोही न बोलता मुकाट्यानं झोपला. नेहमीप्रमाणे अंगावर हात टाकायची सलगीही दाखवली नाही. मघाशी तो निघून गेल्यावर खचलेल्या माझ्या आत्मसन्मानानं तो शेजारी दोन हात अंतरावर झोपताच, पुन्हा फणा वर काढला. वाटलं, त्याला एकदा सुनवावं, “तलाकसारखा विचार तुझ्यासारख्या सुशिक्षित आणि आधुनिक तरुणाला शोभत नाही.” पण आपण होऊन बोलायला मन तयार झालं नाही. स्वाभिमान आडवा आला.

त्यानंतर एकाच पलंगावर एकमेकांचा श्वासोच्छ्वास ऐकू येईल, एवढ्या अंतरावर झोपायचं, बोलणं मात्र बंदच झालं. पण त्याच्या आई-वडिलांना याचा वास लागला नव्हता. एका रात्री मीच विषय काढला, “आमिर! तुझ्या मनात काय आहे ते बोलून मोकळा हो.”

तो काही बोलला नाही.

“असं मौनामध्ये चेचलं जाण्यापेक्षा तोंड उघडून बोलणं चांगलं नाही का?”

“अशी कटकट करत एकत्र राहण्यापेक्षा शांतपणे वेगवेगळं राहणं चांगलं, नाही का? पहिला तलाक सांगितलाय. आणखी दोन शिल्लक आहेत. या अवधीत दोघांनी एकत्र येऊ नये, असं शास्त्र आहे. एकत्र राहूनही जुळत नाही, हे सिद्ध करण्यासाठी या अंथरूणावर झोपतोय.”

मला रडू आलं. पण त्याच्यापुढे अश्रू ढाळून मला मनाचा कमकुवतपणा दाखवायचा नव्हता. तशीच उठले. बाथरूममध्ये गेले, दार बंद करून रडले. रडू म्हणजे तापायला ठेवलेलं दूध– दोनदा ऊतू जातं, त्यानंतर नुसतंच उकळत राहतं. पुन्हा ऊतू जात नाही. दोन-तीनदा आलेला आवेग बाहेर येऊ दिला. यानंतर रडायचं

नाही असा निश्चय करून तोंड धुवून बाथरूमबाहेर आले आणि पुन्हा माझ्या जागी झोपले.

यानं दरमहा एकप्रमाणे आणखी दोनदा तलाक म्हणायची वाट बघत बसण्यापेक्षा आपणच का निघून जाऊ नये, असाही विचार मनात आला. एखादा लहान फ्लॅट घेऊन एकटीनं राहायचं. त्यासाठी भाडं, डिपॉझिट, संसाराचा खर्च एवढं मी मिळवू शकेन. पण नझीर? शरियतप्रमाणे मुलावर कुणाचा हक्क राहील? पहिला हक्क आईचा! पण मी कामानिमित्त सतत घराबाहेर राहिल्यामुळे तो त्याच्या आजी-आजोबांच्या जवळचा झाला आहे. तरीही मी त्याची जन्मदात्री आहे. माझाच त्याच्यावर पहिला हक्क! आधी त्यांच्या कायद्यांची माहिती करून घेतली पाहिजे. मन सावध झालं. आमिर झोपला होता. मी हळूच उठले. पाळण्यात झोपलेल्या नझीरपाशी गेले. त्याच्या कपाळावर ओठ ठेवले. याला सांभाळण्यासाठी एखादी बाई नेमली तर सगळं नीट होईल.

तलाकसाठी मनाची तयारी केल्यानंतर मनात आलं, प्रोफेसर शास्त्रींना भेटून माझ्यावर जे काही ओढवू पाहत आहे, त्याविषयी त्यांच्याशी चर्चा करायला हवी. त्यांनी काही सल्ला दिला, काही उपाय सांगितला तर निर्णयापर्यंत यायला मदत होईल. पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये आम्ही दोघं शिकत असताना मी आणि आमिर एकमेकांच्या प्रेमात पडलो होतो. इंग्लिशमधला 'फॉलिंग इन लव्ह' हा शब्द-प्रयोग किती अर्थपूर्ण आहे! असं त्या वेळी तीव्रपणे वाटू लागलं. प्रेमात पडताना मागचा-पुढचा, भला-बुरा कसलाही विचार सुचत नाही. नेमकं काय आणि कसं प्रेमात पडलो, हे सांगणंही अशक्य वाटावं इतक्या वेगानं घटना घडल्या. पुण्याहून बेंगळुरूला आल्यावर 'लग्न केलं पाहिजे' ही वास्तवता सामोरी आली. आम्हा दोघांच्याही पालकांनी विरोध केल्यावर, पुढाकार घेऊन आमचं लग्न लावलं, प्रोफेसर शास्त्री यांनी! अप्पांचे मित्र शेषशास्त्री यांचा मुलगा. शिक्षणासाठी इंग्लंडला गेले आणि येताना तिथलीच एक गोरी मड्डम बायको म्हणून घेऊन आले. या घटनेमुळे विद्यापीठाच्या बौद्धिक वर्तुळामध्ये त्यांना क्रांतिकारक म्हटलं जात होतं. अर्थात गोरी मुलगी बायको म्हणून घेऊन येणारे ते काही पहिले नव्हते. पण अन्य कुणालाही हे वलय प्राप्त झालं नव्हतं. आंतरजातीय प्रेमी-युगुल यांचा सल्ला घ्यायला त्यांच्यापाशी घुटमळू लागले. आम्हीही त्यांच्याशी सल्लामसलत केली. त्यातही आधी मी.

विद्यापीठातल्या त्यांच्या खोलीत पहिल्यांदा भेटायला गेले तेव्हा ते उद्गारले, "लक्ष्मी! केवढी उंच झालीस! किती मोठी आणि किती सुंदर दिसतेस. नरसापूरचं प्रादेशिक सौंदर्य, त्याला बेंगळुरूच्या नागरी भारदस्तपणाची जोड! वा! काय उत्तम कॉंबिनेशन झालंय तुझ्यात." जवळ येऊन त्यांनी आलिंगन दिलं. सिनेमाक्षेत्रात, त्याही आधी हौशी रंगभूमीवर वावरत असल्यामुळे अशी आलिंगने मला सवयीची होती. तरीही त्या आलिंगनाद्वारे त्यांनी माझ्या शरीराचं सौंदर्य जमेल तेवढं चाखल्याची मला जाणीव झाली.

काही न कळून मी 'थँक यू अंकल' म्हटलं.

यावर त्यांनी सुनावलं, "जोपर्यंत आपण या काका-पुतणीच्या नात्यातून बाहेर पडत नाही, तोपर्यंत आपण त्याच बूर्ज्वा समाजाचा भाग होऊन राहू. तू मला नारायण म्हण, शास्त्री म्हण, अगदीच संकोच वाटत असेल तर प्रोफेसर म्हण."

"तर मग प्रोफेसरच म्हणेन."

"दॅट्स गुड! बोल. गावाकडची काय बातमी? मला तर गावात प्रवेश करायलाच बंदी असल्याचं, तुलाही ठाऊक असेलच."

"मीही तुमच्याच मार्गावर आहे."

"होय? ग्रेट! कोण तो नशीबवान? माझं चुकलंच. घाई झाली माझी! आपल्याच गावात अशी एक सुगंधी कळी फुलते आहे, हे ठाऊक असतं तर इंग्लंडच्या मुलीशी मी कशाला लग्न करायला गेलो असतो? एनी वे! मॅरेजेस आर मेड इन हेवन, असं म्हणतात, ते खरं आहे तर!" म्हणताना त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणि डोळ्यांत अभिलाषा होती.

मी माझी समस्या सांगितली. मी सांगतेय, तेच तेवढं परमसत्य आहे, अशा एकाग्रतेनं त्यांनी ते ऐकून घेतलं. त्यानंतर भूत-वर्तमान-भविष्याचा वेध घेऊन शोधून काढलेलं सत्य सांगत असल्याच्या आविर्भावात ते बोलू लागले. गेली कितीतरी वर्षं मी त्यांचं बोलणं, त्यांची भाषणं ऐकतेय. माझ्यापेक्षा ते दहा वर्षांनी मोठे. जे बोलायचं, त्याला सहज-अभिनयाची जोड द्यायला त्यांना जसं जमतं, तसं कुठल्याही कसलेल्या अभिनेत्याला सुद्धा जमणार नाही. डोळ्यांमध्ये प्रवाह्याचे भाव आणून ते म्हणाले, “लक्ष्मी, क्रांतीच्या मार्गावरून वाटचाल करताना प्रत्येक व्यक्तीनं टाकलेलं एकेक पाऊल इतिहासाच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचं असतं. तू एक पाऊल उचललेलं आहेस. ते आता मागे घेऊ नकोस. तुझ्याबरोबर मी आहे. माझा मित्र-परिवार आहे. आंतरजातीय लग्नापेक्षा आंतरधर्मीय लग्न अधिक क्रांतिकारक आहे.” म्हणत ते टेबलावरून पुढे वाकले आणि माझा हात घट्ट धरला, आश्वासन देत असल्याप्रमाणे.

त्यांनीच आमिरला फोन करून बोलावून घेतलं आणि त्याच्याशी बोलले. “ती मुस्लीम होत आहे ती केवळ आजच्या सामाजिक परिस्थितीमुळे. तिच्या कुठल्याही स्वातंत्र्यावर मी आक्षेप घेणार नाही. आम्हा दोघांनाही जोडीनं सिनेमा जगतात करियर करायचं आहे. पारंपरिक जनानामध्ये ती बसून राहिली तर ते शक्य नाही, हे मला समजत नाही काय?” यानं पुन्हा तेच सांगितलं वाटतं. प्रोफेसरांनी मला एकटीलाच बोलावून सांगितलं. “क्रांतीची विशिष्ट अशी चाकोरी नाही. अनेकदा परंपरेचा वेष घालून आत शिरकाव करून घ्यावा लागतो. तरच परंपरेचा आतून नाश करणं शक्य होतं. आज हिंदू समाजातील परंपरांचा आतून नाश करण्याची खरी गरज आहे. कारण ती मेजॉरिटी कम्युनिटी आहे. तसंच मुस्लीम समाजातली पारंपरिकताही तोडली पाहिजे. तुझ्यासारखी एखादी मुस्लीम होऊन त्यात शिरली तर वाळवीनं पोखरलेल्या वृक्षाला भुईसपाट करावं तसं करता येईल. क्रांती सगळीकडून पसरली पाहिजे.”

क्रांती, प्रगती यासारखे शब्द मी बेंगळुरूमधल्या हौशी रंगभूमीवरील चळवळींच्या संदर्भात ऐकले होते. पुण्याच्या फिल्म-शिक्षणाच्या वेळी तर ‘चलतचित्र हे सामाजिक परिस्थितीविषयी प्रतिक्रिया देण्याचं माध्यम आहे. कला म्हणजे क्रिया. ती काही व्यक्तिगत ध्यान-धारणा होऊ शकणार नाही…’ अशा अर्थाचे अनेक विचार डोक्यात भरले होते. आता तेच विचार वापरून प्रोफेसर मला धर्म बदलण्यासाठी प्रवृत्त करत होते.

“आणि हे बघ लक्ष्मी, इतर कितीही दोष असले तरी, इस्लाममध्ये साम्यवाद आहे. जवळ असलेलं सगळ्यांनी आपसात वाटून खावं, असा स्पष्ट उपदेश त्यात आहे. धार्मिक पातळीवर साम्यवादाची क्रांती व्हायची असेल तर ती इस्लामच्या रंगभूमीवर शक्य आहे. बुरसटलेल्या हिंदू धर्मात ते शक्य नाही,” ते म्हणाले. थोडक्यात, मला पटेल अशा पद्धतीनं मला धर्मांतरासाठी प्रवृत्त केलं ते प्रोफेसरांनीच. एवढंच नव्हे, आमचा निकाह झाल्यावर विद्यापीठात त्यांनी स्थापन केलेल्या ‘क्रांतिकारी विद्यार्थी-संघटने’ कडून एक सामाजिक कार्यक्रम केला. खुल्या रंगमंचासमोर जमलेल्या सुमारे पन्नास विद्यार्थ्यांसमोर आम्हा नवदांपत्याला बसवलं, हार घालून सत्कार केले, स्वत: अध्यक्ष होऊन भाषण केलं. भाषणातही सामाजिक बंधनं झुगारलेलं आदर्श जोडपं म्हणून आमचा गौरव तर केलाच, त्याचबरोबर समस्त तरुण-तरुणींनी आमचा आदर्श समोर ठेवावा, असंही सांगितलं.

कार्यक्रमाचे फोटो जवळ-जवळ सगळ्या वृत्तपत्रांमधून ठळक जागेवर प्रसिद्ध झाले. चित्रपट आणि कला यांचं क्षेत्र कसं समाजाला मार्गदर्शक ठरू शकतं, याकडे लक्ष वेधणारे दोन अग्रलेखही दोन आधुनिक म्हणवणाऱ्या वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले.

अलीकडे मीही प्रोफेसरांना भेटले नव्हते. त्यांच्या घरचा फोन नंबर बदलला होता. विद्यापीठात फोन केला तर कुणी उचलणारं जागेवरच नव्हतं. बऱ्याच खटाटोपानं घरचा फोन नंबर मिळवला तेव्हा समजलं, ते सेमिनारसाठी कोलकात्याला गेले होते. रविवारी संध्याकाळी परतणार होते. पुढच्या शनिवारी पेकिंगला जाणार आहेत, सोमवारपासून शुक्रवारपर्यंत विद्यापीठात भेटता येईल. तिथं गेलं तर सुट्टीच्या वेळात त्यांची भेट होणं कठीण. त्यांच्याभोवताली माणसांचा गराडा असतो, हे मलाही ठाऊक होतं. तरीही गेले.

मला अपेक्षा होती, त्यापेक्षाही मोठा घोळका त्यांच्याभोवती होता. पाच-सहा प्रौढ तरुणी आणि दोन मुलं होती. मला पाहताच प्रोफेसरांच्या चेहऱ्यावर स्मित पसरलं... “रझिया! ठाऊक आहे ना? क्रांतिकारिणी!

फिल्म-पर्सनॅलेटी!" त्यांनी भोवतालच्या घोळक्याला माझी ओळख करून दिली. मुली आश्चर्यानं माझ्याकडे बघू लागल्या. प्रोफेसरांनीच मुलींना विचारलं, "मग? या हिरॉईनसारखं होणार ना?" नंतर मला म्हणाले, "लक्ष्मी, तू आलीस त्याअर्थी काहीतरी तेवढंच महत्त्वाचं असणार. तू असं कर, संध्याकाळी चार वाजता ये. सगळ्यांना बाहेर पिटाळून तुझ्यासाठी वेळ ठेवेन. तोपर्यंत लायब्ररीत बसून काहीतरी वाच. पाच तास थांबावं लागेल तुला."

दुसरा उपाय नव्हता.

संध्याकाळी चार वाजता गेले. "चल, इथे बसलं की माणसं घुसतात. त्यापेक्षा आपण ड्राइव्हला जाऊ या."

मलाही ते पटलं. ड्राइव्हला गेलं तर हे सलगीनं जरा इकडे-तिकडे हात लावतील, हे ठाऊक असलं तरी वाटलं, त्यामुळे काय बिघडणार आहे? नाटक-सिनेमाच्या क्षेत्रात राहायचं म्हटल्यावर एवढा सोवळेपणा बाळगून कसं चालेल? मी त्यांच्या डाव्या बाजूला बसले.

गाडी विद्यापीठाच्या बाहेरच्या बाजूला आल्यावर म्हणाले, "मोठ्या वडाच्या झाडाकडे जाऊ या? या वेळी तिथे कुणीही नसतं." नंतर माझी संमती गृहीत धरून म्हणाले, "बोल कशी आहेस?" त्यांनी डावा हात माझ्या उजव्या दंडावर ठेवला.

"कुठून सुरूवात करावी ते समजत नाही. मुस्लीम समाजात शिरून तिथल्या परंपरेविरूद्ध झगडा द्यावा म्हणून मी लग्न केलं. पण त्या परंपरेचा भाग झाल्याशिवाय त्या धर्मात राहणं अशक्य आहे."

"असं? पण तू आत का शिरलीस? तू आणि आमिर आपापल्या धर्माबाहेर येऊन विवाहबद्ध झाला असतात तर आधुनिक भारतातलं आधुनिक जोडपं ठरलं नसता काय?"

मी चमकलेच. चार वर्षांपूर्वी आपणच हा परंपरेत शिरायचा मार्ग सुचवल्याचं ते पूर्णपणे विसरले होते. हे बघून मला शॉक बसला. "असं काय करताय, सर? तुम्हीच मला असा उपदेश करून धर्मांतर करायला प्रोत्साहन दिलं होतं ना?"

"अरे हो, हो! आत्ता आठवलं थोडं, थोडं! काय झालं? सवस्तिर सांग बघू!"

मी सगळं विस्तारानं सांगून संपवलं तेव्हा आम्ही त्या मोठ्या वडाच्या झाडापाशी येऊन पोहोचलो होतो. कार थांबवून आम्ही खाली उतरलो आणि पायी चालत त्या वृक्षासमोरच्या दगडी बेंचपाशी जाऊन पोहोचलो. ते पुन्हा एकाच वेळी भविष्य, भूत, वर्तमानकाळ एकाच वेळी नजरेत पकडून ठेवावं, अशा प्रकारे त्या झाडाकडे बघत म्हणाले, "हा वटवृक्ष ही एक समर्पक प्रतिमा झालेली आहे, नाही? मूळचा वृक्ष पसरत गेला. भोवताली पारंब्या पसरल्या. त्यातल्या काही जमिनीत रूजल्या. त्यांची मुळं झाली. त्यांची पुन्हा झाडं झाली. वृक्ष झाले... आता शेकडो मुळांचा हा विशाल वृक्ष झालाय. नाही का! आता तूच सांग, या वृक्षाचं मूळचं मूळ कोणतं? वास्तव, म्हणजेच मूळचं मूळ मरून गेलंय. जमिनीत शिरलेली प्रत्येक पारंबी स्वत:च मूळचं मूळ समजतेय. आपला धर्मही असाच आहे, नाही का?"

नेहमीप्रमाणे, त्यांचं बोलणं ऐकताना आपण काहीतरी नवं ऐकतोय, असं वाटत होतं. अशा प्रकारे भूल टाकण्याची शक्ति त्यांच्या वक्तृत्वात आहे, हे एवढ्या अवधीत मलाही समजलं होतं. तरीही भूल टाकणाऱ्या बोलण्याला मुळंच नसतात, हे मात्र त्या वेळी समजलं नव्हतं. त्यामुळे मीही त्यांनी दाखवून दिलेल्या प्रतिमेनं भारावून गेले. त्यांनीही आपला उजवा हात माझ्या खांद्यावरून वेढून जवळ ओढलं, केवळ शरीरच नव्हे, दोघांच्या मनोशक्तिही एक होऊन तल्लीनता आल्याप्रमाणे, दर्शवत! संमती किंवा विरोध काहीच न दर्शवता मी त्या शेवाळलेल्या वटवृक्षाकडे इकडे तिकडे मान करत पाहत राहिले. नंतर म्हटलं, "सर, तुम्ही सांगितलं होतं, समाजवादी तत्त्वं अंगी बाणवलेला एकमेव धर्म म्हणजे इस्लाम! केवळ आपल्याला राग आला, या एकाच कारणासाठी आपलं घर, गाव, वडील, धर्म– सगळं सोडून आलेल्या बायकोविरूद्ध, आपल्या धर्मानं दिलेलं, तलाकचं अस्त्र आमिर वापरतोय! यावर मी काय करावं?"

प्रोफेसर अंतर्मुख झाल्याचं त्यांच्या अर्धोन्मीलित डोळ्यांवरून माझ्या लक्षात आलं. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले, "प्रत्येक समस्येवर उत्तर आहेच. त्याचा फोन नंबर दे."

त्यानंतर काय झालं, त्याला कुणाचा फोन आला, तो कुणाला जाऊन भेटला याविषयी मला काहीच समजत नव्हतं. सुरुवातीला आम्ही दोघंही एकमेकांना कोण भेटलं, कुणाशी काय बोलणं झालं, कुणाचा फोन आला होता याविषयी सांगत होतो. त्यानं 'तलाक' म्हटल्यानंतर दोघांमधलं या प्रकारचं बोलणं पूर्णपणे बंद झालं होतं. त्यामुळे काहीही समजत नव्हतं.

पण मी प्रोफेसरांना भेटून आल्यानंतर पाचव्या दिवशी तो आपण होऊन म्हणाला, "मी खूप विचार केला. वय झालेल्यांना बदलणं शक्य नाही. पण म्हणून रोज त्यांनी कटकट करणंही योग्य नाही. इथून स्टुडिओ लांब आहे, वेळी-अवेळी जावं लागतं तेव्हा त्रास होतो. स्टुडिओपाशीच एक भाड्याचा फ्लॅट पाहतो, तिथेही राहू, इथेही राहू असं सांगून जाऊ या. सुट्टीच्या दिवशी इथे येऊ या. इथे येऊ तेव्हा तू मुस्लीम बाईसारखं राहिलं पाहिजे. काही झालं तरी हे तिकडे येणार नाहीत."

हा सारा प्रोफेसरांच्या बोलण्याचा प्रभाव, हे मला क्षणार्धात लक्षात आलं. पण त्या संदर्भात त्यानं काहीही मला सांगितलं नाही. मीही विचारलं नाही. मन निर्धास्त झालं, एवढं मात्र खरं! स्वातंत्र्य मिळाल्यासारखं वाटलं. स्वभावत: आमिर वाईट नाही. दडपणाखाली तो तलाकविषयी बोलला असला पाहिजे, असं मलाही वाटलं. परस्परांविषयीचं किल्मिष एका दिवसात धुतलं गेलं.

प्रोफेसर पेकिंगहून परतल्यावर फोन करून भेटीची वेळ ठरवली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पाच वाजता गेले. सगळी डिपार्टमेंट्स रिकामी झाली होती. त्यांच्या खोलीत ते एकटेच होते. माझीच वाट पाहत होते. मी थोडी गडबडले. पण मला माझा आत्मविश्वास ठाऊक होता. दिवस-रात्र न बघता सिनेमा क्षेत्रात काम करणाऱ्या माझ्यासारखीला एकांतात पुरूषाला भेटण्यात असलेले धोके ठाऊक होते, पण भीती नव्हती.

आधी त्यांनी आपल्या पेकिंगच्या प्रवासाविषयी विस्तारानं सांगितलं. रशियन साम्यवादापेक्षा चिनी साम्यवाद अधिक अर्थपूर्ण आहे, आधी शेतकऱ्यांमध्ये क्रांती व्हायला हवी, लेनिन-स्टॅलिनपेक्षा माओचा दृष्टिकोन अधिक खोल आणि व्यापक आहे वगैरे... बाबतीत तल्लीन होऊन बोलत राहिले. तेवढ्या वेळापुरती मी त्यांची विद्यार्थिनी झाले होते आणि ते खरोखरच प्रोफेसर– गुरू झाले होते. माझ्या एकटीसाठी तासभर स्फूर्तिदायक भाषण केल्यावर मीच त्यांना माझ्या विषयाकडे वळवलं.

"वेगळा फ्लॅट घेऊन राहायला जाऊ या, असं आमिर म्हणाला. आता फ्लॅट शोधतोय. त्यानं हे घरीही सांगितलंय. मला ठाऊक आहे, हे तुमच्याशिवाय आणखी कुणालाही शक्य नाही! काय सांगितलं तुम्ही त्याला? तो काय म्हणाला? तुमच्याकडूनच ऐकावं, म्हणून आलेय."

"ओ! ते होय! आमिरला फोन करून बोलावून घेतलं इथेच. तू बसलीस त्याच खुर्चीवर बसला होता. ही इज ए गुड बॉय! त्याला म्हटलं, लग्नानंतर आई-वडिलांबरोबर राहणं ही बूर्ज्वा पद्धत आहे. आपल्या जबाबदारीवर आपला संसार उभा करणं ही आधुनिकता आहे. भांडवलशाहीवादी असेल किंवा समाजवादी असेल, तू एखाद्या सुशिक्षित, तेही थिएटर– सिनेमाशी संबंधित मुस्लीम मुलीशी लग्न केलं असतंस तरी, तुझ्या आई-वडिलांशी तेढ आलीच असती. तेव्हा काय केलं असतंस? आमच्या मुलीला तू तलाक दिलास तर बातमी सगळीकडे पसरेल. तू एक कलाकार आहेस, डायरेक्टर, सार्वजनिक व्यक्ती. सार्वजनिक व्यक्तीच्या प्रत्येक खासगी वागण्याला सार्वजनिक आयाम असतो. त्याचा परिणामही होत असतो. एका हिंदू मुलीला भुरळ पाडून तिच्याशी लग्न करून त्यानंतर असा गटारात फेकून देतोयस, ही बातमी समजली तर लोक तुझ्या सिनेमांवर बहिष्कार टाकतील. कुठलाही प्रोड्यूसर तुला संधी देणार नाही. आधुनिक समूह तुझ्याविरूद्ध निषेधसभा घेतील, मोर्चे काढतील, धरणं धरतील. पेपरवाल्यांना हीच सामग्री होईल, तेव्हा काय करशील? तुझ्यासारखी प्रसिद्ध व्यक्ती असं वागायला लागली तर आंतरधर्मीय लग्नं करणाऱ्या तरुणांचा उत्साह नष्ट नाही का होणार? हीच तुझी सामाजिक जाणीव?... असं बरंच बोललो. तो वितळत चालल्याचं मलाही दिसत होतं. यानंतर त्याच्याकडून तुला कुठल्याही प्रकारचा त्रास झाला तर मला सांग. मी सगळं ठीक करेन!"

म्हणत ते खदखदून हसले.

"थँक्यू सर! मेनी मेनी थँक्स!" म्हणत मीही टेबलावरून हात देऊन शेकहँड केला.

"सर...."

"सर म्हणालीस की मला राग येतो. तू आमच्या गावची मुलगी! माझ्या वडिलांच्या सख्ख्या मित्राची मुलगी. तुझ्यावर माझा आणि माझ्यावर तुझा विशेष अधिकार आहे. हो की नाही?"

मी उत्तर द्यायचं टाळलं. त्यांनी पुन्हा तोच प्रश्न विचारून उत्तर द्यायचा आग्रह केला.

"उत्तर दिलंच पाहिजे?"

"जाऊ दे. प्रत्येक गोष्ट तोंडानं स्पष्टपणे सांगितलीच पाहिजे, असं कुणी सांगितलंय? अरे हो! काळीनहळ्ळीचे एकजण भेटले होते. शिवेगौडा त्यांचं नाव. गप्पा मारता मारता म्हणाले, तुझ्या वडिलांनी अलीकडे सार्वजनिक कार्यं कमी केली आहेत. कमी काय, पूर्णपणेच सोडून दिली आहेत म्हणे. घरात बसून सतत काहीतरी वाचत असतात, असं सांगत होते ते!"

अप्पांविषयी क्वचितच मला समजायचं. जे समजायचं, तेही यांच्याकडूनच. गोरी बायको करून हे घराबाहेर पडले. पण माझ्याप्रमाणे त्यांनी धर्मांतर केलं नसल्यामुळे यांना कुणी गावाबाहेर काढलेलं नाही. शिवाय पुरुष. हे आपण होऊन कधीतरी गावाकडे जात-येत असतात. मी विचारलं नाही तरी अप्पांविषयीची आपल्याला ठाऊक असलेली माहिती मला सांगण्यामागे, माझ्याशीही जवळीक ठेवायचा हेतू नसेलच, असं म्हणता येणार नाही, असंही वाटलं.

बाहेर सूर्य मावळून अंधार पसरत चालल्याचं दिसत होतं. मी मनगटावरचं घड्याळ पाहिलं. ते म्हणाले, "तुला शिवाजीनगरला जायचं आहे ना? जयनगरला सोडतो. तिथून तुला बस मिळेल." म्हणत ते उभे राहिले. मीही उभी राहिले. ते माझ्यापाशी आले. नेहमीप्रमाणे आलिंगनाचा विचार दिसतोय, हे माझ्या लक्षात आलं. तसंच घडलं. त्यानंतर त्यांनी माझ्या ओठांवर घट्ट ओठ दाबले. सिनेमात किसिंग सीन केल्यामुळे आणि करवून घेतल्यामुळे मला त्याचं काही वाटलं नाही. तेच म्हणाले, "लक्ष्मी, मला तुझ्याविषयी विशेष ममत्व वाटतं. तुझ्यावर कसलाही प्रसंग आला तरी तू माझ्याकडे ये. मी तुला मदत केल्याशिवाय राहणार नाही." आणि पुन्हा एकदा माझे ओठ शोधू लागले.

"सर! आय एम सो ग्रेटफुल टू यू! चला! निघू या!" मी हलकेच स्वत:ला सोडवून घेत म्हटलं आणि बाहेर चालू लागले.

दोघंही कारपाशी आलो. त्यांनी कार स्टार्ट केली. काही घडलंच नाही अशा आविर्भावात त्यांनी विषय बदलला. "अलीकडे नवं काय वाचलंस? सर्जनशील काम वाढलं, की कलाकार अध्ययन सोडून देतात. विकासाच्या दृष्टीनं अत्यंत धोकादायक पायरी आहे ही!" वगैरे अॅकॅडमिक विषय बोलू लागले. मग मीही अवघडलेपणाला थारा न देता "सिनेमातंत्रासाठी तेवढंच वाचन पुरेसं नसतं. साहित्य-संगीत-चित्रकला याविषयीही वाचत राहावं लागतं...." म्हटलं.

"सामाजिक जबाबदाऱ्यांविषयीही समीक्षक पद्धतीनं विचार करत राहिलं पाहिजे. आपण सगळे इतिहासासाठी जबाबदार आहोत...." तेही पुढे म्हणाले.

जयनगरहून विजयनगरला जायच्या बसमध्ये जागा मिळाली. प्रोफेसरांनी आमिरला जी भीती घातली, ती मीही घालू शकले असते. पण हीच वाक्यं मी बोलले असते तर परिणाम हाच झाला असता काय? समाजात त्याच्याइतकंच माझंही नाव आहे. शिवाय एक स्त्री– तलाकसारखं स्कँडल झालं तर माध्यमवाले त्याच्यापेक्षा मला जास्ती सहानुभूती दाखवतील यात शंका नाही. मला का सुचलं नाही हे? पाठोपाठ सुचलं, प्रोफेसरांची

व्यावहारिक बुद्धी माझ्यापेक्षा अधिक तल्लख आहे, हे मान्य करावंच लागेल. मला एकांतात भेटायला ते उत्सुक असतात, नेहमी ‘लक्ष्मी’ या पूर्वीच्या नावानं हाक मारतात, ‘आमच्या गावची मुलगी’ म्हणत नेहमी जवळीक दाखवतात. सहजच खांद्यावर हात टाकतात, आलिंगन देतात. आज प्रथमच ओठांचं चुंबनही घेतलं. तेही अगदी सहज! काही विशेष न घडल्यासारखं! यामागे काय उद्देश असेल? संधी मिळेल तेव्हा संधीचा फायदा घ्यायचा विचार असेल? किळस वाटली.

तरीही, या माणसाशी विरोध होता कामा नये. दुसरं म्हणजे ही असली माणसं बलात्कार करायच्या पातळीपर्यंत जात नाहीत. त्यामुळे सावधपणे निभावून नेणं सहज शक्य आहे. काय सांगावं, कदाचित त्यांनाही माझ्याविषयी खरोखरच जवळीक वाटतही असेल. तात्कालिक आकर्षणापोटी तरुण वयात एका गोऱ्या मुलीशी यानं लग्नही केलं असेल. इथल्या समाजात वावरत असताना मुळं तुटल्यासारखं वाटून रिकामेपणही वाटत असेल. दोघांचं जन्मगाव एक, दोघांचे वडील जवळचे मित्र, हे सगळं आठवून नात्यात मधुर भावही कदाचित जाणवत असेल. मी सावधपणे वागले, कुठल्याही प्रकारचे चुकीचे संदेश दिले नाहीत म्हणजे झालं! त्यांच्या मनात कसले का भाव असेनात! मनात हे उदार भाव येताच थोडं समाधान झालं.

बेडरूमच्या दाराचा आवाज आला. आमिर दार उघडून बाहेर येत म्हणाला, “एकटीच अंधारात का बसलीस?”

“काही नाही. पाणी पाहत बसले.”

“अंधारात?”

“उगाच बसावंसं वाटलं. तू झोप जा.”

तो मागे वळला. तिथेही उकडत नाही. तरीही नेहमी शेजारी असलेलं माणूस जागेवर नाही म्हटल्यावर याला जाग आलेली दिसते! विचारांची आणि आठवणींची शृंखला तुटली. खिडकीबाहेर बघत बसलं तरी कल्पना, आठवणी, विचार, भावना यां पैकी काहीच येईना. शरीराची दमणूक जाणवली. जांभईही आली. उठून आत गेले आणि आपल्या जागेवर झोपले.

हंपीहून येऊन आठवडा झाला तरी नरसिंहाची मूर्ती, विठ्ठल मंदिर, इतर देवळं आणि मूर्ती यांच्या भंजनाच्या प्रश्नानं मनाचा ठाव सोडला नाही. लहानपणी पाहिलेली हळ्येबिडू वगैरे देवालयं आठवली, पाठोपाठ तीही उद्ध्वस्त केलेली देवालयं म्हणून सांगितलं गेल्याचंही आठवलं. विजयनगरविषयीही हीच माहिती सांगितली जाते. आता आपण निर्माण करत असलेल्या लघुपटांमध्ये हे कसं दाखवायचं, हा प्रश्न मात्र तसाच होता.’

२

एक दिवस सकाळी दहाच्या सुमारास प्रोफेसरांचा फोन आला. आमिर बाहेर गेला होता.

"लक्ष्मी! एक वाईट बातमी सांगायचं काम माझ्या वाट्याला आलंय! तुझे अप्पाजी वारले, असं समजलं. पंधरा दिवस झाले. आपल्या गावचे कुमारेश नावाचे एक जण तुला ही बातमी सांगायला म्हणूनच आले होते. काल दिवसभरात मी तुला आठ-दहा वेळा फोन केला. कुणीही उचलला नाही."

डोकं गर्ररकन फिरल्यासारखं झालं. तोंडून एकही शब्द बाहेर पडला नाही.

"ऐकतेयस ना लक्ष्मी?" यावरही शब्द बाहेर पडला नाही. आत धूर भरल्यासारखा झाला. ना ज्वाळा भडकली, ना आग पेटली. आतल्या आत घुसमटून, ऐकू न येणारं, न दिसणारं बोलणं, जाणवला तो फक्त धुराचा दबाव!

"लक्ष्मी, असली बातमी समोर येऊन सांगितली पाहिजे. तरच बातमी सांगितल्यावर होणाऱ्या दु:खाचं सांत्वनही करता येतं. पण आता मी एका मीटिंगसाठी दिल्लीला चाललोय. नाही तर आलो असतो. तू शांत हो. अठ्ठावीस वर्षं झाली नाही का अप्पांची भेट होऊन? संपर्क नसला तरी नात्यांचे धागे चिवट असतात. आमिरकडे फोन दे."

तो घरात नाही, एवढंही सांगायला जमलं नाही. मिनिटभर थांबून प्रोफेसरांनी रिसिव्हर खाली ठेवला. डोक्यावर वीज कोसळावी तशी अवस्था झाली.

कितीतरी वेळानं आपोआप रडू कोसळलं. एकेका उमाळ्यासरशी श्वास कोंडत होता. पाठोपाठ तीव्रपणे वाटलं, "अप्पाजी! मी तुम्हाला शोभेलशी मुलगी नाही होऊ शकले. अजिबात नाही! कृतघ्न! मस्तवाल!", स्वत:चा तिरस्कार करत मी शेजारच्या भिंतीवर चार-पाच वेळा डोकं बडवून घेतलं. डोकं गरगरल्यासारखं झालं. तशीच दिवाणावर अंग टाकून पडले. कपाळ दुखत होतं. कातडं चुरचुरत होतं. डोक्यात शून्य भाव दाटला होता. आपल्याला कुणी नाही, आपण अनाथ आहोत, आपलं असं जगात फक्त एक माणूस होतं– अप्पाजी! आता तेही निघून गेले! मुळं तुटलेली वेल. उद्या उन्हात सुकून जाण्याशिवाय दुसरा उपाय नाही. मरतानाही त्यांनी निरोप पाठवून बोलावून घेतलं नाही. माझी मुळं आपोआप तुटली नाहीत. त्या मुळांनीच मला पूर्णपणे नाकारलं. पाठोपाठ आणखी रडू आलं. लोंढ्यावर लोंढा आला.

दुपारपर्यंत मन थोडं हलकं झालं. पंधरा दिवस झालेत म्हणजे सगळी दिवसकार्यं संपली असणार. मगच कळवलंय मला. बरोबर आहे. त्यात मी भाग घ्यायचाच नाही म्हणा! त्या धर्माच्या मी बाहेर आहे आणि ज्या धर्मात मी प्रवेश केला आहे, त्या धर्माप्रमाणे ही सगळी काफरांची कर्मं. केवळ तिरस्कार करायची नव्हेत, नष्ट करण्याच्या लायकीची! जरी गावकऱ्यांनी काही विधी करायला परवानगी दिली आणि मी ते केले तरी तब्लीख मला तसंच सोडणार नाहीत. केवळ तब्लीखच नव्हे, सर्वसामान्य मुस्लीमालाही धक्का बसेल. इस्लामचा स्वीकार न करता मेलेल्याला सतत जाळणारा नरकच मिळणार! पण हे कोण कुमारेश, मला हा निरोप द्यायला का इथपर्यंत आले? फक्त अप्पाजींच्या मृत्यूचीच बातमी द्यायला? की आणखी काही सांगायला?

संध्याकाळी बातमी समजल्यावर आमिरनंही दु:ख व्यक्त केलं. त्यानं खरं तर त्यांना पाहिलंही नव्हतं. तिचे वडील गेल्यामुळे तिच्याविषयी वाटणारी अनुकंपा वाटली तरी मेलेल्या व्यक्तिविषयी त्याच्या मनात कसलीच भावना नव्हती. मुलीनं धर्म बदलला म्हणून आयुष्यभर तिला दूर करणारा कठोर म्हातारा, म्हणून त्यांच्याविषयी तिरस्कारच होता. पण तो त्यानं कधीही बोलून दाखवला नव्हता.

"मला शोधत इथपर्यंत आले होते, त्या अर्थी काहीतरी काम असलं पाहिजे. उद्या सकाळी मी गावाकडे

जाऊन येते.”

“मीही येतो.”

“नको!” ती उत्तरली. अर्थात अशा प्रसंगी गेलं तर योग्य ठरणार नाही हे त्यालाही ठाऊक होतं.

“कुणिगलला कितीतरी बसेस आहेत. तिथून सहा मैल. पुढे जायला फारशा बसेस नाहीत आणि हीही अठ्ठावीस वर्षांपूर्वीची गोष्ट. आता काय परिस्थिती आहे, कोण जाणे. कार घेऊन जाईन. संध्याकाळी परत येईन. नाही तर एक-दोन दिवस तू स्कूटर वापर.”

गावात कोण आहे, तिथे गेल्यावर आपण कुणाला भेटणार आहोत, याची काहीही कल्पना नसताना ती कार चालवत होती. एक मात्र ठाऊक होतं. थेट आपल्या घरी जायचं!

‘या रस्त्यावरून कितीतरी वेळा प्रवास केलाय. मंगळूर, चिकमंगळूर, धर्मस्थळ वगैरे भागात जायचा हाच रस्ता. दोन-तीनदा ग्रुपबरोबर कुणिगलला उतरून कॉफीही घेतली होती. त्या वेळी जीव चिमटीत धरून चुरडल्यासारखं झालं होतं.’ ती तळमळ अप्पाजींच्या कठोरपणावर लादून ती थोडी शांत झाली होती. आताही कुणिगलला गाडी थांबवून तिनं कॉफी-नाश्ता घेतला आणि पुढे निघाली.

गावात प्रवेश करता करता थोडा बदल जाणवला. गावाबाहेर एक हायस्कूलसारखी इमारत दिसली. त्यावर बोर्डच लिहिलेला होता ‘श्री लक्ष्मी-नरसिंह हायस्कूल’. त्याच्या शेजारी एक आयुर्वेदिक हॉस्पिटल. त्याच्यासमोर ग्रामदैवत. पांढरदेवीचं देऊळ. तेव्हा हे गावाबाहेर होतं. रस्त्यानं सरळ गावात शिरल्यावर उजवीकडे वळल्यावर, गावाला ज्याचं नाव दिलं आहे, त्या नरसिंह देवाचं देऊळ. सुमारे तीस फुट उंचीच्या टेकडीवर. टेकडीवरून पाहिलं तर सगळं गाव आणि गावापलीकडचं तळं, शेतं, माळरान सगळं दिसतं. टेकडीला वेढा घालून गेलं, की टेकडीच्या पायथ्यापाशी आपलं घर! मागे घराची गाऱ्याची गच्ची आणि पुढच्या बाजूला मंगळुरी कौलांचं छप्पर.

दरवाजा बंद होता. चार-पाच वेळा दार वाजवून तिनं हाळी दिली, “कुणी हाय का घरात?” आणि ती स्वत:च रोमांचित झाली. अठ्ठावीस वर्षं झाली तरी हाक मारायची पद्धत विसरलेली नाही.

एका बत्तीस-तेहतीस वर्षांच्या बाईनं आतून येऊन घराचं दार उघडलं. अंगावरचं लुगडं, हातातल्या बांगड्या आणि कपाळावरचं कुंकू यावरून ती एखाद्या रयताची बायको असावी हे लक्षात आलं. तिनं विचारलं “कोन हाय?”

“घरात कोण आहे?” हिनं विचारलं.

“आमीच की! तुमी कोन?” तिनं पुन्हा विचारलं.

कोण म्हणून सांगायचं? ही गोंधळली. पण सांगायलाच हवं. एकदा सांगून मोकळं झालं, की हा अवघड प्रसंग कायमचा संपेल. तिनं सांगितलं, “मी नरसिंहगौडांची मुलगी.”

“ओ!” क्षणभर तिचा आ तसाच वासलेला राहिला. नंतर सावरत म्हणाली, “बसा! थांबा! चटई अंथरते,” म्हणत तिनं ओसरीकडे हात केला. तिथे लगबगीनं चटई अंथरून दिली तरी हिच्या मनात असमाधान राहिलं, हिनं मला ओसरीवरच बसवलं. आत बोलावलं नाही.

एवढ्यात पाच-सहा मुलं गाडीभोवती गोळा झाली. तिनं सांगितलं “बसा नव्हं! आमच्या गौडांना निरोप धाडते. शेतावर गेल्यात न्हवं का,” आणि ती दारात उभी राहिली. पुढे काही बोलणं न सुचल्यामुळे ती नुसतीच पाहत राहिली. ही कोण माणसं? विचारावंसं वाटलं तरी आगा-पिछा ठाऊक नसताना असं विचारणं योग्य नव्हे. सभ्यपणाचंही नव्हे, असं वाटून हीही गप्प राहिली.

नंतर विचारलं, “शास्त्रींच्या घरात कोण-कोण आहे?”

“ते आन् त्यांची बायको.”

“त्यांच्याकडे जाऊन येते. तुमच्या गौडांना बोलावून घ्या तोवर.” एवढं सांगितलं, कार तिथेच ठेवून ती चालू लागली.

‘आलेल्या वाटेवर सुमारे चाळीस घरं सोडल्यावर, टेकडीच्या पायथ्याशी शास्त्रींचं घर. काहीही फरक झालेला नाही. दोन्ही बाजूला गाऱ्याची गच्ची. घरावर देशी कौलं. पुढच्या दरवाजाला हळदी-कुंकू लावलेलं. दाराला लावलेलं आंब्याच्या पानांचं तोरण सुकलं आहे. घराच्या पुढच्या अंगणात फरशी बसवलेली. उंबऱ्यावर, दारापुढे, तुळशीपुढे ताजी घातलेली रांगोळी.

दरवाजा उघडा होता. उंबऱ्यापाशी जाऊन “आहेत का शास्त्रीबुवा घरात?” अशी हाक दिली. पूर्वीचीच पद्धत ही!

“कोण?” हा आवाज शास्त्रीबुवांचाच! ते वयस्कर झाले होते आणि अठ्ठावीस वर्षांपूर्वीच माझंही नातं तुटलं होतं. तरीही मीही ओरडून सांगितलं, “मी नरसिंहगौडांची मुलगी, लक्ष्मी!”

“लक्ष्मी!” त्यांनीही तितक्याच सहजपणे स्वागत करत, आतून बाहेर येत म्हटलं, “तू होय! ये, ये! केव्हा आलीस?” ’

आपला केसांचा बॉब असला तरी अंगावर साडी आहे, हे आठवून तिला बरं वाटलं. कपाळावर कुंकू असतं तर आणखी चांगलं झालं असतं. लक्षातच आलं नाही. “नुकतीच येतेय. तुम्ही बरे आहात ना? अम्मा कशा आहेत?” म्हणत ती दोन पावलं पुढे आली आणि त्यांच्या पायांना स्पर्श न करता वाकून नमस्कार केला. तिचं त्यांच्याकडे लक्ष गेलं. टकलानं सगळं डोकं व्यापलंय. हनुवटी आणि गालफडांवर पांढऱ्या दाढीचे खुंट. कपाळावर पांढरी विभूती, भुवयांमध्ये कुंकू, काठाचं धोतर. तसलंच एक उपरणं उजव्या काखेखालून घेऊन खांद्यावर पांघरलंय. अप्पाजींना बघितल्यासारखं वाटून तिची दृष्टी धूसर झाली.

शास्त्रीबुवांनी आवाज चढवून सांगितलं, “ऐकलंस काय? नरसिंहप्पाची मुलगी, लक्ष्मी आलीय. ये!” हाक ऐकत अच्चम्मा बाहेर आल्या. ऐंशी ओलांडलीय. कंबर वाकलीय. सौभाग्यलेणं म्हणून हळद लावून लावून पिवळट झालेले गाल, तळहात आणि पावलं. कपाळावर भलंथोरलं कुंकू, गळ्यात काळ्या मण्यांची पोत. हातात बांगड्या. त्यांनाही थोड्या अंतरावर वाकून नमस्कार केल्यावर त्यांनीही विचारलं, “कुठून आलीस?”

“बेंगळुरूहून. कार चालवत आले.”

“बैस. दोसे करते.”

“कुणिगलमधल्या हॉटेलात खाऊनच आले.”

“हॉटेलात कशाला खातेस? तब्येतीला बरं नसतं ते. बरं, जाऊ दे. कॉफी आणते. दुपारी जेवशील म्हणे, इथेच!” म्हणत त्यांनी लाकडी खुर्चीवर बसायला सांगितलं. शास्त्रीही लाकडाच्या बैठकीवर मांडी घालून बसले. अच्चम्मा आत वळल्या.

“कोपऱ्यावरचा कुमारेश अधूनमधून बेंगळुरूला जात-येत असतो. त्याच्याकडून मीच निरोप पाठवला होता. तुझ्या वडिलांच्या घरच्या जमिनींची विल्हेवाट लावायला हवी, नाही का? तुझ्या घराकडे गेली होतीस?”

“होय. कार तिथेच उभी केलीय. तिथल्या बाईनं दार उघडलं. मला बसायला सांगत होती. नवऱ्याला निरोप पाठवलाय तिनं. मीही विचार केला, उगाच तिकडे बसण्यापेक्ष इथे येऊन तुमचा आशीर्वाद तरी घेऊन जावं.”

"असं वाटलं? ओळख ठेवलीस, यावंसं वाटलं, तेवढंच पुरे!"

"काय झालं होतं अप्पाजींना? कसला आजार झाला होता?"

"आजार कसला आलाय! पंच्याऐंशी वय. माझ्यापेक्ष चार वर्षंनी लहानच असेल. त्या हिशेबानं पाहिलं तर आधी मला जायला पाहिजे होतं. काय करणार! प्रत्येकाचं आयुष्य त्याच्या त्याच्या कपाळावर कोरलेलं असतं, नाही का? संध्याकाळी छातीत दुखतंय म्हणत होता म्हणे. पहाटे लवकर उठायची सवय. सकाळी उठला नव्हता. रात्रभर वाचत बसले असतील, उशिरा उठतील म्हणत केंचप्पा नेहमीसारखा शेतावर निघून गेला. नऊ वाजता घरी परतल्यावर बघितलं तरी हा उठला नव्हता. खोलीचा दरवाजा लोटून पाहिलं तर श्वास थांबला होता. शरीर थंडगार. त्याचा मुलगा सांगायला आला. काय करणार!"

"जीव जाईल असं त्यांनाही वाटलं नव्हतं का?"

"नव्हतं. नसावं."

"हं!" ती उद्गारली. त्यामागचा अर्थ त्यांना समजला. पण यावर आपण होऊन काही बोलणं योग्य नव्हे, असं वाटून ते काही बोलले नाहीत. तीच म्हणाली, "ठाऊक असतं तर मला निरोप पाठवला असता का?"

त्यांनी उत्तर दिलं नाही. तीच पुढे म्हणाली, "तुम्हाला नक्की ठाऊक असेल याचं उत्तर!"

"त्याच्या मनात काय चाललं असेल ते मी कसं सांगू, बाळ?"

त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्टच दिसत होतं, अप्रिय सत्य सांगायची त्यांची अजिबात इच्छा नाही.

"कुमारेशांकडून तुम्ही मला का निरोप पाठवला होता?"

"तू त्याची वारस आहेस. आज ना उद्या तूच येऊन त्या संपत्तीची जी काही विल्हेवाट लावायची ती लावली पाहिजेस."

"त्यांनी माझा पूर्णपणे त्याग केला होता. मृत्यू जवळ आल्याचं समजलं असतं तरी त्यांनी मला निरोप पाठवला नसता, हे तुम्हालाही चांगलं ठाऊक आहे. तर मग त्यांच्या संपत्तीवर तरी माझा कसा हक्क राहील? मी कशी स्वीकारू ती?"

"हे बघ बेटा! तू स्पष्टच विचारते आहेस. मीही स्पष्टच बोलतो. ही सगळी संपत्ती वडिलोपार्जित आहे. तीनशे नारळी, दहा आंब्याची झाडं, पाच फणसाची झाडं. हे बागेतलं. शिवाय तीन एकर बागाईत, आठ एकर जिराईत, राहतं घर. या संदर्भात परस्पर निर्णय घ्यायचा अधिकार त्याला नव्हता. अधिकार असता तर त्यानं काय केलं असतं, हे त्याचं त्यालाच ठाऊक! तू निघून गेलीस तेव्हा घरचं बघायला निंगव्वा नावाची एकजण होती. आठवतं? पुढेही चार वर्षं ती होती. नंतर मुलाकडे जाते, म्हणून निघून गेली. त्यानंतर या केंचप्पाला त्यानं घरात आणून ठेवलं. त्याचं लग्न लावून दिलं. ते नवरा-बायको याच्या शेतीवाडीबरोबरच घरचं स्वैपाक-पाणीही बघतात. त्यांना दोन मुलंही आहेत. आपल्या माघारी याचं काय होईल म्हणून नरसिंहप्पानं शंभर नारळीची एक बाग, दोन एकरांचा मळा आणि चार एकर शेत त्याच्यासाठी करून ठेवलंय. गावाबाहेर एक घरही बांधून दिलंय. आता हॉस्पिटलमधल्या एका डॉक्टरांना ते भाड्यानं दिलंय. केंचप्पा प्रामाणिक माणूस आहे. त्याच्या बायकोचं नाव लक्षम्मा. तुझंच नाव! तीही चांगली बाई आहे. तुझ्या वडिलांची चांगली काळजी घेतली त्यांनी. तुला अधिकार आहे. तुला हवं तसं तू करू शकतेस. केंचप्पा आणि त्याची बायको घर रिकामं करून निघून जातील."

'व्यवहाराविषयी इतक्या परखडपणे बोलताहेत, त्याअर्थी शास्त्रींच्या मनातही माझ्याविषयी परकेपणाचीच भावना दिसते! अप्पाजींच्या अगदी जवळचे मित्र म्हटल्यावर आणखी काय शक्य आहे म्हणा!'

"मी संपत्ती ताब्यात घ्यायला आलेली नाही. इथे असं काही असेल, हे माझ्या लक्षातही आलं नव्हतं. तुम्ही निरोप पाठवला म्हणून आले मी."

"ते मलाही ठाऊक आहे. तुला हे कळणं आवश्यक आहे, म्हणूनच निरोप पाठवलाय ना? तू आलीस ते चांगलं झालं. काय करावं म्हणून केंचप्पा गोंधळून गेलाय. नारळ तयार झाले, ते काढून खोबरं सुकायला टाकायचंय. कुणाच्या देखरेखीखाली हे काम करावं, म्हणून तो माझ्याकडे येऊन चौकशी करतोय. फक्त नारळ उतरवायचंच नव्हे, शेती म्हटली की दररोज निर्णय घ्यायची कितीतरी बारीकसारीक कामं असतात. ते कुणी सांगायचं? खर्च, लाभ-नुकसान, शिल्लक यांची जबाबदारी कुणाची? केंचप्पा प्रामाणिक आहे म्हणून हे सगळे प्रश्न उठताहेत. तसं नसतं तर आजच्या कायद्यांचा आधार घेऊन त्यानं ही सगळी संपत्ती गिळंकृत केली असती. आता आधी तू तुझ्या वडिलांच्या मृत्यूचा दाखला दाखवून सगळं तुझ्या नावानं करून घे."

याच वेळी एक पस्तीस-छत्तीस वर्षांचा एक माणूस आला. उभ्या पट्ट्याच्या अर्ध्या चड्डीवर लालसर झालेली पांढरी लुंगी, अर्ध्या बाहांचा पिवळ्या रेघांचा शर्ट, खांद्यावर टॉवेलसारखा पंचा, न विंचरलेले केस, पाच-सहा दिवसंच्या दाढी-मिशा. शास्त्री म्हणाले, "बघ! केंचप्पाच आलाय."

"ताई, केव्हा आला?" बऱ्याच दिवसंची ओळख असल्याप्रमाणे त्यानं बोलायला सुरुवात केली.

"सैपाक होतोय, लक्ष्मी. जेवण करून जा." शास्त्री म्हणाले.

"घरी जाऊन येते. जेवायच्या वेळेपर्यंत येईनच–" म्हणत ती निघाली.

घरी गेल्यावर उजव्या बाजूला असलेल्या खोलीचं कुलूप काढत केंचप्पा म्हणाला, "हीच बघा अप्पा झोपत असलेली खोली. हितंच दिवस-रात्र बसून वाचायचे. दार बंदच असायचं सारखं. कुणीही दार उघडून दंगा करत नव्हतं."

ही खोली तिच्याही परिचयाची होती. दोन अंकणं एवढी रुंद. त्या वेळी दिवस काळी किमान दोन तास ते इथेच बसून चरख्यावर सूत कातायचे. तिनं आत जाऊन पाहिलं. आता त्या खोलीच्या तिन्ही बाजूला भरपूर पुस्तकं होती. एकेक कपाट सात-सात फुट उंच. साडेचार फुट रुंद. काचेची सरकवता येण्यासारखी दारं. अशी तीन कपाटं. भिंतीपाशी एक छोटी बैठक. त्यावर भिंतीला टेकून एक तक्क्या. समोर एक व्यासपीठ, डावीकडे झोपायचा पलंग. त्यावर कांबळं अंथरलेलं.

तिनं मान वर करून सगळ्या भिंती पाहिल्या. आधी तिथे असलेले गांधीजींचे फोटो तिथे नव्हते. खोलीत कुठेही चरखा दिसला नाही. कपाटांची दारं न उघडता तिनं आतल्या पुस्तकांवर नजर टाकली. पवित्र कुरआनचा कन्नड अनुवाद, इंग्लिश अनुवाद, प्रवादी मुहम्मद (स)ची चार वेगवेगळी चरित्रं, मार्गोरी, सर विल्यम, म्युइर, मार्टिन लिंग्स यांची. एक कन्नड. खदीस यांचे खंड, अकबरनामा, बादशाहनामा, तुघलखनामा, तुझक-ई-बाबरी, ऐजाझ-इ-खुश्रवीचे खंड, मासिर-इ-आलमगिरी यासारखे भरत खंडावरील आपला विजय आणि यश यांविषयी मुसलमान इतिहासकारांनी लिहिलेले बहुतेक सगळे ग्रंथ आणि खंड! तिनं काच बाजूला करून पाहिलं, त्यातलं प्रत्येक पुस्तक बारकाईनं वाचल्याच्या खुणा त्यातल्या प्रत्येक पानावर होत्या. कितीतरी परिच्छेदांना खुणा केल्या होत्या, अनेक ओळींखाली रेघा मारल्या होत्या. काही ठिकाणी पुस्तकातच त्यांनी स्वत:ची टिप्पणी केलेली दिसत होती. होय! अप्पाजींचंच अक्षर! त्यातल्या काही टिपा कन्नडमध्ये तर काही इंग्लिशमध्ये केल्या होत्या. चार-पाच टिपांवरून तिची नजर फिरली. इंग्लिश भाषाही प्रौढ होती. तिला आठवत होतं तसं, त्यांना जुजबी इंग्लिश येत होतं, पण या पातळीचं इंग्लिश? एवढी प्रौढ भाषा? हायस्कूलमध्ये असतानाच त्यांनी शिक्षण सोडून स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली होती. त्यानंतर ग्रामीण सुधारणांमध्ये ते गढून गेले होते. तिनं आणखी एक कपाट उघडून पाहिलं. तिथं विल ड्यूरंटच्या नागरी इतिहासाचे खंड होते. तेही वाचल्याच्या अधूनमधून खुणा होत्या. याशिवाय धर्मासंबंधी असलेले कितीतरी विद्वानांचे ग्रंथ होते. जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, जपानी आणि भारतीय विद्वानांची ग्रंथसंपदा. एका कपाटात खालच्या खान्यात ऑक्सफर्ड आणि चेंबर्स शब्दकोश, इंग्लिश-कन्नड शब्दकोश, याशिवाय तीन मोठ्या वहांमध्ये शब्दकोशांतले मोजके निवडक शब्द आणि अर्थ लिहिले होते.

ती एकेका पुस्तकाचं नाव वाचत होती. कपाटाचा दरवाजा उघडला, की आतून डांबराच्या गोळ्यांचा उग्र वास येत होता.

“डांबराच्या गोळ्या केव्हा घातल्या?” खोलीच्या दाराशी उभ्या असलेल्या केंचप्पाला तिनं विचारलं.

“अप्पाजी वारल्यावर शास्त्रीबुवांनी कुणिगलहून मोठं पाकीट आणून दिलं. पुढं उभं राहून पुस्तकांच्या मागे-पुढे ठेवायला सांगितलं.”

“या पलंगावर रोज झोपायचे?”

“होय. यावरच जीव गेला त्यांचा.”

ती थोडा वेळ अप्पाजींच्या अभ्यासाच्या बैठकीवर बसली. एकदा घरभर फिरून यायची इच्छा झाली. पण मुसलमान जातीत प्रवेश केलाय! केंचप्पा, त्यातही त्याच्या बायकोला हे आवडणार नाही, हेही लक्षात आलं. घराशेजारून मागच्या बाजूला जाऊन घराचं परसू आणि गोठा पाहता येईल. पण तसं केलं तर आपण होऊन आपण घरात प्रवेश करायला लायक नाही हे दाखवल्यासारखं होईल, असा विचार करून तिनं काहीच केलं नाही.

एवढ्यात घराच्या ओसरीवर सात-आठजणं जमून बोलत असल्याचं खिडकीतून दिसत होतं. ती खोलीबाहेर येऊन पुढच्या ओसरीवर आली. त्यातल्या पन्नाशीच्या एका बाईनं विचारलं, “तूच काय ती, जातीबाहेर गेलेली नरसिंहप्पाची मुलगी?”

प्रश्न थेट असला तरी त्यात तिरस्कार नव्हता. सहजता होती. तरीही मनावर व्हायचा तो आघात झालाच. नाही म्हटलं तरी राग आला. पण सात-आठ माणसांपुढे आपला राग दाखवून दिला तर आपणच छोटे होऊ, याची तिला जाणीव झाली. पाठोपाठ वाटलं, याव्यतिरिक्त आणखी कुठल्या पद्धतीनं ती हे म्हणू शकली असती म्हणा! तेवढं शब्दचातुर्य खेड्यातल्या या बाईकडे कुठून असणार?

“होय, मीच नरसिंहगौडांची मुलगी.” म्हणत ती ओसरीवर एका बाजूला बसली.

“पांढऱ्या कपाळानं हायेस. किती दीस झालं नवरा जाऊन?” आणखी एका म्हातारीनं विचारलं.

ती संयम राखून हेही समजून घ्यायचा प्रयत्न करू लागली. नवरा जिवंत असताना कुंकवाशिवाय राहण्याची कल्पनाही कुणी खेड्यांमध्ये करू शकणार नाही. कुंकू लावणं ही धर्माविरुद्धची गोष्ट आहे, नरकात लोटणारी गोष्ट आहे असं मानणाराही एक धर्म या पृथ्वीतलावर आहे, याची कल्पनाही या खेड्यात कुणी करू शकणार नाही, असा विचार करून ती उत्तरली, “लावलं होतं. पुसलं वाटतं.”

पण तेवढ्यात एक पन्नाशीचा माणूस म्हणाला, “ए लक्कव्वा, मुसलमानांच्या जातीत कुंकू कुठे लावतात. बघितलं नाय काय कुणिगलात?”

यापैकी कुणीही आपला उपहास करत नाही, तरीही यांच्या बोलण्यामुळे आपलं या गावातलं स्थान सूचित होत आहे. गेल्या अठ्ठावीस वर्षांत अंगवळणी पडलेलं सत्य पुन्हा तिच्या मनात उमटलं.

‘घराबाहेर पडल्यावर आमिरबरोबर राहण्यासाठी छोटा फ्लॅट शोधायला किती त्रास पडला होता तेव्हा! शेजारी दुसऱ्या जातीचं कुणी राहायला येणं कुणालाही आवडत नाही. त्यात वेगळ्या धर्माचं कुणी आलं तर कुणी मान्यच करत नाही. आमच्या शेजारी मांसाहारी माणसं नकोत, असाच सगळ्यांचा हट्ट. हे राहू दे, मांसाहारी लोकही इतर धर्माच्या लोकांना लांबच ठेवत होते. अतिशय कष्टानं एक फ्लॅट मिळवला तरी कुणी आपण होऊन बोलायला येत नव्हतं. सिनेमाजगत आणि वृत्तपत्रांमधून झळकत असलेलं माझं आणि

आमिरचं नाव त्यांनाही ठाऊक होतं. पण आपला धर्म सोडून दुसऱ्या धर्मात जाऊन इतकं नाव कमावणाऱ्या हिच्यामुळे आपल्या मुली प्रभावित झाल्या तर पुढे आपल्यालाच त्रास होईल, म्हणून आपल्या मुला-बाळांना आमच्याशी बोलू देत नव्हते. ही पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट. महानगर बेंगळुरूमधल्या परंपरावादी मल्लेश्वरमध्ये! पण खेड्यात तसं नाही.'

तेवढ्यात एक पंधरा वर्षांचा मुलगा तिथे येऊन म्हणाला, "बेंगळुरूवाल्या बाईंना जेवायला बोलावलंय शास्त्रीबुवांच्या घरी!"

अवघड प्रसंगातून सुटायची संधी मिळाली, असा विचार करत ती उठलीच.

शास्त्रींच्या घरी स्वैपाकघराबाहेर माजघरात एका खांबापाशी केळीचं पान वाढलं होतं. तिला त्यात काही विशेष अपमानास्पद वाटलं नाही. कर्मठ ब्राह्मणांच्या घरी एवढं सोवळं-ओवळं सर्रास पाळलं जातं. तरीही ऐंशी उलटलेल्या त्या वृद्धेला खाली जमिनीवर वाकून वाढायला लावून आपण जेवायचा तिला संकोच वाटत होता. जेवता-जेवता तिनं विषय काढला.

"एवढी सगळी पुस्तकं पाहिली. अप्पाजींनी ती केव्हा वाचायला सुरुवात केली? त्यांना एवढं चांगलं इंग्लिशही येत नव्हतं तेव्हा."

"तू धर्मांतर करून निघून गेलीस. तुझ्या अप्पाजींना त्याचं किती दुःख झालं ते सांगणं कठीण आहे. दुःख, शोक, राग यापैकी काहीही दाखवून देणं त्यांच्या स्वभावातच नव्हतं. अतिशय संयमी माणूस! 'असं का घडलं शास्त्रीबुवा?' म्हणून माझ्यापुढे चडफडत होता. मीही सांगितलं, 'सगळं आपापलं कर्म! तिच्या कर्मामुळे ती तशी वागली, तुझ्या कर्मामुळे तुला हे भोगावं लागतंय.' सुचलं ते सांगितलं मी. 'तुमचा कर्मसिद्धांत अजिबात पटत नाही!' मान हलवत तो म्हणाला. याचा एक परिणाम असा झाला, पंचक्रोशीत, जिथं त्याला मान मिळायचा, तिथले लोक 'याची मुलगी मुसलमान मुलाबरोबर पळून गेली, मुसलमान झाली' म्हणून त्याची अवहेलना करू लागले. याचाही गावोगाव फिरण्यातला रस कमी झाला. एकदा बेंगळुरूला गेला होता. पूर्वीपासून गांधी अध्ययन मंडळाच्या कामासाठी जायचाच, तुलाही ठाऊक आहे ते. तिथे वेंकटरमणय्या नावाच्या एका व्यक्तिची ओळख झाली. त्यांच्याशी इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर पवित्र कुर्‌आनाचा विषय निघाला. त्यांनी विचारलं, 'पूज्य प्रवादींचं जीवनचरित्र वाचलंय का?' यानं 'नाही' म्हणून सांगितलं. त्यांनी विचारलं, 'न वाचता, न समजून घेता नाही ते मत का बनवून बसलात?' यानं सांगितलं, 'ते सगळं अरबी भाषेत आहे. मी कसं वाचणार?' त्यांनी सगळं इंग्लिशमध्ये अनुवादित झाल्याचं सांगितलं. यानं आपल्याला जेमतेम इंग्लिश येत असल्याचं सांगितलं, तर त्यांनी शब्दकोशांचा मार्ग सांगितला. सुरुवातीला थोडा त्रास वाटला तरी नंतर सगळं सोपं होऊन जाईल असंही सांगितलं. एवढंच नव्हे, स्वतः पुस्तकाच्या दुकानात घेऊन गेले, पुस्तकं आणि शब्दकोश निवडायलाही मदत केली. अभ्यासाला सुरुवात केली तेव्हा हा वरचेवर बेंगळुरूला जाऊन वेंकटरमणय्यांना भेटायचा, चर्चा करायचा. नंतर मात्र हा दुकानदाराकडे फक्त यादी पाठवायचा. तो बेंगळुरूचा दुकानदार याला हवं ते पुस्तक, हवं तिथून मिळवून पाठवून द्यायचा. याला दुसरा कसलाच नाद नव्हता. एकदा मीच त्याला विचारलं, 'नुसतं वाचतोयस! काय करणार आहेस एवढं वाचून?' त्यावर म्हणाला, 'कन्नडमध्ये एक गंभीर पुस्तक लिहिणार आहे.' ते पूर्ण व्हायच्या आतच देवानं डोळे झाकले त्याचे! हा वारल्याचं समजल्यावर तुमकूरच्या कॉलेजमधले एक लेक्चरर आले होते. ते म्हणाले, 'भारतावर मुसलमानांची आक्रमणं झाल्यानंतरच्या कालखंडाच्या इतिहासाविषयी नरसिंहगौडांना जेवढं ज्ञान होतं, तेवढं आमच्या विद्यापीठातल्या प्रोफेसरांनाही नाही. मृताला श्रद्धांजली वाहायच्या औपचारिकपणाचा भाग म्हणून मी हे सांगत नाही.' फार आदरानं बोलत होते ते!"

शास्त्रींचं बोलणं ऐकताना तिला तीव्रपणे वाटलं, अप्पाजींनी वाचलेली सगळी पुस्तकं आपणही वाचली पाहिजेत. त्यांना सुरुवातीला असलेली इंग्लिश भाषेची अडचणही आपल्यापुढे नाही. हंपीवरच्या लघुपटासाठी आपण जे चार-पाच पुस्तकांचं वाचन केलंय, त्यामुळे हा विषय आपल्याला पूर्णपणे परका वाटणार नाही असंही तिला वाटलं. अप्पाजींचा संग्रह वाचून काढण्यासाठी आवश्यक असलेली वाचनाची शिस्तही आपल्याकडे आहे आणि काही अडचण आलीच तर बेंगळुरूमधील एखाद्या तज्ज्ञाची मदतही घेता येईल.

काहीतरी आठवून तिनं विचारलं, “अप्पाजींचं दफन कुठे केलंय?”

“दफन? म्हणजे? तुला शवसंस्कार म्हणायचंय काय?”

“होय. तिथे जाऊन नमस्कार करायचाय मला.”

“आपला अंत्यसंस्कार कसा व्हावा याविषयी नरसिंहप्पानं कुणालाही काहीही सांगितलं नव्हतं. एकदा माझ्याशी बोलताना ‘पुरण्यापेक्षा जाळणं चांगलं’ म्हणाला होता तो. तुम्हा रयतांमध्ये खरं तर पुरायची पद्धत आहे. पण त्याच्या म्हणण्याप्रमाणे मीच पुढाकार घेऊन तुमच्या मळ्यात एक चौथरा तयार करून त्यावर दहन केलं. केंचप्पानंच मुलाच्या जागी उभं राहून अग्नी दिला. मी मंत्र म्हटले. तिसरे दिवशी राख सावडून एका गाडग्यात भरून तुमच्या घराण्यातल्या सगळ्यांच्या समाधी आहेत ना, तिथे समाधी केली. त्यातली थोडी राख दुसऱ्या मडक्यात भरून, घट्ट तोंड बांधून तुमच्या मळ्यावरच्या घरात ठेवली आहे. अकराव्या दिवशीच संगमावर विसर्जन करायला हवं होतं. जमलं नाही. लवकर केव्हातरी श्रीरंगपट्टणला पाठवायला पाहिजे.”

शेतावरच्या अप्पाजींच्या समाधीला नमस्कार करायची तिला तीव्र इच्छा झाली. तिनं ती बोलून दाखवली. त्यांनीही सांगितलं, “जाऊन ये ना! रस्ता लक्षात आहे ना? नाही तर केंचप्पाला घेऊन जा.”

“बरं!” म्हणत ती निघाली. पण घरी पोहोचेपर्यंत तिला वाटलं, आपण एकटंच जाऊन यावं. अप्पाजींचं स्मरण करत नमस्कार करताना तिथे आणखी कुणीही असू नये.

“मळ्यावर जाऊन येते. फाटकाला कुलूप आहे काय? चावी द्या, केंचप्पा. अप्पाजींना नमस्कार करून येते.” ती म्हणाली.

“मीही येतो–” तो म्हणाला.

“नको. मी एकटीच जाऊन येते.” म्हणत ती फाटकाची चावी घेऊन निघाली.

‘मळ्याचा रस्ता तसाच आहे. गावाबाहेर पडल्यावर आधी आपलंच शेत. शेजारचं मुदिगेरेच्या रंगप्पांचं. त्यानंतर मळ्यांची रांग. बांधावरची वाट धरून उजवीकडे वळली. सगळीकडे ज्वारी. वाऱ्यावर त्याची पोपटी पानं लहरत चमकत होती. पुढे फाटा. इथून डावीकडे की उजवीकडे? क्षणभर विचार केल्यावर खात्री झाली, होय, उजवीकडे. फाटक दिसलंच. आधी हे झावळ्यांचं असायचं. आता नीट लोखंडी केलेलं दिसतंय.’ कुलूप काढून ती आत गेली.

‘नारळाची झाडं पूर्वीपेक्षा बरीच उंच झाली होती. अठ्ठावीस वर्षं होऊन गेली ना! विहिरीपाशी डावीकडे वळून थोडं पुढे गेलं की सहा बेलाची झाडं. त्याच्या खालच्या बाजूला पूर्वजांची समाधी. त्यांच्या शेजारी ताजी माती आणि त्यावरील दगड नुकताच ठेवलेला दिसत होता.’

चपला थोड्या अंतरावर ठेवून तिनं हात जोडले, डोळे मिटले आणि मनात अप्पाजींचं स्मरण केलं. डोळ्यांसमोर अठ्ठावीस वर्षांपूर्वीची आकृती भरून राहिली. थोडं पुढे होऊन खाली बसली आणि काही वेळ त्या फरशीवर डोकं ठेवून बसली. नंतर उठून उभी राहिली. भोवताली सगळ्या पूर्वजांच्या समाधीच होत्या. तिच्या आईची जागाही तिथेच आहे. आजोबा नरसेगौडा, त्यांचे वडील शिंगेगौड, त्यांचे वडील वेंकटेगौड, त्यांच्या वडिलांचं नाव मात्र ठाऊक नाही. पण सगळे याच मळ्यात, याच जागेवर चिरनिद्रा घेताहेत. त्यांच्या मधोमध थोडा वेळ उभं राहून तिनं पुन्हा चपला घातल्या. मळ्याला एक फेरी मारून, फाटकाला कुलूप लावून ती घराकडे वळली.

ती घरी परतली तेव्हा केंचप्पा घरात नव्हता. लक्ष्मम्मानं “चहा घेणार?” म्हणून विचारलं. तिला चहाची नितांत गरज होती. त्यामुळे “हो!” असं तातडीनं सांगून ती पुन्हा अप्पाजींच्या खोलीत शिरली, वाचनाच्या लाकडी बैठकीवर बसली.

दुसरे दिवशी सकाळी ती बेंगळुरूला जायला निघाली. गाडी गॅरेजमध्ये ठेवून घराची बेल वाजवली तेव्हा अमिना बेगमनं दार उघडलं. आत जाऊन निवांत बसेपर्यंत तिला कसलंच भान नव्हतं. 'अमिना घरचा केर-वारा, स्वैपाकपाणी बघणारी बाई. ही घरात असली की आपण असो वा नसो, घर चालू राहतं. पण आता या घरात काही नाही, जे आहे ते सगळं तिथं आहे, असं तीव्रपणे वाटलं. एवढ्या लांबवर ड्राइव्ह करून, त्यातही नेलमंगल ते बेंगळुरूचा भर रहदारीचा रस्ता! आल्यामुळे सोफ्यावर अंग टाकावंसं वाटलं. एका व्हॅनमधून अप्पाजींचा सगळा ग्रंथसंग्रह इथे आणला तर कुठे ठेवता येईल? पुस्तकं एकीकडे आणि आपण एकीकडे राहिलं तर वाचन बरोबर होणार नाही. स्क्रीन प्ले आणि सिनेमाशी संबंधित लेखन, वाचन करण्यासाठी तिची अशी एक स्वतंत्र खोली होती. पण त्यात एवढी पुस्तकं मावणार नाहीत. माडीवरची नझीरची खोली मोठी आहे. ती वापरली तर? पण मग तो सुट्टीसाठी येईल तेव्हा? शिवाय त्याचं लग्न झाल्यानंतर? घर बांधलं, तेव्हाच एक जास्तीची खोली बांधायला हवी होती. पण त्यावेळी पैशाची चणचण होती.'

'येताना शास्त्रींना भेटून यायचं राहून गेलं. अप्पाजींच्या अस्थी-रक्षेचं विसर्जन करायच्या दिवशी मीही येईन, असं सांगायला हवं होतं. गाडी घेऊन गावी जायचं, ते राखेचं गाडगं घेऊन, स्वत: गाडी चालवत श्रीरंगपट्टणला जायचं'– तिच्या मनात विचार तरळू लागले. त्यातही एक प्रश्न तरळून गेला, जो धर्म कधीच सोडून दिलाय, त्या धर्माच्या कर्मकांडामध्ये पुन्हा का अडकायचं? पण काल गावी गेल्यावर अप्पाजींची पुस्तकं बघितल्यावर, त्यांची समाधी बघितल्यावर आणि शास्त्रींशी अप्पाजींविषयी एवढ्या गप्पा मारल्यावर 'सोडून दिलेला धर्म' ही भावना दुर्बल झाल्यासारखं जाणवलं.

अमिनानं नाश्त्यासाठी हाक मारली. ऑम्लेट-सँडविच खाऊन चहा प्यायल्यानंतर दुपारच्या जेवणाचा मेनू तिला सांगून ती अंघोळीला गेली. बाहेर येऊन पाच मिनिटं झाली असतील, नसतील फोन वाजला. आमिर! तिनं रिसिव्हर उचलला. होय, तोच होता.

"येऊन पाऊण तास झाला."

"काल संध्याकाळी येशील म्हणून वाट पाहिली. इतक्या वर्षांनंतर एकटीच गावाकडे गेली होतीस. काय झालं कोण जाणे, म्हणून भीती वाटली."

"काहीही झालं नाही. माहेरवाशिणीशी वागावं तसं सगळे वागले. घरी केव्हा येतोयस? सगळं सांगते."

"गुरुराजनं सांगितलंय, पुढचे तीन महिने त्याचं शेड्युल आहे, या दहा तारखेपासून हंपीचं शूटिंग सुरू करू या, म्हणतोय तो. तुझी प्रस्तावना आणि तपशील लिहून झाल्याशिवाय शूटिंगचं प्लॅनिंग कसं करायचं?"

"ओह! ते होय!" तिला पुन्हा डोक्यावरचं ओझं पुन्हा येऊन बसल्यासारखं वाटलं. संध्याकाळी घरी येत असल्याचं सांगून त्यानं फोन खाली ठेवला.

हंपीचं नाव कानावर पडताच तिथला भग्न नरसिंह मनाला पुन्हा व्यापून राहिला. पाठोपाठ, 'एवढी गावात गेले होते, पण नरसिंहाच्या देवळात गेले नाही,' हेही तीव्रपणे आठवलं. तीस फुट उंचीच्या टेकडीवरचं नरसिंहाचं देवालय. आधी गाव वसलं नव्हतं. नंतर देवळाच्या भोवताली गाव वाढलं. ती मूर्ती पाहिली असती तर उग्र नरसिंहाची, हंपीमधली मूर्तीच आठवली असती. हे देऊळ काही तेवढं प्रसिद्ध नाही. कुठल्याही नबाबानं, सुलतानानं किंवा बादशहानं यावर आक्रमण केलं नव्हतं. त्यामुळे देवालय आणि मूर्ती अभंग अवस्थेत आहे, हेही आठवलं.

मूळचं कारण न समजून घेता हंपीवरच्या लघुपटासाठी स्क्रिप्ट लिहिणं तिला आतून अशक्य वाटत होतं. संध्याकाळी आमिर घरी येताच तिनं गावी घडलं ते सगळं सांगितलं. नंतर म्हणाली, "तूर्त तरी मला काहीही लिहायला जमेलसं वाटत नाही. त्यावर उगाच वाद-विवाद करून कटकट व्हायला नको. इतर कुणाकडून तरी हे काम करवून घे."

"तुझ्या स्क्रिप्टशिवाय आणखी कुणाच्या स्क्रिप्टवर मी काम केलंय आजवर?"

"मग ही ऑफर सोडून दे."

"एकदा नाही म्हटलं तर हेरिटेजवाले पुन्हा काम देणार नाहीत. हे लक्षात ठेवून जे सांगायचं ते सांग."

तिनं पुन्हा दोन दिवस खटपट केली. तरीही अशक्य वाटलं. तिनं सांगितलं, "मला गावी जाऊन आलं पाहिजे. अप्पाजींची रक्षा विसर्जित करायची आहे. त्यांची मुलगी या नात्यानं निदान तेवढं तरी करेन. कार घेऊन जाईन, तीन दिवस लागतील. तोपर्यंत तू तुझी स्कूटर वापर."

यावर आमिर लगेच काही बोलला नाही. पण त्याच्या चेहऱ्यावरचं असमाधान लपत नव्हतं.

"का? स्क्रिप्ट लिहायला जमणार नाही, म्हणाले, म्हणून राग आला?" म्हणत तिनं त्याचा हात धरला.

"साम्यवादी, विचारवादी, आधुनिक आहेस. त्या धार्मिक सिंबॉल्सना शरण जातेस? चिता-भस्म, संगमामध्ये त्याचं विसर्जन हे सगळे सिनेमात दाखवायचे सीन!"

'इथे सोशालिस्ट, तिकडे पोस्टमॉडर्न विचारवंत असूनही मुस्लीम वळणाची खुरटी दाढी ठेवलीयस ना! तो नाही का सिंबॉलिझम?' हे पटकन मनात आलं. पण तिनं मनाला आवर घातला. त्यापैकी एकही वाक्य जिभेवर येऊ दिलं नाही.

"जशी तुझी आणि माझी वेव्हलेन्थ जुळते, तशी माझी इतर कुणाशी जुळत नाही. आता आयत्या वेळी आणखी कुणाला शोधायचं?" त्यानं विचारलं.

यावरही तिनं काही उत्तर दिलं नाही.

ती तीन दिवस बेंगळुरूमध्ये राहिली. करायची म्हटलं तर करायला कितीतरी कामं होती. पण कशातही मन रमत नव्हतं. मनात सारखं येत होतं, 'आपण गावी जाऊन पोहोचण्याआधीच त्यांनी कुणाच्या तरी हस्ते त्या कलशाचं विसर्जन करून टाकलं तर? त्याचबरोबर त्या खोलीतली सगळी पुस्तकं वाचली पाहिजेत,' अशी जबर इच्छा मनात दाटून येत होती.

चौथ्या दिवशी मात्र उठल्या-उठल्या तिनं आठवड्याभराचे कपडे एका सूटकेसमध्ये कोंबले. दोन बेडशिट्स आणि एक घोंगडं गुंडाळून डिकीत टाकलं आणि आमिरचा निरोप घेऊन ती निघालीच! त्यानं कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. गेले तीन दिवस तो अस्वस्थ आहे, हे दिसतच होतं तिलाही. आता याचं समाधान करायचं म्हणजे स्क्रिप्ट लिहिणं कबूल करणं. आता त्या फंदात पडायलाच नको, म्हणत तिनं कार स्टार्ट केली. तिला निरोप द्यायलाही तो बाहेर आला नाही.

या खेपेला येताना मात्र तिनं कपाळाला टिकली लावली होती. खोलीत सूटकेस आणि अंथरूण-पांघरूणाची वळकटी ठेवून तिनं लक्ष्मम्माला, आपण आठ दिवस राहणार असून, दुपारच्या जेवणासाठीही आहे असं सांगितलं अन् ती शास्त्रींच्या घराकडे निघाली.

शास्त्रींच्या पत्नीने स्वागत करत म्हटलं, "कधी आलीस? थोडं उपीट राहिलंय. दही घालून देते. खा हो!"

तिनं शास्त्रींना विचारलं, "मी रक्षा-कलशाचं विसर्जन करू शकेन? चालेल?"

"त्यांच्या पोटी जन्मलीस. न चालायला काय झालं?"

"मी धर्म बदललाय ना, म्हणून विचारलं."

"तुला सांगू का? धर्मांतर असं काही नसतंच. जन्मजात धर्म आपण सोडतो, म्हटलं तर सुटत नाही. करू नये ते केलं तर प्रायश्चित्त मात्र घ्यावं लागतं. तू गोमांस-भक्षण केलंस?"

“होय!”

“तर मग त्यासाठी प्रायश्चित्त घे.”

“त्याची काय पद्धत असते?”

“तो तपशील प्रायश्चित्त करताना समजेल. तात्पर्य काय, तर आपण केलं ते चुकीचं, याची मनाला जाणीव होणं महत्त्वाचं. त्याच वेळी मनातल्या मनात पुन्हा ही चूक करणार नाही म्हणून संकल्प करायला पाहिजे. या दोन्हींसाठी तू तयार असशील तर सांग. तुला प्रायश्चित्त देववून तुझ्याकडून चिता-भस्माचं विसर्जन करवतो.”

इतक्या सुलभपणे हे प्रकरण संपेल याची तिला कल्पना नव्हती. “मी तयार आहे.” तिनं सांगितलं.

शास्त्रींनी लक्ष्मीला तीन दिवस दूध-फळावर ठेवलं. त्यानंतर एक होम करायला लावला. या काळात तिच्या मनात सतत ‘मी गोमांस खायची चूक केली आहे, त्याचं हे प्रायश्चित्त चाललं आहे’ ही भावना होती. त्यानंतर शास्त्रींना मागच्या सीटवर बसवून, आपल्या शेजारच्या सीटवर रक्षा-कलश लवंडणार नाही अशा प्रकारे काथ्यानं नीट बांधल्यावर ती स्वत: गाडी चालवत पश्चिमवाहिनी नदीपर्यंत गेली. नदीत तीन बुड्या मारल्या आणि मंत्रांचा उच्चार करत असताना तिनं त्या रक्षेचं विसर्जन केलं.

रक्षा-विसर्जन करून आल्यावर तिला वडिलांच्या आठवणी आणखी निकटच्या वाटू लागल्या. आपलं हे प्रायश्चित्त फक्त गोमांसाशी संबंधित नाही, योग्य-अयोग्य हा प्रश्न बाजूला सारून, अप्पांचं मन दुखवल्याबद्दलही झालं, असं वाटून मन थोडं शांतही झालं. त्यांनी एकत्र करून ठेवलेली आणि वाचन करून पचवलेली ही सगळी पुस्तकं आपणही वाचली पाहिजेत, हा विचार आणखी पक्का झाला. ‘जगण्यासाठी चित्रकथा, संवाद वगैरे लिहायची गरज नाही. गावात अप्पांनी राखून ठेवलेली शेती आणि घर आहे, तेवढं पुरेसं आहे जगायला! नवे अनुभव न घेता, साचलेल्या जीवनातली कथानकं आणि संवाद लिहून-लिहून माझी सर्जनशक्ति नि:सत्त्व होत चालली आहे. दोन-तीन वर्षं त्या कामातूनही सुटका होईल!’

‘ही सगळी पुस्तकं बेंगळुरूला नेली तर? नको. अप्पाजींनी वाचलेले हे ग्रंथ याच खोलीत, याच घराच्या छायेत, याच वातावरणात वाचले पाहिजेत.’ अशा प्रकारची भावनात्मक तादात्म्यता प्रबल होऊ लागली. ‘दोन-तीन वर्षं इथेच राहून ही पुस्तकं वाचेन,’ असा मनाशी निश्चय दृढ होऊ लागला. ‘आमिर रागावेल. हंपीवरच्या लघुपटासाठी स्क्रिप्ट लिहिलं नाही म्हणून आधीच तो रागावलाय. घरात त्याचं हवं-नको बघायला अमिनाबानो आहेच. मीही महिन्यातून एखाद्या वेळी जाऊन आले तरी पुरेसं आहे. नाहीतरी कार आहेच. त्याला यायचं असेल तर तो येऊन जाईल.’ तिनं मनातल्या मनात शिस्त लावून टाकली.

३

“प्रिय अम्मीजान, सलाम आलेकूम. बिस्मिल्ला रहमान उर्र रहीम.

आपलं पत्र मिळालं. अलीकडे आपण जास्तीचा वेळ आपल्या जन्मगावी काढता, हे वाचून आश्चर्य वाटलं. तुम्हाला तुमचं असं एखादं जन्मगाव असेल, याची मला कल्पना करणंही कठीण होतंय! तुम्हीही त्या संदर्भात काही सांगितलं नव्हतं. मला अम्मीकडून एक आजोबा आहेत, हेही मला तुम्ही सांगितलं नव्हतं. माझ्या कल्पनेत त्यांची कुठलीही मूर्तीच नाही. मुलगी परक्या धर्मात गेल्याचा राग ते अखेरपर्यंत विसरू शकले नाहीत असं दिसतं. हिंदू माणसं मुळातच अतिशय कोत्या मनाची असतात. इतर धर्मीयांना तुच्छ लेखणारे मूर्तिपूजक धर्मांध लोक, असं माझे आजोबा-आजी मला नेहमी या लोकांबद्दल सांगायचे, त्याची मला तीव्रपणे आठवण आली. जन्मगावाप्रमाणेच तुमचा पूर्वीचा धर्म तुम्हाला आकर्षित करत असावा. मला खरी अडचण आहे, ती म्हणजे हवं तेव्हा मी तुमच्याशी फोनवरून संपर्क साधू शकत नाही. दोन वर्षं अमेरिकेत शिकायला राहिल्यानंतर पत्र लिहिणं हे अतिशय कष्टाचं काम वाटतं. शिवाय या अरब देशांमध्ये आत येणारी आणि बाहेर जाणारी काही पत्रं सेन्सॉर केली जातात. त्यामुळे पत्रामध्ये मोकळेपणानं लिहिता येत नाही. त्यामुळे फोन करणं सगळ्याच अर्थानं सोयीचं आहे. तुमच्या माझ्यावरील प्रेमासाठी का होईना, तुम्ही बेंगळुरुमध्ये राहावं, असं वाटतं. म्हणजे मला हवं असेल तेव्हा मी फोन करू शकेन. हे पत्रही मी, सुट्टीसाठी इंडियात येणाऱ्या लखनौच्या जनाब शबीबखान यांच्याबरोबर पाठवत आहे. इंडियात गेल्यावर स्टँप लावून पोस्टाच्या पेटीत टाकण्याची त्यांना विनंती केली आहे. त्यामुळे हे पत्र मी मोकळ्या मनानं लिहिलं आहे.

सगळ्या अरब देशांमध्ये सौदी हा सगळ्यात संप्रदायनिष्ठ देश आहे. पूज्य प्रवादी(स) यांनी जिथं जन्म घेतला, वाढले आणि इस्लामची स्थापना केली, तो हा देश! हज यात्रेचं हे पुण्य स्थान. इथे आपल्या धर्मातील प्रत्येक बारकाव्याचं निष्ठेनं पालन केलं जातं. अमेरिकेतून थेट इथे आल्यावर हा एक स्वातंत्र्य गमावलेला देश आणि श्वास कोंडून टाकणारा समाज आहे असं वाटतं. अमेरिकेत, त्यातही पेट्रो-केमिकल विषयात आणि त्यातही टेक्सास विद्यापीठात एम.एस. केल्यामुळे, मला इथे आशियात शिक्षण घेतलेल्यांपेक्षा दुप्पट पगार मिळतो. मुस्लीम असल्याचाही नोकरीमध्ये फायदा मिळाला. भरपूर पगार. टॅक्स नाही. इथल्या बाजारपेठेत जी समृद्धी बघायला मिळते, तेवढी जगाच्या कुठल्याही बाजारात बघायला मिळत नाही. धान्य, भाज्या, फळं, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, कपडेलत्ते, गृहोपयोगी वस्तू, सोनं-चांदी, हिरे, मौल्यवान खडे एक ना दोन! जगातल्या बाजारपेठेत ज्या-ज्या वस्तू आहेत त्या सगळ्या इथे आणून विकल्या जातात. अमेरिकेपेक्षाही इथली बाजारपेठ समृद्ध आहे. शिवाय किमतीही कमी. करांचं ओझं नाही. स्वतंत्र म्हणवत असलेल्या इतर देशांमध्ये असलेली चोरी, फसवणूक यांचीही कटकट नाही. इथल्या बाजारात चोवीस-सव्वीस कॅरेटच्या सोन्याचे दाग-दागिने मोठ्या प्रमाणात खुलेआम दुकानांवर लटकत असतात. अम्मीजान! त्यावर काचेचं आवरणही नसतं! झहर, असर, मग्रिब नमाजाची बांग ऐकू आली की व्यापारी दरवाजेही बंद न करता जवळच्या मशिदीकडे धाव घेतात. कुठल्याही दुकानामध्ये कधीही चोरी होत नाही. आश्चर्य वाटतं ना? चोरी करणाऱ्याचा लगेच शोध घेऊन पकडलं जातं, हात कापला जातो. मुलाहिजा नाही आणि विलंबही नाही. शरीयतप्रमाणे न्यायव्यवस्था. कोर्ट, वकील, उशीर, अपील, संशयाचा फायदा यासारख्या मूर्खपणाला अजिबात वाव नाही. खून, बलात्कार, व्यभिचार -गुन्हा कुठलाही असो. शुक्रवारचा दुपारचा नमाज झाल्यावर मशिदीच्या बाहेर उभं करतात आणि दगडांनी ठेचून मारून टाकतात. समाजव्यवस्थेसाठी एवढे कठीण नियम आणि त्यांचं पालन अत्यावश्यक असल्याची सगळ्या समाजाची खात्री पटते.

अम्मीजान, तुम्ही दागिने वापरत नाही, हे मला ठाऊक आहे. गळ्यात एखादी चेन आणि हातात दोन बांगड्याही तुम्ही वापरत नाही. अगदी पार्टीलाही तशाच जाता. इथे बाजारात फिरताना तेवढी एकच करमणूक आहे इथे– दागिन्यांच्या राशी बघताना मला तुमची आठवण येते. तुमच्यासाठी त्यातलं काहीतरी घेऊन यावंसं वाटतं. इंडियात सोनं मिळत नाही, असं नाही. पण इथे मिळतं तेवढं शुद्ध मिळत नाही. तुमच्या बांगडीचं माप सेंटिमीटरमध्ये मला कळवा. गावी येताना मी घेऊन येईन. कारण इथल्या सोन्याचा दागिना घडवताना तिथले सोनार त्यात भेसळ करतात. त्याऐवजी इथूनच घेऊन आलं तर चांगलं. विमानतळावर

काही अडचण आली तर लाच देऊन बाहेर पडता येतं, असं इथे काम करणारे भारतीय मला सांगतात...”

पत्र बरंच लांबलचक होतं. त्यातला आतला आवाज तिच्या लक्षात आला. ‘भाड्याचा फ्लॅट घेऊन आमिरच्या आई-वडिलांपासून लांब राहायला आलो. घरकाम-स्वयंपाकाबरोबरच छोट्या नझीरला सांभाळण्यासाठी ठेवलेली अमिना किती केलं तरी अशिक्षित वर्गातून आली होती. आम्ही दोघंही रोटेशनमध्ये कामाच्या निमित्तानं घराबाहेर राहत होतो. तेव्हा रडणाऱ्या बाळाला शांत करण्यासाठी ती त्याला धमकवायची, चिमटे काढायची, चापट्या मारायची. हे आमच्या लक्षात आलं होतं, पण त्या वेळी दुसरा मार्गही नव्हता. त्यामुळे आमिर सकाळी त्याला आपल्या आईकडे ठेवून रात्री घरी परतताना घेऊन येत होता. त्यांचाही नातवावर बराच जीव असल्यामुळे नझीरही आजोबा-आजीला अधिकच चिकटला. लाड करणाऱ्यांवर जास्त प्रेम, त्यांच्या बोलण्याला अधिक किंमत! आम्ही दोघंही नाटक-सिनेमाद्वारा अधिकाधिक आधुनिक आणि क्रांतिकारी समाजाची उभारणी करायची भाषा करत असताना आमचा मुलगा मात्र आजी-आजोबांच्या प्रभावाखाली पारंपरिक वातावरणात मोठा होत होता. त्यालाही आई-वडील आणि आजी-आजोबांमधला फरक समजत गेला आणि साहजिकच ज्यांच्याबरोबर असेल, त्यांच्यासारखं वागण्या-बोलण्याचं शहाणपण आपसूकच त्याच्यामध्ये आलं.

आजोबा-आजी जाईपर्यंत हे आमच्या लक्षातच आलं नाही. निदान माझ्यातरी. आमिरच्याही हे लक्षात आलं नसेल, का लक्षात येऊनही त्यानं काही सांगितलं नसेल? त्याला हे सोयीचं वाटलं असेल म्हणून? “मला आईकडून एक आजोबा आहेत, हेही तुम्ही मला सांगितलं नाही!... हिंदू अतिशय संकुचित मनोवृत्तीचे असतात... इतर धर्मीयांना हीन समजणारे, मूर्तिपूजक...” हे शिकवणारे आजोबा-आजी. त्यांनी माझ्या वडिलांविषयी त्याला काही सांगितलंच नाही? मला ठाऊक नव्हतं, असं लिहितो हा! पाठोपाठ आठवलं, हा नेहमी सगळं खरं बोलत नाही म्हणा! तरीही मुलाकडून पत्र तर आलं!’ तिला आनंद वाटला.

४

एक दिवस ती नेहमीप्रमाणे शेतात फिरून आली तेव्हा घरासमोर एक मोटरबाईक उभी होती. लांबून ती दिसली तेव्हा मनात कुतूहल निर्माण झालं, कोण असेल? त्याच उत्सुकतेनं ती घरी आली. ओसरीवर दोघं उभे होते. त्यापैकी एक जलील होता. बहुतेक वेळी आमिरच्या कामात त्याला मदत करणारा तरुण. तिला पाहताच त्यानं नम्रपणे 'सलाम आलेकूम' सांगितलं. दुसरा तरुण रघू, कॅमेरामन. तोही असिस्टंटच. त्याची ओळख करून दिल्यानंतर जलीलनं खिशातून एक पाकीट काढून तिच्या हातात दिलं. पाकिटावरील तिच्या नावावरूनच ते आमिरचं पत्र असल्याचं तिच्या लक्षात आलं.

लक्ष्मम्माला त्यांच्यासाठीही नाश्ता बनवायला सांगून ती पाकीट घेऊन आपल्या खोलीत गेली. भेट होऊन दोन महिने झालेत, आमिरनं प्रेम-पत्र लिहिलंय की काय? या विचारासरशी मनात मधुर भाव उमटले. त्याला नीट कन्नड लिहायला येत नाही. वाचता येतं. उर्दू शाळेत त्याचं शिक्षण झालंय. तिनं उर्दू शिकायचा प्रयत्न केला. पण ती लिपी जमली नाही. त्यामुळे त्यांचा पत्रव्यवहार इंग्लिशमध्येच होता.

हेही पत्र इंग्लिशमध्येच होतं.

"डिअर बीबी, तुझ्यावर राग नाही असं खोटं मी लिहिणार नाही. पण राग व्यक्त करायलाही मला वेळ नाहीये.

'अकबर महान', 'राष्ट्रवीर टिपू' ही दोन नाटकं लिहून बसवणं आणि कर्नाटकातल्या सगळ्या विद्यापीठांमध्ये, मुख्य कॉलेजांमध्ये असलेल्या नाट्यवेड्यांना एकत्र करून ती सादर करण्याचं शिक्षण देण्याच्या दृष्टीनं स्क्रिप्ट तयार करून, त्याचं दिग्दर्शन करण्याचं काम शासनानं मला दिलं आहे. हंपीची डॉक्युमेंट्री पूर्ण होताच गोलघुमट, सारनाथ, नालंदा विद्यापीठ, ताजमहल यावर डॉक्युमेंट्री बनवायचं कामही मलाच मिळणार आहे. यात नाटकाची जबाबदारी अंगावर घेणं मला शक्य नाही.

पूर्वी आपण दोघंही नाटकं करीत होतो, याची आजही कितीतरी नाट्यप्रेमींना आठवण आहे. आताही आपण हे काम एकत्रितपणे करू शकतो. पण मला वेळ नाहीये. त्यामुळे तूच या दोन्ही नाटकांची जबाबदारी घे. नाटकं लिही आणि दिग्दर्शन कर. पुढेही प्रमुख नाट्यसंस्था, कलाकार आणि दिग्दर्शकांना याचं शिक्षण दे. ही सरकारी योजना असल्यामुळे यासाठी हवा तितका पैसा उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे तू लगेचच बेंगळुरूला येऊन प्रोफेसर शास्त्रींना भेट."

ती उत्साहित झाली. 'अलीकडे सिनेमा क्षेत्रात गुंतत गेल्यामुळे नाटकाशी संबंधच राहिलेला नव्हता. बेंगळुरूमध्ये इतर ग्रुप्स नाटकं बसवतात, ती पाहायलाही वेळ मिळत नव्हता. किती दिवस लागतील ही दोन नाटकं लिहायला? आणि मुख्य म्हणजे त्यासाठी इतिहासाचा अभ्यास थांबवण्याचीही गरज नाही. दोन्ही कामं एकाच वेळी होऊ शकतील. ठीक आहे. त्या निमित्तानं बेंगळुरूलाही जाऊन येता येईल. एखादी रात्र आमिरचाही सहवास मिळेल. दोघंही आपापल्या व्यवसायात गर्क असताना मिळणाऱ्या अशा रात्री नात्यासाठी पोषक ठरतात.'

ती प्रोफेसर शास्त्रींना जाऊन भेटली तेव्हा त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, "हे बघ, सरकारनं माझ्या सल्ल्यावरूनच हा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी सरकार हवा तेवढा पैसा ओतायला तयार आहे. देशामध्ये पसरत असलेल्या जातीयवादी कॅन्सरवर कला आणि कलाकारांकडूनच उपचार करवले पाहिजेत, या माझ्या विचाराचं महत्त्व सगळ्यांना, त्यातही सीएमला पटलं आहे. तू हे काम मनापासून कर." आणि त्यांनी पाठ थोपटली.

आमिर गावातच होता. पण तिच्यावरचा त्याचा राग तसाच होता. म्हणाला, "मला रात्री शूटिंगसाठी गेलं

पाहिजे.”

“अरेच्चा! खोटं बोललो तर सापडेन, याचीही पर्वा नाहीय तुला. लघुपटाचं शूटिंग बेंगळुरूच्या स्टुडिओमध्ये चालत नाही, हे तुला सुचलं नाही. बायको आपणहून आल्यावर उगाच रुबाब दाखवणं हा नवऱ्याचा – त्यातही मुस्लीम नवऱ्याचा विशेष हक्क आहे. की आलेलं म्हातारपण लपवायला उगाच रागाचा पडदा वापरतोयस?” अशी थट्टा करत तिनं त्याच्या रागाचा पारा खाली आणला.

पुन्हा प्रो. शास्त्रींना भेटून ती नरसापूरला परतली आणि आल्या आल्या टिपू सुलतानाच्या संदर्भाच्या शोधकार्याच्या मागे लागली. अप्पाजींच्या संग्रहात त्या संदर्भातली पुस्तकं तर होतीच, शिवाय अप्पाजींनी पंधरा-वीस पानांचं केलेलं टिपण सुदैवानं तिच्या हाताला लागलं. काही वाचन झाल्यावर एकदा ती बेंगळुरूला जाऊन ग्रंथालयात बसून काही टिपणं करून घेऊन आली. त्या वेळी आमिर गावात नव्हता, अमिनाबानोही रामनगरला लेकीकडे गेली होती.

वाचता वाचता तिला वाटू लागलं, कर्नाटकातील सेक्युलॅरिस्ट आणि भारतातील मुसलमानांनी याला इतका मोठा राष्ट्रवीर का बनवलाय? अन् आजही करताहेत? ती आश्चर्यचकित झाली. याचं खरं स्वरूप दाखवणारं नाटक लिहिलं तर प्रोफेसर शास्त्री त्याला पाठिंबा देणार नाहीत. सरकारही त्यासाठी आर्थिक मदत करणार नाही. राजकीय स्वार्थापोटी त्यांनी टिपूला सहिष्णू, राष्ट्रवीर म्हणून बिंबवायला सांगितल्याचं तिच्या लक्षात आलं. प्रचाराचा हेतू डोक्यात ठेवून नाटक लिहिणं तांत्रिकदृष्ट्या सोपं आहे. टिपूसारख्या क्रूर, अन् केवळ असहिष्णूच नव्हे, तर परधर्माचा द्वेष करणाऱ्या व्यक्तिला सहिष्णू आणि राष्ट्रवीर दर्शवायचा असेल तर विशेष तंत्राचा वापर करावा लागेल. पण हे का करायचं?...

या विचारांच्या आंदोलनात असताना तिनं आमिरला एक पत्र लिहिलं,

“प्रिय आमिर,

कसा आहेस? बायकोची आठवण येते की नाही? तू इथे येशील म्हणून मी दररोज वाट पाहतेय.

गावची मुलगी म्हणून मला गावातील लोकांनी स्वीकारलं आहे. तूही येत-जात राहशील तर तुलाही ही माणसं जावई म्हणून स्वीकारतील. जाती-भेदाच्या भिंती असल्या तरी हिंदूंमध्ये त्या ओलांडण्याची सहिष्णूताही आहे. तू इथे येऊन तर बघ, तुझ्याच लक्षात येईल ही गोष्ट!

गेले दोन महिने माझं टिपूच्या संदर्भातलं वाचन आणि संशोधन सुरूच आहे. त्याच्या संदर्भात नाटक लिहिण्यात येणाऱ्या कलात्मक अडचणी मला समोर दिसताहेत. त्या कळवण्यासाठी म्हणून हा पत्र-प्रपंच. समोरासमोर बसून बोलण्यापेक्षा या संदर्भात लिहिणं मला सोयीचं वाटतंय. लिहिताना माणूस जास्त गंभीर असतो आणि इतर फापटपसाऱ्याशिवाय अधिक स्पषटपणे आपले विचार व्यक्त करू शकतो.

काही जुने लेखक – त्यातही जुन्या म्हैसूर संस्थानातील लोक टिपूचं ज्या प्रमाणात उदात्तीकरण करतात, ते पाहिलं की अक्षरश: किळस येते. इतिहासाशी संबंधित विषयावर लेखन करताना, इतिहासाचा विपर्यास करताना, लेखन-स्वातंत्र्यावर काहीतरी मर्यादा हवी की नाही? अगदी सुरुवातीपासून मी लेखनस्वातंत्र्याचा सर्वशक्तिनिशी पुरस्कारच केलाय. पण आता जाणवतंय, अशा प्रकारचं अज्ञानमूलक लेखनाचं उदात्तीकरण करताना इतरांचं बौद्धिक आणि मानसिक स्वातंत्र्य पायदळी तुडवणाऱ्या एका टोळीचा मीही एक भाग झाले होते. आणि या कशाचीही जाणीव नसल्यामुळे त्याचा अभिमानही बाळगत होते. आधुनिक विचारप्रवाहाच्या मागे लागून सत्याकडेच संपूर्णपणे पाठ फिरवून बसले होते. ही टोळी सांगेल तेच अर्थशास्त्र, तीच नैतिकता, तोच प्रतिक्रियावाद, तोच प्रगतीचा राजमार्ग आणि ते दाखवतील तेच इतिहासातलं सत्य यावर मी संपूर्णपणे विश्वास ठेवला होता. सत्याला पायदळी तुडवून मिथ्याला डोक्यावर घेऊन मांडलेल्या अनेक दृष्टान्तांमध्ये टिपूची कथाही एक आहे.

भारतातील स्वातंत्र्यसंग्रामामध्ये जुन्या म्हैसूर राज्याच्या बाजारपेठा, जत्रा अशा सार्वजनिक ठिकाणी,

इतिहासाचं अध्ययन नसलेल्या, अर्धशिक्षित लावणीकारांनी लिहिलेल्या रचना डिमडी वाजवून गायल्या जात होत्या. मुसलमान – त्यातही मुसलमान व्यापारी या लावणीकारांना पैसे देऊन प्रोत्साहन देत होते. अशाच प्रकारे, टिपूचं उदात्तीकरण करण्यात आलेली नाटकंही त्याच्या ब्रिटिशांविरुद्धच्या लढाईला महत्त्व देऊन लिहिण्यात आली. प्रेक्षकांनीही मग यालाच खरा इतिहास मानला. स्वातंत्र्योत्तर काळात तर मार्क्सवादी, व्होट बँकवाले राजकीय पक्ष, मुस्लीम कलावंत, नाटककार, चित्रपट निर्माते या सगळ्यांनी टिपूला राष्ट्रीय नायक म्हणून समाजमनावर बिंबवलं. टिपूच्या दोन लहान मुलांना ओलीस ठेवून घेणारे इंग्रज कठोरहृदयी, पण अशाच प्रकारे युद्धबंदींना ओलीस ठेवणाऱ्याचं मात्र सोयीस्करपणे विस्मरण! औरंगजेबाचा सेनापती मीर जुम्ला यानं आसामच्या राजाला युद्धात हरवलं, त्याच्याकडील सोनं-नाणं, हिरे-माणकं आणि नगद लुटल्यावर आणखीही संपत्तीची मागणी केली. ती मागणी पूर्ण होईपर्यंत राजाची मुलगी आणि मुलं आणि बुऱ्हा गो हेन, बार् गां हेन, गड् गुनिया उखान आणि बड पत्रा उखान या चार मंत्र्यांच्या मुलांना युद्धबंदी म्हणून जबरदस्तीनं घेऊन गेल्याचा उल्लेख औरंगजेबाविषयीच्या अधिकृत इतिहासात आला आहे. (मासिर-इ-आलंगीरि, लेखक – साकी मुस्तादखान, पाचवे वर्ष, अल हिजिरा १०७२.५. जानेवारी १६०३ आणि जदुनाथ सरकार यांचं A Short History of Aurangzib, Orient Longman 1979, P.108) मोगलांच्या काळात राजपूत राजांना आपल्या किमान एका तरी मुलाला बादशहाच्या दरबारात ठेवावं लागे. तेही, तसं पाहिलं तर युद्धकैदीच. अकबरापासून सुरू झालेली दुसरी एक पद्धत म्हणजे हरलेल्या राजाच्या एका मुलीशी बादशहा लग्न करत असे. हाही युद्धकैदी ठेवण्याचाच एक प्रकार! महाराणा प्रतापवरही आपल्या मुलाला अकबराच्या दरबारात पाठवण्यासाठी असा दबाव आणण्यात आला होता. पण राणा प्रतापनं हे मान्य केलं नाही. पुढे शहाजहान असं नामकरण करून घेतलेला खुर्रम जेव्हा त्याचे वडील जहांगीर याच्याविरुद्ध हरला, तेव्हा जहांगीरनं खुर्रमच्या दोन मुलांना – म्हणजेच खुद्द आपल्या नातवंडांना – दारा आणि औरंगजेब यांना युद्धबंदी म्हणून ठेवून घेतल्याचेही उल्लेख आहेत. पण ब्रिटिश कॉर्नवॉलीसनं टिपूच्या दोन मुलांची जेवढी काळजी घेतली, तेवढी काळजी मोगल राजे कधीच आपल्या युद्धबंद्यांची घेत नव्हते. या युद्धकैद्यांचं धर्मांतर करण्यात येई.

‘ब्रिटिशांविरुद्ध झगडणारा’ हे कारण पुढे करून टिपूला राष्ट्र-नायक म्हणायचं असेल तर त्याच ब्रिटिशांविरुद्ध लढणाऱ्या मराठ्यांचं हेच इतिहासकार आणि साहित्यिक का उदात्तीकरण करत नाहीत? आपल्या सगळ्या शत्रूंमध्ये मराठेच सर्वात बलवान आहेत, हे ब्रिटिशांनी ओळखलं होतं. टिपूला ‘कर्नाटकाचा कुँवर’ असं कर्नाटकातील मुलं म्हणतात. ओडेयारांच्या काळात कर्नाटकाच्या राजकारणाची भाषा कन्नड होती. ती बदलून टिपूनं पारशी भाषा आणली. शेतसाऱ्याच्या संदर्भात आजही ‘खातेखिर्दी’, ‘पहाणी’, ‘खानेसुमारी’, ‘गुदस्ता’, ‘बरानमुने’ वगैरे सगळे शब्द त्यानंच आणले. आजही जुन्या म्हैसूरच्या शेतसाऱ्याच्या खात्यात प्रचलित असलेली, वडिलांच्या नावापुढे ‘बिन’ लावण्याची पद्धत टिपूच्या काळी अस्तित्वात आणली गेली. वेंकटेगौडांचा मुलगा नरसिंहगौडा असं लिहायच्याऐवजी ‘नरसिंहगौडा बिन वेंकटेगौडा’ असं लिहिलं जातं.

गावांची मूळ नावंही त्यानं बदलली आहेत. ब्रह्मपुरीचं सुलतानपेठ झालं. केरळमधलं काळीकोटे किंवा आजचं कलिकोटेचं फरुकाबाद, चित्रदुर्गचं फरुकयदहिस्सार, कोडगचं जफाराबाद, देवनहळ्ळीचं युसुफाबाद, दिंडिगलचं खलीलाबाद, गुत्तीचं फैजहिस्सार, कृष्णगिरीचं फल्-इल्-अझम, म्हैसूरचं नझाराबाद, पेनुगोंडाचं फक्राबाद, संक्रीदुर्गचं मुज्जफराबाद, शिराचं रुस्तुमाबाद, सकलेशपूरचं मंजराबाद– अशी कितीतरी लांबलचक यादी देता येईल. या गोष्टी टिपूचं राष्ट्रनेतेपद दर्शवतील की सहिष्णूता? मूळ हिंदू नावं बदलून त्याऐवजी इस्लामी नावं देण्याची पद्धत पूर्वापार चालत आली आहे. औरंगजेबनंही चतगावचं इस्लामाबाद केलं. केशवराज-मंदिराचा नाश केल्यानंतर मथुरेलाही इस्लामाबाद हे नाव ठेवलं. काशीला महमदाबाद म्हटलं गेलं. फक्त औरंगजेबनं हे केलं, असं नाही. सगळ्या राजांनी हे काम केलंय. आग्र्याचं अकबराबाद झालं. दिल्लीचं शहाजहानाबाद झालं. गोवळकोंडा हैदराबाद झालं. बिदरला जफाराबाद केलं. कड्याला नेकनामाबाद केलं. हिंदूंचं पवित्र तीर्थक्षेत्र प्रयागचं अल्लाहबाद (अल्लाहूचं गाव) केलं. आजच्या अलीगढचं मूळचं नाव कोम होतं.

मुस्लीम राज्यकर्त्यांनी भारतातील ज्या गावांची मूळ नावं पुसून टाकून मुस्लीम नावं ठेवली, अशा गावांची आठ पानांची यादी माझ्या अप्पाजींनी त्यांच्या हस्ताक्षरात लिहून ठेवली आहे. त्या यादीच्या अखेरीस त्यांनी लिहिलं आहे, ‘भारताच्या कानाकोपऱ्यात प्रवास करून, स्थानिक विद्वानांचं सहकार्य घेतल्याशिवाय या

स्थळं-नामांतराची समग्र यादी बनवणं शक्य नाही. रिकाम्या जागेवर गावं वसवून त्यांना अशा प्रकारची नावं द्यायला माझा विरोध नाही. पण अस्तित्वात असलेल्या गावाचं नाव बदलणं आणि एखाद्या जिवंत व्यक्तिचं धर्मांतर या दोन्ही सारख्याच तिरस्करणीय गोष्टी आहेत.'

अप्पाजींच्या संग्रहात मला 'टिपू सुलतानची स्वप्नं' या शीर्षकाची टंकलिखित केलेली प्रत मिळाली आहे. टिपू स्वत:च्या हस्ताक्षरात फारसी भाषेत लिहून ठेवायचा. याविषयी त्यानं आयुष्यभर गोपनीयता बाळगली होती. कर्नल विल्यम कर्क पॅट्रिक याला ती श्रीरंगपट्टणच्या राजवाड्यातील शौचालयात सापडली. टिपूचा अत्यंत विश्वासू सेवक हबीबउल्ला यानं ती ओळखली आणि ते हस्ताक्षर टिपूचंच असल्याची खातरजमा केली. त्याची मूळ प्रत आणि इंग्लिश अनुवाद लंडनमधील इंडिया ऑफिसमध्ये आहे.

ती वाचल्यावर तर टिपू किती धर्मांध होता, याची अधिकच खात्री पटते. त्यात तो हिंदूंचा उल्लेख 'काफर' म्हणूनच करतो. इंग्लिश लोकांचा उल्लेख 'क्रस्ति' असा करतो. लांबलचक दाढीवाले मुल्ला त्याच्या स्वप्नात वरचेवर येतात. आपण मक्का यात्रेला गेल्याची स्वप्नं तो पाहतो. प्रवादी महंमदांनी टिपूला सोडून मी स्वर्गात पाऊल ठेवणार नाही, असं सांगितलं; असं एक लांब दाढीवाला अरब सांगतो. मुस्लीम नसलेल्या सगळ्यांना मुस्लीम आणि सगळी मुस्लिमेतर राज्यं मुस्लीम करण्याचं स्वप्न तो पाहतो.

या छोट्या चोपडीत भारताच्या आधुनिकीकरणाचा सूक्ष्मसा धागा शोधूनही सापडत नाही. आपल्या मार्गातला मोठा काटा ब्रिटिश (तो नेहमी 'क्रस्ति' अशा जातिवाचक नावानं उल्लेख करतो) यांना पळवून लावण्याची तीव्र इच्छा तो यात वरचेवर व्यक्त करतो. या एका कारणासाठी त्याला आधुनिक, जाती-विरोधक आणि भारतीय तंत्रज्ञानाचा पितामह म्हणून चित्रित करण्यासाठी या चोपडीचा आधार घेणं कसं शक्य आहे? या प्रश्नाचं उत्तर बौद्धिक सचोटी मानणाऱ्यांना देता येत नाही. त्यामुळे नाटकात अशा प्रकारेही त्याला रंगवता येणं शक्य नाही.

मलबार आणि कोडगु येथील हिंदूंचं जबरदस्तीनं धर्मांतर करणाऱ्या टिपूनं म्हैसूर प्रांतात मात्र हे धैर्य दाखवलेलं दिसत नाही. १७९१ मध्ये ब्रिटिशांशी मोठं युद्ध झालं, टिपू हरला. ब्रिटिशांना फार मोठ्या प्रमाणात संपत्ती आणि दोन मुलांना युद्धकैदी म्हणून सुपुर्द केल्यानंतर शृंगेरीमठाला भेटवस्तू देऊन त्यानं हिंदूंच्या मतांना गोंजारण्याचा प्रयत्न केला, या घटनेचा उपयोग करून आजचे स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणवणारे टिपूलाही धर्मसहिष्णू म्हणताहेत! अफगाणचा राजा जमानशाहला आणि तुर्कस्तानच्या खलिफाला भारतावर आक्रमण करून संपूर्ण देश इस्लाममय करा, असं पत्र टिपूनं लिहिलं होतं. १७९६ साली म्हैसूरचा राजवाडा त्यानं लुटला, तेव्हा तिथल्या ग्रंथालयातील अमूल्य ग्रंथ, ताडपत्रांवरील हस्तलिखितं जळण म्हणून वापरायची त्यानं आज्ञा दिली होती. मलबारचे मुसलमान मल्याळम भाषा, तमिळनाडूचे मुसलमान आजही तमीळ भाषा बोलतात; पण म्हैसूरचे मुसलमान आजही उर्दूबोलतात. कन्नड बोलायला-लिहायला नकार देतात, ते टिपूनं इथे सुरू केलेल्या उर्दू-फारसी शिक्षणाच्या पद्धतीमुळे! आपल्या हिंदू सेनाधिकाऱ्यांना पकडून त्यांचं धर्मांतर करायची सूचना देणारी, टिपूची कितीतरी पत्रं आजही आपल्याला वाचायला मिळतील.

त्याचं क्रौर्य, इतर धर्मांवरचा त्याचा द्वेष आणि या प्रदेशातल्या मूळ रहिवाशांविषयी असलेला तिरस्कार यांसारख्या शेकडो घटनांची पुराव्यानिशी मी नोंद केली आहे. ज्यांना कुतूहलानं त्यांचा अभ्यास करायचा असेल, त्यांच्यासाठी ही सर्व सामग्री उपलब्ध आहे. या पत्रांमध्ये तो सगळा तपशील द्यायचं कारण नाही.

अशा माणसाचं नाटकात राष्ट्रवीर म्हणून कसं चित्रण करता येईल? तूही कलाकार आहेस, तूच सांग!

तुझी लाडकी बीबी."

महिना गेला तरी आमिरकडून उत्तर आलं नाही.

तो अस्वस्थ होईल, हे पत्र पोस्टात टाकतानाच तिला ठाऊक होतं. पण तिच्या दृष्टीनं तो कलेच्या प्रामाणिकपणाचा प्रश्न होता. याच कलेच्या ओढीपायी तिनं आपला धर्म सोडून, आई-वडिलांची जागा एकत्रितपणे घेणाऱ्या अप्पाजींना सोडून वैवाहिक जीवन स्वीकारलं. इतक्या वर्षांच्या सहजीवनानंतर मनात

उमटलेलं सत्य त्याला न सांगून कसं चालेल? जर त्याला पत्रातले मुद्दे पटले नसतील तर तो मनमोकळ्या चर्चेसाठी का होईना, येऊ शकेल किंवा तिलाच चर्चेसाठी बोलावून घेऊ शकेल, असं तिला वाटलं होतं. पण हा तर उत्तरही न देता एका प्रकारे उपेक्षाच दाखवतो आहे. तिला राग आला.

पण दोन दिवस गेल्यावर तिनं स्वतःला समजावलं. ‘आपणच त्याला भेटून चर्चा केली पाहिजे,’ या विचारानं ती बेंगळुरूला जायला निघाली.

तो गावातच होता. घरातही होता. तीन महिन्यांनंतर बायको भेटल्यावरही त्यानं उत्साहानं स्वागत केलं नाही. तीच आपण होऊन बोलली. थट्टा करत म्हणाली, “वा! साहेबांची प्रकृती सुधारलेली दिसतेय!” खुर्चीच्या मागे उभी राहून त्याला गळामिठी घातली. तो जेवढ्यास तेवढी उत्तरं देत होता. शेवटी ती समोरच्या खुर्चीवर बसली आणि पत्रात लिहिलेले मुद्दे थोडक्यात सांगू लागली.

तिला मधे अडवत तो म्हणाला, “आपल्याला चर्चा करायची आहे ती इतिहासावर नव्हे, नाटकासंबंधी!”

“पण ऐतिहासिक पात्रांचा वापर करून आपल्याला हे नाटक साकार करायचं आहे.” नकळत तिचा आवाज चढला.

“कलाकाराचं म्हणून स्वातंत्र्य असतं ना, पण!” त्याचाही आवाज चढला.

“शुद्ध कलाकारासारखी निर्मिती केली तर स्वातंत्र्य असतंच. ते असलंच पाहिजे! पण जेव्हा एखादी कलाकृती प्रचारासाठी म्हणून साकार होते, तेव्हा तिथे शुद्ध कलात्मकता राहत नाही. आणि मला वाटतं, हे तुलाही ठाऊक आहे.”

“अलीकडे मी पाहतोय, तुझा इस्लामवरचा राग वाढतोय.”

“हे बघ, विषय बदलू नकोस. कलाकारानं धर्माच्या पलीकडे असलं पाहिजे, असं आपण कितीतरी वेळा बोललोय. आता तर मला वाटतंय, कलेपेक्षाही ‘सत्य’ मोठं आहे. कलाकाराची निर्मिती ही सत्याची अभिव्यक्ति असली पाहिजे. याव्यतिरिक्त दुसऱ्या कुठल्याही कारणासाठी कलेचा वापर करणं ही कलेशी प्रतारणा आहे.”

बोलण्याच्या ओघात व्यक्त झालेल्या या स्वतःच्या विचारांमुळे ती स्वतःच आश्चर्यचकित झाली. आतून एक प्रकारचा उन्नत भाव दाटून आला.

मात्र या बोलण्यामुळे त्याच्या मनातलं असमाधान कमी झालं नाही. तो उठून गच्चीत गेला, सिगारेट शिलगावली.

‘काय झालंय हिला? वडिलांचा ग्रंथसंग्रह वाचायचं निमित्त करून गावातच राहतेय. बायको म्हणून असलेल्या आपल्या सगळ्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष करतेय. काही सांगायला गेलं तर म्हणते, “साहेबांचं वय नाही का झालं? तुम्हीही तिकडे या, मीही येईन.” हे आठवताच आणखी राग आला. त्या गावी जाऊन राहायचं? छे:! एक रात्रही तिथे राहणं शक्य नाही. तिथे ही हिंदू पद्धतीनं राहते. कपाळावर टिकली लावते म्हणे! तिनंच सांगितलं हे. आता मी तिथे जाऊन राहायचं? आमिर! आणि त्या घरचा जावई? छे:! मला किती अवघड वाटेल हे हिला कसं समजणार म्हणा!’

“टेबलावर जेवण मांडलंय.” अमिनाबानोनं तिथे येऊन सांगितलं.

“ठीक आहे. तू जा.” त्यानं सांगितलं, पण आत न जाता तिथेच एक खुर्ची घेऊन बसला.

काही वेळानं रझिया जवळ येऊन म्हणाली, “अन्न गार होतंय.”

“तू जेवून घे. मला एकट्याला राहू दे.”

“काय हे! मी एवढ्या लांबून आलेय...” ती जवळ येत म्हणाली.

“मला सवय झालीय एकटं राहायची. तेच बरं वाटतंय मला. प्लीज! डोन्ट डिस्टर्ब मी.” तिच्याकडे ढुंकूनही न बघता त्यानं सांगितलं.

याहून जास्त पुढाकार घेऊन त्याची समजूत काढायची तिला इच्छा नव्हती. गेल्या दोन खेपेचा अनुभव लक्षात घेता त्याचा काहीही उपयोग होणार नाही, हेही तिला ठाऊक होतं. भूक जाणवत होती. तरी तो घरात असताना एकटीनं जेवणं तिला योग्य वाटलं नाही.

तिला आणखी एक घटना आठवली. चार महिन्यांपूर्वी ती इथे आलेली असताना दोघं जेवत होते. अमिनाबानो घरात नव्हती. ‘रस्सा गोमांसाचा की बकरीचा याविषयी माझं मन शंकित झालं होतं.

“तुकडे, मसाले यामध्ये काहीच फरक ठेवत नाही ही अमिनाबानो! त्यामुळे तुकडा तोंडात ठेवून चावेपर्यंत काहीच समजत नाही. आमिर, खाऊन बघ रे, हे कसलं मांस आहे ते.”

“का?”

“गोमांस असेल तर मी खाणार नाही.”

त्यानं माझ्या चेहऱ्याकडे पाहिलं. क्षणभर विचार करून म्हणाला, “का? काय झालं? अशी का विक्षिप्तासारखी वागतेयस?”

त्याला काय म्हणायचंय ते माझ्याही लक्षात आलं.

“यात विक्षिप्तपणाचा प्रश्नच नाही. माझ्या वडिलांची मी एकुलती एक मुलगी. त्यांना मुलगाही नाही. त्यांचे शव-संस्कार, दिवसकर्म काहीही केलं नाही मी. फक्त रक्षा-विसर्जन करू शकले. पण त्यापूर्वी शास्त्रींनी मला माझ्याकडून गोमांस खाल्ल्याबद्दल प्रायश्चित्त घ्यायला सांगितलं होतं. प्रायश्चित्तामध्ये ‘यानंतर पुन्हा ही चूक करणार नाही’ असा निश्चयही दडलेला असतो, नाही का?”

तो लगेच काही बोलला नाही. लग्न झाल्यावर सुरुवातीच्या दिवसांमध्ये गोमांसाचा विषय निघाला, की मी ‘तुम्ही डुकराचं मांस का खात नाही,’ म्हणून वाद घालत असे. आता यानं पुन्हा तोच वाद सुरू केला तर काय उत्तर द्यायचं, यासाठी माझं मन आतून तयार झालं.

पण त्यानं वेगळाच मुद्दा काढला, “सोडायचाच असेल तर सगळाच मांसाहार सोडावा. फक्त गाईचं मांस खायचं नाही, म्हणजे तीही एक प्रकारची अंधश्रद्धा नव्हे काय?”

मीही यावर विचार केला. हा म्हणतोय, त्याला अर्थ आहे आणि मी तर जन्मल्यापासून शाकाहारीच होते. शिवाय आताही घरात केंचप्पा आणि लक्ष्मम्मा शाकाहारीच पद्धतीनं राहतात. त्यामुळे त्या घरी गेल्यापासून मी एक दिवसही मांसाहार केलेला नाही.

मी त्याला म्हटलं, “आमिर, तुझं म्हणणं मला अगदी पटलंच. गावातल्या घरी तर मी पूर्णपणे शाकाहारीच असते. आहार हा आपापल्या आवडीचा प्रश्न आहे, हे खरं असलं तरी शाकाहार नाही म्हटलं तरी वरच्या दर्जाचा. त्यामुळे यानंतर मी इथे आले तरी पूर्णपणे शाकाहारीच राहीन.”

“आहारात असा भेद राहिला तर सहजीवनात एकता कशी राहील?”

“असं म्हणतोस? तर मग तूही शाकाहारी हो.”

"पण देवानं प्राण्यांची निर्मिती माणसाच्या आहारासाठीच केली आहे ना?"

"हाच मूलभूत फरक आहे. हा माणसाचा अहंकार आहे. हे सांगणारे धर्म माणसाचा हा अहंकार गोंजारतात."

एवढ्यावरच त्या दिवशीचं बोलणं थांबलं होतं. मी त्या दिवशी रस्सा खाल्ला नाही. दहाशीच जेवले. रात्री एकत्र झोपताना मात्र जाणवलं – या आहाराच्या मुद्द्यावरूनच आमच्या सहजीवनात अंतर निर्माण होत आहे.'

तिनं स्वत:साठी शाकाहारी तोंडीलावणं कर, असं अमिनाबानोला सांगितलं नव्हतं. आता तिनं काय शिजवून टेबलावर ठेवलंय कोण जाणे. परिस्थिती आधीच बिघडलेली असताना आपण एकटं जेवलो तर अंतर आणखी वाढेल, असा विचार करून ती तशीच अंथरूणावर जाऊन पडली. बराच वेळ झाला तरी तो शेजारी झोपायला आला नाही. त्यानं जेवणासाठीही तिला हाक मारली नाही. 'हा फक्त मी शाकाहारी झाल्याचा राग नाही. हंपीच्या भग्न मूर्ती, टिपूविषयीचे माझे विचार मी स्पष्टपणे कळवल्यामुळे आलेला राग आहे हा! पण याला बरं वाटावं म्हणून माझ्या मनातले विचार दाबून नाटकीपणानं वागायला पाहिजे होतं? आणि त्यानं तरी मी म्हणतेय त्यावर थांबून विचार का करू नये?'

नंतर केव्हा झोप लागली ते तिचं तिलाच समजलं नाही. जाग आली तेव्हा खिडकीच्या पडद्यामधून उजेड येत होता. पलंगावर ती एकटीच होती. एकटं-एकटं वाटलं तिला. 'आमिर मुद्दामच असं वागून मला दूर करतोय!'

ती उठली. तोंड धुवून दात घासल्यावर बाहेरच्या खोलीत येऊन तिनं पाहिलं. आमिरचं जेवण झालं होतं. रात्री त्यानं आपल्याला जेवायला बोलावलं नाही. तिचं मन हिरमुसलं. पायऱ्या चढून ती नझीरच्या खोलीत गेली. खोलीचं दार अर्धवट उघडं होतं. तिथे झोपलेला आमिर सिगारेट ओढत होता.

"इथे का झोपलास?" तिनं विचारलं.

"सॉरी! तू येशील तेव्हा व्हेज स्वैपाक करायला अमिनाला सांगायचं राहून गेलं."

"आज ती येईल तेव्हा सांगेन मीच, माझ्यासाठी एक व्हेजिटेरियन पदार्थ कर म्हणून. ते असू दे. तू इथे का झोपलास?"

"व्हेजिटेरियन बाईची काय ऊब असणार, असं वाटलं." तिच्याकडे न पाहता तो म्हणाला.

"आमिर! नवऱ्यानं बायकोकडे अशा वाहात नजरेनं बघायचं नसतं." तिच्या आवाजात नाही म्हटलं तरी तिरस्काराची छटा होती.

"यात वाहातपणा कसला? फक्त व्हेजिटेरियन स्त्रीच नवऱ्यापासून महिना महिनाभर दूर राहू शकते. तिथे राहून तू आणखी कसली-कसली व्रतं-वैकल्यं सुरू केली आहेस, कोण जाणे! उगाच मी कशाला त्यांचा भंग करू?"

तिला आणखी राग आला. वाटलं म्हणावं, पुन्हा तसंच बोलणं बोलतोयस... पण बोलली नाही.

५

एके दिवशी सकाळी केंचप्पानं तिला एक पाकीट आणून दिलं. आपल्या गावात पोस्टऑफिस आहे, ही गोष्टच ती विसरून गेली होती. तिच्या लहानपणी ते नव्हतं. चौकशी केल्यावर त्यानं सांगितलं, ते सुरू होऊन सात-आठ वर्षं झाली होती.

लखोट्यावरच्या पत्त्याकडे तिचं लक्ष गेलं. कन्नड अक्षरांमध्ये लिहिलेला पत्ता. कुणाचं हे अक्षर? तिला आठवेना. त्यावर कुणाकडून आलंय, तेही लिहिलं नव्हतं.

पाकीट फोडून तिनं पाहिलं, प्रो. शास्त्रींचं पत्र.

तिच्या मनाचा गोंधळ उडाला. पत्ता कन्नडमध्ये असला तरी आतलं पत्र इंग्लिशमध्ये होतं.

"प्रिय लक्ष्मी,

पहिल्यांदाच तुला मी पत्र लिहितोय. या आधी अशी संधीही मिळाली नव्हती आणि गरजही वाटली नव्हती. त्यामुळे मायना लिहिताना तुला लक्ष्मी म्हणू की रझिया, हा प्रश्न पडला होता. पण दोन्ही नावं सुंदर आहेत.

मध्यंतरी मी इथे नव्हतो. दोन आठवड्यांपूर्वी परदेशातून परतलो. गेल्या शनिवारी आमिर भेटला होता. तुझ्याविषयी सगळं सांगत होता. हंपी पाहिल्यापासून तू अत्यंत अस्वस्थ झाली आहेस, धर्मांध इतिहासकारांनी निर्माण केलेल्या भावुकतेला बळी पडून, लघुपटाचं स्क्रिप्ट लिहायला नकार दिलास हेही समजलं.

आजवर तू आणि आमिरनं एकत्रितपणे चित्रपट निर्माण केले आहेत. त्यानं अन्य कुणाकडून तरी या लघुपटाचं स्क्रिप्ट लिहवून घेतल्याचं समजलं, तेव्हा मला अतिशय वाईट वाटलं. इतिहासातलं सत्य या धर्मांध लोकांनी कल्पना करून लिहावं अन् डोक्यावर घेऊन नाचावं, एवढं सोपं नाही. विजयनगरनं आपला नाश स्वत:च करून घेतला आहे. तो मुसलमानांनी केलेला नाही. इथली देवालयं आणि मूर्तींचा नाश काही मुसलमानांनी प्रतीकाच्या रूपानं केला असला, तरी हिंदूही या बाबतीत मागे नव्हते. विजयनगरमध्ये शैव आणि वैष्णव अत्यंत रानटीपणे परस्परांशी भांडले, रक्त सांडलं असा इतिहास अलीकडच्या संशोधनाद्वारे उजेडात आला आहे.

एक गोष्ट तुझ्या लक्षात आली आहे का? आता आपण तिथली जी भग्न देवालयं आणि मूर्ती बघून हळहळतो, विद्ध होतो, ती सगळी देवालयं विष्णूची आहेत. लक्ष्मी-नरसिंह मूर्ती आणि विजय विठ्ठल देवालय ही याची दोन उदाहरणं म्हणून सांगता येतील. उलट शैवांच्या विरूपाक्ष देवालयाला कणभरही धक्का लागलेला नाही. आजही ते तेवढ्याच झोकात उभं आहे. असं का व्हावं? नरसिंह आणि विजय विठ्ठलाचा तेथील शैवांनी नाश केला. तिरुपतीचं– म्हणजे वैष्णवांचं– म्हणजे आंध्रवासीयांचं वर्चस्व सहन न झाल्यामुळे जुन्या शैवांनी मुसलमान राजांना बोलावून घेतलं आणि त्यांना विजयनगरमधील महत्त्वाची स्थळं दाखवली. इथल्या संपत्तीच्या आशेपोटी हे राजे चाल करून आले. हीच संधी साधून शैवांनी वैष्णव देवालयं आणि मूर्तींचा नाश केला आहे. आज काही जात्यंध मंडळी हे सारं मुसलमानांच्या माथी मारून जातीय द्वेष वाढीस लावत आहेत.

तू स्वत: इतिहासात एवढा रस घेत आहेस, याचा मला अतिशय आनंद आहे. मी आधुनिक इतिहासकारांशी तुझा परिचय करून देईन. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तू केवळ हाच नव्हे, संपूर्ण भारताचाच इतिहास पुन्हा एकदा वाच. मानवाच्या प्रगतीवर प्रकाश टाकणं हेच इतिहासाचंही ध्येय, नाही का?

तुझा,
एन.एस.एन."

या पत्रामुळे तिच्या विचारांना थोडीफार चालना मिळाली तरी त्यात व्यक्त केलेल्या विचारांबद्दल विश्वास निर्माण झाला नाही. तिला त्यातलं 'आधुनिक इतिहास' हे प्रकरणच फारसं पटलं नाही. टिपू सुलतानावरचं संशोधन आणि अप्पाजींनी लिहिलेली टिपणं वाचल्यानंतर तर तिचं मत यांच्या विरोधीच झालं होतं. त्यामुळे तिनं कुठल्याही प्रतिक्रियेशिवाय प्रा. शास्त्रींचं पत्र दुमडून बाजूला ठेवून दिलं.

पण एक दिवस मधे गेल्यावर तिनं पुन्हा ते पत्र बाहेर काढून वाचलं.

अप्पाजींचा 'सत्याचा शोध हेच इतिहासाचं ध्येय' हा दृष्टिकोन पुन्हा तिचं मन व्यापून राहिला. हे असं सोडता कामा नये. 'आधी आपण हंपीचा संपूर्ण इतिहास समजून घेतला पाहिजे. त्यानंतर प्रा. शास्त्री म्हणतात, त्या आधुनिक इतिहासकारांनाही भेटून चर्चा केली पाहिजे.'

त्या दृष्टीनं ती अप्पाजींच्या ग्रंथसंग्रहाचा शोध घेऊ लागली. भारताच्या विविधरंगी इतिहासाविषयी आस्था बाळगणारे अप्पाजी विजयनगरच्या संदर्भातही उत्सुक असलेच पाहिजेत!

मधल्या कपाटातल्या वरच्या कप्प्यातलं सिविल यानं लिहिलेलं ' A Forgotten Empire ' नजरेला पडलं. तिला आठवलं, 'या पुस्तकाचं नाव आपण ऐकलं आहे. पण कुठं? मेंदूला ताण दिल्यावर आठवलं. बहुधा हंपीमधल्या विरूपाक्ष देवालयासमोरच्या एका दुकानात आपण हे पुस्तक पाहिलंय. स्क्रिप्ट लिहिण्याचा व्यवसाय असणाऱ्या माझ्यासारखीला अशी अभ्यासपूर्ण पुस्तकं वाचण्याइतकी चिकाटी कुठून असणार म्हणा! आपण वाचलेल्या हंपीवरील चोपडीत या ग्रंथाचा उल्लेख असणं शक्य आहे. तिनं 'A Forgotten Empire ' च्या वरचं कव्हर उघडून पाहिलं तेव्हा तिथे अप्पाजींच्या हस्तलिखिताची आठ पानांची– एक छोटी चळत आढळली. प्रत्येक ग्रंथाचं आपल्याला झालेलं आकलन आणि त्यावरील आपली मताची टिप्पणी अशा प्रकारे नोंदवून ठेवायची अप्पाजींची पद्धत एव्हाना तिच्या लक्षात आली होती. शिवाय एकेका विषयाच्या संदर्भातली पुस्तकं एकत्र ठेवायची त्यांची पद्धतही तिच्या लक्षात आली होती. त्यामुळे तिनं शेजारीच असलेले इतर ग्रंथही पाहिले. श्रीनिवास रेड्डी आणि बी. आर. गोपाल यांचं 'A History of Karnataka ', एन वेंकटरमणय्या यांचं 'The Delhi Sultanate ', सूर्यनाथ कामत यांचं 'A Concise History of Karnataka ', पी. बी. देसाई यांचं 'Karnataka Through the Ages ' असे अनेक ग्रंथ तिथे होते. यातलं काहीही न वाचता लघुपटाचं स्क्रिप्ट लिहायला निघाले होते मी! माझी मलाच लाज वाटली. दोन-चार प्रवासी पुस्तिका वाचल्या तरी पुरेसं आहे, हे आमिरचे उद्गारही आठवले. हे सगळे ग्रंथ निवांतपणे वाचले पाहिजेतच, त्याही आधी अप्पाजींनी लिहून ठेवलेली ती प्रत्येक पुस्तकावरची टिपणं वाचायला हवीत.' तिनं ती टिपणं हातात घेतली आणि बैठकीवर बसली.

'इतिहासाला काही ध्येय आहे का, हा केवळ तत्त्वशास्त्राशी संबंधित आणि केवळ तर्काच्या मागे लागून इकडे तिकडे उडणारा प्रश्न आहे. पण इतिहासाच्या अध्ययनाला मात्र ध्येय आहे, ते म्हणजे सत्याचा शोध घेणं. इतिहासाची सामग्री शोधणं, त्याची निवड करणं आणि वस्तुनिष्ठ व शिस्तबद्ध पद्धतीनं त्यावर मत बनवणं, ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. पण अलीकडे – त्यातही स्वातंत्र्योत्तर काळात काही विद्वान या मार्गात जाणीवपूर्वक भिंती उभ्या करताहेत. त्या ओलांडून सत्यापर्यंत जाऊन पोहोचणं इतिहासकाराच्या दृष्टीनं आणखी कठीण झालं आहे. हंपीच्या संदर्भातही अशा भिंती मुद्दाम रचल्या गेल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे इथल्या मंदिरांचा आणि मूर्तींचा नाश मुसलमानांनी केलेला नाही, तर शैव-वैष्णवांच्या भांडणामध्ये हे घडलं आहे, हे सांगणंही याच प्रयत्नाचा एक भाग आहे. कारण इथे फक्त वैष्णव देवालयं नष्ट झाली आहेत. मुसलमान हल्ल्याचा फायदा घेऊन कर्नाटकातील शैवांनी आंध्राच्या तिरुपतीचं वर्चस्व नाकारण्यासाठी हे कृत्य घडवून आणलं, असंही सांगितलं जातं.

मुसलमानांची धर्मांधता झाकण्यासाठी कर्नाटकातील शैवांच्या डोक्यावर हे खापर फोडलं जातं. शैव राजे वैष्णव देवालयाकडे किंवा विष्णुपूजेकडे कसे पाहत होते, या प्रश्नावर मग मी बेंगळुरूमधील ग्रंथालयांमध्ये तासन्तास बसून बरंच अध्ययन केलं. पुन्हा हंपीला जाऊन तिथे पायी सर्वत्र फिरून पाहिलंय. George Michael and Philip B. Wagoner यांचा Vijaynagara (Architectural Inventory of the Sacred Shrine) Volume III मध्ये हंपीमधील भग्न शिवालयं आणि विष्णू मंदिरांची चित्रे आहेत.

चित्र २०, २१ चंद्रमौळेश्वर देवालय (भग्न आहे)

चित्र ६७, ६८, ६९ सौम्यसोमेश्वर देवालय (भग्न आहे)

चित्र ३२९ लिंग-शिव देवालय (भग्न आहे)

चित्र ३५२, ३५३ चंडिकेश्वर देवालय (भग्न आहे)

चित्र ३९०, ३९१, ३९२ वीरभद्र देवालयसमूह (भग्न आहे)

चित्र ५२० हेमकुंडवरील ‘मूळ’ विरूपाक्ष (भग्न आहे)

याशिवाय वीरशैव कवी चामरसाचा मठ आणि इतरही जागा भग्न झाल्या आहेत.

होस्पेट या हंपीच्या मार्गावरील अनंतशयन देवालय आणि शिवालय मलपनगुडी ही दोन्ही देवालयं भग्न झाली आहेत. होस्पेट-आनेगुंदी मार्गावरील सोमेश्वर डोंगरावरील सोमेश्वर गुहालयही भग्न झालं आहे. विरूपाक्ष देवालयाच्या मागील ‘अरसर गुहे’त असलेलं शिवालयही नष्ट केलं असून, लिंगाची शाळुंका आणि नंदी अनाथ झाले आहेत.

वरील संदर्भ पाहताना याचा अर्थ लक्षात येतो, हंपीमधील फक्त विष्णू देवालयं नष्ट झालेली नाहीत, येथील शिवालयंही नष्ट झाली आहेत. हे पुरावे स्पष्ट असतानाही काही विद्वान आपलाच मुद्दा पुढे सारत वाद घालतीलही. पण हंपीवर राज्य करणाऱ्या राजांमध्ये धर्मांधता नव्हती, हे सिद्ध करायला खालील पुरावे पुरेसे आहेत.

१. विरूपाक्ष देवालयाच्या रायगोपुराचा निर्माता वैष्णव कृष्णदेवराय हा होता.

२. विजय विठ्ठल देवालयाचा निर्माता शैव राजा दुसरा देवराय हा होता.

3. Anna L. Pallapiccola John Friz आणि George Michael यांनी लिहिलेल्या The Ramachandra Temple at Vijayanagara या ग्रंथात, शैव असलेला पहिला देवराय याने रामचंद्र देवालय उभारल्याचा उल्लेख केला आहे.

विरूपाक्ष देवालयात आजही पूजाअर्चा चालते. हे देवालय शाबूत राहिलंय, त्याला कारण कदाचित, या ग्रामदैवताच्या रक्षणार्थ गावकरी मुसलमान सेनेविरुद्ध उभे ठाकले, असंही असू शकेल.’

अप्पाजींच्या संग्रहात असलेले सगळे ग्रंथ लक्ष्मीनं वाचून काढले. त्यानंतर बेंगळुरूच्या ग्रंथालयातले त्यांनी सुचवलेले ग्रंथही तिने वाचून काढले. त्यांची टिपणं काढल्यानंतर ती एकटीच होस्पेटला गेली.

हॉटेलमध्ये एक खोली घेऊन अप्पाजींनी सांगितलेल्या हंपी आणि जवळपासच्या देवळांना तिने भेटी दिल्या. विजयनगरचा इतिहास तिच्या दृष्टीनं थोडा-फार स्पष्ट झाला. इथे चाललेल्या अखंड हिंसेवर आधारित एखादा पूर्ण लांबीचा चित्रपट बनवणं शक्य आहे का, हा विषय तिच्या बुद्धी-मनाला व्यापून राहिला.

ती दोन आठवडे होस्पेटमध्ये राहून हंपी आणि परिसराचा त्या दृष्टीनं शोध घेत राहिली. त्यानंतर ती बेंगळुरूला परतली.

हॉटेलमधून तिनं प्रो. शास्त्रींना फोन केला, “सर, तुमचं पत्र येऊन चार महिने झाले. हंपीची देवालयं शैवांनी पाडलेली नाहीत, ती मुसलमानांनीच पाडली आहेत, या मुद्द्यावर मी कुठल्याही आधुनिक इतिहासकाराशी वाद घालायला तयार आहे. मी या संदर्भातील सर्व पुराव्यांचं वाचन केलं आहे. गेले दोन आठवडे मी हंपीमध्ये फिरून पाहिलं आहे. तुम्ही म्हणत होता त्या इतिहासकारांशी ओळख करून देता का?”

“कुठला इतिहासकार? कधी सांगितलं होतं?” त्यांच्या आवाजात आश्चर्य होतं.

“तुम्ही मला पत्र नव्हतं का लिहिलं, स्क्रिप्ट लिहिलं नाही म्हणून?”

“ओ! ते होय! कलाकार संशोधनात बुडाला तर त्याची कला कोमेजून नाही का जाणार? लक्ष्मी, तू अशी कोमेजून गेलीस तर मला तरी अतिशय दु:ख होईल. मी बर्लिनला चाललोय. एक कॉन्फरन्स आहे तिथे. तासाभरात मला घरून निघालं पाहिजे. सुटकेस पॅक व्हायची आहे. परतल्यावर भेटू या. बाय–” म्हणत त्यांनी फोन खाली ठेवला.

‘अप्पाजींच्या संग्रहातला एकेक ग्रंथ वाचल्यानंतर त्यांच्या टिपणांचा आणखी खुलासा होत होता. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचं केंद्र आणि व्याप्ती समजत होती. त्यांचे प्रश्न, व्याप्ती, टिपणं कन्नडमध्ये होती. मधे इंग्लिश वाक्यं, शब्दसमूहही असले तरी कन्नड भाषेवर त्यांची हुकूमत असल्याचं स्पष्ट दिसत होतं. वाचलेल्या ग्रंथांचा अर्थ लावताना त्यांनी कुठेही गल्लत केलेली नव्हती. न समजलेल्या प्रत्येक शब्दाचा शब्दकोशांमध्ये अर्थ शोधून त्याची नोंद पुस्तकांमध्येही केली होती. त्यांचे निष्कर्ष, त्यांची निरीक्षणं पटत होती. मी या आधी कधीच इतिहासाचे ग्रंथ आणि संदर्भ पाहिले नव्हते. पण तरीही ‘समाजवादी’, ‘आधुनिक मार्क्सवादी’, ‘वस्तुनिष्ठ’, ‘वैज्ञानिक’, स्वयंघोषित चळवळींमध्ये भाग घेताना, इतिहासाविषयी निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या कल्पना डोक्यात भरल्या होत्या. सिद्धान्त, चळवळी, आदर्श यांपासून स्वत:ला सोडवून घेऊन, घडलेल्या घटनांकडे पाहणं म्हणजेच इतिहास समजून घेणं, हे आता कुठे मला समजत होतं.

वर्तमानात निर्माण होणाऱ्या प्रश्नांपासून स्वत:ला सोडवून घेऊन भूतकाळ कसा समजून घेता येईल? भूतकाळ आपलं सत्य अनेक ग्रंथ, अनेक खुणा, अनेक भग्नावशेष यांमधून स्पष्टपणे दाखवत असतो. पण वर्तमानकाळ आपल्या डोळ्यांवर वेगवेगळी झापडं बांधत असतो. त्यामुळे ते सत्य आपल्यापासून लपूनच राहतं. आजची परिस्थिती तर अशी आहे, की आपल्याला गवसलेलं सत्य जगापुढे मांडताना इतिहासकाराला वर्तमानाबरोबरच वर्तमानातील इतिहासकारांशी भांडावं लागतं. अप्पाजींनीही आपल्या टिपणांमध्ये हेच लिहिलंय.

इतिहासाचं विशिष्ट असं काही लक्ष्य किंवा ध्येय असू शकतं का, हा प्रश्नच धारिष्ट्याचा आहे आणि त्याचं उत्तर देणं हे तर त्याहून धारिष्ट्याचं! तंत्रज्ञानातील नव्या-नव्या शोधांमुळे सगळ्या जगाचंच एक खेडं बनत असताना; जात-पात, धर्म, आचार-विचार या सगळ्याच गोष्टींवर पुनर्विचार करण्याची वेळ येऊन ठेपली असताना; सगळेच देश अण्वस्त्रांनी सज्ज होत असताना आणि चंद्र आणि मंगळ यावर वस्ती करण्याची स्वप्नं मानव बघत असताना प्रा. शास्त्रींचे इतिहासाविषयीचे विचार ऐकले की हसावं की रडावं हे कळत नाही. मलाही अलीकडे हे सत्य समजायला लागलं आहे.

एकानं लिहायचं ठरवलेलं पुस्तक दुसरा कसं पूर्ण करू शकेल? अगदी पोटची मुलगी असली तरी? अशक्य आहे ते! तपशिलांची निवड, संदर्भ आणि विवेचन, चिंतन आणि अभिव्यक्तिची भाषा, शब्द प्रत्येक व्यक्तिचे स्वतंत्र असतात. शिवाय मी आणि अप्पाजींमध्ये मूलभूतच भेद आहे.

अप्पाजींचा पिंड शांतपणे एकेक विषय, एकेक घटना तोलून विश्लेषण करणारा. कल्पनाविलासाला त्यात थारा नाही. माझं मन मुळातच कल्पनाप्रधान. घटनाबद्ध आणि तर्कशुद्ध चिंतन हा एक प्रकार, तर कल्पनेच्या भराऱ्या घेत एकीकडून दुसरीकडे जाणं हा दुसरा प्रकार. माझ्या या वैशिष्ट्यामुळेच मी कलाकार झाले. नवी-नवी पात्रं, नवे-नवे प्रसंग कल्पनेनं तयार करून त्यांच्यामधून काल्पनिक कथा मांडण्याचा मार्ग मी निवडला. पण माझी ही शक्ति मी सामाजिक चळवळीच्या हातात देऊ पाहत होते.

अप्पाजींप्रमाणे प्रत्येक वाक्य तोलून-मापून आणि तळटिपांचा आधार देऊन लिहिणं मला तरी शक्य नाही.

इतिहासाच्या पार्श्वभूमीवर काही पात्रं आणि काही प्रसंग निर्माण करून मी या इतिहासाला आकार देऊ शकेन, चित्रकथा लिहू शकेन. कुणी भरपूर पैसा ओतणारा निर्माता भेटला तर उत्तम तंत्रज्ञान वापरून एक उत्तम सिनेमाही बनवू शकेन. पण त्याआधी या दृष्टीनं संपूर्ण भारतभर फोटो काढत प्रवास करायला पाहिजे.

६

संतापानं सर्वांग धगधगतंय. सतत. संतापाची धग असेल तर मनही स्वस्थ नसतं. झोपलं तरी स्वप्नाच्या आधारानं आग पसरत जाते आणि धगधगत राहते. नाही तर झोपमोड होऊन जाग येते. काय झालंय मला हे? मानसिक आजार? हाजी हमदुल्लाना विचारलं पाहिजे. आदिकाळापासून आतापर्यंत, अरेबियापासून इजिप्त, सिरिया, इराक, तुर्कस्तान, पॅलेस्तिन, खुरासान, इराण, तुरान, अफगाणिस्तान मला ठाऊक नसलेल्या आणखीही कितीतरी देशांचे इतिहास हाताच्या बोटांवर असल्याप्रमाणे ते सांगतात. औरंगजेब बादशहा यांच्या इतिहासाच्या कचेरीचे प्रमुख. हिंदुस्थानातील मोगलांच्या सगळ्या सुभ्यांकडून येणाऱ्या सगळ्या बातम्यांची छाननी करून, त्यामुळे बादशहांच्या साम्राज्याला कसल्याही प्रकारची हानी नाही, याची खात्री झाल्यानंतर त्या बातम्यांचे योग्य प्रकारे वर्गीकरण करणारे बुद्धिवंत ते! माझ्यावर त्यांचा विशेष जीव. थेट त्यांच्यापर्यंत जाण्याएवढी त्यांची माझ्यावर मर्जी होती. मला पाहताच त्यांच्या नजरेतून प्रेम ओसंडतं.

गेल्या खेपेला मी त्यांचं दर्शन घेऊन माझा त्रास सांगितला होता. तेव्हा ते म्हणाले, “धग म्हणजे आग. आग म्हणजे नरक. नरकाचं भय तुला जागेपणी, झोपेत आणि स्वप्नावस्थेत छळतंय. याचाच अर्थ अजूनही तुझ्यावर प्रवादींची संपूर्ण कृपा झालेली नाही. तुला आणखी श्रद्धेनं नमाज केला पाहिजे. कुरआनचं पठणही आणखी श्रद्धेनं कर. अरबी वाचता येतं की नाही? अरबी आल्याशिवाय कुरआनचा अर्थ कसा समजेल? फक्त अर्थ समजणं पुरेसं नाही. त्यातला मूळचा अर्थ समजायचा असेल तर अरबी समजणं अत्यावश्यक आहे. फक्त फारसी समजून चालणार नाही. फारसी राज्यभाषा, अरबी देवभाषा — प्रवादींची भाषा. शिवाय तुझ्यामध्ये अज्ञानाची मुळं आहेत ना, हिंदू विश्वास! ती मुळं पूर्णपणे जळून जाईपर्यंत तुझ्यामागची नरकाची भीती चुकणार नाही.”

“हाजीसाहेब, तुम्ही सांगताय ते अगदी खरं आहे असं मलाही वाटतंय. धगधग होते म्हणून सांगितलं ना, तेव्हा माझ्या धर्मातली देवळं, मूर्ती, देव-देवता, होम-हवन, व्रतं-वैकल्यं मनात भरून राहतात.”

“पूर्व-धर्म कशाला म्हणतेस? त्याला धर्म म्हणणं म्हणजे इस्लामचा अपमान नाही का? अज्ञ माणसांचे आचार, अंधविश्वास म्हण हवं तर...”

संतापाच्या धगीला कारण माझी आताची स्थिती. मी एक गुलाम. युद्धकैदी. जीव वाचवण्यासाठी धर्मांतर केलं तरी गुलाम म्हणून जगणारा... फक्त गुलामच नव्हे, पुढच्या माझ्या स्थितीविषयी सांगायची माझी मलाच लाज वाटते. आज मी या स्थितीला येऊन पोहोचलोय. त्यासाठी माझा तो पूर्वीचा धर्मच कारणीभूत नाही का? त्या धर्मात सत्त्व असतं तर तो धर्म का पराभूत झाला असता? हाजी हमदुल्ला धर्माविषयी चर्चा करताना कधीही संयम गमावत नाहीत.

“ख्वाजाजहान, इस्लाम धर्म बाहेरून आला हे खरं आहे. हज्जज, गझनी, घोरी, माम्लक, खिलजी, तुगलख, सैय्यद, लोधी, मोगल असे कुणीही चालून आले तरी तुमचे हिंदू हरले. का? तुमचे म्हणजे तुझे नव्हे, कारण आता तू आमचाच आहेस. एवढा विशाल देश! एवढी संपत्ती! तरीही एकेका आक्रमणापुढे मस्तक झुकवून हार मानली. इस्लामच्या तावडीत सापडले. हजारो, नव्हे लाखो माणसं मेली, गुलाम झाली, खतम झाली. यामागचं कारण काय? एवढी मोठमोठी देवळं, हजारो-लाखो मूर्ती फुटल्या, त्यामागचं कारण काय? त्यांचा तो धर्म – खरं तर त्याला धर्म म्हणायचं कारणच नाही, त्यांचे तकलादू आचार-विचार, अंधविश्वासच याला कारणीभूत आहेत. सूर्य उगवल्यावर जसा अंधकार दूर होतो, त्याप्रमाणे त्यांचे सगळे देव, देवळं आणि अंधविश्वास कस्पटाप्रमाणे उडून गेले. कपाळाला लाल-पिवळी भुकटी लावणारे आणि मानेवर मूठभर केसांची जुडी बांधणारे त्यांचे ते पंडितच सांगतात म्हणे, शेवटी विजय हा सत्याचाच होतो, म्हणून. काय आहे ते वाक्य मूळ भाषेत?”

मी सत्यमेव जयते... वगैरे सांगितलं.

"हं! तेच. काफीर वाक्य. फक्त काफीरच उच्चारू शकतील असं ते वाक्य. एकूण काय, नेहमी विजय सत्याचाच होतो, असा त्याचा अर्थ. अन् इस्लाम धर्म हेच सत्य असल्यामुळे हा धर्म एवढ्या विशाल हिंदुस्थानावर विजय संपादन करून राज्य करत आहे. आता तरी पटलं की नाही?" म्हणत त्यांनी आपली चांदीसारखी चकचकीत लांब दाढी कुरवाळली.

हाजी हमदुल्ला सांगत होते तो विशाल इतिहासच माझ्या अनुभवाचा एक भाग असल्याचं आठवलं. त्यामुळे मी मान डोलावणं स्वाभाविकच होतं. अंबीर राजानं हार मानली, आपली मुलगी बादशहाला दिली आणि त्याच्या सेनेचा प्रमुख म्हणून चाकरी स्वीकारली आणि आपल्या गावाचा व राजवाड्याचा बचाव केला होता. उदयपूरच्या महाराणा प्रतापवर याच अंबीर राजाची – म्हणजे सेनाधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. 'अकबर बादशहाविरुद्ध युद्ध करून विजय संपादन करणारा आजवर कुणीही जन्मलेला नाही आणि यानंतर जन्मणार नाही, माझ्याप्रमाणे तूही शरण येऊन त्यांचा मोठा सेनाधिकारी हो...' असं सांगून प्रतापचं मतपरिवर्तन करायला तोच गेला होता. हल्दीघाटच्या लढाईत हरलेला प्रताप तिथल्या रानावनात लपून तिथलाच होऊन गेला होता. सेन, माळवा, गुजरात हे प्रदेश बऱ्याच काळापासून राजसत्तेला वश झाले होते.

पण अरवलीच्या कुशीत दडलेलं आमचं छोटंसं राज्य देवगढ! तिकडे मात्र कुठल्याही मुस्लीम राजवटीची नजर गेली नव्हती. इतर कुठल्याही मोठ्या राज्याचं मांडलिक नसलेलं, स्वतंत्र असं छोटंसं आमचं राज्य अस्तित्वात आहे, हेच बादशहाला ठाऊक नव्हतं.

बादशहा औरंगजेबला मात्र हे समजलं. त्यानं अजिबात वेळ न घालवता माझे पिताजी महाराज जग्वीरसिंग यांच्याकडे निरोप पाठवला, 'विनाविलंब धर्मांतर करून मुसलमान व्हा, नाही तर युद्धाला तयार व्हा.' औरंगजेबसारख्या बादशहाला नाराज करणारा नकारार्थी निरोप पाठवायचा नसतो, एवढं व्यवहारज्ञान माझ्या पिताजींनाही निश्चितच होतं. पण किल्ल्याला वेढा घालून, तटबंदीवर तोफा रोखून, हत्ती दिंडी दरवाजापाशी उभे करून असा निरोप पाठवला तर कुठला राजपूत शांत राहील? आश्चर्याची गोष्ट म्हणजे आमच्या किल्ल्याला घेरणाऱ्यांमध्ये बहुतेकजण हिंदू जाट आणि माळव्यातले शिपाई होते. एवढंच नव्हे, अगदी आमच्याच राजस्थानातले शेतकरी! आणखी एका छोट्या राज्याला इस्लाम गिळंकृत करू पाहत आहे, आपण त्यासाठी मदत करू नये, एवढीही स्वधर्मनिष्ठा त्यांच्याकडे नसावी ना! हातात तलवारी घेऊन घोड्यावर स्वार झालेल्यांपैकीही निम्मे हिंदू राजपूत होते. त्यांचे सेनानायकही राजपूतच! इतर अफगाणी मुसलमान. हिंदू सैनिक नीट, मनापासून युद्ध करताहेत की नाही, यावर सतत लक्ष ठेवणारे ते सेनानी. पायदळातल्या शिपायांना तर युद्धाचा उद्देशही नीटसा ठाऊक नव्हता आणि समजला असता तरी पोटासाठी दुसरा काही व्यवसायही नव्हता. आज्ञा झाली की चाल करून जायचं आणि युद्धाचा पहिला आवेग अंगावर घेऊन मरून जायचं, एवढंच त्यांचं जीवितकार्य.

आम्हाला घेरून टाकणाऱ्या या संपूर्ण हिंदुस्थानातल्या सैन्याला आम्ही किती दिवस आवर घालणार? पिताजींनी आमच्या सेनानायक, प्रजाप्रमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांना बोलावून घेतलं आणि सांगितलं, "किल्ल्याच्या पश्चिम तटबंदीला खिंडार पाडण्याचे प्रयत्न चालले आहेत. आज संध्याकाळपर्यंत शत्रू चढाई करून आत घुसेल. आपणच दरवाजा खोलून शत्रूवर तुटून पडणं हा एक मार्ग आहे किंवा ते आत येईपर्यंत वाट पाहायची. शत्रूला शरण जाऊन इतक्या वर्षांचा आपला धर्म सोडून त्यांचा धर्म स्वीकारणं हा शेवटचा मार्ग. कुणी कुठला मार्ग धरावा यासाठी मी कुणावरही दडपण आणणार नाही. पण प्रत्येकानं आपापला मार्ग एकाच वेळी स्वीकारल्याने गोंधळ व्हायला नको. त्यापेक्षा जगू दे, मरू दे, शरण जाऊ दे. जे व्हायचं ते सगळ्यांचं मिळून! यावर फारशी चर्चा करण्याइतका वेळ नाही. सगळेजण मिळून काहीतरी एक निर्णय घेऊ या."

मुख्य सेनाधिकारी विजयेन्द्र सिंह लगेच म्हणाले, "सभा बोलावली गेली, तेव्हाच सभेचा हेतू सगळ्यांना समजला होता. त्यामुळे आम्ही यावर विचार केला आहे. सगळ्या स्त्रियांनी जोहार करायचा आणि सगळ्या पुरुषांनी हातात तलवारी घेऊन 'हरहर महादेव' म्हणत शत्रूवर चाल करून जायचं. शक्य तितक्या शत्रूंचा वध करून आपणही बळी जायचं."

“बायकांची जोहार करायला तयारी आहे?”

“होय. स्वत: महाराणींनी सांगितलंय तसं. याशिवाय दुसरा मार्गच नाहीये.. पराभूतांच्या बायकांना आदरपूर्वक वागवण्याची यांच्याकडे पद्धतच नाही. इथल्या उच्च घराण्यातील स्त्रिया त्यांच्याकडील वरच्या हुद्यावरचे पुरुष घेऊन जातात. इतरांना साधारण सैनिक आपसात वाटून घेतात. कुणीही घेऊन गेलं तरी या बायका त्या घरच्या दासी होऊन राहतात. हा अपमान आपल्याकडची कुठली मानी स्त्री सहन करेल? पुरुषांचंही तसंच आहे. धर्म बदलला तरी गुलाम होऊनच राहिलं पाहिजे. त्यांच्या घरचा गुलाम किंवा त्यांच्या पायदळात सैनिक, नाहीतर सैनिकांच्या रस्त्याचं काम करणारा मजूर किंवा जनावरांप्रमाणे घोळक्या-घोळक्यानं नेऊन, लिलाव पुकारून विकली जाणारी वस्तू. अशा प्रकारे विकत नेणारेही आपल्याकडे नेऊन कामालाच लावतात. तिथंही राब-राबून मरायचंच. हिंदुकुश पर्वत ओलांडून अफगाणिस्तान आणि इतर देशांच्या बाजारातही अशा गुलामांचा लिलाव मांडला जातो. या जीवनापेक्षा ‘हर हर महादेव’ म्हणत लढून धारातीर्थी पडणं चांगलं नाही का? हेच सगळ्यांचं मत आहे.”

अखेर ठरलं. तलवारी उगारून बाहेर न पडता मुख्य दरवाजा उघडायचा. प्रत्येक प्रमुख जागेवर एकेका सेनानायकाच्या नेतृत्वाखाली सैन्य उभं करून तिथून आत येणाऱ्या शत्रूंवर हल्ला करायचा.

अर्थात असं करण्यामुळे आम्हाला विजय मिळेल याची कुणालाच अपेक्षा नव्हती म्हणा! पण बाहेर जाऊन तुटून पडण्यापेक्षा थोडा जास्त वेळ तग धरता येईल, एवढीच अपेक्षा होती.

मुख्य दरवाजा उघडण्याआधीच जोहार केला जावा, असंही ठरलं. माझी आई, माझी बहीण, माझी बायको, माझ्या कुटुंबातल्या इतर महिलांबरोबरच किल्ल्यातल्या सगळ्या स्त्रिया जोहार करण्यासाठी पुढे आल्या. एवढ्या स्त्रियांना सामावून घेणारी चिता पेटली. एवढी लाकडं किल्ल्याच्या आवारात होती.

मी युवराज म्हणून मला किल्ल्याची प्रमुख देवता श्रीविष्णूच्या देवालयाचं रक्षण करण्यासाठी नेमण्यात आलं. पूज्य पिताजी राजवाड्याच्या रक्षणासाठी राहिले. आजी, आई, माझी तेरा वर्षांची पत्नी शामला आणि इतर स्त्रियांच्या अग्नी-प्रवेशाच्या कल्पनेनंच माझा थरकाप उडाला होता. युवराजही राजाचा प्रतिनिधी. अग्नी-प्रवेश करून जीव देणाऱ्या सगळ्या स्त्रियांचा पालक. त्यांच्या रक्षणासाठी काहीही न करता त्यांना ‘तुम्ही जळून मरा, आम्ही शत्रूच्या हातून मरतो’ असं सुचवताना माझ्या मनात नपुंसक भाव भरून राहिला होता. दुसरा काहीही उपाय नाही, कुणीही मदतीला येणार नाही, हा शत्रू आपल्यावर कब्जा मिळवल्याशिवाय राहणार नाही, हे ठाऊक असूनही तीन महिने किल्ल्यात कोंडून राहणं, ही नपुंसकता नव्हे तर काय!

शेवटच्या घटकेला सामोरं जाण्याआधी अंत:पुरात जाऊन आजी-आईला भेटावं, पत्नीला शेवटचं आलिंगन द्यावं– छे:! नको! असं केलं तर मन कमकुवत होईल. शिवाय आता तेवढा वेळही नाही. जीव जाण्याआधी पश्चिमेकडील तटबंदीला खिंडार पडलं तर आत घुसलेले सैनिक आधी स्त्रियांना ताब्यात घेतील. वाटलं, घोड्यावरून दौडत त्यांच्यापाशी जावं, त्यांना सांगावं, “तुम्ही लवकर परलोकी जा, स्वयंपाक करून ठेवा. पाठोपाठ पुरुष मंडळी येताहेत.” पण या गंभीर परिस्थितीत माझं असं वागणं हास्यास्पद ठरेल, हे मलाही समजत होतं.

मी सतरा वर्षांचा असलो तरी मला युद्धाचं सगळं शिक्षण देण्यात आलं होतं. अभिमन्यूनं तर सोळाव्या वर्षीच असं साहस केलं होतं ना! शंभर घोडेस्वार आणि तीनशे पायदळ यांच्यासह मी विष्णूमंदिराला वेढा घातला. देवळातल्या कुठल्या खांबाआड कुठला हत्यारधारी उभा असेल, दारामागे कोण उभं राहील, गर्भगृहात कुठले वीर लपून राहतील हे सगळं पक्कं करून देवळाला घेरणाऱ्या पायदळातल्या सैनिकांची पाहणी केली. घोडेस्वारांना थोड्या अंतरावर आडोशाला उभं केलं होतं. देवळावर चाल करणाऱ्या शत्रूवर मागून हल्ला करायचा असं ठरलं होतं.

राजवाड्याच्या दिशेला धूर दिसला. पाठोपाठ ज्वाळा आणि ठिणग्या आकाशाकडे झेपावताना दिसल्या. ‘हर, हर, हर, हर’च्या किंकाळ्यांनी आकाश व्यापलं गेलं. अग्नीमध्ये पट्टराणीनं प्रथम प्रवेश करायचा. त्यानंतर राजकुटुंबातील इतरांनी. त्यानंतर इतर स्त्रियांनी सगळीकडून उड्या मारायच्या. आजी, आई आणि

शामलेचा जीव गेल्यानंतरच इतर स्त्रियांनी अग्निप्रवेश केला असला पाहिजे. माझ्या पोटात आग पडल्यासारखी झाली. आता इतर स्त्रियांचीही त्या चितेत आहुती पडतेय. आता आम्ही कुणीही मागे सरणं शक्य नाही. जर्किलो तरी जगणं शक्य नाही. शक्य तेवढ्या शत्रूला ठार करणं एवढा एकच मार्ग यापुढे!

महाद्वाराकडून 'हर हर महादेव'च्या आरोळ्या ऐकू येताहेत. महाद्वार उघडलं आहे. उघडल्यावर शत्रू लगेच आत शिरेल का? की आम्ही बाहेर येण्याची वाट पाहील? काही वेळ निःशब्दता पसरली. पाठोपाठ लढाईचा खणखणाट. माझ्यावर सोपवलेली मंदिराच्या रक्षणाची जबाबदारी सोडून मला तिकडे जाऊन शौर्य दाखवणं शक्य नव्हतं. ते आपण होऊन इकडे येईपर्यंत मी स्वस्थ राहायचं होतं. आधी राजवाड्यावर चढाई करतील. त्यानंतर मंदिराच्या नाशासाठी इकडे येतील किंवा एकेका लक्ष्यावर एकेक तुकडी हल्ला करण्यासाठी नेमली असेल. आवाजाचा वेध घेत मी माझ्या विश्वविजयवर स्वार होतो. उजव्या हातात तळपत असलेली सोन्याच्या मुठीची तलवार. दुसरा प्रहर. राजवाड्यावरून आकाशाला भिडणारे चित्कार ऐकू येऊ लागले. युद्ध पेटलंय. पिताजी प्रख्यात वीर! हिरे जडवलेल्या मुठीची त्यांची लखलखती तलवार बघितली, की शत्रूचा जीव उडून जातो.

एवढ्यात घोड्यावरून आलेल्या आमच्या वार्ताहरानं ओरडून सांगितलं, "महाराणांनी स्वर्गारोहण केलं. शत्रूनं राजवाड्यावर चाल केली आहे. जोहार पूर्ण झालाय." माझ्या छातीत धडधडलं. ओठ कापू लागले. आता मी काय करू? मंदिराचं रक्षण करणं शक्य नाही. मंदिरातल्या विष्णूनं आमचं रक्षण केलं नाही.

मी मान वळवून पाहिलं. दरवाजा उघडा होता. गर्भगृहात जगाच्या पालनकर्त्या विष्णूची हसतमुख मूर्ती दिसत होती. चतुर्भुज. शंख-चक्र-गदा-पद्म. सृष्टीनिर्माता ब्रह्म आणि संहारकर्त्या शंकरापेक्ष वेगळा! शांत! आजी, आई, पिताजी यांना तर्पण करून त्यांच्या नावे पाणी सोडायला पाहिजे. त्यांचे जीव विष्णू-पादाशी पोहोचवले पाहिजेत. पण तोपर्यंत मी जिवंत असलं पाहिजे.

मनातला हा विचार दृढ होत असतानाच देवळामागच्या बाजूनं घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू आले. वळून पाहिलं, अरबी पठाणांची एक तुकडी आली. काय त्यांची उंची! मी घोड्यावर होतो, तरीही मान वर करावी लागत होती. मी 'हर हर महादेव' अशी रणघोषणा केली. हाणामारी सुरू झाली. आम्ही आमच्या परीनं लढत होतो. तरीही त्यांचं रणतंत्र अधिक तंत्रशुद्ध होतं. त्यांचे व्यूहही जास्त पक्के होते. शिवाय त्यांची संख्याही प्रचंड होती.

त्यांनी आधी पायदळ पुढे न पाठवता, एकदम घोडेस्वार पाठवले. युवराजाला मारायचं नाही, जिवंत पकडायचं असंही ठरलं होतं की काय कोण जाणे! की रण-चलनामुळे तसं घडलं? मी माझ्या सैनिकांपासून वेगळा पडलो. माझ्या विश्वविजयचे पुढचे दोन्ही पाय कापले जाऊन तो खाली पडला. मी त्यांच्या तावडीत सापडलो. कट्यार उपसून ती माझ्या पोटात खुपसण्याआधीच त्यांनी मला जेरबंद केलं. सतराचं वय. कदाचित त्यासाठी माझा अनुभव अपुरा पडला असेल. त्यांच्या हातून निसटणं अशक्य झालं. सोन्याच्या मुठीची तलवार, गळ्यातला हार, पितांबर, शिरस्त्राण यांमुळे त्यांनी मी युवराज असल्याचं ओळखलं होतं. माझी तलवार आणि इतर वस्तू त्यांनी हिरावून घेतल्या आणि मला पूर्णपणे निःशस्त्र करण्यात आलं.

एवढ्यात ती तुकडी देवळात शिरली. आत रणकंदन माजलं. आमची किती माणसं मेली, त्यांची किती मेली हे समजलं नाही. देवळातून आरडा-ओरडा आणि किंकाळ्या ऐकू येत होत्या.

हे किती वेळ चाललं होतं कोण जाणे! त्या मनःस्थितीत वेळेचा नेमका हिशेब समजत नाही. त्यानंतर आतून प्रेतं, अर्धमेले, रक्ताने थबथबलेले असे देह ओढून देवळासमोर टाकण्यात येऊ लागले. देहांच्या या राशीत अजून जिवंत असलेले देह वर पडलेल्या देहांच्या ओझ्याखाली तळमळत होते. आमच्यापैकी देवळातले सगळे मेले होते. त्यांचेही वीस सैनिक मेले होते. एवढ्यात आतून सात-आठ सैनिक बाहेर आले. त्यांच्या दाढ्या, वेष यावरून ते शत्रूचे सैनिक असल्याचं दिसत होतं. एक अवजड दगड त्यांनी फराफरा ओढत बाहेर आणून टाकला. तोही देवळासमोरच्या प्रेताच्या राशीशेजारी उताणा टाकला. तेव्हा मला समजलं, ती विष्णूची मूर्ती होती. आमची कुलदेवता! आमच्या किल्ल्याचा रक्षक! समस्त मानवकुलाच्या रक्षणाची

अधिदेवता! माझ्या पोटात ढवळून आलं. त्यानंतर त्या तुकडीचा नायक, हजार घोडेस्वारांचा मनसबदार, इज़ाज अहमदखान पुढे आला. तगडा वजनदार माणूस, चेहरा, हात, छाती सगळीकडे भरपूर काळे केस, मोठे दात, जाड भुवया, हातात तळपती तलवार, एकाच घावात रानरेड्याची मान छाटेल अशी! त्यानं माझा डावा दंड आपल्या उजव्या हातानं घट्ट पकडला आणि त्या मूर्तीपाशी ओढत नेलं. सतराचा असलो तरी चाळिशीच्या त्या दणकट मनसबदाराच्या पकडीतून सुटका करून घ्यायची शक्ति माझ्याकडे होती. पण मला त्यांनी नि:शस्त्र केलं होतं. भोवताली त्यांचे चार सैनिकही होते. त्यामुळे मी काहीही करणं शक्य नव्हतं.

मनसबदारानं एका छिन्नीनं मूर्तीचं नाक आणि चेहरा फोडून विद्रूप केला आणि तो त्या मूर्तीच्या छातीवर उभा राहिला. मी त्यांच्यासमोर खाली उभा होतो. ते हिंदुस्थानी भाषेत बोलत होते. पण शुद्ध राजस्थानी असल्यामुळे मला ते सहजच समजत होतं, “युद्धाच्या आधी इस्लामचा स्वीकार केला असतास तर तुला जिवाचं रक्षण आणि स्वातंत्र्यही मिळालं असतं. तू युद्धात हरला आहेस. आता तू इस्लामचा स्वीकार केलास तरी तुझा जीव वाचेल, पण तुला गुलाम म्हणूनच राहावं लागेल. इस्लाम नको असेल तर, हे पाहा इकडे! एकच वार!” म्हणत त्यांनी तलवार उगारली. त्यांनी ही फक्त धमकी दिली आहे, मी उत्तर देईपर्यंत ती खाली येणार नाही, एवढंही मला भान नव्हतं.

एवढी वर्षं मला राजकुमार, म्हणजे ‘भावी राजा’ म्हणून वाढवलं गेलं होतं. युद्धकलेचं शिक्षण दिलं होतं. भाले, बर्ची, तलवार, खंजीर अशी अनेक शस्त्रं चालवण्याचं शिस्तबद्ध शिक्षण दिलं होतं. राजा म्हटला, की मृत्यूच्या जवळच वास्तव्य असतं, याचंही मला पदोपदी भान देण्यात येत होतं. भीतीचा लवलेशही माझ्यामध्ये नव्हता. युद्धक्रीडेच्या वेळी अग्नीच्या धगधगत्या रिंगणात घुसल्यासारखे खेळ मी सहज करत असे. तटावरून आगीत किंवा खंदकात उडी घेण्यासारखे साहसी खेळ मला विशेष आवडत. असं असताना मी क्षणाचाही विलंब न लावता ‘मी इस्लामचा स्वीकार करतो,’ असं का बडबडलो?

यावर मी अनेकदा विचार केलाय. मला वाटतं, संपूर्ण जगाचा पालक सगळ्या किल्ल्यातले नागरिक ज्याची परमभक्तीनं पूजा करत तो जगाचा पालनहार– हिरेजडित कंठीहार, भुजकीर्ती, किरीट, शंख-चक्र-गदा-पद्म यांनी अलंकृत महाविष्णूही जेव्हा आपल्या पीठावरून खाली आला, रक्तरंजित प्रेतांशेजारी फरफटत फेकला गेला; चेहरा आणि देहाची विटंबना; छातीवर रुतलेले जोड्यांचे पाय असहाय होऊन सहन करीत राहिला, तेव्हा त्याच्यासाठी आपला जीव गमावण्यात काय अर्थ आहे, असा विचार क्षणार्धात झाला असेल काय? क्षत्रिय धर्माचं शिक्षण आणि उपदेश कितीही कठोरपणे मला दिले गेले असले, तरी साक्षात मृत्यू समोर ठाकताच जीव वाचवण्याची भावना सरसरत वरती आली असेल का? की मी मुळातच क्षत्रिय धर्माला नालायक असा एक भेकड आहे? थोडक्यात, विश्वाचा निर्माता ब्रह्म, पालनकर्ता विष्णू आणि संहारकर्ता शंकर यांच्यावरील विश्वास ढळला. त्यांना आदराचं स्थान असलेल्या धर्मावरचं प्रेमही उडून मी नव्यानं स्वीकारलेल्या धर्माचा तपशील ठाऊक नसला तरी आक्रमण करून विजयानं मिरवणारा हा धर्म आहे, याविषयी खात्री वाटली. शक्ति हाच धर्म, जो सशक्त नाही तो धर्म कसा होऊ शकेल, ही भावना दृढ झाली.

तटबंदीतले जिवंत असलेले सगळे जण संध्याकाळपर्यंत मुसलमान झाले होते. पकडलेल्या सगळ्या पुरुषांना आणि प्रौढांना एकीकडे करण्यात आलं. जोहार न केलेल्या बायकांना दुसरीकडे उभं केलं गेलं. या सगळ्यांना दिल्ली किंवा आणखी कुठेतरी घेऊन जाणार असं म्हटलं जात होतं. माझे वडील आणि इतर वीर मरण पावले होते. राजघराण्यातल्या बायकांनी– त्यात माझी आई, बहीण आणि बायकोही होती– जोहार करून स्वर्गाचा मार्ग धरला होता, हे मला नंतर समजलं.

मला मात्र आमच्या किल्ल्यापासून कोसभर अंतरावरच्या मनसबदारांच्या डेऱ्यात घेऊन जाण्यात आलं. तेही पायी नव्हे, घोड्यावरून. राजकुमार म्हणून, की तलवार उगारल्याबरोबर इस्लाम स्वीकारायला तयार झालो म्हणून ही सूट? डेऱ्यात गेल्यावर त्यांनी मला अंघोळ घातली. घामाची घाण धुवून काढली. अंग पुसून अंगाला सुगंधी द्रव्य लावण्यात आलं. जेवणही आणून ठेवलं. पण आई, वडील, आजी, बायको या सगळ्यांना गमावल्यावर जेवण कुणाला रुचकर लागणार? “मनसबदारांचा हुकूम झालाय, तुम्ही जेवलंच पाहिजे. थोड्या वेळात ते येणार आहेत.” शिपायानं आग्रह केला. त्याच्या चेहऱ्यावर किंचित खोडकर हसू होतं. मला त्याचा अर्थ समजला नाही.

मी उगाच चार घास खाल्ल्यासारखं केलं. झोप आली. तसाच गादीवर लवंडलो.

मनसबदार थोपटून उठवत होते, तेव्हा पणती जळत होती. त्यांचीही अंघोळ आणि जेवण झालेलं असावं. ते माझ्याशेजारी अगदी जवळच बसले होते. ते पाहून मी चटकन उठून बसलो. "खाजा जहान! तेच ना तुझं नाव? घाबरू नकोस." माझ्या डोक्यावरून हात फिरवत ते म्हणाले. त्यांची माझ्यावर खिळलेली मधुर दृष्टी पणतीच्या उजेडात माझ्या लक्षात आली. तेच पुढे म्हणाले, "तू लगोलग इस्लाम स्वीकारून जीव वाचवलास खरा! पण इस्लाम स्वीकारलेल्या प्रत्येकाला असं मनसबदारांच्या गादीवर, त्यांच्या मांडीला मांडी लावून बसायचं भाग्य लाभत नाही. जर मला फारसी काव्य लिहिण्याची कला अवगत असती तर तुझ्यावर शंभर कवनं केली असती मी! तुझं हे सुकोमल रूप! हे उमलत्या कळीचं वय! काय वय आहे तुझं? पंधरा की सोळा? अर्धोन्मीलित अशा तुझ्या सुकुमार चेहऱ्याचं चुंबन घेणारा भाग्यवान मी! मी तुला कधीही दूर करणार नाही. हे घे!" म्हणत त्यांनी माझ्या गळ्यात एक सोन्याचा हार घातला.

मी संकोचून गेलो होतो. माझ्या चेहऱ्यावर किळस उमटली असेल. वासनांधाच्या तावडीत सापडलेली सुकुमार बाला आपल्या शील-रक्षणासाठी जशी झगडेल, ते सगळं मीही केलं. पण त्यानं सोडलं नाही. तो रागावलाही नाही, रागावलं तर यातील माधुर्य नष्ट होईल हे ठाऊक असल्यासारखा तो शांतच राहिला.

मी सोळा वर्षांचा होतो. चौदा वर्षांच्या शामलीशी गेली दोन वर्षं संसारसुख अनुभवत होतो. शामलीसारख्या सुकोमल मुलीच्या सहवासात एवढा सुखी होतो, की स्वर्गलोकीची कुणी अप्सरा आली तरी मी तिच्याकडे बघितलं नसतं. राजघराण्याच्या रिवाजाप्रमाणे मी तिला शामलादेवी म्हटलं की ती मला हळूच सांगायची, "इतरांसमोर हवं तर मला देवी म्हणा. पण आपण दोघंच असताना मात्र हे 'देवी' नको हं!" पहिल्या रात्रीच तिनं हे सांगून माझं मन जिंकलं होतं. जरी ती एवढी सद्गुणी आणि प्रेमळ नसती, तरीही एकदा स्त्री-पुरुष नात्याचा नैसर्गिक अनुभव उत्कटपणे घेतल्यावर या अनैसर्गिक विकृतीची कुणालाही किळस आल्याशिवाय कशी राहील? आणि हे तर या नात्यावर काव्य रचताहेत!

मला आठवलं, माझे गुरू हरगोपाल मिश्र म्हणाले होते, काव्य म्हणजे त्या समाजाची अत्युत्कृष्ट अभिव्यक्ति! त्यांनी सांगितलं होतं, "राजकुमारांचं अजून लहान वय आहे. तूर्त स्थूलमानानं कालिदास, भवभूती, व्यास, विल्मकी यांच्या काव्याचा फक्त परिचय करून देईन. शिवाय आपल्याला फक्त या एकाच विद्येचा अभ्यास करून चालणार नाही. राजतंत्र-युद्धतंत्र हे विषय तुमच्या दृष्टीनं महत्त्वाचे आहेत. त्यानंतर मीच तुम्हाला काव्याभ्यास सांगणार आहे. वेद-वेदांचं मूर्त स्वरूप म्हणजे काव्य!"

आता पोटात ढवळत होतं. उलटी येऊ पाहत होती. पण त्याचं कुणाला भान होतं, म्हणा!

गावातल्या धनवान लोकांना हेरून त्यांच्याकडील धनसंपत्ती, दाग-दागिने, मौल्यवान रत्न-हिरे, भांडी लुटून एकत्र करण्यात आली. ते सर्व सामान लाकडी पेटाऱ्यांमध्ये भरण्यात आलं. हे पेटारे मोहोरबंद केल्यानंतर मोठमोठी भांडी आणि इतर वस्तू बैलगाड्यांवर लादण्यात आल्या. अशा कितीतरी वस्तू हस्तांतरित करण्याची कितीतरी कामं जेत्यांना करायची होती. इजाजमहमद दररोज सकाळी किल्ल्यावर जात होता, संध्याकाळी माघारी येत होता. राजवाड्यात राहायला जायची त्याला इच्छा असली तरी सुरक्षेचा विचार करून त्यानं ते टाळलं. रात्री थोडा वेळ माझ्याशी चाळे करून त्यानंतर तो घोरू लागायचा. नाही तरी त्याला तिथे दोन आठवडे राहावं लागणार होतं. तेवढ्या अवधीत माझं धर्मपरिवर्तन केलं पाहिजे, असा त्यांच्यासोबत असलेल्या मुल्लासाहेबांनी आग्रह धरला. माझ्या मनात भीती निर्माण झाली. शस्त्रांशी एवढं जवळचं नातं असलेल्या मला या विधीची इतकी का भीती वाटावी?

"संपूर्ण मुस्लीम पुरुष समाज जे करून घेऊन जगतो, त्याची तुला का एवढी भीती? हे केलं की तू मुस्लीम आहेस हे कधीही कुणीही नाकारू शकणार नाही. नाही तर पावलोपावली तुला हे सिद्ध करत बसावं लागेल." मनसबदारानं आग्रहानं पटवून सांगितलं. त्याच शुक्रवारी, झहर झाल्यानंतर माझं 'खत्न' करण्यात आलं. दु:ख जाणवू नये म्हणून स्वत: मनसबदारानं मला रोज अफू खाऊ घातली. 'खत्न' झाल्यानंतर मलाही इतर मुस्लीम पुरुषांशी आपलं जवळचं नातं असल्यासारखं वाटू लागलं. 'आम्ही सगळे एका पंथाचे, एका

जातीचे, एका बलवान समाजाचे घटक असून, आपल्या धर्माचा प्रसार हे आपलं ध्येय आहे', अशी भावना मनात तयार झाली.

खत्न करणाऱ्या न्हाव्यानं मला सांगितलं होतं, "घाबरू नकोस. हे केल्यानं पुरुषाचं पौरुष वाढतं. चार नव्हे, चाळीस बायकांना दमवण्याएवढी शक्ति येते. असं नसतं तर पूज्य इब्राहिमनी हा विधी कशाला सुरू केला असता? याचं खरं नाव 'सुन्नत-ए-इब्राहिम'. इब्राहिम प्रवाद्यांचं आचरण."

दोन आठवड्यांनंतर मनसबदार मला आपल्याबरोबर दिल्लीला घेऊन गेला. घोड्यावरून प्रवास होता. सुरुवातीला त्यामुळे सगळं अंग दुखत होतं. हळूहळू दुखणं कमी होत गेलं. माझे आई-वडील, बंधू-बांधव आणि सगळे नातेवाईक अज्ञानानं घेरलेल्या धर्मातले होते, हे मुल्लांचं सांगणं मनात दृढ झालं. त्यानंतर काही स्त्रियांना दमवून टाकण्याचा विचार अधून-मधून मनात डोकावू लागला. हा मनसबदार इकडे कसा का वागेना, काही का करेना, मनात एक वेगळंच स्वप्न तरळू लागलं. दिल्लीला गेल्यावर बादशहाला काहीतरी करून आपण युवराज असल्याचं दाखवून द्यायचं, त्याची मर्जी राखायची, काही तरी करून सरदार व्हायचं आणि चार बायकांचा जनानखाना बाळगून पुरुषार्थ गाजवत जगायचं.

दिल्लीच्या वातावरणात जनाना संस्कृतीचं भारी कौतुक होतं. इथल्या दरबारातल्या लोकांकडे यथेच्छ जहागीर आणि संपत्ती असायची. प्रत्येक सरदाराचा स्वतंत्र असा विस्तीर्ण महाल असायचा. त्यात स्त्रियांसाठी वेगळा विभाग असे. शरीयत धर्माप्रमाणे एक पुरुष एका वेळी चारपेक्ष जास्त बायका करू शकत नाही. जर चार बायका असताना एखादी कोवळी, सुंदर मुलगी भेटली आणि तिच्याशी निकाह करायची इच्छा झालीच तर, आधीच्या चारपैकी एकीला तलाक देऊन हिला त्या जागी आणता येत होतं. शिवाय चार बायकांशिवाय इतर चार-आठ, दहा-पंधराजणींना या जनानखान्यात बाळगून हव्या त्या वेळी, हव्या त्या तरुणीला जवळ करण्याची सोयही होती.

या स्त्रिया बहुतेकवेळा युद्धकैदी असायच्या किंवा गावात कर देऊ न शकलेल्या शेतकऱ्यांच्या बायका-मुलींना वसुली-अधिकारी घेऊन यायचे. शास्त्रसंमत बायकांच्या दासींनाही आपल्या इच्छेनुसार अंथरूणावर बोलवायचा अधिकार या पुरुषांना होता.

तिथे आणखीही एक पद्धत होती. कितीही मोठा मानाचा, श्रीमंत सरदार असो; कितीही मोठमोठ्या महालांचा, सोन्यानाण्याचा मालक असो; तो मेल्यावर त्याची सगळी संपत्ती सरकारजमा होत असे. तो मेल्याची बातमी समजताच राजदूत येत, त्याच्या मालकीच्या एकूण एक संपत्तीची मोजदाद करत, यादी करत आणि घरातले दागदागिने, भांडीकुंडी, हत्ती-घोडे अक्षरश: एकूण एक घेऊन जात. त्यातलं काहीही त्याच्या बायका-मुलांसाठी शिल्लक ठेवलं जात नव्हतं. बादशहांनी कृपावंत होऊन काही दिलं तर ठीक. नाही तर सगळे अक्षरश: भिकारी व्हायचे. त्यामुळे या सरदारांची मन:स्थिती वेगळीच असे. नाही तरी आपण शिल्लक ठेवलेल्यापैकी काहीही आपल्या माणसांना राहणारच नाही, त्यामुळे आपण जिवंत आहोत तोपर्यंतच आपण आणि आपल्या माणसांनी या संपत्तीचा उपभोग घ्यायचा आहे, या चार्वाक तत्त्वज्ञानाचं आचरण करत आणखी मोठे महाल आणि आणखी मोठे जनानखाने बाळगत, सुखलोलुप होऊन जगणं, हीच श्रीमंतांची जीवनपद्धती झाली होती. आपलं वय होत चाललं, की उत्तेजना मिळावी म्हणून कोवळ्या-कोवळ्या मुली मागवणं आणि भोगणं हा त्यांचा सुख मिळवण्याचा मुख्य मार्ग झाला होता. कामोत्तेजक औषधोपचार करणाऱ्या वैद्यांना कधी नव्हे एवढी मागणी होती. कितीतरी पुरुषांना कोवळ्या मुली तर लागतच, शिवाय माझ्यासारखी कोवळी मुलंही लागत. अशा दुहेरी शौक असलेल्या पुरुषांना मंद स्मित करून आणखी खुलवून वर चढवणं इतर पुरुषांच्या रंजनाचा भाग होता. याला कुणीही विकृती मानून नाक मुरडत नव्हतं.

युद्धभूमीवरील स्त्रियांच्या कमतरतेमुळे हजारी मनसबदार मला वापरत असावा, ही माझी समजूत खोटी असल्याचा अनुभव लवकरच मला आला. हाही दुहेरी शौक असलेला माणूस आहे हे दिल्लीला गेल्यावर, त्याचा विस्तीर्ण महाल आणि तिथलं वातावरण बघितल्यावर लक्षात आलं. आईवडिलांना गमावल्यामुळे झालेलं पोरकेपणाचं दु:ख, राज्य गमावल्यामुळे आलेली अनाथपणाची भावना, शामलीसारख्या सुकोमल आणि सालस बायकोला परलोकी पाठवून जिवंत राहिल्याची निर्लज्जपणाची भावना या सगळ्याबरोबर पौरुष

पक्व व्हायच्या या वयात दुसऱ्या पुरुषाच्या विकृत वासनेची शिकार होत राहण्यापेक्षा आत्महत्या करायचा विचार अनेकदा मनात प्रबल होत होता. क्षत्रिय राजघराण्यात जन्मलेला, युद्धकलेत तरबेज असलेला मी. हे असं जगणंच नको. त्यापेक्षा एक साधा सामान्य शिपाई म्हणून जमेल तेव्हा शौर्याचं प्रदर्शन करत जगलं पाहिजे. आज ना उद्या, जमेल तेव्हा ही आपली भावना बादशहाच्या कानावर घालायची इच्छा मनात प्रबल होत होती. माझ्यासारख्या गुलामाला बादशहाच्या समोर जायची संधी मिळणं अशक्य आहे, एवढंही त्या वेळी माझ्या भाबड्या मनाला समजत नव्हतं.

दिल्लीला पोहोचल्यावर तर माझ्या मानसिक आणि शारीरिक छळामध्ये दुप्पट, चौपट, कितीतरी पटीनं वाढ झाली. मनसबदार इजाजमहमदचे अनेक स्नेही त्याच्या वाड्यावर येत होते. हा मोठ्या अभिमानानं मला त्यांच्यापुढे सादर करत होता. मला पाहताच त्यांचे डोळे आशेनं विस्फारले जात होते. त्यांच्यामध्ये फारसी, तुर्की किंवा अरबी भाषेत संवाद चालायचा. एवढ्या अवधीत मला या भाषा थोड्याफार समजू लागल्या होत्या. नंतर स्वत: इजाजच मला त्या मित्रांपैकी एखाद्याबरोबर मला दुसऱ्या खोलीत पाठवत होता. गुलाम असल्यामुळे मला विरोध करायचं स्वातंत्र्यही नव्हतं. तो दोस्तही माझा उपभोग घ्यायचा. त्याला उत्तेजना यावी म्हणून तो सांगेल ते करायची पाळी माझ्यावर येत होती आणि हा सगळाच प्रकार विकृत असल्यामुळे, नैसर्गिक उत्तेजनेचा अभाव असल्यामुळे या विकृत उत्तेजनेचे प्रत्येकाचे प्रकारही अधिकाधिक विकृत आणि किळसवाणे असायचे. उपचार करणाऱ्या वैद्याच्या अलिप्ततेनं हे सारं करण्याशिवाय माझ्यापुढे दुसरा इलाजच नव्हता. शहराच्या कोतवालीत माझं नाव अमक्यांचा गुलाम म्हणून नोंदवलेलं असल्यामुळे मला कुठेही पळून जाणं शक्य नव्हतं. पळून जायचा प्रयत्न केला तरी कोतवालाची माणसं घोड्यांवरून पाठलाग करून पकडून आणत होती. तिथून काहीतरी करून निसटलं तरी भोवतालच्या गावातल्या कोतवालांनाही वर्दी दिलेली असल्यामुळे तिथे पकडण्यात येई. अशा प्रकारे पकडून आणलेल्यांना दोन्ही पाय तोडण्याची शिक्षा फर्मावण्यात येत असे.

इजाजच्या दोस्तांनाही माझा मोह का पडावा, यावर मीच विचार केला. कोवळं वय एवढा एकच मुद्दा असेल का? कामसेवा करवून घेताना कुठलाही क्रूर पुरुष मृदू होऊन जातो. मागेल तो वर देण्याच्या मन:स्थितीत असतो. पण म्हणून यापैकी कुणी मला या गुलामगिरीतून किंवा या विकृत सेवेतून मुक्त करणार नाही, एवढी जाणीव मला निश्चितच होती.

एकदा मी अब्दुल कादर नावाच्या एका मित्राला विचारलं, "तुमची माझ्यावर खरोखरच मुहोबत आहे का?"

"नसती तर तिसऱ्यांदा तुला शोधत इथे आलो असतो का? प्रत्येक वेळी तुझ्या धन्याची परवानगी घेताना अवघड वाटत असलं तरीही वेड्यासारखा आलोच ना?"

"पण का? मीही तुमच्यासारखाच पुरुष आहे!..."

"त्याची आठवणही नको. दुसरं सांगतो. प्रत्येक पुरुषाविषयी मनात अशी मधुर प्रेमभावना निर्माण होत नाही. स्त्रीचं माधुर्य आणि पुरुषी काटकपणा यांच्या मीलनातून निर्माण झालेलं आकर्षक रूप आहे तुझं. हे हजारात एखादंच असतं. तुझ्या कोवळ्या मिशांची लव राठ झाली तरी तुझं हे वैशिष्ट्य असंच राहणार आहे."

तो निघून गेल्यावर मी स्वत:ला आरशात पाहिलं. माझ्या देखण्या रूपाचा मला नेहमीच अभिमान होता. "अशा देखण्या पुरुषशी लग्न करतेस हे तुझं सुदैव!" असं गावातल्या वयस्कर स्त्रियांबरोबरच शामलीच्या समवयस्क मैत्रिणी तिला म्हणायच्या, असं शामलीही सांगायची. स्त्रियांना आवडणाऱ्या माझ्या या रूपात फक्त बायकीपणा कसा असेल? पुरुषाच्या रूपामध्ये मार्दवता का असू नये? असेल तर, त्याविषयी अशी विकृत आशा का असावी? या लोकांची संस्कृती आणि अभिरुची यांविषयी मनात असलेल्या तिरस्काराबरोबर गोंधळही निर्माण झाला.

एक दिवस मोइनुद्दिन तुरानी नावाचे एक मोठे सरदार इजाजला भेटायला म्हणून आले. वय सुमारे पंचेचाळीस वर्षे. टोकदार नाक. गोरापान रंग. करडी टोकदार दाढी. इजाजशी ते बोलले. मला बोलावून पाहिलं. मी 'सलाम आलेकूम' म्हटलं. त्यांच्या नजरेत संमती उमटली. पाठोपाठ इजाजनं मला माझ्या खोलीत

जायला सांगितलं. मी माझ्या खोलीत परतलो. पायजमा, भरतकाम केलेला कुडता, सोनेरी धाग्याचं भरतकाम असलेलं जाकीट, डोक्यावर काळी टोपी असा माझा वेष होता. थोड्या वेळानं मला पुन्हा तिथे बोलावण्यात आलं.

इजाजनं ओळख करून देत सांगितलं, “हे दहा हजारचे मनसबदार सरदार मोईनुद्दिन तुरानीसाहेब. मुजरा कर. त्यांनी तुला माझ्याकडून विकत घेतलंय. या क्षणापासून तू त्यांचा गुलाम आहेस. किंमत एक हजार रुपये. तुझी किती किंमत हे तुला समजायची गरज नाही. तरीही सांगतोय. गुलाम म्हणून तुझी तिथली किंमत काय आहे हे तुला ठाऊक असावं, या करूणेपोटी सांगतोय. तुझ्या वयाच्या आणि तब्येतीच्या सर्वसाधारण गुलामाची बाजारातली किंमत पंधरा ते वीस रुपये असते. आलं का लक्षात? मनसबदार साहेब दयाळू आहेत.”

होकार-नकार देणं, अलिप्त राहणं यापैकी कशाचाही मला अधिकार नाही, हे सत्य त्या वर्षभरात मला समजून गेलं होतं. “मला विकू नको, मला तुझ्याकडेच राहू दे” हे सांगायचा हक्क गाई-गुरांना आणि बकऱ्या-मेंढ्यांना तरी कुठे असतो म्हणा! कुठंही गेलं तरी तेच काम करायचं. या मोईनुद्दिननंही मला त्याच दृष्टीनं विकत घेतलं आहे. हाही आपल्या मित्रांचं रंजन करण्याचाच मला हुकूम देणार आहे. जेवण-खाण, राहणं, कपडे-लत्ते वगैरे बाबतीत मात्र पंधरा-वीस रुपयांच्या गुलामापेक्ष चांगलं ठेवेल. शरीराची दमणूक करणारी, कातडं रापणारी, श्रमाची कुठलीही कामं करावी लागणार नाहीत. एव्हाना दमलेल्या इजाजला सलाम करून मी पुन्हा माझ्या खोलीत गेलो.

मला मोईनुद्दिनच्या घोड्याच्या पाग्यावर नेण्यात आलं. सुमारे दोनशे घोड्यांची ती पागा होती. घोड्यांचा खरारा करणाऱ्या नोकरांच्या खोलीत नेऊन मला पोटभर जेवू घातलं. जेवणानंतर एक मोठी औषधाची गोळी जबरदस्तीनं गिळायला लावली. ती अफुची गोळी असल्याचं मला ठाऊक होतं. “ही का खायची?” मी त्यातही विचारलं. “मुकाट्यानं खा. सरदारांचा हुकूम आहे.” उत्तर मिळालं.

दोन दणकट माणसं आजूबाजूला उभी होती. जागा नवी. नवे मालक. त्यांचा स्वभाव ठाऊक नाही. त्यामुळे काहीही न बोलता गोळी गिळून वर पाणी प्यायलो. त्यांनी माझा हात धरून पागेला एक फेरी मारायला लावली. पुन्हा खोलीत आल्यावर नोकराच्या जागी मला झोपवलं. एव्हाना मला गुंगी येऊ लागली होती. पुढचं सारं अंधुक आठवतंय. त्या दोघांपैकी एकाच्या हातात लाकडाचा जाडजूड चिमटा होता. आणखी एक जण आला. दोघांनी मला जमिनीवर दाबून धरलं. एकानं माझे दोन्ही खांदे दाबून धरले. दुसऱ्यानं पायजमा ओढून काढला. चिमट्यानं माझी दोन्ही अंडं पकडण्यात आली.

मला भीती वाटली. डोळ्यांवरची गुंगी बाजूला हटली. मी किंचाळलो, “नको नको!” धडपडलो. पण दोघांच्या घट्ट पकडीतून निसटायला जमलं नाही. माझ्या सर्वांगाला घाम फुटला होता. काय घडतंय ते मला जाणवलं. क्षणभर गेला असेल-नसेल, फट, फरट् आवाज ऐकू आला. तिथून उठलेली वेदना सर्वांगाला व्यापून गेली आणि पाठोपाठ शुद्ध हरपली.

त्यानंतर किती दिवस मी त्या वेदनेनं तळमळत होतो. मधेच शुद्धीवर, मधेच बेशुद्धावस्थेत होतो. दुखावलेली अंडं किती दिवस सुजली होती, कधी ती सूज उतरायला सुरुवात झाली, यातलं काहीही मला समजलं नाही. इतरांचं बोलणं समजण्याइतकं भान आलं तेव्हा अंगावर पांढरा चोळणा, पांढरा अंगरखा आणि पांढरी शुभ्र दाढी असलेले एकजण म्हणाले, “तुझं दुखणं आता सहन करण्याच्या टप्प्यावर आलंय. तुझ्या चेहऱ्यावरूनच समजतंय ते. नशीबवान आहेस तू. मेला नाहीस. तुझा जीव जाणार नाही, अशा प्रकारे कुशलतेनं मी उपाय केलेत. पण माझा एवढ्या वर्षांचा अनुभव सांगतो, एवढा उपाय करूनही चारपैकी तीन मरतात. फार वेदना जाणवू नये म्हणून आधीही औषध दिलं होतं.”

“पण काय केलं तुम्ही मला? काय झालं होतं?”

“ओह! अजून लक्षात नाही आलं? तुला हिजडा केलंय. तुझ्यामधलं पुरुषत्व पूर्णपणे काढून टाकलंय. यानंतर तुला मोकळेपणानं जनानाच्या सेवेसाठी ठेवता येईल. तिथल्या कितीही सुंदर स्त्रीपाशी तुला ठेवण्यात

धोका नाही. तिथल्या बायकांची मर्जी राखून राहायला जमलं तर कुठल्याही कष्टांशिवाय त्या स्त्रियांइतकंच बिनकष्टाचं आणि सुखा-समाधानाचं आयुष्य तुलाही काढता येईल.”

आता कुठे मला सगळाच खुलासा झाला. अफुच्या गुंगीत मीही तो लाकडी चिमटा पाहिला असला तरी मला तेव्हा त्याचा अर्थ कळला नव्हता. आमच्या देवगढच्या खेड्यांमधले शेतकरी आपल्या वळूंना असेच पाय बांधून ठेवून, अशाच लाकडी चिमट्यानं बीज फोडताना मीही पाहिलं होतं. त्यांना अशा प्रकारे निर्बीज केलं नाही, तर हे कामाच्या वेळी गायींकडे धावतात आणि नांगरणं– गाडी ओढणं यासारख्या कामांची खोटी करतात. शिवाय उत्तम वळूकडून बीजधारणा झाली तर बैलही चांगले जन्मतात. शेतात राबणाऱ्या दुर्बल वळूकडून पुढची पिढी जन्मली तर ती दुर्बल जन्माला येते. अशा प्रकारे निर्बीज केलेल्या बैलांना गाय दिसली तरी उत्तेजना होत नाही वगैरे तपशील कुणीतरी सांगितला होता. त्या वयात हे सगळं ऐकायचीही लाज वाटून मी तिकडे दुर्लक्ष केल्यासारखं दाखवलं होतं. ही माणसं आपला जनाना राखण्यासाठी नपुंसक लोक पाळतात. पण नैसर्गिकरीत्या असे नपुंसक लोक संख्येने कमी असल्यामुळे सशक्त तरुणांनाच पकडून नपुंसक केलं जातं, असं इजाजकडची नोकरमाणसंही आपसात बोलायची. पण हे कसं करत असतील, याची मात्र काहीच कल्पना नव्हती आणि हा दुर्दैवी प्रसंग माझ्यावरही येऊ शकेल, अशी कल्पनाही मनाला शिवली नव्हती. इजाजकडे पकडून आणल्यानंतरही अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही क्वचित कधीतरी माझं पुरुषत्व जागृत होत होतं. मला नपुंसक केल्यानंतरही ते मला हवं तसं वापरू शकतील, या विचारानं अंगाची लाही झाली.

हकिमांनी सांगितलं, “मनसबदार खुरानीसाहेबांचा तुझ्यावर अतिशय जीव आहे हं! तुला हिजडा करण्याआधी हजार रुपये देऊन त्यांनी तुला विकत घेतलं.”

“म्हणजे काय?”

“आधीच सांगितलं ना? हिजडा करताना चारापैकी तीन मरतात. तूही मरायची शक्यता होतीच. मेला असतास तर त्यांचे हजार रुपये फुकटच गेले असते की नाही? पण त्याची तमा न बाळगता त्यांनी हजार रुपये खर्च केलेच ना? याला प्रेम नाही तर दुसरं काय म्हणायचं?”

माझ्या डोळ्यांवर पुन्हा झापड आली. त्यांच्या बोलण्याचा संपूर्ण अर्थ लक्षात आला नाही. वेदना कमी झाल्यामुळे अफु देण्याचं प्रमाणही त्यांनी कमी केलं होतं. काही वेळ गुंगी यायची, पुन्हा जाग यायची. अशीच एकदा जाग आली तेव्हा वाटलं, माणसाला माणसाच्या सेवेसाठी डांबून ठेवणं हा कुठला न्याय? गुलामगिरीलाही एक मर्यादा आहे. पुरुषाचं पुरुषत्वच नष्ट करणं किंवा स्त्री असेल तर तिच्या देहाचे हवे तेवढे, हवे तेव्हा, हवे तितक्या लोकांनी लचके तोडणं आणि नंतर भिरकावून टाकण्याचा हक्क कुठला देव कुणाला देतो?

हकिमांनी माझी परीक्षा घेतली. आतली जखम पूर्णपणे सुकली होती. मी पूर्णपणे खोजा झाल्याची खात्री करून घेतल्यावर माझा जनानात प्रवेश झाला. मोईनुद्दिनचा महाल इजाजच्या महालापेक्षा सात-आठ पट मोठा होता. आमचा देवगढचा राजवाडा सुद्धा याच्यापुढे काहीच नाही. नाही तरी आमचं देवगढ म्हणजे अरवलीच्या आडोशाला अनेक वर्षं लपून राहू शकलेलं छोटं राज्य. राज्याची सगळी आवक राजाच्या उपभोगासाठी आहे अशा भावनेत न अडकता, तिथं सनातन पद्धतीनं राज्यकारभार चालायचा. सगळे कुल-प्रमुख, मंत्री, अमात्य सभेत जमून जमा-खर्चाची जी मिळवणी ठरवत, त्याला राजाही बद्ध असे. राज्यामधील सर्व स्त्री-पुरुष आणि आबालवृद्धांचा आपण पिता असल्याच्या भावनेनं त्यालाही वागावं लागत होतं. त्यामुळे साहजिकच राजवाड्याच्या श्रीमंतीवर आपोआपच मर्यादा येत होत्या. इथं मोईनुद्दिन हा एक दहा हजारचा मनसबदार होता. दहा हजार सैनिकांचा सरदार. म्हणजे दहा हजार सैन्य सतत त्याच्या हाताखाली सज्ज असे, असा याचा अर्थ नव्हे. बादशहाची आज्ञा होताच तेवढं सैन्य उभं करायची जबाबदारी ज्याच्यावर आहे, असा सरदार. बादशहानं दिलेल्या जहागिरीच्या बळावर त्यानं हे सैन्य पोसायचं आणि त्यातच आपलं सुखासीन जीवनही चालवायचं. पैसा कमी पडला, की तो आपल्या जहागिरीतून वेगवेगळ्या मार्गांनं पैसा वसूल करायचा. या वसुलीसाठी गावकऱ्यांना आणि शेतकऱ्यांना पकडून बाजारात गुलाम म्हणून विक्री करायचाही

त्याला अधिकार होता. त्या दृष्टीनं तोही आपल्या प्रांतापुरता राजाच! त्याच्या मनसबदारीपुढील शेकडा, हजार, दहा हजार हा आकडा त्या अर्थी त्याची ताकद दर्शवत होता.

मोईनुद्दिनच्या महालाच्या पुढच्या बाजूला एक विस्तीर्ण उद्यान होतं. तिथं दुमजली पारशी शैलीची इमारत होती. दोन विस्तीर्ण चौक ओलांडून आत गेल्यावर जनानाची हद्द सुरू होत होती. या आधी मी कुठेही जनाना पाहिला नव्हता. इजाजच्या महालात मला स्त्रीसारखं वापरत असले तरी स्त्रिया असलेल्या भागात मला प्रवेश नसायचा. मला देवगढमध्ये बंदिवान केल्यानंतर मी औषधालाही स्त्री पाहिली नव्हती. सगळ्या स्त्रिया जनानामध्येच असत. त्यांच्यापैकीही कुणी पुरुषांना पाहू शकत नव्हतं. रस्त्यावर, शेतावर, बागेत काबाडकष्ट करणाऱ्या काही बायका दिसल्या, तरी त्या रापलेल्या कातडीच्या आणि अनाकर्षक असत. नखशिखान्त शुष्क त्वचा असल्यानं स्त्री-पुरुष असा भेदही जाणवणार नाही इतक्या त्या मातकट असत. त्याही गुलाम. अशा नीरस स्त्रियांना पाहिलं की दया येई. मनात दु:ख दाटून येई. याखेरीज इतर कुठलीही भावना मनाला स्पर्शच करत नसे.

पण मोईनुद्दिनच्या जनानखान्याचं तसं नव्हतं. तिथल्या स्त्रिया उत्तमोत्तम वस्त्रालंकारानं नटलेल्या होत्या. सोनं, हिरे, माणकं, विविध किमती जवाहिरानं मढवलेले दागिने आणि भारी रेशमी वस्त्रं यानं झाकलेल्या त्या स्त्री-देहांना कधीही सूर्यकिरणाची झळ लागली नसणार असं वाटण्याइतक्या त्या तेजस्वी होत्या.

मोईनुद्दिनला चार शास्त्रसंमत बायका होत्या. त्या प्रत्येकीला सात-आठ किंवा दहा-बारा दासी. या दासीही दिसायला देखण्याच. त्याही नटलेल्याच असत. सगळ्या एकजात तरुण. त्या सगळ्या आपापल्या मालकिणीची सेवा करणं, तिचं जेवणखाण बघणं, तिच्या सौंदर्याची निगा राखणं, तिची शय्या सज्ज करणं, तिच्या केसांची निगा राखून त्यांना धुपाची धुरी देणं, तिला कंटाळा आला की तिची करमणूक करण्यासाठी ती सांगेल त्या प्रकारे गायन-नर्तन करून तिचं मन रिझवणं वगैरे करण्यात गढून गेलेल्या असत. तरीही या राण्या सतत कंटाळलेल्या. आपला नवरा आपल्यापाशी न येता इतरांपाशी जास्त जातो, या भावनेनं सतत कावलेल्या असत. ती भावना व्यक्त करण्याची जागा म्हणजे या दासीच. त्याच आपल्या मालकिणींचं आपापल्या पद्धतीनं समाधान करायच्या.

एकदा मोईनुद्दिनसाहेब आपल्या जमिलाबानू या बायकोपाशी आले. बेगम तिशीच्या होत्या. परमेश्वराची आपल्यावर कृपा झाली म्हणून त्या मोहरून गेल्या. त्यांनी मोठ्या आनंदानं पतीला झोपाळ्यावर बसवलं. आपणही त्यांच्या शेजारी बसून त्यांचे हात-पाय मोठ्या प्रेमानं, हलकेच चेपू लागल्या. पतीच्या रंजनासाठी त्यांनी आपल्या दासींना पाचारण केलं. सुगंधी लेपन, वर चामराचं सुखद वारं. त्यानंतर चौघी सुरेल स्वरात गाऊ लागल्या. चौघी जणी नृत्य करू लागल्या. यजमान गायन-नृत्याचा आस्वाद घेण्यात रंगून गेले. त्यांच्या नजरेत मदन उतरू लागला. जमिलाबानूंना तर प्रत्यक्ष स्वर्गच धरतीवर उतरत असल्यासारखं वाटू लागलं. त्या पतीला अधिकच लगटून बसल्या.

पण यजमानांची नजर चार नर्तिकांपैकी एकीवर– केशरबाईवर खिळली होती. ती खरोखरच कुशल नर्तकी होती. स्वत: बेगमसाहिबांनाही ते अतिशय आवडायचं. थोड्याच वेळात शयनगृहात जाण्यासाठी यजमान उठले. बेगमसाहिबाही उठून उभ्या राहिल्या. पण मनसबदारांनी पुढे होऊन केशरबाईचा हात धरला आणि तिला घेऊन ते शयनगृहाकडे निघून गेले. बेगमसाहिबांची निराशा एखाद्या सुरीसारखी त्यांच्या नजरेतून बाहेर पडली आणि त्या केशरबाईवर शेकडो वेळा वार करून आली. पण काहीही करणं शक्य नव्हतं. एखादा वेडावाकडा शब्द जरी यजमानांच्या कानांवर पडला, तर आपली धडगत नाही हे त्यांनाही ठाऊक होतं. चाबकाचे फटके बसू शकतील, तलाकही होऊ शकेल किंवा दासींच्या समोर आणखी कसलाही अपमान होऊ शकेल. त्यामुळे त्यांनी ओठ घट्ट शिवून घेतले, भावनांना आवर घालून त्यांनी दासींना सांगितलं, "तुमचं गायन-नर्तन सुरू असू दे. मनसबदारांच्या कानांवर पडत राहू दे."

केशरबाईला क्षमा करणं त्यांना अशक्य आणि अनैसर्गिक वाटत होतं आणि ते दाखवून देणंही शक्य नव्हतं. आपला राग केशरबाईनं मनसबदारांपर्यंत पोहोचवला तर परिणाम घोर होतील. कदाचित रागाच्या भरात ते तलाकही देतील. आणि तिच्याशी निकाह करतील किंवा यानंतर मला कधीही स्पर्श न करता तिला मुद्दाम

माझ्यासमोरच शयनगृहात घेऊन जातील.

मनातली ही आग कुणापुढे सांगणार त्या? नाही सांगितली तरी ती शांत तरी कशी होणार? तिसऱ्या दिवशी न राहवून त्यांनी नाहीद कंचनीपाशी सांगून मन मोकळं केलं.

चांगली ओळख झाल्यानंतर नाहीदनं ते मलाही सांगितलं. नाहीदला केशरबाईचा मत्सर होता. बरोबर बेगमसाहिबांचं ऐकल्यावर मनात कुठेतरी बरंही वाटलं. सेविकांकडून सेवा करून घेत जन्म काढणाऱ्या बेगमसाहिबांविषयीही तिच्या मनात रागच होता. "नेहमी उत्तम जेवण, रोज दोन-तीन प्रकारचं मांस, भाजी, मिठाई, इतर गोड पदार्थ खायचे. काम मात्र काहीही नाही. प्रत्येक बाबतीत आम्हीच राबायचं. चरबी वाढणार नाही तर काय! आम्ही मात्र दिवसभर राबत राहायचं. यांच्या मर्जीनुसार गायचं, नाचायचं, जेवण-खाणंही मर्यादित. कारण शरीर सडपातळ आणि लवचीक हवं ना? धन्यांचं मन आमच्यावर जाणं स्वाभाविकच नाही का? आमच्यावर बेगमसाहिबांची सापासारखी नजर असते. त्यांचा आमच्यावर रागही असतो. पण आम्ही नसू तर जनानखाना कसा चालेल? फक्त बायकोच असेल तर जनाना कसा होईल?" ती भुवया नाचवत म्हणाली.

मी हिशेब करून पाहिला. चार बायका आणि त्यांच्या दासींची संख्या बावन्न. त्याशिवाय सोळा कंचनी. त्यांना 'बंदी' म्हणायची पद्धत होती. शरीयतप्रमाणे चारपेक्ष जास्त बायका करणं निषिद्ध असलं तरी कितीही बंदी बाळगायची मुभा होती. युद्धकैदींपैकी आकर्षक स्त्रिया, गुलामांच्या बाजारात मन वेधून घेणाऱ्या सुंदरी, मित्रांनी भेट म्हणून दिलेल्या तरुणी यांच्यापैकी भोगण्यासाठी योग्य अशा तरुणींना कंचनी किंवा बंदी म्हणून ठेवण्यात येत होतं. त्या सेविका किंवा दासी नव्हेत. या सेविकांवरही कधीकधी यजमानांची नजर जात असली आणि त्यात त्यांनाही धन्य धन्य होत असलं, तरी आपापल्या यजमानिणींची देखभाल करणं हेच त्यांचं मुख्य काम असे. निषणात आचाऱ्यांनी विविध मसाले वापरून बनवलेले रूचकर पदार्थ या दासी तलम वस्त्रांनी झाकून छोट्या छोट्या भांड्यांमधून आकर्षकपणे घेऊन आल्या, की भूक नसली तरी त्या घमघमाटानं जिव्हा चाळवली जात होती.

इथल्या आचाऱ्यांचे पगार भरपूर असत. विविध प्रकारचे हलवे आणि इतर मिष्टान्ने बनवणाऱ्यांचे पगार त्याहून अधिक. मनसबदारांचं जेवण नेहमी जनानखान्यातच व्हायचं. रोज वेगवेगळ्या बेगमबरोबर. त्या दोघांचं जेवण झाल्यावर उरलेलं जेवण सेविका, कंचनी आणि बंदी यांच्याबरोबर माझ्यासारख्या हिजड्यालाही मिळत असे. त्यात त्यांच्याइतकं वैविध्य नसे, गुणवत्ताही थोडी कमीच असे, पण तरीही गरीबांचं जेवण नसे. जनानाच्या बाहेर घोडेस्वार, पायदळातले शिपाई आपलं अन्न आपणच शिजवून खात. त्यापेक्षा आतल्या सेवकांचं जेवण चविष्ट आणि उत्तम दर्जाचं असे. त्या चवीच्या जेवणाची सवय झाल्यावर, इथून बाहेर पडावं लागलं तर आपली काय गत, म्हणून सगळे घाबरे होत.

जनानाच्या सेवेत माझ्यासह चौदाजण नपुंसक होते. त्यापैकी एक अबिसिनी. उंच, काळा रंग, कुरळे केस. तो जन्मजात हिजडा होता. पन्नाशीचा. त्याला नाझिर म्हणजे मुख्य नपुंसक म्हणून हुद्दा होता. इतर तेराजणांची कामं ठरवून द्यायची, त्यावर देखरेख करायची, कुठे काही चुकलं तर थेट धन्यांपाशी जाऊन सांगायचं हे सारं त्याच्या अधिकारात येत होतं. जनानामधील कुणाही सेविकेची तो धन्यांकडे तक्रार करू शकत होता. त्याच्या शब्दाला एवढं वजन होतं, की तो बोट करून दाखवेल त्या व्यक्तिला शिक्षा ठरलेली. त्यामुळे संपूर्ण जनाना त्याला घाबरत असे. बेगमाही त्याला घाबरायच्या. पाच वर्षांपूर्वी एक सेविका स्नानगृहात एका हिजड्याशी चाळे करताना सापडली होती. प्रत्यक्ष काहीही घडू शकणार नाही हे दोघांनाही ठाऊक असूनही त्यांचा तो खेळ चालला होता. या नाझिरनं त्या दोघांनाही त्या अवस्थेत पकडलं. त्या दोघांची भीतीनं बोबडीच वळली. व्यभिचारावर एकच शिक्षा, ती म्हणजे मृत्युदंड! पण त्या वेळी मनसबदार गावात नव्हते. सैन्यासह दख्खनकडे गेले होते. आता न्यायनिवाडा कोण करणार? त्यानं हे प्रकरण थोरल्या बेगम सुल्तानाबानू यांच्यापुढे नेलं. सुल्तानाबानू बेगम यांचे रोजे सुरू होते. हातात सतत जपमाळ, रोजचा पाच वेळचा नमाजही त्या चुकवायच्या नाहीत. जनानखान्यावर त्यांचाच अधिकार चालायचा. अंगभर चरबी साठलेली असतानाही मनसबदारांनी त्यांना तलाक दिला नव्हता. प्रेमाचा याहून मोठा पुरावा काय असू शकेल? स्वभावानंही त्या दयाळू आहेत, असं सगळे म्हणायचे.

प्रकरण त्यांच्यापुढे गेलं तेव्हा त्यांनी दोन्ही गुन्हेगारांची चौकशी केली. दोघांनीही सगळ्यांची नजर चुकवून साठवलेले पैसे दंड म्हणून काढून घेऊन, त्याला जनानामधल्या नोकरीवरून काढून त्यांनी पाग्यावरच्या घोड्यांच्या खराऱ्याच्या कामावर पाठवलं. आणि तिला गुलामांच्या बाजारात वीस रुपयांना विकण्यात आलं. जनानामधल्या सुखसोयी गेल्या, पण निदान जीव तरी वाचला, असा विचार करत त्या दोघांनी काढता पाय घेतला.

इतर बारा जणं माझ्यासारखे कृत्रिमरीत्या हिजडे करवून इथे आणले होते. त्यापैकी दोन माळव्यातले होते, चार बुंदेलचे होते. लहान वयात युद्धकैदी म्हणून पकडण्यात आलेले आणि बीज फोडण्याच्या उपचारानंतरही जिवंत राहिलेले. न कळत्या वयात बीज फोडण्यात आल्यामुळे त्यांना त्या घटनेची आठवण किंवा त्याविषयी कडवटपणाही नव्हता. त्यामुळे ते या जनानखान्यात कोणत्याही प्रकारचा विरोध न करता वावरत होते. तीस ते चाळीस वयाचे इतर सहाजण गौड देशाचे होते. कर देण्याची शक्ति नसलेल्या या भागातले आई-वडील चौथ्या वर्षी स्वत:च आपल्या मुलांचं बीज फोडून मुलांना बाजारात विकतात म्हणे! अशा प्रकारे विकले जाऊन दलालांकरवी इथे येऊन पोहोचले होते. दोन्ही वेळेला निवांत जेवू घालणाऱ्या या घरापलीकडे त्यांच्या कुठेही निष्ठा नव्हत्या. तिथल्या नीती-नियमांबद्दल आक्षेप घेण्याइतकी बुद्धी आणि मन त्यांच्यापाशी नव्हतं. जेवण, काम आणि झोप या दिनक्रमातच ते सुखी होते.

काही हिजडे प्रसिद्ध सेनानी असल्याचेही उल्लेख आहेत. सुलतान बल्बनचा वजीर इमरूद्दिन रेहन, अल्लाउद्दिनचा सेनापती कपूर हजरदिनारी, कुतुबुद्दिन मुबारक खिलजीचा जवळचा स्नेही खदौशा हे सगळे हिजडेच होते. वजीर ख्वाजाजहान मलीक सर्वार नावाच्या काळ्या हिजड्याला सुलतान महंमदनं तेराशे चौऱ्याण्णवमध्ये मलीक-उस-शर्क या बिरूदासह जोनपूरचा सुभेदार म्हणून पाठवलं. लवकरच त्यानं पश्चिमेला कोल (आजचं अलीगढ) पासून पूर्वेला बिहार येथील तिरहटपर्यंतचा विशाल प्रदेश व्यापला आणि सुलतान उस शरक या नावानं तो त्याचा कारभार पाहू लागला. मोगलांच्या काळी नाझीर आणि ख्वाजा सरस नावाचे काही हिजडे मनसबदार आणि सुभेदार अशा हुद्यांपर्यंत चढले. या नाझीर आणि ख्वाजा सरस यांना ऐतमद्खान अथवा औबरखान (विश्वासू दरबारी) असं बिरुद असायचं. बाबर आणि हुमायूनची सेवा केलेल्या अशा एका ऐतबरखानला अकबरानं दिल्लीचा सुभेदार म्हणून नेमलं होतं. आणखी एका ऐतबरखानवर अकबरानं हजारी मनसबदार म्हणून नेमून आर्थिक व्यवहाराची घडी उत्तम बसवण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली होती. आणखी एका ऐतमतखानला चार हजारी मनसबदार म्हणून नेमून गुजरातचा सुभेदार केला होता. औरंगजेबाकडील हिजड्यांचा प्रमुख बख्तवरखान (मृत्यू १६९८) याला हजारी मनसबदार केलं होतं. औरंगजेबाच्या सेवेत असलेल्या आणि प्रत्येकाला काही ना काही बिरुद असलेल्या चाळीस नाझिरांची यादी मनुकी यानं दिली आहे. 'नैसर्गिक पुरुषत्वाच्या अभावाची कमतरता भरून काढण्यासाठी त्यांनी अशा प्रकारे शौर्य गाजवलं असावं. पण सैन्यात शिरायचं आणि शिरलं तरी तिथे अधिकारी होण्याचं, सुलतान किंवा बादशहाच्या नजरेपर्यंत जाऊन पोहोचण्याइतकं सगळ्या हिजड्यांचं सुदैव नसतं. माझ्या या नायकाला मी हे सुदैव प्राप्त करून दिलं आणि अप्पाजींच्या मताप्रमाणे इतिहासाचा ओघ इकडे वळवून, त्यातील अंत:सत्य जाणून घेतलं तरी त्या बीज फोडून नपुंसकत्व आणणाऱ्या संस्कृतीचं समर्थन केल्यासारखं होईल! काय करावं?'

मी माझ्या खऱ्याखुऱ्या कामावर हजर झाल्यावर दोन महिन्यांनंतर सुलतान बेगम माझ्याशी बोलल्या. त्यांनी आपण होऊन बोलल्याशिवाय आपण होऊन त्यांच्याशी बोलायला जाणं हा तिथल्या आचाराच्या दृष्टीनं असंस्कृतपणा! नवीन काही आज्ञा आली असेल तर ती थोरल्या बेगमना ठाऊक असते. एका अर्थी त्या जनानखान्यातील आचरणाच्या सर्वेसर्वा असतात, हे नाझीरनं आधीच मला सांगून ठेवलं होतं. वागण्या-बोलण्याच्या शिष्टाचारातील बारकावे समजावून सांगितल्यानंतरच मला इथे प्रवेश देण्यात आला होता.

बेगमसाहिबा झोपाळ्यावर लोडाला टेकून बसल्या होत्या. वरच्या बाजूला असलेल्या आडव्या कापडी पड्द्याला बांधलेल्या दोन दोऱ्या आळीपाळीनं ओढत दूर बसलेली सेविका त्यांना मंद वारा घालत होती. हातात पेटती उदबत्ती घेऊन इकडे तिकडे फिरवणाऱ्या बेगमसाहिबांनी मला पाहिलं आणि बोटांनी येण्याची खूण केली. मी आदरानं थोड्या अंतरावर उभं राहून 'सलाम आलेकूम' म्हणून वाकून मुजरा केला. त्यांनी गंभीरपणे विचारलं, "तू जन्मत: हिजडा आहेस की केलं गेलंय?"

"नंतर. शल्यचिकित्सेनं! मनसबदार साहेबांनी मला आधी विकत घेतलं. नंतर चिकित्सा करून इथे आणलं." मी नम्रपणे उत्तर दिलं.

"युद्धात पकडून आणलंय. होय ना?"

"होय."

"युद्धाआधी अज्ञानी लोकांच्या धर्मामध्ये होतास ना? त्याच वेळी या खऱ्या धर्मात आला असतास तर ही गत झाली नसती. उशीर का केलास?"

त्यांना काय उत्तर देऊ? हाच प्रश्न मीही स्वत:ला शेकडो वेळा विचारलाय. माझे वडील आधी का शरण गेले नाहीत? जर ते आधीच इस्लाम धर्मात गेले असते तर आलमगीर आमच्या राज्यावर चाल करून आलाच नसता. आम्ही आमच्या राज्याचे अधिपती म्हणूनच राहिलो असतो किंवा बादशहाचे सामंत, मनसबदार किंवा सुभेदार होऊन राहिलो असतो. दुर्बल देव आणि निर्जीव दगडांच्या मूर्तींवर भरवसा ठेवून आम्ही आपलं नुकसान करून घेतलं. नाही तर मीही अशा एखाद्या महालात अथवा आमच्या देवगढच्या राजवाड्यातच असाच एखादा मोठा जनानखाना निर्माण करून सुखात राहिलो असतो. हजार वेळा ही कल्पना मनात येऊन गेली होती. प्रत्येक वेळी मी मागे सोडून आलेल्या त्या अज्ञानमूलक धर्माविषयीचा राग उसळून वर येत होता. बेगमसाहिबांच्या प्रश्नाच्या निमित्तानं पुन्हा तोच राग धगधगून वर आला.

बेगमसाहिबांनी विचारलं, "न चुकता पाचही नमाज करतोस ना?"

"नियमितपणे जमत नाही."

"नियमितपणे कर. तुझं कल्याण होईल. कितीतरी खोजा मनसबदार झाले आहेत, सुभेदार झाले आहेत. तू राजकुमार होतास ना? तुझ्या बोलण्या-वागण्यात तो डौल आहे. म्हणून सांगतेय."

बेगमसाहिबांच्या हितोपदेशाविषयी माझ्या मनात विश्वास निर्माण झाला. मीही नियमितपणे नमाज करू लागलो.

मोईनुद्दिनच्या जनान्यात माझा प्रवेश होऊन चार वर्षं झाली होती. माझ्या जीवनात काहीही बदल होत नव्हता. जनाना, त्यातील जीवनाचं निरीक्षण करणं, हेच माझं जीवन होऊन गेलं होतं. नव्या कंचनी, बंदी जनान्यात येत होत्या. वय झालेल्यांना कमी दर्जाच्या दरबाऱ्यांना आणि मनसबदारांना विकण्यात येई. केवळ समर्पणाच्या भावनेनं मन रिझवणाऱ्या बायकांची वयं झाली तरी त्यांना ठेवण्यात येई आणि त्यांच्या अन्न-वस्त्राची काळजी घेण्यात येई. आकर्षण गमावलेल्या वयात त्यांना विकत तरी कोण घेणार म्हणा! पण मनात निराशा आणि हताशपणा धगधगत असलेल्यांना मात्र हे शक्य नसे. काही जणांच्या दृष्टीनं ते अशक्य असे. अशा बायका गावाबाहेरच्या सैतानपूर या वेश्यावस्तीत जाऊन राहायच्या. या सैतानपूरमध्ये येऊन जाणाऱ्या लोकांची नोंद करण्यासाठी अकबर बादशहाच्या काळापासून एक दरोगा नेमण्यात येत असे. इथे येणारे आमिर, नामवंत, श्रीमंत या दरोग्याला लाच देऊन आपलं नाव या यादीत येणार नाहीत, याची काळजी घेत, अशी चर्चा होती. आपल्या मित्रमंडळींना रंजनासाठी घेऊन जाण्यासाठी श्रीमंतांचं हे एक लाडकं ठिकाण होतं.

सुलतानाबेगम चार-पाच महिन्यांतून एकदा बादशहाच्या बेगमांच्या जनानखान्यात जाऊन यायच्या. बादशहाच्या जनान्याकडून आलेल्या आमंत्रणावरून तिथे जाऊन येणं ही काही साधीसुधी गोष्ट नव्हती. यांची पालखी कुणालाही दिसणार नाही अशा प्रकारे मोठ्या रेशमी वस्त्रानं झाकली जात असे. त्याला दोन्हीकडे छोट्या खिडक्या असत. आतून बाहेरचं पाहता येत असलं तरी बाहेरच्या कुणालाही यांचे डोळेही दिसू नयेत अशा प्रकारे त्या खिडक्यांना पडदे लावलेले असत. पालखी वाहायला पुढे चार आणि मागे चार दणकट नपुंसक. पालखीच्या भोवताली बाण, भाले घेतलेले दहा सशस्त्र शिपाई. त्यामागे नखशिखान्त काळ्या बुरख्यात झाकलेल्या सेविका, दासी.

एकदा बेगमसाहेबांनी मला सोबत यायला सांगितलं. किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशीच शिपाई आणि इतरांची तपासणी करून आत सोडण्यात आलं. मी खरोखरच नपुंसक आहे, याची खात्री करून घेण्यात आली. दासींची तपासणी करण्यासाठी स्त्रिया नेमल्या होत्या. मुख्य दरवाजा ओलांडून आत गेल्यावर डावीकडे वळून जनानखान्यात प्रवेश करण्याआधी बेगमसाहिबा आणि दासींची सर्वांग चाचपून परीक्षा घेण्यात आली. एका लठ्ठ नपुंसकानं माझीही परीक्षा घेतली. पालखी वाहून आणणाऱ्या हिजड्यांना जनान्यात प्रवेश नव्हता. शिपायांना तर किल्ल्याच्या प्रवेशद्वारापाशीच उभं करण्यात आलं.

आतल्या बाजूला जनानखान्याचा विस्तार माझ्या कल्पनेपेक्ष कितीतरी मोठा होता. असंख्य खोल्या, संगमरवरी लहान-मोठे महाल. त्यातला प्रत्येक महाल वेगवेगळ्या बेगमसाहिबांचा होता. मधे लहान-लहान बागा, पाण्याचे झरे, कारंजी. प्रत्येक बेगमच्या काही दासी. दासींची उन्हात झळाळणारी लाल, हिरवी, पिवळी वस्त्रं. हाता-गळ्यात उन्हानं चमकणारे सोन्याचे दागिने! त्यामुळे या दासी आहेत की राजकुमारी, असा मनात गोंधळ निर्माण होत होता. इतकी वर्षं मोईनुद्दिनच्या जनान्यात मी वावरलो होतो आणि चेहरा बघून दासी आणि मालकिणीला ओळखू शकत होतो, तरीही!

सुलतानाबेगम औरंगजेब बादशहांच्या तिसऱ्या राणी उदयपुरीमहल यांना भेटायला यायच्या. तेही त्यांना भेटीची इच्छा व्यक्त करणारा निरोप पाठवल्यानंतर. बादशहांच्या जनानखान्यात प्रवेश केल्यानंतर मला माहिती समजली ती अशी,

उदयपुरीमहल या मूळच्या गुर्जरस्थान देशातील गुलाम झालेली मुलगी. आधी त्या औरंगजेबाच्या दारा शुको या थोरल्या भावाच्या जनानखान्यात होत्या. राज्याधिकाराच्या डावपेचांमध्ये जिंकल्यानंतर औरंगजेबाने त्याच्या जनानखान्यातील अशा सुंदर स्त्रियांना आपल्या जनानखान्यात आणून प्रेमाच्या पाशात गुंतवून ठेवलं म्हणे! महलनींही प्रसंगाचा रोख ओळखून आपल्या मनातली प्रेमाची मूर्ती बदलली. आजही बादशहा आपला कुठलाही शब्द खाली पडू देत नाहीत, असे त्या सांगत होत्या. अधूनमधून दारूचं प्रमाण जास्त होऊन बादशहा आणि इतरांना अवघड वाटण्यासारखं वागणं झालं तरी, स्वत: दारूला स्पर्शही न करणारा बादशहा तिला शिक्षा न करता उदारपणे वागत असल्याचं मीही पाहिलं होतं.

वरिष्ठांना भेटायला जाताना आपल्या आणि त्यांच्या मानमरातबाप्रमाणे काही ना काही भेटवस्तू घेऊन जाणं हा मोगल आणि त्यांच्या पूर्वजांचा रिवाज होता. वरिष्ठही निरोप देताना तशीच एखादी भेटवस्तू देत. प्रत्येक भेटीच्या वेळी सुलतानाबेगम हिरे, माणकं, मोती, पोवळी जडवलेले सोन्याचे हार उदयपुरीमहलना नजर करायच्या. पण कितीही मौल्यवान दागिना दिला तरी, बिनलग्नाच्या असल्या तरी राणीपेक्षही प्रतिष्ठित स्थान असलेल्या बादशहाच्या लाडक्या राणीच्या दृष्टीनं कमीच ठरणार तो! एकदा असेच भेटीसाठी गेलो असताना, खोलीबाहेरच मी उभा होतो. मला आत बोलावून त्यांच्यापुढे नजर करण्यात आलं. महल म्हणाल्या “आम्ही पाहिलंय.”

सुलतानाबेगम माझ्याकडे वळून म्हणाल्या, “महलसाहिबांशी मी तुझ्याविषयी बोलले. तू त्यांना पसंत आहेस. तुझं सुदैव. तुला मी त्यांना भेट म्हणून दिलं आहे. नेहमी प्रामाणिकपणा आणि निष्ठेनं तू साहिबांची सेवा कर. त्यांनी दिलेलं विषही अमृत म्हणून पिण्याइतकी श्रद्धा मनात असू दे.” महलसाहिबांनीही माझा स्वीकार केल्याप्रमाणे मान लववली. त्यांची मान, कान, नाक, छाती, कपाळ, दंड, हात, बोटं, कंबर अशा प्रत्येक अवयवांवर मोती, रत्नं आणि सोनं याचे दागिने झळकत होते. त्यांच्या त्या मान लववण्यासरशी त्यातले बरेचसे झळाळून उठले.

सुलतानाबेगमना मला महलसाहिबांना नजर करावंसं वाटलं, त्या अर्थी आपण विशेष हिजडा आहोत, ही भावना दोन दिवस मनात होती. मोईनुद्दिनच्या एकसुरी जनानखान्याऐवजी बादशहाच्या विशाल जनानखान्यात आलोय, अशीही भावना मनात होती. तिथे सगळे ओळखीचे होते. प्रत्येक दिवस सारखाच असायचा. ओळखी वाढल्यामुळे दासी-कंचनी यांच्याबरोबर बेगमाही आपल्या मनातल्या गोष्टी सांगायच्या. पण तेच ते, त्याच प्रकारची दु:खं ऐकून कंटाळा येत होता. त्यांचं बोलणं मी संयम ठेवून ऐकून घेत होतो. ते मी इतर कुणालाही सांगणार नाही, असा माझ्यावरचा विश्वासही वाढला होता.

बादशहाचा जनानखाना हा भला मोठा प्रपंच होता. फिरता फिरता रस्ता चुकेल असं जणू भव्य शहरच! पण इथली एक गोष्ट मात्र मला विशेष वाटली. संपूर्ण हिंदुस्थानमधील घडामोडींचं हे केंद्रस्थान होतं. जी काही चर्चा किंवा निर्णय व्हायचे, ते दिवाण-ए-आम आणि दिवाण-ए-खासमध्ये व्हायचे. तिथे घडलेलं अजिबात बाहेर समजू नये अशी कडक व्यवस्था असली तरी तिथली बातमी कशी कोण जाणे, जनान्यात झिरपायचीच. तिथे कुणीही कुणाशी राजकारणावर बोलू नये असा नियम असला तरी काही घोळक्यांमध्ये त्याविषयी कुजबुज ऐकू यायचीच. आणि बघता बघता ती कुजबूज संपूर्ण जनानखान्याच्या कानाकोपऱ्यांपर्यंत जाऊन पोहोचत होती.

७

कदाचित माझंच चुकत असेल म्हणा! बायको म्हटली, की तिनं नवऱ्याचे कपडे धुवून, इस्त्री करून, स्वयंपाक केला पाहिजे किंवा हीच सगळी कामं कुणाकरवी तरी करवून घेतली पाहिजेत. त्याची कामभावना शांत केली पाहिजे, हे मात्र इतरांकडून करवून घेण्याचं काम नाही. कुठलीही बायको यासाठी तयार होणार नाही. पण ही सगळी बायकोचीच कर्तव्यं आहेत, असं का समजावं? दोघंही मिळवते असल्याच्या या दिवसांत त्यानंही स्वयंपाक केला पाहिजे, कपडे धुवून त्यांना इस्त्री केली पाहिजे, असा आग्रह नोकरी करणाऱ्या बायका धरतात. हे सगळं जाऊ दे. अधूनमधून बेंगळुरूला जाऊन त्यांची कामवासना शांत करणं हे जर माझं कर्तव्य असेल, तर त्यानं का अधूनमधून नरसापूरला येऊन जाऊ नये? दाराशी कार आहे अन् दोन तासांचा तर रस्ता आहे.

या खेड्यातल्या वातावरणात त्याचं येणं विसंगत दिसेल, हे कारण पूर्णत: पटण्यासारखं नाही. सुरुवातीला तसं होईलही. पण चार-पाच वेळा तो येऊन गेला, की सगळ्यांनाच त्याची सवय होईल. मला वाटतं, हे तो सांगत असला तरी ते काही खरं कारण नाही. शिवाय इतर भावनिक ओलावा नसताना केवळ त्याच्या वासनेच्या पूर्तीसाठी एक साधन म्हणून मी तिथे जाण्याचा विचार मला तिरस्करणीय वाटतो. त्यामुळे दोन्ही बाजूंनी मिलनातलं माधुर्य वठून गेलंय.

त्याच्या रागाचं कारण, मी त्याच्या हंपीवरच्या डॉक्युमेंटरीसाठी स्क्रिप्ट लिहिलं नाही. एवढंच नव्हे, त्यानं राममूर्तीकडून स्क्रिप्ट लिहवून घेऊन त्यानं बनवलेल्या लघुपटावर मी माझा अभिप्राय स्पष्टपणे कळवला, तोही लिहून! ‘इतर कितीतरी बुद्धिवान कलाकार करतात त्याप्रमाणे तुझा लघुपट Suppressio Veri, Suggestio Falsi – सत्य दडवून असत्य मांडणारी सामान्य कृती झाली आहे. हंपीच्या मूर्ती आणि देवालयं ज्यांनी नष्ट केली आहेत, त्यांनी केवळ याच देशात नव्हे; अफगाणिस्तान, अरेबिया, तुर्कस्तान, इराक, इराण, इजिप्त इत्यादी देशांमध्येही हेच केलं. एकदा नव्हे, शंभरदा नव्हे, हजारो-हजारो वेळा केलं, त्याचा डंका त्यांनीच वाजवला. ते सत्य झाकून तू असत्य मांडलं आहेस. सत्याशी फारकत घेऊन तू सांगशील तसं स्क्रिप्ट लिहायला मी तयार झाले नाही. मला तो व्यभिचार वाटला. राममूर्तींनी तू सांगशील तसं लिहून दिलंय. म्हणजेच तू त्यांच्याकडून हवं तसं लिहवून घेतलंय. ठीक आहे. सरकारकडून तुला भरपूर पैसा मिळालाय. आणखी चार-सहा कामंही मिळाली.’

ते पत्र आवश्यकतेपेक्षा जास्त कठोर झालं का? पण जेव्हा सत्यच स्पष्टपणे सांगायचं असतं तेव्हा आवश्यक आणि अनावश्यक हा प्रश्नच कुठे येतो?

नरसापूरला राहायला आल्यावर वर्षभर मी वृत्तपत्रं पाहातच नव्हते. गावात वृत्तपत्र आणून देणारा एजंट नव्हता. एकदा बेंगळुरूला गेले असता पेपरवर लक्ष गेलं. उत्सुकतेनं शक्य तेवढे सगळे पेपर वाचले आणि चमकलेच. वाटलं, भूतकाळातला इतिहास वाचता वाचता त्यातच मी इतकी बुडून चाललीय, की वर्तमानातील इतिहासाकडे माझ्याकडून डोळेझाक होत आहे. माघारी परतताना मी कुणिगल बसस्टँडवरच्या पेपर एजंटला गाठलं आणि नरसापूरला रोज तीन कन्नड आणि एक इंग्लिश पेपर पोहोचवणं शक्य आहे का, म्हणून चौकशी केली. त्यानं सांगितलं, “नरसापूरचा बसस्टँड हाय न्हवं? तिकडं राजण्णाचं बालाजी हाटेल हाय. तिकडं भ्रमरांबा बसनं पाठवतो की! सकाळी साडेआठला पोचंल.” लगेच त्याला अॅडव्हान्स देऊन मी बस पकडली.

रोज सविस्तरपणे पेपर वाचायला सुरुवात केली तेव्हा एक गोष्ट लक्षात आली. तीन वर्षांपूर्वी रामजन्मभूमीच्या जागेवरील बाबरी मशीद पाडली ही घटना जिवंत ठेवण्यासाठी मुस्लीमांपेक्षा विविध राजकीय पक्ष, साहित्यिक, बुद्धिजीवी आणि कलाकार हीच मंडळी अधिक श्रमताहेत. भारतातील प्रत्येक नागरिकानं आपण प्रतिगामी की पुरोगामी हे सिद्ध करायचा हा कालखंड. पुन्हा त्याच जागी मशीद उभी करण्याला पाठिंबा देऊन स्वत:चं पुरोगामित्व सिद्ध करायची सगळ्यांनाच घाई झालेली दिसत होती. त्या

जागी मंदिर उभारण्याचा विचार मांडणाऱ्यांची ‘रामभक्त’ म्हणून थट्टा करायला सुरुवात केली होती.

एक दिवस सगळ्या कन्नड वृत्तपत्रांमध्ये पहिल्या पानावर एक जाहिरातवजा बातमी झळकली. आतील पानावर तीच बातमी सविस्तर दिली होती. ‘बाबरी मशीद उद्ध्वस्त करून तीन वर्षं झाली तरी आपल्या देशातील शोधखातं आणि न्यायव्यवस्था यांचा दुरुपयोग करून अपराधी राजरोसपणे वावरत असून, कर्नाटकातील साहित्यिक आणि कलावंत याला विरोध म्हणून या वर्षी डिसेंबरच्या सहा तारखेला बेंगळुरूच्या उघड्या रंगमंचावर ‘वीट’ नावाचं नाटक सादर करणार आहेत. प्रख्यात विचारवंत प्रोफेसर राममूर्ती यांचं लेखन, प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक कांतराज हेम्माडी यांचं दिग्दर्शन, तेजनाथ यांचं नेपथ्य, अनुराधा, मीना, वेंकट यासारख्या नामवंत कलाकारांचा सहभाग आणि प्रोफेसर शास्त्री यांचा वैचारिक पाठिंबा...’ अशी सुरुवात करून कला व कलाकाराच्या सामाजिक जाणिवा आणि ऐतिहासिक जबाबदारी या विषयावरील सभेमध्ये प्रा. शास्त्रींनी मांडलेले विचार दिले होते.

विचारवंत राममूर्ती, कांतराज हेम्माडी ही या ग्रुपमधली सगळी मंडळी माझ्या ओळखीचीच होती. मीही या ग्रुपशी संबंधित होते. हिंदू या स्थळाचा ‘रामजन्मभूमी’ म्हणून उल्लेख करून आणि मुसलमान ‘बाबरी मशीद’ म्हणत हा वाद धुमसत ठेवायला मदत करताहेत, हे पटकन माझ्या लक्षात आलं. या विषयावर नाटक सादर करताना कोणतं तंत्र वापरतील आणि कशाकशावर भर देतील याची कल्पना करणं मला अजिबात अवघड नव्हतं. साहित्य, कला, चळवळ, बांधिलकी यांचे परस्पर संबंध अगदी ताज्या, तप्त पार्श्वभूमीवर पडताळून बघून, त्या निमित्तानं मी लिहीत असलेल्या कादंबरीमध्ये– तिला कादंबरी म्हणता येईल, की सरळसोट कथानक म्हणता येईल, हाही एक प्रश्नच आहे म्हणा– व्यक्त होत असलेलं सत्य पुन्हा एकदा पडताळून बघायची ही एक संधी आहे, असं मला वाटलं. शिवाय आमिरलाही भेटून तीन महिने झाले आहेत. तिकडंही फार दुर्लक्ष करून चालणार नव्हतं.

बेंगळुरूला आधी घरी गेले. अमिनाबानूनं सांगितलं, “साहेब नाटकाला गेलेत.” तिनं करून दिलेला चहा-ब्रेड टोस्ट खाताना तिला मी रात्री जेवायला असल्याचं सांगितलं. नंतर ऑटोरिक्षा घेऊन खुल्या रंगमंचापाशी गेले. निम्म्याहून जास्त माणसं जमली होती. त्यापैकी बऱ्याच जणांशी माझी ओळख होती. मी एकटीच एका बाजूला पायरीवर बसून भोवताली पाहत असताना माझ्या शेजारी कुणीतरी येऊन बसलं. मी मान वळवून पाहत असताना तिनं खांद्यावर हात ठेवत “रझिया ना?” म्हटलं. “केव्हापासून बघतेय मी. ओळखच पटेना तुझी. अशी का गं झालीस?”

मलाही ओळख पटली. बी.ई.एस. कॉलेजमध्ये शिकवणारी इंग्लिशची लेक्चरर आणि रंगकर्मी रत्नमाला. माझ्याच वयाची.

“अशी म्हणजे कशी?”

“बंगळुरू सोडून खेड्यात जाऊन राहिलीयस असं समजलं. कशी काय खेड्यात राहतेस, कोण जाणे! मला तर विचारही करणं शक्य नाही. माझं आजोळ खेड्यातच आहे. तिथली धूळ, चिखल, घाण, माशा, अन् टॉयलेटबद्दल बोलायलाच नको. एकदा मी गेले होते, दोन दिवस राहिले होते. टॉयलेट? अशक्य! पोट फुगायला लागलं. शेवटी बेंगळुरूला पळून आले. तू काय करतेयस तिथे?”

“तिथं इतर माणसं राहतात ना, तशी राहते.”

“फक्त टॉयलेटचा प्रश्न नाही गं. तुझे केस बघ कसे झालेत. नीट बॉब केलेला नाही. डाय केलेले नाहीत. चेहऱ्याला किती दिवसांत क्रीम लावलेलं दिसत नाहीय. फेशियल नाही. कशाला तिथे जाऊन पडलीस?”

रत्नमालाचा स्वभाव आधीपासूनच असा बडबडा. प्रश्नाला उत्तर मिळण्याआधीच पुढचे प्रश्न विचारत जाणारी. हे ठाऊक असल्यामुळे मी विचारलं, “या नाटकात तू का भाग घेतला नाहीस?”

“ओह! राममूर्तीचा स्वभाव ठाऊक नाही का तुला? त्याचं न ऐकणाऱ्यांना बाहेर काढतो तो. त्याचं सगळं

ऐकायला मी काय या क्षेत्रात आज पाऊल टाकतेय? आणखी एक गोष्ट. तुला ठाऊकच असेल म्हणा, ती! याचं संपूर्ण दिग्दर्शन तुझ्या नवऱ्याचं आहे. मुसलमानानं दिग्दर्शित केलंय म्हटलं, की अँटी प्रोपोगंडा करतात ना! म्हणून तिथं कांतराज हेम्माडींचं नाव घातलं आहे.”

“या नाटकासाठी पैसा कुठून आला?” मी हलक्या आवाजात विचारलं.

“तू तर आतल्या गोटातली. तुला ठाऊक नाही?”

“आता मी खेड्यात असते म्हणून तूच सांगितलंस ना?”

“म्हणजे आमिरला सोडलंस तू?”

“छे गं! आता मी आतल्या गोटात नाही, एवढाच याचा अर्थ. तुला ठाऊक आहे ना? सांग.”

तिचा हात हातात घेत गुपिताची शपथ घेत असल्याप्रमाणे दाबला.

“या सगळ्या गोष्टी प्रो. शास्त्रींना ठाऊक. त्यांनी काहीही कार्यक्रम ठरवला तरी कुठून तरी पैसा उभा राहतो.”

एवढ्यात नाटक सुरू होत असल्याची सूचना देणारा वाद्यांचा आवाज ऐकू आला. प्रेक्षकांवरचे दिव्याचे झोत मंद होऊन रंगमंचावर उजेड दिसू लागला.

अलीकडे प्रचलित झालेल्या वैचारिक नाटकाच्या तंत्राचा वापर करून हे नाटक लिहिलं होतं. राममूर्ती कधीच सर्जनशील म्हणून मानले गेलेले नाटककार नव्हते. एकीकडे ठरलेला विषय आणि दुसरीकडे नाटकाचं तंत्र घेऊन उत्तम नाटक लिहून तयार होणं शक्य नाही. रंगमंचावर एक इतिहासकार, एक महात्मा गांधी, एक हिंदू मठाधीश, एक स्त्री आणि एक दलित असे पाच जण वकिलाच्या वेशात एका रांगेत उभे होते. न्यायालयात न्यायाधीशांच्या आगमनाची घोषणा होऊन त्यांचं आगमन झालं. ते स्थानापन्न झाले. त्यानंतर त्यांनी आज्ञा दिली, “अपराधींना हजर करण्यात यावं.” रंगमंचावर दुसऱ्या बाजूला लालकृष्ण अडवाणी, मुरलीमनोहर जोशी, उमाभारती, गिरीराज किशोर आणि अशोक सिंघल यांना पोलिसांनी आणून रांगेत उभं केलं. न्यायाधीशांनी पहिला आरोप वाचून दाखवला.

“प्रमुख आरोपी! तू विटेच्या मिरवणुकीद्वारे देशभर प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न केलास. आता बाबरानं उभारलेल्या मशिदीच्या विटा काढून इतिहासाच्या विटांनाही धक्का पोहोचवला आहेस. अशा प्रकारे इतिहासाच्या विटा काढून नवा इतिहास रचणं शक्य आहे? याचं उत्तर देण्यात यावं.”

या अवधीत न्यायमूर्तींच्या मागच्या बाजूला दहा-पंधरा सामान्य माणसं नि:शब्दपणे येऊन उभी राहिली. गुन्हेगारांच्या मागे शेपूट आणि मुखवटे असलेली काही माकडाच्या वेशातली माणसं उभी राहिली.

नंतर हिंदू मठाधीशाच्या वकिलानं आपले आरोप मांडले, “सहनशीलता हे आमच्या धर्माचं वैशिष्ट्य आहे. रामाच्या नावाखाली द्वेष पसरवणाऱ्या तुम्हा लोकांना हिंदू कसं मानायचं? शिवाय प्रत्येकाच्या हृदयात चैतन्याच्या स्वरूपात राहणाऱ्या रामाला भौतिक विटेच्या पातळीवर उतरवण्याचा अधर्म तुम्ही केला आहे.”

त्यानंतर महात्मा गांधींच्या वेषातला वकील म्हणाला, “नथुरामनं माझ्यावर गोळी झाडली, त्या वेळी मी ज्या रामाचं स्मरण केलं, तो माझ्या हृदयातच होता. अशा रामाचं मंदिर उभारून तुम्ही त्याला बंधनात टाकताहात. मला ठार करणारी शक्तिच आता तुमचं रूप घेऊन माझ्या बांधवांचं प्रार्थनास्थळ फोडत आहे. तुम्ही तुमच्या अंतरंगात डोकावून पाहा. क्षमा हीच शिक्षा तुम्हाला योग्य शिक्षा ठरेल. न्यायमूर्तींनी तुम्हाला कुठलीही शिक्षा फर्मावली तरी तुम्हाला क्षमा करावी म्हणून मी सत्याग्रह करेन.”

चौथा क्रमांक स्त्री-वकिलाचा होता.

"तुम्ही तुमच्या धर्माच्या पुनरुज्जीवनासाठी रामाला पुढे करताहात. यामागील कारणमीमांसा भारतातील जागरूक स्त्रीच्या लक्षात आली आहे. पातिव्रत्याच्या नावाखाली सीतेवर रामाने केलेला अन्याय ही संस्कृती असेपर्यंत असाच पुढे चालत राहील. या राम-संस्कृतीचा नाश केल्याशिवाय महिला बंधमुक्त होऊ शकणार नाहीत, अशा भूमिकेनं देशातील निम्मी लोकसंख्या उठून विरोध करत असताना तुम्ही या जनतेवर पुन्हा तीच संस्कृती लादू पाहत आहात. हिंदू स्त्रीनं जेवढा अन्याय सोसला आहे, तेवढा जगातील इतर कुठल्याही समाजातील महिलेनं सोसलेला नाही. यावर उत्तर द्या."

यावर नाटकातील सर्वसामान्य माणसं 'हियर' 'हियर' म्हणू लागली. न्यायमूर्तींनी टेबल वाजवून बजावलं, "शांत राहा! हे न्यायालय आहे."

शेवटी दलित वकील पुढे होऊन बोलू लागला, "शूद्रानं तपश्चर्या केली म्हणून त्याला ठार करणाऱ्यांना पाठिंबा देणाऱ्या रामाचं मंदिर बांधून, तुम्ही परकीय या देशाच्या मूळ रहिवाशांना– दलितांना आणखी तुडवत राहायची संस्कृती पुढे चालवत ठेवण्याची योजना आखत आहात. हा माझा आरोप तुम्ही खोडून दाखवा."

आरोपींची सगळी उत्तरं चाचरत, विनोदी वाटून हशा निर्माण करतील अशा प्रकारे लिहिली होती. ते चाचरू लागले, की नाटकातले प्रेक्षक तिरस्कारानं खदाखदा हसत. उमाभारतीही नेहमीच्या रागीट पद्धतीनं उत्तर देत असताना स्त्री-वकील मधेच म्हणाली, "एक स्त्री असून तू स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या रामाला कसा पाठिंबा देतेस?"

नाटक बघता बघता मला उबग आला. तीन वर्षांपूर्वी कदाचित अशा नाटकाचं मीही कौतुक केलं असतं. कदाचित दिग्दर्शनही केलं असतं, त्यात अभिनयही केला असता. पण तेव्हाही मी एवढ्या कच्च्या तंत्राचा तिरस्कारच केला असता. आता तर बघणं अशक्य वाटून चार-सहा वेळा उठून निघून जावंसं वाटलं, तरीही कंटाळ्यापुढे हार मानायची नाही या हट्टानं तशीच बसून राहिले. शेवटी प्रेक्षकांमध्ये कोण कोण आलंय, हे पाहत मी माझा जीव रमवू लागले.

प्रो. शास्त्री कुठेही दिसले नाहीत. हेही नेहमीचंच आहे म्हणा! स्वत: उभं राहून सगळं घडवून आणायचं, पण असल्या किरकोळ कार्यक्रमामध्ये स्वत: हजर राहायचं नाही. खाली चार रांगा सोडून, उजवीकडे आमिर बसलाय. त्यानं मागे वळून बघितलं तरच मी त्याला दिसेन. तेही नीट निरखून बघितलं तर. नाही तर तो मला ओळखणारही नाही. नाटक संपल्यावर त्याच्याबरोबरच घरी जायचं ठरवून मी पुन्हा नाटक पाहण्याचा प्रयत्न करू लागले.

स्टॅलिनच्या राजवटीत ज्याप्रमाणे आरोपींना सादर केलं जायचं; त्या पद्धतीनं मुरलीमनोहर जोशी, उमाभारती पश्चातापदग्ध होऊन भुईसपाट झाल्याचं दाखवत नाटक संपलं. नाटकातल्या प्रेक्षकांबरोबरच इतर प्रेक्षकांनीही मोठाच विजय झाल्यासारखा टाळ्यांचा कडकडाट केला. प्रेक्षकांपैकी काही जणांनी आमिरला घेरून अभिनंदन करायला सुरुवात केली. त्याच उन्मादात असलेल्या आमिरला माझी पटकन ओळख पटली नाही. ओळख पटल्यावरही त्याच्या चेहऱ्यावर हसू दिसलं नाही. मीच सांगितलं, "दोघं मिळून घरी जाऊ या." एवढ्यात सात-आठ जणांनी मला घेरून "हे काय, मॅडम? तुम्ही दिसतच नाही अलीकडे. हल्ली बेंगळुरूबाहेर राहताय असं समजलं. खरं?" वगैरे विचारायला सुरुवात केली.

कार चालवताना आमिर गप्पच होता. मलाही काय बोलावं ते सुचलं नाही. घरी गेल्यावर बेसिनमध्ये तोंड-हात धुताना आरशात लक्ष देऊन पाहिलं. रत्नमाला म्हणाली ते खोटं नव्हतं. माझ्या डोक्यावरचे केस सुतळीसारखे राठ आणि करडे झाले होते. चेहऱ्याची त्वचाही रापली होती. खेड्यात राहिलं तरी केस डाय करणं किंवा दिवसातून दोनदा चेहऱ्याला क्रीम लावणं काही अशक्य नाही म्हणा. पण त्यात रसच राहिलेला नाही. का? इतिहासामध्ये रस निर्माण होणं आणि नटण्यातला रस नष्ट होणं यांचा परस्परांशी काही संबंध असेल काय?

डायनिंग टेबलावर समोरासमोर बसून जेवू लागलो. त्याच्यासाठी मटणाचा रस्सा आणि माझ्यासाठी डाळीचं सांबार होतं. मीच विषय काढला, “इतक्या वाईट स्क्रिप्टला डायरेक्शन द्यायला तू का तयार झालास?”

हा उत्तर द्यायच्या लायकीचा प्रश्नच नाही, अशा अर्थाची नजर त्यानं माझ्याकडे टाकली.

“तुला विचारतेय मी!” मीही त्याच्याकडे पाहात विचारलं.

“कुठल्या अर्थानं तुला हे स्क्रिप्ट वाईट वाटलं?”

“काय बरं होतं त्यात? ना रचनेचं कौशल्य, ना कथानकात सत्य. या पूर्ण स्क्रिप्टमध्ये बाबरानं बांधलेली मशीद पाडली, एवढंच एकुलतं एक सत्य होतं. मूळच्या हिंदू मंदिराच्या जागी तेच मंदिर पाडून, त्याच दगड-विटांचा वापर करून मशीद उभी केली, हेही तितकंच सत्य आहे.”

“हिंदूंनी मूळचं बौद्ध मंदिर ताब्यात घेतलं, इकडे तिकडे थोडे बदल करून राममंदिर केलं, हेही तितकंच सत्य आहे!” आमिर रागानं उत्तरला.

“हा तुमच्या जे.एन.यू.च्या कॉम्रेड इतिहासकारांनी निर्माण केलेला वितंडवाद आहे. तोच वितंडवाद आजच्या नाटकात कॉम्रेड राममूर्तींनं इतिहासकार वकिलाच्या तोंडी घातला आहे. इतिहास मुळातून न वाचता त्या इतिहासावर कलानिर्मिती करणाऱ्यांपैकी ते एक. गेली तीन वर्षं, दिवसांतले बारा-बारा तास मी इतिहास व त्यावर आधारित ग्रंथ वाचतेय. माझ्या अप्पाजींनी गेली अठ्ठावीस वर्षं अध्ययन करून काढलेली टिपणंही माझ्या आधाराला आहेत. हिंदुस्थान, खुरास्तान, सिंकियांग या सर्व प्रदेशांमध्ये असलेली मूळ बौद्ध देवालयं मुसलमानांनी नष्ट केली असं हु एन त्संगनं लिहिलंय. ठाऊकाय? बुखारा, समरकंद, खोडन, बाल्व, बामियन, काबूल, भज्नी, कंदहार, बेग्राम, जलालाबाद, पेशावर, चरसद्द, ओहिंद, तक्षाशीला, मुल्तान, मीर पुखास, नगरपर्कर, सियालकोट, श्रीनगर, कनौज, श्रावस्ती, अयोध्या, वाराणसी, सारनाथ, नालंदा, विक्रमशील, वैशाली, राजगीर, ओदंतपुरी, छुरहुट, चंपा, पहाडपूर, जगद्दाल, जाजनगर, नागार्जुनकोंडा, अमरावती, कांची, द्वारसमुद्र, देवगिरी, भरूच, वलभी, गिमार, खंभत, पटन, जलोर, चंद्रावती, भिनमल, विद्वान, नागोर, ओसियन, अजमेर, बैराट, ग्वालियर, चंडेरी, मंडू, धार या सर्व ठिकाणची जैन आणि बौद्ध देवळं एकत्रितपणे नाश करणारे मुस्लीमच होते ना? हे सारं कुणा शैवराजानं नष्ट केलं असं सिद्ध करण्यासाठी जे.एन.यू.चा संशोधक एकेक कथा निर्माण करत राहील, नाही का?” सीताराम गोयल यांच्या ‘Hindu Temples : What happened to them? ‘ या ग्रंथाचे दोन खंड गेल्या महिन्यातच वाचल्यामुळे त्यातल्या दुसऱ्या खंडातल्या सदुसष्ठाव्या पानावरच्या ओळीच्या ओळी डोळ्यांसमोर तरळून गेल्यामुळे मी हे बोलल्याचं नंतर जाणवलं.

यावर आमिर काहीच बोलला नाही. बोलण्यासारखं काहीच त्याच्यापाशी नव्हतं. गेली तीन वर्षं मी इतिहासच वाचतेय, असं सांगितल्यावर त्याचा आत्मविश्वास कोमेजून गेल्याचंही मला जाणवलं.

जेवण झाल्यावर टेबल आवरून मी दात घासून अंथरूणावर जाऊन पडले. बराच वेळ झाला तरी आमिर आला नाही. मी आल्यावरही वेगळ्या खोलीत झोपायची ही काही पहिली वेळ नव्हती. मी समजावयाला गेले तरी तो रुसलेलाच असतो. असं झालं की आपल्याला अपमानास्पद वाटतं, हे ठाऊक होतं. तरीही वाटलं, निदान आपण तरी या मान-अपमानाच्या चक्रातून स्वत:ची सुटका करून घ्यावी. तो कुठल्या खोलीत आहे याचा चाहुलीवरून अंदाज घेतला. स्टडीत पाहिलं. तो नव्हता. गेस्टरूमपाशी गेले. दार लोटलेलं होतं. हं! इथे झोपलेला दिसतोय. अजून झोप आलेली नसेल.

काय करावं? दार लोटून आत जावं? त्याला हलवून विचारावं, मी तिथे झोपलेय, तू इथे काय करतोस, म्हणून? नको! सगळ्याचा अर्थ तोच! पुन्हा पेच उभा राहिला. यानं माझा तिरस्कार केलाय आणि मी नि:शब्दपणे याची चाहूल घेत इथपर्यंत आलेय. हेच स्वत:चं अध:पतन आहे. त्याचं लक्ष वेधून स्वत:ला आणखी किती गर्तेत लोटायचं?

मी तशीच माघारी फिरले आणि बेडवर एका कडेला झोपले. रत्नमालानं सांगितलेलं, हात धुताना जे आरशात दिसलं ते आठवलं. त्या कारणासाठी हा असा अलिप्तपणे वागत असेल? चाळीशी उलटलेल्या बायकांचं हे नेहमीचंच आहे. स्वत:ला आकर्षक राखण्यासाठीची ती धडपड, केस डाय करणं, वाढणाऱ्या वजनाच्या बाबतीत विशेष काळजी घेणं, बाथरूममध्येच वजनाचा काटा ठेवणं, दर आठवड्याला पार्लरला जाणं. त्यात मी तर चित्रपटासारख्या प्रदर्शन-कलेशी संबंधित! आणि अचानक सगळी प्रसाधनं सोडून दिली तर? हा स्वत: आकर्षक दिसण्यासाठी विशेष काही करत नाही. बेफिकिरी हेच पुरुषाचं नटणं-मुरडणं का? स्त्रियांना याचंच आकर्षण वाटतं का? पण नवरा-बायकोमध्ये या गोष्टी कशाला हव्यात? बेडरूममधल्या स्निग्ध अंधारात परस्परांच्या सिन्नध्यात अंतरंगातल्या भाव-विचारांची देवाणघेवाण करताना कशाला हवंय हे? तो रुसलाय. मलाच त्याच्यापाशी जाऊन त्याचं समाधान केलं पाहिजे. नवरा-बायकोत कसला आलाय मानापमान?

दार लोटलेलंच होतं. ते ढकलून आत गेले. अंधुक उजेडात तो झोपलेला दिसत होता. आत जाऊन त्याच्या शेजारी बसले. त्याच्या छातीवर हात ठेवत विचारलं, “इथे का झोपलास?”

तो बोलला नाही.

“बोल ना! मला ठाऊक आहे. मी वरचेवर येत नाही, म्हणून तुला राग आलाय ना? अरे, एक संपलं की दुसरं पुस्तक, ते संपलं की आणखी एक, असं माझं सुरूच आहे. शिवाय मी एक कादंबरी लिहायला सुरुवात केलीय. आणखी वर्षभरात माझं वाचन-लेखन संपेल. तोपर्यंत कळ काढ. तू का अधूनमधून येऊन जात नाहीस? तूही कलावंत आहेस. तुला या मूडविषयी मी काय सांगणार?”

तरीही तो बोलला नाही.

“किती रागावणार आहेस? सोड की राग! तूही आता तरुण राहिलेला नाहीस.” म्हणत मी त्याच्या ओठांवर ओठ ठेवून गाढ चुंबन घेतलं. तरीही तो थंडच होता. काही क्षण शांततेत गेले. मग मी स्पष्टच विचारलं, “एवढं रागावण्याचं कारण तरी काय? सांग. माझी काही चूक असेल तर मी सुधारून घ्यायला तयार आहे.”

“अलीकडे तुझा इस्लामवर एवढा का राग आलाय?”

“राग? ज्याला सत्याचा शोध घ्यायचा आहे, त्याला मनात राग किंवा लोभ ठेवून चालणार नाही. तुझी शपथ घेऊन सांगते, माझ्या मनात कुठलाही राग नाही.”

“तर मग फक्त इथं देवळं फोडली, तिथं मूर्ती फोडल्या, या देशात फोडली, त्या देशात फोडली हेच बोलतेयस तू.”

“जर कुणी फोडलेलं नाही असं सिद्ध करून दाखवलं तर तेही मान्य करायला मी तयारच आहे. आम्ही फोडलंय म्हणून मुस्लीम इतिहासकार जागा, संख्या आणि इतर तपशिलासह लिहून ठेवताहेत. भग्नावशेषांचे पुरावे त्या नोंदींशी नीट जुळताहेत. असं असताना, हिंदूंनीच आपापली देवळं फोडली-पाडली, शैवांनी वैष्णवांची आणि वैष्णवांनी शैवांची अशा धडधडीत खोट्या कथा मिर्क्सस्ट इतिहासकारांची गँग रचते आहे. मी तुला पुस्तकं आणून देते. शांतपणे बसून वाच. सगळं वाचायची गरज नाही. मी खुणा करून ठेवते तेवढं वाच. तुलाही सगळं समजेल.”

“नाही! तू मुसलमान-द्वेष्ट्या ग्रुपशी हातमिळवणी केली आहेस. तुझी तिथून बाहेर यायची इच्छा नाही.” म्हणत त्यानं कूस पालटली.

“अरे, असं काय करतोस? द्वेष आणि सत्याचा शोध यामधला फरक समजून घे.”

यावर तो काही बोलला नाही. मी काही वेळ तशीच बसून राहिले. थोड्या वेळानं तो म्हणाला, “मला झोप

येतेय. जा तू!”

त्याची आणखी मनधरणी करायची मला इच्छा झाली नाही.

आम्हा दोघांच्या सहजीवनाचा साक्षीदार असलेल्या पलंगावर झोपलेली असतानाही माझ्या मनात आमिरचे विचार नव्हते. माझं मन ऐतिहासिक कथावस्तूंचा आधार घेऊन साहित्य-रचना करताना आवश्यक असलेल्या सत्यनिष्ठेच्या भानाविषयी विचार करत होतं. आता प्रसिद्धी पावलेल्या टिपू सुलतानच्या जीवनावरील सिनेमा आणि नाटकामध्ये आणि संध्याकाळी पाहिलेल्या ‘वीट’ या नाटकामध्ये काहीच मूलभूत भेद नाही. त्या दोन्ही कलाकृती रचनाकौशल्याच्या दृष्टीनं उत्तम आहेत. पण त्यांनीही ‘वीट’प्रमाणेच कलेला प्रचाराचं साधन बनवलं आहे. साहित्याचा विषय ऐतिहासिक असेल किंवा समकालीन असेल, लेखकाची निष्ठा केवळ सत्याशीच असली पाहिजे. अप्पाजींनी एक विषय धरून केलेलं संशोधन असो किंवा माझ्या लेखनाप्रमाणे कल्पनेवर आधारलेलं असो!

हा विचार मनाशी दृढ होता होता गाढ झोप लागली.

८

खोजा करून मोईनुद्दिनच्या जनान्यात पाठवल्यावर कुणीही मला स्त्री म्हणून वापरलं नाही. त्या दृष्टीनं माझ्यावर होणारे अत्याचार थांबले. खोजा झाल्यावर तसं वापरणं शक्य नाही, असं मला वाटलं होतं. पण ते खरं नव्हतं. वस्तुस्थिती अशी होती, की मोईनुद्दिनना खोजा वापरण्याचा शौक नव्हता. शिवाय तो लहान जनाना होता. बेगमा, कंचनी, दासी सगळ्या मिळून जेमतेम शंभर जणी असतील. याशिवाय इतर सगळे माझ्यासारखे किंवा जन्मजात खोजा. त्यामुळे तिथे असं वापरणारं कुणीही नव्हतं. बादशहाच्या जनानखान्यात गेल्यावर उदयपुरीमहल सरकारांचा माझ्यावर विशेष लोभ बसला.

बादशहांच्या खाशा वर्तुळात तुर्की आणि फारसी भाषांचा वापर होत होता. राज्यकारभाराची भाषा तर फारसीच होती. वझीर, फौजदार, कोतवाल सगळेच अधिकारी त्या भाषेत बोलायचे. सैन्याशी संबंध येत असलेल्या, माहूत आणि शिपायांशी थेट संवाद साधणाऱ्या बादशहांना हिंदुस्थानी भाषा काही प्रमाणात येत असली तरी बादशहांची भाषा फारसी अथवा अरबी. बेगमा आणि कंचनींनी बादशहांशी त्याच भाषेत बोलणं अपेक्षित होतं. इतक्या वर्षांत मला फारसी काही प्रमाणात समजत असली तरी त्यातले बारकावे आणि व्याकरणाची शुद्धता मला उमजत नव्हती. माझं बोलणं ऐकताक्षणी, हा बादशहाच्या गोटातला नाही, नव्यानं धर्मांतरित झाला आहे किंवा हिंदुस्थानी आहे हे लक्षात येत होतं. माझा रंग आणि नाक-डोळे त्यांच्यापेक्षा वेगळे असले तरी कुणीही सहज मान्य करेल असं एक लक्षण माझ्याकडेही होतं. तरीही मी दुसऱ्या दर्जाचा नपुंसक होतो. हिंदुस्थानी मुसलमानांकडे मूळचे अरबी, तुर्की किंवा फारसी तुच्छतापूर्ण नजरेनं पाहत होते. फारसी आणि अरबी उत्तम प्रकारे आत्मसात केलं तरी माझंही स्थान काही अंगुळं वर चढू शकतं, याविषयी मला खात्री होती.

“फारसी, तुर्की आणि अरबी नीट शिकून घे,” असं उदयगिरीमहलनींही मला बजावून सांगितलं. जनानखान्याचे मुख्य नपुंसक अधिकारी नाझरांना सांगून माझ्यासाठी एक शिक्षक ठरवण्यात आले.

हम्दुल्लाह कुफी हे प्रमुख कागदपत्रांच्या कचेरीत अधिकारी म्हणून काम पाहात होते. साम्राज्यातील सगळ्या सुभ्यांकडून राजधानीकडे येणाऱ्या माहितीची इथे छाननी होऊन त्यातली आवश्यक ती माहिती बादशहांच्या नज़रेला आणून देण्यात येत असे. त्यापैकी कुठली माहिती गुप्त ठेवायची, कुठली गुप्त ठेवायची नाही याचा निर्णय करण्यासाठीही इथे पाठवली जात असे. त्या सगळ्या बातम्या त्यानंतर नीट नोंदवून त्यांची रचना करून साठवून ठेवणं हेही इथंच केलं जात असे. त्यामुळे इथे गुप्तता पाळण्याच्या दृष्टीनं अनेक कठोर नियमही होते. त्याचाच एक भाग म्हणजे या कचेरीत परक्यांना प्रवेश नव्हता. या सगळ्या माहितीचा बादशहा आणि त्यांच्या कारकिर्दीचा इतिहास लिहायलाही उपयोग केला जाई. या कचेरीत काम करणाऱ्यांना फारसी, तुर्की आणि अरबीबरोबरच इतिहासाचंही सखोल ज्ञान असणं अत्यावश्यक होतं. तसं पाहिलं तर इथे अधिकारी असलेल्या हम्दुल्लाह कुफींसारख्या भारी विद्वानानं मला शिकवायची गरज नव्हती. पण स्वतः बादशहांची प्रेयसी उदयपुरीमहल यांनी आस्था दाखवल्यामुळे त्यांनी मला शिकवायची जबाबदारी स्वीकारली.

सुरुवातीला महलसरकारांच्या शब्दाखातर त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली असली, तरी लवकरच त्यांचाही माझ्यावर लोभ जडला. कचेरीच्या कामात गुप्ततेचा भाग बराच असल्यामुळे ते मला तिथे शिकवू शकत नव्हते. किल्ल्याबाहेर त्यांचा राहता वाडा होता. जुम्मा मशिदीच्या मागच्या बाजूला. मी त्यांच्या घरी शिकायला जावं, असं ठरवण्यात आलं. त्यांचा राहता वाडाही तेवढाच भव्य होता. भोवताली दोन पुरुष उंचीची तटबंदी, मधे बगीचा. आत गेल्या गेल्या मर्दाना. मधे अंगण, त्याही पलीकडे मर्दानामधून दिसू नयेत अशा प्रकारे असलेले जनान्याचे दरवाजे. मर्दानात कोण आलं, कोण गेलं हे जनान्यात समजायचं कारण नाही. बाहेरून आलेल्याची खात्री करून घेऊन आत सोडायला किंवा बाहेरच्या बाहेर पाठवायला एक जाडजूड खोजा होता.

मदोना विभागात उजव्या बाजूच्या कक्षात माझं शिक्षण चालायचं. साठ-बासष्टीच्या हम्दुल्लांची पहिल्या दिवशी माझ्यावर नजर पडताच त्यांना माझ्याविषयी वाटलेलं आकर्षण मला दिसलं. मनात निर्माण झालेली किळस मी कशीबशी दाबली.

त्यांनी माझी माहिती विचारली. काहीही लपवून न ठेवता मी ती सांगितली. त्यांनीही सांगितलं, “तू आधीच आमचा ज्ञानवंत धर्म स्वीकारला असतास तर तुझ्यावर ही गुलामगिरीची पाळी आली नसती. आताही बादशहासाहेबांची कृपावंत नजर तुझ्यावर पडली तर ते तुला गुलामगिरीतून मुक्त करतील.”

त्यांनी माझ्या मनाला बरं वाटेल असं सांगितलं, पण गुलामगिरीतून मुक्त होऊन मी काय करणार, कुठे जाणार?”

शिकवायला सुरुवात करण्याआधी तिथे मला मिठाई आणि सरबत देण्यात येई. शिकवणीचे पाच-सहा दिवस झाल्यावर एक दिवस त्यांनी माझ्या मस्तकावरून, खांद्यावरून, पाठीवरून हात फिरवला. वरकरणी सित्त्वक दिसणाऱ्या या म्हाताऱ्यालाही मला बघताच अशी भावना निर्माण व्हावी? माझ्या मनात तिरस्कार दाटला. पण त्यांच्या किंचित पाणावलेल्या नजरेत वेगळेच भाव डोकावले. गोंधळलेल्या, मानसिक अवस्थेत मी त्यांच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलं. त्यांचं तिकडे लक्ष नव्हतं. स्वत:च्या मनाला आवर घालत त्यांनी विचारलं, “तू तुझे आई-वडील, तुझा जन्म याविषयी सांगितलंस, ते सगळं खरं का?”

मला त्या प्रश्नाचा अर्थ समजला नाही. माझ्या चेहऱ्यावरचा गोंधळ पाहून त्यांनी पुन्हा विचारलं, “तू तुझ्या आई-वडिलांचा सख्खा मुलगा ना? की पाळलेला? त्यांनी कुठेतरी सापडलेला मुलगा स्वत:चा म्हणून पाळला आणि युवराज म्हणून राज्यावर बसवला का? की कुणी दत्तक दिला? हिंदूंमध्ये दत्तकाची पद्धत आहे हे मला ठाऊक आहे.”

“तुम्हाला ही शंका का आली, उस्तादजी?” मी विचारलं.

“आधी माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. पवित्र कुराणाची शपथ घेऊन!”

“पवित्र कुराणाची शपथ! आई-वडिलांचा मी सख्खा मुलगा. त्यांना दत्तकच घ्यायचं असतं तर त्यांनी माझ्या काकांच्या मुलाला किंवा थोरल्या बहिणीच्या मुलाला दत्तक घेतलं असतं. तेच शास्त्रसंमत आहे आणि त्यांनी मला सांभाळलं असतं तर, इतक्या वर्षांत ते कधी ना कधी माझ्या कानांवर आलं असतं.” मी पुन: पुन्हा आठवून सांगितलं. नंतर पुन्हा विचारलं, “ही शंका तुमच्या मनात का आली?”

“जाऊ दे! चल. सुरू करू या शिकवणी.”

आग्रह करून त्यांना सांगायला लावायचा अधिकार मला नव्हता. त्यामुळे मी पुन्हा विचारायचा प्रश्नच नव्हता. महिना गेला. एक दिवस त्यांनी आपण होऊन सांगितलं. त्यांचा एक मुलगा होता. पहिल्या बायकोपासून झालेला. तो सहा वर्षांचा असताना जुम्मा मशिदीला गेले असता तिथल्या गर्दीत तो चुकला. खूप शोधलं, पण सापडला नाही. तो चुकला, कुणी पळवलं की मारून टाकलं, कोण जाणे! त्याचा रंग, नाक, डोळे, चेहऱ्याची, गालाची ठेवण थेट माझ्यासारखी होती म्हणे. तो असता तर माझ्याच वयाचा झाला असता. मुलगा गेल्याच्या दु:खानं आई झिजून मरण पावली. दुसरं लग्न झालं, मुलंही झाली; तरी त्या मुलाची आठवण त्यांच्या मनात तशीच सल बनून राहिली होती. कधी ती आठवण झोपेतही व्याकुळ करते. हे दुसऱ्या बायकोला लक्षात आलं, की ती वेडेवाकडे आरोप करत राहते. “तो मुलगा जिवंत असता तर तुझ्यासारखा दिसला असता, हे जर तिला कळालं तर ती तुला विष द्यायलाही मागे-पुढे बघणार नाही. त्यामुळे हे सारं तुझ्यापाशीच राहू दे.” असं सांगून त्यांनी मला सावध केलं.

बादशहा औरंगजेबांचे वडील शहाजहान बादशहा मरण पावल्याची बातमी बघता बघता जनानखान्यात पसरली. राज्यकारभाराच्या संबंधात तिथे काहीही मोकळेपणानं बोलायची सोय नव्हती. पूर्वीच्या बादशहांचा मृत्यू ही राजकीयदृष्ट्या साधीसुधी गोष्ट नव्हे, त्याच्याशी संपूर्ण हिंदुस्थानच्या राजकारणाचा संबंध होता.

औरंगजेब बादशहांनी आपल्या वडिलांना युद्धात हरवून आग्र्याच्या त्यांच्या किल्ल्यातच त्यांना बंदिवान करून ठेवलंय, आपल्या तीन भावांना गैरमार्गानं मारलंय. त्यातही एकाला फसवून बंदिवान केलं, अफुचं व्यसन लावलं आणि त्यानंतर थोडं थोडं विष देऊन अखेर मारून टाकलंय. वडिलांना मात्र ठार न करता गेली आठ वर्षं बंदिखान्यात ठेवलं होतं. आता ते वृद्धापकाळानं आपोआप मरण पावले आहेत. या सगळ्या बातम्या एकेक करून, तुकड्या-तुकड्यानं माझ्या कानावर आल्या.

मला त्या संपूर्ण वातावरणाविषयी मनात भय वाटलं. पाठोपाठ कुतूहलही वाटलं. एक दिवस हम्दुल्लांना मी दबकतच विचारलं, आमच्या शिकवणीच्या खोलीतच नव्हे, संपूर्ण मर्दानामध्ये कुणी नसताना विचारलं, “शहाजहान बादशहा आग्र्याच्या किल्ल्यात परमेश्वराच्या सान्निध्यात निघून गेले असं समजलं...”

हम्दुल्लांनी मला दुरुस्त करत म्हटलं, “बादशहांचा उल्लेख नेहमी त्यांच्या बिरुदासह करायचा असतो. अजून त्यांना स्वर्गारोहणानंतरचं बिरुद देण्यात आलेलं नाही आणि ते देण्यात येईल की नाही, कोण जाणे!”

“म्हणजे काय? मला नाही समजलं.”

“बादशहा स्वर्गस्थ झाल्यानंतर पुढील बादशहा त्यांना एक बिरुद देतात. त्यानंतर प्रत्येक ठिकाणी त्यांचा त्या बिरुदासह उल्लेख केला जातो. प्रजाजनांनीही तसाच उल्लेख करणं अपेक्षित आहे. नाही तर बादशहांचा अपमान केल्याबद्दल होणाऱ्या शिक्षेला सामोरं जावं लागतं.”

“या आधीच्या बादशहांची बिरुदं कोणती होती?” या विषयावर बोलण्याची संधी मिळाल्याच्या समाधानात मी विचारलं.

“हिंदुस्थानात मोगल साम्राज्याची ज्यांनी स्थापना केली त्या जहीरूद्दिन बाबर बादशहांना ‘फिर्दोसमकानी’, त्यांचे पुत्र हुमायून यांना ‘जन्नत अश्यानी’, त्यांचे पुत्र जलालुद्दिन अकबर यांना ‘अर्ष अश्यानी’, त्यांचे पुत्र सुलतान नुरुद्दिन जहांगीर यांना ‘जन्नत मकानी’, शहाजहानना अजून बिरुद दिलेलं नाही. देतील की नाही, कोण जाणे!”

“का बरं? अशी शंका वाटायला कारण?” मी आर्त स्वरात विचारलं. त्यांनी उत्तर दिलं नाही. मी म्हटलं, “पवित्र कुराणाची शपथ घेऊन सांगतो, तुम्ही सांगितलेलं इतर कुणाच्याही कानांवर जाणार नाही.”

हम्दुल्लासाहेब काही क्षण गप्प बसले. त्यांनी एकदा माझ्या विश्वासार्हतेचा अंदाज घेतला. त्यांची लांबलचक बोटं शुभ्र दाढीतून काही क्षण फिरली. नजर इतिहासात रुतल्याप्रमाणे दूर कुठेतरी खिळली. नंतर ते सावकाश सांगू लागले, “तुला काहीही ठाऊक नाही, यावर माझा विश्वास नाही. काही माणसं, दाराची माणसं, बादशहाचं ज्यांना पटत नाही ती माणसं काही ना काही कुजबुजत असतात. अर्थात हे बादशहांनाही ठाऊक आहे. पण मोहिमुद्दिन महंमद औरंगजेब बादशहा जे काही करतात, ते मुसलमान धर्मासाठी करतात, हे प्रत्येक सच्च्या मुसलमानाला ठाऊक आहे. उलेमांनी तर पहिल्यापासून त्यांना पाठिंबा दिलाच आहे. सिंहासनाच्या झगड्यात ते जिंकले नसते तर इस्लामची शुद्धता नष्ट झाली असती. एवढंच नव्हे, हिंदुस्थानात काफीर, धर्मभ्रष्ट, जिमींचं वर्चस्व झालं असतं. बघता बघता इस्लाम अदृश्य झाला असता. पण इस्लाम हा अदृश्य होऊ शकेल, असा धर्मच नाही. म्हणूनच मोहिमुद्दिन महंमद औरंगजेब आलमगीरांचा विजय होऊन ते सिंहासनावर बसले.”

“या झगड्यावर थोडा आणखी प्रकाश टाकण्याची कृपा व्हावी, उस्तादजी!”

“हं! ते संदर्भ येईल तेव्हा सांगेन. आता हा दारा! कसला माणूस तो! त्याचा पणजा अर्ष जलालुद्दिन अकबर बादशहा हा त्याचा आदर्श. या मोगल साम्राज्यात आधीपासूनच एक गट आहे. अकबर बादशहाची वाह वाह करायची, त्यालाच आदर्श बादशहा म्हणायचं. सगळ्या धर्मातले भेद बाजूला सारून समान मुद्द्यांचा शोध घेऊन, त्यांचं पालन करू या म्हणायचं. फिरंग्यांबरोबर बायबलवर, फारसींबरोबर झेंड आवस्तावर, यहुदींबरोबर ताल्मुदावर आणि हिंदूंबरोबर वेदान्तावर चर्चा करायची. या देशाच्या प्रमुख लोकसंख्येचा धर्म,

वेद आणि जेत्यांचा धर्म इस्लाम यामध्ये समानता शोधून काढायची. कुणीही कुणाचाही धर्म बदलायचा नाही, एखाद्याची इच्छा असेल तर तो पुन्हा मूळ धर्मात जाऊ शकतो, जिझिया कर नाही. हिंदूंच्या तीर्थयात्रोवर कर नाही. हवे ते स्वतःच्या खर्चानं देवळं बांधू शकतील, जुन्या देवळांची दुरुस्ती करू शकतील. एक ना दोन! अरे! बादशहा झालास तरी हे असं वागून तर धर्म कसा शिल्लक राहील? कसा वाढेल? अकबर म्हणजे धर्मभ्रष्ट! हिंदू स्त्रियांशी लग्न केलं, तरी त्या स्त्रियांना हिंदू देवता, अग्नी यांची पूजा करायची परवानगी द्यायची? त्यांना आपापले महाल हिंदू स्थापत्याप्रमाणे बांधायची परवानगी द्यायची? राजकुटुंबातच इस्लाम धर्माची शुद्धता राहिली नाही तर राज्यात कशी राहील? पणजोबाचं हे वेड दाराच्या डोक्यात कुणी भरलं होतं, कोण जाणे! ताल्मूद, सुफी तत्त्वज्ञान, वेदान्त शिकायला सुरुवात केली त्यानं! लालदास नावाच्या हिंदू योग्याकडेही तो जाऊ लागला. सर्मद नावाच्या मुसलमान फकिराकडेही जायचा. जिहादचा प्रश्न आला, की "आपण कुठल्याही धर्माविरुद्ध युद्ध करु नये, कुणावरही जबरदस्तीनं आपला धर्म लादू नये, इतर धर्माच्या लोकांवर जिझिया लादू नये", असलंच सांगत राहायचा. अशा विचाराचा माणूस पुढचा बादशहा झाला तर इस्लामला धोका आहे, असं उलेमानंनी ठरवलं. हे योग्य की अयोग्य?"

मी मान हलवली. ते आवश्यक होतं. नाही तर त्यांनी बोलणं तिथंच थांबवलं असतं.

"एकूण काय, यांना वाटेतच अडवायला आलेला दारा पराभूत झाला. बादशहा शहाजहाननी सगळ्या मुलांना निरोप पाठवले, 'सगळे आग्र्याला या, मी तुम्हा सगळ्यांमध्ये समेट घडवून आणेन.' समजा, यावर विश्वास ठेवून आलमगीर गेले असते तर? तर त्यांच्या तार्तार अंगरक्षकांकडून त्यांचा वधच करण्यात आला असता. औरंगजेब हुशार! ते नाही गेले. वडिलांनी आग्र्याच्या किल्ल्याची दारं बंद करून स्वतःला आत कोंडून घेतलं. किल्ला अत्यंत बळकट. त्याला खिंडार पाडायला वेळ लागला असता. दिल्लीला पळून गेलेला दारा पुन्हा सैन्याच्या जुळवाजुळवीला लागला होता. चलाख आलमगिरांनी बाहेरून किल्ल्यात जाणारं यमुनेचं पाणी बंद केलं. शरण येण्याशिवाय शहाजहान महाराजांपाशी दुसरा उपाय नव्हता. त्याच किल्ल्यात त्यांना बंदिवान करून त्यावर त्यांनी आपला पहारा बसवला आणि ते दाराला धडा शिकवायला दिल्लीकडे वळले. विजयाच्या अर्धवट धुंदीत असलेल्या मुरादला अफु देऊन, त्याच्या जवळच्या माणसांना लाच देऊन त्याला भरपूर दारू पाजली. त्याची शस्त्रं काढून घेऊन त्यालाही कैदेत टाकलं. तिथे आणखी वेगळंच तंत्र वापरलं, काझीकडूनच त्याला मृत्युदंडाची शिक्षा देववली आणि तो काटा काढला. इकडे दाराला राजपुताना, सिंध, कच्छ या भागात पळापळ करायला लावली. शेवटी जेरबंद करून दिल्लीत आणलं. अवमान करून दिल्लीच्या गल्लीबोळांतून मिरवणूक काढली. इस्लामचा अपप्रचार करत होता, असा आरोप ठेवून उलिमांनी त्याला मृत्युदंड ठोठावला. हीही औरंगजेबांचीच सूचना होती, असं म्हणतात. मृत दाराच्या शरीराचे तुकडे करून दिल्लीच्या रस्त्यावरून मिरवत नेले आणि धर्मविरोधी वागणाऱ्याची– मग तो राजघराण्यातला असला तरी काय गत होते हे प्रजेला दाखवण्यात आलं. अशा प्रकारे अकबर बादशहांच्या दुष्ट परंपरेतला शेवटचा धागा नष्ट होऊन आपल्या धर्माचा पाया भक्कम झाला.

त्यानंतर मलाही कुठून कुठून कितीतरी गोष्टी समजू लागल्या. वडिलांना आग्र्याच्या किल्ल्यामध्ये बंदिवान करून ठेवल्यावर मुहिउद्दिन आलमगीर घाझी या बिरुदाबरोबर स्वतःला अभिषिक्त बादशहा म्हणवून घेऊ लागले. हे सारं घाईघाईनं झालं. एवढ्या अवधीत धाकट्या भावाला– मुरादलाही संपवण्यात आलं होतं. इतर दोन्ही भावांनाही संपवण्याची वा पळवून लावण्याची घाई होती. त्या दोघांनी एकत्र येऊन आपल्यालाच संपवू नये, याचीही भीती होती. त्यामुळे मोगल साम्राज्याला साजेल अशा प्रकारे राज्याभिषेकाचा सोहळा करायला सवड नव्हती. तसं पाहिलं तर साम्राज्याची राजधानी आग्रा नगर. तिथं मोठ्या थाटात सिंहासनावरोहण झाल्याशिवाय बादशहा होण्याला पूर्णता नव्हती. किती केलं तरी आग्र्याचं वैभव दिल्लीला नव्हतं. पण जिथं वडिलांना बंदिखान्यात टाकलंय, तिथे हा थाटमाट करणं मनात कुठेतरी खटकत होतं. सगळे सामंत, सुभेदार, इतर देशांचे प्रतिनिधी आल्याशिवाय थाटमाटाला अर्थ नसतो. ते सगळे आले तरी वैभवाचं कौतुक करण्यापेक्षा वडिलांना बंदिखान्यात टाकल्याबद्दल मनातल्या मनात, आपसात हेटाळणी करतील. नंतर आपापल्या देशात जाऊन याचीच वर्दी देतील, याचीही काळजी होती. त्यांनी शहाजहानला विष तर दिलं नसेल? रोजच्या जेवणातून कणकणभर विष दिलं असतं तरी म्हातारा मेला असता. भावंडांना सोडलं तर एक ना एक दिवस ते पुन्हा फणा वर काढतील आणि सिंहासनावर हक्क सांगण्याची शक्यता होती. म्हातारा बाप असं काही करु शकेल, अशी शक्यताच नव्हती. मग उगाच कशाला खून करायचा? औरंगजेब बादशहांच्या

मनात एवढंच होतं, की आणखीही काही होतं, हे कुणालाही समजणं शक्य नव्हतं. पवित्र कुराणाची शपथ घेतल्यावर बाहादर्शनी तरी ते ती शपथ मोडत नव्हते. आजही तेवढं पथ्य ते पाळतात. पण आतल्या आत कट करून ते काय साधतील, याचा अंदाज मात्र आजही कुणी देऊ शकत नाही.

बादशहाही नेहमी दिल्लीत राहायचे नाहीत. युद्धाच्या निमित्तानं ते नेहमी कुठे ना कुठे फिरत असतात, हे जनान्यात दाखल झाल्यानंतर माझ्याही लक्षात आलं होतं. युद्धाला जातानाही त्यांच्याबरोबर छोटा जनाना जायचा हे मलाही ठाऊक होतं. पण आता संपूर्ण जनानाच आग्र्याला निघाला होता. त्याचा आकार आणि प्रवासाची व्यवस्था माझ्या कल्पनेत न मावणारी होती. ती एक चालतीबोलती राजधानीच झाली होती. एक पथक आधी पुढे जायचं. गरजेनुसार डेरे घातले जायचे. जनाना तिथे पोहोचताच दुसरं पथक पुढचं विश्रांतीस्थळ हेरून तिथल्या तयारीला लागायचं. हम्दुल्ला सुफींनीच मला सांगितलं, औरंगजेब बादशहांचा पणजा अर्ष अश्यानी जलालुद्दिन अकबर बादशहांच्या काळी जनाना हलवण्यासाठी शंभर हत्ती, पाचशे उंट, चारशे बैलगाड्या, शंभर पालख्या वाहणारे भोये अशी व्यवस्था होती म्हणे. शिवाय यांच्या रक्षणासाठी पाचशे योद्धे, शंभर शिपाई, रस्त्यातले काटे-कुटे आणि दगडधोंडे हटवण्यासाठी पाचशे माणसं, पाणी वाहून नेण्यासाठी शंभर माणसं, त्याशिवाय वाटेत दुरुस्तीसाठी सुतार, लोहार, चांभार दिवट्या धरण्यासाठी शंभर माणसं, केर काढायला दीडशे माणसं असायची. त्याही वेळी जनानखान्यातल्या मोजक्याच महाराण्या जात. आता तर सगळा जनानखानाच चाललाय! प्रत्येक घोळक्यात दोन हजारांपेक्षा जास्त हत्ती, चार हजार उंट, हजारो शिपाई... मला सगळा हिशेब करणं अशक्य झालं. हम्दुल्लासाहेबांकडेही हा हिशेब नंतर पोहोचता केला जाईल, असं समजलं. त्यातल्या त्यात बरं म्हणजे दिल्ली आणि आग्रा यामध्ये राजमार्ग असल्यामुळे दगडधोंडे, काटे, झुडपं बाजूला सारून रस्ता बनवायची गरज नव्हती. डेऱ्यांमध्येही दिवाण-इ-आम आणि दिवाण-ए-खास लोकांची वेगवेगळी व्यवस्था ठेवलेली असायची. बादशहांच्या विशेष प्रेमपात्रांसाठीही विशेष डेऱ्यांची व्यवस्था केली होती. दहा गज लांब, दहा गज रुंद, चित्राच्या कपड्यांनी शोभिवंत केलेले कप्पे आकर्षक होते. प्रत्येक बेगमला स्वतंत्र कक्ष, जमिनीवर तीन अंगुळ जाड असे गालिचे. आत सोन्या-चांदीच्या धाग्यांनी विणलेल्या आकर्षक वस्तू. शिवाय आतील स्त्री बाहेर कुणाच्याही नजरेला पडणार नाही, अशी रचना. रक्षक, सैनिक व कामाचे नोकर यांपैकी कुणीही जनान्याकडे नजर वळवायची नाही. तशी कुणाला शंका आली तरी आधी चामडी सोलली जायची. नंतर पुढे काय शिक्षा द्यायची याचा विचार केला जायचा.

दोन आठवड्यांनी आम्ही आग्र्याला जाऊन पोहोचलो. जेवढा आकार मोठा, तेवढा वेग कमी!

आग्र्याला आल्यावरही माझा हम्दुल्लांशी संपर्क कमी झाला नाही. माहिती दाखल करून घेणारी कचेरीही तिथेच आली. किल्ल्याबाहेर त्यांच्या गरजेला योग्य असा एक महाल सरकारनं रिकामा करून दिला. त्यांच्याबरोबर फारसी, अरबी, तुर्कीचं शिक्षण तिथेही सुरुच होतं. इथेही मी त्यांच्या महालमध्ये जाऊन त्यांची भेट घेत असे. ते रोज माझ्या डोक्यावरून हात फिरवायचे. एव्हाना त्यांचा माझ्यावरचा विश्वास एवढा वाढला होता, की इतर कुणालाही न सांगितलेल्या कितीतरी गोष्टी ते माझ्या कानात सांगायचे. साम्राज्याच्या कुठल्या कुठल्या भागांमध्ये विरोध उमटतोय, तो खोडून काढण्यासाठी कोणते उपाय वापरले जाताहेत, कुठे युद्ध आवश्यक आहे, कुणाला दलपतीची पदवी देण्यात आली, याविषयीही ते माझ्याशी बोलायचे.

दक्षिणेकडचा कोकण नावाचा भाग. मराठा नावाच्या जमातीचं प्राधान्य असणारा डोंगराळ प्रदेश. तिथला शिवा नावाचा सरदार मोगलांविरुद्ध खड्ग ठोकून उभा राहिलाय, म्हणे! मोगल सैन्याला मैदानावर समोरासमोर भिडायची ताकद त्याच्यापाशी नाही, पण अडचणींच्या वाटेवर विजेच्या वेगानं हल्ला करून मोगल सैन्याकडील संपत्ती लुटून नेण्यात, या सैन्याला पळता भुई थोडी करण्यात तो आणि त्याचे सैनिक वाकबगार आहेत. त्याचं नाव काढताच फक्त मोगलच नव्हे, इतर आजूबाजूच्या प्रांतांमधल्या शिपायांनाही कापरं भरतं. मुसलमानांचं राज्य उलथून हिंदूंचं राज्य स्थापन करणं ही त्याची महत्त्वाकांक्षा आहे. त्यानं सुरतपर्यंत मुसंडी मारून मोगलांच्या रक्षणाखाली समुद्री व्यापार करणाऱ्या, भारी बंदर स्थापून श्रीमंत झालेल्या फिरंग्यांना लुटलं आणि फिरंग्यांच्या दृष्टीतून मोगल निरुपयोगी आहेत, असं दाखवून दिलं म्हणे! विजापूरच्या सुलतानानं पाठवलेल्या अफझलखान नावाच्या अतिप्रसिद्ध सेनाधिकाऱ्याला स्वत: भेटायचं ठरवून वाघनखं नावाच्या लोखंडी हत्यारानं मारलं आणि त्याच्या सैन्याला पळवून लावलं, म्हणतात.

अशा त्रासदायक सरदाराला काहीतरी करून पकडून आणायची, जमल्यास ठार करण्याची जबाबदारी जयसिंह नावाच्या राजपूत सरदारावर सोपवून पाठवण्यात आलं होतं. अंबेरीचा हा राजकुमार. वडील गेले आणि आठव्या वर्षीच त्याला मोगल सैन्यात सेनापतीपद देण्यात आलं होतं. तेराव्या वर्षी तो अंबेरीच्या सिंहासनावर बसला आणि मोगल सैन्याचा भाग म्हणून वावरू लागला, प्रत्यक्ष युद्धात भागही घेऊ लागला. मुस्लीम समाजातच तो मोठा झाल्यामुळे त्याला मुस्लीम रीतिरिवाज, तुर्की-फारसी-उर्दू भाषा, धर्म-कर्म याबरोबरच त्यांचं युद्धतंत्र-राज्यतंत्रही अवगत होतं. औरंगजेब बादशहांचा तर त्याच्यावर अतिशय विश्वास. वयानं त्यांच्यापेक्षा दहा वर्षांनी मोठा. सिंहासनासाठी भावांबरोबर आणि वडिलांबरोबर झालेल्या झगड्यात तो सतत बादशहांबरोबर राहिला होता. त्यामागचं कारण, त्यांच्यावरील ममता? की जर्किणाऱ्या घोड्यामागोमाग गेलं नाही तर तो पायदळी तुडवेल ही भीती? कोण जाणे! हम्दुल्लांनाही कधी समजलेलं नाही.

जयसिंह दक्षिणेकडे गेला. संपूर्ण दक्षिण प्रदेश शिवाच्या विरुद्ध करण्यात यशस्वी झाला. विजापूरच्या आदिलशहालाही सांगितलं, जर शिवाविरुद्ध उठाव करायला मदत कराल, तर दिल्लीदरबारी भरायच्या साऱ्यामध्ये सूट मिळेल. स्वत:चं सागरी सैन्यदळ बाळगणाऱ्या शिवाचा पाडाव केला तर समुद्रावर तुमचंच निष्कंटक राज्य राहील, असं सांगून गोव्यात स्थिरावत असलेल्या पोर्तुगीजांनाही त्यानं आपल्याकडे वळवून घेतलं. दक्षिणेकडील इतर लहानसहान राजांच्या दरबारात असलेल्या ब्राह्मणांमध्ये जयसिंह ब्राह्मण आहे. आपण सगळे उच्चवर्णीय आहोत, तेव्हा त्याचा बंदोबस्त करायला पाहिजे, असा प्रचार केला. याशिवाय पदरी तीन हजार घोडेस्वार असलेला शिवाजीचा सेनापती आत्माजी, त्याचे दोन भाऊ, आणखी एक सेनापती कहार कोळी यांना फार मोठी लाच देऊन प्रत्यक्ष युद्धाच्या वेळी शिवाजीला धोका देण्याचा कट रचला. एकूण पुरंदर नावाच्या किल्ल्यापाशी झालेल्या युद्धात तह करण्याशिवाय शिवाजीपुढे दुसरा मार्गच राहिला नाही. शिवाजीविरुद्ध मोगलांच्या बाजूनं लढले, ते सगळे राजपूतच होते.

तहाच्या वेळीही शिवाजीनं मोगलांवर पूर्ण विश्वास ठेवला नाही. जर शिवाजी शरण आला तर दक्षिणेकडील सगळी देखरेख औरंगजेब बादशहा त्याच्यावर सोपवतील, अशा अर्थाचा मोघम प्रस्ताव जयसिंहानं शिवाजीपुढे ठेवला. औरंगजेबावर विश्वास ठेवू नका, तो दगाफटका करून जीव घेईल, अशी सहकाऱ्यांनी सावधगिरीची सूचना दिली तरी न ऐकता शिवाजी आग्र्याला आला. जयसिंहानं सांगितलेला मानमरातब शिवाजीला आग्र्याच्या दरबारात मिळाला नाही. संतापलेल्या शिवाजीनं दरबारातच चढ्या आवाजात आपला राग व्यक्त केला, म्हणे! बादशहांना राग आला. त्याला काहीतरी करून संपवायचा त्यांनी घाट घातला होताच. आता सरळसरळ कारणच मिळालं. "आता त्याला बंदी बनवून ठेवलं आहे. त्याला कसं संपवतात, ते पाहिलं पाहिजे," असं हम्दुल्लाह म्हणाले.

शिवाजीला पकडल्याची बातमी केवळ जनान्यातच नव्हे, संपूर्ण आग्रा नगरात पसरली होती. भोवतालच्या प्रदेशातही पसरली. त्या शिवाजीला अशा प्रकारे सापळ्यात अडकवणाऱ्या बादशहांच्या मुत्सद्दीपणाचं सगळ्या राजधानीला कौतुक वाटलं. शहाजहान बादशहांकडे हा मुत्सद्दीपणा कुठे होता? दारा, शुजा, मुराद यांच्याकडे होता? अल्लाहची कृपा! समर्थ होता, त्यालाच त्यानं मोगल सल्तनतीवर स्थानापन्न केलं. सगळ्यांनी कृतज्ञतापूर्वक नमाज-पठण केलं.

शिवाला पकडल्याची बातमी मुद्दामच सर्वत्र पसरवण्यात आली. औरंगजेब बादशहांची कीर्ती त्यायोगे आकाशाला भिडेल, म्हणून! त्याचबरोबर 'शिवा'च्या पुढे आदरार्थी 'जी' लावायचं नाही, असाही फतवा निघाला. त्याच्याविषयी अधिकाधिक तुच्छतेनं बोललं जाऊ लागलं आणि लोकांच्या मनात त्याला बघण्याविषयी उत्सुकता वाढू लागली. पण कसं शक्य होणार? त्याला बंदिवासात ठेवलेल्या घराच्या जवळपास फिरताना जरी कुणी दिसला तरी मृत्युदंडाची शिक्षा होण्याची भीती!

याच वेळी अफगाणिस्तानात युसूफ झाय आणि आफ्रिदींचा उठाव झाला होता. तो मोडून काढण्यासाठी डोंगराळ प्रदेशात लढण्याचा अनुभव असलेल्या शिवाला पाठवायचं आणि तिथेच त्याला संपवायचं असं बादशहांनी ठरवलं होतं. म्हणजे सगळा आरोप दंगलखोरांवर टाकता येईल, असा त्यांचा विचार होता. पण नेमक्या याच वेळी शिवा आजारी पडला. अगदी अंथरूणच धरलं. आजारात हा आपोआपच मरून जाईल, अशी बादशहांनाही आशा वाटू लागली. त्यात शिवानं आपल्या मुलखातून आणलेले सगळे अंगरक्षक

आपल्या मुलखात पाठवून दिले. मरू घातलेल्याला काय करायचे आहेत अंगरक्षक घेऊन?

त्या वर्षी उन्हाळा अतिशय कडक होता. कदाचित नेहमीच दिल्लीपेक्षा आग्र्याचा उन्हाळा कडक असावा. सगळ्यांच्या पाठींवर घामोळ्या उठल्या होत्या. उताणं झोपणं अशक्य व्हावं, इतक्या घामोळ्या! जनान्याच्या सगळ्या बाजूंना वाळ्याचे पडदे सोडण्यात आले. दर तासाला त्यावर पाणी ओतून ते ओले केले जाऊ लागले. छतावरील एक हात रुंद आणि तीन हात लांबीच्या वाळ्याचा पंखा गार पाणी मारून सतत ढाळण्यात येऊ लागला. बेगमा आणि त्यांच्या सेवेत असलेल्यांना तिथल्या थंडाव्यामुळे घामोळ्या आल्या नव्हत्या. आल्या तरी लवकर नाहीशा होत. पण हिजड्यांना हे भाग्य नव्हतं. त्यांना उकाड्यातच तळमळावं लागत होतं. त्यातल्या त्यात सुख म्हणजे आग्र्यात प्यायच्या पाण्याची मात्र कधीच कमतरता नव्हती.

उन्हाळा संपून पावसाळा आला. उन्हाळा जेवढा उग्र होता, तसाच पाऊसही आला. पावसाच्या पहिल्या सरी आल्या आणि जनान्यातल्या बायकाही आपापल्या खोल्यांमधून बाहेर आल्या. सगळ्या जणी अंगावरच्या कपड्यांनिशी पावसात भरपूर भिजल्या. इथे पाऊस येण्याआधीच यमुनेत लाल पाणी दिसू लागलं. तीन दिवसांत नदीचा प्रवाह किल्ल्याच्या भिंतीवर येऊन आदळण्याइतका वाढला. यमुना तीच असली तरी आग्र्याचं तिचं रुप दिल्लीपेक्षा अधिक मनोहर होतं.

एक दिवस अचानक बातमी आली. फक्त आली नाही, बघता बघता तिनं सगळं शहर व्यापून टाकलं. पिंजऱ्यातला पक्षी सगळ्यांची नजर चुकवून उडून गेला होता. बादशहांनी वेगानं धावणारे उमदे घोडेस्वार दक्षिण दिशेला रवाना केले होते. पण हाती काही लागलं नाही. आता बंदिवासाच्या पहारेकऱ्यांचे जीव वाचणार नाहीत. वाटलं होतं त्यापेक्षा हा शिवा अधिक चपळ, चाणाक्ष आणि मुत्सद्दी निघाला होता. बादशहांच्या पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन पळून गेलेल्या शिवाच्या कहाण्या सर्वत्र अधिकाधिक रोचक बनवून परस्परांना सांगितल्या जात होत्या. लोक आपसात बोलू लागले, “जर हा शिवाजी सहीसलामत आपल्या प्रदेशात जाऊन पोहोचला, तर दक्षिण प्रदेश जिंकायचं बादशहाचं स्वप्न कधीच साकार होणार नाही.”

बादशहांचा वाढदिवस आग्र्याच्या दरबारात थाटात साजरा झाल्यानंतर राजदरबार पुन्हा दिल्लीला जायला निघाला. जनान्याचा परतीचा प्रवासही वैभवात झाला. उदयपुरीमहल यांचा माझ्यावर पूर्वीप्रमाणेच जीव होता. मी त्यांच्याशी फारसी भाषेत संवाद करू शकत होतो. त्यांच्या महालाच्या रक्षण विभागात मला छोटीशी बढती देण्यात आली होती. त्यामुळे मला त्यांच्या महालात जास्त वेळ काढायची संधी मिळू लागली. वेगवेगळ्या निमित्तानं मला दिल्लीमध्येच नव्हे, त्यापलीकडे वेगवेगळ्या काळी निर्माण झालेल्या जुन्या शहरातही फिरायला मिळत होतं.

माझ्या लक्षात आलं, दिल्ली हे एक शहर नाही. वेगवेगळ्या पुराण्या दिल्लींचा हा एक समुच्चय आहे. कुठल्याही बाजूला फिरलं तरी कोणता ना कोणता इतिहास सामोरा यायचा. हम्दुल्लांना भेटून त्या प्रत्येक भागाच्या इतिहासाची माहिती करून घ्यावीशी वाटे.

आग्र्याहून परतल्यावर बादशहा राज्यकारभारामध्ये एकेक इस्लाम-तत्त्व आणू लागले. पणजोबा अकबर बादशहांनी त्यांच्या पूर्वजांनी आणलेले कितीतरी इस्लामी कानून सैल केले होते म्हणे. कितीतरी कायदे तर चक्क काढूनच टाकले होते. त्यांचा मुलगा जहांगीर बादशहा वडिलांइतके धर्मभ्रष्ट नसले, तरी ते पूर्णपणे धर्मनिष्ठही नव्हते. हिंदू देवळं आणि मूर्ती पाडून-फोडून त्यावर मल-मूत्र टाकायचे प्रकार काही ठिकाणी त्यांनी केले असले, तरी हिंदू दरबारींचं पद्धतशीरपणे उच्चाटन करून काढून टाकण्याचं काम शहाजहान बादशहांनी मोठ्या प्रमाणात केलं, असं हम्दुल्लांच्या नोंदीच सांगत होत्या. सरकारकडून नवी देवळं बांधणं आणि जुनी दुरुस्त करणं यांचा तर त्यांनी जाहीरपणेच निषेध केला. गोडीगुलाबी, प्रलोभनं, धाकदपटशा अशा विविध मार्गांचा अवलंब करून शहाजहान बादशहांनी आपल्या राज्यात धर्मांतराचं काम सुरूच ठेवलं. जे यासाठी तयार होत नव्हते, त्यांच्याविरुद्ध राजकीय अधिकारांचाही गैरवापर केला जात असे. तीर्थयात्रा करणाऱ्या हिंदूंना विशेष कर भरावा लागू लागला. मुस्लीम धर्माचा खुशीनं जे हिंदू स्वीकार करतील, त्यांना वरच्या हुद्द्यावर नेमण्यात यावं अशी व्यवस्था करण्यासाठी शामीर ला हौरी आणि मोहिद-अली सिंधी

नावाच्या दोन विशेष अधिकाऱ्यांना नेमण्यात आलं होतं. आजोबांनी मनापासून न केलेली आणि वडिलांनी बेशिस्तीनं केलेली इस्लामीकरणाची प्रक्रिया औरंगजेब बादशहांनी एकापाठोपाठ एक वटहुकूम काढून मनापासून आणि शिस्तबद्ध पद्धतीनं पुरी केली.

औरंगजेब बादशहांनी कुराणाचा इतका बारकाईनं अभ्यास केला होता, की त्यातला प्रत्येक बारीकसारीक मुद्दा त्यांच्या जिभेच्या टोकावर होता. त्याचा अर्थ आणि सगळे संदर्भ मनात कुठल्याही प्रकारचा किंतू राहणार नाही, अशा प्रकारे त्यांनी समजून घेतले होते. अल्लाहू हाच खरा राजा आणि या भूमीवर राज्य करणारा राजा हा अल्लाहूचा खराखुरा प्रतिनिधी असून, अल्लाहूच्या धर्माचा प्रचार आणि प्रसार करणं हे त्या प्रतिनिधीचं आद्यकर्तव्य आहे. अल्लाहूव्यतिरिक्त दुसरा देव मानणारा कुणीही राज्यकारभार बघत असेल, तर तो राज्यद्रोह मानण्यात येईल. याहून मोठं पाप नाही. यावर शिक्षा एकच! मृत्युदंड! अल्लाहूच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणं म्हणजे जिहाद. त्याला न मानणारं राज्य (दर्-उल्-हर्ब) त्याला मानणाऱ्या राज्यात (दर्-उल्-इस्लाम) रुपांतरित करण्यासाठी केलेल्या लढ्याला जिहाद हे नाव! युद्ध संपल्यानंतर अल्लाहूला न मानणारे मानणाऱ्यांचे गुलाम होतील. जगातील सर्व जनतेला इस्लाममध्ये आणून इतर वेगवेगळ्या श्रद्धा नष्ट करणं, हेच इस्लाम राज्याचं ध्येय. पवित्र कुराण म्हणतं, "पुण्यमास संपल्यानंतर, अल्लाहूच्या बरोबरीनं इतर देवांना मानणाऱ्यांना तू, ते कुठेही दिसले तरी, ठार कर... पण जर त्यांनी धर्मांतर केलं तर त्यांना त्यांच्या मार्गानं जाऊ द्या." कुराण पुढे सांगतं, "जर ते आपल्या चुकीच्या श्रद्धा पायदळी तुडवणार असतील तर त्यांना क्षमा करायला सांगा. जर ते पुन्हा जुन्या धर्माकडे वळले तर, संपूर्णपणे अल्लाहूचं राज्य येईपर्यंत तुम्ही युद्ध करा."

जो मुस्लीम नाही, त्याला कुठलाही राजकीय हक्क नाही. त्यांना मुस्लीम राज्यात जगायचा हक्कही नाही. त्याला जगू दिलं तरी ते तात्पुरतं असेल. ती स्थितीही गुलामापेक्षा फार वरची नसेल. त्याला जिमी हे नाव. कारण तो राज्यात विशिष्ट जबाबदारीनं (जिम्मा) राहू शकतो. सर्वसाधारण मुसलमानाला असलेला कुठलाही हक्क त्याला मिळणार नाही. शिवाय, त्याला मुस्लीम राज्यात राहायची सूट मिळाल्यामुळे त्यानं त्यासाठी विशेष कर दिला पाहिजे. त्याचं नाव जिझिया. मूळ मुसलमानांना ज्या विशेष भू-कराची सूट दिली गेली, तो भू-क-खरच्- त्यानं दिला पाहिजे. युद्धासाठी केल्या जाणाऱ्या खर्चासाठी आणखी एक प्रकारचा कर दिला पाहिजे. फक्त मुस्लीमच योद्धा होऊ शकेल. जो मुस्लीम नाही, तो सैन्यातली खालच्या दर्जाची कामं करू शकेल. पण तो घोडेस्वार किंवा सेनाधिकारी होऊ शकणार नाही. वागणूक, बोलणं, राहाणं यात त्यानं सतत नम्र राहिलं पाहिजे. चांगलं राहायचं नाही, उत्तम प्रकारे कपडे वापरायचे नाहीत. जवळ शस्त्र बाळगायचं नाही. त्याच्या साक्षीला प्रत्येक मुसलमानाशी नम्रपणे वागलं पाहिजे. त्याच्या साक्षीला न्यायालयात मुसलमानाच्या साक्षीइतकी मान्यता नाही. त्याला जत्रा, उत्सव यात भाग घेता येणार नाही. नवी देवळं बांधायची नाहीत. जुन्या देवळांची दुरुस्ती करता येणार नाही. कंबर वाकवून उभं राहून नम्रपणे जिझिया सुपूर्द केला पाहिजे. पूज्य प्रवाद्यांनी (स) आपल्या अनुयायांना "खऱ्या धर्माचं पालन न करणारे जोपर्यंत आपण होऊन नम्रपणे आणून जिझिया सुपूर्द करणार नाहीत, तोपर्यंत युद्ध करत राहा!" अशी आज्ञाच दिली आहे. (कुराण ९-२९) त्याचा स्वीकार करताना मुसलमानानं उंच जागेवर बसावं. मुसलमानानं खाकरलं तरी जिमीनं नम्रपणे तोंड वासलं पाहिजे आणि मुसलमानानं त्यात थुंकलं पाहिजे. त्यानं किंचितही किळस न दाखवता ते गिळलं पाहिजे. मुसलमानानं मुसलमान नसलेल्याला ठार मारलं तर तो गुन्हा नाही. एकूण काय, हा तीव्र अपमान, अन्याय चुकवण्यासाठी म्हणून का होईना, जिमींनी मुस्लीम धर्म स्वीकारण्यासाठी पुढे यावं.

"त्याच वेळी का केलं नाही? तूच सांग बघू." प्रश्नातच उत्तर दडलंय, अशा अर्थानं ते मंद हसले. तरीही मला उत्तर सुचलं नाही. माझ्याकडे बघून ते त्यांच्या लक्षात आलं. ते म्हणाले, "म्हणून मी नेहमी म्हणतो, इतिहास वाचला पाहिजे. काही संदर्भ इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात सारख्याच पद्धतीनं आलेले असतात. आपल्यापैकीच एक जियाउद्दिन बरनी यानं लिहून ठेवलंय. चारशे वर्षांपूर्वी याच दिल्लीत इल्तमश नावाचा आपला राजा राज्य करत होता. त्या वेळी आपण एवढे प्रबल झालो नव्हतो. आजूबाजूला हिंदू राजे, चंबळच्या दक्षिणेला झांसी, नरवट-ग्वाल्हेरमध्ये परिहार, रणथंबोरमध्ये चौहान, राजपुतान्याच्या नैऋत्येला प्रभावी असलेले जलोर, उत्तरेला यदुवंश, अल्वरचा मार्ग ताब्यात ठेवून असलेले बयाना, थंगीर, अजमेर, दिल्ली ताब्यात ठेवणं कठीण होईल असं करत होते. म्हणजे परिस्थिती कशी होती याची आली ना कल्पना? अशा परिस्थितीत उलेमा सुलतान इल्तमशकडे गेले आणि विचारलं, 'तुम्ही मुस्लीमेतरांविरुद्ध जिहाद का करत

नाही? मुस्लीम व्हा, नाही तर मरायला तयार व्हा, असा का करार घालत नाही? आपल्या धर्माच्या ध्येयधोरणानुसार का राज्यकारभार हाकत नाही?' त्या वेळी सुलतानांनी काय सांगितलं, ठाऊक आहे? 'आता हिंदुस्थानात आपण मुस्लीम लोक भरलेल्या ताटात चिमूटभर मीठ असतं, तसे आहोत. आपण जेव्हा आजूबाजूचे प्रदेश मुस्लीम करू, इथे मुस्लीमांची लोकसंख्या आणखी वाढेल, आपण आणखी प्रबल होऊ, त्यानंतर तुम्ही म्हणता ते शक्य होईल. तूर्त शांत राहा.' हे तुला का सांगितलं? जोपर्यंत आग्र्यात शहाजहान बादशहा जिवंत होते, तोपर्यंत दिल्लीच्या राजकारणावर औरंगजेब बादशहांचा संपूर्ण प्रभाव नव्हता. आता दक्षिणेचा उंदीर पळून गेला असेल, पण दक्षिणेवर आपला प्रभाव आहे. तिथलं सैन्य मोगलच आहे."

"पण जयसिंहासारखे राजपूत आहेत ना!" मी मधेच विचारलं.

"ते कसले राजपूत? फक्त नावापुरतेच राजपूत ते! बादशहांनी राजा म्हणायची कृपा केली तरच ते राजे! अवकृपा झाली की गेलं यांचं राजेपण! आताच्या आता दक्षिणेवर चाल करून जा म्हटलं तर कारण न विचारता त्यांना गेलं पाहिजे. पोटापाण्यासाठी म्हणून सैन्यात असणाऱ्या आणि राजे-सेनापती झालेल्या या असल्या माणसांकडून कधीच कुठलाही धोका नसतो. हा सगळा विचार करून बादशहा तेव्हा गप्प होते आणि हा विचार करूनच त्यांनी आता संपूर्ण हिंदुस्थान इस्लाममय करण्यासाठी दृढ पावलं उचलली आहेत. काहीच वर्षं! नंतर तूच बघशील. गुजरात ते बंगाल, थानेसर ते गोवळकोंडापलीकडे असलेला सगळा प्रदेश... मलाही नीट ठाऊक नाही, सगळीकडे मशिदींचे मीनार आकाशाला स्पर्श करतील. मुश्रिकांच्या देवळांना भुईसपाट केलं जाईल आणि त्यांचे दगड मशिदींच्या मार्गांवर पसरले जातील. आलमगीर बादशहांसाठी स्वर्गातील अतिउन्नत स्थळ राखून ठेवलेलं आहे."

हे सांगताना हम्दुल्लांच्या चेहऱ्यावर धन्यता उमटली होती. जणू ती स्वर्गात राखून ठेवलेली जागा त्यांचीच असावी!

नव्या फतव्याचे दृश्य परिणाम मला पाहायला मिळाले नाहीत. कारण माझा वावर असलेला जनाना आणि दिल्ली शहर त्याआधीच पूर्णपणे मुसलमान झालं होतं.

उदयपुरीमहल कितीही लाडक्या असल्या तरी बादशहांपुढे राजकारणाची अनेक कामं असत. त्यातून सवड होईल तेव्हा इतर बेगमा आणि खुम्मा (रखावी) यांनाही थोडाफार वेळ द्यावा लागत होता. या संदर्भात उदयपुरीमहल साहिबा बादशहांशी भांडायच्या, पण त्याचं स्वरूप लटक्या कलहाचं होतं. त्याहून अधिक तीव्रता त्यात नव्हती. बेगम साहिबांनाही आपण बादशहांशी– त्यातही औरंगजेब बादशहांशी हा लटका कलह करत असल्याचं पुरेपूर भान होतं.

मनोरंजन करून करमणूक करायला कितीही दासी असल्या तरी त्यांना जनान्यातील जीवनाचा अनेकदा उबग येई. त्यामुळे अधूनमधून दरबारातील अमिरांच्या बेगमांपैकी ओळखीच्या कुणाला तरी निरोप पाठवून बोलावून घ्यायची त्यांची पद्धत होती. अशा बेगमा सकाळी येत, दिवसभर थांबून सुखदु:खाची देवाण-घेवाण करत. बादशहांच्या जनान्यांपेक्षा अमिरांच्या बेगमांना बाहेरच्या मुस्लीम समाजाची थोडी जास्त माहिती असे.

एकदा उदयपुरीमहल बेगमनी मला बोलावून दिल्शदखान यांच्या महाली जाऊन शबाना बेगमना दुसऱ्या दिवशी भेटीसाठी यायचा निरोप सांगून यायला सांगितलं. मी शबाना बेगमना पाहिलं होतं. त्यांचा महालही मला ठाऊक होता. तुघलखाबादमध्ये तो होता. पायी अंतर जास्त असल्यामुळे मी घोड्याची मागणी केली आणि ती त्यांनी लगेच मान्य केली. अंतराची कल्पना असल्यामुळे ते स्वाभाविक होतं.

दिल्ली काबीज करणारे जुन्या शहरात न राहता आपल्याला हवं तसं नवं शहर वसवून राहायचे. कारण त्याआधी झालेल्या युद्धात जुन्या शहराची– मग ते मुस्लीम असलं तरी– राखरांगोळी केली जायचीच. भोवताली हवे तितके कोस पसरलेली सपाट जागाही उपलब्ध होती. शिवाय त्याच युद्धात हाती सापडलेले, मजुरीशिवाय राबणारे हजारो-लाखो गुलामही उपलब्ध असायचे. त्यामुळे दिल्लीच्या भोवताली जुनी शहरं पसरली होती. ही जुनी गावं भग्न असली तरी पूर्णपणे निर्जन नव्हती. युद्ध संपल्यावर कितीतरी माणसं आपल्या जुन्या घरांची डागडुजी करून राहत होती. दरबारापासून अंतर ठेवून असलेल्या काही अमिरांनीही

यापैकी जुन्या वाड्यांचं नूतनीकरण करून तिथे राहायला सुरुवात केली होती. नाही तरी भोवतालची वस्ती मुसलमानांचीच असे. जुन्या सुलतानांनी बांधलेली मशीदही जवळपास असे. वरचेवर बादशहांच्या नजरेला पडलं तर ते युद्धावर पाठवतील अशी भीती असे. शिवाय दरबाऱ्यांच्या परस्परांवरील कुरघोड्यांमध्ये सापडू नये, असाही सावधपणाचा विचार त्यामागे असे.

मोगलांच्या दिल्लीमध्ये मी भरपूर फिरलो होतो, फिरत होतो. पण या भग्न दिल्लीमध्ये फिरायची संधी क्वचितच मिळायची. कुतुबमिनार वगळता, तिकडे आवर्जून जाऊन बघाव्या अशा काही वास्तूही नव्हत्या. शिवाय एवढ्या लांब यायचं म्हणजे घोडा हवा. तो मिळायची संधीही क्वचितच उपलब्ध होत असे. अगदी बेगमसाहेबांची आज्ञा असेल तरच मला घोडा मिळायचा.

मला देशी घोडा देण्यात आला. युद्धासाठी सज्ज करण्यात आलेला उमदा अरबी घोडा मला कोण देणार म्हणा! घोड्यावर स्वार व्हायलाही सवय हवी. राजकुमार असताना घेण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा नपुंसक होऊन जनानखान्यात वावरत असताना बऱ्यापैकी विसर पडला होता. आता देशी घोड्यावर स्वार होऊन, वाऱ्यावर केस आणि कपडे उडवत धावताना आनंद होत होता.

अमीर दिल्शदखानांच्या महालाचा मुख्य दरवाजा बंद होता. पण आतला आडणा घातला नव्हता. मी दोन-तीनदा दरवाजा जोरात वाजवला तरी कुणी तो उघडला नाही. या दारामागे बगीचा. तिथून आत गेल्यावर महालाचा पुढचा दरवाजा. मी नपुंसक, शिवाय बादशहांच्या जनानखान्याचा निरोप घेऊन आलेला. त्यामुळे मी धैर्यानं दरवाजा लोटला आणि आत जायला निघालो. त्याच वेळी मुख्य महालाच्या दारातून एक युवती बाहेरचा दरवाजा उघडायला येत असलेली दिसली. डाव्या खाकेत एक मूल होतं. लेहंगा-अंगीया-दुपट्टा. पेहराव मुसलमानी होता, पण खानदानी नव्हे. गुलाम किंवा दासी कुणीतरी असावी. नाही तर ती कशाला महालाचं दार, पुढचा बगीचा ओलांडून दरवाजा उघडायला पुढच्या दरवाजापर्यंत आली असती म्हणा! मर्दानामध्येही कुणी पुरुषमाणसं नसावीत.

माझं तिच्या चेहऱ्याकडे लक्ष गेलं. चेहरा ओळखीचा वाटला. बराच परिचय असला पाहिजे, अशी भावना झाली. पण कुठं पाहिलं असेल? मी तिच्याकडे लक्ष देऊन पाहत असल्यामुळे तीही माझ्याकडे तसंच पाहू लागली, ओळख शोधू लागली. तिला ओळख पटली असावी. तिचा चेहरा खुलला, लाल झाला, काळाठिक्कर पडला. डोळे पाण्यानं भरले. सर्वांगाला सुटलेला कंप माझ्याही लक्षात आला. ओठ दातांखाली दाबत तिनं दुपट्टा सावरला. गर्रकन वळली आणि भेदरलेल्या हरिणीसारखी धावत जाऊन आत दिसेनाशी झाली. तिच्या या अचानक हालचालींमुळे खाकेतलं मूल रडू लागलं. ती धावत महालाच्या कुठल्यातरी खोलीत निघून गेल्याचं दूर जाणाऱ्या आवाजावरून जाणवलं.

ओळख मलाही पटली होती. माझेही हातपाय कापत होते. सर्वांग घामानं थबथबलं होतं. डोकं गरगरू लागलं. उभं राहणं अशक्य होऊन मी जमिनीवर बसकण मारली.

एवढ्यात आतून एक पन्नाशीची दासी आली. तिचाही तसाच वेषा होता. लेहंगा-अंगीया-दुपट्टा. तिनं विचारलं, “कोण? काय पाहिजे?”

“मी हिजडा...” मी कसाबसा बडबडलो.

“ते तर दिसतंच. त्याशिवाय दरवाजा ओलांडून यायचं धैर्य केलं नसतं. काय पाहिजे?”

“उदयपुरीमहल साहिबांनी शबाना बेगम साहिबांसाठी निरोप पाठवलाय. त्यांच्याशी बोलायचंय.”

“आत या.” म्हणत ती मला मर्दाना ओलांडून अंगण ओलांडल्यावर असलेल्या जनानाकडे घेऊन गेली.

निरोप ऐकून शबाना बेगमसाहिबांच्या चेहऱ्यावर धन्यता पसरली. महलसाहिबांचा गुलाम हिजडा म्हणून माझी विशेष खिदमत ठेवण्यात आली. दासीनं सरबत आणून दिलं. जेवून जायचा आग्रह करण्यात आला.

घोड्याला दाणा-पाणी द्यायचीही आज्ञा झाली.

सर्वप्रथम पाहिलेल्या दासीशी भेटून बोलायचं आहे, तिला बोलावून घ्या, असं बेगमसाहिबांना सांगायची तीव्र इच्छा होत होती. पण ती खरोखरच ती होती का? तिच्यासारखीच ही कुणी दुसरी असेल का? नाही. तसं असतं तर हिच्या चेहऱ्यावर मला बघताच इतके विविध भाव एकापाठोपाठ एक उमटले नसते. डोळे पाण्यानं भरले नसते. ओठ चावत अशी पळूनही गेली नसती. जोहार केला ना तिनं? ती कशी इथे जिवंत येईल? ही तिच्यासारखीच दुसरी कुणी नसेल कशावरून?

'वीट' नाटक बघून आल्यानंतर सहा महिने मी बेंगळुरूला गेले नव्हते. औरंगजेब आणि त्याच्या संदर्भातले मूळ ग्रंथ वाचल्याशिवाय माझ्या कादंबरीत वास्तव उतरवणं मला शक्य नव्हतं. तो अभ्यास करून मनात उमटलेलं त्या काळचं चित्रण करत कादंबरी एका टप्प्यावर आल्यावर मी थांबले. बेंगळुरूला जावंसं वाटलं. गेले. आमिरचा राग ओसरला असेल अशा भ्रमात मीही स्वतःला ठेवलं नाही. पण असंच सोडलं तर दोघांमधलं अंतर वाढत जाईल, याचं भान मनाला होतं. आणखी आठ-दहा महिन्यांत लेखन पुरं करून बेंगळुरूला परतेन अशी समजूत काढता येईल असं ठरवलं होतं. त्याचबरोबर यानंतर कधीही हे नरसापूर गाव, हे अप्पाजींचं घर आणि ही अप्पाजींची अभ्यासाची खोली कायमची सोडणं शक्य नाही, याचीही जाणीव मन पुन:पुन्हा करून देत होतं. हेच माझं घर, हेच माझं गाव ही भावना दृढ झाली होती.

बेंगळुरूच्या घरी पोहोचले तेव्हा केरवारे करणारी बाई घरात होती. मी तिची चौकशी केली. नंतर विचारलं, "अमिनाबानू कुठेय? मला भूक लागलीय. तूच काही तरी खायला करशील का?"

"इथे खाणं-पिणं करायचं काहीही सामान नाही. आता साहेब शिवाजीनगरमध्येच राहतात. तिथे जाऊन स्वयंपाकपाणी करायला लांब पडतं. म्हणून अमिनाबानूनं काम सोडलं. हा फ्लॅट स्वच्छ ठेवायला मी अधूनमधून इथलं दार उघडते. इथे कुणीच राहत नाही." तिनं सांगितलं.

मी तिच्याकडे पाहिलं, आणखी काही असेल तर बोल या अर्थानं. तिनं माझी नजर टाळायचा प्रयत्न केला. पण जमलं नाही. मी पुन्हा बजावलं, "सगळं सांग!"

"मला घेऊन काय करायचंय? तुम्हाला ठाऊक असेल असं वाटलं होतं. साहेबांना सांगणार नसाल तर सांगते–"

"तुझी शपथ!"

"साहेबांनी आणखी एक निकाह केलाय. मुलगी शाळेत उर्दूची मास्तरीण आहे. तिच्या वडिलांचं शिवाजीनगरच्या बसस्टँडपुढे फळांचं दुकान आहे. पंचवीस वर्षांची आहे. साहेबांच्या शिवाजीनगरच्या घराजवळचीच."

आत नि:शब्दता दाटून आली. डोकं गरगरलं. सगळ्या मुस्लीम पुरुषंनी आजवर सांभाळून ठेवलेला शरियतमधल्या हक्काचा आमिरनं वापर केलाय! आई-वडील वारल्यावर शिवाजीनगरचं घर त्यानं भाड्यानं दिलं होतं. मल्लेश्वराच्या या वस्तीत हिंदूंचं प्राबल्य होतं, शिवाय भोवताली सुशिक्षित माणसं. इथल्या बहुतेक स्त्रियाही पदवीधर. चित्रपटक्षेत्राशी संबंधित असल्यामुळे सगळे आम्हा दोघांना चांगलं ओळखतात. त्यामुळे याच जागी दुसऱ्या बायकोला आणून ठेवायची लाज वाटली असावी त्याला! कदाचित भीतीही वाटली असेल. काही का असेना, परित्यक्ता असल्याचा भाव मनात दाटून राहिला.

काहीही न बोलता मी वेताच्या खुर्चीवर बसून होते. कामवाली म्हणाली, "मला पुढच्या घरी कामावर जायचंय."

मी उठले, बाहेर आले. याच पावली त्याच्या शिवाजीनगरच्या घरी जाऊन, त्याची कॉलर पकडून जाब विचारावासा वाटला. त्याची सगळी उत्तरं ठाऊक होती. मग गप्प बसायचं? निदान फोनवर तरी दम द्यायला

हवा. डिरेक्टरीवरून नंबर शोधून फोन केला. त्यानंच फोन घेतला.

"आमिर!"

"हं!"

"तू आणखी एक निकाह केलास असं समजलं."

त्यानं उत्तर दिलं नाही. कदाचित लगेच उत्तर सुचलं नसावं.

मी पुन्हा तोच प्रश्न जोरात विचारला. तेव्हा तो उत्तरला, "पण तुला तलाक दिलेला नाही."

याचा अर्थ काय? 'तुला मी सोडलेलं नाही?' की 'आणखी दोन निकाह करायचा मला हक्क आहे?', 'दुसरा निकाह करताना तुला विचारायची गरज नाही?','कुठल्याही क्षणी मी तुला तलाक देऊ शकतो?'

आता मी निरुत्तर झाले. हा माझ्यावरच दोष लादतोय. त्यानं पलीकडे फोन ठेवल्याचा आवाज आला.

शबानाबेगमना काहीही न सांगता, न विचारता मी घोड्यावर स्वार झालो. जोहार करण्याआधीच तिला पकडण्यात आलं असेल का? तसं असेल तर हिच्याप्रमाणेच माझ्या बहिणीला, आईला, आजीलाही पकडून नेऊन कुणा ना कुणाच्या घरी गुलाम, दासी म्हणून... युद्धकैदी म्हणजे... छे:! माझ्यासारख्या पुरुषला ज्यांनी सोडलं नाही ते बायकांना कसे सोडतील? त्यांचा जोहार पूर्ण झाला की नाही याची खात्री करून घेऊन नंतर... पण ते तरी समजून घ्यायचा काय मार्ग होता तेव्हा? त्यांचा जोहार पूर्ण झालाय असं समजून शांत मनानं राहणाऱ्या माझी मलाच किळस आली. आता तरी खात्री करून घेता येईल का? महलसाहिबांना काहीतरी कारण सांगून देवगढला जाऊन आलो तर? किंवा हम्दुल्लांच्या कचेरीत थोडी चौकशी केली तर? कदाचित हम्दुल्लांना उत्तर ठाऊकही असेल. माहीत नसेल तर कागदपत्रं शोधून सांगतील. तिथं सापडलं नाही तर राजपुतान्याच्या सुभेदाराकडून माहिती काढून देऊ शकतील. मला स्वत:चाच राग आला. इतक्या वर्षांत या दृष्टीनं मी का विचार केला नाही? सगळ्या बायका जोहारात आणि सगळे पुरुष युद्धात मरूनच गेलेत असं गृहीत धरून मी राहिलो. का? वस्तुस्थिती काही वेगळी निघाली तर मी सहन करायची नाही, म्हणून?

त्या दिवसापासून मन सैरभैर होऊन गेलं. आत आत खोल जाऊन बसलं. कशातही रस वाटेना. जेवणाची चव कळेना. झोप येईना. यातलं काही हम्दुल्लांशी बोलायचीही इच्छा होईना.

दुसरे दिवशी शबानाबेगम आल्या. दिवसभर राहिल्या. रात्रीही त्यांचा मुक्काम होता. दुसरे दिवशी माघारी गेल्या. जाताना माझ्याकडेही कृपादृष्टीचं हास्य टाकून गेल्या. त्यांच्याशी तिच्याविषयी बोलायची प्रबल इच्छा असली तरी मी ती तशीच दाबून ठेवली. इच्छा दडपून टाकणं हा तर गुलामीचा पहिला नियम, नाही का?

असेच दोन आठवडे गेले. सकाळी माझ्या मालकीण उदयपुरीमहल साहिबांनी बोलावून आदेश दिला, "तुझ्या हातात एक दागिना देईन. घोड्यावरून जाऊन शबाना बेगम साहिबांच्या हाती तो पोहोचवायचा. काम जोखमीचं आहे. त्या दिवशी त्या इथे आल्या होत्या, तेव्हा त्यांच्या गळ्यात होता. मलाही तसाच बनवायचाय. सोनाराला दाखवायला म्हणून ठेवून घेतला होता आम्ही. त्या तर भेट म्हणून द्यायला तयारच होत्या. पण ती गोष्ट आम्हाला शोभणारी नाही. आता याचं काम झालंय. पण ही गोष्ट या कानाची त्या कानाला कळता कामा नये."

मी शब्दांची जुळवा-जुळव करत असतानाच त्या म्हणाल्या, "मीच तुम्हाला निरोप पाठवायचा विचार करत होते. पण विचार पक्का होत नव्हता. त्यात चार दिवस गेले. या निमित्तानं तुम्हीच आलात ही अल्लाहूची कृपा! आमच्याकडची दासी तबस्सुम तुमची बायको होती, असं समजलं. तिच्या पूर्वायुष्याविषयी मला काहीच ठाऊक नव्हतं. आमच्या खानसाहेबांनी तिला विकत आणली, तेव्हा ती सहा महिन्यांच्या मुलाची आई होती.

आम्हा बायकांच्या हातात काय आहे म्हणा! जनान्याच्या सेवेसाठी म्हणून तिला आणण्यात आलं. इथे आल्यावर दोन वर्षांनंतर आणखी एक मुलगीही झाली तिला. आता एक पाच-सहा महिन्यांचा मुलगा आहे. काय करणार आम्ही तरी? सहन केलंच पाहिजे ना! त्या दिवशी तुम्ही महल साहिबांचा निरोप घेऊन आला होता, तेव्हा तिनंच दरवाजा उघडला होता. तुम्हाला बघितल्यावर घाबरून आत धावत आली. आपल्याकडून चूक झाली, नवऱ्याला समजलं तर तो शिक्षा केल्याशिवाय राहणार नाही, म्हणून थरथरत होती. मला यातलं काहीच ठाऊक नव्हतं तेव्हा. महल साहिबांना भेटून मी परतले तेव्हा ही तापानं फणफणली होती. तेही कुणीतरी माझ्या कानांवर घातलं. पण मी तिकडं फारसं लक्ष दिलं नाही. अशा कितीतरी दासी असतात, त्यापैकी कुणाकुणाला काय काय होत असतं. मी सगळीकडे कुठे लक्ष घालणार? पण चार दिवसांपूर्वी हिनं जाऊन मागच्या विहिरीत उडी मारली. परसात काम करणाऱ्या हिजड्यानं बघितलं, पाठोपाठ जाऊन उडी मारली, विहिरीच्या खाचेत पाय अडकवून तिची वेणी धरून ओढलं. त्याही वेळी ती 'मला सोडा! मला मरु द्या' म्हणून धडपडत होती म्हणे. इतरही गुलाम-दासी धावल्या. तिला ओढून बाहेर काढलं. पोटात फार पाणी गेलं नव्हतं. गेलं होतं, तेही बाहेर काढलं. एवढं सगळं घडल्यानंतर मला सगळी बातमी कळली."

मी अवाक होऊन गेलो होतो. काही क्षणांनंतर विचारलं, "मी तिला भेटू? मला तिच्याशी बोलायची संधी मिळेल? कृपा होईल!"

"ठीक आहे. मी करते व्यवस्था. थांबा तुम्ही." एवढं सांगून बेगम बाहेर गेल्या.

थोड्या वेळानं एक पन्नाशीच्या पुढची दासी आली आणि म्हणाली, "महालाच्या उजव्या बाजूला गुरांचा गोठा आहे. चला दाखवते. तिथे थांबा. तबस्सुम तिथे येईल."

मी तिच्या पाठोपाठ गेलो. गोठ्यात गायी एका रांगेत बांधल्या होत्या. समोर त्यांचं खाणं होतं. ते दुधासाठी होतं की मांस जास्त व्हावं म्हणून होतं, ते समजलं नाही. वासरं मात्र नव्हती. त्यांना आणखी कुठेतरी ठेवलं असावं. मी हा विचार करत असताना खालच्या मानेनं लेहंगा-अंगीया घातलेली आणि दुपट्ट्यानं डोकं झाकलेली शामली तिथे आली. जवळ आली तरी तिनं मान वर करून माझ्याकडे पाहिलं नाही. विफल झालेल्या आत्महत्येची काळी छाया तिला झाकोळून टाकत होती. मलाही कुठून बोलायला सुरुवात करावी, हे समजलं नाही. कुठल्याही शब्दात तिची चौकशी केली तरी तिला वेदना होणारच, असं वाटून मी माझी कथा सांगायला सुरुवात केली. "विष्णूमंदिराच्या रक्षणासाठी मला नेमलं होतं. मी रचलेला व्यूह भेदून त्यांनी मला पकडलं. माझ्यापुढेच देऊळ आणि विष्णूची मूर्ती भग्न करण्यात आली. मनसबदारानं मला स्त्रीसारखं स्वत: वापरलं, इतर मित्रांमध्येही वाटलं. आणखी एकानं विकत घेऊन हिजडा करून जनानखान्यात कामावर ठेवलं. मग एका बेगमेनं मला बादशहांच्या बेगम साहिबांना भेट म्हणून दिलं. आता तिथल्या जनान्यात आहे."

माझी हकिकत ऐकताना तिचा चेहरा भावहीन झाला होता. माझं शेवटचं वाक्य संपल्यावर तिनं माझ्याकडे मान वर करून पाहिलं. तिचे डोळे बघता-बघता पाण्यानं भरले. आता मी भावविहीन होऊन तिच्याकडे पाहत होतो.

तिनं विचारलं, "तुमच्याकडे खंजीर होता ना? त्यांनी पकडलं तेव्हा तो का पोटात खुपसून घेतला नाही?"

फारच अनपेक्षितपणे हा प्रश्न माझ्या कानांवर येऊन आदळला. याची मी कणभरही अपेक्षा केली नव्हती.

'माझी निर्भर्त्सना करण्यासाठी ती हे विचारतेय? पण हो, मी का तसं केलं नाही? माझ्याकडे खंजीर होता. एकमेकाला भिडून युद्ध करायचा प्रसंग आला तर उपयोग होईल, या विचारानं मी तो जवळ बाळगला होता. शरण जाण्याऐवजी त्यानंच आत्महत्या करता येईल, हा विचार माझ्या मनाच्या कुठल्याही पातळीवर नव्हताच का? आपण पकडले गेलो तर आपल्या वाट्याला हे असलं बेशरम आयुष्य येऊ शकेल, याचीच कल्पना नव्हती का? होती. तरीही पोटात खंजीर खुपसून घ्यायचा विचार का सुचला नाही? मृत्यूचं भय? आपल्या आपण पोटात खंजीर खुपसून मृत्यूला शरण जायची भीती? की अत्यंत गलिच्छ असलं तरी जगायला तर मिळेल असं वाटणारी जीवनेच्छा? आजवर घडणाऱ्या घटनांचा वेगच इतका होता की याकडे बघणं, त्यावर

विचार करणं शक्यच झालं नव्हतं.'

मी निरुत्तर झालो. तिला काय वाटलं, ते मला समजलं नाही. माझ्यासमोर तीन हात दूर बसून ती म्हणाली, "तुम्ही पोटात खंजीर का खुपसून घेतला नाही, हे मला समजतंय. त्या दिवशी बाहेरच्या बागेजवळ मला बघताच तुमच्या चेहऱ्यावर आधी आश्चर्य उमटलं ना? त्या दिवशी चौकात आग धगधगत होती. सासूबाई, नणंदबाई, आजी सगळ्यांनी त्यात धडाधड उड्या घेतल्या. पाठोपाठ राजकुटुंबातल्या इतर स्त्रियांनीही उड्या घेतल्या. ज्वाळा आणखी आणखी भडकत राहिल्या.

"मी सगळ्यात शेवटी उभी होते. राजघराण्याची सून, युवराज्ञी! खरं तर मी आधी उडी घ्यायला हवी होती. निदान महाराणींचा पदर धरून आगीत शिरायला हवं होतं. आगीत शिरल्यावर वेदना होतील की पटकन जीव जाईल, हे समजेना. काही किंकाळ्या तर ऐकू येत होत्याच. तरीही मन घट्ट करून पुढे सरले. जोहार करायला चालले आहे, जीव 'हर' म्हणजे शंकरापाशीच जाईल या श्रद्धेनं पुढे झाले. पण ज्वाळांच्या झळा अंगावर चाल करून आल्या. सारं अंग होरपळल्यासारखं झालं. क्षणार्धात मी मागे वळले. उन्मादानं माझ्या पाठोपाठ येणाऱ्यांच्या पायदळी सापडले. त्यातूनही स्वत:ला बचावून मी तिथून दूर जाण्यासाठी धडपडू लागले. हातात सापडणाऱ्या शत्रूंच्या स्त्रियांवर अत्याचार करून त्यांना गुलाम बनवलं जातं, म्हणतात. ते खोटं नसेल, कशावरून? अशा स्त्रीकडे बहीण किंवा मुलगी म्हणून बघणारं कुणीच भेटणार नाही, कशावरून? पृथ्वीराजांसारखे क्षत्रिय तसे वागलेही आहेत. यासारखे विचार मनात निर्माण होत होते. जोहारच्या चितेत धडधडून पेटलेल्या देहांवर नजर खिळली होती. मृत्यूच्या समोरचा क्षण एकदा निघून गेला, की पुन्हा मरणं इतकं सोपं नसतं. मरून गेले तर सुटेन, असं वाटणारे कितीतरी प्रसंग समोर येत राहिले. पण मरण्यासाठी निश्चित असे प्रयत्न हातून झालेच नाहीत. पण तुम्हाला बघितल्यावर मात्र मनात निर्माण झालेल्या शरमेनं विहिरीत उडी मारायला भाग पाडलं. पण मेहबूब धावत आला आणि मी नको म्हणत असताना मला वाचवलं त्यानं! पुन्हा अशा निश्चयाचा क्षण कधी येईल कोण जाणे!"

मृत्यूला घाबरून शेवटच्या क्षणी तिनं माघार घेतली, हे ऐकून मला तिचा अजिबात राग आला नाही. सगळ्या स्त्रिया जोहार करून मरून जात नाहीत आणि सगळे पुरुषही हातात तलवार घेऊन 'हरहरठ म्हणत शत्रूवर तुटून पडून मरूनही जात नाहीत. तसं केलं असतं तर एवढ्या मोठ्या संख्येनं गुलाम आणि दासी कसे दिसले असते? शिवाय एवढ्या मोठ्या हिंदुस्थानामधली लक्ष-लक्ष माणसं जिझिया देत का जगली असती? जवळ असलेला खंजीर पोटात खुपसून मीही जीव दिला नाही. म्हणजे मीही तिच्यासारखाच मरणाला घाबरलो. हे सत्य समोर येताच तिच्याविषयी मनात अनुकंपा दाटली.

"पुढे काय झालं, हे मी विचारणार नाही. तुझ्या मनाला क्लेश होतील. तुझ्यासारख्या लक्षावधी युद्धकैदी स्त्रियांची युद्धानंतर काय गत होते हे मलाही ठाऊक आहे. तुला तीन मुलं आहेत असं शबाना बेगमनी सांगितलं. हातातल्या मुलाला त्या दिवशी मी पाहिलं."

"मूल झालं, पण तोही एक अत्याचारच! मालकाचा गुलाम-स्त्रीवर संपूर्ण अधिकार असतो, हे तुम्हालाही ठाऊकच आहे. त्याची इच्छा असेल तर ती नकार देऊ शकत नाही आणि याचा दुसरा परिणाम म्हणजे बेगमांना तिच्याविषयी सवतीमत्सर वाटू लागतो. काही दासींनाही यात असुरी आनंद मिळतो. पण एका राज्याची युवराज्ञी म्हणून मिरवलेल्या माझ्यासारखीच्या दृष्टीनं हा अत्याचारच! मी माझ्याकडून कधीही प्रोत्साहन दिलेलं नाही. उलट भावरहित लाकडी बाहुली म्हणून हिणवून घेतलंय. असं म्हणून का होईना, तो दूर राहू दे, असंच मला वाटत आलंय. पण एक गोष्ट तुम्हाला सांगायला हवी. माझ्या पोटी जन्मलेलं पहिलं मूल तुमचं आहे. माझ्या पहिल्या मालकानं सगळा हिशेब करून मला सांगितलं होतं, हे तुझ्या मुश्रिक दांपत्य जीवनातलं मूल आहे. ते पोटात असताना तू मुस्लीम झालीस, त्यामुळे तेही मुस्लीम झालंय. त्याचं नाव इब्राहिम ठेवलंय."

हे ऐकताच माझ्या छातीत उष्ण रक्तप्रवाह उसळून आला. श्वास रोखायला लावणारा, सहन होईल एवढाच, सुखावह वाटणारा उबदार रक्तप्रवाह. मोईनुद्दिननं माझ्या पौरुषाचा लाकडी चिमट्याच्या चिमटीत नाश केला असला तरी माझ्या रक्ताचा एक कोंब जिवंत आहे! आता तो सहा वर्षांचा झाला असेल. मनानं लगेच

हिशेब केला. समोर तीन हात अंतरावर असलेली शामली माझ्या मुलाची आई आहे, अशी आजवर न जाणवलेली नात्याची मनोहारी भावना मनाला सुखावून गेली. जवळ जाऊन तिच्या मस्तकावरून हात फिरवायची तीव्र इच्छा झाली. पण इथे कुणाची तरी आपल्यावर नजर असणार याची मला खात्री होती. मी नपुंसक असलो तरीही. जनान्याची ती रीतच होती. केवळ मस्तकावरून हात फिरवला, एवढ्याच कारणासाठी मृत्युदंडही होऊ शकेल.

मी विचारलं, “त्याला इथे आणायला जमेल?” सहा वर्षांचा मुलगा म्हणजे कपाळ, नाक, हनुवटी, चेहऱ्याची आणि शरीराची ठेवण साकारली असेल. माझ्याशी नसलं तरी वडील, आजोबा, आई, आजी किंवा तिच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांशी साम्य असू शकेल! किंवा आईसारखा...

माझं तिच्या चेहऱ्याकडे लक्ष गेलं. तिचे डोळे पाणावले होते. “अशा परिस्थितीत मुलाला वडिलांसमोर आणावं लागतंय, याचं दु:ख? आपण आपली दु:खं सोसू शकतो. पण राजकुमार म्हणून ज्याचं पालन-पोषाण व्हायला हवं होतं, त्याला गुलाम आई-वडिलांचं मूल म्हणून वाढावं लागतंय, हे दु:ख असह्य वाटावं असंच आहे. कर्म! दुसऱ्या कुठल्या शब्दांत आपण आपलं समाधान करून घेऊ शकतो?” मी सांत्वन करत म्हटलं.

ती म्हणाली, “फक्त तेवढ्यासाठीच मला दु:ख होत नाही. तुमच्या मुलाला पाहायची इच्छा तुम्हाला होणं स्वाभाविकच आहे. पण माझ्या पोटी त्यानंतरही दोन मुलं जन्मली आहेत. त्यांना पाहायची इच्छा तुम्हाला नाही झाली.”

माझा जीव कासावीस झाला. माझ्या मनात उद्भवलेली सहज भावना तिच्या मनात केवढा कल्लोळ निर्माण करून गेली. एवढी वर्षं सतत जनान्यात राहिल्यामुळे बायकांचा स्वभाव विचित्र असतो हे मलाही ठाऊक होतं. पण या संदर्भात हिच्या मनाचा रोख मी समजू शकलो नाही.

तीच पुढे म्हणाली, “मुस्लीम पद्धतीप्रमाणे निकाह केलेल्या किंवा ठेवलेल्या बाईच्या, दासीच्या, कंचनीच्या पोटी जन्मलेल्या सगळ्या मुलांना सारखाच अधिकार असतो. जन्म देणाऱ्या स्त्रीचं स्थान वेगवेगळं असलं तरी जन्मलेल्या मुलांचं स्थान सारखंच असतं. मुलांच्या आया– त्यातही निकाह करून आलेल्या स्त्रिया मात्र सतत हा भेदभाव करत असतात. शिवाय निकाह करून आलेली नेहमीच मातब्बर घरातून आलेली असते. त्यामुळे जन्मदाताही ठेवलेल्या बाईच्या मुलांवर प्रेम करतोय, हे दृश्य अतिशय कमी वेळा दिसतं. पण चुकून असं झालं तर निकाह करून आलेली बायको अशा मुलांचा जीव घ्यायलाही मागे-पुढे बघत नाही. शिवाय जन्मदाता तरी किती मुलांवर प्रेम करणं शक्य आहे, म्हणा! त्यामुळे त्याच्याही दृष्टीनं, निकाह केलेल्या बायकोचीच मुलं तेवढी आपली. माझ्या मुलांना जन्मदाते आहेत, पण खऱ्या अर्थानं वडील नाहीत. मालकांनी कधी या दोघांना उचलून घेतलं नाही, की लाड केले नाहीत.”

ही गोष्ट मला ठाऊक नव्हती. मनात तीव्रपणे वाटलं, म्हणावं, तिन्ही मुलांना बोलावून आण. पण यालाही काही अर्थ नाही, हेही लक्षात आलं.

अजून हिच्याविषयी मला काय वाटतं, हेच स्पष्टपणे उमजत नव्हतं. मग तिच्या पोटी अत्याचारातून जन्माला आलेल्या त्या मुलांविषयी मला काय वाटतं, हे कुठून उमजणार?

तीच पुढे म्हणाली, “जेव्हा मला समजलं, की थोरला तुमच्यापासून झालाय, तेव्हा मला किती आनंद झाला, ठाऊक आहे? त्यांनी त्याचं नाव इब्राहिम ठेवलं तरी माझं मन त्याच्यासाठी वेगळं नाव शोधत होतं. विष्णूस्वरूपसिंह, नारायणसिंह, उदयभास्करसिंह अशी काही नावं मनात तरळून जात होती. माझी हीन परिस्थिती विसरून त्या बाळावर माया करण्यात गढून जात होते. आश्चर्य म्हणजे पुढे बलात्कारातून जन्मलेल्या मुलांविषयीही मनात तेवढीच ममता निर्माण होत होती. जर यांना मीही जवळ घेऊन कुरवाळलं नाही तर यांना कोण आहे, ही भावना मनात उचंबळत होती.”

मी तिच्याकडे रोखून पाहिलं. त्या दिवशी दुपट्टा सावरत पळून गेलेली ती, आता धीटपणानं मनातलं सत्य सांगत होती.

“याआधी हेही कुणापुढे बोलून दाखवायचा प्रसंग आला नव्हता आणि सांगून कुणाला समजेल, असंही वाटलं नाही. तुम्ही असे अचानक भेटलात. बाई नवऱ्याशिवाय आणखी कुणापुढे तळमळ व्यक्त करेल?” माझ्या नजरेला नजर भिडवून ती म्हणाली.

“शामला, तू भेटलीस. मला नवरा मानून मन मोकळं केलंस. माझ्याही मनात नवा उत्साह उमलतोय. पण वस्तुस्थिती अशी आहे, त्यांनी माझं पौरुष नष्ट करून टाकलंय. ते नसताना, नवरेपणाची भावना कशी निर्माण होईल? शिवाय मी गुलाम आहे. माझ्या मालकानं मला मुक्त करेपर्यंत मी गुलामच! माझ्यासारखे लक्षावधी गुलाम हेच आयुष्य जगताहेत. त्या कुणाच्याही वाट्याला न आलेलं सुटकेचं भाग्य माझ्या नशिबी आहे, असं कसं मानू मी? तुझा मालक तुला मुक्त करेपर्यंत तूही गुलामच आहेस. आज काहीतरी निमित्त घडलं आणि आपण समोरासमोर आलो, एकमेकांशी बोलू शकलो. पुन्हा संपूर्ण आयुष्यात अशी संधी मिळेल याची खात्री नाही. एकदा प्रत्यक्ष डोळ्यांनी तिन्ही मुलांना बघेन आणि निघून जाईन. कारण केवळ भावविवश होऊन काही क्षण जगता येईल. संपूर्ण आयुष्य काढणं शक्य नाही...”

माझं वाक्य अर्धवट असतानाच, मला गोठ्यात सोडून गेलेली दासी धावत येऊन म्हणाली, “अमिरसाहेब परतले आहेत. तुझी चौकशी करत होते. लवकर चल.”

हे ऐकताच शामलीचा चेहरा घाबरा झाला. माझ्याशी एक अक्षरही बोलायचं भान न राहून ती ताडकन उठली आणि भराभरा निघून गेली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत असताना मलाही यानंतर इथे राहण्यातला धोका जाणवला. पटकन उठलो. उदयपुरी साहिबांचं नाव सांगितलं तर धोका नाही. पण गोठ्यात काय करत होतास, म्हणून कुणी विचारलं तर? शिवाय दरवाजाबाहेरच्या एका झाडाला घोडं बांधलंय. जर अमिरांचं तिकडे लक्ष गेलं असेल तर? मनात भीती दाटली असली तरी ती न दाखवू देता मी दरवाजाच्या दिशेनं निघालो.

घोड्यावरून माघारी दौडत असताना दिल्शद खाननं शामलीला एवढ्या आठवणीनं, आल्या-आल्या बोलावल्याचा प्रसंग सारखा मनापुढे येत होता. लांबवरच्या प्रवासावरून आल्या आल्या शामलीची– अजूनही कोवळ्या असलेल्या शामलीची का आठवण झाली असेल ते स्पष्टच होतं. आठवलं, तीन मुलांची आई असली, सहा महिन्यांची बाळंतीण असली, अंगावरचे कपडे अतिसामान्य असले तरी शामली रूपमतीच आहे. क्षणभर वाटलं, दिल्शद खानच्या पोटात खंजीर खुपसून त्याला ठार केलं पाहिजे... मला हजार रुपयांना विकत घेऊन बीज फोडून मला नपुंसक बनवलेल्या मोईनुद्दिन तुरानीच्या छातीत चाकू खुपसून... मन:पटलावर यासारखी चित्रं तरळू लागली.

परतीचा प्रवास असल्यामुळे घोडंही आपल्यापुरतं चाललं होतं.

त्या संध्याकाळी महंमद हम्दुल्लांच्या घरी जायला जमलं नाही. दुसऱ्या दिवशी गेलो, तेव्हा त्यांनी उत्साहानं एक बातमी सांगितली, “बादशहांनी काशीच्या विश्वेश्वर देवालयाचा विध्वंस करण्याचं फर्मान जारी केलं आहे.” हे ऐकून माझ्या मनाला मोठाच धक्का बसला. इतर धर्मीयांच्या देवळांचा नाश करणं हे प्रत्येक मुसलमानाचं– त्यातही प्रत्येक मुस्लीम राजाचं कर्तव्य असतं, हे मला एव्हाना ठाऊक होतं. प्रत्येक मुसलमान राजा, नबाब, सुभेदार आपापल्या राज्यात आपल्याला शक्य असतील तेवढी देवळं भुईसपाट करतात, मूर्ती फोडून टाकतात आणि देवळाचे दगड आणि मूर्ती मशिदीच्या पायऱ्यांसाठी वापरले जातात, हेही ठाऊक होतं. अशा प्रकारे नष्ट केलेल्या देवालयांची संख्या या हिंदुस्थानातच पंधरा-वीस हजारांपेक्षा जास्त आहे, असं स्वत: हम्दुल्लांनीच नोंदी बघून सांगितलं होतं. हिंदुस्थानमध्ये मोगल साम्राज्याची ज्यांनी स्थापना केली, त्या फिर्दोस मकानी जहरौद्दिन बाबर बादशहांनी अयोध्येचं राममंदिर भुईसपाट केलं होतं. उत्तर हिंदुस्थानाच्या काही भागावर राज्य करणारे गझनी, घोरी, गुलाम, तुघलख, निजामशाही, कुतुबशहांनी केलेल्या या धार्मिक कृत्यांविषयी हम्दुल्लांनी विस्तारानं सांगितलं आणि म्हणाले, “या निरंतर चाललेल्या धर्मकार्यात पापी बादशहा अकबर वगळता इतर सर्व राज्यकर्त्यांनी पापी मुश्रिकांची देवालयं नष्ट करून भरपूर पुण्यसंचय केला आहे. बादशहा अकबराचा जीव नरकात सतत तळमळत राहील. आलमगीर बादशहा अत्यंत धर्मनिष्ठ! सत्तेवर पकड येईपर्यंत त्यांनी स्वत:ला कसंबसं रोखलं होतं. आता बघ ना! संधी मिळताच काशीच्या विश्वेश्वर

देवालयाचा विध्वंस करायचं फर्मान काढलंय! यानंतर मुश्रिकांची प्रतिक्रिया बघून ते मथुरेच्या देवळाचा विध्वंस करतील. हा माझा अंदाज खरा ठरेल. बघशील तूही!”

त्या रात्री मला झोप लागली नाही. आमचं रक्षण करू न शकणाऱ्या त्या देवांना सोडून सात वर्षं होऊन गेली. यांनी कुठे कुठे स्थापन केलेल्या प्रार्थनास्थळांवर अजून विश्वास निर्माण झालेला नाही. तरीही ही प्रार्थनास्थळं सगळीकडे मिरवताहेत! त्या देवाची देवळं पाडून त्या भग्नावशेषांच्या आधारे प्रार्थनास्थळं उभारली जात आहेत. बघता बघता नजर जाईल तिथे प्रार्थनास्थळंच दिसतील, याविषयी शंका नाही. मी तर दिल्लीबाहेर फारसा गेलो नाही. हम्दुल्ला म्हणतात, कितीतरी प्रमाणात अज्ञानाचा नाश झाला आहे. पण आणखी कितीतरी नाश होणं आवश्यक आहे. संपूर्ण जग ज्ञानी होईपर्यंत हे कार्य चाललंच पाहिजे. या श्रेष्ठ कार्यासाठी औरंगजेब बादशहा पूर्णपणे उद्युक्त झाले आहेत. आता माझ्या जीवनात या जगात माझ्या अगदी जवळची व्यक्ति म्हणजे केवळ हम्दुल्ला! त्यांच्याइतका ज्ञानी माणूसही जवळपास दुसरा कुणी नाही. संपूर्ण इतिहासाचा तपशील त्यांच्या स्मरणात आहे. कुठल्या राजाच्या कारकिर्दीची सखोल माहिती कुठल्या ग्रंथात नमूद केली आहे, याविषयी बारकाईनं सांगू शकतील असे विद्वान! शिवाय माझ्याविषयी एवढी ममता असणारे! त्यांनी सांगितलंय, त्यात सत्याव्यतिरिक्त आणखी काहीही असायचं कारणच नाही.

काल शामलेला भेटून आल्यानंतर माझ्या मनातली सगळी गृहितं गदागदा हलली होती. आता काशीविश्वेश्वराच्या विध्वंसाचं फर्मान निघाल्याचं ऐकल्यापासून ती माझ्यावर सर्व बाजूंनी प्रहार करू लागली. आता मी ना इकडचा, ना तिकडचा असा होऊन गेलोय! देवगढच्या देवळातला विष्णू भग्न होऊन जमिनीवर कोसळला, धुळीनं माखला आणि माझा त्याच्यावरील विश्वासच नष्ट होऊन गेला. पण शामली भेटली आणि तीव्रपणे लक्षात आलं, तिकडचंही पूर्णपणे सुटलेलं नाही.

१

लक्ष्मी एके सकाळी आपल्या लेखनावरून नजर फिरवत बसली होती. केंचप्पा शेतावर गेला होता. नव्यानं लागलेला गडी गिरियण्णा गोठ्यातलं शेण काढून गोठा साफ करीत होता. या लेखनाला आणखी कलात्मक करायला गेले तर त्यातील सत्याची तीव्रता कमी होईल आणि इतिहासातील सत्याची तीव्रता कायम राखायची असेल तर कलात्मकतेचा मोह सोडायला पाहिजे. यातला कुठला मार्ग आपण धरायचा, या विचारात तिचं मन तळमळत होतं.

अर्थात हा प्रश्न काही अचानकपणे आता उद्भवला नव्हता. या लेखनाची सुरुवात केल्यापासूनच या प्रश्नानं तिला छळलं होतं. अखेर लेखन बाजूला सरून ती उठली आणि शेताच्या दिशेनं चालू लागली.

इथं आल्यापासून हे तिचं रोजचं रूटीन झालं होतं. सकाळी मळ्याकडे, शेताकडे एक चक्कर मारून आल्यावर अंघोळ-नाश्ता करून पुन्हा आपल्या अभ्यासिकेत जायचं, असा तिचा दिनक्रम होता. रोज नारळीच्या रांगांमधून फिरताना कुठल्या झाडावर किती घोस आहेत, कुठल्या घोसांमधले किती नारळ तयार होताहेत, प्रत्येक घोसात अंदाजे किती नारळ आहेत या गोष्टी आपोआप मनात शिरत होत्या. शेताची इतर सगळी कामं केंचप्पा स्वत: उभं राहून करत होता. गरज असेल तेव्हा गडी लावून करवूनही घेत होता. एव्हाना त्या संदर्भात त्याच्याशी विचारविनिमय करण्याइतकी समज तिलाही आली होती.

एकदा सकाळी मळ्यात फिरत असताना गडी गिरियण्णा धावत आला. तो अतिशय उत्तेजित झाला होता. त्यानं बातमी आणली, "तुमचा ल्योक आलाय. पडवीत बसलाय. लक्कव्वांनी मला हाकललं, तुमाला बिगीनं बोलावलंय!"

हे तिलाही अनपेक्षित होतं. तीही काही क्षण उत्तेजित झाली. दोन वर्षं झाली होती नझीरला भेटून! सौदीमध्ये नोकरी करणारा नझीर गेल्या खेपेला आला होता, तेव्हाही ती त्याच्या वडिलांबरोबर राहत नव्हती. तरीही ती बेंगळुरूला आवर्जून जाऊन राहिली होती. त्याला सुट्टी कंटाळवाणी वाटणार नाही, याची तिनं काळजी घेतली होती. आमिरशी तिचं भांडण झालं नसलं तरी तिचं सतत नरसापूरला राहणं आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे वडिलांची ग्रंथसंपदा चाळून काढत इतिहासाचा वेध घेणं यामुळे त्या दोघांमध्ये अंतर निर्माण झालं होतं. तरीही मुलगा सुट्टीवर आला तेव्हा दोघांनीही सूज्ञपणे हे दाखवून दिलं नव्हतं. मुलगा समोर असताना आमिर पत्नीशी गरजेपुरतं बोलत होता. तो नसेल तेव्हा मात्र दोघांमध्ये काहीही संवाद नसे.

'आता नझीर बेंगळुरूत कुठे उतरला असेल? एअरपोर्टवरून सरळ मल्लेश्वराच्या फ्लॅटवरच गेला की काय? की शिवाजीनगरच्या घरी गेला असेल? वडिलांना त्यानं स्वत: येत असल्याविषयी कळवलं असेल का? इथे फोन नाही. पण पत्रही लिहिलं नाही त्यानं येण्याआधी! आपल्या वडिलांनी आणखी एक निकाह केलाय, याविषयी त्याला काय वाटलं असेल?'

या विचारांच्या आवर्तनातच ती घराकडे वळली.

घरासमोर नवी करकरीत हिरवी टोयोटा लक्झरी कार उभी होती. त्यात आधुनिक अरबी दाढी ठेवलेला तरुण ड्रायव्हर बसला होता. लक्ष्मी घराचा उंबरा ओलांडून आत आली. तिथे जाजमावर किब्लादकडे– म्हणजे पवित्र मक्का असलेल्या दिशेला तोंड करून, स्वत:चं जानमाज नावाचं छोटं जाजम अंथरून, त्यावर बसून नझीर नमाज करत होता. अंगावर अरब पद्धतीचा पायजमा, मांडीपेक्षा लांब अंगरखा, दोन अंगुळं लांबीची चमकदार दाढी, दाढीपेक्षा कमी लांबीची मिशी, नेटकेपणानं कापलेल्या काळ्याभोर केसांवर नमाज करताना घालायची पांढरी टोपी. त्यानं तिच्याकडे पाहिलं. पण नमाज करताना मनाची एकाग्रता ढळता कामा नये म्हणून त्यानं नजर पुन्हा किब्लादकडे वळवली.

अभ्यासिकेचा दरवाजा उघडून ती आत गेली. लक्ष्मम्मानं केर काढून खोली स्वच्छ करून ठेवली होती. ती आपल्या लेखनाच्या खुर्चीवर बसली.

थोड्या वेळानं नझीर आपला जानमाज गुंडाळून घेऊन अभ्यासिकेत आला. तिनं त्याला समोरच्या खुर्चीवर खुणेनंच बसायला सांगितलं.

खुर्चीवर बसत तो म्हणाला, "अम्मीजान, नमाज केल्यावर केवढी शक्ति जाणवते, ठाऊक आहे? अल्लाशिवाय दुसरा देव नाही. माणसानं आणखी कुणापुढे डोकं लववायची गरज नाही, असं वाटण्यासारखी शक्ति! आणखी काही करायला जमू दे, नाही तर न जमू दे, दररोज पाचवेळा नमाज केला की पुरेसं आहे. त्यांना जगातली कुठलीही शक्ति हरवू शकत नाही. मी तर कधीही, चुकूनही नमाज चुकवत नाही."

आतापर्यंत तो कन्नड बोलायचा. आई-वडील दोघंही कन्नड रंगकर्मी, चित्रपट कलाकार. मित्रमंडळीही कन्नडच होती. त्याला उर्दू येत होतं, एवढंच. पण आता तो उर्दूमध्ये बोलत होता. अरबी शब्द मुबलक असलेली आणि अरबी व्याकरण आणि उच्चार असलेल्या, अरबी शैलीच्या उर्दूमध्ये. त्यातल्या काही शब्दांचा अर्थ समजला नाही तरी गोळाबेरजेनं अर्थ समजून ती म्हणाली, "प्रार्थना माणसाला शांती मिळवून देते. अहंकार नष्ट करून नम्र बनवते. इतर कुठल्याही देवांपुढे डोकं झुकवायचं कारण नाही, ही भावना बलिष्ठ होत असेल तर अहंकार वाढलाय, असा अर्थ नाही का होणार?"

त्यानं तिच्याकडे तीक्ष्ण नजरेनं पाहिलं. नंतर म्हणाला, "अम्मीजान, एवढ्या लांबून आलोय. आल्या आल्या आईशी धर्मचर्चा करणं हे काही आनंदाचं नाही. पण तुम्ही विषयच काढलाय म्हणून सांगतो. तुम्ही बहु-देवतांची उपासना सोडलेली नाही हे तुमच्या बोलण्यावरून समजतं. कुणी जाणून-बुजून अज्ञानातच खितपत राहणार असेल, तर कोण काय करणार?"

'एका दैवताला मानणारे एकाहून अधिक देवतांची पूजा करणाऱ्यांना काय म्हणतात, याचं गेली चार वर्षं अध्ययन चाललंय. त्यातली अनेक उदाहरणं देऊन, ही कुठल्या प्रकारची धर्मांधता आहे, याविषयी याला तपशिलानं सांगितलं पाहिजे,' असं वाटलं. तरीही तिनं सांगितलं, "बेटा! या खोलीत असलेल्या ग्रंथांवरून एकदा नजर फिरव. तुझ्या आजोबांनी अठ्ठावीस वर्षं त्यांचं अध्ययन केलं आहे. गेली चार वर्षं मीही वाचतेय. एकेश्वर उपासना, अनेकेश्वर उपासना व विविध संस्कृती हा गंभीरपणे समजून घ्यायचा विषय आहे. ते जाऊ दे! तू कसा आहेस? सौदी कसं आहे? सांग."

"अम्मीजान, अल्लाहूची कृपा! प्रवादी (स) जिथं जन्मले, तो हा देश. जगातल्या कुठल्याही देशात नसेल, एवढी संपत्ती या देशात आहे. देशाची संपत्ती म्हणजे सोनं, चांदी, हिरे, जवाहर नव्हे किंवा विमान, रॉकेट, तंत्रज्ञान यात नाही, ते आहे पेट्रोलमध्ये! एक बॅरल पेट्रोलची किंमत फक्त पाच डॉलरनं वाढवली की सगळ्या मस्तवाल देशांची मस्ती झर्रकन खाली उतरते. बघता बघता हे देश भुईसपाट होतात. ही शक्ति फक्त मुस्लीम राष्ट्रांत आहे. त्यातही जिथं प्रवादी (स) जन्मले, वास्तव्य करून त्यांनी जो देश पुनीत केला, त्या सौदीमध्ये आहे. तो दयाळू अल्लाहू आपल्या पुण्यस्थळावर कृपा केल्याशिवाय कसा राहील? आणि इंडिया! विमानातून उतरलं की समोर येतं ते दारिद्र्य, रोगराई, भूक. इस्लामचा मनापासून स्वीकार करायचा नाही, फक्त राजकारणासाठी तेवढा मुसलमानांचा अनुनय करायचा आणि आतून अनेकेश्वर धर्मावर निष्ठा ठेवायची. कशी वाढणार मग संपत्ती?"

"बेटा, तू अमेरिकेत पेट्रो-केमिकल इंजिनियरिंगमध्ये एम.ई. केलंस. सांग, जमिनीत असलेल्या पेट्रोलची उत्पत्ती कशी होते? लक्षावधी वर्षांपूर्वी जमिनीत गाडली गेलेली वनराई, प्राणिजीवन कालांतरानं खनिज तेल बनलं. मी असं कुठंतरी वाचलं होतं. तुला त्यातला तपशील विस्तारानं ठाऊक असेल. आज जिथं वाळवंटं आहेत, त्या मुसलमान देशांमध्ये एके काळी समृद्ध वनजीवन होतं. भू-शास्त्रज्ञ जे सिद्ध करून सांगताहेत, ते तू अल्लाहूची कृपा म्हणून मांडतोयस. हे तुझं बोलणं अरेबियाच्या मुल्लांना साजेसं आहे."

त्याला राग आला. इतर कुणी असा वाद घातला असता तर पराकोटीचा तिरस्कार दाखवून त्याची उपेक्षा केली असती. पण आपली आईच आपल्या धर्माचं महत्त्व कमी करतेय. हे मात्र सहन करणं कठीण होतं. तो

म्हणाला, "जमिनीत खनिज-तेल कसं तयार होतं, याविषयी मला कुणी सांगायची गरज नाही. पण जिथं प्रवादी (स) नी जन्म घेतला, त्याच प्रदेशात कसं, एवढ्या मोठ्या प्रमाणात खनिज तेल निर्माण झालं? अनेकेश्वर उपासना करणाऱ्या इंडियात का नाही झालं? हा प्रश्न मोकळेपणानं स्वत:ला विचारला तर सहजच उत्तर सापडेल. अल्लाहूचं माहात्म्य जाणण्यासाठीही अल्लाहूची कृपा आवश्यक आहे. त्याची ज्याच्यावर कृपा असते, त्यालाच हे ज्ञान होतं. नाही तर अज्ञानातच राहून नरकात जावं लागतं. तुमच्याविषयी आई म्हणून माझ्या मनात प्रेम आहे, ममता आहे. पण मी तरी तुमच्यासाठी काय करू शकतो?"

अरबी देशांमध्ये– त्यातही सौदीमध्ये नोकरीसाठी जाणाऱ्या भारतीय मुस्लीम तरुणांप्रमाणे हाही तिथल्या इस्लामच्या सोवळेपणावर भाळलाय, हे तिच्या लक्षात आलं. ऑफिस, कार्यालयं, फॅक्टरी अशा सार्वजनिक ठिकाणीही अजानची हाक ऐकताच माणसं हातातली कामं जिथल्या तिथे टाकून नमाजासाठी धाव घेतात, असं तिनंही ऐकलं होतं. त्यापैकी काही आपापल्या जागीच बसून नमाज करतात किंवा काही करतही नाहीत. पण, नोकरीसाठी म्हणून तिथे गेलेले भारत, पाकिस्तान, बांगलादेश इथले मुसलमान मात्र, आपण अरबांपेक्षा कडवे मुसलमान आहोत हे दाखवण्यासाठी प्रत्येक वेळी जवळच्या मशिदीकडे धाव घेतात, असं तिनं काही जणांकडून ऐकलं होतं. याचंही तसंच झालं असावं सुरुवातीला, नंतर तोच गाढ विश्वास बनला असावा. अशा मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि उदार भावना निर्माण करायला एक-दोन दिवस पुरेसे नाहीत. शिवाय सतत वाद घालायला लागलं तर संबंध ताणले जातील. धर्मासाठी बंधू-बांधव, आई-वडील, बायको-मुलं यांना सोड; बळी दे म्हणून स्वत: प्रवादी (स) यांनी जिथं सांगितलंय, तो हा धर्म!

तिनं विषयांतर करत विचारलं, "बेटा, काय जेवशील?"

"इथं काय मिळतं?"

"इथला मुख्य आहार म्हणजे नाचणीची उकड. वर भात. चपाती हवी असेल तर कुणाला तरी कुणिगलला पाठवून आटा मागवता येईल. भाज्या परसातच येतात. शिवाय मळ्यातही आहेत. शिवाय दूध, दही, तूप तर घरात हवं तेवढं आहे."

"तुम्ही वक्कलिग जातीच्या. मांस खाता ना?"

त्याचं बोलणं तिला खटकलं. पण 'मी वक्कलिग नाही, मुसलमान आहे' असं ठणकावून सांगायची इच्छाही झाली नाही. आपला मुस्लीम धर्मावरचा विश्वास डळमळीत झाला असताना त्याला तरी कशाला काय सांगायला जायचं?

ती म्हणाली, "आम्ही वक्कलिग आहोत आणि मांस खातो हे खरं आहे, पण आम्ही रोज खात नाही. आमच्या स्वयंपाकघरात मांस शिजवलं जात नाही. बाहेर ओसरीच्या बाजूच्या खोलीत किंवा न्हाणीघरालगतच्या खोलीत शिजवतात. त्याची भांडी वेगळी असतात. घरच्या बायका तो स्वयंपाक करत नाहीत. त्या स्वयंपाकघरात भात आणि नाचणीची उकड करून देतात. रोजच्या जेवणात मांसाहार नसतो. पत्रावळीत किंवा द्रोणात वाढून घेतात. जेवल्यावर ते फेकून देतात. मांस शिजवलेली भांडी आणि डाव स्वच्छ धुवून पुन्हा न्हाणीघराच्या छताला टांगून ठेवतात. याचाच अर्थ, मांसाहार निषिद्धच! प्राणी हिंसा म्हणून त्याला विरोध. तुझे आजोबा तर गांधी आश्रमात राहून आले होते ना? त्यांनी मांसाहाराचा पूर्णपणे त्याग केला होता. इथे आल्यापासून मीही सोडून दिलाय. या जगातल्या प्रत्येक प्राण्याला जगायचा हक्क आहे. देवानं प्राण्यांची निर्मिती मानवाच्या आहारासाठी केलेली नाही, हे इथल्या धर्माचं तत्त्व आहे."

त्यानं एक-दोनदा खांदे उडवले आणि म्हणाला, "कुठलाही वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला माणूस हे नॉन्सेन्स मान्य करणार नाही."

हा वाद इथे वाढवायची तिची इच्छा नव्हती. काही क्षण त्याच्याकडे पाहत ती म्हणाली, "भात आणि एखादी पातळ भाजी करायला लक्ष्मम्माला सांगते. दही तर आहेच. तुला हे चालणार नसेल तर, हातात वाहन आहे. कुणिगलच्या हॉटेलांमध्ये जाऊन जेवून ये. तुझी मर्जी!"

यावर तो काही बोलला नाही. तिनं आत जाऊन लक्ष्मम्माला भात-भाजी करायला सांगितलं. स्वयंपाक होईपर्यंत त्याला एकट्याला अभ्यासिकेत ठेवून ती स्वयंपाकघरातच होती. त्यानंतर हात धुवायला पाणी देऊन ती स्वत: त्याला वाढू लागली. त्यानं चमचा मागितला. ताटलीत सार-भात नीट कालवून चमच्यासह तिनं त्याला वाढला. दोनदा सार-भात कालवून वाढल्यानंतर तिनं भातावर घट्ट दही वाढलं. मध्येच "एवढं का कमी जेवतोयस? नीट जेव!" असा आग्रहही केला. नाही म्हटलं तरी तो भावुक झाला. जेवणानंतर त्याला विश्रांतीसाठी तिनं आपला पलंग नीट करून दिला. टॅक्सी ड्रायव्हरला जेवायला देऊन तीही जेवली.

जेवण आटोपून ती येईपर्यंत नझीरची छोटीशी झोप झाली होती. त्याच्या पलंगापाशी खुर्ची घेऊन बसत तिनं विचारलं, "बेंगळुरूमध्ये कुठे उतरलास?"

"शेरीफमहल हॉटेलात."

"का? अब्बाजानबरोबर नाही राहिलास?" तिनं आश्चर्यानं विचारलं.

"यायच्या आधी मी फ्लॅटवर फोन केला, तर हा फोन अस्तित्वात नाही, असं उत्तर मिळालं. इथे तुमच्याकडे तर फोन नाही. दोन दिवस विचार केला. शेवटी शिवाजीनगरच्या घराजवळ आहे ना माझा मित्र इम्तियाझ, त्याला फोन केला. तर त्यानं उलट मलाच विचारलं, 'तुझ्या वडिलांनी दुसरा निकाह केला हे तुला ठाऊक नाही? आता ते इथे जुन्या मोठ्या घरात राहतात. नव्या बीबीबरोबर. हवा तर फोन नंबर मिळवून देईन. अर्ध्या तासानंतर पुन्हा फोन कर.' मला धक्का बसला. तोच म्हणाला, 'तुझी ममी आपल्या वडिलांच्या घरी जाऊन राहतेय ना. मग काय करतील तुझे वडील? सच्चा मुसलमानानं दुसऱ्या जातीची बायको केली तरी, कन्व्हर्ट करून करून किती करणार, असं इथं मोहल्ल्यातली माणसं बोलताहेत.' त्याच्याकडून नंबर घेऊन अब्बाजानशी बोललो. त्यांना आनंद झालेला दिसला. म्हणाले, 'एअरपोर्टवर येतो. फ्लॅटमध्ये सगळी व्यवस्था तशीच आहे. तू राहशील तितके दिवस एक स्वयंपाकाची बाई लावली की पुरे.' दुसरी बीबी वयानं माझ्यापेक्षा लहान असली तरी तिनं माझ्यापुढे पर्दा करायचं कारण नाही. मी 'मेहरम'चा नातेवाईक. शिवाय मी तिथे उतरलो तर तुम्ही मला भेटायला तिथे याल. तेव्हा अवघड वाटेल म्हणून अब्बाजाननी तसं सांगितलं, हे माझ्या लक्षात आलं. एअरपोर्टवर आले होते ते. मीच सांगितलं, फ्लॅटमध्ये नको, शरीफमहलमध्ये राहीन. त्यांनीही नको म्हटलं नाही. घरी घेऊन जाऊन नव्या बीबीशी ओळखही करून दिली नाही. संकोच वाटला असावा."

आपल्या मुलाच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नाविषयी आपल्या मुलाशी बोलायची तिची इच्छा नव्हती.

आता नझीर थोडा मृदू झाला होता. धर्माचा कठोरपणा बाजूला सरून मनानं जवळ आला होता. आईनं आस्थेनं कालवून घातलेला भात पोटात गेल्यामुळे आपल्यात हा बदल झाल्याचं त्याच्याही लक्षात आलं नसावं.

"सुट्टी किती आहे?" तिनं विचारलं.

"सहा आठवडे."

"हॉटेलमध्ये कशाला राहतोस? इथेच राहा. हवं तर अधून-मधून मित्रांना भेटायला बेंगळुरूला जाऊन ये."

तो काहीही बोलला नाही.

"इथून कुणिगलला दिवसातून सात बसेस आहेत. तिथून बेंगळुरूला दर अर्ध्या तासानं बस मिळते. हवं तर तू राहशील तितके दिवस एक स्वतंत्र टॅक्सी ठेवू शकतोस."

तरीही तो काही बोलला नाही. मौन ही अर्धवट संमती, हे लक्षात येऊन तीही काही बोलली नाही. काही वेळानं तिनं विचारलं, "लग्नाचा विचार केलास?" यावरही तो बोलला नाही. तिनं पुन्हा तेच विचारलं, तेव्हा मात्र म्हणाला, "फक्त विचार करून लग्न होतं का?"

परदेशी राहणारी मुलं आपल्या यायचा दिवस आई-वडिलांना कळवतात. इकडे ते सात-आठ मुली हेरून ठेवतात. मुलगा आल्यावर त्यापैकी एक निवडतो, लग्न करतो आणि बायकोला घेऊन जातो. ही पद्धत तिलाही ठाऊक होती. पण इथली परिस्थिती वेगळीच होती. गेली चार वर्षं तिचा मुस्लीम समाजाशी संपर्कच राहिला नव्हता. शिवाय नवऱ्याचं दुसरं लग्न झालंय. नझीरला इतर जातीतलं कुणी मुलगी देऊन लग्न करून देणं, शक्य नाही. मुस्लीम मुलींशी मोकळेपणानं भेटून स्वत: लग्न ठरवण्यासारखं वातावरण नाही. पण तरीही 'अमेरिकेत एम.ई. करून सौदीमध्ये मोठ्या पगाराची नोकरी आहे' अशी जाहिरात दिली तर लग्न जमणं कठीण नाही, या विचारासरशी तिला थोडं बरंही वाटलं. धर्माची चौकट नसलेली एखादी आधुनिक घरातली मुलगी का नाही मिळणार? पण अशा आधुनिक मुलीचा स्वीकार करायला हा तयार होईल काय? या संदर्भात काहीतरी बोलण्यासाठी तिनं तोंड उघडलं, पण तो झोपी गेला होता.

ती त्याच्याकडे टक लावून पाहू लागली. अरबी पद्धतीची, त्यातही मुस्लीम म्हणता येईल अशा प्रकारची दाढी, त्याच पद्धतीचा पायजमा आणि लांब अंगरखा. आपण मुस्लीम असल्याचं ठसवणारी वेषभूषा. भारतातले कितीतरी तरुण आजकाल अशाच प्रकारे आपला मुस्लीम धर्म व्यक्त करत असतात. त्यात हा तर सौदीमध्ये राहणारा! अमेरिकेत शिक्षण संपल्यावर सौदीमध्ये नोकरी मिळाली. हा फक्त योगायोग म्हणता येईल?

'तान्हा असताना किती गोड दिसायचा हा! कुठल्याही धर्माचा छाप नसताना मुक्तपणे राहायचं वय ते! त्याला तसंच मुक्तपणे वाढवायची माझीही तीव्र इच्छा होती. पण शूटिंग, रिहर्सल, लोकेशन म्हणत सतत घराबाहेर राहावं लागायचं. नोकर-माणसांवर पूर्णपणे सोपवायला मन तयार नसायचं. त्यामुळे आमिरच्या सूचनेनुसार शिवाजीनगरच्या घरी सोडावं लागलं. तिथं हा एक कर्मठ मुसलमान म्हणून घडत असल्याचं लक्षातच आलं नाही. ठाऊक झालं असतं तर? 'असं होऊ दिलं नसतं' असं म्हणणं प्रामाणिकपणाचं होईल? तरीही हा इतका कडवा धार्मिक माणूस होईल, असं नक्की वाटलं नव्हतं.'

ती बराच वेळ तशीच बसून होती.

तासभर गाढ झोप काढून झाल्यावर त्याची झोप चाळवली. कूस बदलून तो पुन्हा झोपला. जाग आली. काहीतरी विसरल्यासारखं त्यानं पटकन घड्याळ पाहिलं. तिनं विचारलं, "का रे? काय झालं?"

"असर नमाजची वेळ झाली," म्हणत तो धडपडत उठला आणि घाई-घाईनं घराच्या मागच्या बाजूला असलेल्या न्हाणीघरात गेला. तीही त्याच्या मागोमाग गेली. मोठ्या तांब्याच्या हंड्यात पितळी तांब्या बुडवून घेऊन त्यानं 'उजू' करायला सुरुवात केली. 'नियत' करून त्यानं 'बिस्मिल्ला' म्हटलं. दोन्ही हात मनगटापर्यंत धुतले. दात घासले, चूळ भरली, नाकात पाणी घालून धुतलं, दाढीच्या मुळांपर्यंत बोटं फिरवून धुतली, हातापायांची बोटं एकमेकांत गुंफली आणि धुतली. दोन्ही कान स्वच्छ धुतले. आधी उजवा पाय, नंतर डावा पाय धुतला. या सर्व क्रिया एकापाठोपाठ एक अशा तीन वेळा केल्यानंतर शुद्ध अरबी उच्चारात दु आ सांगू लागला :

"अश्हदु अल्लाइलाह इल्लल्लाहवहदहूलाशरीकलहूव अश्हदु अन्न मुहम्मदन्न अब्दुहू... मी साक्षी आहे. अल्लाहूव्यतिरिक्त दुसरे आराध्य नाही. तो एकमेव आहे. त्याला कुणी वाटेकरी नाहीत. मी पुन्हा साक्ष देतो, महंमद (स) हे अल्लाहचे दास आणि संदेशवाहक आहेत. अल्ला! मला तू आत्यंतिक पश्चात्तापदग्ध बनव. मला तू शुद्ध झालेल्यांपैकी एक कर. तुझ्या पावनतेचा मी उद्घोष करतो. हे अल्ला! तुझी स्तुती करताना दुसरे आराध्य नाही, याचा मी साक्षी आहे. मी तुझ्याकडे क्षमायाचना करतो. मी पश्चात्तापदग्ध होऊन तुझ्याकडे परतेन."

एवढं म्हणून झाल्यावर तो अभ्यासिकेत आला. जानुमाज अंथरून, डोक्यावर पांढरी टोपी घातली आणि ओळीनं नमाज केला. त्याचे सगळे 'फर्ज' ती विसरूनच गेली होती. त्याला नमाज करताना बघून तिला आठवलं, 'अल्लाव्यतिरिक्त दुसरं कुठलंही आराध्य नाही. महम्मद (स) हे अल्लाहचे संदेशवाहक आहेत, अशी मी साक्ष देतो.' असं सांगितल्यावर 'अश्हदु अल्लाइलाहइल्लल्लाहू...' वगैरे मंत्राचं पठण केल्यावर

'अत्सलाम आलेकूम वरहम्तुल्लाह' म्हणत त्यानं उजवीकडे आणि डावीकडे मान वळवल्यावर नमाज संपला हे तिच्या लक्षात आलं.

जानुमाज दुमडून ठेवून तो एका खुर्चीवर बसला. तिनं विचारलं, "चहा हवाय?" त्यानं संमती दर्शवली. चहा सांगायला ती स्वयंपाकघरात गेली तेव्हा केंचप्पा संकोचानंच म्हणाला, "आई! तुम्ही आमच्या गौडाची मुलगी आहात. नंतर जात बदलली असली तरी तुम्ही जन्मानं आमच्यापैकीच. त्यामुळे तुम्ही स्वयंपाकघर, न्हाणीघरात फिरलात तरी आम्हाला चालतं. तुमचा मुलगा जन्मजात तुर्क. त्याला घरात आणून आमचं न्हाणीघरातलं पाणी शिवलं तर ओवळं होणार नाही काय? आता बघा! चिंच लावून हंडा घासायला पाहिजे. पुन्हा सहा घागरी पाणी ओढून हंडा भरायला पाहिजे. लक्ष्मी रागावलीय बघा."

ती क्षणार्धात घामेजली. हा मुद्दा तिच्या डोक्यातच आला नव्हता. ही केंचप्पाशी वाद घालायची वेळ नव्हे. शिवाय, कितीही वाद-विवाद केला तरी केंचप्पा किंवा लक्ष्मम्मा बदलणं शक्य नव्हतं. त्यांनी मान्य केलं तरी गावातली जातीतली इतर माणसं गप्प राहणार नाहीत. जबरदस्तीनं काही करायला गेलं तर 'तुमच्याकडे राबतो म्हणून जात बाटवता काय?' म्हटल्याशिवाय राहणार नाहीत. आणि जर वाद या पातळीवर पोहोचला तर विश्वास राहणं शक्य नाही. ती सावध झाली. नरमाईनं म्हणाली, "माझ्या लक्षात नाही आलं, केंचप्पा! तू असं कर, गोठ्यात एक बादली आणि तांब्या ठेव. दोन्ही प्लॅस्टिकचा. म्हणजे सोवळ्या-ओवळ्याचा प्रश्न राहणार नाही. उद्या अंघोळीचं पाणीही तिथेच दे." हे केंचप्पाला पटलं.

ड्रायव्हरला चहा देऊन ती नझीरचा चहा घेऊन गेली. चहा घेता घेता तिनं विचारलं, "सौदीत कुणी मुलगी भेटली नाही? म्हणजे मित्र, ओळखीचे, कलीग्ज यांच्यापैकी कुणी आपल्याकडच्या मुलीसाठी विचारलं नाही?"

"मी सौदी नाही ना!" तो क्षणार्धात म्हणाला.

"पण मुस्लीम आहेस ना!"

"सौदीचे लोक स्वत:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतात. आपल्याकडच्या मुलींना ते बाहेर देत नाहीत. जर एखादी मुलगी तशी तयार झाली तर तिला ठार मारतात. शिवाय तिथे मेहेरही लाखांमध्ये असते. ती द्यायची कुवत नसलेले कितीतरी सौदी मध्यमवर्गीय पुरुष सीरिया, इजिप्तकडून बायका आणतात. इंडिया, पाकिस्तान, बांगलादेशातून घरकामासाठी म्हणून गेलेल्या स्त्रियांवर इथले पुरुष बलात्कार करतात आणि तिसरी किंवा चौथी बायको करतात. त्या संसारात सौदी स्त्रीचं स्थान नेहमी वरचंच राहतं."

"सहजीवनासाठी इस्लाम अत्युत्तम उदाहरण आहे, असं सांगितलं जातं ना, मग?"

"प्रत्येकाला आपापल्या देशाविषयी श्रेष्ठतेची भावना असायचीच. सौदीतही काही टोळ्या आहेत. प्रत्येक टोळीवाले स्वत:ला श्रेष्ठच समजतात. आपल्या मुलींना दुसऱ्या टोळीतही देत नाहीत."

"तू सौदीतच का राहतोस? इतर कुठे नोकरी मिळणार नाही?"

"मिळेल, पण एवढा पगार आणखी कुठे मिळत नाही. इतर सगळ्या देशांमध्ये टॅक्सच्या नावाखाली कमाईतला तिसरा किंवा त्याहून जास्त भाग लुबाडला जातो. सौदीत टॅक्स नाही. त्यामुळे संधी मिळत असेल तर युरोप-अमेरिकेतली माणसंही नोकरीसाठी सौदीत जायला तयार असतात."

१०

सुरुवातीला कर्नाटकातील एक बुद्धिजीवी किंवा विचारवंत म्हणून ओळखले जाणारे एन.एस.एन. शास्त्री हळूहळू संपूर्ण भारतातले एक विचारवंत म्हणून ओळखले जाऊ लागले. क्रांतिकारी वैचारिकता, कुठलाही विषय तात्त्विक पातळीवर नेऊन विश्लेषण करण्याची हातोटी, वादग्रस्त विचार व्यक्त करणं, प्रखर भाषा, वाक्चातुर्य या वैशिष्ट्यांमुळे ते फार लवकर तरुण-तरुणी आणि प्रसारमाध्यम यांमध्ये लोकप्रिय झाले. 'जागतिक आर्थिक परिस्थिती'पासून देशाच्या आध्यात्मिक इतिहासापर्यंत कुठल्याही विषयावर आपले विचार सविस्तरपणे मांडत असतानाच हुंडा-विरोध, अस्पृश्यता विरोध अशा आधुनिक प्रकारच्या सगळ्या कार्यक्रमांचे उद्घाटक किंवा समारोपाचे पाहुणे होऊन भाषणं करता करता त्यांनी समाज-परिवर्तक म्हणूनही ख्याती मिळवली होती. लवकरच ते प्रोफेसरही झाले. त्याच वेगानं ते पद्मश्री, पद्मभूषण आणि पाठोपाठ पद्मविभूषणही झाले. आता त्यांच्या पाठीराख्यांनी म्हणायला सुरुवात केली होती, 'कुणाकुणाला भारतरत्न दिलं गेलंय. अजून आमचे प्रोफेसर का भारतरत्न झाले नाहीत?' यावर प्रोफेसर शास्त्री म्हणाले, 'व्यक्तिमुळे पुरस्काराची किंमत वाढत असते, पुरस्कारामुळे व्यक्ति मोठी होत नसते, हे सनातन सत्य समजून घेतल्याशिवाय तुम्ही व्यक्तिगत पातळीवरून तात्त्विक पातळीवर जाऊन पोहोचू शकणार नाही. मानवाच्या इतिहासावर पाऊलखुणा उमटवलेल्या कुणा-कुणाला कुठले पुरस्कार मिळाले आहेत, याचा तुम्ही विचार केलात तर तुम्हालाच याचं उत्तर मिळेल.' हे त्यांनी त्यांच्या दहा चाहत्यांपुढे, नजर विलक्षण पद्धतीनं वळवून सांगितलं. त्या चाहत्यांकडून हे प्रसारमाध्यमांना समजलं, इतर लोकांमध्ये पसरलं आणि त्यांच्याविषयीचा आदर आणखी वाढला.

तरुण-तरुणींच्या मनातली त्यांची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यासाठी आणखीही एक कारण घडलं. इथं एम.ए.ची पदवी मिळवल्यानंतर डॉक्टरेट करण्यासाठी ते ऑक्सफर्डला गेले. येताना ते डिग्रीबरोबर एक इंग्लिश बायकोही घेऊन आले. शिष्याच्या बुद्धिमत्तेने आणि प्रतिभेने प्रभावित होऊन ऑक्सफर्डमधील प्राध्यापकांनी पुरस्कार म्हणून आपली मुलगी यांना बहाल केली, अशी बातमी त्या काळी प्रसृत झाली होती. आई-वडिलांनी आपली मुलगी कुणाला 'बहाल' करायची पद्धत पाश्चिमात्य जगतात नसल्यामुळे ही बातमी खोटी आहे, असं काही जण म्हणू लागले तेव्हा, ती त्यांच्या बुद्धीवर भाळून त्यांच्याशी विवाहबद्ध झालेली त्यांची वर्गमैत्रीण होती, अशी बातमी पसरू लागली. काही जणांच्या मते या दोन्हीपैकी एक किंवा कदाचित दोन्हीही खरं असेल. पण यावरही कुणीतरी खुसपट काढलं, जर ती ऑक्सफर्डची पदवीधर आहे तर बेंगळुरूसारख्या महानगरात काहीच न करता कशी राहिली? एखादी प्राध्यापिकेची जागा तिला मिळाली नसती का? पाश्चिमात्य संस्कृतीमधून आलेली कुठलीही स्त्री आपलं शिक्षण वाया घालवत, अशी घरात बसून राहील? बायकोला एक नोकरी मिळवून देणं शास्त्रींसारख्या व्यक्तिला शक्य नव्हतं का? अर्थात, ही सगळी चर्चा चाळीस वर्षांपूर्वी चालायची. आता अशा चर्चेत कुणालाही फारसा रस राहिलेला नव्हता. त्याही सुरुवाती-सुरुवातीला नवऱ्याची भाषणं ऐकायला यायच्या, लोकांच्या नजरेला पडायच्या. अलीकडे त्या कुठल्याही कार्यक्रमात दिसत नव्हत्या. अधून-मधून पुस्तकांच्या दुकानांमध्ये चेस-कादंबऱ्या विकत घेताना दिसायच्या, एवढंच! दर रविवारी चर्चला जाणं आणि तिथल्या ओळखीच्या बायकांबरोबर दोन तास गप्पा मारणं हा त्यांच्या रूटीनचा भाग झाला होता. शेजार-पाजाऱ्यांशी तोंडओळख झाली असली तरी त्यांच्याबद्दल आत्मीयता निर्माण झाली नव्हती. कामवालीशी बोलता येईल, एवढं कन्नड त्या शिकल्या होत्या. कॅथॉलिक आई-वडिलांचा, मुलाचं धर्म-परिवर्तन न करता त्याच्याशी लग्न करायला विरोध असल्यामुळे लग्नानंतर त्यांच्याशीही तसे बरे संबंध राहिले नव्हते. इथे आल्यानंतर त्या दोनदा आई-वडिलांना भेटण्यासाठी स्वदेशी गेल्या होत्या. इतर जातीतल्या मुलाशी लग्न केलं तरी हिनं आपला धर्म सोडलेला नाही, या मुद्द्यावर त्यांनी हिचं स्वागत केलं. ते वारल्यानंतर आवर्जून जावं, असं तिथं काही राहिलंच नाही.

प्रोफेसर शास्त्रींना एक मुलगा होता. दिगंत नाव त्याचं. त्याच्यापेक्षा दहा वर्षांनी छोटी मुलगी, अरुणा. दिगंत गव्हाळी वर्णाचा. भारतीय वाटेल असं व्यक्तिमत्त्व असलेला. अरुणाही आईइतकी गोरी नसली तरी गोरी, तांबूस केसांची मुलगी.

दिगंत कॉम्प्युटर इंजिनियरिंगमध्ये बी.इ. झाला. स्टॅन्फोर्डमध्ये एम.बी.ए. झाला, कॅलिफोर्नियामध्ये नोकरीचा अनुभव घेऊन भारतात परतला. इथल्या एका मोठ्या कंपनीत दोन वर्षं नोकरी केल्यानंतर त्यानं स्वत:ची स्वतंत्र कंपनी सुरू केली होती. गेल्या वर्षी त्याच्या कंपनीची आर्थिक उलाढाल शहाण्णव कोटींच्या घरात पोहोचली. अमेरिका, जर्मनी, फ्रान्स यांसारख्या पुढारलेल्या देशांकडून कंपनीला ऑर्डर्स मिळू लागल्या होत्या. एक ना एक दिवस इन्फोसिस-विप्रोसारख्या बलाढ्य कंपन्यांना मागे सारण्याचं स्वप्न तो बाळगत होता. त्याची पंजाबी बायको बबिता कॉम्प्युटरमधील तज्ज्ञ होती. कंपनीच्या मॅनेजमेंटचा बराचसा भाग तिच्या अधिपत्याखालीच होता. कंपनीचा विकास आणि परदेशातील कामं तेवढी दिगंत पाहत होता. त्याच्या कॉर्पोरेट इमारतीचा विस्तार करण्यासाठी सरकारकडून अलीकडेच पन्नास एकर जमीन मंजूर झाली होती आणि आर्किटेक्टबरोबर बसून दोघांचीही त्याच इमारतीच्या प्लॅनविषयी चर्चा चालली होती. पन्नास एकर जमीन मंजूर होण्यासाठी स्वत: प्रोफेसरांनी मंत्र्यांकडे वशिला लावला होता. कारण हे त्यांच्या प्रचार-तंत्राचे अनधिकृत सल्लागार! शिवाय निवडणुकीच्या फंडाला दिगंतनं पन्नास लाख रुपये दिले. पैशाचा हा सगळा व्यवहार स्वत: प्रोफेसरांनीच निभावून नेला, अशीही बातमी त्या वेळी उठली होती. भारतात सरकारदरबारी काही कामं करून घ्यायची असतील तर पैसे द्यावेच लागतात, यात कुणाला काही विशेष वाटायचं कारण नाही. पण, आधीपासून समाजवाद आणि मार्क्सवादाची बाजू हिरिरीनं मांडत समाजात स्वत:चे चाहते निर्माण करून सामाजिक कार्यकर्ता आणि विचारवंत म्हणून मिरवणाऱ्या प्रोफेसरांच्या चाहत्यांपैकीच काही जण उलटले आणि त्यांचा प्रभाव असलेल्या वृत्तपत्रांमधून त्यांच्यावर टीका करू लागले, 'यांचा मुलगा भांडवलदार आहे, त्यासाठी त्यांचा त्याला सक्रिय पाठिंबा आहे, यांनी त्याला लाच द्यायला मदत केलीय...' वगैरे वगैरे.

पण प्रोफेसर अशा किरकोळ प्रकरणांना दाद देणाऱ्यांपैकी कधीच नव्हते. त्यांनी सांगायला सुरुवात केली, "माझा पहिल्यापासून लोकशाहीवर विश्वास आहे. केवळ तो माझा मुलगा आहे म्हणून त्याच्यावर आपले विचार लादणाऱ्या सरंजामशाहीला माझा नेहमीच विरोध राहिला आहे. मी माझ्या आई-वडिलांच्या संकुचित विचारांचा धिक्कार करून त्यातून स्वत:ला सोडवून बाहेर पडलो आहे. अशा परिस्थितीत आपल्या मुलाचं स्वातंत्र्य पायदळी तुडवून 'तू अमुकच केलं पाहिजेस!' असं सांगायचा नीचपणा कसा करू? मला ते करायचं असतं तर त्यानं पंजाबी मुलीशी लग्न केलं, त्याच वेळी विरोध केला असता. उलट हे एक राष्ट्राच्या ऐक्याचं कार्य मानून मी त्याच्या निर्णयाचं कौतुकच केलेलं आहे. आता उदारीकरणामुळे देशभर सर्वत्र खासगी उद्योगधंद्यांची भरभराट होत आहे. याचा परिणाम म्हणून कामगारांची संख्या वाढते आहे. भांडवलदार कामगारांचं शोषण करतील. कामगारांमधील असंतोष टोकाला पोहोचून क्रांती व्हायची असेल तर हाही टप्पा अनिवार्य आहे. जिथे औद्योगिकता पराकोटीला पोहोचते, तिथेच कम्युनिझमचं आगमन होतं, या मार्क्सच्या सांगण्यात सत्य दडलेलं आहे. माझा मुलगाही भारतातील कम्युनिझमसाठी छोटीशी पायरी होत आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन माझ्या चाहत्यांनी याचा अभिमान बाळगला आहे. शिवाय, आणखी एक गोष्ट म्हणजे मी माझ्या मुलाबरोबर राहात नाही. त्याच्या कुठल्याही व्यवहाराशी माझा संबंध नाही. तो कुणालाही लाच देणं शक्यच नाही. त्यातही लाच द्यायच्या कामी मी मध्यस्थी केली, अशा प्रकारचं घृणास्पद बोलणं तशाच एखाद्या मानसिकतेच्या माणसालाच शक्य आहे. अशा प्रकारचे आरोप करणाऱ्यांविरुद्ध, लिहिणाऱ्यांविरुद्ध आणि छापणाऱ्यांविरुद्ध न्यायालयात जाण्याशिवाय मला गत्यंतर नाही."

तरीही काही समाजवादी याला घाबरले नाहीत. त्यांच्या प्रसिद्ध वृत्तपत्रांनी त्यांच्या निवेदनाला प्रसिद्धी दिली नाही. मग त्यांनी ते स्वत: छापून वाटण्याची व्यवस्था केली. स्वत:च्या मर्यादित प्रचार असलेल्या वृत्तपत्रात छापून आणलं. अर्थात, हा गदारोळ किती दिवस चालेल, हे प्रोफेसरांना ठाऊक होतं. शिवाय या गदारोळामुळे वृत्तपत्रांच्या वर्तुळात त्यांच्या नावाचं वजन आणखी वाढलं. त्याआधी कम्युनिस्ट मंडळी त्यांना आपल्या कार्यक्रमांमध्ये भाषणासाठी बोलवत नव्हती. या प्रकरणाचा परिणाम म्हणजे तीही प्रोफेसरांना बोलावू लागली. तिथल्या भाषणांमध्ये हे मोकळेपणानं सांगू लागले, "देशाची आर्थिक वाढ शक्य आहे. पण उद्योगपतींनी फायद्याचं प्रमाण मर्यादित ठेवून समाजाचं अध्वर्यू झालं पाहिजे. त्यांनी महात्मा गांधी यांचे विचार आत्मसात करून त्याप्रमाणे आपलं जीवन ठेवलं पाहिजे. मूलत: पाहिलं तर गांधी आणि मार्क्स यांच्यामध्ये काहीही फरक नाही. दोघंही महात्माच आहेत." त्यानंतर त्यांना अनेक औद्योगिक कार्यक्रमांचे वार्षिकोत्सव, पद-ग्रहण आणि इतर सार्वजनिक सभा यांमध्ये आमंत्रित करण्यात येऊ लागलं. अशा सभांमध्ये आणि नंतर ते, यासाठी आवर्जून हजर राहणाऱ्या आपल्या मुलाची आणि सुनेची तिथे आलेल्या मोठमोठ्या उद्योगपतींशी आणि सरकारी अधिकाऱ्यांशी आवर्जून ओळख करून देत होते.

अठ्ठावीस वर्षांची अरुणा. तिला ढ म्हणता आलं नाही तरी हुशार, स्मार्ट म्हणणंही शक्य नव्हतं. वर्गात प्राध्यापक जे शिकवत, नोट्स देत त्या नीट लिहून घेऊन अचूक इंग्लिशमध्ये लिहून तिनं बी.ए., एम.ए. केलं. भरपूर ओळखी असूनही तिला एखादी चांगली नोकरी मिळवून देणं प्राध्यापकांनाही जमलं नाही. मनात असतं तर दिगंतही तिला आपल्याकडे नोकरीला ठेवून चांगला पगार देऊ शकला असता. पण त्याचा व्यवसाय कॉम्प्युटरमधला. हिची डिग्री आर्टस साईडची. त्याच्या ऑफिसमध्ये अगदी खालच्या दर्जाची नोकरी करण्यासाठीही नालायक. शिवाय, आपल्या कंपनीत नवऱ्याच्या कोणत्याही नातलगाला घ्यायला बबिताचा विरोध होता. परिणामी, बऱ्याच प्रयत्नांनी प्रोफेसरांनी मुलीला एका खासगी कॉलेजात कमी पगारावर पार्टटाईम लेक्चररची नोकरी मिळवून दिली.

तसंच, त्यांनी तिलाही 'तुझा तू नवरा शोध' म्हणून स्वातंत्र्य दिलं असलं, तरी तो शोधण्याइतका तरतरीतपणाही तिच्यापाशी नव्हता. मग प्रोफेसरांनी आपल्या मित्रमंडळींपुढे बोलायला सुरुवात केली. पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. बेंगळुरू कितीही मोठं 'महानगर' असलं तरी लग्नाच्या संदर्भात कुणीही एक किंवा दोन पायऱ्या ओलांडून पुढे जायला तयार नव्हतं. मुलीची आई इंग्लिश. ख्रिस्ती. घरातलं वातावरण असं, की तिथे हिंदू रीतिरिवाजांना थाराच नव्हता. पत्नीच्या धर्म-स्वातंत्र्याला संपूर्ण वाव देण्याचा करार केलेले प्रोफेसर तिला तसा आग्रह करू शकत नव्हते आणि त्यांचाही अशा प्रकारच्या आचरणावर विश्वास नव्हता. कट्टर कॅथॉलिक आई आपल्या दोन्ही मुलांना दर रविवारी न चुकता चर्चला घेऊन जात असली तरी हायस्कूलमध्ये गेल्यावर दिगंतनं वडिलांच्या धर्माचीही माहिती करून घेतली. तो बी.ई. शिकत असताना 'आपले वडील मार्क्सिस्ट हिंदू आहेत' हे त्यानं जाणून घेतलं. अमेरिकेत गेल्यावर तर धर्म म्हणजे त्या विशिष्ट समाजाच्या प्रवासातले अनेक टप्पे आणि त्या त्या टप्प्यावरील आचार-विचार असल्याचं त्याला समजलं. दिल्लीला आय.आय.टी. केलेल्या बबिताच्या धार्मिक गरजा दिवाळी, भांगडा आणि करवाचौथ सारख्या काही व्रतांमध्ये संपून जात होत्या. तिच्या अपेक्षेप्रमाणे दिगंतनं शेरवानी घालून, फेटा बांधून, घोड्यावरून बारात आणली आणि रात्री धूमधडाक्यात तिच्याशी लग्न केलं. प्रोफेसर, अरुणा आणि मॅडमही त्यात सहभागी झाले होते.

धर्माच्या संदर्भात अरुणाच्या मनात बराच गोंधळ होता. थोरल्या मुलानंतर दहा वर्षांनंतर ही मुलगी जन्मली होती. त्यामुळे ती आईची लाडकी मुलगी होती. सतत कुशीत असलेल्या या मुलीच्या मनावर आईनं आपल्या धर्माचं महत्त्व पहिल्यापासूनच बिंबवलं होतं. प्रत्येक कामाच्या सुरुवातीला येशूचं स्मरण करणं, गळ्यात क्रॉस घालणं, न चुकता दर रविवारी चर्चला जाणं हे तिच्याही अंगवळणी पडलं होतं. परमेश्वराचा उल्लेख झाला, की तिच्या डोळ्यांसमोर क्रूसावर चढवलेल्या येशूचीच मूर्ती यायची.

हायस्कूलला गेल्यावर मैत्रिणींच्या कपाळावरच्या बिंदीचं आकर्षण वाटून मैत्रिणीच्या कंपास बॉक्समधली टिकली कपाळावर लावून ती घरी परतली. पण आईच्या एका कटाक्षातच 'आपण काहीतरी भयानक चूक केलीय' अशी अपराधी भावना तिच्या मनात भरून राहिली. वर आईनं सांगितलं, "डिअर! तुला या पॅगन चिन्हाची गरज आहे का? आणि हवंच असेल तर क्रूसाच्या आकाराचं चिन्ह लाव." पण बाजारात क्रूसाच्या आकाराची बिंदीच मिळाली नाही. सापडली तरी, ती लावल्यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळ्या दिसू असं तिला वाटलं. त्यानंतर कसलीही बिंदी न लावणं, हीच आपली ओळख आहे, असं तिला वाटू लागलं.

आपला रंग, केस पाश्चात्त्य वळणाचे. नाव अरुणा शास्त्री, धर्म ख्रिस्ती यातील विसंगती तिला कॉलेजमध्ये गेल्यावर अधिक तीव्रपणे जाणवू लागली. 'शाळा-कॉलेजना सुट्टी देऊन सगळं गाव गौरी-गणपतीचा उत्सव साजरा करत असताना आपल्या घरात काहीही केलं जात नाही. डॅडीही मॉमला काही करायला सांगत नाहीत. अर्थात डॅडींनी सांगितलं तरी मॉम ऐकणार नाही, म्हणा! डॅडींची गोष्ट वेगळी. सणाच्या दिवशी त्यांच्या एवढ्या सगळ्या मित्रांपैकी कुणीतरी त्यांना जेवायला बोलावतं. आम्ही मात्र घरात एखादा मृत्यू घडलेला असावा, तसे बसून असतो.'

पहिल्याच वर्षी गणेशोत्सवाच्या वेळी दाक्षायणी या मैत्रिणीनं संध्याकाळी आरतीसाठी अरुणाला आपल्या घरी बोलावलं. मॉमला कारण न सांगता अरुणा तिच्या घरी गेली, तेव्हा गणपतीची कथा चालली होती. घराच्या पडवीला केळीचे खुंटे, शेवंतीच्या माळा, आंब्याच्या पानांची तोरणं बांधून फळा-फुलांनी नटवलं होतं.

उंच आसनावर गौरी आणि पुढच्या बाजूला थोड्या कमी उंचीच्या आसनावर तिचा मुलगा गणपतीची स्थापना करण्यात आली होती. या दृश्यानं तिला आकर्षून घेतलं. कथा सांगितली जात होती, घरची लेक गौरी बाळंतपणासाठी घरी आली आहे, गणेशाचा जन्म झालाय, पाच दिवस माय-लेकाला घरात कौतुकानं ठेवून घेऊन त्यानंतर त्या दोघांनाही गौरीच्या पतीच्या घरी पाठवून देण्यात येतं.

कथा ऐकल्यावर तर ती इतकी भारावून गेली, की त्या माय-लेकरांविषयी तिच्याही मनात ममता दाटून आली. कथेनंतर गौरी-गणपतीची आरती करण्यात आली. नंतर तिला एकटीला एका खोलीत बसवून दुपारच्या जेवणात केलेले कडबू आणि पोळी दिल्यावर ते खाताना तर ‘आपली आई घरात असले पदार्थ का करत नाही,’ असं वाटून तिचं तन-मन अस्वस्थ झालं. त्याच वर्षी पद्मलतानं तिच्यासह आठजणींना आपल्या घरी गोकुळाष्टमीसाठी बोलावलं होतं. त्याच दिवशी जन्मून पाळण्यात झोपलेल्या कृष्णाचे किती लाड करण्यात येत होते! त्याला किती प्रकारे नटवलं होतं! त्या नटवण्यात अलंकरणाच्या सोसापेक्षा प्रेम ओथंबत होतं. कृष्ण जन्मला, या आनंदापोटी कितीतरी खाद्यपदार्थ केले होते. खरोखरच, आठ-दहा वर्षं वाट पाहिल्यावर तान्हं मूल आल्याचा आनंद त्या घरात ओसंडत होता. तो आनंद वाटायचा एक प्रकार म्हणजे आलेल्यांना विविध खाद्यपदार्थ खाऊ घालायचे. तिलाही कृष्णाची कथा थोडीफार ठाऊक होती. ‘युद्धात पांडवांना विजय मिळवून देणारा मुत्सद्दी! आणि हिंदू याची देव म्हणून पूजा करतात. तो एक व्यभिचारी, चोर, खोटारडा! अशा व्यक्तिला देव मानून पूजा करणारा धर्म किती नीच म्हणायचा!’ या सुरात चर्चमधले प्रवचनकार कधीकधी उल्लेख करत. असल्या व्यभिचारी, खोटारड्या, चोरट्याच्या जन्माचा एवढा महोत्सव करणारेही तितकेच खोटारडे-चोरटे असले पाहिजेत ना? पण पद्मलताला ती स्वत:च ओळखत होती. अतिशय सालस मुलगी. तिचे वडील सरकारी हॉस्पिटलात मोठे सर्जन. रोग्यांकडून लाच न घेता, रात्रीपर्यंत ऑपरेशन करत असतात. खासगी व्यवसाय केला तर दरमहा लाखांची कमाई होईल एवढं ज्ञान, हातात कौशल्य आणि नावलौकिक असताना ते सरकारी नोकरीत, तेवढ्याच पगारावर राहात होते. गरीब रुग्ण तर त्यांना देव समजून नमस्कार करायचे. अशी माणसंही जर या कृष्णाची पूजा करत असतील तर याचा अर्थ काय? ते काही अशिक्षित नाहीत. इंग्लंडमध्ये एफ.आर.सी.एस. होऊन काही वर्षं अमेरिकेतही त्यांनी काढली आहेत. अरुणाच्या मनात सगळा गोंधळ उडाला. ‘हे हिंदूंचे देवच विचित्र आहेत. शिवाय यांच्यामध्ये स्त्री-दैवतंही आहेत म्हणे! किती विचित्र! देव स्त्री कशी असू शकेल? ममाही हेच म्हणत असते. या लोकांना देवाचा दरारा नाही, आदर नाही, भीती तर मुळीच नाही! आई आणि तिच्या पोटी जन्मलेलं मूल? याचा अर्थ काय? शी:!

मनातला गोंधळ ममापुढे सांगण्यातही अर्थ नाही. गोंधळातून मार्ग काढण्याऐवजी ती उलट दमच देईल, “नाही त्या गोष्टी मनात आणू नकोस. यामुळे येशूवरील तुझी श्रद्धा कमी होईल. मग कसल्या घोर नरकात जाशील, ठाऊकाय?” हे सांगताना तिच्या त्या निळ्या डोळ्यांमध्ये प्रत्यक्ष नरकच दिसायला लागतो.

वडिलांचं महा-विद्वान म्हणून नाव झालंय. सगळीकडे त्यांची भाषणं होत असतात. कॉलेजच्या गॅदरिंगच्या वेळीही एकदा त्यांना बोलावलं होतं. रोज किमान एक तरी पुष्पगुच्छ घरी आणल्याशिवाय त्यांना समाधान होत नाही. शिवाय शाली, नारळ, फळांची बास्केट. त्या संध्याकाळी टीव्हीवरच्या बातम्या आणि दुसरे दिवशी वृत्तपत्रांमध्ये बातम्या. त्यांच्याशी कधीतरी या विषयावर चर्चा करायची इच्छा व्हायची. पण ममानं त्यांना मागेच कधीतरी माझ्यापुढेच बजावलं होतं, “माझ्या आणि माझ्या मुलीच्या येशूवरच्या श्रद्धेला तडा देण्याचं काम करू नका. तुमचा मार्क्सवाद तुम्हालाच लखलाभ होऊ दे.”

काहीही असो, डॅडी ममाला खरोखरच घाबरतात. त्याही दिवशी, “नो डार्लिंग! मे जीझस् ब्लेस यू!” म्हणत त्यांनी ममाचा खांदा थोपटला, प्रेमपूर्ण हास्य करून परिस्थितीतला तणाव कमी केला. स्वत:च्या या कौशल्याबद्दल स्वत:चीच पाठ थोपटल्यासारखं हसत त्यांनी माझ्याकडे विजयी नजर टाकली. एवढं सगळं घडलेलं असल्यामुळे घरात मी त्यांच्याशी या विषयावर बोलणं शक्य नव्हतं. घराबाहेर त्यांची भेट घेणं शक्य नव्हतं. त्यांनी मला पूर्णपणे ममावर सोडून दिलंय!

ते ममाला घाबरण्यामागे आणखीही एक कारण होतं. त्यांना कुणी मैत्रीण किंवा एखादी लाडकी विद्यार्थिनी भेटली, की आलिंगन देऊन भेटायची त्यांची पद्धत. नंतरही ते तसेच खांद्यावर हात टाकून गप्पा मारत उभे

राहायचे. मागे यावरून त्या दोघांमध्ये भरपूर भांडणं व्हायची. यावर ते म्हणायचे, “यात तू का एवढं वाटून घेतेस? तू पाश्चात्त्य जगात जन्मली, वाढली आहेस. तिथे शेकहँड करणं, गालावर किंवा कपाळावर किस करणं यात कुणी गैर समजतं का?”

यावर ममी संतापून म्हणायची, “पण हा इंडिया आहे! तिथं कुणीही तुम्ही मारता तसे स्त्रियांना मिठी मारून, खांद्यावर हात टाकून उभं राहत नाही. तिथं कुणीच कुणाला, त्यातही स्त्रियांना अनावश्यक स्पर्श करायला जात नाहीत. तुमचे धंदे मला ठाऊक नाहीत, असं वाटलं की काय तुम्हाला?” यावर “वुमन! दाय नेम इज सस्पिशन...” म्हणत ते शांतपणे ममीला मिठीत घ्यायचे. माझ्या पुढ्यातच हे सगळं चालल्यामुळे संकोच वाटून मी माझ्या खोलीत निघून जात असे. एकदा ममी मिसेस रॉबसनना म्हणत होती, “ब्रिटनमध्ये असते तर मी वेगळी झाले असते. कॅथॉलिक असल्यामुळे डायव्हर्स नाही. इतकी वर्षं या देशात राहिल्यामुळे त्या देशाशी पूर्णपणे संबंध तुटून गेलाय. काय करू मी?” मिसेस रॉबसन म्हणजे आमच्या घरी वरचेवर येणारी ममाची अँग्लो-इंडियन मैत्रीण.’

धर्म आणि देवाच्या संदर्भात एक-दोन वर्षं अशा प्रकारे संभ्रमात गेल्यावर अरुणा आईच्या श्रद्धास्थानामध्ये मिसळून जाऊन काही प्रमाणात समाधानी झाली. तिचं कुतूहल तसंच जागृत असतं तर ते शमवण्यासाठी एकाऐवजी कितीतरी मार्ग होते. कॉलेजमध्ये एखाद्या प्राध्यापकाशी ती बोलू शकली असती. इतरही अनेक संस्थांमध्ये जाऊन ती मनातल्या शंकांचं निरसन करू शकली असती. कॉलेजच्या ग्रंथालयात योग्य अशी पुस्तकं मिळवून वाचू शकली असती. पण तिचा स्वभाव तसा नव्हता.

एके सकाळी दहा वाजता लक्ष्मी शिवाजीनगरजवळच्या शरीफमहल हॉटेलपाशी रिक्षाची वाट बघत उभी होती. एक कार तिच्याजवळून पुढे गेली आणि पटकन ब्रेक दाबून थांबवण्यात आली. गाडी कुणासाठी थांबली असावी, हे न कळून तिनं भोवताली नजर टाकली. कुणी नव्हतं. कार मागं येऊन तिच्याच शेजारी थांबली. समोरच्या भागातली डावीकडची काच खाली गेली. प्रोफेसर शास्त्री कार चालवत होते. तिच्याकडे बघत म्हणाले, “तुला अजिबात ओळखलं नाही. पुढं गेल्यावर लक्षात आलं. कुठं निघालीस? चल. सोडतो तुला.” म्हणत त्यांनी बाजूचं दार उघडलं. ती आत बसल्यावर दार लावून त्यांनी काचा वर केल्या. टिंटेड काचा असल्यामुळे आतलं काहीही दिसत नव्हतं. आत ए.सी.चा गारवा जाणवत होता. हंसासारखी डौलदारपणे तरंगत जाणारी आधुनिक कार!

“गावातच राहतेस, सतत पुस्तकं वाचतेस म्हणून समजलं. का? बेंगळुरू सोडायला काय झालं?” त्यांनी विचारलं.

“मला बसस्टँडला जायचंय. कुणिगलला चाललीय. त्या दृष्टीनं कुठेतरी सोडा मला!”

“ते ठाऊक आहे मला. आमच्या गावची प्रतिनिधी तू एकटीच आहेस. भेटून बरेच दिवस, खरंतर वर्षं झाली. चार वर्षं झाली असतील, नाही का? सुख-दु:खाच्या चार गप्पा मारू या. नंतर जा. आता कुठे जाऊ या? सांग. बेंगळुरूमध्ये एकांतात निवांतपणे बोलत बसता येईल, अशी जागाच नाही. कब्बन पार्कमध्ये बसायचं?”

तिनं मान हलवली. तिच्या खांद्यावर हातानं थोपटत ते ‘गुड गर्ल!’ म्हणाले.

“एका हातानं ड्राईव्ह करू नका. बेंगळुरूचं ट्रॅफिक आहे.” तिनं किंचित असमाधान दाखवत म्हटलं.

“का? ॲक्सिडेंट झाला तर ‘प्रोफेसर शास्त्रींबरोबर प्रसिद्ध सिनेकलाकार रझिया होत्या’ अशी बातमी वृत्तपत्रात छापून येईल म्हणून घाबरतेस?” तिच्या खांद्यावरचा हाताचा दाब वाढवत त्यांनी विचारलं.

यावर काहीतरी तीव्र उत्तर द्यावंसं वाटलं, तरी पटकन काही सुचलं नाही. त्यांनीच पुढे विचारलं, “खेड्यात राहतेस ना? केसांना डाय का करून घेत नाहीस? चेहऱ्याला क्रीम का लावत नाहीस? कुणीही जीवनावरचं प्रेम गमावता कामा नये. माझंच पाहा ना!”

कारमध्ये बसतानाच तिनं त्यांच्याकडे पाहिलं होतं. कानांवर थोडे पांढरे आणि इतर सगळे केस मध्यमवयीन दिसण्यासाठी काळे रंगवले होते. सोशॅलिस्ट पद्धतीच्या दाढीच्या अधेमधेही मोजकेच पांढरे केस ठेवून इतर दाढी डाय केली होती. हे केवळ पार्लरमधील तज्ज्ञांकडूनच करवून घेणं शक्य आहे, हे स्पष्ट होतं. नाटक-सिनेमाच्या क्षेत्रातल्या वावरामुळे हे पाहताक्षणी लक्षात येणं अत्यंत स्वाभाविक होतं म्हणा! तिच्या मनात त्यांच्याविषयी दया निर्माण झाली.

"सर, तुमची मुलं काय करतात?"

"मुलगा कॉम्प्युटर कंपनी चालवतो. लग्नही झालंय."

"नातवंडं? मुलगी काय करते?"

'हे प्रश्न विचारून ही मला माझ्या वयाची जाणीव करून तर देत नाही? तिच्या प्रश्नाचा रोख काही का असेना, आपण ते मनावर घ्यायचं कारण नाही.' तिचा प्रश्न अत्यंत स्वाभाविकच आहे, असं भासवत ते उत्तरले, "मुलगा आणि सून दिवस-रात्र राबून कंपनी वाढवताहेत. चार वर्षांचा एक नातू आहे. सुनेला आणखी मूल नकोय. कामाचा लोड वाढतोय, त्यात आणखी एका मुलाला वाढवायची जबाबदारी अंगावर घ्यायला ती तयार नाही. सगळ्या स्त्रियांनी आपापल्या करिअरसाठी असाच निर्णय घ्यायचा ठरवलं तर, मला तर काळजी वाटते, या पृथ्वीतलावरून मानवाची जातच नाहीशी होईल की काय!"

"याचा अर्थ, तुम्हाला आणखी एका नातवंडाची इच्छा आहे. नाही का?" आता कुठे तिलाही सूर सापडला.

"मी स्वत:ची भावना नाही सांगितली. मी कधीच स्वत:पुरता विचार करत नाही, हे तुलाही ठाऊक आहे. जेव्हा तुम्ही सार्वत्रिक सत्य मांडू शकता, तेव्हाच तुमच्या विचारांना वजन प्राप्त होतं." महानगरातल्या गर्दीच्या रस्त्यावरून कार चालवत असतानाही त्यांच्या दृष्टीत तत्त्ववेत्त्याची छटा उमटू लागली.

"आणि मुलगी?"

"तिचीच काळजी आहे. लेक्चरर म्हणून नोकरी करते. तुझा तू नवरा शोध, असं सांगून चार वर्षं झाली. पण आपला जोडीदार शोधण्याची शक्ति आपल्या देशात अजून तरुणांमध्ये आलेली नाही. अजून इथला समाज बदललेला नाही. इथले तरुण अजूनही जुन्या पद्धतीतच वावरतात. बरं, मी ठरवावं म्हटलं तर, यू नो दि प्रॉब्लेम!"

बागेत त्यांना एक बाक मिळाला. तिथं बसताना त्यांनी सांगितलं, "या पार्कवरही कब्जा करण्याचा काही जणांचा प्रयत्न होता. 'कब्बन पार्क बचाओ' आंदोलन सुरू करून मी ही बाग वाचवली. तुला ठाऊक नाही ते प्रकरण? माझी सरकारला भीती वाटते आणि माझ्यावर रागही आहे."

तिच्या मनात वेगळा विचार चालला होता.

"अशा ठिकाणी बसलं, की मनाचा प्रवाह वेगळ्याच दिशेला वाहू लागतो. म्हणूनच बागांना नगरांचं अंतर्मन म्हणायचं. कसला विचार चाललाय?"

"तुमच्या मुलीचं वय काय?" तिनं विचारलं.

"अरुणा तिचं नाव. विसरलीस? अठ्ठावीस."

"आठवलं. गोरी, आईसारखी युरोपियन वळणाची आहे ना?"

"तिकडच्या आजीसारखी आहे. मीही पाहिलं होतं तिला. अतिशय सुंदर! एलिझाबेथही हेच म्हणते. का?

कुणी मुलगा आहे का माहितीचा?"

"माझ्या मुलाचंही लग्न करायचंय. बत्तीस वर्षांचा आहे. टेक्सास युनिव्हर्सिटीमध्ये पेट्रो-केमिकल इंजिनियरिंग करून सौदीत मोठ्या पगाराच्या नोकरीवर आहे. आता आलाय तो इथे. अलीकडे आमिरशीही फारसा संपर्क राहिलेला नाही. त्यानं दुसरं लग्न केल्याचं तुम्हालाही ठाऊक असेल. मुलासाठी बायको शोधायला ही एक अडचण झाली आहे."

"आमिरनं हे असं केल्याचं माझ्याही कानावर आलं. आधी समजलं असतं तर मी त्याला असं करू दिलं नसतं. तू मला का नाही सांगितलंस?"

"मला तरी कुठे ठाऊक होतं? आता तो विषय नको. नझीरला चांगली मुलगी मिळणं महत्त्वाचं आहे."

"दिसायला तो देखणा असलाच पाहिजे, म्हणा! तुझा मुलगा!"

तिनं पर्समधून एक फोटो काढून त्यांच्या हातात दिला. तो पाहताक्षणी त्यांच्या चेहऱ्यावर पसंतीदर्शक भाव उमटले. भुवया उंचावल्या गेल्या. ते म्हणाले, "वा! सोशलिस्ट इंटलेक्च्युअल दिसतोय."

"नाही! ही इस्लामिक दाढी आहे. त्यातही खास सौदी!"

"इस्लाम आणि सोशॅलिझममध्ये विरोध नाही. 'वाटून खाऊ या' या तत्त्वावरच इस्लामही उभा आहे ना?"

'सर! तुम्ही हे सरधोपट विधान करताय, ते चुकीचं आहे. उलट, अमीर-गुलाम हेच या समाजाचं मूळ लक्षण आहे. चुकीचे संदर्भ चुकीच्या ठिकाणी देत भाषणं करायची सवयच आहे तुम्हाला...' असं काहीतरी तिखट बोलायची इच्छा झाली तरी तिनं स्वत:ला आवरलं. वादविवादाची ही वेळ नव्हे.

अजूनही प्रोफेसरांच्या भुवया उंचावलेल्या होत्या. नंतर म्हणाले, "मुलगा सौदीमध्ये भरपूर पगार मिळवतोय तरी तू का जुनी साडी नेसलीस?"

"हव्या तेवढ्या नव्या साड्या विकत घेण्याइतका पैसा माझ्याकडेही आहे. पण तशी आवड नाही."

"दॅट्स गुड! मुलांकडून कधीही काहीही घेऊ नये. माझंही हेच तत्त्व आहे. आमिर कसा आहे याबाबतीत?"

"मला ठाऊक नाही. पण घेत नसावा, म्हणूनच याला त्या घरी राहायचा संकोच वाटून हॉटेलमध्ये उतरलाय." हे उत्तर देऊन झाल्यावर काही क्षणांनी तिच्या लक्षात आलं, 'नझीरवर त्याच्या आई-वडिलांची जबाबदारी कितपत आहे, हे जाणून घेताहेत हे!'

"मी स्वत:च वेगळ्या जातीच्या, वेगळ्या देशातल्या मुलीशी लग्न केलंय. तेही चाळीस वर्षांपूर्वी. माझ्या मुलीनं कुणाशीही लग्न केलं तरी माझा विरोध नाही. तरीही मुलगा भारतात असता तर बरं झालं असतं, असं मला वाटतं. कारण परस्परांचे आचार-विचार परस्परांना ठाऊक असतात. मुलगा ख्रिश्चन असला पाहिजे, असा माझ्या बायकोचा हट्ट आहे. हे सगळे धर्म व्यवहारानुसार वाकू शकतात, हे तुलाही ठाऊक आहे. सगळ्यांनाच ठाऊक आहे हे. आधी मुलगा-मुलगी एकमेकांना पाहू देत, भेटू देत." ते म्हणाले.

मुला-मुलीनं प्रोफेसरांच्या घरी एकमेकांना पाहिलं. दोघंही एकमेकांना आवडले. कुणाच्याच इतर काही अटी-अपेक्षा नव्हत्या. नझीरचं एकच म्हणणं होतं, 'आपल्या होणाऱ्या पत्नीनं आधी मुस्लीम झालं पाहिजे, त्यानंतर मुस्लीम रिवाजाप्रमाणे निकाह झाला पाहिजे.' त्यानंतरही घरात मुस्लीम पद्धतीचंच जीवन राहील, ही मुलाची अटही मुलीनं क्षणाचाही विलंब न लावता मान्य केली. तिच्या आईनं मात्र याला विरोध केला, "येशूची साथ सोडली तर धगधगत्या नरकात जावं लागेल, हे तुला ठाऊक नाही?"

यावर मुलीनं उत्तर दिलं, “एका प्रवाद्याला सोडून दुसऱ्या प्रवाद्याला शरण जातेय मी! ते प्रवादी शिक्षा करायला आले तर हे प्रवादी वाचवतील. तुझ्या प्रवाद्यापेक्षा महंमद (स) अधिक बलाढ्य आहेत. त्यांनी कितीतरी युद्धं करून ती जिंकली आहेत. या गालावर मारलं तर दुसरा गाल पुढे कर, म्हणून सांगणाऱ्या येशूकडे मारायची शक्तिही नाही आणि मारणाऱ्यांपासून रक्षण करण्याची शक्तिही नाही.”

आपल्या मुलीच्या तोंडून असं काही उत्तर येऊ शकेल, याची कल्पनाही तिच्या आईला नव्हती.

प्रोफेसरांनी नझीरला सांगितलं, “तिला हवं तर मुस्लीम होऊ द्या. पण तुम्ही सिव्हिल मॅरेज करा.”

“अंकल, मी मुस्लीम मुलीशी लग्न केलेलं नाही असं समजलं तर, यानंतर रिट्रेंच झाल्यावर सौदीवाले मला कामावरून पिटाळून लावतील. आधी ती मुस्लीम होऊन नंतर लग्न केल्याचं सर्टिफिकेट मौलवीनं दिलं पाहिजे. तिचं नाव, तिचा धर्म, तिचा नवरा– सगळं मुस्लीम असल्याच्या आधारावरच तिचा पासपोर्ट तयार झाला पाहिजे. नाहीतर व्हिसा मिळणार नाही आणि तुम्ही म्हणता त्या सिव्हिल मॅरेजची काय किंमत? ते कशाला हवं?”

“मी स्पष्टच बोलतो. तुझ्या आई-वडिलांच्या लग्नात मीच पुढाकार घेतला होता. तुझ्या आईला मुस्लीम व्हायलाही मीच प्रोत्साहन दिलं होतं. आता ती असताना तुझ्या बापानं दुसरं लग्न केलंय. सिव्हिल मॅरेजचं बंधन असतं तर तो असा वागला नसता. आपला आजचा विचार कितीही स्पष्ट असला तरी पुढे परिस्थिती कशी फिरते, आपलं मन कसं बदलतं ते आज कसं सांगता येईल? मुलीचा बाप म्हणून मला याची काळजी नको घ्यायला?” त्यांनी नम्रपणे, अधूनमधून मंद हास्याची पखरण करत सांगितलं.

“माझ्या आई-वडिलांमध्ये नेमकं काय घडलंय, हे मला ठाऊक नाही. माझा माझ्या आईवर जीव आहे आणि हेही लक्षात घ्या, माझ्या वडिलांनी माझ्या आईला तलाक सांगितलेला नाही. हे कौतुकास्पद नाही का? त्या दोघांमधल्या नात्याचं विश्लेषण आपण कसं करणार?” तोही तितक्याच नम्रपणे मंद हसत म्हणाला.

“सौदी किंवा मुस्लीम देश सोडले तर तुला इतर कुठे नोकरी मिळणार नाही का?”

“अंकल, दॅट्स नॉट द पॉईंट! माझं सलमावर प्रेम आहे. माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी प्रेम करतच राहीन. तुमच्यासारख्या सीनियर्सनी यावर विश्वास ठेवला नाही तर इतर कसे ठेवतील? का? समजलं नाही का? सलमा तुमच्या मुलीचं नाव. तिलाही आवडलंय हे नाव!” म्हणत त्यानं भावी सासऱ्यांच्या दंडावर हात ठेवला. यानंतर त्याच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही, हे प्रोफेसरांच्या लक्षात आलं.

तो गेल्यावर त्यांनी मुलीपाशीही हाच विषय काढला, “माझं ऐक, आधी सिव्हिल मॅरेज करा. नंतर निकाह होऊ दे. म्हणजे नंतर तो दुसरं लग्न करायला गेला तर त्याला अडवता येईल.”

यावर ती म्हणाली, “डॅडी! एकमेकांवर विश्वास नसेल तर संसार कसा होईल? लग्नाआधीच त्याच्यावर अविश्वास दाखवला तर कदाचित लग्नच मोडेल.”

“मोडलं तर मोडू दे. आपण दुसरा मुलगा शोधू या.”

“डॅडी, माझं नझीरवर प्रेम बसलंय. तुम्ही नका काळजी करू आणि प्लीज, तो दुखावला जाईल, असं काहीही बोलू नका. लग्नानंतर बायकोनंच नवऱ्याबरोबर अॅडजेस्ट व्हायचं असतं ना?” तिनं स्पष्ट शब्दांत सांगून टाकलं.

फक्त एका आठवड्यात तिचं नझीरवर एवढ्या प्रमाणात प्रेम जडलं? त्यांना आश्चर्य वाटलं. पाठोपाठ आठवलं, ‘इंग्लंडमध्ये असताना आपल्याला एलिझाबेथविषयी हीच भावना होती. तिच्यामधल्या मर्यादा अजिबात लक्षात आल्या नव्हत्या. जगातल्या सर्वच्या सर्व सुशिक्षित मुसलमान स्त्रिया पुरुषांच्या या हक्काविरुद्ध आवाज उठवत असताना, या आपल्या मुलीनं त्या अधिकारापुढे का मान तुकवावी? ही खूप

हुशार नाही, पण ढ ही नाही! एवढी साधी गोष्ट समजायला काहीच हरकत नाही. असं का व्हावं?'

'सारी रात्र विचार करण्यात गेल्यावर दुसरे दिवशी उत्तर सुचलं. आता ही अठ्ठावीस वर्षांची झाली. गेल्या दहा-बारा वर्षांपासून शरीराची भूक त्रास देत असेल. पाश्चिमात्य देशांमध्ये सोळाव्या वर्षांनंतर ती भागवायला कायद्याची संमती आहे. त्या संदर्भात काय काळजी घ्यायची याचीही त्यांना माहिती असते. त्यामुळे लग्नाचा निर्णय घेताना ही दडपलेली भूक महत्त्वाची भूमिका बजावत नाही. ही इथे वाढलीय. शिवाय आई कर्मठ कॅथॉलिक. नझीरला पाहताक्षणी त्याच्यावर जीव जडला. त्यामुळे तो म्हणेल त्या प्रत्येक गोष्टीला हिनं संमती दिली आहे. त्याच्या समर्थनार्थ ती माझ्याशी वाद घालण्याइतकी धीटही झाली. लग्नाच्या जोखडाखाली स्त्रीनं आपल्या सर्वस्वाचा होम करायची अजिबात गरज नाही, असं सुशिक्षित, सुसंस्कृत जग ओरडून सांगत असताना; या विषयावरील माझ्या स्फूर्तिदायक भाषणांमुळे कितीतरी जागरूक महिला माझ्या चाहत्या बनल्या असताना माझीच मुलगी अशी का झाली?'

त्यांनी लक्ष्मीलाही सांगितलं, "तू तरी तुझ्या मुलाला निकाह करण्याआधी सिव्हिल मॅरेज करायला सांग." तिलाही हे मनापासून पटलं. हॉटेलमध्ये जाऊन तिनं हे मुलालाही पटवून द्यायचा प्रयत्न केला. त्यानं सांगितलं, "अम्मीजान, निकाह हा शरियतशी संबंधित आहे. त्याआधी सिव्हिल मॅरेज करून, त्यानंतर निकाह केला तर तो केवळ नाम के वास्ते होणार नाही का?"

"नामके वास्ते नव्हे रे! दोन्ही एकमेकाला पूरक आहेत."

"उगाच काहीतरी फाटे फोडू नका तुम्ही. शरियतमध्ये नवरा आणि बायको दोघांनाही सारखेच अधिकार आहेत. निकाहच्या करारात 'मी तुला सोडलं तर इतकी रक्कम देईन' असंही एक कलम असतं. तलाकचा प्रसंग आला तर कबूल केलेली रक्कम घेऊन तिनं जागा रिकामी केली पाहिजे. लग्न म्हणजे एक करारच ना?"

"तुझ्या बापानं केलं तसं! हिच्यावरचं आकर्षण कमी झाल्यावर आणखी एक-दोन लग्नं केलीस तर?"

"केली तरी प्रत्येकीला सारख्या न्यायानं वागवलं पाहिजे असं शरियतमध्ये सांगितलंय. हा धर्म सोडून मी कधीही वागणार नाही. माझा इस्लामवरचा विश्वास गाढ आहे. वरवरचा नाही."

याच्याशी या विषयावर फार बोलण्यात अर्थ नाही, हे तिच्या लक्षात आलं. 'आपलं चुकलंच. याच्यासाठी अशाच एखाद्या कर्मठ मुस्लीम घरातली मुलगी शोधायला हवी होती. याला सुशिक्षित आणि आधुनिक घरातली बायको मिळावी म्हणून प्रोफेसरांकडे लग्नाचा विषय काढला. तीही याच्या सगळ्या अटी मान्य करून राहायला तयार झालीय. पण पुढील संभाव्य धोक्याची तिला पूर्ण कल्पना असेल का? प्रोफेसरांनी तिला ते सांगितलं असेल का? कुणाची मुलगी असली तरी, तिच्यावर अन्याय होता कामा नये.'

हॉटेलबाहेर येताच तिनं प्रोफेसरांना फोन करून जे घडलं ते सांगितलं. नंतर म्हणाली, "मला माझ्याच मुलाच्या लग्नात विघ्न आणायचं नाही. मी तुम्हाला फोनवर बोलले हेही कुणाला समजू देऊ नका. तुम्हीच तुमच्या मुलीला सांगा. आधी सिव्हिल मॅरेज होऊ दे, म्हणून तिलाच हट्ट धरायला सांगा. यावरून हे लग्न मोडलं तरी त्यासाठीही तिला तयार राहा म्हणावं!"

"ते शक्य झालं नाही, म्हणून मी तुझ्याशी बोललो होतो."

"का? एवढा विश्वास जडलाय तिचा त्याच्यावर?"

"फोनवर बोलण्यासारखा हा विषय नाही. प्रत्यक्ष भेट होईल, तेव्हा सगळं सांगेन."

अरुणा सलमा होऊन सौदीला गेली, त्याला दोन महिने होऊन गेले तरी प्रोफेसरांच्या मनातला सल कमी झाला नाही. 'मी माझ्या मुलीला नीट शिक्षण दिलं नाही, तिला तिच्या पायावर उभी राहण्याइतकं बळ दिलं

नाही, तिचं लग्नही नीट करून दिलं नाही.’ आपली मुलगी कॅथॉलिक धर्म सोडून गेली, या गोष्टीची त्यांच्या पत्नीलाही मोठीच खंत होती. तिच्या मनातली तार्किक विचार करायची शक्ति दुबळी केली म्हणून नवऱ्याचा बायकोवरचा राग उफाळला होता. उलट, इतिहासकाळापासून शत्रुत्वाचं नातं असलेल्या इस्लामचा स्वीकार करून त्या धर्मातल्या माणसाशी आपली मुलगी लग्न करून निघून गेली, याला जबाबदार तिचा बाप आहे, म्हणून बायको धुमसत होती. घरात मौन साकळलं होतं. स्वयंपाकाला बाई असल्यामुळे त्या मौनाचा भंग व्हायचा प्रसंगही येत नव्हता. किंबहुना गरजही भासत नव्हती.

मुलगी निघून गेली आणि प्रोफेसरांना त्यांच्या आईची आठवण छळू लागली. तसं बघायला गेलं तर या दोन्ही गोष्टींचा परस्परांशी काहीही संबंध नव्हता. ‘उगाच मनात येऊन गेलं, कुठलासा कवी म्हणतो, आईच मुलीच्या रूपानं घरात जन्म घेते. खरं असेल का हे? आईचं वय काय असेल? ऐंशी-पंचाऐंशी. मी जन्मलो तेव्हा ती पंधरा वर्षांची होती, म्हणे! त्या काळी असंच असायचं. मी एकटाच मुलगा. झाली बरीच, पण मी एकटाच जगलो. अशाच चार मुलीही जगल्या. त्या विश्वातून बाहेर पडल्यावर सगळं जगच बदलून जातं. ही एलिझाबेथ तरी काय! म्हटलं, ‘तू धर्म बदलायची काहीही गरज नाही. साडी नेस, कपाळावर कुंकू लाव, हातात बांगड्या घाल. एवढं केलंस तरी आई तुझा सून म्हणून स्वीकार करेल.’

पण तिनं ऐकलं नाही. उलट म्हणाली, “तुम्ही शब्द दिलाय, माझ्यावर तुम्ही कुठलेही आचार लादणार नाही, म्हणून!” तिनं बेंगळुरूच्या मोठ्या चर्चमधल्या फादरना विचारलं. त्यांनी तर स्पष्ट शब्दांतच बजावलं, “नो! नो! नो! डोंट एंटरटेन एनी नॉनख्रिश्चन प्रॅक्टिस!” तिच्या या हट्टामुळे तिला गावी घेऊन जायचा प्रश्नच नव्हता.

मी मात्र दर तीन वर्षांनी एकदा जाऊन येत होतो. पैसे देऊ केले तर अप्पांनी तेही नाकारत त्यांनी सांगितलं, “नको! आमच्या गरजेला पुरेल एवढं नरसिंहदेव देतोय.”

आईला विचारलं, “अम्मा, तुला कसला दागिना पाहिजे, सांग. पुढच्या खेपेला येताना घेऊन येईन.” तर ती म्हणाली, “मला म्हातारीला काय करायचेत दागिने? तूच मुलं-बाळं असलेला संसारी माणूस आहेस. तुलाच राहू देत पैसे.”

त्या वेळी पगारही बेताचाच होता म्हणा! शिवाय ब्रिटिश स्टँडर्डनं घर चालवणं भाग होतं.

ते गोमांसाचं प्रकरण झालं नसतं तर संबंध इतके तुटले नसते.

मी आधुनिक विचारवंत म्हणून नावलौकिक मिळवू लागलो, त्या काळात घडलेली घटना. आपले ऋषी-मुनीही गोमांस भक्षण करायचे, या मुद्द्यावर भर देऊन मी एक दीर्घ लेख लिहिला होता. लेख प्रकाशित झाल्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटली. घरावर भला मोठा मोर्चाही चालून आला होता. पोलिसांचा पहारा नसता तर त्या दिवशी, माझ्या घराच्या खिडक्या शिल्लक राहिल्या नसत्या. माझा जीव गेला नसता तरी माझे हात-पाय नक्की मोडले असते. मी न डगमगता पुढच्या अंकात आणखी एक लेख लिहिला. त्यात लिहिलं, “गोमांस खाणारे आणि न खाणारे या दोघांनीही विचार केला पाहिजे. न खाणाऱ्यांनी खाणाऱ्यांचा निषेध केला तर त्यांना बाहेर ठेवल्यासारखं होईल. याचाच परिणाम म्हणून पुढच्या काळात राष्ट्राचं विभाजनही होऊ शकेल. भारताबाहेर कुठेही गोमांसभक्षण निषिद्ध मानलेलं नाही. परदेशी राहात असताना मीही नियमितपणे खात होतो. आताही शक्य असेल तेव्हा मी खात असतो. मी भारतीय नाही, असं म्हणायचा अधिकार कुणाला आहे?...”

हा लेख प्रसिद्ध झाला, त्या वेळेपर्यंत सनातन्यांचा राग ओसरला होता. आम्हाला पोलिसांचं– पर्यायानं सरकारचं रक्षण होतं. आम्हीही अधून-मधून सेमिनारमधून हा विषय जिवंत ठेवत होतो.

यानंतर वर्षभरानंतरच गावी जाऊन येऊन तीन वर्षं झाली होती. काळेनहळ्ळीच्या सोशलिस्ट पुढारी प्रकाश गौडांच्या मुलीच्या लग्नाला जायचं होतं. नाही गेलं तर पक्षाशी स्नेह कसा वाढेल? एवढ्या जवळ गेल्यावर आई-वडिलांना न भेटता आलो तर गावचे लोक बोलल्याशिवाय राहणार नाहीत, हे ठाऊक होतं. गावची बरीच माणसं लग्नाला आली होती, तीही ‘गावाकडं न येताच जाणार?’ म्हणून विचारत होती.

दुपारी जेवण झाल्यावर तीन वाजता कारनं गावी गेलो. घरात पाऊल टाकलं. आत ओसरीवर आई फुलवाती वळत बसली होती. आधी तिला माझी ओळखच पटली नाही. त्या वेळेपर्यंत मी जे.पीं.चा ड्रेस घालायला सुरुवात केली होती. मीच सांगितलं, “मी आलोय! मी!”

आतून आप्पा आले. त्यांनी विचारलं, “प्रकाश गौडाच्या मुलीच्या लग्नाला आला होतास? थांब!” म्हणत ते आत गेले. आतून वृत्तपत्र घेऊन पुन्हा बाहेर आले. ते माझ्यापुढे धरत त्यांनी विचारलं, “गोमांस-भक्षण करतो म्हणून लिहिलंयस. खरंय हे?”

या अचानक धक्क्यानं माझं तोंड बांधल्यासारखं झालं. तरी क्षणभरात सावरून म्हटलं, “आप्पा, बाहेरच्या राजकारणात काहीतरी बोलावं लागतं, लिहावं लागतं. त्यावर तुम्ही विश्वास ठेवता?”

“पण असलं खोटं कशाला सांगायला जातोस? तुला जिभा तरी किती आहेत? माणूस आहेस ना? जन्मदाते आई-वडील समोर आहेत. आता सांग, खरं काय ते!” त्यांनी जाब विचारला.

मलाही राग आला. म्हटलं, “तुम्हाला भेटून जावं म्हणून आलोय. समजा, चुकून कधी तरी खाल्लं, तर काय बिघडलं? गाई-गुरं न पाळणारे चीन-मंगोलियासारखे देश सोडले तर जगभर सगळीकडे गोमांस सर्रास खातात. आपल्या देशातही किती टक्के लोक खातात, ठाऊक आहे? एकानं दुसऱ्याचा आहार नियंत्रित करणं, हा फॅसिझम आहे! लोकशाही नव्हे!...”

“उत्तम! निदान कबूल तरी केलंस. तुझ्यासारख्या पुत्ररत्नाला जन्म दिल्याबद्दल मी आणि तुझी आई प्रायश्चित्त घेऊ.” म्हणत ते आत निघून गेले. मीही रागारागानं कारमध्ये येऊन बसलो आणि कार सुरू केली.

नंतर प्रकाश गौडांकडून सगळी बातमी समजली. ते वृत्तपत्र यांच्या घरी आणून वाचून दाखवायचा उद्योग नरसिंहप्पानं केला म्हणे. त्याच्या मुलीचं लग्न मुसलमान आमिरशी होण्यासाठी मी पाठिंबा दिला, म्हणून तर त्यानं सूड उगवला नसेल? की, हा नरसिंहप्पा गांधीवादी. गांधी गोपूजक. वैचारिक प्रवाह पुढे वाहत असताना अगदी जवळची नातीही दूर दूर जातात. जगाला मार्गदर्शन करून पुढे नेणाऱ्या प्रत्येक महापुरुषाच्या चरित्रात हेच दिसतं. अज्ञानी आई-वडील-भावंडं दूरच जातात. त्या क्षणी जर या महापुरुषांनी भावुकता दाखवली असती तर ते महापुरुष झालेच नसते! याच विचारांनी गेली पंचवीस वर्षं बळ दिल्याचंही आठवलं.

अरुणा सिव्हिल मॅरेजचं कवच पांघरून गेली असती तर आईची आठवण अशी छळायला आली नसती की काय, कोण जाणे! कसा कशाशी संबंध जोडला जातोय? आश्चर्य वाटलं. त्या घटनेनंतर अम्मा-अप्पांचं सगळं प्रेम-वात्सल्य त्या चार मुली आणि नातवंडांपुरतंच उरल्याचंही समजत होतं. बातम्या समजतात, पण संबंध राहिले नाहीत. अम्मा पंचाऐंशीच्या घरात आहे. एवढं वय झालंय! केव्हा काय घडेल कोण जाणे! आप्पा तर त्र्याण्णवचे. शंभरी सहज गाठतील, ओलांडतीलही. पण काहीही झालं तरी तिथल्या उत्सवामध्ये मला सहभागी होता येणार नाही. एवढी वर्षं परस्परांपासून दूर राहिल्यावर हे कसं शक्य होईल? मानवी संबंधांपेक्षा एका प्राण्याचं मांस खाणं, न खाणं महत्त्वाचं मानणारा हा कसला धर्म? या धर्माला उभा-आडवा छेदून, त्याचे तुकडे तुकडे करून कितीही लेख लिहिले, कितीही भाषणं केली तरी ढिम्म न होता जसाच्या तसा आहे.’

त्यांच्या जिवाची तगमग झाली.

११

प्रोफेसर शास्त्रींना अमेरिकेतून एक मेसेज आला. तिथे नॉर्थ-ईस्ट युनिव्हर्सिटीत वेगवेगळ्या देशांमधील वैचारिक प्रवृत्तींच्या संदर्भात चाललेल्या एका अभ्यासक्रमामध्ये आजच्या भारतातील वैचारिक प्रवृत्तींवर आठवड्यातून दोन लेक्चर्स देण्यासाठी दोन महिन्यांसाठी भेट द्यावी, अशी त्यांना विनंती करण्यात आली होती. या आमंत्रणामागे तिथल्या वैचारिक मित्राचा– टॉमचा हात असला पाहिजे, हे त्यांच्या लक्षात आलं. हा अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये डाव्या विचारसरणीला वाव देऊन, तिची व्यवस्थित निगराणी करण्यात अत्यंत निपुण. तो मागे भारतात आला होता तेव्हा या संदर्भात त्याच्याशी झालेलं बोलणंही आठवलं. त्यांनाही कंटाळा आला होता. तेवढीच अमेरिकेची वारी झाली की कंटाळा पळून जातो, असा त्यांचा अनुभव होता. शिवाय डॉलरची मुबलक प्राप्ती होईल. कारही बदलता येईल.

पण यात एकच अडचण होती. बनारसमधल्या एका सेमिनारमध्ये बीजभाषण करण्याचं निमंत्रण त्यांनी आधीच स्वीकारलं होतं. तिथला काही फार ग्रेट अनुभव असणार नाही, याची त्यांनाही कल्पना होती. आजवर हजार ठिकाणी जे बोललोय, तेच इथेही बोलायचं. भारतातल्या सगळ्या कॉलेजमधली तरुण मुलं याच प्रकारचे प्रश्न विचारतात. रिकामाच असल्यामुळे हे आमंत्रण स्वीकारलंय. आयत्या वेळी, अमेरिकेचं कारण सांगून जाणं टाळलं तर नाव खराब होतं. त्यामुळे तो सेमिनार संपवून अमेरिकेसाठी केव्हा निघता येईल, हा विचार करत ते कॅलेंडर पाहत बसले होते. डोक्यात चक्र चाललं होतं, अमेरिकेला जायला निघण्याआधी इथल्या सगळ्या वृत्तपत्रांमध्ये ठळकपणे 'अमेरिकेमधल्या विद्यापीठातून व्याख्यानासाठी निमंत्रण' ही बातमी येण्याची व्यवस्था करायला पाहिजे. दिगंत आपल्या व्यवसायात कितीही पुढे जाऊ दे, कितीही पैसा मिळवू दे, त्याला कितीही मदत केलेली असू दे, त्याच्याकडून पैसे घ्यायला ते कधीच तयार नसत. तसं केलं तर आपला सन्मान राहणार नाही, अशीच त्यांची भावना होती. त्याला भेटायचं, क्षेमसमाचाराची बोलणी करायची, मदत हवी काय म्हणून विचारायचं. पण कधीही काहीही त्याच्याकडून घ्यायचं नाही. एलिझाबेथ त्याच्याकडे पैसे मागत असते हे त्यांना ठाऊक होतं. 'नाहीतरी बायकांना स्वाभिमान कमीच असतो म्हणा! पण हे चार-चौघांत उच्चारायची सोय नाही. स्त्रीवादी विरोधात जातील. तिलाही स्वत:ची आर्थिक प्राप्ती असती तर तिच्यातही स्वाभिमान असला असता. स्वत:ची आर्थिक प्राप्ती असती तर ती माझ्याबरोबर न राहता वेगळीही राहिली असती कदाचित! तेही तितकंसं खरं नाही म्हणा! ती कॅथॉलिक आहे...'

इकडे तिकडे धावणाऱ्या मनाला त्यांनी पुन्हा मूळ प्रश्नापाशी ओढून आणलं. त्याच वेळी दोन तिशीचे विचारवंत प्रोफेसरांना भेटायला आले. आकर्षक, टोकदार दाढी, विस्कटलेले केस, चेक्सचा शर्ट, जीन्स. कर्नाटकात एक भव्य विचारवादी संमेलन भरवण्याचा, त्याचं उद्घाटन प्रोफेसरांच्या हस्ते करायचा त्यांचा विचार होता. त्याचीच विनंती करायला ते दोघं तिथं आले होते. तसे ते दोघं ओळखीचेही होते. सांस्कृतिक-भौतिक किंवा आधुनिक चळवळीमधील सगळी मंडळी प्राध्यापकांना ओळखत होती. त्यांच्या आशीर्वादाच्या अपेक्षेनं बरेचसे प्राध्यापकांशी ओळख करून घेत होते.

आल्या-आल्या त्या दोघांनी आपल्या येण्याचा उद्देश प्रोफेसरांच्या कानावर घातला. प्रोफेसरांनीही आधी 'युरोपन वैचारिकता आत्मसात केल्यावर कसं बलाढ्य होऊन सगळं जग पादाक्रांत केलं' हे सांगून 'विचार ही शक्ति आहे, विचारहीनता ही दुर्बलता आहे' वगैरे सैद्धांतिक प्रस्तावना मांडली. आलेले तरुणही सिगारेट ऑफर करून, स्वत: ओढायचंही विसरून त्यांचं बोलणं एकचित्तानं ऐकत असतानाच फोन वाजला. "पाहिलंत ना? सोयीसाठी म्हणून घेतलेला फोन कसा आपल्या एकाग्रतेचा भंग करतो," म्हणत त्यांनी रिसव्हिर उचलला.

पलीकडे लक्ष्मीचा आवाज ऐकू आला, "सर, मी कुणिगलहून बोलतेय. तुमच्या आई वारल्या."

"आँ? व्हॉट? खरं?" बसलेला धक्का काही सामान्य नव्हता. "काय झालं होतं?"

"अलीकडे त्यांची तब्येत बरी नव्हतीच. गावात वैद्यकीय सेवा नीट नाहीत म्हणून विशालाक्षी ताईंनी त्यांना तुमकूरला नेलं होतं. गेला महिनाभर दोघंही तिथंच होते. हृदयाचा थोडा-फार त्रास होता. या वयात आणखी काही करणं शक्य नाही, असं डॉक्टरांनी सांगितलं होतं. दहन कुणी करायचं असा प्रश्न आला होता. जावईही मुलासारखाच असतो, त्यांनाच करू दे, असं शास्त्रीकाकांनी सांगितलं. बाकीची क्रियाकर्म गावातच करणार आहेत. मीनाक्षी आणि जलजाक्षीही आल्या आहेत. त्यांचे नवरे-मुलं सातव्या दिवशी येणार आहेत, म्हणून समजलं. विशालाक्षी ताई आणि त्यांचा नवरा इथेच आहेत. आज सकाळी ताईच घरी आल्या होत्या. त्याच म्हणाल्या, 'निदान तू तरी त्याला फोन करून कळव. आई गेल्याचंही कुणी कळवलं नाही, असं नको व्हायला.' त्यांना वाटतं, किती केलं तरी श्राद्धाचा अधिकार मुलाचाच असतो. म्हणून बसनं कुणिगलला येऊन फोन करतेय."

"लगेच निघतो मी! येतोच! तू आहेस ना?" क्षणभरही विचार न करता ते म्हणाले.

"वाट बघते. या. ठेवू?" म्हणत तिनं फोन ठेवला.

नाही म्हटलं तरी प्रोफेसर विवश झाले. त्यांनी सांगितलं, "आय अॅम सॉरी! माझी आई वारली. कुणिगलहून सहा मैलांवर गाव आहे. मला लगेच तिथे गेलं पाहिजे."

ते तरुणही म्हणाले, "आमची कार आहे. तुम्हाला पोहोचवून देऊ, सर!" फारसा विचार न करता प्रोफेसर कारमध्ये जाऊन बसले.

कार बेंगळुरूमधून बाहेर पडेपर्यंत सगळे गप्प होते. नंतर त्या दोघांपैकी एकानं विचारलं, "वय काय होतं, सर? तुमच्यासारख्यांना जन्म देणारी ती माता खरोखरच महान!"

विषय निघाल्यावर प्रोफेसरही आईचे एकेक गुण आठवून विस्तारानं सांगू लागले, "शंकराचार्यांनी आईची अंत्यक्रिया करून आईचं महत्त्व दाखवून दिलं आहे. इतर संन्याशांपेक्षा ते अधिक मानवतावादी, म्हणजेच विचारवादी होते..."

आधी कार लक्ष्मीच्या घरापाशी घेण्यात आली. त्यांनी तिलाही सोबत यायला सांगितलं. यावर ती म्हणाली, "तुम्हा कुटुंबीयांच्या आपसातल्या गोष्टी असतील. तिथे मी येऊन काय करणार आहे?"

"तू कुठल्याही अर्थानं बाहेरची नाहीस. तुला आलंच पाहिजे." त्यांनी आग्रह केला. एवढ्या वर्षांनंतर वडिलांपुढे उभं राहायला अवघड होत असल्यामुळे ते आपल्याला बोलावताहेत, हे लक्षात येऊन ती निघाली. सोबत आलेल्या तरुणांनीही, "मॅडम, तुम्ही आम्हाला ओळखत नाही, पण आम्ही आपल्याला ओळखतो. सगळा देशच आपल्याला ओळखतो..." वगैरे बोलून तिच्याशी ओळख करून घेतली.

ओसरीवर सुब्बण्णा भाऊजी बसले होते. मुंडण केल्यामुळे त्यांना त्यांची पटकन ओळख पटली नाही. शिवाय भेट होऊनही पाव शतक गेलं होतं. त्यांनीच "आता आलात?" म्हटलं तेव्हा आवाजावरून ओळख पटली. "आत चला. मामा आत बसलेत." म्हणत सुब्बण्णा भाऊजी त्यांना आत घेऊन गेले. सोबत आलेले दोन्ही तरुणही पाठोपाठ आत आले. सुतकात असल्यामुळे काहीही आच्छादन नसलेल्या लाकडी पलंगावर बसलेले आप्पा शतक उलटण्याची वाट पाहत असलेल्या कालपुरुषसारखे वाटले. थोडं सुजट वाटणारं नाक, पुढे आलेलं कपाळ, डोक्याचं टक्कल, गालांवर पांढरे खुंट, गुडघ्यापर्यंत धोतर, उघड्या अंगावरचं जानवं, खांद्यावर पंचा. प्रोफेसरांनी थोड्या अंतरावरून वाकून नमस्कार केला आणि अंतर ठेवूनच उभे राहिले. सुब्बण्णा भाऊजीच त्यांच्या जवळ जाऊन कानाशी ओरडले, "नाणि आलेत! नारायणराव!"

शास्त्री "ओ!" म्हणून गप्प राहिले. नंतर म्हणाले, "सगळं ठीक आहे ना?"

प्रोफेसर "हं" म्हणाले.

पुढे काय बोलावं हे दोघांनाही समजलं नाही. एवढ्यात आतून विशालाक्षी आली. तिच्यापाठोपाठ मीनाक्षी आणि जलजाक्षीही आल्या. "आत्ता आलास, अण्णा? वहिनी-मुलं बरी आहेत ना?" त्यांनी मोठ्या आस्थेनं चौकशी केली. चौघींचेही केस पांढरे झाले होते.

शेषशास्त्रींनी मुलाला बसायला सांगितलं. दोघंही लाकडी पलंगाच्या एकेका टोकाला बसले. जमिनीवरच्या चटईवर लक्ष्मी आणि बेंगळुरूहून आलेले दोघं जण बसले. सुबण्णा भाऊजीही एका खांबाला टेकून बसले. प्रोफेसर म्हणाले, "आईला हार्ट-प्रॉब्लेम होता म्हणून समजलं. मला ठाऊक झालं असतं तर बेंगळुरूला नेऊन मी तिचं ऑपरेशन करवलं असतं. परदेशी शिकून आलेले कितीतरी हार्ट-सर्जन माझ्या ओळखीचे आहेत."

"तुमकूरच्या डॉक्टरांनी सांगितलं, ऑपरेशनचा काहीही उपयोग होणार नाही, म्हणून!" विशालाक्षीनं उत्तर दिलं. पुन्हा मौन पसरलं. पुढे काय बोलावं, कुणालाही सुचलं नाही. मग विशालाक्षीच वडिलांना ऐकू येईल अशा आवाजात म्हणाली, "आम्ही तिघींनी विचार करूनच अण्णाला बोलावून घेतलंय. जावयांनी कितीही मनापासून क्रियाकर्म केलं तरी मुलानं केल्यासारखं होत नाही. मुलगा असताना त्यानंच केलं पाहिजे. नाही का?"

वडील काही क्षण गप्प होते. काहीतरी विचार करत असावेत. नंतर म्हणाले, "क्रियाकर्म आणि श्राद्धविधी कुणीही केले तरी मेलेल्या व्यक्तिला काहीही फरक पडत नाही. त्याच्या पाप-पुण्यानुसार त्याचं जे व्हायचं ते होत असतं. ज्यांना मुलं नसतात त्यांनी काय करायचं? हे सगळे विधी आत्म्याला पुढे पाठवण्यासाठी असतात. श्राद्ध करणारे मेलेल्यांवर कसलेही उपकार करत नाहीत. ते आपलं कर्तव्य करतात, एवढंच!"

"तरीही, आम्हा सगळ्यांना वाटतं, मुलगा आहे तर त्यानं पुढचे विधी करावेत." मीनाक्षी मध्येच म्हणाली.

"त्याला करायचं असेल तर करू दे. पण आधी त्यानं प्रायश्चित्त घेतलं पाहिजे."

"कळत-नकळत हातून घडलेल्या पापाचा लोप होऊ दे, असा मंत्र म्हटल्यावरच सगळ्या विधींची सुरूवात होते ना?" सुबण्णा भाऊजी सासऱ्यांपाशी येऊन, त्यांना ऐकू येईल अशा आवाजात म्हणाले.

"हे कळत-नकळत किंवा अज्ञानामुळे झालेलं पाप नाही. जाणीवपूर्वक धर्माचा धिक्कार करत, 'गोमांस भक्षण केलंय– करतोय– यानंतरही करणार आहे!' अशी घोषणा करत केलेलं पातक आहे. तसं लिहून प्रकाशित केलंय यानं! तशी भाषणं केली आहेत. इथं येऊन आमच्याशीही वाद घातलाय. त्यामुळेच ती मन घट्ट करून त्याच्यापासून दूर झाली. तिचं श्राद्ध करायचं असेल तर केवळ एक मंत्र म्हणून दर्भ चुरडण्यानं चालणार नाही."

यावर सुबण्णा भाऊजीही निरुत्तर झाले. बहिणीही गप्प बसल्या. मुलानं काय केलं पाहिजे, हे शेषशास्त्रींनीही सांगितलं नाही. आणि आपण काय करावं, असं प्रोफेसरांनीही विचारलं नाही. 'पंचवीस वर्षांपूर्वी घडलेली एक घटना मनात ठेवून आज हे वागताहेत! काय करावं म्हणून विचारणं म्हणजेच त्यांच्या पुढच्या कर्मकांडांना काही टक्के का होईना, मान्यता दिल्यासारखं होईल. छे:! आपलं चुकलंच. आपण आपली कार घेऊन यायला हवं होतं किंवा गाडी आणि ड्रायव्हर पाठव म्हणून दिगंतला फोन करायला हवा होता. त्या दोघांचंही आपल्या बोलण्या-वागण्यावर लक्ष आहे. त्यामुळे आता त्यांच्याकडे नजर जाता कामा नये.' तिथेच लक्ष्मीही बसलेली असल्यामुळे तिकडे बघणं आणखी अवघड आहे, हे त्यांना जाणवलं.

सुबण्णा भाऊजींनीच विचारलं, "सांगा. यांनी कसं प्रायश्चित्त घ्यायचं?"

"फक्त तुम्हीच बोलताय! हा प्रश्न त्याच्या मनात उमटला आहे का?" त्यांनी विचारलं.

या वयातही धर्मासंबंधीच्या बारकाव्याविषयी आप्पा अत्यंत तल्लख आहेत, हे ठाऊक असल्यामुळे मीनाक्षी म्हणाली, "म्हणजे काय! त्यानं आपण होऊनच विचारलं पाहिजे का? त्यांच्या बाजूनं आम्ही सगळे विचारतोय.

सांगा!"

काही क्षण डोळे मिटून बसलेले शेषशास्त्री काहीतरी आठवत असावेत. नंतर म्हणाले, "माझं वय झालंय. स्मरणशक्ति पहिल्यासारखी राहिलेली नाही. त्यामुळे माझाच शब्द शेवटचा असं समजू नका. क्रियाकर्म करायला विरूपाक्षशास्त्री येतील ना, त्यांना विचारा. मला तर या प्रकारच्या पापासाठी दोन प्रकारच्या शिक्षा दिसतात. एक म्हणजे परिषद, पंचायत किंवा कोर्टानं सुनावलेली शिक्षा. ही बाह्य-शिक्षा. दुसरी म्हणजे माणसानं आत्मशुद्धीसाठी स्वत:च स्वत:ला दिलेली शिक्षा. यालाच प्रायश्चित्त हे नाव आहे. पूर्वीच्या काळी या दोन्ही शिक्षा एकत्रितपणे दिल्या-भोगल्या जाण्याची पद्धत होती. अनेकदा पंचायतीच्याही लक्षात न आलेलं पाप व्यक्तिच्या हातून घडलेलं असायचं आणि व्यक्ति स्वत:च प्रायश्चित्त घ्यायची. प्रायश्चित्तामध्ये दोन मुद्दे असतात. एक म्हणजे आजवर पाप केलं त्याची शिक्षा आणि दुसरी म्हणजे यानंतर असं वागणार नाही म्हणून वचन देणं. चोरून केलेल्या पातकासाठी गुप्तपणेही प्रायश्चित्त घेता येतं. पण प्रकटपणे केलेल्या चुकीसाठी सगळ्या समाजाला समजलं पाहिजे. एवढं करून, पातकाचा परिणाम नष्ट होतो, असंही नाही. तो तर भोगूनच संपवायला पाहिजे. प्रायश्चित्तामुळे मन:शुद्धी होते, लोक-स्वीकृती होते, एवढंच! पापाचं विश्लेषणही दोन प्रकारे करण्यात आलं आहे. अजाणता, कुठलीही अपेक्षा नसताना घडलेलं पाप आणि जाणीवपूर्वक, ठाऊक असून आणि मनात काहीतरी आकांक्ष ठेवून केलेलं पाप! अजाणता केलेल्या पापासाठी कमी प्रतीचं प्रायश्चित्त पुरेसं आहे; पण जाणीवपूर्वक केलेल्या पापासाठी शिक्षाही कठोरच पाहिजे. यानं जे गोमांस भक्षणाचं पातक केलंय, त्यात गोहत्येचं पातकही अंतर्भूत आहे. मला एवढंच सांगायचंय, यानं काही अजाणता हे पातक केलेलं नाही. स्वत:ला समजून-उमजून आणि जगात डांगोरा पिटून त्यानं हे पातक केलंय. त्यामुळे प्रायश्चित्तही सगळ्या जगाला समजेल, असंच घेतलं पाहिजे. केलेल्या पापाबद्दल पश्चात्ताप सगळ्यांसमोर व्यक्त करायला पाहिजे आणि यानंतर पुन्हा हे पाप करणार नाही असा सगळ्यांसमोर शब्द दिला पाहिजे. पूर्वीच्या काळी असल्या पातकासाठी बारा वर्षं वनवास आणि तपश्चर्या करणं, असा नियम होता. बारा वर्षांनंतर वनवासातून जगून-वाचून माघारी येण्याची शक्यता कमी होती. पुढच्या ऋषी-मुनींनी ही शिक्षा बरीच सौम्य केली. यानंही प्रायश्चित्त म्हणून आपली चूक झाली हे त्याच वृत्तपत्रांमधून लिहिलं पाहिजे, भाषणांतून सांगितलं पाहिजे. अरण्यात जाण्याऐवजी यानं केवळ फलाहार करत, गावच्या नरसिंहाच्या देवळात, प्रार्थना करत काही दिवस काढले पाहिजेत. त्यानंतर होम-हवन करून पुढचे विधी करतील. नाहीतर तुम्ही विरूपाक्ष शास्त्रींशी बोला आणि ते सांगतील तसं करा." एवढं बोलून शेषशास्त्री वरच्या खुंटीवर टांगलेल्या पंचांगाकडे पाहू लागले.

पुढे कुणी काही बोललं नाही. भावाला, "तू काय म्हणतोस?" म्हणून विचारावंसं वाटलं तरी विशालाक्षीनं स्वत:ला आवरलं. ज्यांना जे सांगायचं असेल ते सांगतील, आपण यात काही बोलायचं कारण नाही ही जाणीव सगळ्यांनाच झाली होती. अप्पा या वयातही धर्माच्या संदर्भात किती कठोर आहेत, यात प्रोफेसरांचं एक मन गुंतलं होतं आणि दुसरीकडे वाटत होतं, अशी कशी मी चूक केली? मी माझी गाडी का घेऊन आलो नाही? एकीकडे वाटत होतं, अशा परिस्थितीत अप्पांशी वाद घालणं योग्य नाही. दुसरीकडे तीव्रपणे जाणवत होतं, या वयात बायको गेली तरी धर्माच्या मुद्द्यांवरून मुद्देसूद वाद घालण्याची शक्ति हे बाळगून आहेत आणि मी मात्र या वयात आईला गमावलं आणि ती प्रखरता गमावून बसलोय. त्यांना आपली हार तीव्रपणे जाणवत होती.

'आता लगोलग काहीही सांगायची गरज नाही. एक तर अप्पांचा तसा काही आग्रह नाही. त्यांनी काही कर असंही सांगितलेलं नाही. एखादा दिवस जाऊ देऊन नंतरही यावर बोलता येईल. नाही तरी पुढचे विधी सातव्या दिवसानंतरच सुरू होणार आहेत म्हणा!'

ते उठत म्हणाले, "मला अर्जंट काम होतं. लक्ष्मीचा फोन आला म्हणून तसाच धावत आलो." सगळ्यांकडे दृष्टिक्षेप टाकून अप्पांना लांबूनच नमस्कार करून ते निघालेच. दोघं तरुणही त्यांच्या पाठोपाठ निघाले. बहिणी पाठोपाठ येऊन "काहीतरी खाऊन जा... निदान कॉफी तरी..." वगैरे म्हणत राहिल्या. यावर उगाच काहीतरी उत्तर देत त्यांनी कार सुरू करायला सांगितलं.

कार गावाबाहेर आल्यावर ड्रायव्हिंग करणारा तरुण म्हणाला, "सर! संदर्भ लक्षात आला आमच्या. गोमांस-

भक्षणावरचा तुमचा निबंध तुमच्या संग्रहातही घेतलाय. कितीतरी आधुनिक संस्था, राजकीय पक्ष, मुस्लीम लीग, इंडियन ख्रिश्चन फेडरेशन, धर्मसमन्वय समित्या त्या निबंधाच्या प्रती करून वाटत असतात.”

“आपल्या धर्माला आतल्या आत किती गंज चढलाय, त्याचंच हे लक्षण! खरोखरीचा जन्म दिलेल्या आईशी असलेल्या नात्यापेक्षा आई मानलेल्या प्राण्याच्या मांसाचा विषय अधिक महत्त्वाचा होऊन जातोय इथे. यावर एक प्रखर लेख लिहून आणखी एका क्रांतीची हाक दिली पाहिजे.” प्रोफेसर म्हणाले. मघाशी जी प्रखरता पा' दाखवून पळून गेली होती, ती आता पुन्हा परतली होती.

दुसरा तरुण म्हणाला, “तुम्ही का इतके प्रखर क्रांतिकारक आणि विचारवंत झालात, हे आता लक्षात आलं.”

“सर, सकाळपासून आम्ही दोघांनीही काही खाल्लेलं नाही. तुमचाही ब्रेकफास्ट झालेला दिसत नाही. कुणिगलमध्ये काहीतरी खाऊन घेऊ या.”

तेही म्हणाले, “होय. मलाही खायचंय.”

“व्हेज की नॉनव्हेज?” कार चालवणाऱ्यानं विचारलं.

“नॉन व्हेज! अॅज ए प्रोटेस्ट!”

बार अँड रेस्तोराँमध्ये बसताना प्रोफेसरांना गरगरल्यासारखं झालं. कोसळत असल्याची भावना मनाला घेरून गेली. तिला कसला तरी आधार देऊन पुन्हा उभं करणं आवश्यक आहे. नाहीतर यातून बाहेर येणं कठीण आहे. फक्त दोन सिगारेटी ओढून पुरणार नाही. त्यांनी विचारलं, “डू यू माईंड मी ऑर्डरिंग अ पेग?”

“नॉट अॅट ऑल, सर! पण यांना ड्राईव्ह करायचंय. बेंगळुरूला गेल्या गेल्या मला ऑफिसमध्ये जायचंय. त्यामुळे मलाही...”

टेबलावर आम्लेट आणून ठेवलेलं बघून प्रोफेसरांनी विचारलं, “तुमच्या हॉटेलमध्ये बीफ बनवता काय?”

“तुम्हाला बेंगळुरूला मिळेल. इकडं आम्ही ठेवायला लागलो तर लोक हॉटेलला काडी लावून देतील. इथं हवं तर कोंबडी, बकरी मिळेल. डुकराचं मांसही क्वचित कधीतरी असतं. का साहेब, विचारताय?”

“काही नाही. सहज विचारलं.” प्रोफेसर म्हणाले. आपल्या दोन्ही साथीदारांकडे बघून ते धैर्य व्यक्त करत हसले.

नंतर कारच्या मागच्या मोठ्या सीटवर गाढ झोपी गेले.

घरी पोहोचल्यावर थोडं हलकं वाटून विचार करणं सोयीचं वाटू लागलं. मनात घोळणारे विचार आणि भावना कुणापुढे तरी व्यक्त केल्या, की त्या अधिक स्पष्ट होतात, हा त्यांचा नेहमीचा अनुभव होता. पण आता उमटत असलेले विचार आणि भावना कुणापुढे व्यक्त करणार? बेंगळुरूच नव्हे, संपूर्ण कर्नाटकात, कर्नाटकाच्या बाहेर, मुंबई-दिल्ली-हैदराबाद-कोलकत्यात बोलण्यात त्यांना गुरुस्थानी मानणारी अनेक माणसं होती. पण त्यापैकी कुणापुढेही सांगण्यासारखी ही भावना नव्हे. व्यक्त केली तर आपली प्रतिमा डागाळेल. ते सगळे आपल्यावर टीकेचा भडिमार करतील. धर्मद्रोह्यांवर धर्मनिष्ठ करतात, तशी टीका! मनातलं सगळं ओकून टाकलं तरी तागडीत तोलायला जाणार नाही असा एखादा स्नेही असता तर!

‘मेल्यावर काहीही राहत नाही, राहतात त्या फक्त आठवणी– चिंतन, भावना. शरीर, शरीराचं केंद्र असलेला मेंदू काम करत असेपर्यंत सगळं अस्तित्व. तो निष्क्रिय झाला, की व्यक्तिच्या अस्तित्वाला अर्थच राहत नाही. श्राद्धकर्म आणि मृत्युत्तर इतर सर्व कर्मकांडं हे स्मरण पुढे होत राहावं म्हणून निर्माण झाले आहेत... हे विचार मनात कितीही घोळवले तरी मनाला समाधान होईना. आईची आठवण अधिकच छळू लागली. थोरला मुलगा

आहे मी. ते कोण शास्त्री सांगतात त्याप्रमाणे मुंडण करून ते सगळे विधी केले तर आप्पा, बहिणी, मेहुणे, त्यांची मुलं, गावकरी सगळ्यांना आनंद होईल. पूर्वीपेक्षा हल्ली प्रायश्चित्ताची पद्धतही सौम्य केलीय, असं आप्पाच सांगत होते. आचरणामध्ये आणखी शॉर्टकट शोधून ते आणखी सौम्य करता येईल. एरवीसुद्धा आपण मनाविरुद्ध कितीतरी गोष्टी करत असतोच ना? वरिष्ठ अधिकाऱ्यांचं मूल माकडासारखं असलं तरी त्याला 'गोजिरवाणं' म्हणतोच ना!

शिवाय हा अनुभवही वेगळा असेल. श्राद्धकर्म हे काय प्रकरण असतं, तिथं काय-काय केलं जातं, काय-काय सांगितलं जातं, कुठल्या-कुठल्या टप्प्यावर दक्षिणा उकळली जाते या सगळ्याची माहिती अनायासे मिळेल. नंतर त्याच्या आधारानं दोन लेख लिहिता येतील.

मनातले विचार बायकोला सांगण्यात अर्थ नव्हता. तिच्याशी बोलणं संपूर्णपणे सोडल्याला एक वर्ष झालंय, एवढंच त्यामागचं कारण नव्हतं. बीफ खाल्ल्याच्या पापापासून मुक्त होण्यासाठी प्रायश्चित्त घेतो, असं सांगितलं तर तिच्या धर्माच्या आहारावर आरोप केल्यासारखं होईल. गाईपासून जेवढं मुबलक मांस मिळतं, तेवढं आणखी कुठल्या प्राण्यापासून मिळतं? बकऱ्या-मेंढ्यांपासून दहा टक्केही मिळत नाही आणि कोंबड्यांपासून एक टक्का एवढंही मिळत नाही. बीफ खायचं नाही असं ठरवलं तर माणसानं खायचं तरी काय? सगळ्या प्राण्यांना माणसासारखा जीव आहे, अहिंसा वगैरे सगळे विचार निसर्गधर्माच्या अगदी विरुद्ध आहेत. हरीण नसेल तर वाघ, बेडूक नसेल तर साप जगू शकेल का? झाडपाला खाऊन जगणारे किती प्राणी आहेत या जगात! सारी सृष्टी, सारं विश्व, सारे प्राणी परमेश्वरानं माणसासाठी बनवले आहेत, असा तिच्या धर्माचा आदेश असताना अमुक मांस वर्ज्य, तमुक ग्राह्य असं म्हणण्यात काय अर्थ आहे, असं तिचं म्हणणं. मैत्रीण नाही ती पत्नीही होऊ शकत नाही. अशा बाईशी वाद घालण्यात काहीही अर्थ नाही.

संध्याकाळी फोन वाजला. हा स्थानिक कॉल नाही. म्हणजे दिल्लीचाच. त्यांनी रिसिव्हर उचलला. पलीकडे लक्ष्मीचा आवाज, "सर, कुणिगलहून बोलतेय. तुमचे सुब्बण्णा भाऊजी बोलताहेत." नंतर सुब्बण्णा भाऊजींचा आवाज, "तुम्ही गेल्यावर अर्ध्या तासानं जयराम आला. तुम्हाला आठवतोय का? मीनाक्षीचा मुलगा. मद्रासमध्ये कॉम्प्युटर इंजिनियर आहे. आजी गेल्याचं समजल्यावर मद्रासहून गाडी चालवत आलाय. केवढी मोठी कार! त्यातून मी, ही, मीनाक्षी, जलजाक्षी सगळे मिळून तुमच्याशी बोलायचं म्हणून कुणिगलला आलोय. जावयानं कितीही मन लावून केलं तरी मुलानं केल्यासारखं कसं होईल? मातृऋण शिल्लक ठेवू नये. कुणिगलमध्ये आम्ही विरूपाक्ष शास्त्रींनाही भेटून याविषयी बोललो. त्यांनीही सांगितलंय, काळ बदललाय, मी काही शेषशास्त्रींएवढा जाणकार नाही. त्यांनी सांगितलं तेवढं पुरेसं आहे. तुम्ही मुकाट्यानं गावी या बघू! सगळे लांबचे नातेवाईक येतील. नाही तरी घरात झोपायला जागा नसेलच. पुरुषांना देवळातच झोपावं लागेल. तुम्हीही तिथेच झोपाल. तीन दिवस तिथेच राहिलात तर कुणाच्या लक्षातही येणार नाही. फळं भरपूर मिळताहेत, शिवाय फराळाच्या नावाखाली पोहे-उप्पीटही करून देतील. मला वाटतं, या प्रायश्चित्ताचं फार मोठं प्रकरण न करता, कुणाच्याही नकळत ते उरकून टाकता येईल. नंतर इतर विधीही करता येतील. थांबा. हिच्याशी बोला."

त्यानंतर विशालाक्षी. हिचा आवाज फोनवर कसा वाटतो ते मी ऐकलंच नव्हतं. तीही तेच म्हणाली. नंतर मीनाक्षी, जलजाक्षीही तेच म्हणाल्या. शेवटी जयराम बोलला, "मामा, मला बघितल्याचं तुम्हाला आठवत नसेल. पण मी तुम्हाला कितीतरी वेळा टीव्हीवर पाहिलंय. भाषण करताना, चर्चेत भाग घेताना, सार्वजनिक विषयावर प्रतिक्रिया व्यक्त करताना, महत्त्वाचं कुणी वारलं तर शोकसंदेश देताना. तुम्ही दिसलात, की लगेच बायकोला दाखवतो, हे बघ आमचे मामा, म्हणून! आजीचे दिवसकार्य तुम्ही करणं लागली मोर टनेबल. मी अचानक निघून आलोय. उद्या पहाटे मद्रासला जाईन. चौदाव्याला पुन्हा येईन." लक्ष्मीनंही पुस्ती जोडली, "मलाही वाटतं, आता तुम्ही यावं. नाहीतर तुमच्या जन्मगावाशी असलेला तुमचा संबंध कायमचा पुसला जाईल. जननी-जन्मभूमी एकच ना?"

ते सगळे एवढं सांगत असताना प्रोफेसरांच्या मनातले विचारही स्पष्ट होऊ लागले. 'देवळात तीन दिवस राहणं, तीन रात्री झोपणं हाही एक वेगळाच अनुभव होईल. नंतरही घरात घुसमटल्यासारखं वाटलं तर लक्ष्मीचं घर आहे. लहान असताना याच देवळात मित्रांबरोबर किती खेळ, किती दंगा चालायचा! त्या वेळी

कितीतरी वेळा देवळाच्या पडवीत दुपारची डुलकीही काढायचो. गुरं राखणाऱ्या कितीतरी जणांचं दुपारचं विश्रांतस्थळ तेच नाही का?'

त्यांनी सांगितलं, "ठीक आहे, लक्ष्मी! तुम्ही सगळे इतकं सांगताय. परवा सकाळी मी येईन."

फोन ठेवल्यावर प्रोफेसर सिगारेट पेटवून खिडकीबाहेर पाहत बसले. आता त्यांचं मन खरोखरच हलकं झालं होतं. 'किती सुंदर बोलतो हा जयराम! म्हणजे मद्रासच्या टीव्ही चॅनेलवरही माझ्या बातम्या वरचेवर दाखवतात तर! मन उल्हसित झालं. शेवटी रक्ताचं नातं कुठं जाईल? मी त्याचा मामा आहे. त्याच्या आईचा भाऊ! त्याच्याविषयी मनात माया निर्माण झाली. पुन्हा मद्रासला जाईन, तेव्हा त्याच्या घरी जाऊन आलं पाहिजे.'

रात्री एकटं जेवताना त्यांना कन्नड भाषाचं एक वैशिष्ट्य जाणवलं. 'सगळ्या नात्यांना दोन-दोन अर्थ आहेत इथं. कारण नात्यातल्या नात्यात मुली दिल्या-घेतल्या जात असल्यामुळे नातीही दुहेरी बनत गेली आहेत. त्याच त्याच रक्तामध्ये विवाह झाल्यावर संततीमध्ये निर्माण होणाऱ्या विकृती सोडल्या, तर किती छान आहे हे! हा जयराम केवढा असेल? बत्तीस-तेहतीस? म्हणजे अरुणापेक्षा चार-पाच वर्षांनी मोठा. छे:! घरातल्या घरात किती चांगला मुलगा होता तिच्यासाठी!' मनात चमकून गेलेली ही कल्पना त्यांना इतकी आवडली, की कितीतरी वेळ ती रेंगाळत राहिली.

रात्री अंथरुणावर पडल्यावर आणखीही एक विचार मनात आला. नाही तरी दिल्लीच्या गांधी-प्रतिष्ठानचे लोक कितीतरी वर्षं त्यांच्या त्रैमासिकासाठी लेख मागताहेत. 'गाय आणि गांधींची अर्थव्यवस्था' अशा शीर्षकाखाली यांत्रिक नांगरणी, रासायनिक खतांचा वापर न करता शेती करणं यावर न थांबता शेणखताचा वापर आवश्यक असल्यामुळे गाई-बैलांची शेतीसाठी अत्यंत गरज आहे. अशा शेतीतून आलेलं पीक प्रकृतीसाठी उत्तम असतं. त्या दृष्टीनं पाहिलं तर गोवधाचा निषेध करणं अत्यावश्यक आहे... या पद्धतीनं एक लेख लिहिला तर प्रायश्चित्तही होईल. तिथला लेख कुणी विचारवंत वाचण्याची शक्यता नाही. समजा कुणी वाचलाच तर सांगता येईल, 'गांधीअर्थव्यवस्थेत काय सत्य आहे ते मी या लेखात मांडलंय, हे माझे विचार आहेत, असं समजायचं काहीही कारण नाही.' उद्या दिवसभरात लेख लिहून रवाना करायचा आणि परवा गावी जायचं, हे निश्चित केल्यावर मन शांत होऊन गाढ झोप लागली.

सकाळचं फिरणं, पेपर पाहणं वगैरे आटोपून ते लेख लिहायला बसले. एखादा परिच्छेद लिहून होत असतानाच फोन वाजला, "सर, आम्ही!"

"फोनवर आवाजाची ओळख पटत नाही."

"काल तुमच्याबरोबर तुमच्या गावी आलो होतो ना!"

"बोला. काय आहे? मी एक लेख लिहितोय."

"डिस्टर्ब करतोय, सॉरी! पण तुम्हाला कळवणं आवश्यक होतं म्हणून फोन केला, सर! तुम्ही आईचं श्राद्ध करायला गावी जाऊन प्रायश्चित्त घेणार आहात, असं इथं काही जणांना समजलंय. तुमच्या गावी सी.आय.डी. पाठवून तुमच्या हालचालींवर पूर्णपणे लक्ष ठेवायचं आणि नंतर एक मोठा लेख लिहायचा असा त्यांचा प्लॅन आहे. म्हणून तुम्हाला कळवतोय."

"मी जाणार नाही, असं तुमच्यापुढेच ठरवलं होतं ना? तसं का नाही सांगितलं तुम्ही?"

"आम्ही सांगितलं, सर! पण ते म्हणतात, तो कसला माणूस आहे, तुम्हाला ठाऊक नाही. दाखवायला वेगळा मुखवटा घालतो आणि प्रत्यक्षात वेगळंच करतो. त्यांनी आम्हालाही हे सगळं गुपित ठेवण्याबाबत बजावलंय."

"पण तुम्ही कशाला त्यांना माझी आई वारल्याचं आणि मी गावी जाऊन आल्याचं सांगितलंत? हा वैयक्तिक

विषय, नाही का?”

“रात्री पार्टीमध्ये, असाच काहीतरी विषय निघाला होता. हिंदू धर्म किती सडलाय, हे सांगायला उदाहरण म्हणून त्या सकाळीच घडलेली ती घटना सांगितली. किती प्रतिकूल परिस्थितीत तुम्ही कसे शूरपणे झगडता, हे सांगायचं होतं आम्हाला!”

“पार्टीत कोण-कोण होतं?”

“ते सगळं घेऊन काय करायचंय, सर?”

“काळेनहळ्ळीचा प्रकाशगौडा, रामराजू, आनंदप्पा बडिगरेहळ्ळी, जयेंद्र हुणसूर हे सगळे असतील. नाही का?”

“तुम्हाला सगळं ठाऊकच आहे, सर! तुमचेही सी.आय.डी. काम करतात...”

“सी.आय.डी.ची काहीही गरज नाही. माझ्या मदतीनं उजेडात येऊन, माझ्यावरच उलटणारे क्रिमिनल हे! त्यांचं काय करायचं ते मी बघतो. त्यापैकी कुणाचाही कुठलाही लेख कुठेही छापून येऊ देणार नाही. मग माझ्याविरुद्धच्या लेखाचा प्रश्नच नाही.” प्रोफेसर संतापानं धुमसत म्हणाले. फोन ठेवल्यावर थोड्या वेळानं राग शांत झाला. तेव्हा वाटलं, ‘यांच्यापुढे त्यांचं नाव घेऊन दमदाटी केली हे ठीक झालं का? की चुकलं? जाऊ दे! त्या रांडेच्यांनाही समजू दे, मलाही राग येतो म्हणून! बोललो तेच ठीक झालं. कर्नाटकातल्या या फालतू माणसांना मी किंमत द्यायची गरज नाही. ऑल इंडिया लेव्हलवर, इंटरनॅशनल लेव्हलवर माझा वावर आहे.’ भूक जाणवली. आत जाऊन स्वयंपाकीण कॅथरीनला सांगून ब्रेड टोस्ट आणि आम्लेट करवून घेतलं. केळ्यांबरोबर टोस्ट खाल्ला, कॉफी प्यायलो आणि पुन्हा आपल्या अभ्यासिकेत येऊन त्यांनी सिगारेट शिलगावली. ‘भडवा! या काळेनहळ्ळीच्या प्रकाशगौडाबरोबर मी गोडीतच आहे. आई-वडिलांनाही कितीतरी वर्षांत न भेटणारा मी! याच्या मुलीच्या लग्नाला आवर्जून गेलो होतो. तरीही माझ्याशी शत्रुत्व करतोय. नको म्हटलं तरी असेंब्लीच्या निवडणुकीला उभा राहिला. अपेक्षेप्रमाणे पडला. मी त्याच्या बाजूनं प्रचार केला नाही, म्हणतोय! याला पूर्णपणे नामशेष केला नाही तर मीही शास्त्री नाही.

कॉम्प्युटरपुढे बसलं, तरी लेख पुढे गेला नाही. थांबलेल्या जागेवरून पुढचा विचार सुचला नाही. पंधरा मिनिटं धडपड केल्यावर वाटलं, लेख लिहिला नाही तर काय बिघडलं?’ ते उठले आणि अंथरुणावर अंग टाकलं. ‘काहीही म्हणा, बायकांचा मुलांपेक्षा जावयांवरच जास्त जीव! कुणीतरी सांगत होतं ना, शेण-शेवई आणि लेक-जावई यांचा बायकांना मोह सोडवत नाही. काही का असेना, नाही तरी त्यांचा सुब्बण्णा भाऊजींवरच जीव होता. त्यांनीही केस भादरले आहेत. त्यांनीच सगळे विधी करणं चांगलं. तो भडवा प्रकाशगौडा त्या परिसरात राहणारा आहे. मी कधी गावी आलो, कुठे राहिलो, काय जेवलो, कुणाशी काय बोललो या सगळ्यांवर पाळत ठेवेल. अगदी मी कुठे केस भादरले, कुठल्या ब्राह्मणांना नमस्कार केला, किती दक्षिणा दिली, कुठल्या गायीची पूजा करून ती दान म्हणून कुणाला दिली या सगळ्याची बित्तंबातमी मिळवून लेख लिहिल्याशिवाय राहणार नाही. लिहायचं तर लिहू दे! मला फिकीर नाही. मीही गप्प बसणार नाही. ‘शंकराचार्यांनीही संन्यास-धर्म बाजूला ठेवून आईचं श्राद्ध केलं,’ तो आधार घेऊन लेख लिहीन. मातृभक्तीचं महत्त्व जाणून न घेता, तिची खिल्ली उडवणाऱ्यांची संस्कृती मुठीत पकडून गदागदा हलवेन.’ या विचारासरशी त्यांना उभारी आली. नवी सिगारेट पेटवून त्यांनी त्या उभारीला आधार दिला.

संध्याकाळी आणखी एक मार्ग दिसला. ‘गावात सुब्बणा भाऊजींना करू दे, मी गयेत जाऊन पिंड-दान करेन आईचं! ते म्हणतात तेच सत्य असेल तर आई थेट विष्णूच्या पायाशीच जाऊन पोहोचेल! म्हणजे पुन: पुन्हा पिंडासाठी वाट बघायची कटकटच नाही राहणार. मी कुठे जाणार आहे, काय करणार आहे याविषयी कुणालाही काहीही सांगायला नको. हेच ठीक होईल. गावात चौदावं होईपर्यंत सगळे टपून बसलेले असतील. बेंगळुरूमध्येही माझ्या हालचालींवर नजर ठेवतील. मी कुठेही गेलो तरी, चोरून प्रायश्चित्त घेतलं, चोरून श्राद्ध करून आला अशी बातमी उठवतील. त्यामुळे चौदा दिवस होईपर्यंत मला बेंगळुरूमध्येच राहिलं पाहिजे. आलेला प्रत्येक फोन उचलला पाहिजे. त्यानंतर एक दिवस गयेला जाऊन आलं पाहिजे. नाहीतरी

पाटणा विद्यापीठातल्या प्रो. सिन्हांनी कधीचं सांगून ठेवलंय, एखाद्या सोयीच्या दिवशी येऊन ‘भौतिकवाद आणि प्रगती' या विषयावर दोन व्याख्यानं द्या, म्हणून! त्याला फोन करून कळवलं तर पाटणा-बेंगळुरू-पाटणा विमानप्रवास खर्च मिळेल. दोन व्याख्यानांचे दहा हजार रुपये मानधनही मिळेल. मानधनाच्या रकमेत पाटणा ते गयेच्या प्रवासाचा खर्चही निघेल.'

त्यांनी लगेच पत्त्यांची डायरी काढून पाटण्याला फोन केला. प्रा. सिन्हा भेटले. समोरचं कॅलेंडर पाहत त्यांनी दोन्ही दिवस पक्के केले. "तुम्ही कुठल्या विमानानं येणार आहात ते कळवा. मी एअरपोर्टवर येईन."

प्रो. सिन्हाही भौतिक विचारवादी, आधुनिक. एकदा त्यांच्या स्वागताच्या तडाख्यात सापडलं तर गयेला जाणं शक्य नाही. आधी पाटण्याला जायचं, तिथून थेट गयेला जायचं. तिथून आल्यावर टॅक्सीनं गेस्ट-हाऊसवर जायचं. त्यांनी सांगितलं, "कुठल्या विमानानं यायचं, ते अजून पक्कं झालेलं नाही. कसाही आलो तरी आदल्या दिवशी निश्चितपणे पाटण्याला येऊन पोहोचेन. गेस्ट-हाऊसलाही मी येईन. तुम्ही त्रास घेऊ नका. गेस्ट-हाऊसमध्ये रूम मात्र रिझर्व्ह ठेवा."

गावी चौदाव्या दिवशी वैकुं' समाराधना होईपर्यंत त्यांनी बेंगळुरू गाव सोडलं नाही. उलट या दिवसांमध्ये चार समारंभांत भाग घेतला. सार्वजनिक संदर्भात दोन विधानं केली. हे सगळं टीव्हीवर दाखवण्यात आलं. वृत्तपत्रंमध्येही फोटोंसह बातम्या छापून आल्या. गावाकडूनही कुणाचा फोन आला नाही. बहिणी, भाऊजी, लक्ष्मी– कुणाचाही! त्यांनी ठरवलं, नंतर या सगळ्यांना ठणकावून सांगायचं, तुमच्या प्रायश्चित्ताचा निषेध म्हणून मी गयेला जाऊन पिंड-दान करून आलो.

प्रोफेसर तसे उत्तर हिंदुस्थानात बरेच फिरले असले तरी त्यांचा वावर मोठमोठ्या शहरांमधून असे. विमानतळ, गेस्ट-हाऊस किंवा स्टार हॉटेल, टॅक्सी स्टँडवर त्यांच्या नावाचा बोर्ड घेऊन उभे असलेले विद्यार्थी किंवा स्वयंसेवक यांच्याशीच त्यांचा संपर्क येत असल्यामुळे त्यांना नीट हिंदी येत नव्हती. इतरांचं बोलणं जेमतेम समजायचं. पण वाक्यरचना करून बोलणं केवळ अशक्य होतं. इंग्लिशचं व्याकरण हिंदीला लावून, काही हिंदी शब्दांना इंग्लिश शब्द लावून, त्यात काही अडचण आली तर कन्नड शब्द वापरून काहीतरी बोलायचा प्रयत्न करत.

पण गयेच्या पंड्यांबरोबर बोलताना त्यांना काही अडचण आली नाही. भारतातल्या विविध भागांमधून येणाऱ्या यात्रेकरूंशी संवाद हीच व्यवसायाची गरज असलेले पंडे तिथे होते. त्यांना भेटलेल्या पंड्यानं शुद्ध कन्नड आणि इंग्लिश भाषेचा वापर करून सांगितलं, "फक्त पाच हजार रुपये द्या. वर दक्षिणा किंवा नापिताचे म्हणून दमडीही मागणार नाही." आपल्या मानधनापैकी फक्त निम्मी रक्कम! प्रोफेसरांनी लगेच संमती दिली.

श्राद्धकर्म करण्याआधी त्यांना आयुष्कर्म करणं आवश्यक होतं. प्रोफेसरांनी सांगितलं, "मी संपूर्ण डोकं भादरून घेणार नाही. शास्त्रापुरती केसाची एक बट काढायला सांगा." पंड्यानं ‘बरं' म्हणत काही मंत्र म्हटले, डोक्यावर पाणी शिंपडलं आणि नापिताकाकडे नेलं. नापिताला त्यानं हिंदीमध्ये काही सूचनाही दिल्या आणि नापिताकाच्या समोरच्या रांगेत उभं केलं. त्या भडव्यांना घाबरून इथं येऊन यांच्या हातात सापडायला नको होतं, असं प्रोफेसरांना तीव्रपणे वाटलं. ‘सुब्बण्णा भाऊजींनी कितीही श्रद्धेनं केलं तरी मी गावीच जाऊन दिवस-कर्म करायला हवे होते. न जाऊन बहिणी-भाऊजीच नव्हे, आप्पांनाही नाराज केलं. वयही झालंय. कधी राम म्हणतील, सांगता येत नाही. "मी जिवंत असताना ज्यानं आईचंच काही कर्म केलं नाही, तो उद्या मला तरी पाणी तरी कसा पाजणार आहे?" असं त्यांना वाटलं तर काय चुकलं? शंकराचार्य इथेही येऊन गेले असतील काय? हे संपल्यावर पंड्यांना विचारायला पाहिजे.'

अचानक ते भानावर आले. ‘अरे! काय केलं यानं हे?' त्यांनी डोक्याला हात लावून पाहिलं. उजव्या बाजूच्या डोक्यापासून गालावरच्या दाढीचा भाग नापितानं वस्तऱ्यानं साफ केला होता. ते घाबऱ्याघाबऱ्या ओरडले, "आरसा दे! मिरर! मिरर देव."

नापिताला काहीही समजलं नाही. हे पुन:पुन्हा ‘मिरर', ‘आरसा' वगैरे म्हणत राहिले. तो वस्तरा परजत

खुणेनं “काय?” म्हणत विचारु लागला. तो पुढेही काही तरी सांगत होता, पण ते यांना समजत नव्हतं. यांनी पुन्हा ओरडून सांगितलं, “पंडा! पंडा! कॉल पंडा!” हे मात्र त्याला कळलं. तो तसाच पंड्याला शोधायला गेला. नदीच्या काठावर आठ-दहा पंडे आपापल्या गिऱ्हाइकांकडून श्राद्ध करवत होते. वरच्या बाजूला असलेल्या बस स्टँडवर गिऱ्हाइक हेरणारे पाच-सहा पंडे होते. शेवटी तिथे अपेक्षित पंड्या सापडल्यावर नापित त्याला घाटावर घेऊन आला. प्रोफेसर त्याला रागानं म्हणाले, “बघा, काय करून ठेवलंय या मूर्खानं!”

पंड्याला काहीच समजलं नाही. त्यानं शांतपणे विचारलं, “काय झालं, साहेब?”

“सगळे केस काढायचे नाहीत, शास्त्रापुरते चार काढायचे म्हणून सांगितलं होतं की नाही?”

आता त्यालाही आठवलं, “होय, होय! मी सांगितलं होतं याला.” आणि नापिताकडे वळून तो हिंदीत काहीतरी बोलला.

नापितानं सांगितलं, “असले फॅशन-कट करायला हे काही सलून नाही आणि तुम्ही सांगितलेलं मी विसरून गेलो. मी हजारो जणांचे केस कापलेत. संपूर्ण केस काढल्याशिवाय कुणीही श्राद्ध करत नाहीत. शास्त्र मलाही ठाऊक आहे.” असं बरंच काही तो बोलला. पंड्यानं ते हिंदीतलं बोलणं इंग्लिशमिश्रित कन्नडमध्ये प्रोफेसरांना सांगितलं आणि म्हणाला, “आता काय करायचं, साहेब? आता उरलेलंही साफ करून घ्या. शास्त्राच्या संदर्भात, मंत्रंच्या बाबतीत आम्ही मंडळी जुळवून घेऊ शकतो. पण हे नापित अजिबात ऐकत नाहीत.”

“काही नको! मला हे कर्मच करायचं नाही. माझे मला पैसे द्या. जातो मी!” प्रोफेसर म्हणाले.

“कुठले पैसे?”

“तुम्हाला दिलेले पाच हजार.”

“ते माझ्याकडे कुठे आहेत? तुमच्यासमोरच थोरले पंड्या घेऊन गेले नाहीत का? त्यांच्या सूचनेप्रमाणे इथं कर्म करवून घेणं एवढंच माझं काम.”

“फसवणूक! शुद्ध फसवणूक आहे ही! माझे पैसे परत द्या. नाहीतर मी पोलिसांकडे कंप्लेंट करेन.”

“कुठले पोलीस? पुण्य-क्षेत्री आलात, पितरांचं श्राद्ध करायला! आपला शब्द बदलताय. आणि वर पोलिसांची भीती घालताय?”

एवढं सगळं चाललं असता दहा-बारा पंडे भोवताली गोळा झाले. यानं त्यांनाही प्रोफेसरांची समस्या सांगितली. त्यांनीही सांगितलं, “नापिताचं काहीही चुकलेलं नाही. तुम्ही म्हणता तसं कटिंग हवं असेल तर सलूनमध्ये जायचं. आता काहीही करणं शक्य नाही. वेळ न लावता उरलेले केस आणि दाढी काढून पुढचे विधी करा. सगळ्यांचा खोळंबा करू नका.”

प्रोफेसरांनी पुन्हा एकदा साफ केलेल्या भागाला हात लावून पाहिला. दुसरा काही पर्याय नाही, हे तर स्पष्टच होतं.

सगळं आटोपून ते हॉटेलवर गेले. ‘आरशात चेहरा पाहिला तेव्हा त्या दिवशी ओसरीवर बसलेल्या सुब्बण्णा भाऊजींचा चेहरा आणि डोकं आठवलं. वाटलं, हेच शास्त्र असेल तर, आपण नापितावर रागवायला नको होतं. पण रात्रभर विचार केला तरी या नव्या समस्येवर उत्तर सापडलं नाही. दुकानं उघडल्यावर एक टोपी विकत घेतली पाहिजे. गांधी टोपी नको. जेपी टोपीही नको. हॅट की काळी टोपी? कुठली का असेना, या अवताराच्या संदर्भात निदान सिन्हापुढे तरी काही खुलासा करावा लागेल. खूप विचार करून ठरवलं, सांगायचं कपाळावर डोक्यातल्या कातडीला कसलंसं इन्फेक्शन झालंय, सगळे केस काढल्याशिवाय

कातडीपर्यंत औषध पोहोचणार नाही, असं डर्मोटॉलॉजिस्टनी सांगितलंय.’

‘पाटण्यात गेल्यावर सिन्हानं विचारलं नसतानाही त्यांनी ठरलेला खुलासा केला. सिन्हांनी संमती दर्शवत म्हटलं, “हो ना! काय करणार? डॉक्टरांनी सांगितल्यावर ऐकायलाच हवं. ” पण टी.ए.डी.ए.चं बिल बनवण्यासाठी त्यांनी विमानाचं तिकीट मागितलं तेव्हा ते बेंगळुरू-बनारस असल्याचं आठवलं. साधारणत: डोकं भादरून आलेले गयेला जाऊन आलेले असतात, हे या बिहारीला ठाऊक झालं असेल, अशी भीतीही वाटली. पण सिन्हाच्या बोलण्या-वागण्यात कुठेही ही शंका व्यक्त झाली नाही. बेंगळुरू-बनारस-बेंगळुरू एवढा टी.ए. दिला. प्रोफेसरांनी भौतिक वाद आणि प्रगती यावरील दोन व्याख्यानं, कितीतरी दशकांपूर्वी तयार करून ठेवल्यामुळे आणि अनेक ठिकाणी भाषणं केल्यामुळे जोरदार झाली. विद्यापीठातील श्रोत्यांनी माना डोलवत ती ऐकली आणि भाषणानंतर त्यांना घेरून टाकलं.

पाटण्याहून बनारसला गेल्यावर तिथल्या चर्चासत्रातही हीच टोपी वापरायची. नंतर अमेरिकेत मात्र कुठल्याही टोपीची गरज नाही. तिथे हवे ते कपडे घाला, केस हवे तसे ठेवा, वाटले तर सगळे भादरा, कुणीही काहीही विचारणार नाही. तो खरा स्वतंत्र माणसांचा देश! तोपर्यंत केस बऱ्यापैकी वाढलेले असतील.’ पाटणा-बनारस प्रवास याच विचारात संपला.

१२

बातमी समजताच गावी गेलेल्या दिगंत आणि बबिताच्या मनात, आजीच्या अस्थींचं प्रयागमध्ये विसर्जन केलं पाहिजे, हा विचार सुचला. दिवसकार्य संपल्यानंतर एखादा सोयीचा दिवस बघून हे करता येईल, असं आजोबांनी सांगितलं. हेही काम सुब्बण्णा मामानंच केलं पाहिजे. "तुम्ही विमानानं जाऊन या. विमानाचं तिकीट आम्ही काढून देऊ." असं सांगून दिगंत आणि बबिता बेंगळुरूला परतले. मातीच्या मडक्यात ठेवलेल्या अस्थी विमानातून घेऊन जाणं सुब्बण्णांना अडचणीचं वाटलं. विमान प्रवासाची काहीच माहिती नसलेल्या सुब्बण्णांचं म्हणणं पटण्यासारखं होतं. त्याच वेळी समजलं, गावातच राहणाऱ्या लक्ष्मी मॅडम आपल्या काही कामासाठी बनारसला जायला निघाल्या होत्या. सुब्बण्णा, विशालाक्षी यांनीही त्यांच्याबरोबर जावं, काम झाल्यावर लक्ष्मी मॅडमनी त्यांना रेल्वेत बसवून द्यावं, असं ठरवून तिघंही प्रवासाला निघाले.

पुन्हा एकदा बनारसला जाऊन आल्याशिवाय औरंगजेबाने ग्यानवापी मशीद बांधल्याचा भाग लिहिला तर त्यात वास्तवता येणार नाही, हे लक्ष्मीच्या लक्षात आलं होतं. आता या दोघांच्या सोबतीनं जायचं ठरलं. तसं पाहिलं तर तिला अशा प्रकारच्या सोबतीची गरजच नव्हती. अप्पाजींच्या अभ्यासिकेत दार बंद करून घेऊन इतिहासातल्या घटना आणि पात्रंमध्ये ती बुडून जायची. सवय झाल्यापासून तिला इतर कुणाच्या कंपनीची गरजच नसायची. केंचप्पा-लक्कव्वा आपण होऊन काही बोलले तर, तेवढंच! पाय मोकळे करण्यासाठी शेतावर गेलं तरी तिला तिथल्या नारळी-पोफळीत इतिहासातील पात्रंच दिसायची. खरं तर बेंगळुरू ते काशी एकटीनं रेल्वेचा प्रवास करायला मिळाला असता तर तिला जास्त बरं वाटलं असतं. स्टेशन आलं की तो प्रदेश कुठला, गेल्या हजार वर्षांत तो कुठल्या राजकर्त्याकडून कुठल्या राज्यकर्त्याकडे गेला, त्याच्या भोवताली कुठले स्तूप, विहार, मंदिरं किंवा जैन प्रार्थनास्थळं होती, कुठल्या नबाबानं किंवा सुलतानानं त्याचा नाश केला किंवा बचाव केला याची आठवण करत, संपूर्ण भूखंडाच्या इतिहासाचं पुनरावलोकन करत प्रवास करता आला असता.

आता विशालाक्षी आणि सुब्बण्णा सतत काही ना काही विषयावर बोलताहेत. विशालाक्षी तिच्यापेक्षा आठ वर्षांनी मोठी. आधीपासून एकेरीच हाक मारतात. सुब्बण्णांशी आधी फारशी ओळख नव्हती. ओळख झाली तेव्हा लक्ष्मी कॉलेजमध्ये शिकत होती. त्यामुळे ते बारा-तेरा वर्षांनी मोठे असले तरी आदरार्थी उल्लेख करतात. गेले काही दिवस काही ना काही निमित्तानं बोलणं व्हायचं. आता अडीच दिवसांचा एकत्र प्रवास. गप्पांमधील प्रत्येक विषय शेवटी प्रोफेसरांपाशी येऊन थांबायचा, "सगळी शिकलेली माणसं अशी होतात, असं नाही. पण हा असा कसा झाला? माकड आपल्याबरोबर सगळं वनही खराब करतं, म्हणतात ना तसं! ही म्हण मी नाही सांगत. तुमचे अप्पाजीच सांगायचे. माझ्यापुढेही बोललेत ते. संदर्भ आला की नाही लक्षात?"

विशालाक्षीचं बोलणं तिथेच तोडत सुब्बण्णा म्हणाले, "आता ते सारं पुराण उगाळण्यात काय अर्थ आहे? काय बोलतेस ते तुझं तुला तरी समजतं का?"

विशालाक्षीची बौद्धिक कुवत ठाऊक असल्यामुळे लक्ष्मीच म्हणाली, "खरं तेच बोलल्या त्या! तुम्हाला काही वाटायचं कारण नाही..."

थेट गाडीत जागा न मिळाल्यामुळे त्यांना इटारसीत गाडी बदलावी लागली. एका सहप्रवाशानं सांगितलं, "आणखी अर्ध्या तासात गाडी आहे. भरपूर जागा असते. मोगलसराईला उतरा. तिथून रिक्षा, टांगे, बस हवं ते वाहन करून अर्ध्या तासात बनारसला पोहोचाल. तिथून गयेला जाऊन यायलाही हवी तेवढी वाहनं मिळतील." आणखी दोन-तीन जणांना विचारून माहिती खरी असल्याची खात्री करून घेतली आणि त्याप्रमाणे प्रवास ठरवला. आधी काशी, नंतर प्रयाग.

सकाळी दहा वाजता मोगलसराईला उतरून दोन सायकल रिक्षा केल्या. एकात त्या दोघांना बसवून दुसऱ्यात लक्ष्मी स्वत: बसली. पांढऱ्या पंचात गुंडाळलेलं अस्थीचं मडकं सुब्बण्णांनी आपल्या हातातच ठेवलं

होतं. निघाल्यावर थोड्याच वेळात दोन्ही रिक्षांमध्ये फर्लांगभर अंतर झालं. दोन्ही रिक्षावाले भाऊ-भाऊ असल्याचं ठाऊक झाल्यामुळे त्या दोघांची काळजी करायचं कारण नव्हतं.

तिचा रिक्षावाला तिशीचा होता. उन्हात रापून काळं पडलेलं शरीर. गुडघ्यापर्यंत धोतर. अर्ध्या हाताच्या पिवळट पडलेल्या मळक्या अंगरख्यावरून आतल्या खांद्यापाशी जानवं. डोक्याला भगव्या रंगाचं फडकं गुंडाळलं होतं. तिनं विचारलं, "नाव काय, भाई, तुझं?"

"बिस्वनाथ सर्मा!" धापा टाकत तो उत्तरला.

"सर्मा? की शर्मा?"

"तेच, तुम्ही म्हणालात ते. सर्मा."

"सर्मा म्हणजे ब्राह्मण?"

"होय माताजी. कान्य कुब्ज ब्राह्मण."

"ब्राह्मण असून रिक्षा चालवतोस?"

"पोट! पोटासाठी करावं लागतं, माताजी!"

"तसं नव्हे...!" पुढे काय विचारायचं, ते न समजून ती गप्प राहिली. तोही दमला होता. त्यात बोलायला विषय मिळाल्यावर त्यानं रस्त्यालगतच्या कडुनिंबाच्या झाडाखाली रिक्षा थांबवली. रिक्षाच्या दांडीला अडकवलेल्या पिशवीतून एक विडा तोंडात घातला. थोडा चावल्यावर निवांतपणे म्हणाला, "माताजी, बोलणं अर्धवट ठेवून थांबलात. गरिबीतच राहावं हा ब्राह्मण जातीचा धर्म, नाही काय? पूर्वीपासूनच गावाबाहेर, वनात पर्णकुटी बांधून विद्यादान करत जगणारी जात ही. ही जात नष्ट केली तर सगळे मुसलमान करणं सोपं जाईल म्हणून येणाऱ्या प्रत्येक नबाबानं, बादशहानं, सुभेदारानं आम्हाला पकडलं. चिमट्यानं तोंड उघडायला लावून, त्यात थुंकून जात भ्रष्ट केली. तलवारींनी गळे कापून मारलं. मग आमचे पूर्वज खेडेगावांकडे धावले. पुराण-प्रवचनं करत त्यांनी त्यांचा धर्म वाचवला. पुढे अंग्रेज आले. ही जात नष्ट झाली तर सगळा समाज ख्रिश्चन होईल, या आशेनं त्यांनी हिकमत केली. आता अंग्रेजही गेले. आता मताच्या राजकारणासाठी आमचे राज्यकर्तेही हेच करताहेत." म्हणत तो हसला.

"एवढं सगळं ठाऊक आहे. याचा अर्थ काशीचा इतिहासही तुला ठाऊक असला पाहिजे. मला काशी दाखवशील का दोन-तीन दिवस फिरून?"

"ठिकाय माताजी. काशीमधलं एकेक मंदिर, एकेक घाट, एकेका खांबाचीही माहिती सांगेन."

"काय शिकलास तू?" हा कॉलेजमध्ये काशीचा इतिहास शिकलाय की काय, असं वाटून तिनं विचारलं.

"थोडं फार संस्कृत येतं. तुलसी-रामायण संपूर्ण येतं. ऐकून शिकलोय. इथे असणाऱ्या प्रत्येकाला या काशीचा इतिहास ठाऊक असलाच पाहिजे. नाहीतर काशीवासी म्हणवून घ्यायला तो नालायक ठरेल. चला, निघू या. ते पुढे गेले असतील. माझा भाऊ माझ्यापेक्षा ताकदवान आहे. वेगात घेऊन जातो रिक्षा, पण माझ्या एवढी इतिहासाची आणि पुराणाची माहिती मात्र त्याला नाही." त्यानं रिक्षा थोडी तशीच ओढत पळवली, तिनं वेग पकडल्यावर तिच्यावर टणकन उडी मारून बसला आणि पायडल मारु लागला.

त्याच्या त्या बोलण्यातूनच बराच इतिहास डोकावताना तिला दिसला. देवस्थानांचा नाश झाल्यावर तिथला पुजारी वर्ग विखुरला किंवा पूजा करायला देऊळ-मंदिरच न राहिल्यामुळे ब्राह्मणवर्ग रानोमाळी पळून गेला. त्यानंतर या गावोगावी भटकणाऱ्या कथनकारांमुळे हिंदू धर्म जिवंत राहिला. भजनं, गाणी, पदं, प्रवचनं

यांच्यामधून धर्माचं अस्तित्व टिकून राहिलं. संस्कृत भाषा आणि मंत्र यांचं महत्त्व कमी होऊन धर्म स्थानिक भाषांमध्ये प्रवाही झाला. वैश्य-शूद्र संत जन्मले आणि हा प्रवाह आणखी व्यापक झाला. जानपद म्हणी, प्रतिमा आणि प्रतिभा यांचा प्रवेश होऊन धर्माचा पुनर्जन्म झाला. तो धर्म वेगळ्या प्रकारे शक्तिशाली झाला. संपूर्ण भारतभर भक्तिमार्ग उफाळून येऊन वाहू लागला.

रिक्षा पुढे चालली होती.

अरे! ती पाहा काशी! झळाळणाऱ्या सूर्याच्या प्रकाशात उठून दिसतेय ही काशी!

"शर्माजी! ते समोर दिसतंय ते गाव कुठलं?"

"काशी. माताजी! बनारस!"

"खरं?"

"शंका का आली, माताजी?"

संपूर्ण काशीला आपल्या मुठीत ठेवून 'मीच काशी!' म्हणून मिरवणारी मशीद! दुर्बीण आणली असती तर बरं झालं असतं असं तिच्या मनात आलं. खालच्या बाजूला घाटांच्या रांगा, उजवीकडेही एक मोठी मशीद...

"शर्माजी! सगळीकडे मशिदीच दिसताहेत. विश्वनाथाचं देऊळ कुठे आहे?"

"ठाऊक नाही? डावीकडे बघा. तिथे ती, संपूर्ण काशी म्हणजे मी, असा भार वाहत उभी आहे ती 'ग्यानवापी मशीद.' मूळचं विश्वनाथ मंदिर औरंगजेब बादशहानं फोडलं, त्याचेच खांब-भिंती वापरून त्याच जागी १६६९ साली ही मशीद बांधली. औरंगजेबानं बांधली असली तरी नाव मात्र 'ग्यानवापी मशीद' असंच राहिलंय. उजवीकडे आहे, तिचं नाव मात्र आलमगीर मशीद असं पडलंय. त्या जागी बिंदुमाधव मंदिर होतं. ते पाडून त्या जागी ही मशीद बांधलीय. ही मशीद बांधलीय १६५९ साली."

याला इसवी सनही ठाऊक असल्याचं बघून तिला कौतुक वाटलं. याच्याबरोबर काशीमधली प्रत्येक मशीद बघून तिचा इतिहास समजून घ्यायला पाहिजे. उन्हाची तिरीप चुकवण्यासाठी कपाळावर आडवा हात धरत तिनं पुन्हा एकदा सगळ्या काशीवरून नजर फिरवली. असंख्य मशिदी दिसत होत्या. वेगवेगळ्या आकारांच्या. प्रत्येक मशीद त्या त्या जागी असलेल्या देवळाच्या भग्नावशेषांच्या आधारे बांधलेली. तिला पुस्तकात वाचलेला सगळा तपशील पुन्हा आठवू लागला.

'काशी हे सगळ्या पंथांचं प्रमुख केंद्र. वैदिक, बौद्ध, जैन, शाक्त, तांत्रिक, वैष्णव, शैव, गाणपत्य, राम, कृष्ण! हे काशीत स्थायिक न झालेले देव-देवताच नाहीत, म्हटलं तरी चालेल. इथे पूजेची विधी-विधानेही नाहीत. इथे मृत्यू झाला तर मुक्ती मिळते या श्रद्धेनं या जंबुद्विपाच्या सर्व बाजूनं वृद्ध इथे येतात, पूर्वीही येत. चोरा-चिलटांची भीती न बाळगता, मुसलमान राजांनी लादलेले यात्रिक कर भरून इथे येत आणि इथेच प्राण सोडत. त्या प्रत्येकाच्या पंथाचं इथे एकेक मंदिर. प्रत्येकाच्या इष्ट दैवतासाठी एकेक देऊळ. पुराणकथांमध्ये साकार झालेल्या प्रत्येक छोट्या-मोठ्या पात्रासाठी एकेक देवालय. हे सारं समाजाच्या धार्मिक गरजेपोटी. काशीमध्ये जेवढी देवळं बांधली गेली, तेवढी देशातल्या इतर कुठल्याही शहरात बांधली गेली नाहीत. इतर धर्मांची देवळं पाडणं म्हणजेच हा धर्म मानणारे शतकानुशतकं या काशीवर राज्य करत राहिले. त्यामुळे एवढ्या मशिदी उभ्या राहणं स्वाभाविकच आहे म्हणा! दाराशी आलेल्या प्रत्येक धर्मपंथाला आपापलं पूजास्थान उभारण्यासाठी जागा देणाऱ्या काशीनं आपल्या याच धर्माप्रमाणे इस्लामच्या प्रार्थनास्थळांनाही जागा दिलीच असती. पण इतर सर्व धर्मांना नामशेष करून फक्त आपणच जिवंत राहिलं पाहिजे, या वृत्तीच्या इस्लामनं काशीमधील सर्व पंथांच्या मंदिरांचा नाश करून, त्या जागी मशिदी उभ्या केल्या.'

काशी जवळ आली. घाट स्पष्टपणे दिसू लागले. प्रत्येक घाटाला एकेक नाव. अस्सी घाट, हनुमान घाट,

शिवाला घाट, बच्छराज घाट, आनंदमयी घाट, केदार घाट, चौकी घाट, नारद घाट, अमृतराव घाट, चौसठ्ठी घाट, पांडे घाट, राना घाट, दशाश्वमेध घाट, बाजीरावानं बांधलेला मणिकर्णिका घाट, भोसला घाट, यज्ञेश्वर घाट, राम घाट, मंगलगौरी घाट, दलपत घाट... कितीतरी घाट, कितीतरी नावं! 'मोतीचंद आणि डायना एल यांच्या संशोधन ग्रंथात दिलेली सगळी नावं आठवतही नाहीत. हे सगळं मराठ्यांनी आणि मराठ्यांच्या काळात बांधले गेले आहेत. जर मराठ्यांचा उदय झाला नसता, काशी मुस्लीमांच्या ताब्यातच राहिली असती तर, काशी 'काशी' राहिली असती? हिंदूंना पुनर्जीवन मिळालं असतं का?' या विचारांमध्ये ती इतकी गढून गेली, की समोर असलेले विविध घाटही तिला दिसेनासे झाले.

यात्रेला येऊन हॉटेलमध्ये उतरणं अधार्मिक होईल, एखाद्या धर्मशाळेतच उतरलं पाहिजे, असा विशालाक्षीनं हट्ट धरला. तशी तीही अधून-मधून हॉटेलचं खायचीही. पण काशी-रामेश्वरासारख्या तीर्थक्षेत्री गेल्यावर काही धार्मिक नीती-नियमांचं पालन केलं पाहिजे, शिवाय इथे येण्यामागचं कारण आईच्या अस्थी विसर्जन आहे, हे तिचं म्हणणं सुब्बण्णांनाही पटलं. रिक्षावाला बिस्वनाथ सर्मा तर या बाबतीत बराच आग्रही दिसला. त्यानं सांगितलं, "तुम्ही कर्नाटकातून आलात. इथे म्हैसूर धर्मशाळाही आहे. पण ती हरिश्चंद्र घाटावरच असल्यामुळे तिथे चोवीस तास प्रेतं जळाल्याचा धूर भरलेला असतो. मान-मंदिर घाटाच्या शेजारी मारवाडी धर्मशाळा आहे. चांगली स्वच्छ असते. मारवाडी यात्रेकरू नसतील तर इतर यात्रेकरूंनाही देतात. तिथले मॅनेजर माझ्या ओळखीचे आहेत. हवं तर मिळवून देतो. दशाश्वमेध घाटाजवळच आहे ती."

शेजारीच असलेल्या मारवाडी खानावळीतलं जेवण विशालाक्षीला भावलं. त्यामुळे राहण्याचा-जेवणाचा प्रश्न मिटला.

दिवस कलायला लागला. "उद्या सकाळी लवकर येतो. एक ओळखीचे पंडेजी आहेत. कितीही गर्दी असली तरी तुमची लवकर पूजा होईल, असं करतील. हवं तर आता तुम्ही जाऊन विश्वनाथाचं दर्शन घेऊन या. मी दाखवतो, हवं तर!" रिक्षावाला बिस्वनाथ सर्मा म्हणाला. हे तिघंही जायला निघाले. शेजारचा दशाश्वमेध घाट चढून जाऊन उजवीकडील गल्लीतून तो घेऊन गेला. लहान-लहान गल्ली-बोळ. जागोजागी बसलेले झेंडूच्या फुलांचे व्यापारी. सगळ्या तीर्थक्षेत्री असतात, त्याप्रमाणे. आपल्याकडून पूजेचं ताट घेऊन जायचा आणि त्या बदल्यात चप्पल सांभाळण्याची हमी घेणाऱ्या छोट्या दुकानदारांचा तगादा. संध्याकाळ झाली तरी यात्रेकरूंची गर्दी होती. शिवाय दररोज विश्वनाथाचं दर्शन घेणाऱ्या काशी-निवासींची लगबग होतीच. 'आपापल्या पर्सेस, गळ्यातले दागिने सांभाळा. हाच काशी-विश्वनाथ!' सर्मानं सांगितलं.

"कुठाय? कुठे आहे?" काहीही न समजून विशालाक्षीनं विचारलं. तिला तेवढं हिंदी समजत होतं. सुब्बण्णाही "कुठाय?" म्हणून विचारु लागले.

समोर छोटासा मंडप होता. खेड्यातली एखादी देवळी असावी, एवढा लहान. प्रदक्षिणा घालण्यापुरतीही भोवताली जागा नाही. "काशीचं सुप्रसिद्ध मंदिर म्हणतात ते हेच?" विशालाक्षी आणि सुब्बण्णा एकाच सुरात उद्गारले. इतिहासाचं सविस्तर वाचन केलेली लक्ष्मी काही बोलली नाही, पण आतल्या आत तीही कोसळून गेली.

"एवढ्याशा मंडपाला मंदिर मानून पूजा करतात?" सुब्बण्णांनी विचारलं.

सर्मानं त्या तिघांना एकीकडे घेत म्हटलं, "इकडे या. इथे दाखवतो." एका काळ्या दगडातल्या नंदीकडे बोट दाखवत म्हणाला, "नंदी नेहमी शंकराच्या पिंडीपुढेच बसलेला असतो आणि त्याची ध्यानस्थ नजर गर्भगृहातल्या शिविंलगावर रोखलेली असते. होय की नाही? आता बघा, हा नंदी कुठे पाहतोय? समजलं?"

या तिघांनीही लक्ष देऊन पाहिलं. लक्ष्मीच्या डोक्यात उजेड पडला. मोगलसराईहून येताना दूरवरून सर्व काशी व्यापून, स्वत:च काशी असल्याच्या थाटात उभी असलेली 'ग्यानवापी मशीद!' औरंगजेबाचा धार्मिक दरारा आजही जाणवावा असं ते दृश्य होतं. कुणीही आत प्रवेश करू नये म्हणून उभारलेली बारा फूट उंचीची भिंत आणि त्यावर छातीत आरपार जातील एवढ्या लांब आणि तीक्ष्ण तारांचे भेंडोळे. संपूर्ण काशीभर हवं तिथे चढून, हवी तिथली केळी खाणाऱ्या माकडांनाही आत शिरता येणार नाही, एवढं काटेरी

कुंपण दाट होतं. रोखलेल्या बंदुका घेऊन देशाच्या सीमेवर उभ्या असलेल्या सशस्त्र सैनिकांप्रमाणे ही तटबंदी!

पाहताक्षणी विशालाक्षी आणि सुब्बण्णांच्या छातीत धडकीच भरली. याविषयी सगळं पुस्तकात, वृत्तपत्रंत वाचलेल्या लक्ष्मीलाही या दृश्याचा पाहताक्षणी अर्थ समजला नाही.

“औरंगजेबानं विश्वनाथ मंदिराचा विध्वंस करून त्या जागी उभारलेल्या मशिदीचं, काटेरी कुंपण बांधून सशस्त्र सैनिक रक्षण करताहेत.” सर्मानं सांगितलं.

तीन दिवसांचा रेल्वेप्रवास. इटारसीहून येताना झोपायला जागा मिळाली नव्हती. विशालाक्षी आणि सुब्बण्णा लवकर झोपी गेले. शारीरिक दमणूक जाणवत असली तरी लक्ष्मीला झोप आली नाही. डोळे मिटले, की डोळ्यांसमोर ग्यानवापी मशीद उभी राहत होती. काशीला पायदळी तुडवत तिच्या छाताडावर उभी राहून काशीचा श्वास घुसमटून टाकणारी ग्यानवापी मशीद! डोळे उघडल्यावर तिला श्वास घेणं सुकर वाटत होतं. त्यामुळे ती उठून बसली. शेजारीच ऐंशी फुटांवरून वाहणाऱ्या गंगेच्या प्रवाहाचा आवाज ऐकू येईल म्हणून तिनं कानोसा घेतला. पण काहीही ऐकू आलं नाही. ही खळखळ आवाज करत वाहणारी नदी नाही. नि:शब्दपणे आतल्या आत चालत राहणारी तिची संस्कृती आहे. कितीतरी पंथ, विचारधारा, कितीतरी तर्क, व्याख्यानं, आस्तिक-नास्तिक, देव न मानणाऱ्यांना मानणारे, धर्माचं मूळ शोधणारे या सगळ्यांची ही नि:शब्द साक्षीदार. तीव्रपणे वाटलं, नदीच्या काठी जाऊन बसावं.

विशालाक्षी-सुब्बण्णांना जाग येणार नाही, अशा प्रकारे ती उठली, हळूच बाहेर येऊन खोलीला बाहेरून कुलूप लावलं. ती घाटावर आली. चांदणं होतं. चंद्रप्रकाशात नदीचं पात्र चांदीसारखं चमकत होतं. मान वळवून पाहिलं, ग्यानवापी मशीद चांदण्याच्या प्रकाशात आक्रमक वाटत होती आणि काठावर उभ्या असलेल्या त्या उद्दाम मशिदीची पर्वाच नसल्यासारखी गंगा नदी संथपणे आपल्यापुरती वाहत होती.

‘मंदिराचा नाश करा म्हणून औरंगजेबाचा हुकूम आलाय. लोक उसळून उठतील म्हणून सुभेदार प्रत्येक गल्ली-बोळात मुस्लीम सैनिक ठेवत आहेत. देवळाच्या पुजाऱ्यांना सुगावा लागतो. देऊळ वाचवणं आपल्याला कदाचित अशक्य असेल, पण किमान मूर्तीतरी! रातोरात सगळे पुजारी एकत्र येतात, शिविंलग काढून देवळाशेजारी असलेल्या ‘ग्यानवापी’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विहिरीत विसर्जित केले जाते. वर माती सारून त्या विहिरीचं तोंड बंद करून टाकतात. दुसरे दिवशी मंदिर फोडायला आलेल्यांना हे समजलं नाही. त्यामुळे मूळचं विश्वनाथाचं शिविंलग वाचलं. रिक्षावाला शहाणा आहे. बरंच ठाऊक आहे त्याला! फक्त रिक्षावालाच नव्हे, काशीमधल्या प्रत्येकाला हे ठाऊक आहे.’

“बाई, कोण तुम्ही?”

मागून बुटांच्या पावलांचा आवाज आला. रात्रीच्या वेळी घाटावर अशी एकटी बाई! लक्ष देऊन पाहिलं तर अधे-मधे बसलेली माणसं दिसताहेत. ध्यानमग्न? की नीरव शांतता प्राशन करायला आलेली माझ्यासारखी माणसं?

“कुठल्या? कुठल्या प्रांतातून आलात? कुठल्या धर्मशाळेत उतरलात? या वेळेला एकट्याच का इथे बसलात?” बिडीचा वास आला. “नदीच्या पात्रापाशी जाऊ नका. एकटी बाईमाणूस. इकडे चोरटे, गुंड असतात. सावध राहा.” पावलं दशाश्वमेध घाटाच्या दिशेनं गेली. तिनं उजवीकडे वळून पाहिलं. दूरवर दहा-वीस नावा बांधून ठेवल्या होत्या. ती घाटावरच्या पायरीवर बसली. कितीतरी वेळ बसून राहिली. चंद्र पश्चिमेला कलला. ‘आज तिथी? पक्ष? कृष्ण की शुक्ल? चंद्रास्त केव्हा? छे:! एकदा सगळं नीट समजून घेतलं पाहिजे. सुब्बण्णांना ठाऊक असेल. शेषशास्त्रींना तर निश्चित ठाऊक असेल. पण ते तर यानंतर तुमकूरला निघून जातील. या वयात ते एकटे कसे राहतील म्हणा!’

अंधार असला तरी तिला भीती वाटली नाही. गुंड-चिलटांचा सीन दोन-तीन टेकमध्ये पर्फेक्टली रेकॉर्ड झालाय. पाठोपाठ आठवलं; ‘मंदिराचा नाश ख्वाजाजहानच्या बरोबरीनं बघायला पाहिजे. हम्दुल्लांबरोबर

त्यालाही काशीला यावं लागेल. मनात उमटलेले अस्पष्ट विचार हम्दुल्लांना सांगून तिनं त्यांना तातडीनं काशीला जायला सांगितलं. त्यांनीही सांगितलं, विचार करून उद्या काहीतरी मार्ग सुचवता येईल. दुसरे दिवशी त्यांनी सांगितलं, तुझा, प्रत्यक्ष काशीला येऊन सगळं स्वत:च्या डोळ्यांनी पाहायचा उत्साह बघून मीही उत्साहित झालोय. अज्ञानाचं श्रद्धाकेंद्र नष्ट होताना पाहाण्याचं पुण्य मलाही लाभू दे. मंदिर नाशाचा सगळा तपशील मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून, नोंदी करून आणेन. माझ्या मदतीला ख्वाजाजहान आला तर ते मलाही सोयीचं होईल. ही घटना आणीबाणीची असल्यामुळे लगोलग परवानगी द्यावी, असा वझिरे आझमांकडे अर्ज करतो. बघू कसं काय जमतं ते!'

त्या संध्याकाळीच अर्ज मंजूर झाला. एवढंच नव्हे, टपाल नेणाऱ्यांबरोबर आम्ही दोघांनीही निघावं अशी आज्ञाही निघाली.

त्या वर्षीचा पाऊस नेहमीपेक्षा आवेशाने कोसळत होता. नदी दुथडी भरून वहात असल्यामुळे नावेतून प्रवास करणं धोक्याचं होतं...

सकाळी तिघांनीही गंगेत अंघोळ केली. विश्वनाथाच्या पूजेसाठी म्हणून ते निघाले. दशाश्वमेध घाटाच्या पायऱ्या चढत होते. सोबत एक पंड्या आणि रिक्षावाला सर्माही होते. एकटी आली असती तर लक्ष्मी या गंगास्नान आणि विश्वनाथ-पूजेच्या फंदात पडली नसती. लहान असताना अप्पाजींच्या प्रभावाखाली असताना, अहिंसा हाच धर्म आहे, इतर सगळ्या आचारांना फारसा अर्थ नसतो, यावर तिचा विश्वास होता. त्यानंतर मार्क्सिस्ट विचारांमुळे, धर्म ही गरिबांना दिलेली अफूची गोळी आहे, असं मानू लागली. पुढच्या टप्प्यांवर स्त्री-पुरुषांचं परस्परांविषयीचं प्रेम हाच परमधर्म आणि इतर सगळे बाह्य-आचार आहे आणि फक्त इस्लाममध्ये तेवढा समाजवाद आहे, अशी तिची भावना झाली. नंतर, इस्लाम आणि ख्रिश्चन हे धर्म संपूर्ण जगावर लादण्याचा खटाटोप हा साम्राज्यवादच आहे, असं तिला वाटू लागलं. धर्माविष्यीच्या या सर्व प्रवासात, तिच्या जन्मजात धर्मातल्या कर्मकांडाला कुठे जागाच नव्हती. पण विशालाक्षी आणि सुब्बण्णा पूजा करायला निघालेले असताना त्यांच्याबरोबर न जायलाही तिला काही कारण द्यावंसं वाटलं नाही. उलट, काशीला पायदळी गाडून उन्मादानं उभ्या असलेल्या त्या ग्यानवापी मशिदीचा आध्यात्मिक धिक्कार करण्याचा एक मार्ग म्हणून विश्वनाथाच्या पिंडीवर तांब्याभर गंगाजल ओतून एखादं फूल वाहून येणं तिलाही आवश्यक वाटलं.

तिघंही पायऱ्या चढत असताना एकाएकी धक्काच बसला. अरेच्चा! हे इथे? होय! छे:! हे कसं शक्य आहे? पण... होय. तेच. विशालाक्षी तर पुढे होऊन बोलल्या, "हे काय अण्णा? तूही आलास? बरोबर आहे, शेवटी मन कसं गप्प बसू देईल? मातृऋण सगळ्यात मोठं आहे म्हणून शंकराचार्य..."

प्रोफेसर शास्त्रीच! इंटलेक्च्युअल. काळी पँट, तांबडा झब्बा, खांद्यावर हिरवी शाल, हातात जपानी कॅमेरा, डोकं पूर्णपणे भादरलेलं, दाढी-मिशीही नाही. अन् त्या असत्या तरी लगेच ओळख पटली असती. चेहऱ्यावर मात्र बराच गोंधळ उडालेला. अवघडलेपण. मला त्यांनी पाहिलं. गाल, नाक, कान लालबुंद झाले.

"गावात नको, काशीत पिंडदान करायचं म्हणून आलास? काय करणार अप्पांचा राग फार! नाही तर गावातच केलं असतंस नाही? आम्ही अस्थी घेऊन आलोय इथे. धर्मशाळेत आहे. उद्या तूच आमच्याबरोबर प्रयागला येऊन विसर्जन कर."

एक-दीड क्षण गेला. प्रोफेसरांनी स्वत:ला कसंबसं भानावर आणलं. नंतर म्हणाले, "इथल्या विद्यापीठात एका वर्कशॉपसाठी म्हणून आलोय. रझिया, सिनेमावाली तू. मूव्ही कॅमेरा हातात नसताना बनारसच्या घाटावर काय करतीयस? इथले लँडस्केप्स म्हणजे इथले घाट, माकडं, वळू! तू नाही का ऐकलंस? रांड, सांड..." त्यांना पुढचं आठवलं नाही. शेजारच्या पंड्यानं ते लगेच पूर्ण केलं, "रांड, सांड, सिढी, संन्यासी!" हे एकापाठोपाठ सांगितल्यावर पंड्यानं लगेच विचारलं, "साहेब, गयाला जाऊन आलेले दिसतात."

प्रोफेसरांचा चेहरा पांढराफटक पडला. याला कसं समजलं असेल? या पंड्यांना सगळ्या भाषा येतात? की विशिष्ट भाषा येणारे पंडे विशिष्ट यात्रेकरूंना पकडतात? विशालाक्षीच्या बोलण्यावरून याला सगळंच

समजलं असेल. पंड्याच पुढे म्हणाला, “त्रिस्थळी यात्रा असते ना? गया-काशी-प्रयाग. तुम्ही गयेहून आलात. काशीची पूजा करायची असेल तर आमच्याबरोबर चला. प्रयागला जायचं असेल तरी मी येईन.”

“तुम्ही निघा. माझा या सगळ्यावर विश्वास नाही. इथे फोटो काढायला म्हणून आलोय.” पुढे काही बोलायची संधी न देता, ते पुढील दृश्यावर कॅमेरा रोखत निघून गेले.

‘इथे मी नसते तर ते बहीण-मेहुण्यांबरोबर पूजेला गेले असते का? पंड्या म्हणाला, तसं ते खरोखरच गयेला जाऊन डोकं भादरून आले असतील काय?’ एरवी कुठेही भेटली तरी ‘आमच्या गावची मुलगी, लक्ष्मी!’ म्हणणाऱ्या प्रोफेसरांनी ‘रझिया’ म्हटल्याचीही तिच्या बुद्धीनं नोंद घेतली होती.

दुसरे दिवशी तिघंही प्रयागला जाऊन अस्थी-विसर्जन करून आले. बेंगळुरूच्या थेट रेल्वेमध्ये जागा न मिळाल्यामुळे विशालाक्षी-सुब्बणांचा मुक्कामही वाढला.

आधीच ठरल्याप्रमाणे नंतरही लक्ष्मी दोन आठवडे काशीत राहिली. धर्मशाळेत आठवडाभर राहायची परवानगी होती. त्यानंतर अशाच स्वच्छ, स्वतंत्र आणि नदीच्या काठावर असलेल्या धर्मशाळेत व्यवस्था करायचा रिक्षावाल्या सर्मानं शब्द दिला. आता विशालाक्षी-सुब्बण्णा स्वतंत्रपणे एकेका देवळाला जाऊन येऊ लागले. लक्ष्मीचं मन पुन्हा तिच्या कामाकडे वळलं. डोक्यात विश्वनाथाच्या विध्वंसाचा इतिहास घोळू लागला होता. प्रत्यक्ष लेखनाच्या वेळी तपशील आणखी वाढेल. भरपूर मुद्दे संशोधनातूनही सापडले आहेत. ही गंगा, या मशिदी, या सगळ्या विध्वंसानंतर राहिलेली आणि वाढलेली देवळं, यांच्या जागा फिरून पाहिलं तरी पुरेसं आहे. शक्य असेल तर हा भाग या गावातच लिहून संपवायला पाहिजे. विशालाक्षी-सुब्बण्णांना रेल्वेत बसवल्यावर लगेच लिखाणाला सुरूवात केली पाहिजे!

१३

माझ्या मनात अस्पष्टपणे उमटलेले विचार हम्दुल्लांना सांगून मी माझा काशीला जायचा विचार बोलून दाखवला. विचार करून उद्या मार्ग सांगायचं त्यांनी कबूल केलं.

दुसरे दिवशी ते म्हणाले, “काशीला जाऊन सगळं स्वत:च्या डोळ्यांनी पाहायचा उत्साह बघून माझ्या मनातही उत्साह निर्माण झालाय. अज्ञानश्रद्धेच्या केंद्रस्थानाचा नाश डोळ्यांनी पाहायचं पुण्य मलाही लाभू दे. देवालयाच्या नाशाचा सगळा तपशील मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून विस्तारानं लिहून आणेन. मला सहायक म्हणून ख्वाजाजहान आला तर सोयीचं होईल. ही आणीबाणीची परिस्थिती असल्यामुळे त्वरित परवानगी द्यावी, अशी वझिरे आझमांना विनंती करेन. बघू या, काय होत ते!”

त्या संध्याकाळीच परवानगी मिळाली.. एवढंच नव्हे, टपाल नेणाऱ्यांबरोबर आमच्या प्रयाणाची व्यवस्था झाल्याचंही कळवण्यात आलं.

त्या वर्षी पाऊस नेहमीपेक्षा आवेगाने कोसळत होता. नदी दुथडी भरून वहात असल्यामुळे नावेतून प्रवास करणं धोक्याचं होतं. दोन टपाल-स्वारांबरोबर आम्हा दोघांना एकेका घोड्यासह पाठवण्यात आलं. मोठे उमदे घोडे. सुरुवातीला मला त्यावर स्वार होणं थोडं अवघड गेलं. प्रशिक्षित घोडे. त्यांना कळणाऱ्या संज्ञाही वेगळ्या होत्या. मी साधा माणूस असतो तर त्या दोघांनी माझ्या अर्धवट नैपुण्याची थट्टा केली असती. असल्या अडनिड्या घोडेस्वाराबरोबर प्रवास करणं अशक्य आहे, अशी त्यांनी कदाचित टपाल-प्रमुखाकडे तक्रारही केली असती. पण मी हम्दुल्लांबरोबर, त्यांच्या अधिकाऱ्यांसारखा आलो होतो. हम्दुल्ला पाहताक्षणीच एखाद्या फारसी-अरबी विद्वानासारखे दिसत होते. शिवाय मी खुद्द उदयपुरीमहल यांच्या जनानामधला हिजडा! हे सगळं समजल्यावर त्यांनी मला घोड्याला समजणाऱ्या संज्ञा समजावून सांगितल्या. एक प्रहरभरात मला घोडे-सवारीवर पकड आली आणि घोडा वेगातही पळवता येऊ लागला. हम्दुल्लांना हा प्रश्न नव्हता. नवं घोडं असलं तरी त्यांचा तो सवयीचाच भाग होता. आज्ञा लिहिलेल्या कागदावर बादशहांची मुद्रा उठवून तो गुंडाळून बांबूच्या नळीत ठेवला होता. त्यावर आच्छादन गुंडाळून त्यावर लाखेची मुद्रा उठवली होती. ते नळकांडं एका पिशवीत घालून ती पिशवीही सगळीकडून शिवून, तिच्यावरही लाखेची मुद्रा उठवून ते दोन्ही घोडेस्वार जपून घेऊन जात होते. त्यातला संदेश त्या दोघांनाही ठाऊक नसला तरी त्यात काय आहे, हे हम्दुल्लांना अधिकृतपणे आणि मला अनधिकृतपणे ठाऊक होतं. यातलं इतर स्वारांना समजता कामा नये, अशी कठोर आज्ञा हम्दुल्लांना देण्यात आली होती. दिल्ली ते बनारस आणि त्यापुढेही राजमार्ग होता. दिल्लीहून निघून शहाबाद, गाझीयाबाद, धाना, हाफुड, बागसर, गडमुक्तेश्वर, बगडी, अमरोहा, मुरादाबाद, रायबरेली, सेला, कडा, दल, महू अशा मार्गानं बनारसला जायचं असल्याचं स्वारांनी हम्दुल्लांना सांगितलं. रहदारीचा मार्ग. रस्ता चांगला. रस्त्यात मुस्लिमांसाठी जेवण-खाण आणि नमाजासाठी असलेल्या सराई. सरकारी कामासाठी प्रवास करणाऱ्यांसाठीही नीट व्यवस्था होती. मधे मधे घोडी बदलत आम्ही सुखानं प्रवास केला. मधूनच पावसाच्या सरी येत होत्या. त्या वेळी ते दोघं टपाल भिजणार नाही, याची विशेष काळजी घेत होते.

आम्ही बनारसला जाऊन पोहोचल्यावर दुसऱ्या दिवशी कसलासा पर्व-काळ होता. त्यामुळे खूप लांबून यात्रेकरू जमले होते. यात्रेच्या स्थळी नेहमीच गावकऱ्यांपेक्षा यात्रेकरूंची संख्या जास्त असते. त्यात काशी हे तर यात्रास्थळांचं यात्रास्थान! त्यात पर्वकाळी इथे येऊन गंगास्नान आणि शिवदर्शन केल्याचं विशेष पुण्य लाभतं, अशीही जनमानसात श्रद्धा! मुसलमानांच्या आक्रमणानंतर अशा यात्रांसाठी कर लावलेला आहे, हे सांगून हम्दुल्ला पुढे म्हणाले, “अपवाद फक्त धर्मभ्रष्ट अकबर बादशहांचा! ही माणसं आधीच गरीब. व्यापार-व्यवहारात यांना मुसलमानांच्या दुप्पट कर भरावा लागतो. त्यात जिझिया कर. यात्रेला जायला पैसा कुठे आहे? शिवाय हिंदूंना घोड्यावर सवारी करायची अनुमती नाही. यावर यात्राकर भरून इथं येणं म्हणजे, तूच विचार कर. अज्ञानाचा अंधार किती दाट आहे.”

कोतवालांना भेटायची हम्दुल्लांनी काही इच्छा व्यक्त केली नाही. पण बादशहांच्या दफ्तरातले, दिल्लीहून आलेले असं समजताच स्वत: कोतवाल मुजरा करायला आले. राजधानीतल्या फुटकळ अधिकाऱ्याला राज्यात सर्वत्र 'राजप्रतिनिधीं'चा मानाचा मुजरा मिळतो, हे राजकारभारातलं सत्य त्यानंतर हम्दुल्लांनी सांगितलं. हम्दुल्लांनाच मंदिर-नाशाच्या फर्मानाचा प्रतिनिधी समजलेल्या कोतवालानं खालच्या आवाजात विनंती केली, "आता इथे पर्वकाळ चाललाय. या हिंदुस्थानींचा वेडेपणा इथे बनारसमध्ये असणाऱ्यांनाच समजू शकतो. बाहेरची लक्षावधी माणसं आलेली असताना मंदिर फोडायला गेलं तर मोठा दंगा होईल. आपली बाजू सत्याची असली तरी आपलं संख्याबळ त्यांच्या तुलनेत कमी असल्यामुळे आपण हिकमतीनं वागणं आवश्यक आहे. आपण एक आठवडा जाऊ देऊ. सगळे बाहेरगावचे यात्रेकरू निघून जातील. पर्वकाळ संपल्यावर कुणीही इथे राहू नये, असं मी स्वत:च फर्मान काढेन. त्यानंतर संपूर्ण गावाला आपल्या शिपायांकरवी जेरबंद करून, त्यानंतर बादशहांचं फर्मान जारी करेन. उशीर झाला तर बादशहा नाराज होणार नाहीत, याची आपण काळजी घ्यावी."

"धर्माच्या कार्यात लाखो माणसं विरोधात उभी राहिली तर त्या सगळ्यांना ठार करणं हाच धर्म आहे. पण संख्याबळ कमी असताना काम हिकमतीनंच फत्ते केलं पाहिजे. किती केलं तरी तुम्ही युद्धतज्ज्ञ!"

कोतवालांच्या चेहऱ्यावर समाधान उमटलं.

आम्हाला खास महालात उतरवण्यात आलं होतं. जेवण-खाण तर आमच्या कल्पनेपेक्षा उत्कृष्ट होतं. दिल्लीपेक्षा इथे फळ-फळावळ भरपूर. त्यात ते आंब्याचे दिवस. दूध, गूळ, वेलदोडा घातलेला आमरस मी आयुष्यात कधी खाल्ला नव्हता. हम्दुल्लांना तर खाताना जणू वयाचा विसर पडला होता. अर्थात, परिणाम भोगावा लागला म्हणा! अतिसाराचा त्रास झाला. चाटण खावं लागलं.

मी एकटाच काशी पाहण्यासाठी गावात भटकत होतो. देवगढला असल्यापासून या तीर्थक्षेत्राविषयी मी ऐकत आलो होतो. कितीही राग असला तरी माझ्या पूर्वायुष्यातील तीर्थक्षेत्र असल्याचं वात्सल्य माझ्या मनाच्या आत कुठेतरी दडून बसलं होतं की काय कोण जाणे! काशीच्या रस्त्यावरून चालताना पहिल्याच दिवशी ते आपोआप बाहेर उचंबळून आलं आणि मीही प्रयत्नपूर्वक ते पायदळी दामटलं. काशी म्हणजे फक्त विश्वनाथ अशी माझी भावना होती. पण गावात फिरत असताना असंख्य देव-देवतांची देवळं सामोरी येत राहिली. वेषावरून मी मुसलमान असल्याचं लक्षात येत असलं तरी सगळे जण मी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचं नीट उत्तर द्यायचे. मला पाहताच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वेगवेगळे भाव उमटत होते. भीती, म्लेंच्छ असल्याचा तिरस्कार, राज्यकर्त्यांच्या जातीचा म्हणून आदर, लाचारी, संधी मिळाली तर चाकू खुपसून ठार करायची इच्छा–प्रत्येक चेहऱ्यावर वेगवेगळा भाव. काही वेळा एकाच व्यक्तीच्या चेहऱ्यावर यापैकी संमिश्र भाव दिसत. खालच्या मानेनं चाललेल्या गरीब गाईच्या डोळ्यांतही काही वेळा संधी मिळाली तर शिंगावर घ्यायची ईर्षा दिसते, तसे भाव मला त्या लोकांच्या डोळ्यांत दिसले.

त्या रस्त्यांवरून फिरताना तर माझ्या मनात, मीही धोतर नेसून त्यांच्यासारखं या रस्त्यावरून फिरलं पाहिजे असं तीव्रपणे वाटत गेलं. पण मला असं धोतर कुठे मिळणार? काशी वस्त्र-व्यापाराचं फार मोठं केंद्र आहे, हे मलाही पूर्वीपासून ठाऊक होतं. तिथं जाऊन एखादं धोतर, खांद्यावर उपरणं विकत घेण्याइतके पैसेही माझ्यापाशी होते. कपडे बदलले तरी चेहऱ्यावरची धर्म-सूचक दाढी? तिचं काय करायचं? ती काढून टाकली तर हम्दुल्ला बरे सोडतील? समजा, त्यांना सांगितलं, बातम्या काढण्यासाठी हे वेषांतर केलंय, तर विश्वास ठेवतील? लगेच मनात सावधगिरीचा इशारा दिला, हे सगळे प्रयोग अत्यंत धोकादायक आहेत. त्यामुळे तसाच फिरत राहिलो.

गावात देवळांची संख्या भरपूर होती. प्रत्येक गल्लीत आठ-दहा देवळं होतीच. काही घरांच्या आतही खासगी देवळं होती. अन्नपूर्णा, लक्ष्मी, पार्वती, गौरी, दुर्गा, काळी, चंडी, चामुंडी वगैरे शेकडो स्त्री-देवताच नव्हे; असंख्य, वेगवेगळ्या नावाची शिवलिंगं. बृहस्पतीश्वर, कामेश्वर, पंचालकेश्वर, पंचकेश्वर, अंधकेश्वर, शांतेश्वर, विल्मकेश्वर, चमनेश्वर, कार्कोटकेश्वर, भैरवेश्वर, दहा-पंधरा नव्हे, शेकडो-हजारो! मार्कंडेश्वराच्या देवळापाशी उभा राहून एका वीस वर्षाच्या तरुणाला "या देवळाचं नाव काय", म्हणून विचारलं; तेव्हा तो

म्हणाला, “खानसाहेब, तुम्हाला संपूर्ण काशीभर फिरवून सगळी देवळं दाखवेन. तुम्हाला वाटेल तेवढी रसम द्या.” नाव विचारलं. दधीचभट्ट म्हणून समजलं. कपाळावर भस्म, मध्ये गंधाचं बोट टेकवलेलं, केशविरहित मस्तकावर गोपद्मच्या आकारात वाढलेले केस. “पूजेच्या फंदात न पडता, संपूर्ण काशीमधली एकूण एक सगळी देवळं नुसती बघायची ठरवलं तरी चार दिवस सकाळ ते संध्याकाळ फिरावं लागेल. नाही तरी तुम्ही देवळात जाऊन दर्शन घ्यायच्या धर्मातले नाही आहात. बाहेरच उभं राहून मी प्रत्येक देवळाचा इतिहास सांगेन.” त्यानं सांगितलं. मीही त्याला दोन रुपये द्यायचं कबूल केलं. त्याला आनंद झाला.

वाटेत मी त्याला काही प्रश्न विचारत होतो,

“काशीत फार फार मोठे विद्वान वास्तव्य करून आहेत, म्हणतात, खरं आहे का ते?”

“होय. वेगवेगळ्या क्षेत्रातले वैदिक पंडित तर आहेतच; बौद्ध, जैन आचार्यही आहेत.”

“सगळे इथे राहायला येण्यामागे कारण काय?”

“कारण?” तो घुटमळला, “कारण मला काय ठाऊक? मी काही एवढा विद्वान नाही!”

“भट्टजी! घाबरु नका. मी हेर नाही. तुम्ही काहीही सांगितलं तरी मी इतर कुणाला सांगणार नाही. अल्लाहची शपथ!” मी म्हटलं. त्याचाही माझ्यावर विश्वास बसला.

“काश्मीर, तक्षशीला, पुरुषपुरा, कान्यकुब्ज, स्थाणेश्वर या सर्व ठिकाणांवर मुसलमानांनी आक्रमण केलं. तिथली मंदिरं, स्तूप, बसदी म्हणजे जैन मंदिरं यांचा नाश करून तिथले पंडित, आचार्य, भिक्षू, मुनींचा सामूहिकरीत्या वध केला. उरलेले सगळे जीव वाचवून पूर्वेकडे पळून आले. त्या सगळ्यांना काशीनं आश्रय दिला. बख्तियार खिलजीनं नालंदा विद्यापीठाचा नाश केला आणि तिथल्या हजारो बौद्ध भिक्षूंची कत्तल केली. तेव्हा कितीतरी जणांनी तिब्बतला पळून जाऊन जीव वाचवला. काही जणं काशीला येऊन सारनाथला स्थायिक झाले. काशीत मृत्यू आला तर मुक्ती मिळते, या श्रद्धेनं इथे येणाऱ्यांची सतत रीघ लागलेलीच असते. भरतखंडातले अनेक विष्यांतले विद्यापारंगत इथे येतच असतात. त्यामुळे काशीमध्ये जेवढे विद्वान राहतात, तेवढे इतर कुठेही आढळत नाहीत.”

हा विसाव्या वर्षी एवढं सगळं जाणून आहे? मला आश्चर्य वाटलं. समाजातल्या मोठ्यांचं बोलणं ऐकून त्याला एवढं ठाऊक झालं असावं. त्यानं वेदाभ्यासही केला होता. पंड्यांच्या व्यवसायाची माहिती दिसत होती.

“एवढी सगळी देवळं तुम्ही दाखवली. दैत्यांचा संहार केल्यावर त्या दैत्याचं नाव शिवलिंगाला देता आणि त्याचीही पूजा करता? त्यांच्या नावानं मंदिरं उभारता? याचा अर्थ काय? मधुकैभट हा राक्षस होता, असं तुम्हीच सांगितलंत. त्याच्याच नावानं मधुकैभटेश्वर नावाचं देऊळही आहे. असं कसं?”

“खानसाहेब, एखादी व्यक्ती जिवंत असेपर्यंत देवाची वैरी असू शकेल. पण मृत्यूनंतर त्या व्यक्तीलाही सद्गती देणं हा देवाचा गुण आहे. देव कुणाचाही तिरस्कार करत नाही. नाही का?”

“कुणाचाही तिरस्कार करत नाही? सैतानाचाही?”

“तुमच्या धर्मातल्या सैतानाचं जे रूप आहे, ते आमच्या धर्मात नाहीच. अज्ञानामुळे चुकीचं वागणाऱ्यालाही आमचा देव उचलून छातीशी धरतो. आई लेकराला जवळ घेत नाही का? तसं.”

गेल्या आठ वर्षांमध्ये माझ्या डोक्यात रुजलेल्या देवाच्या कल्पनेशी ही कल्पना कुठेच जुळत नव्हती. ‘देवाला ताठपणा नको? देवातच नसेल तर तो त्याच्या अनुयायांमध्ये कुठून येणार? याच कारणासाठी ही माणसं भेकड झाली असतील का?’ त्याच्याबरोबरची चर्चा तिथेच थांबवून मी पुढची देवळं बघायला पुढे झालो.

सगळी देवालयं पाहून चौथ्या दिवशी मी वसतिस्थानावर परतलो तेव्हा हम्दुल्लांनी चौकशी केली, "काय काय पाहिलंस?"

"नावं लक्षात ठेवणं अशक्य आहे, एवढी देवळं!"

"लक्षात ठेवणं अशक्य व्हावं, एवढी देवळं पाहिली तर इतिहास समजतो का?"

यावर मला उत्तर सुचलं नाही. मी बावळटासारखा त्यांच्याकडे पाहत राहिलो. कितीही असमाधान वाटलं तरी ते माझ्यावर रागावणार नाहीत, याचा मला अनुभव होता. त्यांनीच सांगितलं, "गेले चार दिवस तू देवळं बघायला गेलास, की मी घोड्यावरून मशिदी बघायला जात होतो. सोबत कोतवालांनी दोन मौलानासाहेब दिले आहेत. त्यांना इतिहासाची उत्तम माहिती आहे. स्थानिक इतिहासाचा तपशील आमच्यासारख्यांना, दिल्लीत बसून दफ्तर लिहिणाऱ्यांना कसा ठाऊक असेल? कुतुबुद्दिन ऐबक आणि शहाबुद्दिन घोरी यांनी अल् हजिरा ६०४ मध्ये बनारस ताब्यात घेऊन सय्यद जमालुद्दिन नावाच्या दक्ष अधिकाऱ्याला सुभेदार म्हणून नेमलं होतं. त्यानं या शहरात आपल्या नावानं जमालुद्दिनपुरा नावाचा मोहल्ला निर्माण केला. अजूनही तो आहे. त्यानं या शहरातल्या मूर्तिपूजेचा संपूर्णपणे ऱ्हास करायचं ठरवलं. पण लवकरच इथला अधिकार आपल्या हातून निसटला. अल् हजिरा ६०७ मध्ये कुतुबुद्दिननं पुन्हा हे शहर जिंकून घेतलं. त्यानंतर इथे आपला धर्म अभिमानानं मिरवू लागला. त्या वेळी असलेली देवळं भुईसपाट करून, त्यांचेच खांब वापरून मशिदी बांधण्यात आल्या. हनुमानद्वारच्या मार्गावर एक अतिशय सुंदर घुमटाची मशीद आहे. पाहिलीस का? तू नाही पाहिलीस. तिचा खालचा संपूर्ण भाग हिंदू मंदिरांच्या अवशेषांनी बांधलेला आहे. मशीद अडीच मजली आहे. दुसऱ्या मजल्यावर एक संस्कृत शिलालेख आहे. म्हणजे कुठल्या तरी देवळातला शिलालेख, ते मंदिर पाडल्यावर मशीद बांधताना वापरला आहे. चौखंबा मोहल्ल्यातल्या मशिदीतले चोवीस खांब, गुलजार मोहल्ल्यात मकदूमसाहेब नावाचं एक स्मशान आहे. तिच्या उत्तर आणि पश्चिमेकडील ओवऱ्याही अशाच हिंदू मंदिरांच्या खांबांनी बांधल्या आहेत."

एवढ्या कमी अवधीत त्यांनी मिळवलेली माहिती ऐकून मला आश्चर्य वाटलं. बल्बन, खिलजी, तुघलक, लोदी या प्रत्येकाच्या कालखंडात काशीमधील कोणकोणती मंदिरं पाडण्यात आली आणि त्या मंदिरांचे अवशेष वापरून कुठल्या मशिदी बांधल्या, याविषयीही ते तपशिलानं बोलत होते. तेवढा सगळा तपशील माझ्या लक्षात राहणं कठीण होतं. काही म्हणा, हम्दुल्लांची स्मरणशक्ति अगाधच म्हटली पाहिजे! मला मंदिरं दाखवणाऱ्या तरुणापेक्षा यांच्याकडूनच जास्त माहिती मिळेल, असं वाटून मी विचारलं, "एवढ्या प्रमाणात विध्वंस होऊनही या शहरात आजही एवढी देवळं आहेत, असं कसं?"

"तेच तर! आमच्या लोकांना कितीही सवलती द्या, कितीही प्रोत्साहन द्या, व्यापार-धंद्यांमध्ये हिंदू बनियांशी ते स्पर्धा करू शकत नाहीत. ही आमची माणसं, युद्धामध्ये प्रशिक्षित; पण युद्ध नसेल तर लुटालूट, जेवणखाण, बायका यात रमतात. तूही पाहिलंस ना! कितीही कर लादले तरी हे बनिया दमडीही वाया जाऊ न देता, पैशानं पैसा जोडतात आणि व्यापार वाढवत राहतात. मुस्लिमांव्यतिरिक्त इतरांना व्यापार करायची संधीच द्यायची नाही, असं ठरलं तरी आमची माणसं आपण परवानगी घेतात आणि ठरावीक टक्के फायदा घरबसल्या घेत एखाद्या बनियाला विकून टाकतात. स्वत: बाई-दारूमध्ये बुडून जातात. सैनिक म्हणून तयार केलेल्या लोकांची लायकीच एवढी! पण म्हणून तेही सोडता येत नाही. आपलं सैन्य नसेल तर साम्राज्य शिल्लक कसं राहील? थोडक्यात सांगायचं तर पैशाची ताकद पूर्णपणे त्यांच्या हातातून हिसकावून घेणं शक्य नाही. हे बनिया त्यांच्या देवांना सोडत नाहीत. काशीसारख्या शहरातल्या मुस्लीम अधिकाऱ्याला लाच देऊन शहेनशहांचा हुकूम पूर्णपणे जारी होणार नाही, याची व्यवस्था करतात. नवी देवळं न बांधणं, जुन्यांची दुरुस्ती न करणं, यापैकी कुठलाच हुकूम या बनारसमध्ये चालवला जात नाही आणि दिल्लीच्या बादशहांना तरी काय! या सुभ्यातून जेवढा कर अपेक्षित आहे, तेवढा मिळाला की संपलं. त्यानंतर इथले सुभेदार आणि कोतवाल जी वर्दी देत, त्यावर विश्वास ठेवायला ते मोकळे! आता परिस्थिती तशी नाही. दक्ष, चाणाक्ष, धर्मनिष्ठ आलमगीर औरंगजेब बादशहा एवढ्यावर समाधान मानून गप्प बसणाऱ्यांपैकी नाहीत. लाचलुचपत करून कुणी त्यांच्या डोळ्यांत धूळ फेकू शकणार नाहीत."

"आता आहे ते विश्वनाथाचं मंदिर कुणी बांधलंय?"

"तोडरमल नावाचा बनारसचा राजा होता. त्याचा मुलगा गोवर्धन. नारायण भट्ट नावाच्या एका ब्राह्मणानं गोवर्धनला, त्याच्या वडिलांच्या नावे विश्वनाथ देवालय निर्माण कर, तुझ्या वडिलांना सद्गती मिळेल, असं सांगून प्रेरित केलं. असल्या पापकर्मासाठी नेहमीच ब्राह्मण लोक प्रेरणा देतात. ब्राह्मण म्हणजे हिंदूंचा मुल्ला!..." बोलता बोलता त्यांनी बोलणं आवरलं... "म्हणजे... तसं नाही. पापकर्माला प्रेरणा देणारे! म्हणूनच म्हणतात, एका ब्राह्मणाला ठार केलं तर दहा सर्वसाधारण हिंदूंना ठार केल्याचं पुण्य लाभतं. हे मंदिर अकबर बादशहांच्या काळात बांधलंय. त्यांचा हुकूम होता, सरकारकडून मदत मिळणार नाही, पण तुमचे तुम्ही पैसे जमवून देऊळ बांधणार असाल तर सरकारची काहीही हरकत नाही. धर्मभ्रष्ट! नीच! पापी! अजून नरकात खितपत पडला असेल. अल् हजिरा १०१५ मध्ये मेलाय ना? गेली चौसष्ठ वर्षं खितपत पडलाय तो. यानंतरही तसाच खितपत राहील." हम्दुल्लांचा चेहरा तिरस्कारानं भरला होता. त्यांच्या हसतमुख चेहऱ्यावर एवढा तिरस्कार त्याआधी कधीच मी पाहिला नव्हता.

रात्री जेवताना ते काही बोलले नाहीत. मीही गप्पच होतो. झोपण्याआधी मी विचारलं, "आलमगीर बादशहांनी विध्वंसाची सुरुवात काशीपासून का केली?"

"उत्तर स्पष्टच आहे. काफिरांच्या केंद्रस्थानापासूनच सुरुवात करायला हवी होती ना? आणखीही एक कारण असेल. या शहरात गेल्या तीनशे वर्षांपासून भक्तिपंथ नावाचं प्रकरण वाढायला लागलंय, म्हणतात. कुणीतरी रामानंद नावाचा, कबीर म्हणून एक जण, त्यानंतर वल्लभ नावाचा, तुलसीदास नावाचा एक कवी– ही सगळी मंडळी मंत्र-तंत्र काहीही नको, फक्त भक्ती पुरेशी आहे, असं सांगत फिरताहेत, असं समजलं. एवढंच असतं तर आपण तिकडे लक्ष द्यायची गरजच नव्हती. पण हे काय म्हणताहेत ठाऊक आहे? सगळे देव एकच आहेत, तुमचे-आमचे देव सारखेच!! याचा अर्थ काय? यांचा देव आणि आमचा अल्ला समान? उद्धटपणाची परिसीमाच झाली ही! अल्लाच्या बरोबरीचा दुसरा देव आहे, म्हणणाऱ्यांची खरं तर गर्दनच छाटायला पाहिजे. यातला कबीर तर आपला माणूस, मुस्लीम. पण स्वत:ला रामभक्त म्हणवतो. राम-रहीम सारखेच म्हणतो. मुसलमान असून दुसऱ्या देवाचा उच्चार केला, एवढंच खरं तर पुरे आहे त्याची गर्दन उडवायला! आणि असं असताना, इथे हे असले प्रकार चालतात, याचाच अर्थ आमचे अधिकारी किती लाचखोर झाले आहेत, तूच पाहा! आलमगीर बादशहांच्या हे सगळं लक्षात आलंय. म्हणून सर्वप्रथम बनारस शुद्ध करून, त्यानंतर इतर गावांकडे मोर्चा वळवायचा त्यांनी निश्चय केलाय. अतिशय धार्मिक मन आहे त्यांचं. असं धार्मिक मन कसं काम करतं ते मला ठाऊक आहे! मी नेहमीच सांगतो ना! त्यांच्यासाठी स्वर्गात शुद्ध सोन्याचा, चकाकणारा महाल, एव्हाना बांधून सज्ज आहे!"

काही वेळ माझं मन एवढा मोठा शुद्ध सोन्याचा महाल बांधायला किती लक्ष मण सोनं लागेल, याचा हिशेब करण्यात रमलं. स्वर्गाचा आकार मला ठाऊक नव्हता. हम्दुल्लांना विचारावंसं वाटलं. पण तोवर त्यांना झोप लागली होती.

दुसरे दिवशी आम्हाला जाग यायच्या आधीच शहराच्या प्रत्येक गल्लीत सशस्त्र घोडेस्वार आणि शिपाई उभे होते. नदीवर अंघोळीला जाण्याचीही मनाई करण्यासाठी काठावर शिपाई उभे होते. मुसलमानांव्यतिरिक्त इतर कुणाकडेही कसलीही हत्यारं असता कामा नयेत, घोड्यावर बसू नये असा हुकूम तर संपूर्ण साम्राज्यभर होता. लाकूड तोडण्याच्या कुऱ्हाडी, कोयते, एवढंच नव्हे, भाजी चिरायचे छोटे चाकूही घराबाहेर आणण्यावर बंदी आली. पुन्हा डांगोरा पिटेपर्यंत घरातून कुणीही बाहेर पडू नये असा हुकूम झाला.

या सगळ्या हुकमांमुळे कुठल्या तरी मंदिराचा नाश केला जाणार आहे, हे गावभर सगळ्यांना समजलं. पण काय करणार? हातात शस्त्र, अधिकार काहीच नव्हतं, समूहशक्तिही नव्हती. काही घरांच्या दारांआडून 'हर हर महादेव', 'बम् बम् भोलेनाथ', 'शिवोहं शिवोहं' वगैरे ऐकू येत होतं. त्या दारांवर धडका देत शिपाई "थांबवा दंगा! नाहीतर घर पेटवून देऊ!" म्हणून दमदाटी देत. आतले आवाज आपोआपच गप्प होत. क्वचित एखादा तरुण हातात कुऱ्हाड घेऊन उन्मादानं 'हर हर महादेव'च्या घोषणा देत विश्वनाथ मंदिराच्या दिशेला धाव घेई. पण दहा-बारा पावलं पुढे जाण्याआधीच एखादा वेगानं येणारा घोडेस्वार त्याला कंठस्नान घालून

निघून जाई. रक्ताचा आणखी एक पाट रस्त्यावरून वाहू लागे. जवळपासच्या घरांमधून उमटणारी आक्रंदनंही बंद दाराआड आतल्या आत शमली जात होती.

हे सारं नीट चाललंय की नाही यावर देखरेख करण्यासाठी आम्हा दोघांना राजचिन्हाचा मुखवटा आणि जीन कसलेले दोन घोडे दिले होते. त्यावर स्वार होऊन आम्ही संपूर्ण शहराच्या बंदोबस्ताची पाहणी करून आलो.

"मुसलमानांव्यतिरिक्त इतरांना हत्यार बाळगायची परवानगीच नसताना एवढ्या बंदोबस्ताची खरोखरच गरज आहे का?" मनात उमटलेला प्रश्न मी हम्दुल्लांना विचारला.

"त्याचं असं आहे, कुत्रं कधी चावेल, सांगता येत का? अलीकडे, म्हणजे सदतीस वर्षांपूर्वी घडलेली एक घटना सांगतो, ऐेक. आमच्या बादशहांचे पिताजी शहाजहान बादशहाही धर्मनिष्ठ होते. अर्थात आमच्या बादशहांची सर नव्हती, तरीही धर्मनिष्ठच म्हटलं पाहिजे. त्यांचे वडील जहांगीर बादशहा. त्यांच्यामध्ये मात्र आपल्या धर्मभ्रष्टतेचं प्रमाण जास्तच होतं. हवं तर आपापल्या खर्चानं काफिर देवळं बांधू शकतील, हा अकबर बादशहांच्या काळातील कानून जहांगीर बादशहांनीही सुरू ठेवला होता. त्यामुळे त्यांच्याही काळात साम्राज्यात कितीतरी ठिकाणी देवळांच्या उभारणीचं कार्य सुरू असायचं. शहाजहान बादशहा सिंहासनावर आले. त्यांनी अल् हिजरा १०४२ मध्ये फर्मान काढलं, नव्यानं बांधलेली आणि बांधकाम सुरू असलेली देवालयं तातडीनं जमीनदोस्त केली जावीत. हे तर 'बादशहा-नामा'त नोंदलं गेलेलं आहे. या फर्मानाच्या आधारे सरकारनं फक्त बनारसमध्ये ७६ देवळं जमीनदोस्त केली. अलाहाबादचा सुभेदार हैदरबेग यानं आपल्या चुलतभावाला बनारसमध्ये या अर्धवट बांधलेल्या ७६ देवळांना पाडण्यासाठी पाठवून दिलं. पण एक हिंदू राजदूत रस्त्यात टपून बसला होता. त्यानं त्या चुलतभावाला आणि त्याच्या चार सहकाऱ्यांना रस्त्यात गाठून ठार मारलं. पण पाठोपाठ यांच्या सैन्यानं त्या राजदूतावर हल्ला करून त्याला कापून काढलं. मरायची खात्री असताना एकट्यानं पुढे होऊन पाच जणांना मारलं! म्हणजे यांची धर्मांधता किती टोकाला जाऊ शकते, हे तूच बघ! इतरांनी धडा शिकावा म्हणून त्या राजदूताचं प्रेत रस्त्याकडेच्या झाडाला टांगून सगळे पुढे गेले. असल्या अनुभवांमुळेच कोतवालांनी एवढी सावधगिरी बाळगली आहे."

काशीला आल्याच्या दुसऱ्या दिवशीच मी विश्वनाथ-देवालय पाहिलं होतं. त्यानंतरही एकदा मुद्दाम गेलो होतो. आणखी पाच-सहा दिवसांत जमीनदोस्त होणाऱ्या देवळाचा आकार तरी पाहू या, असा विचार करून. ते चौकोनी देऊळ. प्रत्येक बाजू एकशे चोवीस हात लांब. गर्भगृहालगत सोळा हात लांब आणि दहा हात रुंदीचे चार मंडप. त्यानंतर बारा हात लांब आणि आठ हात रुंद अशा आकाराचे मंडप. त्यातून चारही दिशांना जाता येत होतं. पूर्व आणि पश्चिमेच्या मंडपात द्वारपाल आणि दंडपाणी यांची मंदिरं. देवळाच्या चारही कोपऱ्यांत चार छोटी छोटी उपदेवालयं. देवळाबाहेर नंदीमंडप. संपूर्ण देवालयाची उंची एकशे अठ्ठावीस हात लांब. मंदिराच्या शिखराची उंची चौसष्ठ हात. मंडपांवरील शिखरांची उंची अठ्ठेचाळीस हात. एकंदरीत हे पाच मंडपांचं मंदिर. पूर्वेच्या एकशे पंचवीस हात लांब आणि पस्तीस हात रुंदीच्या रंगमंडपात धार्मिक-अध्यित्मक उपदेश, व्याख्यानं चालतात म्हणून भट्टनं सांगितलं होतं. मंदिराच्या चारही दिशांना प्रदक्षिणा पथ. त्या प्रदक्षिणा पथावर अगणित लहानसहान छोटी छोटी मंदिरं!

चारही बाजूंनी तोफा डागून मंदिर भुईसपाट करतील अशी माझी कल्पना होती. पण हम्दुल्लांबरोबर घोड्यावरून तिथे जाऊन पोहोचलो, तेव्हा तिथलं दृश्य वेगळंच होतं. इमारतीच्या कोणत्या भिंतीवर तोफेचा गोळा बसला पाहिजे आणि कोणत्या भागाला अजिबात धक्का लागता कामा नये यावर तिथे गंभीरपणे चर्चा चालली होती. चर्चा करणारे फारसी भाषेत बोलणारे मुसलमान वास्तुशिल्पी होते. बरीच चर्चा झाल्यावर दारुगोळ्याचा वापर करून भिंती उडवण्यात आल्या. देवळातल्या मूर्तीकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. पाया, प्रमुख भिंती आणि खांब राखून याच वास्तूचं मशिदीत रूपांतर करण्याबाबत वास्तुशिल्पींचा विचार सुरू होता. देवळाभोवती पाचशेहून अधिक शिपाई आणि घोडेस्वार हातात शस्त्र घेऊन सज्ज होते. पुढची भिंत ढासळत असताना, या कामासाठी नेमलेला प्रमुख सरदार "मूर्ती! मूर्ती" ओरडला. भिंती पाडण्याचं काम तिथेच थोपवून दहा-बारा शिपायांसकट तो गर्भगृहात घुसला. बाकीचे सगळे बाहेरच उभे होते. थोड्या वेळानं बाहेर येऊन सरदारानं सांगितलं, "आत मूर्तीच नाही. तिथून ती उचकटून नेल्याच्या खुणा दिसताहेत."

कोतवालांनीही आत जाऊन पाहिलं. बाहेर आल्यावर त्यांची आपसात काहीतरी चर्चा झाली. हम्दुल्लांशीही बोलणं झालं. पूर्वी केव्हा इथे लिंग होतं? की याआधी पुजारीही या रिकाम्या जागेची पूजा करायचे? त्यांना जेरबंद करून मिरचीची धुरी देऊन, जबरदस्तीनं तोंड उघडू या म्हटलं तर ते निघून गेलेले आणि शिविंलग सापडलं नाही म्हणून काय बिघडणार आहे? सापडलं तरी ते मशिदीच्या दाराशी पायरी म्हणूनच वापरलं असतं. अन् त्यासाठी भोवतालच्या देवळांच्या मूर्ती आहेतच म्हणा! हे एक शिविंलग नाही म्हणून काय बिघडणार आहे? एवढ्याशा कारणावरून हातात घेतलेल्या कामाला उशीर होता कामा नये, म्हणून पुढच्या पाडापाडीला सुरुवात झाली.

सकाळपासून माझ्या पोटात कलमलत होतं. त्यातच घोड्यावर बसून गावातल्या गल्ली-बोळातून फिरलो होतो. आताही देवळासमोर घोड्यावर बसून होतो. पोटात अस्वस्थ होत होतं. सकाळी पोट साफ झालं होतं. त्यानंतर पोटाला तडस लागेल एवढी बिर्याणी खाल्ली होती. दिल्लीत कल्पना करणंही कठीण, असं समृद्ध जेवण इथे आम्हाला मिळत होतं. वर फळं. तरीही पोटात अस्वस्थ वाटत होतं. पुन्हा एकदा पोट साफ करायला जाऊन यावं का? तेच बरं. हम्दुल्लांना सांगून मी वसतस्थिळाकडे निघालो. त्यांनी बजावलं "एकटाच जाऊ नकोस. एखाद्या खिडकीतून एखादा चाकू येईल आणि पोटच साफ करायचंय ना? मग इथेच नदीवर जाऊन ये. काफिर पवित्र मानतात, अशा जागी बसशील तर पुण्य लाभेल." त्यांनी सांगितलं.

नदीच्या प्रवाहाचा जोर थोडा कमी झाला होता. निसरडं, चिखल नसलेली जागा शोधून तिथल्या दगडांचा आधार घेऊन उकिडवा बसलो. काफिर पवित्र मानत असलेली जागा मलीन करतोय, अशी भावना मनात घेऊन! पण पोटातली तळमळ कमी झाली नाही. पोट रिकामंच असल्यामुळे उकिडवं बसूनही काही उपयोग झाला नाही. पोटातली मळमळ मनाची तळमळ झाली. कारण मात्र समजत नव्हतं.

पायात गोळे आल्यावर उठलो आणि तसाच पाय ओढत नदीकडे गेलो. पायरीवर बसलो. नदीचं पाणी अजूनही लालबुंद होतं. वरच्या बाजूला कुठे तरी पावसाचा जोर कायम होता. पाण्याला वेगही बराच होता. पण वरवर पाहता हे लक्षात येत नव्हतं. प्रवाह शांतच वाटत होता. प्रवाहातून झाडांच्या फांद्या, खोडं, गुरा-ढोरांचे मृतदेह, वितभर कापड असलेले मानवी मृतदेह वाहून येत होते. एवढ्यांना मृत्यू देण्याची शक्ति आणि एवढ्यांना जीवन देण्याची ताकद असूनही शांतपणे वाहणारी गंगा पाहत असताना क्षणार्धात गावच्या देवाचं रक्षण करता न येणं, पोटात खंजीर खुपसून जीव न देणं, क्षणाचाही विलंब न लावता धर्म बदलणं, लाकडी पकडीनं गमावलेलं पुंसत्व– या सगळ्या घटना मनात तरळून गेल्या. आपल्या मंदिरांचंही जो रक्षण करू शकत नाही, तो कसा विश्वाचा नाथ होऊ शकेल? पाठीशी ऐकू येणाऱ्या दारुगोळ्याच्या प्रत्येक आघातासरशी मनातली तळमळ अधिकच वाढत होती. उठून पायऱ्या चढून देवळापाशी जावंसं वाटेना. पुन्हा नदीवर नजर खिळवून बसून राहिलो. सपाटीवरून वाहणारी ती नदी मला एखाद्या मूर्तीसारखी वाटली.

तसाच घाटांवरच्या पायरीवरून चालत राहिलो. थोड्या अंतरावर एक साधू बसला होता. पांढरी दाढी, पांढरे केस, पांढऱ्या कौपिनावर पांढरं सैल वस्त्र. ऊन-वारं-थंडी-पाऊस यानं रापल्यामुळे काळं पडलेलं शरीर. पावसाळ्यात मधूनच पडणाऱ्या उन्हाच्या किरणांमध्ये त्याची आकृती स्पष्टपणे दिसली. तो ध्यान करतोय की नदीचं निरीक्षण करतोय, हे समजलं नाही. जवळ जाऊन पाहावंसं वाटलं. त्या दिशेनं पावलं टाकली. पावलांची चाहूल लागून किंवा सावली जाणवून त्यानं माझ्याकडे वळून पाहिलं. काहीतरी बोलायची इच्छा झाली. पण काय बोलणार? दोन-तीनशे पावलांएवढ्या अंतरावर चाललेल्या एका घटनेनं माझं मन एवढं ढवळून टाकलं होतं की आणखी काही सुचणं शक्य नव्हतं.

"तिथे तुमच्या विश्वनाथाच्या मंदिराचे तुकडे होताहेत, ऐकू नाही आलं? तरीही तुम्ही इथे शांत बसलात?" मी म्हटलं.

"तुमचा उद्देश सफल झाला ना? परमेश्वर तुमचं भलं करो!" त्याच्या चेहऱ्यावर मंद हसू होतं. ते पाहून मी गोंधळून गेलो. 'मंदिर-नाश हा माझा उद्देश होता? नव्हता? त्याच उद्देशानं तर मी बादशहांच्या खास प्रेयसीची मदत घेऊन हम्दुल्लांच्या बरोबरीनं इथे यायचा घाट घातला ना? तरीही वाटलं, त्याच्या बोलण्याला विरोध केला पाहिजे.'

त्याची नजर मला आतून-बाहेरून निरखत होती. वाटलं, आता एखाद्या तर्काचा आधार घेऊन काहीतरी संभाषण करणं शक्य आहे.

"हा माझ्या उद्देशाचा प्रश्न नाही. समस्त हिंदोस्तानवर अंमल असलेल्या शहेनशहा औरंगजेबाचा उद्देश आहे. ज्या जगन्नियंत्यानं त्यांची या प्रदेशावर राज्य करण्यासाठी नेमणूक केली, त्याच्या उद्देशाची पूर्तता बादशहांच्या आज्ञेनं होतं आहे. माझा प्रश्न एवढाच आहे, ज्याची तुम्ही विश्वाचा नाथ म्हणून पूजा करता, त्या विश्वनाथाला आपल्या स्वत:च्या वसतस्थिनाचं शंभर फिरंग्यांकडून रक्षण करण्याएवढीही शक्ति नाही. याचाच अर्थ, तो एक मिथ्या देव आहे. हिंदोस्तानमध्ये असले शेकडो नव्हे, हजारो देव आहेत ना, त्यांचा संहार करून तिथे एक देव स्थापन करणं, हा बादशहांचा उद्देश आहे. अनेक मिथ्या देवांच्या चिंध्या करून एका देवाची उपासना सुरू करणं! समजलं?" मी आवेश दाखवत म्हणालो.

"बैस! उभ्यानंच बोलतोयस. उभ्या-उभ्या बोलायचा हा विषय नाही." त्यानं शेजारच्या दगडाकडे हात दाखवत म्हटलं. सकाळपासून माझ्याही पायात गोळे येत होते. बसलो.

"कुठलं गाव तुझं? आई-वडील काय करतात?" ज्येष्ठानं लहानाची सहज चौकशी करावी, तसं त्यानं विचारलं.

त्या प्रश्नानं मी कासावीस झालो. 'काय उत्तर देऊ? रागही आला. याला काय करायचंय हे घेऊन? पण काय चुकलं याचं? ओळख करून घ्यायची ही अगदी सामान्य पद्धत. मुसलमानांमध्येही ही आहे. उलट इतरांपेक्षा जास्त. 'बिन्' म्हणून पुढे वडिलांचं नाव लावलं नाही तर पहिल्या नावाला वजनच येत नाही. त्यानं तेच विचारलंय. राग कमी झाला. पण प्रश्न कायम होता. काय उत्तर देऊ?'

तोच पुढे म्हणाला, "तुला संकोच वाटणं स्वाभाविक आहे. मीच सांगतो ऐक. तू राजपुतानाचा आहेस. तुला पकडून तुझं पौरुष नष्ट करून तुला जनानांच्या सेवेसाठी ठेवण्यात आलंय. होय की नाही?"

माझं सर्वांग घामेजून गेलं. 'चेहऱ्यावरून इतिहास सांगणारा हा कुणी सिद्ध पुरुष तर नाही?' क्षणभर त्यांना पदस्पर्श करून नमस्कार करावंसं वाटलं. पण केला नाही. तेच पुढे म्हणाले, "माझ्याविषयी तुझ्या मनात असलेली भावना बदलतेय. आदर वाढतोय! होय ना? स्पष्टच सांगतो, माझ्यामध्ये अशी कुठलीही अलौकिक शक्ति नाही. हिंदुस्थानातल्या शिल्लक असलेल्या आणि भग्न झालेल्या सगळ्या स्थळांची मी तीर्थयात्रा करत भिक्ष मागत फिरतोय. त्यामुळे माणूस पाहताच मी तो कुठल्या प्रदेशातला आहे, हे त्याच्या चेहऱ्यावरून आणि शब्दोच्चारावरून ओळखतो. त्यामुळे मी तुझा मूळ प्रदेश सांगू शकलो. सकस आहार मिळत असला तरी पौरुष नष्ट झाल्यावर येणारी कळाहीनता आणि विचित्र मुखचर्याही सहजच लक्षात येण्यासारखीच असते. उन्हाचा स्पर्श न झाल्यामुळे कोमल राहिलेल्या त्वचेमुळे तू जनानाच्या सेवेत असल्यासारखं वाटलं. माझा अंदाज ठीक आहे?"

विवस्त्र होऊन वैद्यापुढे उभ्या राहिलेल्या रोग्यासारखी माझी परिस्थिती झाली. त्यामुळे वैद्याचा अंदाज नाकारण्याचं नैतिक बळ कुठून येणार? मी नम्रपणे विचारलं, "महाराज, मुसलमानांमध्ये एक देव आहे. हिंदूंमध्ये शेकडो देव आहेत. मग त्यांच्यामध्ये एकता कशी येणार? त्यांच्या हातातून सत्ता निघून चालली आहे, सगळीकडे इस्लाम प्रबळ होतोय, हे खोटं आहे का?"

"गणपती-पूजकांनी विष्णू-पूजकांवर आणि पार्वती-पूजकांनी लक्ष्मी-पूजकांवर आगपाखड करत मुसलमानांची मदत घेतली, असं एखादं तरी उदाहरण आहे का?" त्यांनी विचारलं.

मला एकही घटना आठवली नाही. "तरीही अल्लाहूपुढे तुमची एकेक देवालयं कोसळत नाहीत का? आणि यावरून अल्लाहू बलिष्ठ दैवत आहे, हे सिद्ध होत नाही का?" मनातली शंका मी बोलून दाखवली. शांतपणे ऐकून घेतल्यावर ते म्हणाले, "देवाविषयीची त्यांची कल्पनाच चुकीची आहे आणि आपण युद्धात हरल्यामुळे आपणही ती मान्य करतोय. त्यातून तुझा प्रश्न उद्भवला आहे. आपण ज्या नैतिकतेच्या कल्पना मानतो, त्यावरच आपला देवही उभा असतो. अध्यात्माच्या ज्या पातळीवर असतो, त्यावरही ते अवलंबून असतं.

अल्लाहू हा अत्यंत मत्सरी देव आहे, असं माझं म्हणणं आहे. आपल्याव्यतिरिक्त इतर कुणाचीही आराधना करणाऱ्या भक्ताला तो सतत जाळणाऱ्या नरकात टाकून देतो. अशा प्रकारच्या देवाची निर्मिती करणारेही अशाच मत्सरी स्वभावाचे आहेत, असा याचा अर्थ नाही का होत? मी फक्त एकटा आहे, तिथे इतर कुणाला जागाच नाही, असं म्हणणारा; काम-क्रोध-मद-मत्सर असलेला देव निर्माण करणारा धर्म तरी कसला? क्षुद्र शक्ति आणि नीतिबाहा तंत्राचा वापर करून मिळवलेला विजय आपल्या देवावर आरोपित करणं, अध्यात्म-संमत म्हणता येईल का?"

मला यावर उत्तर सुचलं नाही. अशा प्रकारे विचार करता येईल, अशी शक्यताच माझ्या लक्षात आली नव्हती. ते माझ्या उत्तराची काही वेळ वाट पाहून म्हणाले, "अध्यात्म हाच धर्माचा आधार आहे, असं आम्ही मानतो. त्यांच्याकडे अध्यात्माची कल्पनाच नाही. पशूशी साम्य असलेल्या माणसानं आधी आतून स्वत:ला शुद्ध करत वाढलं पाहिजे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, शौच, संतोष, तपस्या, स्वाध्याय, ईश्वर प्रणिधान या नीतीच्या कल्पना ऐकल्यास का?"

"लहानपणी ऐकल्या होत्या. आता त्याचा अर्थ अस्पष्टपणे लक्षात येतोय."

"या नीती-नियमांच्या पालनानं परिशुद्ध झाल्याशिवाय देवाच्या संदर्भात बोलायचा अधिकारच कोणाला नाही. परिशुद्धी कमावत असतानाच अध्यात्मात वाढलं पाहिजे. अशा प्रकारच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर देवाची वेगवेगळी कल्पना जन्म घेत असते. त्यामुळे प्रत्येक जण साधनेच्या अथवा नैतिकतेच्या कोणत्या टप्प्यावर आहे हेच त्याचा देव दर्शवत असतो. इतरांच्या देवांचा नाश करायचा आदेश देणाऱ्यांची नैतिकता आणि साधना कशा प्रकारची आहे, हे तूच सांग!"

मला त्यांचं बोलणं पूर्णपणे समजलं, असं म्हणता येत नाही. मी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहत राहिलो. मला समजलेलं नाही, हे त्यांच्याही लक्षात आलं. ते पुढे म्हणाले, "सगळ्या धर्माचं सार एकच आहे. सगळे धर्म-ऋषी एकच तत्त्व सांगतात. प्रत्येकाची भाषा फक्त वेगवेगळी असते. कुणी सकारात्मक पद्धतीनं सांगतं, तर कुणी तेच तत्त्व नकारात्मक पद्धतीनं सांगतं. कुणी 'असंप्रज्ञात समाधी' म्हणतात, तर कुणी प्रज्ञा म्हणतं. कुणी सत्याला मुख्य मानतात, तर कुणी असत्य नाकारतात. कुणी आनंद-प्राप्तीच्या मार्गाविषयी बोलतं, तर कुणी दु:ख-निर्दालनाचा मार्ग दाखवतं. नीती-वेदान्तात मूलभूत फरक नाही. वेदान्त, बौद्ध, जैन, योग इत्यादी सगळे भेद नावापुरतेच आहेत. सगळ्या धर्मातल्या विद्वानांना भेटून त्यांच्याशी चर्चा करणं ही माझी पद्धत आहे. त्यांचा शोध घेत मी हिंदुस्थानच्या काना-कोपऱ्यांत फिरत असतो. एकदा एका मौलवीसाहेबांशी बोलायचीही संधी मिळाली. हे मौलवी शक्यतो इतर धर्मीयांशी चर्चा करायला तयार नसतात. आपला धर्मच सर्वश्रेष्ठ असून, हाच भगवंताचा शेवटचा संदेश आहे आणि तो संपूर्ण जगभर पसरवण्याचा त्याच भगवंताचा आदेश असल्यावर इतर सर्व धर्म तुच्छच ना? मग अशा तुच्छ धर्माच्या तुच्छ अनुयायांशी चर्चा कसली? मला भेटलेले मौलवीसाहेबही या मनोवृत्तीपासून फारसे वेगळे नव्हते. त्यांनी त्यांचा धर्मसंस्थापक पूज्य प्रवादी (स) यांच्या जीवनातली एक घटना सांगितली. परमेश्वरानं गेब्रियल नावाच्या देवदूताच्याद्वारे प्रवादी (स) यांचेकडे पाठवलेल्या संदेशाला 'कुर्‌आन' असं नाव आहे. प्रवादी (स) यांनी आपल्या जीवनानुभवातून आपल्या अनुयायांना काही दाखले दिले. त्याचं नाव 'हदिस'. 'कुर्‌आन' श्रुतधर्म. 'हदिस' हा आचारातून व्यक्त झालेला कृत-धर्म. दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. त्यामुळे प्रवादी (स) यांचं जीवनचरित्र 'कुर्‌आन'इतकंच महत्त्वाचं मानलं जातं. याच प्रकारात ते समजून घेतलं पाहिजे. नीट सांगतोय ना मी?"

"मला ठाऊक आहे, त्यावरून तरी, योग्यच सांगताय."

"मौलवीसाहेबांनी सांगितलेली घटना अशी : प्रवादी (स) यांना अरेबियामध्ये असलेल्या सर्व टोळ्यांना आपल्या धर्मात ओढून घेण्याची जबर इच्छा होती. अरेबियात बनिकुरैझ नावाचा एक यहुदी समूह होता. इतर समूहांच्या परिवर्तनाएवढं यांचं परिवर्तन करणं सोपं नव्हतं. यहुदी व्यापारी समाज श्रीमंत, हुशार. त्यांचा इतर समूहांवर प्रभाव होता. कुर्‌आनला ख्रिस्ती बायबलची पार्श्वभूमी होती. बायबलचं मूळ यहुदींचा 'तोरा.' यालाच जुना मसुदा असंही म्हणतात. त्या भागात अतिप्राचीन परंपरा असलेला समूह म्हणून समाजात मान्यताही जास्त. पुढे आणखी एक प्रवादी जन्म घेणार आहे असं 'तोरा'मध्येही लिहिलेलं आहे, म्हणतात. तो प्रवादी

आपणच आहोत असं जर यहुदींकरवी मान्य करायला लावलं, तर त्या भागातले सगळे समूह आपल्याला मान्यता देतील असं प्रवादी (स) यांना वाटलं. बनिकुरैझना त्यांनी तसा निरोप पाठवला. पण त्यांनी ते मान्य करायला हवं ना? उलट, इस्लामविरोधी समूहांशी हातमिळवणी करून ते त्यांना चिथवत होते. त्यांना धडा शिकवायचा असा प्रवादी (स) यांनी विचार केला. त्यांच्या समवेत असलेल्या इतर दोन अरबी समूहांना फसवून दूर करून त्यांच्या किल्ल्यावर हल्ला केला. शक्तिच्या अभावामुळे त्यांना शरणागती पत्करावी लागली. पुढे काय झालं, हे समजून घेणं तुझ्या प्रश्नाच्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे. प्रवादी (स) यांनी आत सापडलेल्या सातशे सैनिकांचे हात बांधून त्यांना बाहेर आणलं. एक हजार दोनशे स्त्रिया-मुलांना गुरं हाकत आणतात तसं बाहेर आणण्यात आलं. प्रवादी (स) यांनी त्या पुरुषांच्या प्रमुखाला विचारलं, 'तुम्हाला शिक्षा झालीच पाहिजे. तुमच्यापैकी एकावर न्यायाधीशाची जबाबदारी सोपवतो. तो सांगेल तीच शिक्षा देण्यात येईल.' याला साहजिकच त्यांनी मान्यता दिली. यहुद्यांमध्येही अंत:कलह होताच. या घटनेआधी काही दिवस साद नावाच्या एका यहुदीनं बनिकुरैझवर हल्ला करून हार मानली होती, जीव वाचवून पळून गेला होता. त्या युद्धात बाणांनी केलेल्या त्याच्या देहावरच्या जखमा अजूनही ताज्या होत्या. प्रवादी (स) पैकी एक स्त्री त्याची शुश्रूषा करत होती. त्याला प्रवादी (स) यांनी गाढवावर बसवून बोलावून घेतलं आणि यांना शिक्षा फर्मावण्यास सांगितलं. आपल्यापैकी माणूसच शिक्षा देणार म्हटल्यावर सगळे बंदी 'दया, दया'म्हणून आक्रंदू लागले. या सादनं सगळ्या पुरुषांना शिरच्छेदाची शिक्षा फर्मावली. सगळी संपत्ती वाटून घ्यायची आणि बायका-मुलांना गुलाम करावं अशी शिक्षा केली. प्रवादी (स) नी याला संमती दिली. हा निर्णय दिलेल्या सादला स्वर्गातली अत्युत्तम जागा मिळू दे, अशी त्यांनी प्रार्थना केली. बायका-मुलांना गावी नेण्यात आलं. त्या रात्री पुरुषांना मैदानातच बंद करून ठेवण्यात आलं. जर त्या सगळ्यांनी 'तोराठमध्ये उल्लेख असलेला प्रवादी महमद (स) आहे, हे मान्य केलं असतं तर त्यांचा जीव वाचला असता. पण जीव वाचवण्याच्या कारणासाठीसुद्धा त्यापैकी कुणी आपल्या पुरातन धर्माशी प्रतारणा केली नाही. सगळी रात्र त्यांनी धर्मग्रंथाचं पठण करत, परस्परांचा विश्वास दृढ ठेवायला मदत करण्यात घालवली. इथे प्रवादी (स) नी रात्रभर गावाच्या मधोमध खोल खंदक खणायला लावले. सकाळी पाच-सहा जणांना त्या खंदकापाशी आणून त्यांचा शिरच्छेद केला. त्यानंतर पुन्हा पाच-सहा माणसं. रात्री चूड पेटेपर्यंत अशाच प्रकारे हत्याकांड चाललं. रक्ताचे पाट वाहात राहिले, मांसाचा ढीग साचत राहिला. या चढाईत ज्यांनी भाग घेतला होता, त्या सैनिकांनी त्या बायका-मुलांना आपसात वाटून घेतलं. त्यापैकी अत्यंत रूपमती 'रहेना' हिला प्रवादी (स) यांनी स्वत:साठी निवडून, ठेवून घेतलं. तिच्याशी लग्न करायचा प्रवादी (स) यांचा प्रस्ताव होता. पण तीही धर्म सोडायला तयार झाली नाही. त्यामुळे त्यांनी तिल ा तशीच ठेवून घेतली. जिंकून आणलेल्या संपत्तीपैकी पाचवा भाग प्रवादी (स) यांना देऊन इतर सर्व सैनिकांत वाटण्यात यावे, असा प्रवादी (स) यांनी निर्णय दिला. सैनिकांनी निवडल्यानंतर शिल्लक राहिलेल्या स्त्रिया, मुलं, घोडे, गुरं यांचा लिलाव पुकारण्यात आला. युद्धामधल्या लुटीचा पाचवा भाग राजाकडे जमा करायची पद्धत तेव्हापासून सुरू झाली. ही घटना तू ऐकली होतीस क�

"ऐकली होती. पण भय-भक्तीपूर्वक! हम्दुल्लांनी सांगितली होती." मी मान खाली घातली.

"याचं तात्पर्य काय, सांग बघू!" साधूनं विचारलं.

मला समजलं नाही. तो माझ्या चेहऱ्याकडे पाहत होता. माझ्या तोंडून काही ना काही उत्तर वदवून घेण्याइतकी ती नजर तीक्ष्ण होती.

"प्रवादी (स) जे काही करतील ते देवाच्या प्रेरणेमुळेच, होय की नाही? यहुदींनी प्रवादी (स) यांचं प्रभुत्व का मान्य केलं नाही?" मी म्हणालो. खरं तर हे दोन्ही माझ्या मनातले प्रश्न नव्हते. ही घटना सांगताना हम्दुल्लांनी पटवून दिलेले हे मुद्दे होते.

"संत, साधू, प्रवादी, ऋषी– कुणीही माणूस असू दे, आपल्या कार्याची जबाबदारी देव किंवा दैव यांवर टाकतो, तेव्हा तो त्यातली आपली जबाबदारी टाळत असतो. प्रत्येक व्यक्ती किंवा समाज आपल्या नैतिक पातळीप्रमाणे आपला देव निर्माण करतो, असं मी सुरुवातीला सांगितलं. आपण सांगतो किंवा मानतो त्या देवावर सगळ्यांनी विश्वास ठेवावा, त्याची उपासना करावी असं म्हणणं हा अहंकार नाही तर दुसरं काय? ही अहंकारी वृत्ती इतरांच्या श्रद्धांचा कसा आदर राखेल? देवच मानत नाही, म्हणणाऱ्यांना कसं समजावून घेऊ

शकेल? अध्यात्मात तर देव हा महत्त्वाचा नाहीच. देवाचं अस्तित्व नाकारणाराही अध्यात्मी असू शकतो. मूलभूत हवी ती दया, काया-वाचा-मने अहिंसा, ब्रह्मचर्य. कारण ‘काम’ जिंकल्याशिवाय हिंसेवर विजय मिळवता येणार नाही.”

“महाराज, युद्धात हरलेल्यावर आपला धर्म लादणं, चुकीचं आहे का?”

“तू याज्ञवल्क्य-स्मृती नावाच्या धर्मशास्त्राचं नाव ऐकलंस काय?”

“नाही.”

“त्यात सांगितलंय,

‘यस्मैन् दंशे य आचारो व्यवहारा: कुलस्थिती:!

तथैव परिपाल्यो: सौ यदा वश मुपागता: ’

अर्थात दुसरा देश जिंकल्यावर राजानं, तिथे जे आचार, व्यवहार चालत होते, तिथली जी कुटुंब-स्थिती ती जशीच्या तशी चालवली पाहिजे. समजला का नाही, आमच्या बहुप्राचीन धर्माचा आदेश? बरं, कालिदासाचं महाकाव्य ‘रघुवंशम्’चं नाव ऐकलंय?’

“नाही.”

“त्यात रघूला महाकवीनं धर्मविजयी म्हणून गौरवलं आहे. याचा काय अर्थ? खूप पूर्वी होऊन गेलेला काश्मीरचा विद्वान वल्लभदेव यानं राजांचे धर्म-विजयी, लोभ-विजयी आणि असुर-विजयी असे तीन प्रकार पाडले आहेत. जिंकलेल्या शत्रूला त्याच्याच जागी ठेवून फक्त आपला विजय घोषित करणारा धर्म-विजयी राजा. जिंकलेल्या शत्रूचं राज्य, धनभांडार हिरावून फक्त प्राणदान देणारा लोभ-विजयी राजा आणि शत्रूला ठार करून त्याचं राज्य आणि धनभांडार लुबाडणारा असुर-विजयी राजा. तू कौटिल्याच्या अर्थशास्त्राचं नाव ऐकलंस?”

“ऐकलंय. माझ्या पिताजींच्या दरबारातले पंडित अनेकदा या नावाचा उच्चार करायचे. युद्धतंत्रचा अभ्यास पूर्ण झाल्यावर तो शिकवणार असल्याचं पंडित शिवपादांनी सांगितलं होतं.”

“त्यात जिंकलेलं राज्य कसं राखावं याविषयी वस्तृित तपशील आहे. त्यातलं सांगतो ऐक.

न च हतस्य भूमी द्रव्य पुत्र दारा नभिमन्येत

कुल्यान व्यस्य स्वेषु पात्रेषु स्थापये

कर्मणि व्रतस्य पुत्रं राज्ये स्थापयेत

येव नस्य दंडोपनहताह पुत्र पौत्रानन्वर्तते...

म्हणजे मरून गेलेल्या राजाची पत्नी, मुलं, निकटवर्ती यांना वश करून घेऊ नये. सगळ्या श्रेणी, कुळ, कुटुंब यांना ते असतील तिथेच बळ देऊन राहू द्यावे. युद्धात मरण पावलेल्या शत्रूच्या मुलाला राज्य द्यावं. असं केल्यानं ते सगळे नातेवाईक, मुलं-बाळं आपल्याला अनुकूल होतील. याशिवाय ते सांगतात, विजेत्या राजानं हरलेल्या राज्याला साजेसा वेष, भाषा, आचार या गोष्टी अंगी बाणवाव्यात. ब्रह्मचर्य, गृहस्थ वगैरे आश्रमांविषयी गौरव बाळगावा, सर्व क्षेत्रातल्या मुरलेल्या व्यक्तींना सन्मानानं वागवावं, भूमी-धन द्यावं. असा सांगायला बसलो तर हवे तितके नियम सांगता येतील.”

“पण तरीही, युद्धात हरलेल्यावर आपला धर्म लादला तर...”

“एखाद्याला हरवायला निघणं, हाच तामसीपणा. युद्धात हार झाली म्हणून हरलेल्या राज्याच्या प्रजेला गुलाम करणं तरी योग्य आहे का? आपला आत्मा म्हणजे त्या परमात्म्याचा अंश असेल तर त्याचा आत्माही त्याच परमात्म्याचा अंश, नाही का? यांचं आक्रमण होण्याआधीही भरत-खंडात युद्धं होत होती. पण कुठलाही राजा हरलेल्या राजावर आपला धर्म लादत नव्हता.”

हा विषय, ही भाषा मला सर्वस्वी अपरिचित नव्हती. पकडून आणण्याआधीच्या आयुष्यात मलाही भगवद्गीतेतले काही श्लोक शिकवण्यात आले होते. सगळ्यांचा आत्मा एक आहे, प्राण्यांनाही आत्मा आहे, सित्त्वक-राजस-तामस असे गुण असतात वगैरे भूतकाळात गडप होऊन गेलेली तत्त्वं अस्पष्टपणे आठवू लागली. प्रवादी (स) यांनी केलेली कामंच पुढच्या नबाबांना, सुलतानांना, टोळ्या-प्रमुखांना, बादशहांना आदर्श वाटली की काय, या मनात उमटलेल्या प्रश्नानं माझं तोंडच बंद झालं. तोही काही बोलला नाही. थोड्याच वेळानं मनात एक प्रश्न उठला, “यांनी अशा प्रकारे देवळं पाडणं, पुजाऱ्यांना अवमानित करून पिटाळून लावणं, लक्ष-लक्ष लोकांना गुलाम करणं सुरूच ठेवलंय. अशा वेळी तुम्ही काय करताय?”

“मी काय करतो? केवळ मीच नव्हे, माझ्यासारखे हजारो साधू-संन्यासी-बैरागी गावोगावी फिरतायत. दुष्काळ आहे म्हणून हाय खाऊ नका, तुमच्या पूर्वजांचा धर्म सोडू नका असं सांत्वन करतो. कालचक्र एकाच जागी स्थिर नसतं.”

“शिवाजी जिवंत आहेत?” काहीतरी मनात येऊन मी विचारलं.

“जिवंत? औरंगजेबाच्या कैदेतून निसटून स्वदेशी पोहोचलेदेखील! गमावलेला एकेक किल्ला पुन्हा मिळवायचे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. पुढच्या काळात भरतखंड शापमुक्त होणार आहे, यात शंका नाही.”

एवढ्यात साधूची नजर माझ्या मागे गेली. मलाही पावलांची चाहूल लागली. वळून पाहिलं, हातात तलवारी असलेले दोन शिपाई आमच्याकडे येत होते. जवळ आल्यावर त्या दोघांपैकी एकानं विचारलं, “कुठलं गाव?”

“दिल्ली.” मी उत्तर दिलं.

“बादशहांच्या टपालाबरोबर आलात?”

“होय.”

“पायखान्यासाठी म्हणून नदीच्या काठावर आलात. हम्दुल्लासाहेबांना तुमची काळजी वाटतेय. चला.”

मी उठून चालू लागलो. त्यांच्यासमोर साधूशी बोलणं किंवा ओळख दाखवणं कुणाच्याच दृष्टीनं हिताचं नव्हतं.

दररोज ऐकलेला आणि पाहिलेला मजकूर हम्दुल्ला नोंदवत होते. ते सांगायचे आणि मी लिहून घेत होतो. विश्वनाथ मंदिर कोसळल्याचा दुसरा सगळा दिवस या नोंदी करण्यात गेला.

“कोतवालही वर्दी लिहून कळवत असतो. पण जो तपशील मी नोंदवून ठेवतो, तो नोंदवायची बुद्धी त्या कारकुनाकडे कुठून येणार? शिवाय यांच्यावर शुद्ध फारसी भाषेचे संस्कार तरी कुठे आहेत म्हणा! मी टिपलेल्या नोंदी बादशहांनी वाचल्या तर ते इतके हुरळून जातील, की त्या खुशीत मला एखादी जहागीरही बहाल करतील. पण काय सांगायचं! तिथेही राजकारण करणारे काहीजण असतात ना! ते माझा अहवाल बादशहांपर्यंत जाऊच देत नाहीत.” म्हणत त्यांनी सुस्कारा सोडला. पुढे म्हणाले, “काही का असेना, मी माझं पवित्र कर्तव्य केलंय. त्यासाठी अल्लाहूकडून मिळेल तेवढी बक्षिसी मला पुरेशी आहे.”

हीच संधी पकडून मी विचारलं, "परमात्म्याला कुणीही, कुठल्याही स्वरूपात पूजलं तरी एकच, असं काफिर सांगतात. मूर्तिपूजा महाहीन असं मानून ज्ञानी माणसं मंदिरांचा नाश करताहेत. हे पूज्य प्रवादी (स)नीं सांगितलंय का?"

"त्यांनी केवळ सांगितलेलं नाही. त्यांनी स्वत: तसं वागून तसा आदर्श आपल्या अनुयायांपुढे ठेवलाय. अल्-मालिक, बाल्, एल्, अल्-लाह, मनात अल्-उझ्झ, शम्स, धु, श-शरा, अत्-थुरैया, खु झ्रु, वाद, रुडा, जड, मनाफ, यगुत या सगळ्या देवतांच्या मूर्ती होत्या. देवळंही होती. ती सगळी देवळं आणि त्यातील मूर्तींचा नाश करून अल्-लाह या एकाच देवाची प्रतिष्ठापना करून प्रवादी (स) यांनी हिंदुस्थानातील सगळ्या नबाब, सुलतान, शेख आणि बादशहांपुढे आदर्श ठेवला. आता औरंगजेब बादशहा त्यांचाच आदर्श समोर ठेवून कार्य करत आहेत. लक्षात ठेव!"

स्वत: प्रवादी (स) नी एवढा मोठा आदर्श ठेवल्यावर ते योग्य की अयोग्य हे ठरवण्याचा अधिकार कुणालाही नाही. पण नदीकाठच्या साधूनं सांगितलं, तेही खोटं मानायला मन तयार होईना. मनात निर्माण झालेलं हे द्वंद्व बोलून दाखवण्याइतकी सलगी वाटली नाही. पुन्हा एकदा त्या साधूशीच याविषयी बोलायची तीव्र इच्छा झाली. रात्र झाल्यामुळे तेही लगेच शक्य नव्हतं. शिवाय शहरातल्या प्रत्येक रस्त्यावर नाकाबंदी होती. शहर बाहेरूनही सैन्यानं घेरल्याचं मला ठाऊक हातं. दुसरे दिवशी सकाळी जाणं शक्य होतं. मात्र रात्री बराच वेळ मी जागा होतो.

पहाटे उठून नदीवर गेलो तेव्हा तिथे साधूच काय, एकाही माणसाची चाहूल नव्हती. काशीमध्ये काय घडतंय, याची काहीही फिकीर नसल्यासारखी गंगा मात्र आपल्यापुरती वाहत होती. काशीच काय, असलं आणखी कितीतरी पोटात दडवून ही वाहतेय की काय, अशा प्रकारचं काहीतरी अस्पष्टपणे मनात चाललं होतं. पण स्पष्टपणे काहीच उमजत नव्हतं.

बादशहाच्या फर्मानाला उत्तर लिहून, ते बांबूच्या नळीत ठेवून, त्यावर मुद्रा लावून, ते चारही बाजूंनी शिवलेल्या पिशवीत ठेवून, त्या पिशवीलाही मुद्रा लावून आम्हा चौघांना प्रवासाचं अनुमतीपत्र देण्यात आलं. हम्दुल्लांना शाल आणि अंगरखा देण्यात आला. मलाही अंगरखा देऊन कोतवाल आणि नायबांनी आम्हाला निरोप दिला. आता मात्र टपालातल्या पत्रात काय लिहिलं असेल याचा आम्ही दोघंच नव्हे, टपालखात्याचे स्वार इम्तियाझखान आणि कादरखानसुद्धा अंदाज करू शकले असते. पहिल्या रात्री सराईमध्ये आमच्यासाठी बनवलेलं गरम जेवण जेवलो आणि इशा-नमाज करून झोपी गेलो. ओसरीवर झोपलेले दोन्ही स्वार आपसात गप्पा मारत बसले होते. इम्तियाझखान सांगत होता, "मंदिराचा नाश केल्यामुळे मिळणाऱ्या पुण्यात माझाही वाटा आहे. स्वर्गातल्या राजवाड्यात जागा मिळाली नाही तरी एखादा संगमरवरी महाल तर निश्चितच मिळेल."

"तुला काय वाटलं स्वर्ग म्हणजे? पगार घेऊन केवळ फर्मान घेऊन गेल्यामुळे मिळायची ती जागा नव्हे." काळ्या रंगाचा देशी, पण धर्माविषयी बरंच जाणणारा कादरखान म्हणाला.

इम्तियाझही देशी मुसलमानच. मागच्या कुठल्या पिढीत कुणी हा धर्म स्वीकारला, हे त्याचं त्यालाही ठाऊक नव्हतं. अर्थात ते खरंच ठाऊक नव्हतं, की ते सांगायची इच्छा नव्हती कोण जाणे! दिल्लीहून बनारसला येताना मीही त्यांच्याशी गप्पा मारल्या होत्या. त्या वेळी तोही आपण अरब देशातून आलेला शुद्ध मुसलमान असल्याचंच सांगत होता. पण त्याला अरबी किंवा फारसीचा गंधही नव्हता. अरबी शब्दांचा भरणा असलेल्या हिंदुस्थानी फौजी भाषेत ते दोघं बोलायचे. राज्यकारभार फारसी भाषेत चालत असला तरी बहुतेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही फौजी भाषा येत असते. पण या हलक्या भाषेत ते कधीच एकमेकांशी बोलत नाहीत. असं म्हणतात, आलमगीर बादशहांनाही ही भाषा अवगत आहे. ते आवश्यकही आहे म्हणा! खालच्यांची भाषा अवगत असेल तरच राज्यकारभारावरची पकड पक्की असते ना! हेही हम्दुल्लांनीच मला सांगितलं होतं.

"आपण फर्मान पोहोचतं केलं नसतं तर हे पुण्य-कर्म झालं असतं का?" इम्तियाझ आपल्या बोलण्याच्या समर्थनार्थ म्हणाला.

"तसं नव्हे. जो जिहाद करतो, त्यालाच तेवढा स्वर्ग मिळतो. धर्मप्रसाराच्या कामासाठी जीव दिला पाहिजे. तेव्हा स्वर्ग मिळतो. स्वर्गात काय असतं, ठाऊक आहे का?"

"तू धर्मग्रंथ वाचलायस ना? मग तूच सांग."

"सांगतो ऐक. दूध, मध यांनी भरलेलं सरोवर. ऊन नाही आणि थंडीही नाही, अशी हवा असलेलं उद्यान. म्हणाल तेथे घेऊन जाणारे घोडे. रेलून बसायला सुखासन. टपोऱ्या मोत्यासारख्या तेजस्वी विशाल डोळ्यांच्या युवती, त्याही कशा ठाऊक आहेत? कोवळ्या, आकर्षक स्तनांच्या, अक्षत योनीच्या चिरयौवना. त्यांचं नाव हुरी. त्यांचं शरीर पारदर्शक असतं. त्यातून आतली हाडं हिऱ्या-माणकातल्या रेषेसारखी दिसतात. या तरुणी पांढऱ्या शुभ्र काचेच्या पेल्यामधल्या लाल वारुणीसारख्या दिसतात. सर्वसाधारण स्त्रीला असणारा विटाळ, गरोदरपण, बाळंतपण, एवढंच काय, अत्यंत नैसर्गिक अशा मल-मूत्रादी क्रियांपासूनही दूर अशा त्या अतिशुद्ध स्त्रिया असतात. लज्जेमुळे डोळे नेहमी अर्धोन्मीलित. आपल्या पतीशिवाय इतर परपुरुष्कडे नजरही वर करून न पाहणाऱ्या. आपला पत्नी म्हणून स्वीकार केल्याबद्दल पतीबद्दल सदैव कृतज्ञ असणाऱ्या. मुख्य म्हणजे या स्त्रियांचं वय कधीच वाढत नाही. त्यांची नजर स्वर्गातून पृथ्वीवर पडली तर सगळं वातावरण सुगंधानं भरून जातं. त्या आरशापेक्षा अधिक प्रकाशमान असतात. त्यांच्या गालांवर कुणीही आपलं प्रतिबिंब पाहू शकतील. स्वर्गात प्रवेश केलेल्या प्रत्येक पुरुषाला अशा बहात्तर हुयरी देतात. त्यानं कुठल्याही वयात स्वर्ग-प्रवेश केला तरी त्याचं वय तीस वर्षं होतं. त्यानंतर त्याचं वय वाढतच नाही. शिवाय त्याला शंभर पुरुषांइतकं पुरुषत्व लाभतं. प्रत्येकासाठी हिऱ्यांनी बांधलेला राजवाडा आणि नऊ हजार गुलाम दिमतीला! आलं का लक्षात?"

इम्तियाझकडून काही आवाज आला नाही.

पण हम्दुल्ला अंथरुणावरून उठल्याची चाहूल लागली. भिंतीच्या आधारानं बाहेर गेले. मीही त्यांच्या पाठोपाठ गेलो. उंबऱ्याशी उभं राहून हम्दुल्लांनी विचारलं, "कादर, एवढा वेळ तू सांगत होतास ते खरं! पण जे सांगितलंस ते कुठल्या पवित्र ग्रंथाच्या कुठल्या प्रकरणात सांगितलंय, ते नाही सांगितलंस?"

"खानसाहेब! फौजी भाषेच्या अनुवादातलं थोडं-फार मी वाचलंय. पण एवढ्या सुरा आहेत. त्यामुळे नेमकं कुठे वाचलंय ते आठवत नाही. मी सांगितलं ते खरंय म्हणालात ना? याचाच अर्थ, अल्लाहूची माझ्यावर कृपा आहे."

"होय."

तिसरा दिवस. रस्त्यात चार-पाचशे माणसं चालली होती. त्यांची धावपळ, धडपड चालली होती. त्यात म्हातारे-कोतारे, तरुण स्त्री-पुरुष, मुलं होती. मुलं वगळता सगळ्यांच्या डोक्यांवर भांडी-कुंडी, घरचं सामान, टोपल्या-बुरड्या होत्या. मुलांना बखोटीला घेतलेल्या स्त्रियांच्या डोक्यावरही सामानाची मोठी गाठोडी होती. सगळी खेड्यातली माणसं होती. अंगभर नीट कपडे नव्हते, पोटभर अन्नही मिळत नसावं, केसांना तेलाचं बोटही लागलेलं दिसत नव्हतं. पुरुषांच्या अंगात अंगरखे नव्हते. स्त्रियांची पोलकीही पाठीवर फाटलेली-विरलेली दिसत होती. आम्ही पाहत असताना सुमारे वीस घोडेस्वार आले आणि त्या समूहाला घेरलं. धावत सुटलेला घोळका घाबरून जागीच थांबला. नाही तरी सगळे दमल्यामुळे धापा टाकत होते ते थांबलेच असते म्हणा! हाताशी असलेली आणि बखोटीला असलेली मुलं किंचाळत होती. काही स्त्रिया मोठ्यानं गळा काढून रडत होत्या. आम्ही चौघंही त्या घोडेस्वारांपाशी जाऊन थांबलो. आमचे कपडे आणि घोड्यांचे अलंकार बघून त्या घोडेस्वारांनी आधी 'सलाम आलेकूम' केलं. आम्ही 'आलेकूम सलाम' सांगून त्या घोळक्याची चौकशी केली.

"सुव्वर लेकाचे! कर चुकवून पळून चालले होते. आम्ही दौडत येऊन घेरलं नसतं तर तसेच पळून गेले असते." एका घोडेस्वारानं सांगितलं.

घोळक्यातला एक म्हातारा ओरडला, "कर भरलाय! वर अन्यायाची मागणी करताहेत हे!"

"सुव्वर! जिझियाला अन्यायाची मागणी म्हणतोस? मग व्हा मुसलमान! जिझिया चुकेल. बादशहा दयाळू आहेत. मुसलमान होतील त्यांच्यावर जिझिया कर घालू नका, जमिनीचा करही घेऊ नका, म्हणून आज्ञा आहे त्यांची. आता मुसलमान हो. तुझं घर, जमीन, गुरं-ढोरं तुझी तुला मिळतील." त्या स्वारानं पुन्हा सांगितलं. आणखी चार स्वारांनी त्यात आवाज मिसळून सांगितलं, "तुम्ही सगळेच मुसलमान व्हा आणि सुखानं राहा."

म्हातारा म्हणाला, "आमच्या देवाला सोडायला सांगणारे तुम्ही कोण? तुमचा देव मोठा असेल तर राहू दे तुम्हाला! आमच्या देवाच्या नादाला लागलात तर!" म्हणत तो पचकन थुंकला.

त्याच्या उद्धटपणाला काय शिक्षा करावी, यावर सगळे स्वार आपसात चर्चा करू लागले. एवढ्यात इम्तियाझनं आपला घोडा त्या घोळक्यात घातला आणि हातातल्या तलवारीनं त्या म्हाताऱ्याच्या मानेवर खांद्याकडून वार केला. निम्मी मान कापली गेली. म्हाताऱ्याला राम म्हणायची संधी मिळाली नाही. माणसं घाबरली, बिथरली. घेरलेल्या स्वारांची फिकीर न करता उधळली. स्वारांचं संख्याबळ कमी असल्यामुळे तो घोळका आवरणं कठीण गेलं. बरेचसे पळून गेले. थोडे त्यांच्या ताब्यात सापडले.

"सुव्वर पळून-पळून कुठे पळतील? कुठेही पळाले तरी आमचे सैनिक त्यांची शिकार केल्याशिवाय राहणार नाहीत. काय वाटले यांना आमचे बादशहा म्हणजे!" स्वारांचा प्रमुख गरजला. रक्त माखलेली तलवार परजत आलेल्या इम्तियाझला कादरनं विचारलं, "तू का रे असा या भानगडीत पडलास? जिझियाच्या वसुलीचं काम काही आपलं नाही. जल्दी टपाल नेऊन पोहोचवायचं काम आपलं आहे."

"अरे, आपल्या देवाचं नाव घेत तो कसा थुंकला, पाहिलंस ना? मग त्याच्याविरुद्ध जिहाद नको करायला? त्याला लगेच नरकात धाडलं. आता सांग, मला स्वर्ग मिळेल की नाही?"

"अधिकाऱ्याच्या संमतीशिवाय असं कुणालाही ठार करणं, कायद्याच्या बाहेरचं आहे." त्यांचा प्रमुख म्हणाला. आमची ओळख सांगून आणि कामाचं स्वरूप सांगून त्याला प्रभावित केल्यानंतर त्यांनी आम्हाला पुढे जाऊ दिलं. बरंच अंतर पुढे दौडल्यानंतर, आम्ही त्यांच्या नजरेपासून दूर आल्यावर कादरनं घोड्यांचा वेग कमी केला. माझ्याकडेही तलवार होती. इम्तियाझचा गळा कापायची मलाही तीव्र इच्छा होत होती. पण परिणामाचा विचार मनात येऊन मी स्वत:ला आवरलं. तरीही अर्धवट मान कापलेल्या त्या म्हाताऱ्याची आकृती काही केल्या डोळ्यांसमोरून हलत नव्हती. तो सारा घोळकाच डोळ्यांपुढून जाईना. त्यातल्या पुरुषांना गुलाम करतील, षंढ करतील. सुंदर तरुण स्त्रियांना उपभोगासाठी वापरतील. माझा स्वानुभवच सांगत होता ते. पाठोपाठ तीव्रपणे शामलीची आठवण झाली.

तिला पुन्हा भेटलो नाही. थोडा प्रयत्न केला असता तर ते अशक्य नव्हतं. खटाटोप करून उदयपुरीमहल साहिबांच्या अंत:पुरात तिला आणवता येईल. पण हेही तितकं सोपं नाही. तीन मुलांच्या आईला त्या तरी काहीही कारण नसताना कोणी आपल्या दिमतीला घेतील? आणि हे सगळं जमलं तरी उपयोग काय? लग्न? कदाचित त्याचीही परवानगी मिळवता येईल. पण षंढाचं लग्न? लोक हसणार नाहीत? शामलीही हसेल.

पुन्हा वाटलं, इथून पळून गेलेल्या त्या घोळक्यातल्या लोकांची काय गत होईल? सैनिकांपासून चुकवायला रानावनात जातील. अन्न-वस्त्र-निवाऱ्यासाठी वणवण करतील आणि आदिवासी मानवासारखे कंदमुळांवर आणि झाडांच्या पानांनी लज्जारक्षण करत राहतील. अकबराच्या सैनिकांचा पाठलाग चुकवत रानावनात फिरणारा, महाराणा प्रताप आणि त्याचे अनुयायी असेच फिरत राहिले. त्यांच्याही चौथ्या-पाचव्या पिढ्या अशाच वनवासी होऊन राहत असतील.

दिल्लीला पोहोचल्यावर उदयपुरीमहलनी मी पाहिलेल्या पुण्य-कृत्याचं वर्णन करून सांगायला सांगितलं. वाटलं, सांगावं, ते देवाच्या नावाखाली केलेलं पाप होतं, म्हणून! पण कसं सांगणार? सांगितलं असतं तर जीव राहिला नसता. थोडक्यात, दहा वाक्यांमध्ये वर्णन केलं. अशा प्रकारच्या शेकडो देवळांच्या नाशाची कथा ऐकली असल्यामुळे त्यांनाही ऐकायला फार उत्साह नव्हता. त्यांनीही "प्रवादी (स) तुझ्यावर स्वर्गलोकाची दया दाखवू दे" असं शुभवचन बोलून विषय संपवला. त्यानंतर एक दिवस हम्दुल्लांनी उत्साह आणि अभिमानानं सांगितलं, "ऐकलंस का नाही? मथुरेच्या केशवराज देवळाच्या विध्वंसाचंही फर्मान निघालंय.

एवढंच नव्हे, राजपुतान्यातले लहान-मोठे सरदार डोकं वर काढताहेत. नवी नवी देवळं बांधताहेत. त्या सगळ्यांना धडा शिकवायची योजना तयार होतेय. जोधपूर भागातली काही, उदयपूरच्या महालासमोरचं देवालय, उदयसागर सरोवराच्या काठची तीन देवालयं, उदयपूरच्या भोवतालची एकशे पंच्याहत्तर देवालयं, चित्तूरमधली त्रेसष्ठ, अंबेरमधली सहासष्ठ देवालयं नष्ट करताहेत. शिस्तबद्ध रीतीनं काम करायची बादशहांची नेहमीचीच पद्धत आहे म्हणा! हिंदुस्तानमधल्या शेवटच्या काफराला मुसलमान करेपर्यंत किंवा ठार करेपर्यंत ते गप्प बसणार नाहीत. याआधी कुणाहीसाठी बनवला गेला नाही अन् नंतर कुणाहीसाठी बांधणार नाही एवढा मोठा महाल त्यांच्यासाठी स्वर्गात बांधून तयार असेल. बघ हवं तर!”

प्रोफेसर निश्चितच कार्यशाळेसाठी म्हणून इथे आलेले आहेत, यात शंका नाही. चर्चासत्रं, भाषणं, एकूण वृत्तपत्रात बातमी येईल असे कार्यक्रम आणि विमानाचा किंवा रेल्वेचा प्रथमश्रेणीचा प्रवासखर्च देणारी एखादी संस्था असल्याशिवाय ते कुठलाही प्रवास करणार नाहीत, हे एवढ्या वर्षांच्या अनुभवावरून तिला ठाऊक झालं होतं. ‘व्ही.आय.पी. गेस्ट-हाऊसमध्ये उतरायची त्यांची नेहमीची पद्धत. ते असतील तिथे घोळका असलाच पाहिजे. गप्पांचे फड रंगत राहिले पाहिजेत. हे सगळं जमण्याइतकी मोठी खोलीच हवी. सरकारी किंवा सरकारी अनुदान घेणाऱ्या संस्थेलाच त्यांना बोलावणं शक्य होत असल्यामुळे व्ही.आय.पी. गेस्ट-हाऊसमध्ये त्यांची सहजच सोय होऊन जाते. जर हे कार्यशाळेसाठी म्हणूनच आले असतील तर विद्यापीठाच्या एखाद्या विभागानं हे ठरवलं असेल. त्यामुळे त्यांचा मुक्काम निश्चितच विद्यापीठाच्या गेस्ट-हाऊसमध्ये असेल. जाऊन का पाहून येऊ नये?’ मागे तीही या विद्यापीठात येऊन गेली होती. ‘प्रोफेसरांच्या पुढाकारानं, इथे अखिल भारतीय पुरोगामी विद्यार्थी संघाचं अधिवेशन भरलं होतं, त्यासाठी! आपल्या मोहून टाकणाऱ्या वक्तृत्वामुळे त्यांनी अखिल भारतीय दर्जाचे विचारवंत म्हणून स्थान कमावलं होतं ते इथेच! त्या वेळी सभेचं स्वरूप एवढं मोठं होतं, की तिथल्या क्रीडांगणावर मोठा शामियाना उभारला होता. त्या वेळची सगळी भाषणं मार्क्सवादी विचारांची होती. भारतातल्या जातीव्यवस्थेमधून चाललेला वर्गसंघर्ष; साहित्य, कला, संगीत, धर्म वगैरे बाबतीत चाललेला वर्गसंघर्ष; पूजा, ध्यान, यात्रा, तीर्थाटन यामध्ये चाललेला वर्गसंघर्ष; अध्यात्माच्या बुरख्याआड चाललेलं शोषण अशा प्रकारचे विषय घेण्यात आले होते. सकाळ ते संध्याकाळ भाषणं ऐकायची, त्याच विषयावरची जानपद नाटकं, रूपकं; दिल्लीचं कॉकेशियन चॉकसर्कल वगैरे वगैरे. त्या वेळी या काशी शहरात पायही ठेवला नाही. विश्वनाथ मंदिर दूर राहिलं, गंगाघाटही पाहिले नाहीत. काय पाहायचं त्यात? शोषणाच्या जखमा! पुण्याची आशा दाखवून, कामगारांचं शोषण करून उभारलेली देवळं आणि धर्मशाळा. काशी नावाचं कुजून दुर्गंधी पसरवणाऱ्या संस्कृतीचं प्रतीक! डॉक्टर रामस्वरूप यादव या इथल्याच पुरोगामी विद्वानानं इथंच सांगितलं होतं ना! त्यांना मीच विचारलं होतं, “डॉक्टर साहेब, तुम्ही तुमचं नाव का नाही बदललं?” यावर त्यांनी उत्तर दिलं होतं, “माझे आई-वडील किती मूर्ख होते, हे लक्षात राहावं म्हणून, अजूनही तेच नाव ठेवलंय मी.” ’

सायकल रिक्षात बसून गेस्ट-हाऊसवर गेल्यावर समजलं, “होय. बेंगळुरूचे प्रोफेसर शास्त्री दोन नंबरच्या सूटमध्ये आहेत. आता ते वर्कशॉपमध्ये आहेत. सोशल-सायन्स ब्लॉक.” इमारतीची वाट विचारून ती त्या दिशेला गेली.

इमारत मोठी होती. बाकी सगळ्या वर्गांना सुट्टी दिसत होती. आतल्या एका मोठ्या रूममध्ये सुमारे शंभर विद्यार्थी होते. व्यासपीठावर तीन प्रतिष्ठित वाटणाऱ्या व्यक्ती बसल्या होत्या. मधोमध बसलेले प्रोफेसर शास्त्री कार्यक्रमाचे अध्यक्ष होते हे उघडच होतं. लाल झब्बा, दोन आठवड्यांपूर्वी साफ केलेल्या डोकं आणि दाढी-मिशांमुळे ते क्रांतिकारकासारखे दिसत होते. ती खिडकीबाहेर उभी राहून आत पाहत होती. कार्यक्रमाचं स्वरूप प्रश्नोत्तरासारखं दिसत होतं. विद्यार्थी-विद्यार्थिनी नेहमी वर्गात बसावं, तसे शिस्तीत बसले होते. एकेक जण क्रमाक्रमानं हात वर करून, अनुमती मिळाल्यानंतर पुढचा प्रश्न विचारत होता. लहान वयात अशा वर्कशॉपमध्ये भाग घेतल्याचं तिला आठवलं.

एका विद्यार्थ्यानं विचारलं, “हे वर्कशॉप बनारस विद्यापीठात घेण्यामागचं कारण काय?”

शास्त्रींशेजारचे पँट आणि राखी रंगाचा शर्ट घातलेले उत्तर द्यायला उभे राहिले. पण शास्त्री म्हणाले, “यावर मी उत्तर देईन.” पहिले वक्ते पुन्हा खुर्चीवर बसले. शास्त्री नेहमीच्या ढंगात बोलू लागले, “तुमच्या या प्रश्नातच

याचं उत्तर आहे. याचं नाव 'बनारस हिंदू विद्यापीठ.' प्रतिक्रियावादी मालवियांनी हे विद्यापीठ प्रतिक्रियावादी भांडवलदार व्यापारी, मारवाड्यांकडून पैसे मिळवून, भारतातील अत्यंत प्रतिक्रियावादी काशी नगरात निर्माण केलं. या विद्यापीठात नामवंत उद्योगपती बिर्ला यांनी एक मोठं विश्वनाथ मंदिर उभारलं. त्यायोगे, या सगळ्याला सुप्तपणे प्रतीकही निर्माण करून दिलं आहे. 'भारतीय संस्कृती' म्हणवणाऱ्या या सडक्या, दुर्गंधीयुक्त उकिरड्यालाच सर्वप्रथम प्रगतीची चूड लावून तो उकिरडा स्वच्छ करणं आवश्यक आहे, नाही का?"

"पण या विद्यापीठात विज्ञान, प्रज्ञान, वैद्यकीय ज्ञान शिकवलं जातं ना?" त्याच मुलानं पुन्हा विचारलं.

"त्याविषयी आमची तक्रार नाही. पण हे विषय शिकवणारे इथले बहुतेक सर्व प्राध्यापक सामाजिक, धार्मिक आणि नैतिकदृष्ट्या प्रतिक्रियावादीच आहेत. त्यांना सुधारणं आवश्यक आहे. त्यामुळे आजच्या वर्कशॉपमध्ये त्याच विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येनं आले आहेत. त्या विभागाचे काही प्राध्यापकही आले आहेत. त्यामुळे आजचा हा कार्यक्रम सफल झाला आहे, अशी मी घोषणा करत आहे!" पाठोपाठ संपूर्ण सभेनं टाळ्यांचा कडकडाट केला.

त्या कडकडाटातच एक मुलगा उठला. त्यानं विचारलं, "असं असेल तर इथून जवळच असलेलं अलीगढचं मुस्लीम विद्यापीठही तेवढंच कुजून गेलं असेल. तिथे का हे वर्कशॉप आयोजित केलं नाही? की यानंतर तिथेही असं वर्कशॉप आयोजित करणार आहात?"

सगळी सभा स्तब्ध झाली. प्रोफेसर शास्त्रींनी काहीही न बोलता त्याच्याकडे रागानं असा कटाक्ष टाकला, की तेवढ्यानंच त्याच्या मनात न्यूनगंड तयार व्हावा. त्यानंतर नेहमीप्रमाणेच प्रसन्न मुद्रेनं म्हणाले, "आपण आपल्या समाजाची स्वच्छता करत असताना लगेच आपल्या गरीब, अल्पसंख्याक बांधवांकडे बोट दाखवणं हे प्रतिक्रियावाद्यांचं प्रमुख लक्षण आहे. तुम्ही हा प्रश्न विचारलात, त्याअर्थी तुमची पार्श्वभूमी आर.एस.एस.चीच असली पाहिजे. आमची कार्यशाळा अटेंड करून हा प्रश्न विचारताय त्याअर्थी तुम्ही इथे हेरगिरी करण्यासाठी आला आहात. तरीही एक मूलभूत सत्य समजून घ्या. बहुसंख्याकांना विवेकबुद्धी असते. आपल्या अस्तित्वासाठी सतत भयग्रस्त असलेल्या अल्पसंख्याकांकडे अशी विवेकबुद्धी असू शकत नाही. आपली संस्कृती राखण्याचा आणि वाढवण्याचा हक्क जोपर्यंत आपण अल्पसंख्याकांना देत नाही, तोपर्यंत लोकशाही आहे, असं म्हणता येणार नाही. बहुसंख्याकांचा अविवेकीपणा देशालाच मारक ठरतो. इतिहासातलं हे सार्वकालिक सत्य कुणीही विसरता कामा नये."

हॉलचं छप्पर उडून जाईल इतका टाळ्यांचा कडकडाट झाला. प्रश्न विचारणाऱ्याचा चेहरा घामेजून गेला.

सभेत घुसून प्रोफेसरांचा शब्द न् शब्द शेकडो उदाहरणं देऊन खोडून काढला पाहिजे, अशी तीव्र इच्छा लक्ष्मीच्या मनात दाटून आली, पण आपण इथे आगंतुक आहोत. शिवाय आता यांच्याशी आपलं नातंही जुळलं आहे, तेही आठवलं. थांबून त्यांची भेट घ्यायची इच्छाही नष्ट होऊन गेली. ती माघारी वळून चालू लागली.

'ही कथा इथंच संपली? ख्वाजाजहान दिल्लीला परतला. तिथं तो आणखी काय करणं शक्य आहे? औरंगजेबाचा खून करणं तर शक्य नाही. त्याच्या अंगरक्षकांचा व्यूह भेदून तिथपर्यंत जाणं तर शक्य नाही. काशीचं विश्वनाथ मंदिर भग्न औरंगजेब अडतीस वर्षं जगला, असं इतिहास सांगतो. आपल्या मनाप्रमाणे कथानक जाऊ द्यायला ते काही दिवा-स्वप्न नाही. ऐतिहासिक कथानक किंवा साहित्य रचताना पात्रं आणि त्यांचं अंत:सत्त्व संपूर्णपणे ऐतिहासिक असलं पाहिजे. नाहीतर अप्पाजींनी लिहिलं, त्याप्रमाणे शुष्क इतिहासाचा तपशील लिहायला हवा होता. तो शुष्क इतिहासही आपल्या मर्जीप्रमाणे मध्येच थांबवणं शक्य नाही. कादंबरी अशा प्रकारे थांबवली तर भाव-संकटही जाणवतं. यानंतर तबस्सुम झालेल्या शामलादेवी या पात्राचं कथानकही कुठेतरी पोहोचवलं पाहिजे. पण म्हणजे काय करायचं?' काहीही न सुचून लक्ष्मी दोन दिवस तळमळत राहिली.

तिला काशीला येऊन दोन महिने झाले होते. कादंबरीचा इथं घडणारा भाग तिनं इथंच लिहिला होता. दर

आठवड्याला धर्मशाळेमधला पत्ता बदलत तिथल्या मॅनेजरनंही तिच्या राहण्याची सोय केली होती. कुणी आक्षेप घेऊ नये म्हणून मधे काही दिवसांसाठी त्यानं स्वतःच्या ओळखीनं दुसऱ्या धर्मशाळेतही सोय केली होती. कादंबरीच्या दृष्टीनं काशीमधल्या वास्तव्याची गरज संपली असली तरी अजूनही तिच्या मनातली त्या प्रदेशाची ओढ संपली नव्हती. मध्यंतरीच्या काळात विद्यापीठाच्या ग्रंथालयात बसून तिनं त्यानंतरच्या काळातल्या काशीविषयीचा तपशील मिळवायला सुरुवात केली होती. तिची या विषयातली आसक्ती आणि गती पाहून तिथल्या ग्रंथपालानंही तिला तिथे बसून ग्रंथ वाचायची आणि टिपणं काढायची परवानगी दिली होती.

एक दिवस अचानक तिच्या मनात आलं आणि तिनं तिच्या टिपणांमध्येही नोंद केली : “गझनी महंमदाच्या आक्रमणानंतर पश्चिम भारतातली म्हणजे काश्मीर, पंजाब येथील सुसंस्कृत माणसं येऊन स्थायिक झाल्यामुळे काशी हे उत्तर भारतातलं एकमेव विद्याकेंद्र झालं. औरंगजेबानं काशीचं विश्वनाथ मंदिर आणि तेथील देवालयं नष्ट केली. त्याबरोबरच तेथील ज्ञानकेंद्रांचाही नाश केला. बख्तियार खिलजीनं नालंदा विद्यापीठ नष्ट केलं, तेथील दुर्मीळ ग्रंथसंपदा जाळून टाकली आणि तिथे ज्ञान संपादन करत असलेल्या हजारो भिख्खूंची कत्तल केल्याचं उदाहरण समोर असूनही, सावधगिरी न बाळगता काशीचे पंडित तिथे मोठमोठ्या विद्या-संस्था चालवत होते. त्यांचा औरंगजेबानं विध्वंस केल्यानंतर पंडितांनी शिष्यांना आपापल्या घरी ठेवून घेऊन शिकवायची पद्धत वाढली. आधुनिक काळात पंडित मदनमोहन मालवीयांनी पुन्हा मोठी शिक्षणसंस्था उभी केली. आता प्रोफेसर शास्त्रींसारखी माणसं वर्कशॉप्स घेऊन त्या शिक्षणसंस्थांचा नाश करू पाहताहेत. प्रोफेसर शास्त्रींना भावनात्मकदृष्ट्या औरंगजेबाचे वंशज म्हटलं तर?”

मूळची काशी आता नाही. आजच्या काशीमधील बहुसंख्य देवालयं, घाट, स्मशानं मराठ्यांनी बांधली आहेत. मुसलमानांच्या प्रभावाखालून काशीची सुटका करून, देवालयांच्या जागी त्यांच्या अवशेषांच्या साहाय्यानं उभारलेल्या मशिदींच्या जागी पुन्हा देवळं बांधायचा प्रयत्न प्रत्येक मराठी राज्यकर्त्यांनी आणि अधिकाऱ्यांनी केला आहे. त्यासाठी त्यांनी साम, दाम, दंडाचाही वापर केला. एकदा ताब्यात घेतलेली मंदिराची जागा परत द्यायला कुठल्याही मुस्लीम राज्यकर्त्यानं मान्यता दिली नाही.

त्यानंतर बनारस इंग्रजांच्या ताब्यात गेलं. इंग्रजांना हवा तेवढा पैसा आणि इतर ठिकाणी त्यांना सैनिकी साहाय्य देऊन विश्वनाथ मंदिराची मूळची जागा मिळवण्याचा मराठ्यांनी बराच प्रयत्न केला. पण हिंदू आणि मुस्लीम यांच्यामध्ये सतत तेढ ठेवून स्वतःचं रक्षण करणं हे धोरण असलेल्या इंग्रजांनी हे नाकारलं. पहिल्या बाजीरावाचा हेतू तर केवळ ग्यानवापी मशीद पाडून तिथे मंदिर उभारणं, हाच होता. पण बाळाजी बाजीराव (१७४०-१७७१) मात्र काहीतरी करून बनारसवर कब्जा करण्याच्या दृष्टीनं १७४२ साली मिर्झापूरपर्यंत सैन्याबरोबर आला. त्याचा हा उद्देश अवधचा नवाब सफ्दरजंग याच्या लक्षात आला. त्यानं काशीच्या पंडितांना एकत्र आणून, जर बाळाजी बाजीरावनं काशीमध्ये प्रवेश केला तर त्या सगळ्यांना ठार करण्याची धमकी दिली. घाबरलेल्या ब्राह्मणांनी बाळाजी बाजीरावला परत जायची विनंती केली. बाजीराव निघून गेला. नऊशे वर्षांपूर्वी ताब्यात घेतलेल्या मूलस्थान म्हणजे मुलतानमधल्या सूर्यमंदिरावर कब्जा केलेल्या मुसलमानांनी सूर्यमंदिराचा नाश करायची धमकी देऊन आपल्यावर आक्रमण करणाऱ्यांना पळवून लावलं होतं. आता ब्राह्मणहत्येची भीती घालून त्यांनी बाजीरावला माघारी पाठवलं. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर हजारोंच्या संख्येनं बलिदान द्यायची परंपरा असताना त्या काळचे बनारसचे ब्राह्मण का भेकड झाले? त्यांना हतप्रभ करण्याचा मुस्लीम राज्यकर्त्यांचा उद्देश यशस्वी झाला होता, असंच म्हणावं लागेल.

बाळाजी बाजीरावनं रामजी अनंत शिंदे (सिंधिया) याला लिहिलेलं पत्र १७५९ च्या फेब्रुवारी महिन्यातलं आहे. त्यात त्यानं लिहिलंय, “शुजाउद्दौलाशी दोन-तीन गोष्टी ठरवल्या पाहिजेत. त्याच्याकडून बनारस, अलाहाबाद आणि अयोध्या काढून घे. त्यानं माझ्या वडिलांना (१७५७ साली) बनारस आणि अयोध्या देईन असा शब्द दिला होता. अलाहाबादेवर अजूनही चर्चा चालू आहे. याही बाबतीत सहजासहजी तडजोड होत असेल तर कर.” (ऐतिहासिक? यादी वगैरे. पृ. १६६). पण बनारस आणि अयोध्या सोडून देण्याची भाषा करणाऱ्या शुजाउद्दौलाच्या मनात वेगळंच होतं. दिल्लीचा वझीर त्याला असं न करण्यासाठी दडपण आणत होता. एकदा जिंकलेलं परत करणं इस्लामच्या विरुद्ध आहे. नाही का?

अकबराचा एकमेव अपवाद वगळता, प्रत्येक मुसलमान राज्यकर्त्यानं हिंदू यात्रेकरूंकडून कर वसूल केला आहे. औरंगजेबनं हा कर असह्य होईल अशा पातळीपर्यंत वाढवला. त्याच्या मृत्यूनंतरही तिथे आलेल्या सुभेदार, बादशहा, नबाबांनीही हे कर कमी केले नाहीत. काहीतरी करून काशी, अलाहाबाद आणि प्रयाग आपल्या ताब्यात घेऊन हिंदूंची यात्रा सुकर करून द्यावी म्हणून मराठे सतत प्रयत्न करत राहिले. युद्धात जिंकून किंवा विकत घेऊन, पण ग्यानवापी मशिदीच्या जागी पुन्हा विश्वनाथ देवालय उभं करणं मुसलमानांनी कधीच शक्य होऊ दिलं नाही. पाठोपाठ आलेल्या इंग्रजांनी मुसलमानांची बाजू घेतली. विश्वनाथ मंदिर देणार असाल तर टिपू सुलतानविरुद्धच्या युद्धात मदत करू, अशी नाना फडणविसांनीही अट घातली होती. पण इंग्रजांनी ती मान्य केली नाही. त्यामुळे इंग्रज-मराठ्यांत वितुष्ट निर्माण झालं.

१६६९ साली औरंगजेबनं नष्ट केल्यापासून १७७५ पर्यंत विश्वनाथ मंदिर उरलंच नव्हतं. आज ‘ग्यानवापी मशिदी’ शेजारी असलेला छोटासा ‘मंदिर’ म्हणवला जाणारा मंडप १७७५ च्या सुमारास अहिल्याबाईंनी उभारला. १८५७ च्या उठावाच्या वेळी काही मुसलमानांनी या छोट्या मंडपावरही हिरवा झेंडा लावायचा प्रयत्न केला. त्यामुळे इंग्रजांच्या हातात कोलीतच सापडलं.

इंग्रजांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी जी धोरणं अवलंबली होती त्यांना स्वतंत्र भारतात घटनेत नियमांचं स्वरूप दिलं. परिणामी, आपण नष्ट केलेल्या देवालयांच्या जागा आपल्याच आहेत हा मुसलमानांचा हट्टही कायदेशीर झाला. १८०३ साली लॉर्ड बेलेमुशिया नावाच्या इंग्रजानं लिहिलंय, “...औरंगजेबानं बांधलेल्या मशिदी नजीकचे मिनार पाहताना माझ्या मनात एका हिंदूचे भाव जागृत झाले. नजरेला व्यथा देणाऱ्या त्या भांडणाचा शेवट करून सरकारनं या पवित्र नगरीतल्या पवित्र देवालयाची जागा त्याच्या पूर्वीच्याच मालकांना दिली पाहिजे, असं मला वाटलं.” (जॉर्ज बेकौंट वेलेंशिया. वायेज अँड ट्रॅव्हल्स ऑफ लॉर्ड वेलेंशिया, भाग १, पृ. ९० लंडन. १८११) मोगल राजवट संपल्यावरही आजपर्यंत तीर्थक्षेत्री यात्राकर देण्याची पद्धत तशीच सुरू आहे. परकीयांनी सुरू केलेली ही पद्धत काढून टाकण्याऐवजी ती तशीच पुढे सुरू ठेवणाऱ्या स्वदेशी बुद्धीला काय म्हणावं?

‘खेड्यातल्या घरातल्या अप्पाजींच्या अभ्यासिकेत स्वत:ला कोंडून घेऊन, केवळ पुस्तकांच्या आधारे लिहायला बसले असते तर कादंबरीतील काशीमधील भाग लिहिणं शक्य झाला नसता. एवढंच नव्हे, या नगरीचा त्या नंतरचा इतिहासही समजला नसता. किती पुस्तकं, किती लेख, किती संशोधन प्रबंध, पेशवा दफ्तराचा अनुवाद, युरोपीय प्रवाशांचं कथन! ग्रंथालयातल्या त्या उत्साही तरुणीनं कितीतरी ग्रंथांमधले संदर्भ शोधून दिले.’ लक्ष्मीचं मन या नव्या दर्शनानं उल्हसित झालं.

येऊन पाच महिने झाले तरी तिला काशी सोडायची इच्छा झाली नाही.

��?”

१४

काशीला जाऊन आल्यावर मला अधिक स्वातंत्र्य मिळालं. जनान्याच्या सेवेचा मला कंटाळा आला होता. हम्दुल्लांच्या शिफारशीमुळे त्यांच्या कचेरीत लेखनाच्या प्रती तयार करायच्या कामी मी माझी नेमणूक करून घेतली. गुलाम या स्थानामध्ये काहीही बदल झाला नसला तरी कचेरीच्या कामाचा पगार मिळू लागला होता. हम्दुल्लांच्या घरातच जेवण्याची आणि राहण्याची व्यवस्था झाली होती. पगारातला निम्मा भाग त्यासाठी म्हणून मी त्यांच्या हाती सुपूर्द करत होतो.

मोगल साम्राज्याचा एक निष्ठावान सेवक म्हणून कचेरीमध्येही मला योग्य मान मिळत होता. काफिरांचं अत्यंत महत्त्वाचं देवालय नष्ट होताना पाहण्यासाठी मी गेलो याचं सगळ्यांना कौतुक होतं. त्यासाठी सगळ्यांनी मला बधाईही दिली होती. पण माझं मन मात्र आता या औरंगजेबाच्या साम्राज्याच्या पायाचा विध्वंस पाहायचं स्वप्न बघू लागलं होतं. मी स्वत: तलवारीनं बादशहाचं मुंडकं उडवल्याचं, लक्षावधी घोडेस्वारांना लोळवल्याचं या स्वप्नात बघत होतो. कितीतरी वेळा माझ्या या दिवास्वप्नांची मलाच लाज वाटायची.

याच काळात मला मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करून घेऊन चार वेळा शामलेला भेटलो होतो. मनात येईल तेव्हा एक घोडं मिळवणं सहज शक्य होत होतं. आमच्या या भेटीला शबानाबेगमही सहकार्य देत असत. निकाह न केलेल्या आपल्या या तरुण सवतीला– तबस्सुमला नवरा आहे, ही भावना त्यांनाही बरी वाटत होती. त्या आमच्या भेटीसाठी गोठ्यात व्यवस्था करत, शिवाय मधे जेवणही पाठवायच्या. मुलांनाही पाठवायच्या. इब्राहिमविषयी माझ्याही मनात विशेष प्रेम होतं. तिच्या पोटी जन्मलेल्या इतर दोन मुलांनाही तितक्याच प्रेमानं जवळ घेत होतो.

एक दिवस मी तिला विचारलं, “शामले, पैसे देऊन तुला मी गुलामीमधून मुक्त करू शकेन किंवा वरून दबाव आणून तुझे मालिकच तुझी मुक्तता करतील असं करू शकेन. यापैकी काहीही केलं तरी शबानाबेगम आपल्याला शक्य असेल तेवढी मदत निश्चितच करतील. मीही गुलामीमधून स्वत:ची सुटका करून घेऊ शकेन. मला थोडी-फार तनख्वाह मिळतेय. दोघंही एकत्र राहू या?”

“हे कसं शक्य आहे?” तिनं पटकन विचारलं.

“का?”

“तुम्ही पौरुषहीन...” तिचा हा प्रश्नही निम्मा घशातच अडकला. आपण हे म्हणायला नको होतं, असं वाटून तिचा चेहरा खरकन उतरला. जीभ दातांखाली अडकली.

‘यात नवं काय होतं? तरीही दोघांनी एकत्र सुखा-समाधानानं राहायला काय हरकत आहे?’ ही भावना इतकी तीव्र होती, की मागचा-पुढचा विचार न करता मी ती व्यक्त करून मोकळा झालो होतो. एकदा मनात आलं, एवढं सगळं पाहिलं, ऐकलं; मग पौरुषाशिवाय सहजीवन शक्य नाही, म्हणून?

पण माझ्या तोंडून एक शब्दही उमटला नाही. माझं मन विद्धि होऊन गेलं होतं. असं म्हणण्यामागे तिची काय भावना असेल, याचा विचार करण्याइतकंही भान राहिलं नाही. त्यानंतर, तीन महिने मी तिला भेटायला गेलो नाही. ती गुलाम असली तरी तिला दिल्शदखानकडून दोन मुलं झालेली आहेत. त्याच्याकडून शारीरिक भूक भागतेय. गुलाम असली तरी तिचं बाकी जीवन सुख-संपन्न आहे. हे सगळं सोडून, कधी काळचं नातं आठवून, पौरुष नसलेल्या नवऱ्याबरोबर गरिबीत दिवस काढायला येण्यात कुठला शहाणपणा आहे? होय. तिनंही असाच विचार केला असावा. नाही म्हटलं तरी मन दुखावलं. पण त्यामुळे वस्तुस्थिती बदलणंही शक्य नव्हतं.

याच काळात शिवाजीविषयी बातमी आली. केवळ माझ्या कचेरीतच नव्हे, सगळ्या दिल्लीत हाच बातमीची चर्चा होती. आजारी असल्याचं भासवून, त्यासाठी शांतीसारखे धार्मिक विधी करायचं निमित्त करून ब्राह्मणांना पेटाऱ्यांमधून फळ-फळावळ आणि धान्य दान म्हणून पाठवायचं नाटक करून एका फळांच्या पेटाऱ्यात शरीराची घडी घालून, झोपून, पळून तो गेल्याचं नंतरच्या तपासात समजलं होतं. त्याला पकडण्यासाठी घोडेस्वारांना दक्षिण दिशेला पिटाळण्यात आलं होतं. पण तो सापडला नव्हता. आता आपल्या प्रदेशात परतलेला शिवाजी एकेक करून आपले किल्ले पुन्हा ताब्यात घेत आहे, असं लोक बोलत होते. मला काशीच्या गंगा-घाटावर भेटलेल्या आणि शिवाजी महाराजा होणार अशी ग्वाही देणाऱ्या साधूची तीव्रतेनं आठवण झाली. आता समजत होतं, तो दक्षिणेकडे न जाता मथुरेकडे गेला. तिथे दाढीमिशा आणि केस काढून, संन्याशाच्या वेशात पूर्वेला प्रयागला गेला आणि त्यानंतर दक्षिणेचा मार्ग धरून तो मराठा-देशात पोहोचला. पंचवीस दिवसांनंतर! संपूर्ण दिल्लीमधल्या लोकांच्या दृष्टीनं तो एक आदर्श शूरवीर झाला होता. सगळीकडे त्याच्याविषयीच चर्चा चालली होती. 'आपण त्याला दरबारात पाहिलं होतं,' असं सांगण्यात आता सगळ्यांनाच अभिमान वाटत होता. असं सांगणाऱ्यांत त्याला न पाहिलेलेही बरेच होते. अगदी बादशहाविषयी अभिमान बाळगणारेही शिवाजीचं धैर्य, हुशारी, प्रसंगावधान आणि तंत्राविषयी कौतुकोद्गार काढत होते, न राहावून!

यातच आणखीही एक बातमी आली. बुंदेलचा छत्रसाल शिवाजीपाशी गेला आणि स्वत:ला त्याच्या सैन्यात भरती करून घ्यावं म्हणून विनंती केली. औरंगजेबानं सिंहासनासाठी युद्ध पुकारलं तेव्हा याच छत्रसालाच्या वडिलांनी औरंगजेबाला मदत केली होती. पुढे त्या दोघांमध्ये मतभेद झाले. औरंगजेबानं त्यांच्यामागे सैन्याचा असा ससेमिरा लावून दिला, की शेवटी त्यांच्यावर आत्महत्या करायची पाळी आली होती. जयपूरच्या मिर्झाराजाच्या मध्यस्थीनं मुलगा छत्रसालही औरंगजेबाच्या सैन्यात शिरला होता. जेव्हा मिर्झाराजानं शिवाजीला चहूबाजूंनी घेरून आग्र्याला येणं भाग पाडलं तेव्हाही हा छत्रसाल औरंगजेबाच्या बाजूनं लढला होता. पण आपल्या वडिलांचा मृत्यू आणि आपल्या धर्माच्या देवालयांचा नाश पाहिल्यावर मात्र त्याच्या मनानं औरंगजेबाला पाठिंबा द्यायला नकार दिला. त्यामुळे आग्र्याहून निसटून पळून गेलेल्या शिवाजीला भेटून त्यानं शिवाजीच्या सेनेत सेनाधिकारी व्हायची इच्छा व्यक्त केली. त्याला शिवाजीनं सांगितलं म्हणे, "आमच्या सेनेत युद्ध करायला अनेक योद्धे आहेत. पण केवळ मराठ्यांनी लढून काहीही उपयोग होणार नाही. तू तुझ्या देशात जा आणि मोगलांविरुद्ध तुझ्या माणसांना उठण्याचं आवाहन कर. मीही तुला मदत करेन." आता छत्रसाल बुंदेलखंडात परतला असून त्याचे प्रयत्न सुरू आहेत. सुरुवातीला मोगलांविरुद्ध आवाज उठवायचं कुणालाही धैर्य नव्हतं. पण मथुरेत केशवराय मंदिराचा नाश केल्यावर बुंदेलखंडचे लोकही संतापले. बादशहा अकबराचा मुलगा–सलीमने वडिलांविरुद्ध उठाव केला, तेव्हा त्याला पकडून आणण्यासाठी बादशहांनी त्यांचा अत्यंत विश्वासू, 'अकबरनामा' आणि 'ऐने अकबरी'चा लेखक अब्द-उल-फसल याला पाठवलं होतं. त्यावेळी या अब्द-उल-फसलचा वाटेतच वध करण्यासाठी सलीमनं आपला इष्ट मित्र बुंदेलचा वीरसिंह याला पाठवलं होतं. वीरसिंहनं हे कार्य केलं. पुढे हाच सलीम जहांगीर नावानं सिंहासनावर बसला तेव्हा त्यानं याच वीरसिंहाला केशवराय मंदिर बांधायला परवानगी दिली होती. मुस्लीम राजवटीत इतर कुठल्याही धर्माच्या व्यक्तीला आपल्या इष्ट देवतांचं मंदिर बांधायची परवानगी नसताना! बुंदेलखंडाच्या रहिवाशांना या देवालयाविषयी विशेष आस्था होती. औरंगजेबानं त्या देवालयाचा नाश करून त्याच्या अवशेषांचा पायदळी वापर करून त्याच जागी मशिदीचं बांधकाम सुरू केल्यामुळे बुंदेली लोकांनी छत्रसालच्या नेतृत्वाखाली बंड पुकारून स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यामुळे बादशहा तिकडे सैन्य पाठवायच्या गडबडीत आहेत.

हा सगळा तपशील मला हम्दुल्लांकडून समजला. प्रत्येक वेळी ते शिवाजीचा उल्लेख अत्यंत तुच्छतेनं करत होते. छत्रसालाला तर ते 'नरकाच्या दिशेनं धावत सुटलेलं पितर' म्हणत होते. मला त्यांची मनोवृत्ती आणि त्यांची भाषा ठाऊक असल्यामुळे त्यांच्या बोलण्यातून नेमकी वस्तुस्थिती जाणून घेत होतो.

त्या रात्री, अचानक एक विचार मनात आला. 'पोटात खंजीर खुपसून न घेण्याची, क्षणभराची चूक घडली आणि शारीरिक-मानसिकदृष्ट्या केवढी हीन स्थिती उद्भवली. मी असंच किती वर्षं जगायचं? औरंगजेबाच्या तावडीतून सुटून पुन्हा स्वत:चं राष्ट्र उभारत असलेल्या शिवाजीचं धैर्य माझ्यामध्ये का निर्माण होऊ नये? केवळ लैंगिक शक्ति गमावली म्हणजेच मी नपुंसक झालो असं का समजायचं? हिंदुस्थानच्या मुस्लीम

इतिहासात कितीतरी नपुंसक सेनाधिकाऱ्यांनी प्रचंड पराक्रम केल्याच्या नोंदी आढळतात. हम्दुल्लांनी अशा कितीतरी जणांविषयी सांगितलं आहे.'

रात्रभर झोप आली नाही. दुसऱ्या दिवशी मनात शंका निर्माण झाली, पहिल्यापासूनच बिनकष्टाचं जीवन जगत, नंतरचा बराच काळ जनानखान्यात, सुखात काढल्यावर आता शिवाजीसारख्या धैर्याची अपेक्षा कशी करता येईल? नशिबात असेल तितके दिवस हे असंच जीवन जगायचं. हाच सुखाचा मार्ग आहे. पण दोनच दिवसांत, हे असलं मार खाऊन शेपूट दोन्ही पायांमध्ये घालून लोचट कुत्र्यासारखं जगण्याची घृणा वाटू लागली. युद्धात मी किती जणांचं रक्षण करेन किंवा किती शत्रूंची हत्या करेन, हे महत्त्वाचं नाही. एक दिवस का होईना, मी स्वतंत्र म्हणून जगलं पाहिजे, ही भावना आठवडाभरात प्रबल झाली. 'मीही केस, दाढी, मिशा भादरून संन्याशाच्या वेषात सहज वावरू शकेन. एवढं तरी मी शिवाजीसारखं करू शकेन. शिवाय माझा काही शिवाजीसारखा पाठलागही व्हायची शक्यता नाही. अर्थात कुणी वाटेत अडवून तपासलं तर माझी 'सुन्ता' झाल्याचं समजेल. एकदा मुसलमान होऊन पुन्हा धर्म बदलला तर मृत्युदंड ठरलेला, हेही आठवलं. काहीतरी कारण सांगून, अगदी आलमगीरांनी जो दरबार अलंकृत केला, तो दरबार पुन्हा एकदा पाहायची इच्छा आहे, असं सांगितलं तर हम्दुल्लासुद्धा सरकारी परवानगी मिळवून देतील. ती घेऊन आग्र्याला गेलं आणि तिथून नजर चुकवून अरण्यात शिरलं तर बुंदेलखंड जवळच आहे. एकदा तिथे पोहोचलो तर प्रश्नच नाही. पाठोपाठ मनात आलं, आपण मराठा देशात जायला नको. शिवाजीच्या देशात जाऊन सुरक्षित जीवन जगणं, एवढंच माझ्या जीवनाचं ध्येय राहता कामा नये. बंड करून, या दिल्लीपतीच्या जवळच स्वतंत्र राज्यासाठी धडपडणाऱ्या छत्रसाल राजालाच सामील होणं योग्य ठरेल.' मनातले विचार स्पष्ट होऊ लागले, तसं मनंही थोडं शांत होऊ लागलं.

मन शांत होऊ लागलं तेव्हा मनात आणखी एक विचार येऊ लागला. शामला म्हणून जगायचं की तबस्सुम होऊनच राहायचं आहे, हे आणखी एकदा शामलेला विचारलं पाहिजे. शिवाय इब्राहिम माझा, देवगढ वंशाचा मुलगा. तिनं नाही म्हटलं तरी त्याला बरोबर नेलं तर? दिल्शदखानच्या घरात तो वाढतोय. तिथे तो सैनिकच होणार, यात शंका नाही. पुढे हाच देवालयं फोडण्याच्या किंवा जिझिया वसूल करायच्या कामावरच नेमला जाईल. आपण सोबत घेऊन गेलो तर निदान हे तरी चुकेल. शामलेशी या सर्व संदर्भात शेवटचं बोलून पाहण्यासाठी मी घोड्यावरून निघालो.

शबानाबेगमांनी व्यवस्था केल्याप्रमाणे मी नेहमीसारखा गोठ्यात गेलो. प्रहरभरानंतर शामला आली. माझ्या मनात एक संशय होता. आधीच तिनं मला सहजीवनासाठी नकार दिलाय. आता माझ्या मनातले विचार तिनं दिल्शदखानला सांगितले तर? तर इथून निघण्याआधीच माझं मस्तक धडापासून अलग होऊन जमिनीवर कोसळेल. इथे येण्याआधी हा विचारच मनाला सुचला नव्हता. मनात एक सावधगिरीचा इशारा उमटला. आल्यासारखं चार सुख-दु:खाच्या गोष्टी बोलून इथून काढता पाय घ्यायचा.

पण जवळ आलेल्या शामलेच्या चेहऱ्यावर विवंचना दिसत होती. काहीही न बोलता ती समोर बसली. मलाही काय बोलावं ते सुचलं नाही. शेवटी मीच बोलायला सुरुवात केली, "कशी आहेस?"

"सहा महिने झाले ना तुम्ही आल्याला? तुम्हाला राग येणं स्वाभाविकच आहे म्हणा! दोघं एकत्र राहू या, म्हणून तुम्ही सांगितलं त्या क्षणी जे मनात आलं, ते मी बोलले. चार-चार बायका, तरीही नवी आकर्षक कुणी भेटली की चारांपैकी एकीला तलाक सांगून जागा रिकामी करून घेणं, त्याशिवाय शक्य असतील तितक्या रखेली. अशा वातावरणात राहतेय मी! त्यामुळे शरीरसंबंध नसलेल्या दांपत्य-जीवनाची मी कल्पना तरी कशी करू? मला पकडण्यात आलं तेव्हा मी पंधरा वर्षांची होते. त्यानंतर आजपर्यंत फक्त याच वातावरणात वावरतेय मी! ते जाऊ दे. तुमच्या त्या विचाराचं पुढे काय झालं?"

माझा माझ्याच कानांवर विश्वास बसेनासा झाला. मी तिच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर दृढता होती. तिनं विचारलं, "असे का पाहताय? विश्वास नाही वाटत?"

"फक्त आपल्या संसाराव्यतिरिक्त काही माझ्या मनात आहे–" असं म्हणून मी तिला काशी-प्रवासाविषयी

आणि छत्रसालाविषयी सांगून म्हटलं, “आग्रा पाहण्यासाठी मी उदयपुरीमहलांकडून अनुमती मिळवेन. तू मुलांसह इथून कसं बाहेर पडता येईल, याचा मार्ग शोधशील? इथून तीन दिवसांसाठी बाहेर पडायची परवानगी मिळाली तरी पुरेसं आहे. आग्र्याहून एखाद्या अरण्यात प्रवेश केला, की पुढे कसलीही काळजी नाही. बुंदेल देशात सहज जाऊ शकू. तिथे काही अत्यंत सुखी जीवन आपली वाट पाहत असेल, असंही नाही. शिवाय आपणही केवळ सुखी जीवनाच्या अपेक्षेनं इथून निघालेलो नाही, स्वतंत्र होऊन राहण्यासाठी! स्वातंत्र्यलढ्यात मरायलाही सज्ज होऊन निघणार आपण...”

काही क्षण विचार करून ती म्हणाली, “पण राज्याबाहेर पडून आपण लढणार आहोत, हे कुणालाही सांगायला नको. तुमच्याबरोबर राहण्यासाठी इथून बाहेर पडायचं म्हटलं तर शबानाबेगम मला निश्चितच सर्व प्रकारे मदत करतील. निदान एक सवत तर गेली, असं त्यांनाही समाधानच मिळेल. दिल्शादखानांचाही स्वत:च्या या दोन्ही मुलांवर जीव नाही. त्यांची अशी कितीतरी मुलं कुठे-कुठेतरी जन्मली आहेत. ही मुलं नजरेआड व्हावीत असं बेगमसाहिबांना तर निश्चितच वाटतं. तुम्ही पुढच्या व्यवस्थेला लागा.”

१५

अमेरिकेहून माघारी येईपर्यंत शास्त्रींच्या डोक्यावरचे आणि दाढीचे केस पूर्ववत वाढले होते. दोन आठवड्यांनंतर मधे लहानशा पांढऱ्या रेघा दिसतील अशा प्रकारे त्यांनी डाय केले. या वयातही टकलाऐवजी घनदाट केस असलेल्या आपल्या डोक्यावरून त्यांनी अभिमानानं हात फिरवला. हे अप्पांकडून नव्हे, आईकडून आलंय. टकलाचा आणि बुद्धिमत्तेचा काहीही संबंध नाही, असं स्वत:लाच पुन्हा एकदा सांगत, आरशात बघून ते स्वत:शीच हसले.

त्यानंतर एक दिवस एका मीटिंगसाठी विमानतळावर गेले असताना इकॉनॉमी क्लासच्या चेकइनच्या रांगेत त्यांना लक्ष्मी दिसली. ते एक्झिक्युटिव्ह क्लासनं जाणार असल्यामुळे, तिथे गर्दी कमी होती. त्यामुळे रांगेत उभं राहायचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे तेच तिच्यापाशी जाऊन म्हणाले, “हाय लक्ष्मी! तुझ्या खेड्यात अजून एक फोन-लाईन नाही ना आली? तुझ्याशी संपर्क साधण्यासाठी फार खटाटोप केला. ज्या मीटिंगसाठी तू चाललीस, तिथेच मीही चाललोय. जर तू आधीच ‘मला इकॉनॉमी दर्जाचा विमानप्रवास शक्य नाही’ म्हणून पत्रानं कळवलं असतंस तर मी एक्झिक्युटिव्ह क्लास देण्याविषयी शिफारस केली असती.”

“अडीच तासांचा तर प्रवास! कुठेही बसलं तरी काय बिघडणार आहे?” ती म्हणाली.

“गप्पा मारत प्रवास करता आला असता.”

“मी तुमच्या क्लासमध्ये येऊन बसायचं म्हटलं तर एवढे पैसे भरावे लागतील. सरकार ते देणार नाही, पण तुम्ही आमच्या क्लासमध्ये येऊन बसलात तर विमान कंपनी आक्षेप घेणार नाही. अर्थात जागा असेल तर!”

“मला क्लासचं फारसं कौतुक नाही, हे तुलाही ठाऊक आहे. विमान उडाल्यावर भेटू आपण.”

तिच्या क्लासमध्ये हव्या तितक्या खुर्च्या रिकाम्या होत्या. दोघंही एके ठिकाणी शेजारी-शेजारी बसले. तिलाही त्यांच्याशी गप्पा मारायच्या होत्याच. त्यांनाही तिची चौकशी करायची होती.

तिनं सुरुवात केली, “तुम्ही याल म्हणून तेव्हा आम्ही सगळ्यांनी फार वाट पाहिली. का नाही आलात?”

तिच्या नजरेत अत्यंत आत्मीयतेनं नजर मिसळत ते म्हणाले, “फ्रँकली स्पीकींग, या प्रायश्चित्तांना काय अर्थ? घरात जागा नाही म्हणून देवळात झोपायला जायचं, ओ के! पण...”

“तुमचा इगो फार मोठा आहे. सॉरी! सेल्फ इमेज म्हणा हवं तर!” तिनंही त्यांची नजर झेलत म्हटलं.

या मुद्द्यावर वाद घालायला सुरुवात केली तर ती आपला मुद्दा अधिकच घट्ट पकडून राहील, हे तिच्या नजरेतल्या दृढतेतूनच त्यांच्या लक्षात आलं. त्यांनी लगेच स्नेहपूर्वक चौकशी केली, “सांग. कोण-कोण आलं होतं? चौदाव्याला खूप माणसं जमली असतील. दिवसकार्याचा झालेला खर्च द्यायचा माझा विचार होता. पण म्हटलं, कुठल्याही विधीत भाग न घेतलेल्याचा पैसाही कशाला हवा म्हणून त्यांनी गोंधळ केला तर... म्हणून गप्प बसलो.”

“तुम्ही दिले नाहीत, पण तुमच्या मुलानं, दिगंतनं दिले. तुम्ही भाग घेतला नाही, पण तो, त्याची बायको, त्याचा मुलगा सगळे आले होते. त्यांनी पानं वाढली, जेवायला वाढलं, नंतर खरकटी पानं उचलून जमीनही धुवून काढली. त्याची बायको तर विलक्षण आहे. सगळ्या गावकऱ्यांना फार आवडली ती!”

“पण त्याला कुणी सांगितली ही बातमी? त्याचा कुठे त्याच्या आजोबा-आजीशी संबंध होता?”

"संबंध होते तर! त्या दिवशी फोनवर बोलला ना, जयराम? मीनाक्षीताइचा मुलगा? मद्रासमध्ये राहणारा? त्याच्या कंपनीचा दिगंतच्या कंपनीशी व्यावसायिक संबंध आहे. कामाच्या निमित्तानं कधीतरी भेटले. दोघंही कन्नड भाषिक म्हणून समजल्यावर, जेवताना गप्पा मारताना आपण दोघं आत्ते-मामेभावंडं असल्याचं लक्षात आलं म्हणे. तो बेंगळुरूला आला की याच्या बंगल्यावर उतरतो, हा मद्रासला गेला की त्याच्या घरी उतरतो. एकदा तोच याला कारनं आजोबा-आजींना भेटायला घेऊन आला. त्यानंतर दर वर्षी हे नवरा-बायको एकदा गावी येतात, एक वेळ जेवतात, लुगडं-धोतरासाठी म्हणून दहा हजार रुपये देऊन, पाया पडून जातात. त्या दिवशी तुमच्याबरोबर फोनवर बोलून तो घाईघाईनं मद्रासला निघून गेला आणि त्याच रात्री दिगंतशी फोनवर गावाकडे काय-काय घडलं, ते सगळं सांगितलं. दुसरे दिवशी सकाळी दोघंही गाडी घेऊन आले. आजोबांशी आणि तिन्ही आत्यांशी बोलले. पन्नास हजार ठेवून सांगितलं, आजी परिपूर्ण आयुष्य जगली, दिवसकार्य उत्तम प्रकारे होऊ द्या. आम्हाला थांबायला वेळ नाही, अर्जंट काम आहे. अबूधाबीला जायला पाहिजे. वैकुंठसमाराधनेच्या दिवशी सकाळी येऊन रात्रीपर्यंत राहू!..." आणि निघून गेले.

प्रोफेसरांची नजर तिच्या चेहऱ्यावर खिळली होती. 'दिगंतनं आपल्या पाठीत सुरा खुपसलाय असं वाटलं. एवढं सगळं करण्यापूर्वी त्यानं मला का सांगितलं नाही? त्याच्या डेमॉक्रेटिक हक्काला मी आडवा येईन, असं त्याला वाटलं की काय? दिगंत आणि त्याची बायको माझ्याबरोबरही ठीक असतात. आपली कंपनी वाढवण्यासाठी माझी हवी ती मदतही घेतात.'

लक्ष्मी पुढे म्हणाली, "आजीच्या नावानं आपण नरसिंहाच्या देवळाची दुरुस्ती करून देऊ, बेंगळुरूहून आर्किटेक्ट पाठवतो, सुरुवातीला पाच लाख देऊ, जास्त लागले तरी हरकत नाही, स्थानिक व्यवस्था तुम्ही बघा, असं मला सांगून गेलेत. त्याच्यापेक्षा त्याच्या बायकोची देवावर जास्त भक्ती आहे. दर वर्षी दोघंही वैष्णवदेवीला जाऊन येतात, म्हणून ती सांगत होती. तिरुपतीलाही सगळ्या पायऱ्या चढून जातात, म्हणे!"

एकदा बबितानं त्यांच्यापाशीही देवाचा विषय काढला होता. तेव्हा त्यांनी 'तिरुपती हा कॅपिटॅलिस्ट देव आहे' असं सांगितलं होतं. 'तिथे जाणाऱ्या भक्तांपैकी पंच्याण्णव टक्के भक्त सर्वसाधारण किंवा गरीब असतात. त्यांनाही आपण कॅपिटॅलिस्ट व्हावं, असं वाटतं, असा याचा अर्थ झाला,' म्हणत ती हसली होती. 'गरिबाची ही इच्छा पूर्ण करण्याची आकांक्षा म्हणजेच अफू, असं मार्क्सनं सांगितलंय,' असं प्रोफेसरांनी म्हणताच ती 'पण या अफूबरोबरच्या युद्धात रशिया हरलं. त्यांच्या मागोमाग चाललेल्या भारताचीही हार होऊन, आमच्यासारख्यांच्या कंपन्या भरभराटीला येत आहेत,' म्हणाली. सुनेशी वाद घालून तिला हरवण्यात काय अर्थ आहे, असा विचार करून प्रोफेसरांनी तेव्हा वाद तिथेच थांबवला होता. क्षणार्धात त्यांना सगळं आठवलं. काही का असेना, दिगंतनं आपले आजोबा-आजीशी संबंध आहेत, हे सांगायला हवं होतं. का सांगितलं नसेल? भीती की मुत्सद्दीपणा? त्यांना मुलगा-सुनेचा– त्यातही मुलाचा राग आला. पण म्हणून त्याला जाब विचारता येणार नाही किंवा दबाव आणता येणार नाही, हेही त्यांना समजत होतं.

ते अस्वस्थ झाले. आतून आग पेटल्यासारखं झालं होतं. त्यांनी बेल दाबली. जवळ आलेल्या हवाईसुंदरीला आपला एक्झिक्युटिव्ह क्लासचा पास दाखवून, "एक जीन" अशी ऑर्डर दिली. नंतर लक्ष्मीकडे वळून, "तुला?" म्हणून विचारलं. तिनं "काही नको" म्हणून सांगितल्यावर ती "यस सर" म्हणून निघून गेली.

राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी म्हणून सरकारनं देशातील बुद्धिजीवी, कलाकार, शिक्षण-तज्ज्ञ, विद्वान, इतिहास-तज्ज्ञांची तीन दिवसांची एक सभा बोलावली होती. तीस-बत्तीस माणसं जमणार होती. त्यातली काही वरचेवर वृत्तपत्रं आणि टीव्हीवर चमकणारी होती. गेल्या पाच वर्षांत टीव्हीवर एकदाही न झळकणारी रझिया एकटीच होती तिथे. पण त्याआधी तीही टीव्हीवर आणि वृत्तपत्रांमधून सतत चमकत असायची. मीटिंग सुरू होण्याआधीच्या चहापानाच्या वेळी अनेकांनी तिला ओळखलं आणि चौकशी केली, "हे काय! हल्ली कुठे असता? इंडियात की कुठे परदेशी?" प्रोफेसरही फिरत, सगळ्यांशी हसून बोलत, चौकशी करत होते. मंत्रालयाचे सेक्रेटरी आणि आणखी काही अधिकारी सगळ्यांची चौकशी करत होते. एकूण वातावरणात प्रोफेसरांचं स्थान महत्त्वाचं असल्याचं लक्षात येत होतं. या यादीत तिचं नाव आपणच सुचवलं असल्याचं त्यांनी दिल्ली विमानतळावर सामानाची वाट पाहात असतानाच सांगितलं होतं. त्यांना काही इतरांप्रमाणे टॅक्सी करून जनपथ हॉटेलला जायची गरज नव्हती. सरकारी गाडी त्यांना न्यायला आली होती. तिथून त्यांना

सरकारी मालकीच्या पंचतारांकित हॉटेल अशोकामध्ये नेण्यात आलं होतं. त्यांनी सूचना केल्याप्रमाणे ती मात्र टॅक्सी करून जनपथ हॉटेलला गेली.

सभेचं उद्घाटन करणारे मंत्री आले. सगळ्यांनी पुढे होऊन मंत्री-महोदयांशी ओळख करून घेतली आणि स्वत:ला धन्य मानलं. त्यापैकी अनेकांचा मंत्र्यांशी चांगला परिचय होता. मंत्र्यांनीही सगळ्यांच्या सोयीसुविधांबाबत चौकशी केली. टेरिकॉटमिश्रित खादीचा सफारी घातलेले मंत्री बऱ्यापैकी आधुनिक दिसत होते.

आपल्या सुरुवातीच्या भाषणात त्यांनी जातीयवादी प्रवृत्तींवर जोरदार हल्ला करून कला, शिक्षण, संशोधन, साहित्य, विद्वत्ता इत्यादी माध्यमांवर त्या कसा प्रभाव टाकत आहेत हे सांगितलं आणि हा प्रभाव नष्ट करण्यासाठी सरकारनं काय केलं पाहिजे, यावर प्रकाश पडावा म्हणून ही सभा बोलावल्याचं सांगितलं. “या सभेची दिशा काय असावी याविषयी काही मुद्दे आपल्या देशातील प्रख्यात विचारवंत प्रोफेसर शास्त्री आपल्या बीजभाषणात मांडतील–” असं सांगून ते थांबले. हे केवळ साधारण मंत्री नसून स्मार्ट राजकारणी असल्याची सगळ्यांची पुन्हा खात्री झाली.

त्यानंतर प्रोफेसर शास्त्री बोलायला उभे राहिले. सगळ्यांवर एकवार मंद हास्याचा वर्षाव करून, आपल्याला एवढा आदर प्रदान करणाऱ्या मंत्रिमहोदय आणि सरकारचे आभार मानून, आता राष्ट्र किती गंभीर परिस्थितीतून जात आहे, याविषयी विस्तारानं सांगितलं. “...भारत हा कधीच एकमुखी संस्कृतीचा देश नव्हता. आपल्या दृष्टीनं वेरुळ-अजंठा जितके महत्त्वाचे आहेत, तेवढाच ताजमहालही महत्त्वाचा आहे. विजयनगर पाहायला येणाऱ्या प्रवाशांपेक्षा ताजमहाल पाहायला येणाऱ्या प्रवाशांची संख्या कितीतरी पटीनं जास्त आहे, हे आपण विसरता कामा नये. भारतात हिंदू-मुस्लीम असा विरोध कधीच नव्हता. मुस्लिमांनी हिंदूंची देवालयं फोडली असा अपप्रचार करणाऱ्यांपासून आपल्या मुलांचं रक्षण करण्यासाठी आपल्याला आपल्या इतिहास शिक्षणात, इतिहास-संशोधन क्षेत्रात काय करणं आवश्यक आहे, या संदर्भात आपले कलाकार, माध्यमं, प्रकाशक, समीक्षक, लेखकांची काय कर्तव्यं आहेत, याविषयी विस्तारपूर्ण चर्चा करून सरकारला शिफारस करण्याची जबाबदारी आपल्या या सभेवर आहे. आवश्यकतेनुसार ही सभा पुन:पुन्हा बोलावली जाणार आहे. प्रत्येक वेळी एकेका क्षेत्रात काय करता येईल, यावर चर्चा करून शिफारशी करायच्या आहेत. या सभेत आपण काही मूलभूत तत्त्वं निश्चित करायची आहेत. सभेचा अध्यक्ष होऊन, या दृष्टीनं कामकाज करावं, असं माननीय मंत्र्यांनी मला सांगितलं आहे. या सभेत माझ्यापेक्षा श्रेष्ठ असे विद्वान उपस्थित असताना मला ही जबाबदारी नको, असं मी स्पष्ट सांगितलं आहे. पण आपल्यावर सोपवलेली जबाबदारी पार पाडून सभेच्या कामकाजाला हातभार लावणं हे मी माझं कर्तव्य समजतो...”

अशा प्रकारे पाऊण तास चाललेलं त्यांचं भाषण ऐकताना यांना वगळून सभा चालवणं अशक्य आहे, असं अनेकांना वाटलं. काही जणांना वाटलं, या मंत्र्यानं यांच्या सूचनेवरूनच आपल्याला निमंत्रित केलं आहे, अशा वेळी त्यांना विरोध कशाला करायचा? आणि करून तरी काय उपयोग आहे? मंत्र्यांनी ‘सभेच्या अध्यक्षच्या निवडीबाबत काय मत आहे,’ असं विचारताच टाळ्यांचा गजर झाला. सुरुवातीला मोजक्याच टाळ्या पडल्या, पण मंत्र्यांनी नजर फिरवल्यावर गजर झाला, असं म्हणणं योग्य ठरेल.

मंत्री निघून गेल्यावर सभेचं मुख्य काम सुरू झालं. सेवकांनी सगळ्यांना बसल्या जागी चहा-बिस्किटं दिली. अध्यक्षांनीच विषय मुख्य मार्गावर आणला, “आपल्या समाजाचं विघटन करणारं क्षेत्र म्हणजे इतिहासाचं शिक्षण. इतिहास हा नेहमी प्रगतीचा मार्ग दाखवत असतो. मुसलमानांनी देवालयं फोडली, जबरदस्तीनं धर्मांतर केलं, यासारख्या काही खोट्या गोष्टी, कशा कोण जाणे, आपल्या इतिहासात शिरल्या आहेत. त्या बाजूला काढून आपला इतिहास आपण शुद्ध केला पाहिजे. संपूर्ण जगात आदर्श होईल असा इतिहास आपण निर्माण केला पाहिजे आणि त्यांना पाठ्य-पुस्तकांमध्ये स्थान दिलं पाहिजे. या कार्यासाठी या सभेनं एक कमिटी निर्माण केली पाहिजे...”

हे ऐकत असताना लक्ष्मीचा जीव कासावीस झाला, तळमळला. हे सगळं तिला असह्य होऊ लागलं. यांच्या बोलण्याला सुरुवातीच्या टप्प्यावरच विरोध करायची ऊर्मी आतून दाटून आली. पण इथे असणारे सगळे

राष्ट्रीय पातळीवर नाव असणारे आहेत. केंद्र सरकारनं अत्युच्च पातळीवर ही सभा बोलावली आहे, या विचारानं ती रोमांचितही झाली.

"औरंगजेब, टिपू सुलतान, महंमद गझनी यासारखी काही उदाहरणं घेऊन, त्यांच्यावर करण्यात आलेले खोटे आरोप..." प्रोफेसरांचा वाग्प्रवाह ओघात चालला असता, स्वत:च्या नकळत तिनं एक प्रश्न उपस्थित केला, "सर! तुम्ही बनारस पाहिलंय?"

प्रोफेसर चमकले. सगळी सभा चकित झाली. गोलमेजाच्या भोवताली बसलेले सगळे तिच्या दिशेला वळले. प्रोफेसरांनी आत्मविश्वासानं विचारलं, "तुमच्या या प्रश्नाचा अर्थ माझ्या लक्षात आला नाही. आणून द्याल तर बरं!"

"विश्वनाथ देवालयाच्या जागी एक भव्य मशीद उभी आहे. मुस्लीम लोक तिला 'ग्यानवापी मशीद' म्हणून ओळखतात. तिच्याशेजारी एका कोपऱ्यातल्या एका मंडपात विश्वनाथ मंदिर म्हणून शिविंलगाची पूजा केली जाते. ती मशीद कुणी बांधली, ती त्याच जागी का बांधली? या विषयावर निरंकुशपणे बोलण्याआधी यासारख्या हजारो अवशेषांच्या संदर्भात उठणाऱ्या प्रश्नांना उत्तर द्यावं लागेल." तिचा आवाज उद्वेगानं भरला होता.

"कुठल्या तरी रिकाम्या जागी त्यांनी, म्हणजे औरंगजेबानं म्हणा हवं तर, मशीद बांधली असेल. पण ती हिंदू देवालयं पाडून त्याच जागी बांधली असं म्हणणं अर्थहीन आहे. हे अवैज्ञानिक आहे, असं नाही का होणार?" प्रोफेसरांनी विचारलं.

"औरंगजेब १७०७ साली वारला. त्यानंतर त्याचा शेवटचा मुख्याधिकारी हिनायतुल्लाखान याच्या आज्ञेवरून काश्मीरच्या साकी मुश्ताकखान यानं त्याचा आवडता बादशहा औरंगजेब याचा इतिहास लिहिला आहे. दरबारात असलेल्या पुराव्याशिवाय त्यानं एक वाक्यही लिहिलेलं नाही. त्या ग्रंथाचं नाव 'मासिर-ई-आलमगिरी.' 'बादशहाच्या आज्ञेनुसार त्याच्या अधिकाऱ्यांनी काशीचं विश्वनाथ देवालय नष्ट केलं' अशी वर्दी आली, अशी त्यात स्पष्टपणे नोंद आहे. १६७० साली रमजान महिन्याचं पवित्र कर्तव्य म्हणून मथुरेचं देवालय नष्ट करावं, असा औरंगजेबानं हुकूम केला, त्याच जागी एक मोठी मशीद उभारली, असं त्याच पुस्तकाच्या पुढच्या प्रकरणात लिहिलं आहे. बादशहाच्या राजवटीच्या बाराव्या वर्षी विश्वनाथ देवालयाचा नाश झाला आणि मथुरेचं देवालय तेराव्या वर्षी पाडण्यात आलं. हा ऐतिहासिक आधार मी सभेपुढे आणू इच्छिते."

सभा स्तब्ध झाली. पाच वर्षं तोंड मिटून असलेल्या लक्ष्मीला बोलायचा मूड आला होता. ती पुढे बोलू लागली, "हिंदू-मुस्लिमांमध्ये ऐक्य निर्माण करणं हा विचार निश्चितच उदात्त आणि स्वागतार्ह आहे. त्याची आज नितांत गरजही आहे. पण असत्यावर समाज ठाम उभा करणं शक्य नाही. दर वर्षी किमान पंचवीस लाख यात्रेकरू काशीला जात असतात. ज्या अपेक्षेनं आणि श्रद्धेनं आपण आलो ते काशी विश्वेश्वराचं मंदिरच अस्तित्वात नसून तिथे एक अजस्र मशीद उभी असल्याचं पाहून धक्क्यानं ते कोलमडून जातात. गावी परतल्यावर आपल्या जवळपासच्या सगळ्यांना या आघाताविषयी सांगतात. अशा प्रकारची भावना मनात असताना राष्ट्रीय भावना कशी निर्माण होणार? आज शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून तुम्ही हे सत्य दडवून ठेवण्यात यशस्वीही व्हाल. हीच मुलं शैक्षणिक प्रवासासाठी जातील आणि सोबत असलेल्या अध्यापकांना यासंबंधी प्रश्न विचारतील. त्या वेळी त्यांनी काय उत्तर द्यावं? ही केवळ काशी-मथुरा-अयोध्येची गोष्ट नाहीये. भारतात अशी किमान तीस हजार भग्न देवालयं आहेत! हा संशोधकांनी सांगितलेला आकडा आहे. ही सगळी देवालयं रानटी प्राण्यांनी भग्न केली असं सांगायचं काय? जैन, बौद्ध, शैव, वैष्णव या सगळ्यांनी परस्परांची देवळं पाडली म्हणून कथा निर्माण कराल काय? यापैकी कुणाच्याही धर्मग्रंथांनी इतरांची देवालयं पाडावी म्हणून सांगितलेलं नाही. कुणी समाजकंटकानं असलं काही केलं तरी त्याला आपल्या धर्मानं आदर्श मानलेलं नाही. उलट इतर धर्मीयांची पूजा-स्थळं आणि मूर्ती फोडणं, हातात तलवार घेऊन धर्माचा प्रसार करणं, जिझिया लादणं, हरलेल्यांना हजारोंच्या संख्येनं गुलाम करणं या साऱ्या गोष्टी स्वत: त्या धर्मसंस्थापकांनी केल्या असून, त्यांनाच आदर्श मानण्यात आलं आहे. कधी काळी, असंस्कृत काळी, असंस्कृत देशात केलेली कृत्यं आणि सांगितलेला उपदेश आजच्या काळातही अनुसरण्याची मनोभूमिका असेपर्यंत तुम्ही म्हणता ते ऐक्य कसं

शक्य आहे? मनुसारख्याच्या मनोभूमिकांना त्याज्य ठरवून, सर्व जण समान आहेत, या तत्त्वाचा स्वीकार करून आपण आपल्या देशाचं संविधान लिहिलं नाही का? त्याचप्रमाणे परधर्माचा द्वेष करत स्वत:च्या प्रेषितानं सांगितलेलाच धर्म श्रेष्ठ मानून, आपल्या धर्मात न येणाऱ्यांना ठार करा असं सांगणाऱ्यांच्या मनोभावाचा तिरस्कार करून 'एकं सत्विप्रा: बहुधा वदंति' हे तत्त्व सगळ्यांवर कठोरपणे लादल्याशिवाय आपण ऐक्याच्या गोष्टी केल्या, तर त्या पोकळ ठरणार नाहीत का? हे तत्त्व सगळ्या मुलांपर्यंत कसं पोहोचवता येईल, हे आजच्या सभेचं लक्ष्य असलं पाहिजे."

लाहा फुटाव्यात तसे ती आतून उसळून येणारे विचार मांडत होती. तिन्ही दिवस असंच बोलावं लागलं तरी बोलता येईल एवढे मुद्दे आपल्यापाशी आहेत, असा विश्वास तिच्या मनात निर्माण झाला होता. तिनं कसलीही टिपणं सोबत आणली नव्हती. संदर्भ-ग्रंथही तिच्यापाशी नव्हते. तिला तर या सभेचा अंतर्गत उद्देशही ठाऊक नव्हता. पण आता तिला त्याची फिकीर नव्हती. अप्पाजींनी तीन दशकं अध्ययन करून काढून ठेवलेल्या टिपणांवर आणि गेली पाच वर्षं वाचून स्वत:शी लावलेल्या संदर्भातला प्रत्येक मुद्दा तिच्या लक्षात आला होता. तिच्या मनात धैर्य निर्माण झालं होतं. सगळ्या श्रोत्यांकडे एक स्पष्ट नजर टाकून, नजरेनंच प्रत्येकाची दखल घेतल्यावर तिचा आत्मविश्वास आणखी वाढला. स्पष्ट आणि धीट दृष्टिक्षेपही वादविवादामध्ये एक महत्त्वाचं हत्यार होऊ शकतं हेही तिला आठवलं. गोलमेजाच्या भोवताली बसलेल्यांवरून ठाम नजर फिरवत असताना... 'अरेच्चा! केव्हा आला हा! माझं लक्ष मंत्री आणि त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या प्रोफेसरांच्या भाषणावर केंद्रित झालं असताना केव्हा तरी आला असावा. आपल्या विषयात मग्न असल्यामुळेही तो आला तेव्हा तिकडे आपलं लक्ष गेलं नसावं. सभेची सुरुवात होऊन काही वेळानंतर हा आलेला दिसतोय.'

क्षणभर ती संकोचून गेली. त्याचबरोबर मन अधीर झालं. पाठोपाठ ती सावध झाली. 'यात अडकले तर माझी हार ठरलेली! तिला पायदळी तुडवून उभी राहिले तरच मी माझे विचार स्पष्टपणे मांडू शकेन.' डगमगणारी नजर तिनं त्याच्यावरच रोखली. आता मात्र आमिरचीच नजर डगमगत असल्याचं तिच्या लक्षात आलं. 'तोही दृष्टियुद्धात आपला पाडाव करायला धडपडतोय! पण आपण माघार घेता कामा नये, हार मानता कामा नये, कोलमडता कामा नये!' काही क्षण धडपड करून त्याची नजर समोरच्या मेजवर कोसळली आणि फायलीचा आधार शोधू लागली.

प्रोफेसरांनी मध्येच तिला थांबवत म्हटलं, "आपण आपला दृष्टिकोन सांगितलात. आभार! बेगम रझियांच्या या विचारांवर जर कुणाला काही टिप्पणी करायची असेल तर पुढे व्हावं."

आपलं बोलणं मध्येच अडवणाऱ्या प्रोफेसरांचा तिला राग आला. त्यांच्या चेहऱ्यावर मंद हास्य असलं तरी डोळ्यांमध्ये मात्र 'असले कितीतरी प्रसंग मी पेलले आहेत!' अशा अर्थाचा गर्व दिसत होता. त्यांची नजर एका ओळीत बसलेल्या, त्यांच्यासारखीच दाढी असलेल्या काही जणांवरून फिरली. ही मर्क्सिस्ट दाढी? की आधुनिक मुस्लीम दाढी? तिला तिच्या मुलाची, नझीरची दाढी आठवली.

गटातील एक दाढीवाला उठून म्हणाला, "नीट अभ्यास न करता एखाद्या धर्मावर आणि धर्म-गुरूंवर टीका करणारी व्यक्ती या आधी पाहिली नव्हती, असं नव्हे. पण एवढ्या महत्त्वाच्या सभेमध्ये अशा व्यक्तीला निमंत्रित करण्यासाठी कोण जबाबदार आहे, हेही कुणी सांगितलं तर मी त्यांचा कृतज्ञ राहीन."

उपस्थित केलेल्या प्रश्नावर चर्चा करायचं सोडून हा व्यक्तिगत आघात करण्याची वृत्ती तिरस्करणीय आहे, असं तिला म्हणावंसं वाटलं तरी तिनं स्वत:ला आवरलं. एवढ्यात त्याच्याशेजारी बसलेल्यानं विचारलं, "मॅडम, तुम्हाला फारसी भाषा येते? येत असेल तरी कुठल्या दर्जाची? कारण, आपण उल्लेख केलेला 'मासर-ई-आलम्गिरी' हा ग्रंथ फारसी भाषेत आहे."

"मला ती भाषा येत नाही. जदुनाथ सरकारांच्या अनुवादाचा मी आधार घेतला आहे."

तो विशिष्ट समूह खदखदून हसला. त्यातलाच एक जण म्हणाला, "जदुनाथ सरकारांसारख्या परंपरावाद्याला इतिहासकार मानता? काय म्हणावं तुम्हाला?" दुसरा म्हणाला, "मूळ भाषाच येत नसताना, अनुवादाचे संदर्भ देताय. काय म्हणावं तुम्हाला?"

तिनं पटकन विचारलं, “तुम्हाला ग्रीक येतं?”

“हा प्रश्न आता कशाला?”

“मूळ भाषा येत नसताना, इंग्लिश अनुवादावरून तुम्ही सगळे युरोपचा प्राचीन इतिहास समजून घेत नाही का?” ती म्हणाली. प्रश्नकर्ता चांगलाच गडबडला. त्याच्या पलीकडचा पुढे सरसावला.

“असा वाद-विवाद सुरू झाला तर सभेचं कामकाज पुढे कसं चालेल? शिवाय, एकाच व्यक्तीनं संपूर्ण सभेच्या वेळेवर आक्रमण केलं तर कसं चालेल? इतरांनी अभिप्राय केव्हा व्यक्त करायचे? या मॅडमनी एकट्यांनीच पाऊण तास गिळंकृत केला आहे. तीस सदस्यांपैकी प्रत्येकाला पाऊण तास म्हणजे एकूण साडेबावीस तास हवेत. एवढा वेळ आहे का? असला तरी अशा प्रकारे निरूपयोगी चर्चेत वेळ काढण्याची ही पद्धत योग्य आहे का? याबाबतीत अध्यक्षांनी हस्तक्षेप करावा.”

अध्यक्ष म्हणाले, “आता इतरांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. मिसेस रझिया कुरेशी यांना पुन्हा बोलण्याची संधी अवश्य मिळेल.”

“हा बोलण्याच्या संधीचा प्रश्न नाही, आदरणीय अध्यक्ष महाशय! पाया नीट भरून त्यावर बळकट इमारत उभी करण्याचा प्रश्न आहे हा!” ती तितक्याच जोरात अध्यक्षांना म्हणाली, “ऐतिहासिक व्यक्तींचं पुनर्चित्रण करण्याचं काम राजकारणी लोकं करताहेत. राजकीय सिद्धान्त तर यांच्या पाठीशीच उभे आहेत. इतिहासाची जबाबदारी न घेणारे साहित्यिक त्यांच्या गरजेनुसार इतिहासाची मोडतोड करून नाटकं-कादंबऱ्या लिहिताहेत. यावर काहीही भाष्य करायचा अधिकार या सभेला नाही, असं समजायचं काय?”

“कुठला विषय कुठे नेताय? उदाहरण देऊन बोला. तुमचा मुद्दा स्पष्ट होऊ द्या.” एक जण म्हणाले.

तिच्या उजवीकडे सहाव्या खुर्चीवर बसलेल्या एका स्त्रीनं विचारलं. स्लीव्हलेस ब्लाऊज– लाल साडी– गळ्यात मोठ्या मोठ्या लाल मण्यांची माळ. कोण? रझियाला ओळख पटली नाही. “जगातील अत्यंत प्रमुख धर्माच्या प्रेषिताच्या संदर्भात अनादराचे उद्गार काढणं कितपत योग्य आहे?”

“मी कुणाहीविषयी अनुदार शब्द उच्चारले नाहीत. उच्चारणार नाही. ऐतिहासिक सत्याचा शोध घेणाऱ्यांनी कुणाहीविषयी अनुदार दृष्टिकोन ठेवता कामा नये. मी ऐतिहासिक मुद्दाच मांडते आहे. प्रेषितांनी अरब देशांमध्ये काय केलं? त्यांची पहिली पत्नी खतिजा ही स्वत: कारवाचा व्यापार चालवण्याइतकं आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य असलेली स्त्री होती. तिनं स्वत:चा तिसरा नवरा स्वत:च निवडला आणि स्वत:हून पंधरा वर्षांनी लहान असलेल्या तरुणाशी लग्न केलं. ती जिवंत असेपर्यंत तिच्याशी एकनिष्ठ असलेल्या प्रेषितांनी त्यानंतर– म्हणजे त्यांच्या वयाच्या बावन्नाव्या वर्षांनंतर एकूण अठरा जणींशी लग्न केलं...”

आता ती गोलमेजाभोवतीच्या सगळ्यांकडे पाहत बोलत असली तरी तिची नजर आमिरवर रोखली होती. त्या एकट्यानंच आपल्या प्रश्नांचा भार सोसून उत्तर द्यावं, अशी अपेक्षा त्यात होती.

“...त्यानंतरच्या संपूर्ण मुस्लीम इतिहासात कुठल्या स्त्रीला अशा प्रकारे व्यापार करण्याचं आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य होतं? इस्लामपूर्व अरब देशांमध्ये काही स्त्री-दैवतांची पूजा केली जात होती. इस्लाममध्ये स्त्री-दैवताला स्थानच नाही. अल्लाह पुरुषच का असला पाहिजे, स्त्री का असू नये, हा प्रश्न विचारायचं धैर्य कुणामध्ये आहे? स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणारी कुणीही महिला हा प्रश्न का उपस्थित करत नाही? इस्लामच्या प्रभावामुळे भारतीय स्त्रीच्या परिस्थितीवर जे परिणाम झाले, त्याविषयी कुणीच का बोलत नाही? मुसलमान टोळ्या, आक्रमणखोर, नवाब, अधिकाऱ्यांनी हजारो स्त्रियांना काबूल, इराण वगैरे भागात नेऊन विकलं. राजस्थान, पंजाब आणि उत्तर भारतात सतीची पद्धत मोठ्या प्रमाणात प्रचलित झाली. इतकी की तीच एक परंपरा झाली. याविषयी कुणीही स्त्रीवादी का ‘ब्र’ही काढत नाही? आजही उत्तर भारतात रात्री विवाह लावण्याची पद्धत आहे. तिच्या उगमाकडे का कुणी पाहत नाही? प्रत्येक वाईट परंपरेला आपला

जुना-पुराणा धर्मच कारणीभूत आहे, असं पावसाळ्यातल्या बेडकांप्रमाणे डराव-डराव करून सांगणाऱ्या आमच्या बुद्धिजीवींना खरा इतिहास ठाऊक तरी आहे का? युरोपमध्ये यंत्रयुग आलं, त्यांनी मोठाली जहाजं बांधली आणि ते आपल्या धर्माच्या प्रचारासाठी नव्या नव्या खंडांचे शोध लावत निघाले. मुद्रणकलेचा शोध लावून ज्ञानप्रसार करू लागले. त्या वेळी संपूर्ण भारतावर मुस्लिमांचं राज्य होतं ना? देशातली सगळी संपत्ती आपल्या जनान्यावर उधळत ते केवळ भोग घेत आयुष्य जगत होते, देशातील स्थानिक लोकांचं धर्मांतर करत होते, त्यांची देवळंच नष्ट करत होते असं नव्हे, नालंदा-तक्षशीलासारख्या ज्ञानकेंद्रांनाही धुळीला मिळवत होते. विद्वानांना भोसकून ठार करत होते, देशोधडीला लावत होते. तिथली ग्रंथसंपदा जाळून खाक करत होते. भारताच्या मागासलेपणाचं खापर कधी काळच्या धर्मपरंपरेवर फोडून त्याचाच प्रचार करण्यापेक्षा गेल्या हजार वर्षांमध्ये हा देश सर्व अर्थानं पौरुषहीन करणाऱ्यांचा उल्लेखही का केला जात नाही? अकबरासारखा बलिष्ठ बादशहाही मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंना आणि समुद्रमार्गे व्यापार करणाऱ्या पोर्तुगीजांना सैन्याचं रक्षण देत होता. यावरून त्या वेळच्या परिस्थितीची कल्पना येत नाही काय? आपण आपल्या मुलाबाळांना कुठला इतिहास शिकवणं आवश्यक आहे?” म्हणत तिनं भोवताली पाहिलं.

कुणीही बोललं नाही. आमिरही आपल्या फायलींवर नजर खिळवून बसला होता.

ती पुढे म्हणाली, “तुमच्यापैकी काही जण तरी साहित्यिक आहोत. कुणी चित्रपट क्षेत्रातलं आहे, नृत्य-नाटक यासारख्या दृश्य कलाक्षेत्रंमधले आहात. खरं सांगा! कला, कलाकार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या संदर्भात या देशातील धर्माएवढा उदात्त धर्म दुसरा कुठला आहे का? कलेला पंचमवेद आणि कलेतून मिळणाऱ्या आनंदाला ब्रह्मानंद-सहोदर मानून, कलाकाराला ऋषितुल्य मानून गौरव करण्याची प्रथा आणखी कुठल्या धर्मात आहे? आपले देव, आपले आचार्य यांच्यावर आपण मोकळेपणानं टीका करू शकतो. त्यांची थट्टाही करू शकतो. हे स्वातंत्र्य इतर कुठल्या धर्मात आहे? युरोपमध्येही प्रचंड लढा देऊन, नवोदय काळात हे स्वातंत्र्य मिळवण्यात आलंय. इस्लाममध्ये तर याची कल्पनाही करणं अशक्य आहे. आपल्या परंपरेनं आपल्याला दिलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करून घेऊन आपले कलाकार आणि लेखक तीच परंपरा भस्मसात करायला निघाले नाहीत काय? या परंपरेच्या परिणामांची भयावह स्थिती ठाऊक असूनही ते का आत्मवंचनेमध्ये गुरफटले आहेत?”

बोलता-बोलता तिनं पुन्हा भोवताली पाहिलं. अंगात कसलासा संचार झाल्यासारखं तिला झालं होतं. श्रोत्यांमध्येही शांतता पसरली होती.

दाढीवाल्यांच्या रांगेतले सात-आठ जण उठून उभे राहिले. अध्यक्ष शास्त्रीही म्हणाले, “जेवायला पाऊण तास उशीर झाला आहे. मॅडम रझियांनी आपला दृष्टिकोन सवस्तिरपणे मांडल्याबद्दल आभार! जेवणानंतर एकेक करून प्रत्येकाला संधी दिली जाईल.”

दुपारच्या बुफे जेवणाच्या वेळी आमिर इतर कुणाकुणाशी गप्पा मारत आपल्याला चुकवतोय हे तिला स्पष्टपणे दिसत होतं. या सभेत त्याच्याही ओळखीचे बरेच जण होते. ती पाच वर्षांपासून ज्या चित्रपटसृष्टीपासून लांब होती, त्यात तो असल्यामुळे आणि त्याच्या डॉक्युमेंटरीज देशभर दाखवल्या जात असल्यामुळेही लोक त्याला ओळखत होते. तरीही तो आपली नजर चुकवून फिरत असल्याचं लक्षात येताच तिचं धैर्य आणखी वाढलं.

दुपारच्या सभेत सगळ्यांचा एकच सूर होता, “अध्ययन करायचं, तेच मुळी सामंजस्यासाठी, जुन्या कडवट भावना उराशी कवटाळून आज काय करायचंय? हिंदू-मुस्लीम हा भेद ब्रिटिशांनी मुद्दाम पेरलेला आहे. भारतातील जातीच्या उतरंडीला वैतागलेल्या दीन-दलितांनीच मुस्लिमांना बोलावून घेतलं. महंमद पैगंबरांचं मार्गदर्शन नसतं तर येथील दीन-दलितांचं जीवन नरकासारखं झालं असतं. मुस्लीम परकीय आक्रमणकर्ते असतील, तर आर्यही आक्रमणकर्तेच! ब्राह्मण तोंडापासून, क्षत्रिय बाहूपासून, वैश्य मांड्यांपासून आणि शूद्र पायांपासून निर्माण झाले ही प्रतिमा डोक्यात ठेवूनच भारतातील मूर्तिपूजेला सुरुवात झाली. मुस्लिमांनी केलेल्या मूर्तिभंजनामुळे खरा मार बसला तो उच्चवर्णीयांना! आता तेच लोक मुस्लिमविरोधी भावना पेटवताहेत. वगैरे वगैरे.”

"तुम्ही सांगताय ते खोटं आहे. जिझिया भरायला नकार देऊन कितीतरी उच्चवर्णीय अरण्यात निघून गेले आणि आदिवासी होऊन राहिल्याची कितीतरी उदाहरणं देता येतील. महाराणा प्रताप आणि त्याचे अनुयायी मोगलांकडून हरल्यानंतर, पुन्हा राज्य मिळेपर्यंत नगरात प्रवेश करणार नाही अशी शपथ घेऊन रानात राहिले. ते आजही गाडिया लोहार या नावानं राजस्थानात आहेत. त्या संदर्भात एक संशोधनपर ग्रंथही प्रसिद्ध झाला आहे." "आपल्या साम्राज्याचं समर्थन करण्यासाठी ब्रिटिशांनीच आर्यांना आक्रमणकर्ते म्हणायला सुरुवात केली." "आर्य आणि द्रविड अशी विभागणी करता येईल असा इथला समाज कधीच नव्हता..." अशा प्रकारची वाक्यं ती संधी मिळेल तेव्हा संदर्भानुसार बोलत होती.

एक जण बोलत असताना दुसऱ्यानं मधे बोलणं हे सभेच्या सभ्यतेला नाही, असा आक्षेप काही जणांनी घेतला. "स्वत:ला अतिशहाणी समजणाऱ्या या श्रीमतीजींना अध्यक्षांनी अडवलं नाही तर सभा कशी पार पडेल?" असा काही जण आरडाओरडाही करू लागले, "रझिया मॅडम! मला कठीण निर्णय घ्यावा लागेल. कृपया इतरांनाही त्यांचे विचार मांडू द्या." अध्यक्षांनी आवाज चढवला. ती गप्प बसली.

'एक गोष्ट स्पष्टच दिसत होती. विशिष्ट धोरणांना पाठिंबा देणाऱ्यांनाच इथे निमंत्रित करण्यात आलं आहे. माझ्याहीविषयी तसंच वाटल्यामुळे मलाही इथे बोलावण्यात आलेलं आहे. निमंत्रितांची नावं सुचवल्यापासून आणि त्यानंतर शेवटपर्यंत प्रोफेसरच या सभेचे ड्रायव्हर असणार आहेत. अप्पाजींच्या मृत्यूनंतर मी गावी जाऊन राहिले, कसलंसं अध्ययन करतेय, एवढंच त्यांना ठाऊक होतं. अध्ययनाचा विषय ठाऊक नसल्यामुळे, मी यांच्याच ब्रँडची जुनी बंडखोर महिला एवढंच डोक्यात असल्यामुळे यांनी माझं नाव या यादीत घातलं आहे. आता हे अडचणीत सापडले आहेत. एक तर माझे विचार, दुसरं म्हणजे नातं. माझा मुलगा पक्का शरियतप्रमाणे वागणारा. या कारणामुळे हे माझ्या संदर्भात एवढा संयम दाखवत आहेत. नाही तर यांनी अत्यंत अपमानकारक पद्धतीनं मला गप्प बसवलं असतं. पाच वर्षांमध्ये जे वाचलं, जे मनात चिंतन झालं, ते एकाच वेळी उफाळून बाहेर येईल, असं करणारी ही सभा होती, हे मात्र नक्की!

पण प्रोफेसरांनी विमानात गप्पा मारताना आमिरही या सभेला येत असल्याचं का मला सांगितलं नाही? की यांच्या नकळत मंत्र्यांनी काही नावं घातली असतील?'

ही या सभेला हजर असेल याची पुसटही कल्पना आमिरला नव्हती. समितीचा उद्देशही त्याला स्पष्टपणे ठाऊक नव्हता. राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात असलेल्या सभेला आपल्याला निमंत्रित करण्यात येत आहे, अशा अर्थाचं पत्र मंत्रलयाकडून आलं होतं. यामागे कोण आहे, हेही त्याला ठाऊक नव्हतं. 'प्रोफेसर शास्त्रींनीही तसा काही फोन केला नव्हता. अलीकडे त्यांचा फोनही नसतोच. आणखी एक निकाह केल्यामुळे त्यांच्या मनात माझ्याविषयी रागही असेल. म्हणूनच त्यांच्या मुलीच्या नझीरशी झालेल्या निकाहच्या वेळीही त्यांनी माझ्याशी संपर्क साधला नाही. आता मी तरी कशाला मुद्दाम विचारायला जाऊ? राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भातल्या डॉक्युमेंटरीज करायला सरकार माझी निवड करतेय. त्यामुळेही मला हे निमंत्रण पाठवण्यात आलं असावं.'

सभेत तिला पाहताच तो अस्वस्थ झाला होता. दोघांची कधीही, कुठेही भेट होणं शक्यच नाही, असं होणार नाही, हे समजत असूनही अशी भेट होईल याचीही त्याला अपेक्षा नव्हती. त्यामुळे अशा भेटीत आपण कशी प्रतिक्रिया द्यायची, यावरही त्यानं विचार केला नव्हता. 'ती आपल्या खेड्यात पुस्तकांच्या ढिगाऱ्यात गाडलेली, आपण बेंगळुरू आणि जवळपास चित्रपट निर्मितीच्या व्यवसायात गढलेले. त्यामुळे भेट व्हायचा प्रश्नच कुठे येणार नाही, अशा काहीशा समजुतीत तो होता. एकदा तिनंच फोन करून, 'तू आणखी एक निकाह केलास, म्हणून समजलं–' असं विचारलं होतं. त्या वेळी मीही 'तुला तलाक दिलेला नाही–' असं सांगून रिसव्हिर ठेवून दिला होता. त्या घटनेनंतर कसलाही संपर्क नव्हता. तशी शक्यताही नव्हती म्हणा! अतिशय मस्तवाल बाई! ही मस्ती? की आत्मसन्मान?

आजही तिनं ही सभा गाजवली. काही का असेना मस्ती किंवा आत्मसन्मान! विद्वान प्रोफेसर, हनुवटीवर दाढी ठेवणारे बुद्धिजीवी, बुद्धिमत्तेचं प्रदर्शन करण्याची एकही संधी न सोडणारे लांब दाढीवाले, खादीचा झब्बा आणि धोतर नेसणारे समन्वयवादी, केसांच्या दाटीत बोटभर शेंडी बाळगून कपाळावर गंधाचं बोट

लावणारे दोघे पंडित प्रोफेसर या सगळ्यांकडे तुच्छ दृष्टिक्षेप टाकून, शेवटी मी दिसल्याबरोबर शिकार सापडल्याचा आनंद व्यक्त करत तिनं माझ्यावरच दृष्टी फोकस केली. या सगळ्या डायरेक्शन-इफेक्टच्या गोष्टी आहेत असं मला त्याच वेळी का नाही समजलं? मी का तिची ती नजर टाळून संयोजकांनी दिलेल्या फायलींमध्ये दडवली? अशी नजर झुकवणं म्हणजे हार मानणं, हे त्या क्षणी मी का विसरलो? मी तसं केल्यामुळे ती आणखी जोरात बोलायला लागली. त्याच वेळी मीही तिच्याकडे दृष्टी टाकली असती तर तिचा बोलण्याचा जोर निश्चितच ओसरला असता! छे! चुकलंच!'

'दुपारच्या जेवणानंतर अध्यक्षांनी इतरांना बोलायची संधी दिली. तरीही ती प्रत्येक वेळी आपला मुद्दा मांडतच होती. सभेत कुणीही तिच्याइतक्या तयारीनिशी आलेलं दिसलं नाही. ती प्रत्येकाच्या बोलण्यावर प्रश्न उपस्थित करतेय! माझ्याकडे एकदाही मान वळवून पाहिलं नाही. मी काही बोललो तर मात्र ती शस्त्र परजत माझ्यावर चाल करून येईल. चलाख प्रोफेसर शास्त्रीनं मुद्दाम मला विचार मांडायला सांगितले तर ती माझ्याकडे वळेल. शिवाय मी कसलीही तयारी करून आलो नाही.'

आमिरला त्या सभेत बसायला नको वाटलं. वाटलं, हजेरी पुस्तकावर सही केली तरी पुरेसं आहे. तिसरे दिवशी सगळं मानधन हातात पडेल. कुणाच्याही लक्षात येणार नाही, अशा प्रकारे तो उठला. स्वच्छतागृहाकडे निघाल्यासारखं करून तो तिथून बाहेर पडला. एका टॅक्सीत बसून 'जनपथ हॉटेल' सांगितलं.

टॅक्सी हॉटेलच्या दिशेनं धावू लागली. प्रशस्त रस्त्यावरून धावताना मागे पडणारी झाडं, इमारती दिसू लागल्या.

'हिचं हे नेहमीचंच आहे. वाद-विवाद, भाषा, भाषेची योजना, कन्नड-इंग्लिश दोन्ही भाषा तितक्याच प्रभावीपणे वापरण्याचं हिचं कसब अवाक करतं. मी सूचना केली म्हणून नव्हे, ती आपण होऊन स्क्रीन-प्ले आणि डायलॉग्ज लिहू लागली. तिनं चित्रकथा लिहिली तर दिग्दर्शन किती सहजसुलभ होतं. फक्त चित्रकथा लिहूनही थांबत नाही. दिग्दर्शनातही 'हे असं नाही, तसं हवं' वगैरे सूचना करत असते. तिच्या त्या सूचनावजा वादांमधूनच मलाही नव्या नव्या कल्पना सुचतात. झुबेदामध्ये ही ताकदही नाही आणि ती कलाही नाही. मुख्य म्हणजे तेवढा आत्मविश्वासही नाही. उर्दू शाळांमध्ये शिक्षिका मुळात मिळत नाहीत. त्यामुळे ही आठवी पास असल्याचं सर्टिफिकेट सादर केल्यावर प्रायमरी शाळेमध्ये शिक्षिकेची नोकरी मिळाली, एवढंच! डोळे सोडून केसापासून पायांपर्यंत संपूर्ण शरीर झाकणारा काळा बुरखा, शाळेत गेल्यावर तेवढं चेहऱ्यावरचा पडदा बाजूला करायचं स्वातंत्र्य! शिवाजीनगर बसस्टँडच्या समोर छोटं फळांचं दुकान चालवणाऱ्या जनाब सत्तार साहेबांचं कुटुंब अत्यंत पारंपरिक असल्यानं बायको किंवा मुलींना त्यांनी एकदाही एकटं घराबाहेर पाठवलं नव्हतं. त्या घरातल्या कुणाही महिलेनं बुरखा घेतल्याशिवाय घराबाहेर पाऊल ठेवलं नव्हतं. मागच्या बाजूला राहणाऱ्या किस्सर अलीखाननी 'मुस्लीम मुलीशीच लग्न केलं असतं तर असं झालं नसतं. बीबी अशी सोडून गेली तर आपला समाज गप्प राहिला नसता. तुम्ही हिच्याशी निकाह करा. चांदीसारखी लखलखीत आहे' वगैरे सांगून पटवलं होतं. मी तरी एकटा किती दिवस राहू? शरीराची भूक आपल्या सर्व विचारांना नियंत्रित करत असते, हे अगदी खरंय! चित्रपट जगतात इथे-तिथे चरता आलं असतं. पण त्यातही अनेक समस्या होत्या. या जगात काहीही लपून राहणं शक्य नसतं. शिवाय या क्षेत्रातल्या प्रत्येकाचा माझ्याइतकाच रझियाशी परिचय होता. घरात बायको असली की सगळंच बघून घेते. वयानं लहान असेल तर माझंही तारुण्य पुन्हा माघारी येईल, असा विचार करून झुबेदाशी विवाह करायचा निर्णय घेतला.

पण पहिल्याच दिवशी लक्षात आलं. बेंगळुरूमध्ये जन्मून बेंगळुरूमध्येच वाढली असली तरी झुबेदाची बुद्धिमत्ता प्रायमरी शाळेत उर्दू शिकण्यापलीकडे वाढलेली नाही. आता हिच्याशी कसली देवाण-घेवाण करायची, या विचारानं मन निराश झालं. स्वयंपाक चांगला करते, घर नीट बघते, 'तुम्ही म्हणत असाल तर नोकरी सोडते' म्हणते, अंथरुण उबदार करते. पाच वर्षांची भूक शमतेय, असं वाटत असतानाच दिवस राहिले. का कोण जाणे, माझी मलाच शरम वाटली. बत्तीस वर्षांचा मुलगा आहे, नातवंडं खेळवायच्या वयात हे काय झालं? या वयात हे तान्हं मूल माझं आहे म्हणून सांगायचं? हे आपल्याला नको म्हटलं तर ती ऐकायला तयार नाही. आई व्हायची नैसर्गिक इच्छा तर होतीच, शिवाय कुटुंबनियोजन म्हणजे पाप ही भावना!

वडिलांची अकरा जिवंत आणि मेलेली पाच अशा सोळा मुलांचं उदाहरण जवळून पाहिलं होतं. जबरदस्तीनं गर्भपात करवण्याइतका कठोर नसल्यामुळे शेवटी मीच हरलो. जवळच राहणारी तिची भावंडं आमच्या प्रशस्त घरात येऊन राहू लागली. मोठं घर आणि आर्थिक संपन्नता हेरूनच हा गळ टाकला होता की काय? कारण दोघांच्या संसारासाठी दरमहा कितीही सामान आणलं तरी पुरेनासं झालं होतं. मनात हजार वेळा येऊन जायचं, "तुझ्या भावंडांनी आपल्या घरात पाऊल टाकता कामा नये" असं हिला बजावलं पाहिजे. एक-दोनदा सांगून पाहिलं तर म्हणाली, "तुम्ही दिवस-रात्री, वेळी-अवेळी शूटिंगसाठी घराबाहेर असता. मी एकटी घरात कशी राहू?" शिक्षणाचा अभाव असेल तिथे असली तंत्रं भरपूर वापरली जातात, हे मला ठाऊकच नव्हतं. तिला तलाक द्यायचा विचारही अनेकदा माझ्या मनात येऊन गेला असला तरी माझ्या मनात निर्माण झालेली दया, तिच्या पोटात वाढत असलेलं माझं मूल, यामुळे ते तितकं सुलभ नाही हेही लक्षात आलं. सुशिक्षित, सर्जनशील, आर्थिकदृष्ट्या नवऱ्यावर भार न टाकणारी, स्वत:च्या पायावर समर्थपणे उभी असणारी जीवनसाथी असेल तर सखा-सखी असल्याची भावना किती सुखद असते! रझियाची तीव्र आठवण होऊन कुणिगलजवळच्या त्या गावी जाऊन यावंसं तीव्रपणे वाटलं. जाऊन तिला सांगायचं, "मी काही तुला तलाक दिलेला नाही. किती केलं तरी आपण दोघं अजूनही नवरा-बायको आहोत. तू मल्लेश्वरम्च्या फ्लॅटवर राहा. मी जास्त काळ तुझ्याबरोबरच राहीन. निकाह केलेल्या चुकीसाठी तिच्या अन्न-वस्त्राची व्यवस्था करेन. तीही तशी चार पैसे मिळवतेच..." पण नाही. ती ऐकणार नाही. अजिबात ऐकणार नाही! पुण्याच्या फर्ग्युसन हिलवरील प्रणय प्रसंगापासूनच्या सहजीवनातील सगळ्या सुखद क्षणांची आठवण करून देऊन अनुनय करता येईल. पण 'हे सगळे स्क्रिप्टमधील डायलॉग्ज मीही लिहिले आहेत,' म्हणाली तर?...'

"साहब! जनपथ हॉटेल!" टॅक्सीवाल्यानं भानावर आणलं. खोलीत जाऊन एसी लावून झोपायचा प्रयत्न केला तरी झोप येईना. 'किती तीक्ष्ण नजरेनं माझ्याकडे पाहत होती! जेवणानंतर तेवढंच दुर्लक्षही केलं. बुद्धी असावी, सर्जनशीलता असावी, धैर्यही असलं पाहिजे; पण नवऱ्याविषयी थोडातरी नम्रपणा नको? त्यासाठी संस्कृती हवी म्हणायची. तीच नाही म्हटल्यावर काय उपयोग? या विचारासरशी थोडं बरं वाटलं. सभेला कोण कोण येणार आहेत ते न कळवता आलेल्यांना संकटात लोटणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांना फैलावर घ्यायला पाहिजे. पण फार मस्तवाल असतात हे सरकारी अधिकारी! म्हणतील, 'तुम्हाला बोलावलंय, यायचं तर या, नाही तर तसं कळवा. आम्ही इतर कुणाला बोलावलंय हे जाणून घेऊन तुम्हाला काय करायचंय?' अतिशय उद्धट जमात!'

रात्रीचे आठ वाजले तरी त्यानं उठून दिवा लावला नाही. पोटात भूक जाणवली. जेवायला म्हणून तो उठला. बार अँड रेस्तोरोंमध्ये गेल्यावर काहीतरी प्यायची इच्छा झाली. तशी त्याला रोज प्यायची सवय नव्हती. पण शारीरिक किंवा मानसिक दमणूक झाली असता एखाद-दुसरा पेग घ्यायची सवय होती. अशा प्रसंगी रझियाही कंपनी देत होती, त्याची आठवण झाली. त्या आठवणीसरशी त्याला स्वत:चाच राग आला. त्याच रागासरशी त्यानं मन झटकलं. जवळ आलेल्या बेअराला स्कॉच सांगितली आणि जेवणाचं मेनूकार्ड पाहू लागला. पोटातल्या स्कॉचला चिकनची साथ देऊन त्यावर आणखी थोडी स्कॉच ओतल्यावर त्याला हायसं वाटलं. शरीरात ताकद आणि मनात हिंमत जाणवू लागली. मेंदूही थोडा तल्लख झाला.

'आपण एकटे इथे उतरलेलो नसणार. इतरही सदस्यांची सोय याच हॉटेलमध्ये केलेली असेल. तिचीही! का चौकशी करू नये?' या विचारासरशी बिलाची पावती घेऊन तो स्वागतकक्षात गेला. चौकशी केली, "मंत्रलयाच्या मीटिंगसाठी आल्या आहेत. नाव रझिया बेगम. खोली नंबर किती?" रिसेप्शनिस्टनं शोधून सांगितलं, "रझिया बेगम कुरेशी. थ्री वन फोर."

'थँक्यू' म्हणून तो त्या रूमच्या दिशेनं निघाला. त्याची खोली टू वन फाइव्ह... म्हणजे याच्याच वरच्या बाजूला... खोली सापडली. बेल दाबून तो दारात उभा राहिला. अर्ध्या मिनिटातच दार उघडलं. तीच दारात उभी होती. डोक्यावरचे केस पूर्ण पांढरे झालेले. अंगावर अजूनही दिवसभर नेसलेली पोपटी रंगाची, काठा-पदराची साडीच होती. डोळ्यांना चष्मा. हातात एक तीनशे पानी पुस्तक. तो म्हणाला, "मी!"

"हं!" ती म्हणाली.

"तुझ्याशी बोलायचं होतं."

"आत यायला हरकत नाही." तिनं अनुमती दिली. तो आत आला. त्याला सोफ्यावर बसायला सांगून तिनं खोलीचं दार लावलं आणि आत येऊन त्याच्या समोरच्या सोफ्यावर बसली.

इतक्या सहज खोलीत प्रवेश मिळाल्यामुळे त्याचं आणखी धैर्य वाढलं. पण सुरुवात कुठून करावी हे त्याच्या लक्षात येईना. शिवाय आपण काय बोलायला इथे आलोय, हेही त्याला ठाऊक नव्हतं. तो म्हणाला, "रिसेप्शनिस्टला रझिया बेगम कुठल्या खोलीत उतरल्या म्हणून विचारलं, तिनं रझिया बेगम कुरेशी या रूमवर आहेत, म्हणून सांगितलं."

"हे मला सांगण्यात काही अर्थ आहे का?" तिनं विचारलं. तो प्यायल्याचं एव्हाना तिच्या लक्षात आलं होतं.

"तिनं माझी खोली विचारली नाही. ती बघितली असती तर तिनं विचारलं असतं, तुम्ही दोघं वेगवेगळ्या रूममध्ये का उतरलात?" म्हणत तो गर्भित हसला.

काहीही न बोलता तिनं त्याच्याकडे पाहिलं. पण आता त्याला तिच्या त्या नजरेची भीती वाटली नाही. आत्मविश्वासानं तिच्या नजरेत नजर मिळवून तो म्हणाला, "आपला खर्च करणाऱ्या सरकारचा अधिकारीही हा प्रश्न विचारू शकेल. ते असू दे, मला तर वाटतं, आपण एकत्र राहावं. निदान आजची रात्र तरी!"

"ओह! त्यासाठी हा सगळा डाव आहे तर!"

"यात डाव कसला? आपण नवरा-बायको आहोत."

"तुझा नवरा म्हणून असलेला हक्क तुला दाखवायचा आहे? कारण तू मला तलाक दिलेला नाहीस. तलाक न देता तसंच ठेवून घेतलंयस का?"

"करेक्ट! कधीही देणार नाही. अजिबात देणार नाही. तुझा आग्रह असेल तर झुबेदाला देईन. मला तू हवी आहेस! प्लीज!" म्हणत तो उठून तिच्यापाशी निघाला.

क्षणभर किळस आणि भय वाटलं तरी स्वत:ला सावरून ती म्हणाली, "आमिर, उठू नकोस! तिथेच बैस! आधी एक-दोन गोष्टींविषयी स्पष्टपणे बोललं पाहिजे." तो पुन्हा पूर्ववत कोचावर बसला. ती म्हणाली, "स्त्री पुरुषापेक्षा अगदीच शक्तिहीन असेल किंवा पुरुषाच्या हातात एखादं शस्त्र असून, तो ते वापरण्याचा धोका असेल तरच पुरुष स्त्रीवर अत्याचार करू शकतो, अन्यथा नाही. समबल अथवा थोड्या कमी शक्तिच्या स्त्रीवरही अत्याचार करणं ही अशक्य गोष्ट आहे. त्यातही प्यायलेल्या पुरुषाला तर ते अजिबात शक्य नाही. हवे तेवढे रेप-सीन तूही शूट केले आहेत, त्यामुळे तुला हे ठाऊक असायला हरकत नाही."

"मी काय तुझ्यावर रेप करायला आलोय? उगाच काहीतरी बोलू नकोस. तू माझी बीबी आहेस. मी तुला तलाक दिलेला नाही. तुझा आग्रहच असेल तर झुबेदाला इथूनच तलाक सांगेन. पण मला तू हवी आहेस." तो बडबडला.

"बायको असली तरी जबरदस्ती करायला कायद्याची संमती नाही. आपण वेगवेगळ्या खोल्या घेतल्या आहेत, यावरूनच माझी सहजीवनाला संमती नाही, हे सिद्ध व्हायला पुरेसं आहे. त्यामुळे तू माझ्या खोलीत अतिक्रमण केलं आहेस, अशी तक्रार मी करू शकते."

"पण मी रेप करायलाच आलोय, अशी का तू समजूत करून घेतली आहेस? नॉन्सेन्स!"

"तू पुन:पुन्हा तलाक दिला नाही म्हणतोयस. तुला मीही तलाक देऊ शकते."

"ते कसं? बाइला कुठाय तो अधिकार? थिऑरोटिकल विचारतोय."

"तलाकची पद्धत असलेल्या धर्मातून बाहेर पडायचा कायदेशीर अधिकार या देशात मला आहे की नाही? मी धर्म बदलून पुन्हा हिंदू झालेली आहे अथवा, माझा कुठलाच धर्म नाही असा सहीनिशी अधिकृत अर्ज देईन. पुरुष असो किंवा स्त्री आपला धर्म बदलला तरी आपलं लग्न ज्या धर्मानुसार झालं, त्या धर्माची बंधनं पाळली पाहिजेत, असा कोर्टाचा निर्णय झाल्याचं मलाही ठाऊक आहे. पण मी असताना आणखी एकीचा पत्नी म्हणून स्वीकार करून तू मला मन:ताप दिला आहे म्हणून सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन आवाज उठवेन. तुझ्या मनात आलं म्हणून एकाच वेळी चौघींशी लग्न करायचा हक्क तुला आपोआप मिळेल असं तुला वाटलं असेल, पण मी गप्प बसणार नाही. हा प्रश्न मी तडीस नेईन. मग तुझ्या इमेजचं काय होईल, याचा तूच विचार कर."

ती काय म्हणतेय ते सुरुवातीला त्याच्या लक्षात आलं नाही. जेव्हा लक्षात आलं तेव्हा त्याचा चेहरा खर्रकन उतरला. एकदम रितं-रितं वाटू लागलं. ती त्याच्याकडेच पाहत होती. थोड्या वेळानं तो उठून तिच्या शेजारी येऊन बसला. ती गप्प होती. तिचा हात हातात घेऊन त्यानं नि:श्वास टाकला.

"मी आणखी एक निकाह केला म्हणून तुला राग येणं स्वाभाविक आहे. पण तू नसतेस तेव्हा मी एकटा असतो, हे लक्षात घे!"

नाही म्हटलं तरी ती काही क्षण भावुक झाली. तरीही संयम राखत तिनं विचारलं, "आणखी एक लग्नच करायचं तर कुणी सुशिक्षित भेटली नाही? तुला बौद्धिक आणि भावनिकदृष्ट्या साजेशी?"

"आमच्यात स्त्रियांना शिक्षणाची संधीच नसते, हे तुलाही ठाऊक आहे. उच्चवर्गीयांमधल्या मुली भरपूर शिकतातही. पण ते कशाला त्या मुलीला दुसऱ्या निकाहसाठी, तेही माझ्या या वयात देतील?"

त्याच्या या बोलण्यावर तिला हसावं की रडावं, तेच कळेना. 'याला भोळेपणा म्हणावा, की विशिष्ट परिस्थितीत माझ्याकडून अनुकंपा मिळवण्यासाठी चाललेला बिलंदरपणा?' आपला हात धरलेला त्याचा हात दाबत ती म्हणाली, "झुबेदा नाव नाही का तुझ्या बेगमचं? तिलाच यानंतर शिकवायला सुरुवात कर. काही नाही! योग्य त्या शाळा-कॉलेजमध्ये पाठवून, वेगवेगळ्या शिक्षक-प्रोफेसरांचं मार्गदर्शन मिळालं तर आणखी आठ-दहा वर्षांत तीच तुला साजेशी बीबी होईल."

"तोपर्यंत मी सत्तर वर्षांचा होईन. मी कितीही धडपड करून शिकवायचं म्हटलं तरी तिच्या मनात शिकायची इच्छा हवी ना! तिच्या बुद्धीची पातळी तुला ठाऊक नाही."

'हेही खरंय म्हणा!' त्याच्या परिस्थितीविषयी तिच्या मनात अनुकंपा निर्माण झाली. ती खरोखरच अंतर्मुख होऊन विचार करू लागली. तीन-चार मिनिटं तशीच बसून राहिली. नंतर म्हणाली, "आणखीही एक गोष्ट लक्षात घे. आधुनिक शिक्षणाशिवाय कुणाचीही बुद्धी प्रखर होणार नाही. बायकांना फक्त धर्माचं ज्ञान दिलं तर कुठलीही स्त्री तुझ्यासारख्याची सहचरी होण्याच्या पातळीपर्यंत येऊ शकणार नाही. पण आधुनिक शिक्षण घेतलेली स्त्री समानतेची मागणी करणार. केवळ आर्थिक, सामाजिक आणि सहजीवनातच नव्हे तर धार्मिक पातळीवरही! मग ती प्रश्नही उपस्थित करू शकते. देव पुरुषच का असला पाहिजे? स्त्री का असू नये? हिंदू धर्मात पुरुष देवतांइतक्याच स्त्री देवता आहेत. पुरुष देवतांपेक्षा त्या अधिक शक्तिशालीही आहेत. महिषसुरासारख्या राक्षसाला ठार मारण्याची शक्ति तिला आहे. सगळे देव दुर्गेला शरण जातात आणि दुर्गा चामुंडी होऊन राक्षसांचा संहार करते, ती कथा ऐकली नाहीस का? मुस्लीम धर्माच्या स्थापनेआधी अरेबियामध्येही अनेक स्त्री-दैवतं होती. प्रवादी (स) यांनी त्यांच्यावर बंदी घालत अल्लाह नावाच्या पुरुष-दैवताला तेवढं शिल्लक ठेवलं. त्याऐवजी एका स्त्री दैवताला का शिल्लक ठेवलं नाही? स्त्रीवादी या प्रकारचे प्रश्न उपस्थित करतात. आणखी एक लक्षात ठेव. आधुनिक शिक्षण आणि विचारांना सामोरं जाणाऱ्याला स्त्रीवादी व्हावंच लागतं आणि ते होतातच. स्त्री तर प्रखर स्त्रीवादीच असते. वीसएक वर्षांपूर्वी घडलेली घटना सांगते, 'सीता अग्निपरीक्षा या घटनेला कथारूप दिलेला भाग बेंगळुरूच्या एका महिला साहित्य संमेलनात वाचून दाखवला होता. त्या कथेत तिनं लिहिलं होतं, राम जेव्हा सीतेला अग्निपरीक्षा करायला सांगतो, तेव्हा

सीता त्याला म्हणते, तर मग तूही माझ्याबरोबर अग्निप्रवेश कर. एवढ्या वर्षांत मी दूर असताना तू तरी माझ्याशी एकनिष्ठ होतास, याची काय खात्री? त्या वेळी मीही तिथे हजर होते. एक स्त्री उठून म्हणाली, सीतेने फक्त एवढंच म्हणून पुरेसं नाही, अग्निपरीक्षा कर म्हणणाऱ्या रामाला सीतेनं चार-सहा थोबाडीत मारल्या, असं लिहायला पाहिजे.' विसंगतीविरुद्ध आधुनिक महिलेचं मन किती तीव्र प्रतिसाद देतं, याचं हे एक उदाहरण म्हणून सांगितलं. आजच्या आमच्या स्त्री-लेखिका अहिल्या, द्रौपदी, सीता, मंदोदरी, कुंती या सर्व पात्रांना धगधगत्या अग्निरूपात चित्रित करतात, हे तुलाही ठाऊक आहेच. ठाऊक आहे की नाही? बोल!"

काही क्षणांच्या शांततेनंतर त्यानं हुंकार दिला. ती पुढे म्हणाली, "तुझ्या धर्मातल्या स्त्रियांना आधुनिक शिक्षण दिलं तर त्याही असा प्रश्न उपस्थित करतील. पुनरुत्पादनासाठी स्त्री-पुरुष दोघंही तितकेच महत्त्वाचे नाहीत का? त्यातही एकाचं स्थान महत्त्वाचं आणि दुसऱ्याचं गौण कसं असाही प्रश्न उपस्थित करतील. त्या वेळी देव पुरुष असला पाहिजे की स्त्री, यावरही पुनर्विचार करायची पाळी येईल. गेली पाच वर्षं मी वाचतेय. त्यात थोडाफार वेदान्तही वाचतेय मी. त्यानुसार परमतत्त्व असलेलं ब्रह्म स्त्रीही नाही आणि पुरुषही नाही. ईश्वर हेही त्याचीच एक बाजू आहे. त्यातल्या शक्तिपासून जग निर्माण होतं. आणि ती शक्ति स्त्री-रूपी आहे. तिच्यामुळे हे जग आहे. त्यामुळे आपण तिला कधीही विसरता कामा नये. याचाच अर्थ, देव हे स्त्रीरूपच आहे आणि त्यापलीकडचं जे काही आहे ते लिंगातीत आहे. भाषा, शब्द, भावना याद्वारे आपण प्रार्थना करायची ती या स्त्रीरूपी देवतेची! दैवताच्या पुरुष रूपाचं अस्तित्व या स्त्री देवतेवर आधारित आहे. राणी मधमाशीची सेवा करणाऱ्या कष्टकरी मधमाशांसारखं! जिज्ञासा अध्यात्माच्या पातळीवर पोहोचली तर प्रत्येक स्त्रीवादी व्यक्ती अशा प्रकारे वेदान्ती होते. शिवाय स्त्री आणि पुरुष हा भेद केवळ प्रकृतीच्या पातळीवरचा आहे. आत्म्याच्या पातळीवर पोहोचलं तर लिंगभेद नाही, असंच वेदान्तही मानतो. असला वेदान्त मानायला तुझ्या धर्मातले लोक मान्यता देणार आहेत काय? सांग ना! देतील?"

ती बोलायची थांबली. त्यानं काहीच उत्तर दिलं नाही. तिनं वळून त्याच्याकडे पाहिलं. त्याच्या डोळ्यांमध्ये तुडुंब झोप भरली होती. आधीच दारुचा अंमल, त्यात झोप! आपण एवढा वेळ एवढ्या गंभीरपणे आणि कळकळीनं बोललो, ते याच्या कानांमधून आत गेलंच नसावं, असं तिला जाणवलं. एवढं मनापासून बोललेलं सगळं निरर्थक झालं, या विचारानं तिला खेद वाटला.

बसलेला आमिर तिच्या अंगावर कलला. असंच सोडलं तर हा शेजारच्या अंथरुणावर कलंडेल, हे लक्षात येऊन ती उठली. त्याचे दोन्ही दंड धरून हलवत जागं करू लागली, "आमिर! आमिर! तुला झोप आलीय. चल तुझ्या खोलीवर पोहोचवून येते. रूम नंबर किती?"

तो नुसतंच 'अं?' म्हणाला. तिनं त्याच्या खिशात हात घालून पाहिलं. खोलीची चावी सापडली. टू वन फाइव्ह. त्याचा दंड धरून ती त्याला खोलीबाहेर घेऊन आली. फक्त दंड धरून त्याला चालवणं कठीण वाटून ती इकडे तिकडे पाहत असताना तिसऱ्या मजल्यावरचा हॉटेलचा माणूस दिसला. तिनं त्याला जवळ बोलावलं, खोलीची चावी देऊन सांगितलं, "यांना त्यांच्या खोलीत नेऊन झोपवा." त्यानं आमिरचा दंड धरून लिफ्टच्या दिशेला नेलं.

हॉटेलच्या माणसानं आमिरचा दंड पकडून त्याला लिफ्टमधून घेऊन जाईपर्यंत दारात उभी राहून ती खोलीत येऊन पडली, तरी तिला झोप आली नाही. संपूर्ण दिवसभर चाललेल्या चर्चासत्रानं तिची मन:शांती ढळली गेली होती. आता शोधत खोलीपर्यंत आलेल्या आमिरच्या भेटीमुळे त्यात प्रचंड लाटा उठल्या होत्या. 'आपल्यावरच्या रागापोटी हा दुसरं लग्न करायला निघाला. पण या वयाच्या माणसाला आणखी कशी मुलगी भेटणार म्हणा!' या विचारासरशी तिला थोडं बरंही वाटलं. 'आपण एकटा असल्याचं मोकळेपणानं त्यानं व्यक्त केलं. त्यानं व्यक्त केलं, आपण केलं नाही तरी एकट्याच आहोत. मी सांगितलं तर तो तिला लगेच तलाक देऊन निघून येईल. या विचारासरशी काही क्षण समाधान वाटलं. पण लगेच मन सावध झालं. स्वत:च्या स्वार्थासाठी त्या धर्मातील एका अनिष्ट परंपरेचा आधार घेऊन मी वागले तर, त्यावर टीका करायला नैतिक आधार मला कसा राहील? शिवाय, एवढं सगळं घडून गेल्यानंतर मला त्याच्याविषयी प्रेम वाटतंय का, हेही तपासून पाहायची वेळ आली आहे.' मनानं लगोलग नकारात्मक कौल दिला. या सर्व भावनिक चढ-उतारांमुळे पहाटेपर्यंत झोप लागली नाही.

सकाळी उठून अंघोळ-नाश्ता उरकून सभेच्या ठिकाणी जात असताना वाटेत ‘औरंगजेब रोड’ नावाचा मोठा रस्ता दिसला. तिला आश्चर्य वाटलं. ‘गंमत आहे! या महानगरात एका रस्त्याला अकबर बादशहाचं नाव ठेवलंय. पण ज्यांना उजाडताच आठवावं, अशा आदर बाळगण्याजोग्या व्यक्तींमध्ये औरंगजेबाचाही समावेश? याचा काय अर्थ? स्वतंत्र भारताची कुठली भूमिका यातून व्यक्त होतेय? इतिहासकाळातील सगळ्या व्यक्तींना आपण समान नजरेनं पाहतोय, हे धोरण व्होट बँकेच्या छुप्या हेतूमुळे स्वीकारलं आहे की काय? की विकृत मनोवृत्तीचं हे लक्षण आहे? हे राजकारणी, मेलेल्या रावणाला रामाप्रमाणे आणि दुर्योधनाला धर्मरायाप्रमाणे पाहू शकणाऱ्या व्यास-वाल्मीकींच्या पातळीचे तर निश्चितच नाहीत. औरंगजेब हे एक ऐतिहासिक वास्तव आहे. जर त्याला आपण इतिहासातून पुसून टाकू शकत असू तर पाठ्य-पुस्तकातले त्याच्या कर्तृत्वाचे धडे कसे काढून टाकता येतील?’ आजच्या सभेत काहीतरी करून हा प्रश्न उपस्थित केलाच पाहिजे.

ती चर्चासत्राच्या जागी वेळेपेक्षा आधीच येऊन पोहोचली होती. ‘नाही तरी दिल्लीत आलेय. एक दिवस थांबून लालकिल्ला, जुम्मा मशीद, तुघलखाबाद, हुमायूनची कबर वगैरे मुस्लीम स्मारकं पुन्हा एकदा सविस्तरपणे पाहिली पाहिजेत. त्यामुळे मी लिहिलेल्या कादंबरीतले बारकावे तपासून पाहायला मदत होईल.’

याच विचारात ती बाहेर उभी असताना एक पन्नाशीचे गृहस्थ तिच्यापाशी आले.

“मी डॉक्टर राजदान. अलाहाबाद विद्यापीठात इतिहासाचा रीडर आहे. कालचे तुमचे मुद्दे फर्स्टक्लास! तुम्ही खऱ्या मर्द!” ते म्हणाले.

“आत्ता असं म्हणताय. पण काल सभेत का मला पाठिंबा दिला नाही?” तिनं स्पष्टपणे विचारलं.

“तुम्हीच सांगितलं ना, मुस्लीम राजवटीनं संपूर्ण भारताला शिखंडी बनवलं, म्हणून?” म्हणत ते स्वत:च्या विनोदावर स्वत:च हसले. नंतर तळहातावर तंबाखू, चुना, जर्दा ठेवून, तो बोटानं मळून तोंडात सारला. “तुमचं नाव रझिया बेगम. पण तुम्ही जन्मानं मुस्लीम नाही. होय ना?”

“कशावरून?”

“जन्मजात मुस्लिमांना तुम्ही व्यक्त केलेले ते विचार सुचणंच शक्य नाही. लव्ह मॅरेज करण्यासाठी तुम्ही धर्म बदललाय. पण नंतर तुमचं दोघांचं पटलं नाही. होय की नाही? वैयक्तिक विषयावर बोलतोय, रागावू नका.”

‘तुम्हाला हे कसं ठाऊक, प्रोफेसरांनी सांगितलं का, म्हणून विचारलं तर मी हे मान्य केल्यासारखं होईल.’ या विषयावर ती विचार करत असताना खास कारमधून प्रोफेसर आणि खात्याचे सेक्रेटरी येऊन उतरले. डॉक्टर राजदानांनी पुढे होऊन प्रोफेसरांना जवळ बोलावलं. सेक्रेटरी पुढील व्यवस्था पाहायला हॉलमध्ये निघून गेले. राजदान म्हणाले, “सर, मला हस्तसामुद्रिकाची आवड आहे. थोडा फार अभ्यासही आहे. आर्थिक अपेक्षा न ठेवता सांगत असल्यामुळे माझं भविष्य नव्वद टक्के बरोबर येतं. आपला शुभहस्त पाहायची संधी देऊन मला उपकृत कराल काय?” बोलता बोलता त्यांनी त्यांचा उजवा हात हातात घेतला. प्रोफेसरांनीही विरोध केला नाही. त्यांनी आपला उजवा तळहात राजदानांसमोर धरला. चष्मा नीट करून त्यांनी प्रोफेसरांचा हात निरखून पाहायला सुरुवात केली. नंतर म्हणाले, “एकाच नव्हे, वेगवेगळ्या दृष्टीनं पाहिलं तरी तात्पर्य तेच निघतंय. तुम्हाला एवढ्यात अत्युच्च पातळीवरचा एखादा पुरस्कार, एखादा सन्मान मिळणार आहे. आपल्या देशात अत्युच्च पुरस्कार म्हणजे भारतरत्न नाही का!”

प्रोफेसरांचा चेहरा खुलला.

आता डॉक्टर राजदानांच्या चेहऱ्यावर मंद हसू उमटलं. तंबाखूची पिंकही न कळत ओठांबाहेर आली. पण त्याची फिकीर न करता ते पुन्हा लक्ष देऊन तळहात पाहू लागले. तिच्या लक्षात आलं, यांना हात बघून भविष्य कळतं की नाही कोण जाणे! पण चेहरा बघून भविष्य सांगण्यात हे पारंगत दिसतात!

त्या संध्याकाळी संधी बघून त्यांनी तिलाही विचारलं, “मॅडम, तुमचा हात बघू?”

“भविष्याविषयी काही अपेक्षा असणाऱ्यांना ज्योतिष्याचा आधार लागतो. मला त्याची गरज नाही. माझ्याविषयी तुम्ही मांडलेले अंदाज अगदी बरोबर आहेत. त्यासाठी तुमचं अभिनंदन!”

यावर ते खदखदून हसले आणि म्हणाले, “यात माझ्या अंदाजाचं काहीही नाही. तुमच्याविषयी आपल्यापैकीच कुणीतरी बोलत होतं, ते माझ्याही कानांवर आलं होतं. एके काळच्या तुम्ही आधुनिक महिला! तुम्ही धर्म बदलून विवाहबद्ध झाल्याचं इथे काही जणांना ठाऊक होतं. प्रोफेसर शास्त्रींनी तुमचं नाव सुचवलं होतं. त्यांच्या विचारांना तुम्ही अनुमोदन द्याल, या अपेक्षेनं त्यांनी तुम्हाला निमंत्रण दिलं, तर तुम्हीच त्यांच्यावर उलटलात. केवळ शास्त्रींनाच नव्हे, मंत्र्यांनाही आश्चर्य वाटलं आहे. कारण इथल्या सभेचा अहवाल दोनदा मंत्र्यांपर्यंत जातो ना! मंत्र्यांनी प्रोफेसरांना बोलावून ‘तुम्ही सुचवलेली मुस्लीम स्त्री असं का बोलतेय?’ म्हणून कानउघडणी केली तेव्हा प्रोफेसरांनीच हे सारं सांगितलंय.”

ही सभा बोलवण्यामागे कोण आहे आणि त्यामागचा त्यांचा हेतू काय आहे, याविषयी आता तिच्या मनात कसलीच शंका राहिली नाही. वाद घालण्यात अर्थ नाही हे स्पष्टपणे कळत असतानाही ती अधूनमधून ठाऊक असलेले ऐतिहासिक संदर्भ देत होती. “आजच्या नव्हे, त्या काळच्या त्यांनीच सांगितलेल्या गोष्टींकडे डोळेझाक करणं अवैज्ञानिक आहे”, “इतिहासातलं सत्य उघड्या डोळ्यांनी जाणून घेऊन स्वीकारल्याशिवाय इतिहासातून धडाही मिळत नाही”,“मनुनं केलेल्या चुका लक्षात आल्यावर गेल्या शंभर वर्षांत त्या सुधारण्याचे प्रयत्न होत नाहीत काय? दलित आणि मागासलेल्या समाजाला आरक्षण उपलब्ध करून देऊन, त्यांच्याशी अपमानास्पद वागणाऱ्यांना योग्य ती शिक्षा करून, त्यांना देवळात प्रवेश देऊनच नव्हे तर त्यांची पुजारी म्हणून नेमणूक करण्याचे प्रयत्न करत सगळा समाज ती चूक सुधारण्याचा प्रयत्न करतोय ना? अशाच प्रकारे सुधारणा घडवून आणण्याची संधी मुस्लीम समाजात का उपलब्ध करून देत नाही? आणि सुधारणा व्हायच्या असतील तर आधी चुकांची जाणीव व्हायला नको का? इतिहासाचं सत्यदर्शन झाल्याशिवाय या सुधारणा कशा होतील...?” वगैरे बोलतच राहिली.

मध्येच एक गुळगुळीत दाढी केलेले प्रोफेसर म्हणाले, “तुम्ही म्हणताय तसं मुस्लीम राजे-बादशहा वागले ते खरंय असं मान्य केलं, तरी त्या कारणासाठी आजच्या आपल्या मुस्लीम बांधवांचा द्वेष करून समाजातलं वातावरण कलुषित करून राष्ट्राचं काय हित साधणार आहे?”

तिनं पटकन उत्तर दिलं, “कुणाचा तिरस्कार करणं, हेटाळणी करणं, मन कलुषित करणं हा इतिहासाचा उद्देश कधीच नसतो. असता कामा नये. आपल्या आधी होऊन गेलेल्यांच्या चुका डोळसपणे समजून घेऊन आपण आजचं जीवन शक्यतो, निदान त्या दोषांपासून तरी मुक्त करून घेतलं पाहिजे. म्हणूनच, ऐतिहासिक सत्याला कुठलाही रंग न देता, थेट त्याकडे पाहण्याचा प्रामाणिकपणा हवा. पण तुम्ही त्यांना तशी संधीच देत नाही. मागे होऊन गेलेल्या मुस्लीम राजांच्या वागणुकीला आजचे मुस्लीम जबाबदार नाहीत, हे अगदी खरं आहे. पण आपल्या पूर्वजांनी केलेल्या चुकांची प्रांजळपणे जाणीव करून घेऊन त्यांची जबाबदारी नाकारायची नसेल तर याचा अर्थ, आपण त्या चुकांचं समर्थन करतो, असाच होतो. अगदी अलीकडच्या काळात कोरियामध्ये आपल्या लोकांनी केलेल्या अन्यायाची जबाबदारी जपाननं स्वीकारली, याचा अर्थ काय? नाझींनी मानवतेविरुद्ध जी हीन कृत्यं केली, त्यासाठी जर्मन माणसांनी पश्चात्ताप व्यक्त करून, यानंतर कधीही अशी घटना घडणार नाही, अशी शपथ घेतली नाही का? आपल्या पूर्वजांनी केलेल्या चुकांना आपण जबाबदार नाही. आम्ही वेगळे आहोत, हेच त्यांनी त्या शपथेतून सांगितलं. भारतीय मुस्लीम समाजाला अशा नैतिकतेनिशी विस्तार पावण्याची तुम्ही संधीच देत नाही. इतिहासातील सत्याचा प्रामाणिकपणे स्वीकार करण्याचं धैर्य असेल तर आपण पुन्हा त्या ऐतिहासिक चुका करणार नाही. मनुनं केलेल्या चुका हिंदू समाजानं प्रांजळपणे स्वीकारल्या. तीच प्रांजळता याही समाजानं दाखवली, आपणही त्यांना त्यासाठी मदत केली तर समाजातील भ्रातृत्व, एकता यासारखे राष्ट्रीय ऐक्यासाठी आवश्यक असलेले गुण अधिक दृढ होतील आणि राष्ट्राच्या ऐक्याचा पाया अधिक भक्कम होईल, असं नाही का वाटत?”

“तुमचे विचार इतरांनी ऐकून घेतले आहेत. आता त्यांच्या बोलण्यात अडथळे न आणता त्यांना त्यांची मतं

मांडू द्या," अशी अधून-मधून विनंती अध्यक्ष महाराज करतच होते. त्यांची मुलगी नझीरची बेगम नसती तर एवढ्या अवधीत यांनी आपल्याला सभेबाहेर काढले असते, हे ठाऊक असल्यामुळे तीही न थांबता मध्ये मध्ये आपले विचार मांडत राहिली.

गावी परतल्यावरही तिच्या डोक्यात तेच विचार घोळत असल्यामुळे तिनं पुन्हा एकदा त्या संदर्भातले ग्रंथ आणि टिपणं चाळली. त्या संदर्भ-ग्रंथांची सूची करायला सुरुवात केली. पुढची सभा बोलावली जाईल तेव्हा या ग्रंथ-सूचींची एकेक प्रत प्रत्येकाला द्यायची, असं तिनं ठरवलं. महिन्याभरानं डॉक्टर राजदान यांच्याकडून एक पत्र आलं, "मॅडम रझिया यांना सलाम. पुन्हा एकदा तुमच्याशी भेट होण्याची संधी आली, याचा मला आनंद झाला आहे. याच महिन्याच्या चोवीस-पंचवीस-सव्वीस तारखांना होणाऱ्या दुसऱ्या सभेला तुम्ही येताय ना? इतिहासाच्या संदर्भात तुमच्याशी बरंच काही बोलायचं आहे. तुमची प्रकृती चांगली असेल, ही अपेक्षा!"

'अरेच्चा! आपल्याला निमंत्रणच आलेलं नाही. राजदानना निमंत्रण पोहोचल्यावर त्यांनी लिहिलेलं पत्र इथे येऊन पोहोचलं, तरी?' तिला आश्चर्य वाटलं, पण लवकरच त्याचा अर्थ लक्षात आला. तिच्या जिवाची तगमग झाली. 'सत्यमेव जयते ' हे घोषवाक्य असलेल्या या देशात चालणारे कसले हे डावपेच!

दोन आठवडे गेले तरी मन दुखावलेलंच होतं. त्याचबरोबर दुसऱ्या सभेत काय-काय घडलं, ते समजून घ्यायची इच्छाही झाली. डॉक्टर राजदानना पत्र लिहून विचारावं असा एक मार्गही दिसला. त्यांना सगळं सांगण्यात काहीच हरकत असायचं कारण नव्हतं, पण पत्रात लेखी लिहून ते सापडणार नाहीत. फोन केला तर मात्र कदाचित ते मोकळेपणानं बोलतील. मागील भेटीत त्यांनी दिलेलं व्हिजिटिंग कार्ड तिनं शोधून काढलं. त्यात त्यांच्या घरचा फोन नंबरही होता. देशातल्या प्रत्येक गावी फोनची सोय करून देण्याविषयी हल्ली सरकार घोषणा करतंय, इथे कधी येणार आहे कोण जाणे, म्हणत ती सकाळची बस पकडून कुणिगलला गेली. फोनवर भेटलेल्या राजदाननी विचारलं, "रझियाजी! तुमच्यामुळे भारताच्या इतिहासाला नवी दिशा मिळाली. अभिनंदन!" सहिष्णू

"म्हणजे काय? जरा नीट सांगाल तर बरं होईल."

"एक मिनिट! फोन ठेवू नका. तंबाखू थुंकून येतो..." त्यांनी रिसव्हिर ठेवल्याचा आवाज ऐकू आला. काही क्षणांत पुन्हा आवाज ऐकू आला, "मुस्लीम राजांना धर्मांध म्हणणं म्हणजे 'जातीयवादी!' आलं का लक्षात? अवतरणचिन्हात जातीयवादी! इतिहासकार औरंगजेबाला जातीयवादी राजा मानतात ना? तो धर्मांध नव्हता, उलट धर्मसहिष्णू राज्यकर्ता होता, असं चित्रण करणारे दहा-पंधरा संशोधन-लेख, चार-सहा संशोधन-ग्रंथ लवकरात लवकर लिहून प्रकाशित करावेत असा सभेत निर्णय घेतला गेला आहे. आणखी एक-दोन वर्षांत औरंगजेबाचं चित्रण पूर्णपणे बदलून जातं की नाही ते पाहा हवं तर! काशी-विश्वनाथाची कथा कशी वाढणार आहे, ठाऊकाय? औरंगजेब बंगालला निघाला होता. सोबत कितीतरी हिंदू राजे होते. त्यांच्याबरोबर त्यांच्या राण्याही होत्या. बनारसजवळ आल्यावर त्यांनी विश्वनाथाच्या पूजेची संधी मिळावी, अशी बादशहापाशी विनंती केली. धर्मसहिष्णू बादशहानं त्यांना त्यासाठी परवानगी तर दिलीच, त्याचबरोबर त्यांच्या रक्षणासाठी बनारसच्या पाच मैल रस्त्यावर सैन्याचीही नेमणूक केली. गंगेमध्ये स्नान करून सगळ्या राण्यांनी विश्वनाथ देवालयात पूजेसाठी प्रवेश केला. पूजा झाल्यावर एक वगळता सगळ्या राण्या मागे वळल्या. ऐकताय ना, रझियाजी?"

"होय. ऐकतेय, बोला तुम्ही!" ती मोठ्यानं म्हणाली.

"तुम्ही मध्ये-मध्ये हं-हं म्हणा. नाही तर मला पुढे सांगायला जमत नाही. मागे राहिलेल्या राणीचा देवालयाच्या काना-कोपऱ्यात शोध घेतला तरी सापडली नाही. बातमी समजताच बादशहा भडकले. तिला शोधण्यासाठी त्यांनी आपल्या उच्च अधिकाऱ्यांना पाठवून दिलं. त्यांनी कसून तपासणी केली, सगळ्या मूर्ती हलवून पाहिल्या. एका कोनाड्यात गणेशाची मूर्ती जागेवरून ढळल्याचं लक्षात येताच त्यांनी ती हलवली तर मूर्तीच्या मागे पायऱ्या दिसल्या. त्या उतरून तळघरात जाऊन पाहिलं तेव्हा त्या राणीवर बलात्कार झाल्याचं दिसलं. ती रडू लागली. ते तळघर विश्वनाथाच्या खालच्या बाजूलाच होतं. हे पाहून सगळ्या हिंदू राजांनी

बादशहापाशी अपराध्याला शिक्षा झालीच पाहिजे, असा आग्रह धरला. पवित्र स्थळ अपवित्र झाल्यामुळे तेथील पवित्र शिविलिंग तिथून हलवून देवालय भुईसपाट केलं. तिथले पुजारी बदलले. देवालय आणि देव यासंदर्भात अत्यंत शुद्ध आचरणाचा पराकोटीचा आग्रह असलेल्या बादशहांनी अशी भूमिका घेणं समर्थनीय आहे. त्या काळीही हिंदू धर्माची किती अधोगती झाली होती, हे यावरून लक्षात येईल. आलं ना लक्षात? नव्या इतिहासकारांनी या दृष्टीनं आपलं संशोधन मांडावं असं परवाच्या सभेत ठरलं...”

मध्येच लक्ष्मी म्हणाली,“अपवित्र झालं म्हणून देऊळ भुईसपाट करणं योग्य, असं म्हणायचं असेल तर त्या अपवित्र जागी, त्याच अपवित्र देवळाच्या भिंती आणि खांब वापरून बादशहानं पवित्र मशीद, एवढ्या धर्मनिष्ठ बादशहानं कशी काय बांधली? मथुरेच्या केशवराय मंदिरात कुठलं अपवित्र कार्य घडलं? उदयपूरच्या राजवाड्यापुढचं देऊळ, उदयसागराच्या काठावरची मूळची देवळं, उदयपूरच्या भोवतालची एकशे बत्तीस देवळं, चित्तूरची बासष्ट देवळं, अंबेरची सहासष्ट अशी कितीतरी देवळं औरंगजेबानं नष्ट केली असं मासिर-ई-आलमगिरीमध्ये आहे. त्या सगळ्या देवळांसाठी कुठली कथा निर्माण करणार आहेत?”

“प्रत्येक देवळासाठी वेगवेगळी कथा निर्माण करतील. सरकारकडे मुबलक पैसा आहे. आपण सांगू तसा इतिहास लिहिला गेला पाहिजे असा आग्रह असेल तर हव्या तितक्या कथा निर्माण करता येतील. नाही का?”

“तर मग, तुम्ही हे सगळं खोटं आहे, असं म्हणून सभेत विरोध नाही केला?”

“ह्या सगळ्या सभेच्या चर्चेत घडणाऱ्या गोष्टी नाहीत, मॅडम! सभा संपल्यावर आतल्या गोटातली माणसं अशा प्रकारचे काही निर्णय घेतात आणि नंतर तीच अधिकृत घोषणा असल्याप्रमाणे हलकेच वातावरणात सोडून देतात. मीही त्यांच्यापैकीच एक असं समजून माझ्यापुढे त्यांची चर्चा चालली होती. मीही स्कॉच घेतो ना! त्याचा एक चांगला आडोसा असतो!...” ते हसत म्हणाले.

१६

राष्ट्रीय एकात्मतेवरील सभेविषयी वृत्तपत्रांमध्ये बातम्या आल्या. इंग्लिश वृत्तपत्रांनी प्रोफेसरांच्या बीजभाषण आणि समारोपाच्या भाषणाचा गोषवारा सांगणारा एक मोठा लेख छापला होता. सभेमध्ये व्यक्त झालेल्या विचारांची नोंदही इंग्लिश आणि कन्नड वृत्तपत्रांनी घेतली होती. पण त्यात कुठेही तिचं नाव आणि तिनं व्यक्त केलेल्या विचारांचा उल्लेखही नव्हता. एकाही वृत्तपत्रात नाही! 'संपूर्ण मानवकुल एकच आहे' या प्रवादी महंमदांच्या उपदेशाला अनुसरून राज्यकारभार केलेल्या मुस्लीम राज्यकर्त्यांची निंदा करणारे, ब्रिटिशांच्या धूर्तपणाला बळी पडलेले आमचे काही इतिहासकार, शतकानुशतकं बंधुप्रेमानं वागत आलेल्या भारतीयांना जो खोटा इतिहास सांगताहेत, तो पूर्णपणे निपटून काढल्याशिवाय आपल्या देशामध्ये ऐक्य साधणं शक्य नाही... हेच सगळ्या वृत्तपत्रांनी आणि सगळ्या लेखकांनी, संपादकीयांनी, वाचकांनी लिहिलं होतं. या देशाला कुठल्या बौद्धिक रोगानं पछाडलंय, या विचारानं ती चिंताक्रांत झाली.

त्यानंतरही महिनाभर ती सगळ्या वृत्तपत्रांवर नजर ठेवून होती. सगळीकडे हाच सूर ऐकू येत होता. विविध सभा-संमेलनांमध्येही हाच विचार चर्चिला जात होता. तिला वाटलं, आपणच एक लेख का लिहू नये? सभेमधे व्यक्त केलेले विचार आपणच लेख-रूपात लिहून काढायचे. सभेत याला कुणीही समर्पक उत्तरं न देता पुढील सभेच्या वेळी आपल्यालाच कसं वगळण्यात आलं, तेही लिहायचं. तसा कन्नड आणि इंग्लिश लेख तयार होताच बेंगळुरूला जाऊन तिनं तो टाईप करून घेतला. नंतर जास्तीत जास्त खप असलेल्या एका इंग्लिश वृत्तपत्राकडे आणि कर्नाटकातील 'निर्भीड' म्हणवणाऱ्या एका वृत्तपत्राकडे ते पाठवून दिले. दोन आठवडे गेले, तीन आठवडे गेले, महिना उलटला. कुठल्याही वृत्तपत्रात लेख प्रसिद्ध झाला नाही किंवा एखाद्या ओळीचं खुलाशाचं पत्रही त्यांच्याकडून आलं नाही. दोन्ही संपादकांना याविषयी चौकशी करणारं पत्र रजिस्टर्ड पोस्टानं पाठवलं तरी, उत्तर आलं नाही.

शेवटी एक दिवस ती प्रत्यक्षच इंग्लिश वृत्तपत्राच्या ऑफिसमध्ये गेली. तिथल्या निवासी संपादकाला जाऊन भेटली. तो तिच्या ओळखीचाच निघाला. आनंदन त्याचं नाव. त्यानं तिचं अत्यंत आदरानं स्वागत केलं. लेखाची चौकशी करताच म्हणाला, "मला काहीही ठाऊक नाही. सबएडिटरनं का तो छापला नाही, कोण जाणे!"

"मला त्यांची भेट घेऊन बोलायचंय. सहज सोडून देण्यासारखा माझा लेख नाही." ती म्हणाली. यावर तो म्हणाला, "बाहेरच्या लोकांपुढे हाताखालच्याला बोलावून दोष देणं, हे माझ्या धोरणात बसत नाही."

"तर मग तुम्हीच तो लेख मागवून घ्या. जर त्यानं तो गहाळ केला असेल तर मी त्याची दुसरी प्रत आणली आहे. ही घ्या!" त्याच्या चेहऱ्यावर पुसटशी चोरटेपणाची रेखा दिसली. त्यानं सांगितलं, "असं करा, तुम्ही ठेवून जा. मी आता ऑफुली बिझी आहे."

"ठीक आहे. तर मग कधी येऊ मी? माझा लेख प्रकाशित करण्यासाठी मी हे विचारत नाही. विषय गंभीर आहे. गेली अनेक वर्षं मी या विषयावर अभ्यास केलाय. समाजाला समजलाच पाहिजे असा विचार मी त्यात मांडलेला आहे. म्हणून माझा आग्रह आहे."

"मॅडम! या सगळ्या वृत्तपत्राच्या धोरणाच्या संदर्भातल्या गोष्टी आहेत. आमच्या मुख्य ऑफिसमध्ये त्या ठरत असतात. ज्याचं मी उत्तर देऊ शकणार नाही, असं तुम्ही मला विचारू नका." त्यानं आपली असहायता दर्शवली.

"तर मग तिथला पत्ता द्या. त्यांना ही प्रत पाठवून देईन."

"जरुर पाठवा!" म्हणत त्यानं तिच्या पुढ्यात कार्ड ठेवलं.

तिनं मुख्य ऑफिसलाही लेखाची प्रत पाठवली. तिथूनही उत्तर मिळालं नाही. एकूण काय, कुठेही तो लेख प्रकाशित झाला नाही. कन्नड वृत्तपत्राचे संपादकही जुन्या आठवणी काढत नीट बोलले, "तुम्ही बेंगळुरू सोडून खेड्यात का जाऊन बसलात? इथलं कलाक्षेत्र तुम्हाला किती मिस करतंय, ठाऊकाय? पाच वर्षं म्हणजे या क्षेत्राच्या दृष्टीनं फार मोठा कालखंड झाला. या अवधीत नव्यानव्या ताऱ्यांचा जन्म झालेला असतो. अर्थात मी तुम्हाला फक्त तारा मानत नाही म्हणा!..." वगैरे बोलून झाल्यावर अत्यंत आपुलकीच्या स्वरात म्हणाले, "तुम्ही आणि आमिर वेगळे झालात, फार वाईट झालं. त्यांनी दुसरं लग्न केलं, हे तर बेंगळुरूमध्ये कुणालाही आवडलेलं नाही. तेही बुरखा घालणाऱ्या बाईशी? तिच्याबरोबर त्यांना तरी कसला आनंद मिळणार आहे म्हणा! त्या लग्नाविषयी आणि बायकोविषयी ते कुणाशीच बोलत नाहीत. इतर लोकही कसं विचारतील?"

"याविषयी स्त्रीवादी चळवळवाल्यांनी काही केलं नाही?"

"अल्पसंख्याकांचा विषय आला, की या चळवळीशी संबंधित लोकही धूर्तपणे गप्प राहतात. तुम्ही इथे का आलात, सांगू? तुमचा लेख आम्ही का छापला नाही, हे विचारायला! वर्षानुवर्षं अभ्यास केल्याशिवाय असा लेख लिहिणं शक्य नाही, हे आम्हालाही समजतं. पण तो छापायची मला भीती वाटते. तो छापला तर लोक घोळक्यानं येऊन आमच्या ऑफिसवर दगडफेक करतील. आग लावतील. आमची वृत्तपत्रं नेणाऱ्या वाहनांवर पेट्रोल टाकून काडी लावतील. माझाही खून करतील. माझे मालक मला कामावरून कमी करतील, याविषयी तर शंकाच नाही. कुठला लेख छापला तर काय परिणाम होईल, याचा माझ्यासारख्या संपादकाला आता अंदाज यायला नको? राज्यकर्ते तर अशा लेखांविरुद्ध आगपाखड करतील. वृत्तपत्राला त्रास द्यायचं ठरवलं तर सरकारकडे सत्राशे साठ मार्ग असतात. तुम्ही कुठेही हा लेख पाठवला तरी प्रत्येक संपादक हा विचार करणारच."

संशोधन-स्वातंत्र्य नाही, अभिव्यक्ती-स्वातंत्र्य नाही, माध्यम-स्वातंत्र्य नाही! ही कसली लोकशाही? हा देश कधी प्रबल होणार? इथला नागरिक त्याअर्थी कधी स्वतंत्र होणार? अप्पाजींच्या संग्रहात असलेली आणि त्यानंतरही गरजेनुसार मागवलेली सगळी पुस्तकं वाचून संपली होती. यानंतरच्या वाचनामुळे तपशिलात भर पडेल, विचार-प्रवाहात काहीही फरक होणार नाही, हे आता तिचं तिलाच स्पष्ट झालं होतं. आपण जमवलेल्या तपशिलाच्या आधारे एखादा ग्रंथ लिहायलाही उत्साह वाटेना. त्याऐवजी, आतापर्यंत लिहिलेल्या कादंबरीलाच आकार देऊन पूर्ण करावी, असं तिला वाटू लागलं.

कादंबरी संपली. फार मोठी नव्हे. बेताच्या पृष्ठसंख्येची. टाईप करून त्याच्या चार प्रती करून चार प्रकाशकांकडे दिल्या. ते प्रकाशकही तिला नावानं ओळखत होते. नाटक-सिनेमाच्या क्षेत्रात ते प्रसिद्धच होतं. त्यामुळे चौघांनीही मोठ्या उत्साहानं ते मागून घेतलं आणि वाचूनही काढलं. पण कुणीही ते प्रकाशित करायला मात्र तयार होईना.

"मॅडम, हे पुस्तक प्रकाशित झालं तर फार गडबड होईल. आम्हाला दगडफेक, जाळपोळ, जीवे मारायच्या धमक्या सुरू होतील. सरकारही कदाचित यावर बंदी आणेल. आम्हाला काय करायच्यात या भानगडी? असं करा, तुम्ही आणखी एक कादंबरी लिहून द्या. लगोलग छापायला घेऊ!–" चौघांनीही हेच वेगवेगळ्या शब्दांत आणि सुरात सांगितलं.

"मी या पुस्तकासाठी येईल तो सगळा खर्च देईन. पुस्तकं खपतील तसे मला पैसे परत करा. तुम्ही म्हणताय तसं काही होऊन नुकसान झालंच तर माझे पैसे जातील." तिनं सुचवलं.

यासाठीही कुणी तयार झालं नाही.

आता मात्र तीही हट्टालाच पेटली. 'आपण एक कलाकार आहोत. लेखिका आहोत. आपल्या अभिव्यक्तीसाठी मी ही कादंबरी लिहिली आहे. आता कुठल्या तरी दडपशाहीमुळे घाबरून माघार घ्यायची?'

ती एका मुद्रणालयात गेली. टाइप केलेली प्रत दिली. एक हजार प्रती छापण्यासाठी किती खर्च येईल, याचा तिनं अंदाज विचारला. त्यांच्या हिशेबानुसार तीस हजार द्यायचं कबूल केलं आणि अॅडव्हान्स देऊन गावी परतली. छपाई झाली. प्रमुख वृत्तपत्रांकडे अभिप्रायार्थ पुस्तकाच्या प्रती पाठवल्या. राज्यातल्या प्रमुख लेखक-समीक्षक आणि प्रमुख विचारवंतांनाही एकेक प्रत पाठवली. तीन पुस्तकांच्या दुकानांमध्ये विक्रीनंतर पैसे द्यायच्या बोलीवर शंभर-शंभर प्रती ठेवून आली. पण कुणीही पुस्तकावर परीक्षण लिहिलं नाही; एवढंच नव्हे, लेखक-समीक्षक आणि विचारवंतांनी साधी पोचही दिली नाही. हा कसला बौद्धिक कट म्हणायचा? तिचे दिवस विषादाच्या भावनेनं बुडून जात होते.

पण एके रविवारी एका प्रमुख कन्नड वृत्तपत्राच्या पुरवणीमध्ये "राष्ट्रविघातक कादंबरी" या शीर्षकाखाली एक लांबलचक परीक्षण छापून आलं. 'भारताचं विभाजन झाल्यानंतर इथल्या मातीवरील प्रेमापोटी इथेच राहिलेल्या बांधवांना मन:ताप देणाऱ्या, शारीरिक ताप देणाऱ्या लक्ष्मी ऊर्फ रझिया बेगम यांनी आपल्या सडक्या स्वभावाचं, बुद्धीचं आणि मानसिकतेचं दर्शन घडवलं आहे... इस्लाम या शब्दाचा अर्थच शांती असा असताना त्यांनी अल्पसंख्याकांचा अपमान केला आहे... देशाच्या घटनेनं दिलेल्या अभिव्यक्ती-स्वातंत्र्याचा त्यांनी दुरुपयोग केला आहे. धार्मिक अशांती निर्माण करणारं हे पुस्तक लिहून आणि प्रकाशित करून राष्ट्रीय एकात्मतेला चूड लावणाऱ्या या पुस्तकावर वेळीच बंदी घातली नाही तर सरकारला याची दामदुपटीनं किंमत द्यावी लागेल...' वगैरे आरोप पहिल्या परिच्छेदात केले होते. लेखाच्या लेखकाचं नाव न देता केवळ 'समीक्षक' असा उल्लेख केला होता. नाही तरी अशा स्वत्व गमावलेल्या माणसाचं नाव समजून तरी काय फायदा म्हणा!

पण रागावून तरी का होईना लिहिलं म्हणा! वाचकांना अशी एक कादंबरी आली आहे, हे तरी समजेल. तेवढं पुरेसं आहे. तिला थोडं बरं वाटलं. पण त्याचबरोबर यावर बंदी येईल की काय, अशी भीतीही वाटू लागली आणि आपण काय करावं हे तिला समजेना. 'त्यात रविवार. म्हणजे पुस्तकांची दुकानंही बंद असतील. सरकारी ऑफिसेसही बंद असतील. उद्या बेंगळुरूला जाऊन दुकानांमध्ये चौकशी केली पाहिजे. समीक्षकांनीच प्रक्षोभाविषयी सुचवलं तर कसं? माझ्या कादंबरीमध्ये वापरलेल्या ऐतिहासिक पुराव्यांविषयी त्यात एक वाक्यही लिहिलेलं नाही. त्यात केवळ भावनिक लाभ आणि रस्त्यावरचं राजकारणच भरलं आहे. पाठोपाठ आठवलं, अप्पाजींच्या मृत्यूनंतर गावी जाऊन त्यांचा ग्रंथसंग्रह वाचण्याआधी मीही अशाच भाषेत, अशाच भावनेत बुडाले नव्हते काय?'

तिनं पुन्हा एकदा आपली कादंबरी वाचायला सुरुवात केली. काही संदर्भग्रंथांच्या तिथल्या तिथे तळटिपा दिल्या होत्या, पण एवढं पुरेसं नाही. प्रत्येक ठिकाणी त्या त्या संदर्भग्रंथांची नोंद करायला हवी होती. कादंबरीच्या शेवटी एक संदर्भग्रंथांची सूची द्यायला हवी होती. पण अजून काही बिघडलं नाहीये. पंचेचाळीस पानी संदर्भ-सूची वेगळी छापून घेऊन प्रत्येक प्रतीबरोबर देता येईल.

संध्याकाळी पाच वाजता तिच्या घरापुढे एक पोलिसांची जीप येऊन उभी राहिली. एक इन्स्पेक्टर आणि पाच कॉन्स्टेबल त्यातून उतरले. पाठोपाठ एक लॉरीही होती. त्यात दहा शिपाई होते. हे जप्तीसाठी आले आहेत, हे पाहताक्षणी तिच्या लक्षात आलं. पण आता आपण काय करावं हे तिला सुचेना. हा सगळाच अनुभव तिच्या दृष्टीनं नवा होता. इन्स्पेक्टरनं येऊन विचारलं, "लक्ष्मी ऊर्फ रझिया बेगम तुम्हीच ना?"

तिनं 'होय' म्हटलं.

"तुमच्या पुस्तकावर बंदी घालावी अशी सरकारी आज्ञा आली आहे. आम्हाला पुस्तकाच्या प्रती जप्त करायच्या आहेत..." म्हणत ते सरळ आत घुसले. पाठोपाठ शिपाईही घुसले आणि घरभर शोधू लागले. माडीवरही जाऊन आले. एका खोलीत वीस-वीस प्रतींचे गठ्ठे बांधून ठेवले होते. शेकड्याच्या गठ्ठ्यांवर कादंबरीच्या नावाची चिठ्ठी लावली होती. इन्स्पेक्टरनी खूण करताच शिपायांनी सगळ्या प्रती लॉरीत नेऊन ठेवल्या. नंतर इन्स्पेक्टर अभ्यासिकेत शिरून म्हणाला, "हेही उचला!" त्यासरशी सात-आठ शिपाई अभ्यासिकेत घुसले आणि सगळी पुस्तकं एकत्र करू लागले.

लक्ष्मी दारात उभी राहिली आणि म्हणाली, "थांबवा हे! तुम्ही जप्तीचा हुकूम मला दाखवलेला नाही आणि

सरकारनं बंदी घातलीच असेल तर तिचा संबंध फक्त या सहाशे प्रतींशी आहे. ही इथली सगळी पुस्तकं जुनी आहेत. यातली बरीचशी पन्नास वर्षांपेक्षाही जुनी आहेत. यांचा जप्तीशी काहीही संबंध नाही. तुम्ही थांबा. हात लावायचं कारण नाही.”

“हे पाहा बाई! तुमच्या घरातली सगळी पुस्तकं घेऊन या, असं आम्हाला सांगण्यात आलंय. त्यात काय-काय आहे हे बघायची जबाबदारी आमची नाही. त्यासाठी तुम्ही हवं तर कोर्टात जा आणि तुमची पुस्तकं मिळवा.” त्यांनी पुन्हा शिपायांना खुणावलं. त्यांच्यापैकी एकानं तिचा दंड धरून बाजूला ओढलं. बाकीचे भराभरा पुस्तकं गोळा करून लॉरीत भरू लागले.

सगळी पुस्तकं लॉरीत भरून सगळे शिपाई लॉरीत चढले. त्यांनी पुस्तकं नीट रचलीही नव्हती. कशीही कोंबली होती. त्यामुळे सगळ्यांना उभं राहायलाही जागा नव्हती. त्यातले काहीजण पुस्तकांवर बुटाचे पाय ठेवून उभे होते. ‘पुस्तक हे सरस्वतीचं रूप आहे, त्याला चुकून पाय लागला तरी नमस्कार केला पाहिजे ही संस्कृती तर दूर राहिली, पायदळी एखादी वस्तू तुडवून नष्ट करू नये, ही लौकिक संस्कृतीही यांना नाही?’ ती अंतर्मुख झाली. जीप निघाली. पाठोपाठ लॉरीही निघाली. संदर्भ-ग्रंथ, सहायक ग्रंथ आणि लिहिलेला ग्रंथ, सगळीच पुस्तकं जप्त केली आहेत. ‘आता ही पुस्तकं पुन्हा मिळवण्यासाठी किती दशकं कोर्टाचे खेटे घालावे लागतील, कोण जाणे! तेवढ्या अवधीत या ग्रंथांची शिवण उसवेल, कागद भिजतील, त्याचे तुकडे पडतील! या अप्पाजींच्या अनमोल ग्रंथ-संपदेची माती होऊन जाईल. अशा प्रकारे भारतातल्या सगळ्या ग्रंथालयांमधल्या या ग्रंथांच्या प्रती काढून नष्ट केल्या जातील.’ या विचारानं तिचा थरकाप उडाला.

रात्रभर तिच्या डोळ्याला डोळा लागला नाही. मन असाहाय्यता आणि हताशेनं भरून गेलं होतं. श्वासाची गती आणि हृदयाची लय चुकत असल्याचं तिचं तिलाच समजत होतं. कल्पनाशक्तिच्या जोरावर तिने निर्माण केलेल्या कादंबरी-नायकाची बीज फोडल्यानंतर, काय अवस्था झाली असेल, याचा अनुभव जणू ती घेत होती. ‘या परिस्थितीशी कसे दोन हात करायचे? विचार-स्वातंत्र्य, संशोधन-स्वातंत्र्य, अभिव्यक्ती-स्वातंत्र्य नसलेल्या या वातावरणात डोळ्यांवर कातडं ओढून मुकाट्यानं बसून राहायचं? नाही. ते शक्य नाही! पण मग लढा कसा द्यायचा?’ त्याचा मार्ग कोणता या विचारानं तळमळत असतानाच कोंबडा आरवला. तरीही झोप लागली नाही.

सकाळी उठल्यावर अंघोळ उरकून नाचणीची भाकरी आणि नारळाच्या चटणीची न्याहारी झाली. झोप येण्याला अडचण होईल म्हणून कॉफीऐवजी वाटीभर दही खाल्लं. आता मात्र थोडी डुलकी आली. नेहमीच्या जागी, अभ्यासिकेमध्यल्या पलंगावर पडल्या पडल्या झोप लागली.

पण लवकरच लक्ष्म्मानं हाक मारली, “अव्वा, कुणीतरी गाडीतून आलंय. तुम्ही झोपलाय म्हणून सांगितलं तरी ऐकायला तयार नाहीत. आत्ताच्या आत्ता उठवा म्हणून घाई करताहेत.” निरुपायानं लक्ष्मी उठली. आळस झटकून अंथरुणातून बाहेर यायला पाच मिनिटं लागली. बाहेर येऊन तिनं पाहिलं.

दारात नवी करकरीत कार उभी होती. ओसरीवर एका खुर्चीत आमिर बसला होता. ती आश्चर्याच्या धक्क्यातून सावरत असतानाच तो उठला आणि इंग्लिशमध्ये म्हणाला, “तुला तातडीनं एक गोष्ट सांगायला म्हणून आलो. इथे बोलू या?”

ती त्याला अभ्यासिकेत घेऊन गेली. तिथल्या खुर्चीवर बसायला सांगितलं तरी न बसता तो अत्यंत हलक्या आवाजात म्हणाला, “बाकी सगळं वाटेत सांगतो. तुला अटक करावं असा सरकारी हुकूम निघालाय, असं समजलं. पोलिसांनी येऊन पकडून नेण्याआधी तुला इथून बाहेर पडलं पाहिजे. बेंगळुरूमध्ये एखादा चांगला वकील पकडून अटकपूर्व जामीन मिळवायला पाहिजे. एकदा अटक झाली की जामीन मिळायला किती आठवडे किंवा महिने लागतील ते सांगता येणार नाही. तोपर्यंत जेलमध्ये सडत पडावं लागेल. समाजात फूट पाडणं, त्याद्वारे देशविघातक कृत्य करणं यासारखे आरोप ठेवण्यात येतील. आता गरजेनुसार चार कपडे घे आणि चल. कुणिगलवरून बेंगळुरूला जायच्या मार्गानं नको जायला! मला खेड्यांमधून जाणारा एक आडमार्ग ठाऊक आहे. तसं जाऊ या. बेंगळुरूमध्ये एखाद्या मित्राच्या घरी तुला काही दिवस लपून राहावं

लागेल. वकिलाला पकडून अटकपूर्व जामिनाचा अर्ज हायकोर्टापुढे नेण्यासाठी आवश्यक असलेली सगळी धावपळ मी करेन.”

तिनं पटकन एका सूटकेसमध्ये आवश्यक ते कपडे कोंबले, बाहेर येऊन लक्ष्म्माला म्हणाली, “माझं तुमकूरला थोडं कोर्टाचं काम आहे. कुणी आलं, पोलीस आले आणि चौकशी करायला लागले, तरी मी कुठे गेले ते माहीत नाही म्हणून सांगायचं.” आणि ती कारमध्ये आमिरच्या शेजारी बसली.

कार गावाबाहेर आली.

“उजवीकडे पाच मैल गेल्यावर दोड्डाघट्ट नावाचं खेडं आहे. तिथून डावीकडे वळून पुढे गेलं, की बेंगळुरूला जाता येतं. घाबरायचं कारण नाही.” ती म्हणाली.

तिच्या मनात एक प्रकारचं विचित्र धैर्य निर्माण झालं होतं. ‘अटक करून पुढे काय करणार आहेत? अटक केली तर माझी शक्ति उलट जास्त होईल. सत्याग्रही होऊन लढता येईल. अन्न-सत्याग्रह करेन! माझ्या कादंबरीमधल्या पात्रांच्या अनुभवांपुढे माझ्या अटकेचं काय मोठं?’

‘दोड्डाघट्टच्या डावीकडे वळल्यावर मनात कुतूहल निर्माण झालं, या आमिरच्या मनात एकाएकी माझ्याविषयी एवढी का काळजी निर्माण झाली?’ तिनं त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. त्याचंही तिच्याकडे लक्ष गेलं. दोघांची नजरभेट झाली. तोच म्हणाला, “तुझ्या मनात काय आलंय, ते माझ्या लक्षात आलंय. हे रस्ते वेडेवाकडे आहेत. ड्राईव्ह करताना बोलायला जमणार नाही. एक-दोन मैल गेल्यावर कार थांबवून बोलता येईल. आपल्या पोलिसांचा उरक आपल्याला ठाऊक आहे. ते काही या रस्त्यानं यायचे श्रम घेणार नाहीत.”

“खरंय तुझं! नाही येणार. तुला काय म्हणायचंय ते मलाही ऐकायची उत्सुकता आहे.” त्याच्या दंडाला स्पर्श करत तीही म्हणाली.

मैलभर गेल्यानंतर उजवीकडे आंबा, फणस, चिक्कू, पपईची झाडं असलेली बाग दिसली. तिच्या आडोशाला कार उभी केल्यावर आमिर म्हणाला, “त्या दिवशी दिल्लीत मी तुझ्या खोलीवर आलो तेव्हा बराच प्यायलो होतो. त्या वेळी झालेलं बोलणं माझ्या अर्धवट लक्षात होतं. दुसऱ्या दिवशी थोड्या उशिराच उठलो. सभेत तुझ्यासमोर यायची भीती वाटली. तरीही, हिला कशाला घाबरायचं, असं स्वत:ला बजावत मी आलो. तुझं माझ्याकडे लक्ष नव्हतं. संपूर्ण सभा तुझ्याविरुद्ध असली, सभेच्या सभ्यतेच्या नावानं तुला अडवलं गेलं तरी तू किती धैर्यानं परिस्थितीला तोंड देत होतीस ते मी बघत होतो. त्या संपूर्ण सभेत विषयाचा सांगोपांग अभ्यास केलेली तू एकटीच होतीस. तुझं ऐकता-ऐकता मला तुझ्या विषयाविषयी आसक्ती निर्माण झाली. मनातल्या मनात ‘वाहव्वा', ‘शाब्बास' असे उद्गार उमटत होते. इतर कुणी काही बोललं तरी मनात तुझ्या बाजूनं उत्तरं उमटत होती. पण एवढ्या लोकांसमोर, त्यातही सरकारचं प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रोफेसर शास्त्रींपुढे उभं राहून हे सगळं बोलायचं धैर्य मात्र झालं नाही. तुझ्यात मात्र ते धैर्य होतं. कुठून आलं ते? तुझ्या बोलण्याला प्रत्येक टप्प्यावर ऐतिहासिक आधार असलाच पाहिजे, असं वाटू लागलं. एवढंच नव्हे, प्रामाणिकपणे सांगतो, ते ऐकता ऐकता तुझ्याविषयी प्रेम निर्माण झालं.” म्हणत त्यानं तिच्याकडे पाहिलं.

तीही गंभीरपणे त्याच्याकडेच पाहत होती.

तोच पुढे म्हणाला, “हे प्रेम म्हणजे फिल्मी नव्हे. एक प्रकारचं कौतुक किंवा आदर म्हण हवं तर! विद्वत्ता आणि प्रखरता नसलेल्या स्त्रीविषयी वाटणारं प्रेम फिल्मीच म्हणावं लागेल. ज्याचा अभिमान वाटेल, ज्यामध्ये आराधनेची पातळी गाठली आहे, त्या प्रेमाची या फिल्मी प्रेमाशी तुलनाच होऊ शकणार नाही, असं वाटलं. पण हे सगळं संध्याकाळी तुझ्या रूमवर येऊन सांगायचा संकोच वाटला. त्या नंतरच्या दुसऱ्या मीटिंगला तुला वगळण्यात आल्याचं दिल्लीला गेल्यावर समजलं. आपल्या सरकारचं हे असंच आहे. मला इतक्या डॉक्युमेंटरीजची कामं देताहेत. प्रत्येक डॉक्युमेंटरीत पंचाहत्तर टक्के फायदा आहे. ही नवी कार त्यातूनच घेतली. ते जाऊ दे. त्यानंतर मला तुझी सतत आठवण येत होती. बौद्धिक साहचर्य नसलेल्या स्त्रीबरोबर काय बोलायचं? कसली देवाण-घेवाण करायची? पुरुषापेक्षा अधिक बुद्धिमत्ता नसलेली स्त्री त्याला काय देईल

म्हणा! पण तुला भेटायची मात्र मनात भीती वाटत होती. संकोचही वाटत होता. त्यानंतर कामातच बुडून गेलो...”

वारा सुटला होता. त्यानं एकदा सभोवताली नजर टाकली. अशा मोकळ्या हवेत, बागेपाशी किती छान वाटतं! आमिर पुढे म्हणाला, “चल. तिकडच्या त्या दगडी बाकावर बसू या.” आणि कारमधून उतरला. उतरून त्या बाकावर बसल्यावर सांगू लागला, “पुढे आपल्या कामात बुडून गेलो. काल सकाळी उठल्या उठल्या रविवारच्या कन्नड वृत्तपत्राची पुरवणी पाहिली. माझी एक मुलाखत येणं अपेक्षित होतं, म्हणून मी पेपर बारकाईने पाहिला. तुझ्या कादंबरीवरचं परीक्षण वाचलं. तू अशी काही कादंबरी लिहिली असशील, याची मला कल्पनाच नव्हती. तूही वाचलं असशील ना ते परीक्षण?”

“वाचलं. तीन कन्नड आणि एक इंग्लिश पेपर घेते मी.”

“त्याला ‘समीक्षा’ दूर राहिलं, ‘परीक्षण’ तरी कोण म्हणेल? कुणी तरी सरफिऱ्यानं लिहिलं असावं, असं वाटलं. कुणी का असेना, एवढ्या आक्रमकपणे लिहिलंय याचा अर्थ कादंबरीत काहीतरी सत्य असलंच पाहिजे, असं वाटलं. कादंबरी लगेच वाचायची इच्छा झाली. पण रविवार. पुस्तकांची दुकानं बंद. माझा असिस्टंट मोहनकुमार ठाऊक आहे ना? तो कन्नड साहित्याचा भोक्ता आहे. त्याला फोन केला. तो म्हणाला, मी वाचलीय, माझ्यापाशी आहे. वाचलीत तर तुम्ही नक्की दुखावले जाल. पण मी सांगितल्यावर त्यानं आणून दिली. लगोलग मी ती वाचून काढली. खरं सांगतो! मन गोंधळून गेलं. खरोखरच असं घडलं असेल? पण तू तर प्रत्येक ठिकाणी संदर्भ-ग्रंथांचा आधार घेतला आहेस. स्वत: सुलतान-बादशहांनीच लिहून घेतलेल्या ग्रंथांमधले संदर्भ पृष्ठ-संख्या आणि प्रकाशकांच्या नावासकट दिले आहेस. त्यामुळे मूळ ग्रंथ वाचून सत्य काय आहे ते समजून घ्यावं, असं वाटलं. दिल्लीमध्येही तू अशाच प्रकारे संदर्भ देत बोलली होतीस. मूळ पुस्तकं कुठून मिळवावीत याचा विचार करत होतो. संध्याकाळचे आठ वाजले होते. टीव्ही लावला. बातम्यांमध्ये सांगितलं, गावात विशिष्ट जातीच्या लोकांनी जाळपोळ सुरू केली आहे. कारण, तुझी कादंबरी! दुकानं, बसेस पेटवल्या आहेत, दगडफेक केल्यामुळे दुकानांची मोडतोड झाली आहे. त्यामुळे सरकारनं त्या पुस्तकावर बंदी आणून त्याच्या प्रती जप्त करण्याचा आदेश दिला आहे. लेखिकेला अटक करावी, अशीही या समाजाची मागणी आहे.

“बातमी ऐकताक्षणी मला तुझी काळजी वाटली. रात्री दहा वाजता पोलिसांकडे फोन केला. नावावरून मला एक अल्पसंख्याकांचा प्रतिनिधी समजून त्यांनी माहिती दिली. लेखिकेच्या गावी जाऊन तिच्या त्या पुस्तकांच्या प्रती आणि तिचा संपूर्ण ग्रंथसंग्रह जप्त करून आणला आहे. एवढ्यातच वृत्तपत्रांना बातमी दिली आहे. त्यामुळे उद्यापासून वातावरण निवळेल. आम्हाला खातरी आहे.” मी विचारलं, “लेखिकेलाही अटक केली पाहिजे अशी त्यांची मागणी आहे, त्याचं काय?” त्यांनी सांगितलं, “याहून जास्तीची माहिती आम्ही एवढ्यात देऊ शकत नाही.” याचा अर्थ काय? तुला अटक करायचा त्यांचा विचार आहे. नाही का? रात्रभर तळमळत राहिलो. तू दिल्लीच्या सभेत ज्या धैर्यानं बोलत होतीस, ते सगळं आठवत राहिलो. तिथे तू कितीतरी संदर्भ-ग्रंथांचा उल्लेख केला होतास. या कादंबरीतही केलायस. मलाही त्या संदर्भ-ग्रंथांमधला काही भाग वाचायचाय. पण पोलिसांनी सगळा ग्रंथ-संग्रहच जप्त केल्यावर काय करायचं? याच विचारात सिगारेट ओढत आपल्या मोठ्या झोपाळ्यावर बसलो. आठवतोय ना तो तुला? तेव्हा आठवलं, तो सगळा ग्रंथ-संग्रह तुझ्या वडिलांचा होता.”

दोघंही पुन्हा कारमध्ये येऊन बसले. तिनं विचारलं, “माझ्या मनात एक कुतूहल आहे. परीक्षणाच्या नावाखाली हा प्रक्षोभक लेख कुणी लिहिला असेल?”

“आधी तू तुझा अंदाज सांग. नंतर मला काय वाटतं ते मी सांगतो.” सुरू केलेली कार बंद करत त्यानं विचारलं.

“प्रोफेसर शास्त्री?”

“माझाही तोच अंदाज आहे. त्यांनी कदाचित स्वत: लिहिलं नसेल. एखाद्या चेल्याकडून लिहून घेतला

असावा. आपला खप वाढवण्यासाठी वृत्तपत्रांनीही ही दंगल पेटवून दिली. शास्त्रींनी आपली मुलगी तुझ्या मुलाला दिलीय. किती केलं तरी असा थेट हल्ला करणं त्यांना परवडणार नाही. त्यामुळे या प्रकरणामध्ये ते प्रत्यक्ष भाग घेण्याची शक्यता मला तरी वाटत नाही. सावकाश चौकशी केली तर तेही शोधून काढणं कठीण नाही.” म्हणत त्यानं कार सुरू केली. नझीरच्या लग्नाचा विषय निघताच ती गप्प राहिली.

थोडं अंतर गेल्यावर त्यानं विचारलं, “पोलिसांनी उचलून नेलेल्या पुस्तकांची, लेखकांची आणि प्रकाशकांची नावं आठवतात?”

“का?”

“त्यांची एक यादी कर. कोर्टात जाऊन सोडवून आणायची म्हटलं तरी त्या यादीचा उपयोग होईल. सुरुवातीला लिही, ही परिपूर्ण यादी नाही, आठवलं तेवढंच यात लिहिलंय.”

काही क्षण ती विचारमग्न झाली. नंतर म्हणाली, “फक्त आपली पुस्तकं माघारी मिळवण्यासाठीच नव्हे, माझ्या कादंबरीसाठीही या सर्व ग्रंथांचा आधार आहे. कादंबरीवर बंदी घालायची असेल तर त्याआधी त्या प्रत्येक ग्रंथावर बंदी घातली पाहिजे, असाही कोर्टात वाद घालता येईल.”

बेंगळुरूच्या नंजुंडप्पांच्या घरी अज्ञातवासात असताना लक्ष्मीनं केवळ आठवणींच्या जोरावर ही यादी तयार केली.

Abu-L-Fazl Allaml:	1.	The A-IN-I Akbar, vol. I, II and III Translated by H. Blochmann, complete and ubabridged, First published 1927, 1949 Low price publications, Delhi 110052 D. K. Publishers Distributors Pvt. Ltd. Ansari Road, Darya Gunj, New Delhi-110002
Abu-L-Fazl:	2.	The Akbar Nama Translated from the Persian by H. Beveridge, Vol. 1and 11 first Published, 1902, 1939 Low price publications D. K. Publishers Distributors
A.K. Priolkar:	3.	The Goa Inquisition With accounts given by Dr. Dellon and Dr. Buchanan, First published 1961, Voice of India 1991

Alberuni's India:	4.	Edited With notes and Indices by Edward C. Sachau Vol. 1and 11 First published, 1910, Reprints 1989, 93, 96, Low price publications.
Babur-Nama:	5.	Translated by Annette S. Beveridge Two Vols bound in one First published 1921 Reprinted in Lpp, 1989, 97
Sir H. M. Elliot And John Dowson	6-13.	The History Of India As Told By lts Own Historians. 8 Volumes, Low price publications, Delhi-52

त्या त्या काळातील मुसलमान लेखकांनी केलेल्या, मोगलांचे भारतावरील आक्रमण, युद्धं आणि राज्यकारभार याविषयीच्या विपुल प्रमाणातील नोंदी असलेले; इलियट आणि डॉसन यांनी निवडून इंग्लिशमध्ये अनुवादित केलेले बृहदाकार ग्रंथ.

David Frawley And Navaratna S. Rajaram :	14.	Islam in Today's World (The Myth and The Truth) Naimisha Research Foundation, Bangalore

David Frawley and S. V. Seshagiri Rao Navaratna S. Rajaram	15.	Crusade in India: Christianity's struggle for survival in the post-colonial world. Naimisha Research Foundation, Bangalore
Harsh Narain :	16.	Jizya and The Spread of Islam 1990
The Islamic Trilogy Series:	17.	Vol.I.Mohammed And The Unbelievers A Political Life
	18.	Vol. II. The political Traditions Of Mohammed The Hadith For The Unbelievers
	19.	Vol. III. A Simple Koran Read Able And Understandable
	20.	Vol. IV An Abridged Koran Readable And understandable
	21.	Vol. V. Mohammed, Allah, And The Jews The Foundational Doctrine

	22.	Vol. VI. Mohammed, Allah And The Christians The Foundational Doctrine
	23.	Vol. VII. Mohammed, Allah And Hinduism The Foundational Doctrine
	24.	Vol. VIII. Mohammed, Allah And The Intellectuals The Foundational Doctrine Centre For The Study Of Political Islam (CSPI Publications)
Ishwar Sharan:	25.	The Myth of Saint Thomas and The Mylapore Shiva Temple Voice of India 1991
Jadunath Sarkar:	26.	A Short History Of Aurangzib Orient Longman 1979. First published 1930, 54, 62.
	27.	Shivaji and his times, First edition 1919 Orient Longman 1973, 92, 97

28. A History of Jaipur written in 1939-40 published in

29. Military History of India First Edition 1960 Orient Longman 1970

James Tod: 30-31. Annals and Antiquities of Rajasthan 2 volumes, First published 1829, Routledge Keganpaul Ltd. London, Paper back 1997 Rupa Ă co.,

John F. Richards: 32. The New Cambridge History of India, The Mugal Empire, Cambridge University Press, First South Asian Edition 1993 Foundation Books, Ansari Road New Delhi 110 002

Koenradd Elst: 33. Ayodhya and After; issues before Hindu Society, Voice of India, 2/18 Ansari Road, New Delhi 110 002

34. Negationism in India; concealing the Record of Islam, Voice of India

35. Psychology of Prophetism, Voice of India

36. Ram Janma Bhoomi Vs Babri Masjid: A case Study in Hindu Muslim conflict. Voice of India

37. The Saffron Swastika The notion of Hindu Fascism) Vol I Ă II Voice of India

38. Dr. Ambedkar, A True Aryan

39. Indigenous Indians: Agatsya to Ambedkar.

K. M. Panikkar: 40. Malabar and the Portuguese, 1929 Voice of India reprint 1997

K. S. Lal: 41. The Mughal Harem, Aditya Prakashan, New Delhi

	42.	Muslim slave system in Medieval India Aditya Prakashana
	43.	Indian Muslims: Who are they? Voice of India
	44.	Theory And Practice of Muslim State in India. Aditya Prakashana
	45.	The legacy of Muslim Rule in India. Aditya Prakashana
Maasir-I-Alamgirr:	46.	Saqi Must'ad Khan, Eng tr. By Jadunath Sarkar, Royal Asiatic Society of Bengal, Calcutta,1947, 1986
Navaratna S. Rajaram:	47.	The Politics of History (Aryan Invasion Theory and The Subversion of Scholarship) Voice of India
	48.	Nationalism and Distortions in Indian History, Naimisha Research Foundation, Bangalore

49. A Hindu view of the world Essays in the Intellectual Kshatriya Traditions Voice of India

50. Profiles in Deception (Ayodhya and the Dead Sea Scrolls) Voice of India

51. Hindutva and The Nation Naimisha Research Foundation, Bangalore

52. Aryan Invasion: Historical Theory or Political Myth. Vigil (A public opinion Forum) 49, Murthy Street, West Mambalam Madras 600 033

Navaratna S. Rajaram David Frawley Foreword by Klaus K. Klostermaier.

53. Vedic Aryans and The Origins and of Civilization (A Literary and Scientific Perspective)

R. C Majumdar :	54-64.	The History And Culture of the Indian people, 11 vols Bharatiya Vidya Bhavan.
Samuel P. Huntington:	65.	The Clash of Civilizations and The Remaking of world Order. Penguin
Suhas Majumdar:	66.	Jihad (The Islamic Doctrine of permanent war), Voice of India
Swapan Das Gupta. Ramajois, Arun Jaitley:	67.	The Ayodhya Reference, Supreme Court Judgement And Commentaries
S. P. Gupta. Koenraad Elst:		
Arun Shourie Shrikant G. Talageri:	68.	Aryan Invasion Theory and Indian Nationalism, Voice of India

69. The Aryan Invasion Theory: A Reappraisal. With Foreword by S. R. Rao. Aditya Prakashan F-14/65 Model town II Delhi 110 009

SitaRam Goel: 70. History of Hindu-Christian Encounters (A. D 304 to 1996) Voice of India.

71. Hindu Temples-What Happened to Them vol.I A Preliminary Survey Vol. II The Islamic Evidence

72. The Calcutta Quran Petition Voice of India

73. How I became A Hindu (Reprinted With a post script) Voice of India

74. Freedom of Expression (Secular Theory versus Liberal Democracy) Voice of India

75. Genisis And growth of Nehruism vol.I Commitment to Communism

76. Catholic Ashrams (Sanyasins or Swindlers?) Voice of India

77. Papacy: Its Doctrine and History

78. Stalinist 'Historians" Spread the Big Lie

79. Perversion of India's Political parlance

80. Hindu Society Under Siege

81. Muslism Separatism: Causes and Consequences

82. Pseudo-Secularism: Christian Missions and Hindu Resistance

83. Defence of Hindu Society

	84.	Heroice Hindu Resistance To Muslim Invaders (636 A. D to 1206 A. D)
	85.	Hindus and Hinduism: Manipulation of Meanings
	86.	India's Secularism, New name for National Subversion. Original in Hindi, English translation by Yashpal Sharma
Stanley Lane-Poole :	87.	Aurangzib And the Decay of Mugal Empire. First published 1890, reprint 1930, Lpp 1990.
The Jahangirnama :	88.	Memoirs of Jahangir Translated, Edited and Annotated by Wheeler Thackston. Oxford University press, New York

The Tuzuk-I-Jahangiri:	89-90.	The Memoirs of Jahangir Translated by Alexander Rogers Edited by Henry Beveridge in two volumses bound in one, First published 1909-1914
Gul Badan Begum:	91.	The History of Humayun (Humayun Nama) Translation with introduction notes illustration by Annette S. Beveridge First Published 1902
William Irvine:	92.	The Army of the Indian Moghuls, (Its Organization and Administration) LPP

या कादंबरीमधील विश्वनाथ देवालयाच्या विध्वंसाशी संबंधित.

Anwar Shaikh:	93.	Islam, The Arab Imperialism
	94.	Islam, Sex and Violence 1999 The Principality Publishers P.O. Box 918, Cardiff, U.K.

Arun Shourie: 95. Eminent Historians: Their Technology, Their Line, Their Fraud A.S.A. New Delhi

96. A Secular Agenda A.S.A.

97. The World of Fatwas Or The Shariat in Action, A.S.A.

98. Indian Controversies, Essay on Religion in Action, A.S.A.

99. Arun Shourie and his Christian Critic. Voice of India

100. The State As Charade, A.S.A.

101. Missionaries in India, A.S.A.

102. Harvesting Our Souls, A.S.A.

103. Hindusim: Essence and Concequence. A.S.A.

David Frawley: 104. Arise Arjuna: Hinduism And The Modern World. Voice of India

Diana L. Eck:	105.	Banaras, City of Light, Penguin
Every Man's Library:	106.	The Koran Translated by Marmaduke
Pickthall Ibn Warraq:	107.	Why I Am Not a Muslim Prometheus Books, 59 John Glenn Drive Amherst, New York 14228-2197
Jagmohan:	108.	My Frozen Turbulence in Kashmir Allied publishers
King James Version:	109.	Holy Bible Standard Text Edition
Sir William Muir:	110.	The Life of Mahommet: From Original Sources, Third Edition, London, 1894, First Indian reprint, Voice of India
Margoliouth D.S.:	111.	Mohammed and The Rise of Islam First published, London 1905 Reprint, Voice of India, 1985
Martin Lings:	112.	Muhammad His life Based on the Earliest Sources. George Allen and Unwin

या पुस्तकातील LXI या प्रकरणात बनि कुरैझ नावाच्या टोळीतील सर्वच्या सर्व, सातशे पुरुषांची हत्या करून एक हजार दोनशे स्त्रिया आणि मुलांना सैनिकांनी वाटून घेतल्याचा उल्लेख आहे. इतरांचाही युद्धाचे घोडे आणि शस्त्राच्या बदल्यात व्यापार केल्याचा उल्लेख सर विलियम्स-मुद्दर यांच्या वरील ग्रंथाच्या पृष्ठ ३२० यावर आहे. मार्टिन लिंग्ज यांच्या पुस्तकाला पाकिस्तान सरकारनं पुरस्कार दिला असून, १९८३ साली इस्लामाबाद येथे झालेल्या National Seerat Conference मध्ये, प्रवादींविषयी लिहिलं गेलेलं अत्युत्तम चरित्र

म्हणून निवड करण्यात आली. १९९० साली या पुस्तकाकडे अशर विद्यापीठाचं लक्ष गेल्यावर इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष मुबारक यांनी पुस्तकाच्या लेखकाचा पुरस्कार देऊन सत्कार केला. याचाच अर्थ, हे सर्व मुस्लिमांनी मान्य केलेलं प्रवादींचं जीवनचरित्र. पहिली आवृत्ती; George Allen and Unwin, 1983 पुनर्मुद्रण १९८६-८८.

मी वापरलेल्या आवृत्तीचे प्रकाशक : The Islamic Text Society, 1991, 22 A, Brookland Avenue, Cambridge CB2 2D U.K.

Sir William Muir यांच्या ग्रंथामधील XVII, Seige of Medina आणि Massacre of the Beni Kureiza, D.S. Margoliouth यांच्या ग्रंथातील Chapter IV, Destruction of the Jews आणि Chapter IV यामध्ये मुस्लीम समाज आणि मुस्लीम जगाला आजही ज्यू समाज आणि इस्राईल देशाविषयी असलेली तेढ दिसून येते. या संदर्भात Paul Johnson: A History of the Jews, Harper Perennial P. 166, 167, 165 ही पृष्ठेही पाहता येतील.

Naipaul V.S.: 113. Beyond Belief Islamic Excursions among the Converted Peoples, Viking

Ram Swarup: 114. The Word as Revelation Names of Gods Foreword by David Frawley 1980

115. Meditations, Yogas, Gods, Religions

116. Women in Islam

117. Whither Sikhism?

118. Hindu view of Christanity and Islam

119. Pope John Paul II on Eastern Religions and Yoga A Hindu-Buddhist Rejoinder

Robert Sewell: 120. A Forgotten Empire (Vijayanagar) Asian Educational Services, New Delhi-Chennai

Sharma H.D.: 121. The Real Tipu

डॉ. प्रधान गुरुदत्त यांनी हे पुस्तक ‘टिपू - निज स्वरूप’ या नावानं कन्नडमध्ये अनुवादित केलं आहे. ‘साहित्य सिंधू’, १४/३, नृपतुंग रस्ता, बेंगळूरू, ५६०००१, २००३.

या ग्रंथाच्या अखेरीस असलेल्या संदर्भग्रंथांची अवश्य नोंद घ्यावी.

Shriram Sathe:	122.	Aryans: Who Were They? Bharatiya Itihasa Sankalana Samiti, Mysore, 1971
	123.	Bharatiya Historiography Bharatiya Itihasa Sankalana Samiti, 14/3 RT, LIGH Barkatpura Hyderabad 500 027
	124.	Facts About Aryans Hyderabad 500 027
	125.	European Secularism: Mother of Misconceptions
Vigil, A Public opinion Forum:	126.	Kashmir: Views by Eminent persons 49, Murthy Street, Madras 600 033
Warad Pande N.R. :	127.	The Nemisis of Nehru-Worship Sahitya Sindhu Prakashana Bangalore 560 001.
पवित्र कुर्आन :	१२८.	शांति प्रकाशन, हिदायत् सेंटर, बीबी अलाबि रस्ता, मंगळूर, ५७५००१

प्रत्येक सूर : (प्रकरणात) मध्ये, उदा. Everyman's Liabrary च्या इंग्लिश अनुवादामध्ये येणाऱ्या वचनांची (किंवा श्लोकांची) संख्या प्रत्येक आवृत्तीत कमी-जास्त झाली आहे.

मोतिचंद्र	१२९.	काशी का इतिहास, (हिंदी) विश्वविद्यालय प्रकाशन, चौक, वाराणसी- २२१ ००१

या कादंबरीतील काशीच्या गंगाघाटावर भेटलेल्या साधूचं बोलणं.

याज्ञवल्क्य स्मृती	१३०.	१.३४३, नाग पब्लिशर्स, दिल्ली १९८५
रघुवंशम्:	१३१.	४-४३. धर्मविजय नावाच्या ग्रंथाचे टीकाकार काश्मिरी विद्वान, वल्लभ देव.
Raghu Vamsham,ED	132.	H.D. Velankar, Nirnayasagar press, Bombay 1948 p.93
वेंकटाचार्य एन.एस.:	१३३.	कौटलीयार्थ शास्त्रं ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, म्हैसूर १७६ वे प्रकरण, १३ वे अधिकरण, ५ वा अध्याय आणि १२१ वे प्रकरण, ७ वे अधिकरण, १६ वा अध्याय.
नारायणाचार्य के.एस.:	१३४.	Relevance of Kautilya For Today Kautilya Institute of National Studies Mysore-570005.

135. "The Chachnama is Arab of Muslim genre writing, a 'pleasant story of conquest', the conquest of Sindu. But it is a bloody story, and the parts that get into the school books are fairy tales... History as selectiove as this leads quickly to unreality. Before Mohammed, there is blackness, slavery, exploitation. After Mohammed, there is light: slavery and exploitation vanish. But did it? How can that be said or taught? What about all those slaves sent back from Sindh to the Caliph? What about the descendants of the African slaves who about Karachi? There is no adequate answer. so the faith begins to nullify or overlay the real world"

V.S. Naipaul. Among the Believers6An Islamic Journey, 1981

'Is the c all for jihad against a particular people a religious right by those calling for it, or is it a human rights violation against the people on which jihad is declared and waged?

-Dr. John Garang. United Nations, Geneva, March 22, 1999.

Quoted in:

The Legacy of Jihad

Islamic Holy War and the Fate of Non-Muslims

Ed: by Andrew G. Boston, MD. Foreword by ibn Warraq

Prometheus Books 59 John Glenn Drive Amherst,

NewYork 14228-2197

The Complete Works of Swami Vivekananda:	136.	Advaita Ashrama, Mayavati Memorial Edition, Fourteenth Edition, 1972 Vol. I p. 183 to 185

"The Yogi teaches that the mind itself has a higher state of existence, beyond reason, a superconicious state, and when the mind gets to that higher state, then this knowledge, beyond reasoning, comes to man. Metaphysical and transcendental knowledge comes to that man. This state of going beyond reason, transcending ordinary human nature, may sometimes come by chance to a man who does not understand its science; he, as it were, stumbles upon it. When he stumbles upon it, he generally interprets it as coming from outside. So this explains why an inspiration, or transcendental knowledge, may be the same in different countries, but in one country it will seem to come through an angel, and in another through a Deva, and in a third through God. What does it mean? It means that the mind brought the knowledge by its own nature, and that the finding of the knowledge was interpreted according to the belief and education of the person through whom it came. The real fact is that these various men, as it were, stumbled upon this superconscious state.

"The Yogi says there is a great danger in stumbling upon this state. In a good many cases there is the danger of the brain being deranged, and as a rule, you will find that all these men, however great they were, who had stumbled upon this superconcious state without understanding it, groped in the dark and generally had, along with their knowledge, some quaint superstition. They opened themselves to hallucinatione. Mohammed claimed that the Angs. Gabriel came to him in a cave one day and took him on the heavenly horse, Harak, and he visited the heavens. But with all that, Mohammed spoke some wonderful truths. If you read the Koran, you find that most wonderful truths mixed with superstitions. How will you explain it? That man was inspired, no doubt, but that inspiration was, as it were, stumbled upon. He was not a trained yogi, and did not know the reason of what he was doing. Think of the good Mohammed did to the world, and think of the great evil that has been done through his fanaticism! Think of the millions massacred through his teachings, mothers bereft of their childern, childern made orphans, whole countries destoryed, millions upon millions of people killed!

"So we see this danger by studying the lives of great teachers like Mohammed and others. Yet we find, at the same time, that they were all inspired. Whenever a prophet got into the super conscious state by heightening his emotional nature, he brought away from it not only some truths but some fanaticism also, some superstition which injured the world as much as the greatness of the teaching helped. To get any reason out of the mass incongruity we call human life, we have to transcend our reason, but we must do it scientifically, slowly, by regular practice, and we must cast off all superstiton. We must take up the study of the superconscious state just as any other science. On reason we must have to lay our foundation, we must follow reason as far as it leads, and when reason fails, reason itself will show us the way to the highest plane. When you hear a man say 'I am inspired" and then talk irrationally, reject it. Why? Because these three states- instinct, reason, and superconciousness, or the unconscious, conscious and superconciousness state- belong to one and the same mind. There are not three minds in one man, but one state of it develops into the others. Instinct develops into reason, and reason into the transcendental consciousness; therefore, not one of the states contradicts the others. Real inspiration never contradicts reason, but fulfils it. Just as you find the great prophets saying, 'I came not to destory but to fulfil,' so inspiration always comes to fulfil reason, and is in harmony with it."

स्वामी विवेकानंदांच्या भाषणाचा अनुवाद :

“विचारापलीकडे एक उन्नत अवस्था आहे, असे योगी मानतो. मन जेव्हा त्या उन्नत अवस्थेत पोहोचते, तेव्हा तर्कातीत ज्ञान होते. अशा व्यक्तीला अति-भौतिक आणि अचिंत्य ज्ञानही प्राप्त होते. मानवाच्या स्वाभाविक स्थितीपलीकडे जायचा शास्त्रक्रम विचाराने समजला नाही, तरी काही वेळा तीही व्यक्ती अचानक त्या स्थितीपर्यंत पोहोचू शकते. याचे त्या व्यक्तीला नीट आकलन झाले नाही तर ती व्यक्ती तिथेच अडकून राहील. अशा वेळी ती व्यक्ती ‘हे कुठून तरी बाहेरून येते’ असे समजते. अशी स्फूर्ती किंवा अतिंद्रिय ज्ञान सर्वत्र एकच असले तरी वेगवेगळ्या देशात, धर्मात आणि लोकांमध्ये त्याचे विवरण वेगवेगळ्या पद्धतीने केले जाते; यामागे हेच कारण आहे. हे एखाद्या देवदूताकडून आले, असे काही देशात मानले जाते. एखाद्या देवाने दिले, असे आणखी एखाद्या देशात मानतात, तर ईश्वराकडून आले असे आणखीही कुणी मानते. याचा अर्थ काय? मनाने स्वाभाविक ज्ञान जाणले, पण त्यामागच्या कारणांचा शोध घेताना ज्या व्यक्तींमार्फत ते ज्ञान

प्रकट झाले, त्या व्यक्तींची श्रद्धा, विश्वास आणि ज्ञान यानुसार ते मांडले गेले. वस्तुस्थिती अशी, की या व्यक्ती त्यामागील कारणमीमांसा ठाऊक नसल्यामुळे या अतिंद्रिय अवस्थेत अडकून राहतात.

या स्थितीत अशा प्रकारे अडकून राहण्यात फार मोठा धोका आहे, असे योगी सांगतो. अशा प्रकारे अडकलेले अनेकदा वेडे होण्याची भीती असते. अशा प्रकारे अडकलेल्यांमध्ये– मग ते कितीही थोर असोत– काही ना काही प्रकारची अंधश्रद्धा असलेली तुम्हीही ओळखू शकाल. यांनी स्वत:ला विचित्र विकारांसमोर मोकळे करून ठेवलेले असते.

एक दिवस आपल्या गुहेत गेब्रियल नावाचा देवदूत आला आणि आपल्याला घोड्यावरून हराक नावाच्या देवापाशी घेऊन गेला, असे प्रवादी महंमदांनी सांगितले आहे. शिवाय महंमदांनी आश्चर्यचकित करणारे सत्यही सांगितले आहे! तुम्ही कुराण वाचलेत तर अशा प्रकारची अंधश्रद्धा आश्चर्यचकित करणाऱ्या सत्याच्या बरोबरीने दिसेल.

याचा कसा खुलासा कराल? प्रवादी महंमदांना स्फूर्ती किंवा अतिंद्रिय ज्ञान झाले होते हे खरे, पण ते अचानक अपघाताने प्राप्त झाले होते. योग्य मार्गाने, टप्प्या-टप्प्याने साधना करून झालेले ते योगी नव्हते. त्यामुळे आपल्या हातून जे काही घडत आहे, त्यामागील कारण त्यांना ठाऊक नव्हते.

प्रवादी महंमदांनी जगाच्या कल्याणाबरोबरच, याच जगाचे नुकसानही केले आहे, याचाही विचार करून पाहा! त्यांच्या उपदेशांमुळे धर्मांध झालेल्यांमुळे बळी पडलेले लक्षावधी लोक, मुले गमावलेल्या माता आणि माता-पिता गमावून अनाथ झालेली मुले, पूर्णपणे खाक झालेले देश आणि सामूहिकरीत्या देहदंड भोगलेल्या कोट्यवधी मानवांचा विचार करा.

थोडक्यात, प्रवादी महंमदासारख्या थोर प्रेषिताच्या जीवनचरित्राचा अभ्यास केल्यास आपल्याला या मार्गातील धोका लक्षात यायला हरकत नाही. हे सगळे स्फूर्त किंवा अचिंत्य ज्ञान प्राप्त झालेलेच. भावांचा उद्रेक होऊन प्रज्ञातीत अवस्थेत गेले आणि तिथून माघारी येताना काही सत्याबरोबरच धर्मांधताही घेऊन आले. त्यांच्या प्रमुख उपदेशाने या जगाचे जेवढे कल्याण केले आहे, तेवढेच त्यांच्या अंधश्रद्धांनी या जगाला दु:खही दिले आहे.

जीवन नावाच्या या असंबद्ध ढिगाऱ्यातून काही विचार मिळवायचा असेल तर आपल्याला या विचारांच्या कक्ष ओलांडून पुढे गेलेच पाहिजे. पण वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून, नियमित साधना आणि अध्ययन करत, सावकाश हा प्रवास झाला पाहिजे. सगळ्या अंधश्रद्धा निपटून काढल्या पाहिजेत.

विचाराच्या मार्गानेच आपण आपला पाया शोधला पाहिजे. जेथपर्यंत विचार आपल्याला घेऊन जाईल, तोपर्यंत आपण त्याच्या पाठोपाठ गेले पाहिजे. जेव्हा विचार हरेल, तेव्हा तोच पुढच्या मार्गाकडे निर्देश करेल.

कुणी 'मला अचिंत्य ज्ञान झाले आहे' असे सांगून अविचाराने बोलू लागले तर त्याचा तिरस्कार करा. त्याला नाकारा. का? कारण सहजप्रवृत्ती, विचार आणि अचिंत्य ज्ञान किंवा प्रज्ञातीत स्थिती या तिन्ही एकाच मानवाच्या मनाच्या तीन वेगवेगळ्या अवस्था आहेत, एकाच मानवाची तीन मने नव्हेत. सहजप्रवृत्ती विचारामध्ये विकसित होते आणि विचार प्रज्ञातीत अवस्थेपर्यंत जातो. त्यामुळे यापैकी कुठलीच स्थिती इतर स्थितींना विरोध करत नाही.

खरी प्रज्ञातीत अवस्था कधीही विचारांना विरोध करत नाही, करत नसते. उलट पूर्णत्व देते.

'मी येतो ते विध्वंस करण्यासाठी नव्हे, पूर्णत्व देण्यासाठी!' या महात्म्यांच्या उक्तीप्रमाणे प्रज्ञातीत अवस्था किंवा स्फूर्ती नेहमीच विचारांना पूर्णत्व देण्यासाठी येते, त्यांच्याशी समरस पावते."

ही यादी तयार होता होता लक्ष्मीला जाणवलं, आपण वाचलेल्या पुस्तकांपैकी ही तर फक्त एकचतुर्थांश यादी झाली! तिनं ठरवलं, यानंतरही आठवतील त्या ग्रंथांचा या यादीत समावेश करत राहिलं पाहिजे.